# यशवंतराव चव्हाण

## व्यक्तित्व व कर्तृत्व



गोविंद तळवलकर

Y.C.P LIBRARY
M923.60954/TAL
G02187

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री० यशवंतराव चव्हाण यांच्या असंख्य खळबळजनक घटनांनी परिपूर्ण असलेल्या जीवनाचे दर्शन त्यांच्या चित्रचरित्रात घडते. त्याची प्रस्तावना म्हणजे लिखित स्वरूपातील चरित्र नव्हे; तीत यशवंतरावांच्या जीवनातील ठळक प्रसंगांची माहिती आणि विवेचन आहे.

कऱ्हाड तालुक्यातील देवराष्ट्रे या लहानशा गावात एका गरीब कुटुंबात जन्म; नंतर शालेय जीवनातच राष्ट्रीय स्वातंत्र्य-आंदोलनात सहभाग व कारावास, कष्टपूर्वक शिक्षण, देश स्वतंत्र झाल्यानंतर तेव्हाच्या मुंबई प्रांतिक मंत्रिमंडळात संसदीय सचिव आणि नंतर द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री; मग देशाचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री इत्यादी नात्यांनी यशस्वी कारभार–असा यशवंतरावांचा राजकीय प्रवास झाला.

राज्य व देश यांच्या सरकारांपुढे ज्वलंत परिस्थिती उभी राहावी आणि ती शमवण्याची जबाबदारी यशवंतरावांनी पार पाडावी, असे होत गेले. हे या तीन पदांपुरते मर्यादित राहिले नाही, तर बांगलादेशाच्या युद्धामुळे निर्माण झालेल्या अवघड आर्थिक परिस्थितीतच अर्थमंत्रिपदही त्यांच्याकडे आले.

मुंबई राज्यातीलदोन प्रमुख भाषिकांत विश्वास निर्माण करणे, सैन्यदल व उच्च अधिकारपदस्थ यांचे मनोधैर्य वाढवणे आणि संसदीय जीवनास निर्माण होत असलेला धोका निवारणे, ही महत्त्वाची आणि कसोटी पाहणारी कामगिरी यशवंतरावांनी केली.

अखिल भारतीय काँग्रेसचा मन:पूर्वक स्वीकार अगदी तरुणपणीच केलेल्या यशवंतरावांनी पक्षनिष्ठेमुळे राजकीय व्यवहार दूषित केला नाही आणि एकांगीपणाही धारण केला नाही.

तीन पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळात सहकारी म्हणून वावरलेल्या यशवंतरावांना राजकीय जीवनात अवघड परिस्थितीशी मुकाबला करावा लागला. अधिकारपदांवर असताना त्यांनी लोकहिताच्या दृष्टीने कारभार केला.

सहकाराच्या माध्यमातून नवे जीवन फुलवण्याची ईर्षा व प्रयत्न होते. तसेच आर्थिक विकासाचा एकच एक मार्ग असल्याची दृष्टी नसल्यामुळे सरकारी, खाजगी आणि सहकारी उद्योगांचे स्वागत होत होते.

विविध देशांच्या विविध थरांतील अधिकारपदस्थांचा सहवास, त्या देशांतल्या लोकजीवनाची ओळख इत्यादींमुळे यशवंतरावांचे स्वदेशाचे प्रेम अधिक डोळस होत गेले. जे केले त्यापलीकडे जाण्याची त्यांना उमेद होती–पण परिस्थितीच्या मर्यादा नजरेआड झाल्या नव्हत्या

**किंमत पाचशे रुपये**



# यशवंतराव चव्हाण

## व्यक्तित्व व कर्तृत्व



# यशवंतराव चव्हाण

## व्यक्तित्व व कर्तृत्व

गोविंद तळवलकर

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G02187
DATE: 02/06/2012

3.60945



मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन ६७५

पहिली आवृत्ती
२२ एप्रिल २०१२

© २०१२, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

मुखपृष्ठ / सजावट
शुभानंद जोग

किंमत पाचशे रुपये

ISBN 978-81-7486-995-1

प्रकाशक
संजय वि० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
माधव द० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४



# दोन शब्द...

'यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व' हे पुस्तक यशवंतरावांच्या जन्मशताब्दीनिमित्त वाचकांसमोर ठेवताना मला विशेष आनंद होत आहे. प्रथमत: अशी संकल्पना होती की, मुख्यत्वे करून यशवंतरावांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांवर प्रकाश टाकणारी छायाचित्रे एकत्रित करून चित्ररूप चरित्राच्या स्वरूपात वाचकांपुढे ठेवावीत. त्याचबरोबर या छायाचित्रांतून उलगडणाऱ्या जीवनाचा अन्वयार्थ सांगण्याच्या दृष्टीने 'यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व' याचे निवेदन करणारी एक प्रस्तावना सुरुवातीस असावी. त्या दृष्टीने एकीकडे उपलब्ध छायाचित्रांमधून योग्य ती छायाचित्रे निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली व त्याचबरोबर यशवंतरावांचे निकटवर्ती आणि मराठीतील नामांकित पत्रकार व सिद्धहस्त लेखक श्री० गोविंदराव तळवलकर यांना चित्ररूप चरित्राची प्रस्तावना लिहिण्याची विनंती करावी असे ठरले. श्री० गोविंदरावांनीही या विनंतीस मान देऊन एक विवेचक प्रस्तावना अभ्यासपूर्वक लिहून दिली. त्यांचे वास्तव्य सध्या अमेरिकेत असते व प्रकृतीच्याही अनेक अडचणी आहेत. परंतु यशवंतरावांविषयीच्या आत्मीयतेमुळे या सर्व अडचणींवर मात करून त्यांनी प्रस्तावनेच्या रूपाने यशवंतरावांचे एक संक्षिप्त चरित्रच लिहिले आहे. त्यामुळे आपणांसमोर जे पुस्तक येत आहे त्याचे स्वरूप चित्ररूप चरित्राऐवजी सचित्र चरित्र असे झालेले दिसेल. हा बदल वाचकांच्या पसंतीस उतरेल याची मला खात्री वाटते.

यशवंतरावांचे जीवन म्हणजे देवराष्ट्रेसारख्या एका लहान गावातील व गरीब घरातील मुलाने आपल्या कुटुंबीयांच्या व मित्रांच्या मदतीने परंतु प्रामुख्याने स्वत:च्या हिमतीने, बुद्धिमत्तेने व कर्तृत्वाने राष्ट्रीय नेतृत्वाचे शिखर गाठण्याची जी किमया केली त्याची लक्षवेधक कहाणी. श्री० गोविंदरावांनी यशवंतरावांविषयीचे उपलब्ध साहित्य चिकित्सक नजरेने तपासून व काही नव्याने उपलब्ध झालेली माहिती नजरेखाली घालून प्रथमत: यशवंतरावांच्या देवराष्ट्रे व कराड येथील शालेय जीवनातील हकिकत मांडली आहे. तेथील भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीही कथन केली आहे. आणि तसे करताना विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रामध्यें जे विविध विचारप्रवाह प्रभावी होते व ज्यांचे संस्कार यशवतंरावांच्या संवेदनाशील मनावर होत होते त्यांचाही अर्थपूर्ण आढावा घेतला आहे. यशवंतरावांना पहिला कारावास घडला तो ते मॅट्रिक होण्यापूर्वीच. त्यांनीच लिहून ठेवल्याप्रमाणे हा कारावास म्हणजे त्यांच्यासाठी एक वैचारिक विद्यापीठ ठरले. त्यानंतर त्यांचे कोल्हापूरमधील महाविद्यालयीन शिक्षण व पुणे येथील कायद्याच्या पदवीसाठी केलेला अभ्यास आणि त्याच वेळी सातारा जिल्ह्यातील १९४२च्या चळवळीमधील सहभाग आणि या सर्व अनुभवांमधून यशवंतरावांची झालेली वैचारिक जडणघडण यावरही प्रकाशझोत टाकलेला आहे. यशवंतराव-वेणूताई विवाह, यशवंतरावांवर ओढवलेले कौटुंबिक आघात, १९४६ची निवडणूक व त्या वेळचे मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांच्या मंत्रिमंडळात संसदीय सचिव या पदावर यशवंतरावांनी केलेला प्रवेश, या सर्व घटना केवळ मालिकेप्रमाणे न मांडता त्या घटनांचा अन्वयार्थही सांगितलेला आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर यशवंतरावाच्या राजकीय जीवनानेही वेग घेतलेला दिसतो. विशेषत: फाझलअली आयोगाचा भाषावार प्रांतरचनेवरील अहवाल आणि त्यातून महाराष्ट्रात उठलेले वादळ, 'महाराष्ट्र व नेहरू यांची निवड करण्याची वेळ आली तर मी नेहरूंची निवड करीन' असे यशवंतरावांचे विधान व त्यासाठी सोसावी लागणारी तीव्र टीका आणि तिथून द्वैभाषिक राज्याचे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्यापर्यंतचा यशवंतरावांचा प्रवास आजच्या पिढीला फारसा परिचित नसला तरी आमच्या पिढीला तो ठळकपणे आठवणारा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील यशवंतरावांची भूमिका व त्या वेळच्या महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांच्या भूमिका हा सर्व भाग मुळातून वाचला पाहिजे.

१९६२च्या भारत-चीन संघर्षानंतर यशवंतरावांच्या जीवनाला एक वेगळे वळण मिळाले. आधीचे संरक्षणमंत्री श्री० कृष्ण मेनन यांच्या राजीनाम्यानंतर पं० नेहरूंनी संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची निवड केली व त्यानंतर २२ वर्षे कृष्णाकाठच्या यशवंतरावांनी यमुनातीरी दिल्लीच्या राजकारणात व्यतीत केली. हा सर्व कालावधी वाचकांसमोर जिवंत करताना श्री० गोविंदरावांनी यशवंतरावांचे मौलिक विचार, १९६९मध्ये राष्ट्रपतींच्या निवडणुकीमध्ये झालेल्या गुंतागुंती व समज-गैरसमज, १९७५मध्ये आणीबाणीच्या वेळी यशवंतरावांची झालेली कुचंबणा आणि यशवंतरावांसारखा महाराष्ट्राचा नेता राष्ट्राच्या पंतप्रधानपदापर्यंत पोचला नाही याविषयी मराठी माणसाला वाटणारी खंत, या सर्व बाबी वस्तुस्थितीच्या प्रकाशात विवेकपूर्ण समालोचन करून मांडलेल्या आहेत. त्यांचे विवेचन किंवा निष्कर्ष सर्वांनाच मान्य होतील असे नाही. परंतु आपल्या भूमिका मांडताना त्यांनी सर्व ठळक उपलब्ध माहितीचा आधार घेऊन विवेचन केलेले आहे. यशवंतरावांच्या आकस्मिक निधनानंतर आता जवळजवळ ३० वर्षे लोटली आहेत. त्यांच्या हयातीतील अनेक वावटळी आता शमल्या आहेत, वाद-विवादांचा धुरळा खाली बसला आहे. त्यामुळे काळाच्या विपरीत रीतीनुसार त्यांच्या जीवनातील अनेक घटना अधिक स्पष्टपणे दिसून त्यांच्याविषयी तारतम्याने निष्कर्ष काढणे शक्य झाले आहे. तसेच साधेपणा, राष्ट्रीय दृष्टिकोन, सुसंस्कृतपणा, संवेदनशीलता व परमतसहिष्णुता या राजकारणातच नव्हे तर इतर क्षेत्रांतही दुर्मिळ होत चाललेल्या गुणांमुळे जसजसा काळ जातो तसतशी यशवंतरावांच्या कर्तृत्वाला एक वेगळीच झळाळी येताना दिसते.

चरित्रलेखन ही लेखकाची सत्त्वपरीक्षाच असते! एकीकडे ऐतिहासिक वस्तुस्थितीशी प्रामाणिक राहून चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचे व कर्तृत्वाचे यथातथ्य वर्णन करावे लागते व त्या त्या काळातील घटना व विचारप्रवाह यांच्या संदर्भात चरित्रनायकाच्या कृतींचा अर्थ लावावा लागतो. थोर व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने त्या त्या कालखंडावर ठसा उमटवत असतात. परंतु त्यांच्याही जीवनाशी देशकालपरिस्थितीचा संबंध अनिवार्यपणे येतो. यशवंतरावांसारख्या राजकीय नेत्याच्या जीवनातील संघर्ष म्हणजे चरित्रलेखकाची कसोटीच असते. कारण त्या त्या संघर्षमय प्रसंगात चरित्रनायकाने घेतलेली भूमिका व तिचे यथायोग्य विवेचन करीत असतानाच चरित्रनायकावर किंवा त्या प्रसंगातील इतर नेत्यांच्या भूमिकेवर अन्याय होणार नाही याचीही दक्षता घ्यावी लागते. या सर्व दिव्यांमधून श्री० गोविंदरावांचे लिखाण तावूनसुलाखून निघेल असे वाटते.

या पुस्तकामध्ये यशवंतरावांची २२८ छायाचित्रे समाविष्ट केलेली आहेत. शक्यतो त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग व त्यांच्या कौटुंबिक व राजकीय जीवनातील महत्त्वाच्या व्यक्ती यांविषयींची छायाचित्रे समाविष्ट असावी असा प्रयत्न केलेला आहे. त्या काळच्या तंत्रज्ञानानुसार सर्व छायाचित्रे कृष्णधवल आहेत. काही छायाचित्रे कालौघात खराब झालेली आहेत. शक्य त्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी काही छायाचित्रे उत्तम दर्जाची नसतानादेखील त्यांचे ऐतिहासिक व प्रासंगिक महत्त्व लक्षात घेऊन ती ग्रंथात समाविष्ट केलेली आहेत.

जन्मशताब्दीच्या वर्षात प्रकाशित होणाऱ्या या सचित्र चरित्राच्या रूपाने यशवंतरावांचे जीवन व त्यांचे असामान्य कर्तृत्व पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेपुढे ठसठशीतपणे उभे राहील असा मला विश्वास वाटतो!

१२ मार्च २०१२.



# आभार

हरिदेव शर्मा हे दिल्लीच्या नेहरू ग्रंथालयाचे संशोधक ग्रंथपाल होते. या ग्रंथालयाने स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक नेत्यांच्या मुलाखती ध्वनिफितींवर घेतल्या आहेत. त्या इंग्रजीत आहेत. त्यांतील अनेक शर्मा यांनी घेतल्या होत्या. शर्मा यांनी यशवंतराव चव्हाण यांचीही दीर्घ मुलाखत घेतली आहे. तिच्या तर्जुम्याचा उपयोग केला आहे.

डॉ० जयंत लेले हे कॅनडात स्थायिक झालेले असून, ते किंग्स्टन येथील क्वीन्स विद्यापीठात राज्यशास्त्र इत्यादी विषयांचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. नंतर त्यांची त्याच विद्यापीठात सन्माननीय प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आहे. त्यांनी महाराष्ट्रातल्या राजकारणासंबंधी बरेच लिखाण केले असून, १९६०नंतर त्यांनी यशवंतरावांच्या अनेक मुलाखती ध्वनिफितींवर घेतल्या असून त्या अनेक तासांच्या आहेत. या इंग्रजीतील मुलाखती प्रसिद्ध झालेल्या नसून, त्यांच्या तर्जुम्याची पाने जवळजवळ आठशे होतात. डॉ० लेले यांनी ती मला दिली, हे साभार नमूद करत आहे. यशवंतराव चव्हाण यांची विधिमंडळातील भाषणे महाराष्ट्र सरकारच्या 'लोकराज्य' या प्रकाशनात प्रसिद्ध झाली होती. त्यावरून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने सीडी तयार केल्या आहेत. त्यांचा उपयोग प्रस्तावनेसाठी केला आहे.

भाऊसाहेब नेवाळकर यांच्या अप्रकाशित आत्मचरित्रातील, सातारा जिल्ह्यातील भूमिगत आंदोलनाबद्दलचा भाग त्यांचे चिरंजीव अनिल यांच्याकडून मिळाला.

**–गोविंद तळवलकर**


THE REVOLT IN TIBET
INSIDE EUROPE TODAY
MARY McCARTHY THE GROUP

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्र इथे १२ मार्च १९१३ रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील कराड शहरापासून जवळ असलेल्या या गावी यशवंतरावांचे आजोळ होते. त्यांच्या जन्माच्या वेळी गावाची लोकसंख्या केवळ दीडदोन हजारांपर्यंत होती. तथापि काही दशकांपूर्वी सातवाहनांच्या राज्यानंतर छोटीमोठी राज्ये उदयाला आली त्यांत देवराष्ट्र हे एक होते. त्याची राजधानी होती कौडिन्यपूर. नंतर तिचे नाव कुंडल पडले.

यशवंतरावांनी *कृष्णाकांठ* या आत्मवृत्तात्मक पुस्तकात देवराष्ट्रचे प्रारंभीच वर्णन दिले आहे. ते सांगतात की, देवराष्ट्रचे कुबेर असेही नाव होते आणि गावात कुबेरेश्वराचे देऊळ आजही आहे. नैऋत्येला सागरेश्वराचे मंदिर आणि खिड लागते. ती ओलांडल्यावर कृष्णेचे खोरे असून स्वातंत्र्योत्तर काळात तिथे आणखी सुबत्ता आली असली तरी पूर्वीच्या काळीही सुबत्ता होती. सागरेश्वराचे देऊळ-सागरोबाचे देऊळ म्हणून ओळखले जाते. त्याला लागूनच वाहणाऱ्या ओढ्याचे सोनहिरा असे मोहक नाव आहे.

गावात ज्यांची विहीर आहे आणि त्यामुळे बऱ्यापैकी शेती आहे, अशी पाचदहा कुटुंबे होती आणि थोडी व्यापार-उदीम करणारी. ही सोडली तर बाकी गरीब मराठा, सणगर, धनगर अशी जी कुटुंबे होती ती काबाडकष्ट करून जगत होती. शेती हा मुख्य व्यवसाय होता. यशवंतराव अशा शेजाऱ्यांत वाढत होते. त्यांचे कुटुंब गरीब होते. वडील बळवंतराव हे विट्याजवळ असलेली थोडी शेती पाहत. पण कोरडवाहू जमीन काही फारसे उत्पन्न देत नसे. तेव्हा नोकरीच्या शोधात बळवंतरावांना फिरावे लागले. पण नंतर त्यांना बेलिफाची नोकरी मिळाली. त्यांचे वडीलही बेलीफ होते. या नोकरीमुळे यशवंतरावांच्या वडिलांना फिरती असे, पण काही निश्चित उत्पन्न मिळत होते.

ज्ञानोबा, गणपतराव हे दोन भाऊ आणि राधाबाई ही बहीण अशी यशवंतरावांना तीन भावंडे होती. यशवंतरावांची पहिली शाळा देवराष्ट्र इथलीच. पण ते चार वर्षांचे असताना या कुटुंबावर मोठा आघात झाला. १९१७ सालात प्लेगची साथ आली होती आणि बळवंतराव देवराष्ट्र इथे आले ते आजारी होऊन. याच आजारात त्यांचे निधन झाले. यामुळे यशवंतरावांच्या आई विठाबाईवर आकाश कोसळले. घरात दुसरे मिळवते कोणी नव्हते. ज्ञानोबा तेव्हा सोळा-सतरा वर्षांचे होते. बळवंतरावांचे काम चांगले असल्यामुळे त्यांची बेलिफाची नोकरी ज्ञानोबा यांना देण्यात आली. परंतु देवराष्ट्र इथे राहणे शक्य नव्हते. तेव्हा विठाबाईंनी कराडला बिऱ्हाड हलवले. ज्ञानोबा काही रक्कम पाठवत, तीत विठाबाई काबाडकष्ट करून थोडी भर टाकत.

विठाबाई या निरक्षर होत्या, पण शिक्षणाचे महत्त्व जाणत होत्या. कोणाची नोकरी करायची नसेल तर करू नका, लोकांची कामे करायची असतील ती करा, पण शिक्षण सोडू नका; त्यामुळेच तुमचे भले होईल असे त्या आपल्या मुलांच्या मनावर बिंबवित असत. तेव्हा यशवंतरावांनी शिक्षणात खंड पडू देऊ नये, आपण घरखर्चाचे पाहू असे आश्वासन गणपतरावांनी दिले व ते अखेरपर्यंत पाळले. यामुळे आपली आई व आपले भाऊ यांचे ऋण यशवंतराव कधी विसरले नाहीत. तसेच ज्या गरीब खेडुतांत ते वाढले होते त्यांनाही ते विसरले नाहीत आणि यामुळे मोठमोठ्या अधिकारपदांवर चढूनही त्यांचे दार अशा लोकांना नेहमीच मोकळे राहिले. नंतरच्या काळात यशवंतराव समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली आले. पण त्या विचारात कष्टकरी जनतेच्या कल्याणाचा जो गाभा आहे त्याबद्दलची जाणीव ग्रंथवाचनाने तीव्र झाली असली तरी तिचा उगम स्वानुभवात होता.

यशवंतरावांवर त्यांच्या आईने आणखी एक संस्कार केला होता. तो म्हणजे कितीही संकटे आली तरी धीर न सोडता आशावादी राहण्याचा. विठाबाई संकटकाळी कधी डगमगल्या नाहीत आणि मुलांनीही धैर्य न सोडता संकटास तोंड दिले पाहिजे हा त्यांचा उपदेश होता.

नका, बाळांनो डगमगू,<br>चंद्र-सूर्यावरील जाई ढगू

जन्मस्थान : देवराष्ट्र (जिल्हा सांगली) येथील घर



ही ओवी त्या अनेकदा म्हणत. ती यशवंतरावांच्या मनावर कायम ठसली होती.

माध्यमिक शाळेत असताना आपल्या मनाची काय अवस्था होती याचे प्रत्ययकारी वर्णन यशवंतरावांनी थोडक्यात केले आहे. ते लिहितात, ''आम्ही मुले परावलंबी होणार नाही याचीही काळजी तिला (आईला) होती. पण तिने तसे कधी भासू दिले नाही. त्या लहान वयात मला ते थोडे फार समजत होते, पण त्यावरचा उपाय मात्र उमजत नव्हता–नियतीला जग केवळ सुखीही ठेवायचे नाही आणि दु:खीही बनवायचे नाही. श्रीखंडाच्या जेवणातही हिरव्या मिरचीची चटणी लागतेच; तरच त्या जेवणाला रुची येते आणि सुखाने श्रीखंड पोटभर खाता येते, पण त्या वेळी माझ्या पानात काहीच नव्हते. मोकळ्या ताटावर बसून भूक भागविण्याची आईची कला मला अवगत नव्हती. मनाच्या कोंडवाड्यातून बाहेर पडावे, धडपड करावी, शिकावे, आईचे ओझे कमी करावे असे नेहमी वाटे. परंतु जागच्या जागी पंख फडफडविण्याव्यतिरिक्त मी काही करू शकत नव्हतो. परिस्थितीचे कुंपण चारी बाजूंनी उभे होते–या कोंडीतून बाहेर निसटायचे एवढेच माझ्या समोर होते.'' (*यशवंतराव चव्हाण ऋणानुबंध,* पृ० १०)

या प्रकारच्या स्थितीत वाढणारी मुले पुढील काळात मनाने निबर होतात किंवा जरा परिस्थिती सुधारली तर ख्यालीखुशालीत मग्न होतात. एकप्रकारे सर्वतुच्छतावादी होण्याचाही संभव असतो. पण यशवंतरावांना यांपैकी कशाचीच बाधा झाली नाही.आशावादाला त्यांनी प्रयत्नवादाची जोड दिली. लहानपणी वाट्यास आलेल्या अनुभवांमुळे त्यांच्यात सावधानपणा आला आणि म्हणून त्यांनी मनाचा तोल जाऊ दिला नाही, असे म्हणावयास हरकत नाही.

यशवंतराव पदवी परीक्षेपर्यंत शिकले; वकिलीच्या परीक्षेतही यशस्वी होऊन काही काळ वकिली केली, पण स्वातंत्र्य चळवळीत सामील होऊन काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय होता होता, १९४६ साली ते गृहखात्याचे संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) झाले आणि पुढे द्वैभाषिकाचे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री; संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र अशा खात्यांचे मंत्री होत उपपंतप्रधानपदापर्यंत चढले. त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला एक विवेकी व सुसंस्कृत नेतृत्व लाभून महाराष्ट्राच्या जीवनावर त्यांनी आपला ठसा कायमचा उमटवला. या रीतीने कोणत्याही क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा आलेख काढायचा तर तिच्यावरील नुसते कौटुंबिक संस्कार पाहून चालत नाही, तर या संस्कारांबरोबरच त्या काळातील सामाजिक व राजकीय घडामोडींचाही संदर्भ लक्षात घेणे अगत्याचे असते. या अशा व्यापक पार्श्वभूमीवर यशवंतरावांच्या जीवनाचा व कर्तृत्वाचा आलेख काढायचा आहे.

यशवंतराव कराडला सातवी इयत्ता उत्तीर्ण झाले आणि मग माध्यमिक शाळेत त्यांनी प्रवेश केला. त्या काळात सातवी इयत्ता म्हणजे व्हर्न्याक्युलर फायनलची परीक्षा म्हणून ओळखली जात असे. ती झालेल्यास प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा होत होता. पण यशवंतराव याप्रमाणे शिक्षक होण्याची वाट पाहत नव्हते. त्यांना जितके शिकता येईल तितके शिकायचे होते. म्हणून ते कराडच्या टिळक विद्यालयात दाखल झाले. मराठी सातवी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास माध्यमिक शाळेच्या पहिल्या तीन इयत्तांची परीक्षा देण्याची मुभा होती. तशी परीक्षा दिल्यामुळे यशवंतरावांना इंग्रजी चौथ्या इयत्तेत प्रवेश मिळवता आला.

कराडची ही शाळा स्थानिक लोकांनी लोकमान्यांच्या स्मरणार्थ स्थापन केली होती. या शाळेतल्या विद्यार्थ्यांना पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात दर वर्षी होणाऱ्या वक्तृत्वस्पर्धेत भाग घेण्याची मुभा असे. त्याप्रमाणे १९३१ साली यशवंतरावांनी या स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यास दहा

मिनिटांचा वेळ मिळे. यशवंतरावांना विषय दिला होता, 'ग्रामीणसुधारणा'. त्यांचे भाषण परीक्षकांना इतके आवडले, की त्यांनी आणखी दहा मिनिटे दिली आणि यशवंतरावांना दीडशे रुपयांचे पहिले बक्षीस मिळाले. नंतरच्या काळात यशस्वी वक्ता म्हणून त्यांनी लौकिक मिळवला; त्याचा आरंभ वयाच्या सतराव्या वर्षी झाला होता.

यशवंतराव व त्यांचे काही मित्र यांनी शिवजयंती उत्सव साजरा करण्याचा उपक्रम कराडमध्ये याच सुमारास सुरू केला. या उत्सवात भजनाचे कार्यक्रम ठेवण्याची कल्पना निघाली आणि मग हे कार्यक्रम यशस्वी होत गेले. टाळ, मृदंग यांच्या साथीत भजन हा प्रकार या निमित्ताने आपल्याला ऐकायला मिळाला आणि त्याची आवड निर्माण झाली, असे यशवंतरावांनी लिहिले आहे. कृष्णा बागणीकर, भागवत हणबरवाडीकर, म्हैसूरकर महाराज, औंधचे आंधळे पण नाणावलेले मृदंगवादक दाजी गुरव अशांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असत. या अशा कार्यक्रमांसाठी कराडच्या आसपासचे लोकही हजर असत. यानंतर आपले मित्र काशिनाथपंत देशमुख यांच्याबरोबर भजनाचे अनेक कार्यक्रम यशवंतरावांनी सुटीत ऐकले. यातून संगीताची आवड निर्माण झाली व ती वाढत गेली. यामुळे यशवंतरावांना रागदारीचेही ज्ञान झाले. पुढील काळात ही आवड त्यांनी जोपासली. नाटकाचाही छंद याच वेळेला लागला. कराडला वर्ष-दीडवर्षांनी 'आनंदविलास' नाटक कंपनी येत असे. तिची नाटके यशवंतरावांनी कधी चुकवली नाहीत. दीनानाथ मंगेशकर, रघुवीर सावकार इत्यादींची नाटके यशवंतरावांनी कराडमध्येच पाहिली. नाटके पाहता पाहता आपणही नाटकात काम करावे अशी इच्छा निर्माण होऊन, शाळेतल्या संमेलनात *माईसाहेब* या नाटकात त्यांनी एक भूमिकाही केली.अधिक चांगली नाटके पाहण्याची इच्छा कोल्हापूरला केशवराव दाते यांचे नाटक पाहून पुरी करता आली.

नाटकाप्रमाणे तमाशाही मित्रांसमवेत पाहण्याची संधी यशवंतरावांनी सोडली नाही. संगीत, भजन, नाटक यांप्रमाणेच कुस्त्यांचे फड हा यशवंतराव व त्यांचे मित्र यांचा आवडीचा कार्यक्रम होता. तथापि तालमीत जाऊन नियमित व्यायाम करण्याचे मात्र त्यांनी टाळले होते. ही कसर ते पोहून भरून काढत. या रीतीने ग्रामीण भागात वा कराडसारख्या मध्यम शहरात त्या वेळी करमणुकीचे हे जे कार्यक्रम होत असत, त्यांचे आकर्षण यशवंतरावांना होते आणि हाही संस्कार महत्त्वाचा होता.

माध्यमिक शाळेत असताना यशवंतराव केवळ वृत्तपत्रवाचनावर समाधान मानत नव्हते. त्यांनी पुस्तक वाचनावर भर दिला. मिळतील ती पुस्तके ते वाचत होते. सुटीत देवराष्ट्रास गेले तर पुस्तकांचा संच बरोबर नेण्यास ते विसरत नसत. स्वातंत्र्यपूर्व काळात–साधारणत: माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत–चालू राजकारणासंबंधी उत्सुकता असल्याचे दिसून येईल. यशवंतरावांच्या ठिकाणी ही उत्सुकता बरीच होती. यामुळे स्थानिक वृत्तपत्रांच्या वाचनावर संतोष न मानता पुण्या-मुंबईहून येणाऱ्या वृत्तपत्रांचे वाचन ते नियमितपणे करत होते. त्यातच सातारा जिल्ह्याची ऐतिहासिक परंपरा मोठी होती आणि तिची वारंवार जाणीव व्हावी असे प्रसंगही येत असत.

ही ऐतिहासिक परंपरा शिवाजी महाराजांपासून सुरू होते. जिल्ह्यातील प्रतापगड व सज्जनगड हे शिवाजी राजांच्या काळातील पुरुषार्थाचे सतत स्मरण देत. पुढील काळात शाहू महाराजांनी साताऱ्यलाच छत्रपतींची गादी आणली. एल्फिन्स्टनने पेशव्यांचा पराभव करून ईस्ट इंडिया कंपनीची राजवट स्थापन केली. मग पुणे व आसपासच्या जनतेला राजी राखण्याचे प्रयत्न त्याने केले. पुणे, नाशिक, वाई इत्यादी ठिकाणी त्याने शास्त्री-पंडितांना दक्षिणा वाटल्या. तसेच त्याने मराठा समाज राजी राखण्याच्या हेतूने



पिताश्री बळवंतराव चव्हाण–मूळ गांव भाळवणी, तालुका खानापूर, जिल्हा सांगली



मातोश्री विठामाता बळवंतराव चव्हाण–देवराष्ट्र येथील दाजीबा घाटगे यांची बहीण

सातारच्या गादीवर भोसले कुळातील व्यक्तीला बसवण्याचे ठरवून त्याप्रमाणे मोठा समारंभ घडवून आणला. या रीतीने प्रतापसिंह महाराज छत्रपतींच्या गादीवर स्थानापन्न झाले. प्रतापसिंह महाराज तरुण होते, पण एल्फिन्स्टनवर ते प्रभाव टाकू शकले.

निवृत्त होऊन एल्फिन्स्टन स्वदेशी परतला तरी त्याचे भारतातील घडामोडींकडे लक्ष होते. लॉर्ड डलहौसी हा गव्हर्नर-जनरल असताना त्याने भारतातल्या संस्थानांबद्दलचे धोरण बदलून, कोणत्या ना कोणत्या कारणाने एकेक संस्थान खालसा करण्याचे सत्र सुरू केले. सातारचे राजे प्रतापसिंह हे ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड करण्यासाठी शिपायांना चिथावणी देतात असा डलहौसीचा आरोप होता. पण प्रतापसिंह महाराजांनी तो नाकारला. त्यांनी चौकशीला सामोरे जाण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव त्यांना पदच्युत करण्यात आले आणि त्यांच्या जागी त्यांच्या भावाला बसवण्यात आले. तो मोठ्या आजाराने आजारी झाल्यामुळे त्याने वारस नेमण्याची परवानगी मागितली. ती नाकारण्यात येऊन डलहौसीने सातारा संस्थानच खालसा केले.

डलहौसीचे हे धोरण एल्फिन्स्टनला मंजूर नव्हते. त्याने हिंदुस्थानातील संस्थानासंबंधी बराच मोठा लेख लिहिण्यासाठी टिपणे केली होती. त्यांत प्रतापसिंह महाराजांसंबंधी बरीच टिपणे असल्याचे एल्फिन्स्टनचा चरित्रकार कोलब्रूक याने नमूद केले आहे. एल्फिन्स्टन इतका नाराज झाला होता, तर भारतात किती नाराजी असेल याची कल्पना केलेली बरी. भास्कर पांडुरंग तर्खडकर हे कंपनीच्या कारभाराचे टीकाकार होते. त्यांनी लिहिले, की हिंदुस्थानातल्या कोणत्याही राजापेक्षा प्रतापसिंह यांना राजकीय जाण

अधिक आहे. त्यांना दूर करून दुर्बल व्यक्तीला गादीचा वारस करून कंपनी सरकारने काय साधले? नंतरच्या काळात साताऱ्याच्या संस्थानाचे पुनरुज्जीवन करावे म्हणून रंगो बापूजींनी अविश्रांत परिश्रम केले, पण त्यांना यश आले नाही.

कंपनी सरकारच्या राजवटीशी सहकार्य न करता, तिच्याविरुद्ध बंडाचे निशाण उभारण्यात उमाजी नाईक पुढे होता. त्याचे हे बंड सातारा जिल्ह्यातच झाले. तो रामोशी जातीचा होता. या जातीचे लोक तेलंगणातून महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाले होते आणि शिवाजी महाराजांच्या सैन्यात या जातीचे काही लोक होते. पण कंपनीची राजवट आल्यावर रामोशांचा नेता उमाजी नाईक याने बंड केले. परंतु सरकारशी संघर्ष करताना उमाजी नाईक मारला गेला. सातारा जिल्ह्यांतील ब्रिटिश सरकारविरुद्ध झालेले आणखी एक बंड म्हणजे वासुदेव बळवंत यांचे. त्यांनीही खेड्यापाड्यांतील गरीब लोक जमवून सशस्त्र उठाव केला होता. नंतरच्या काळात १८५७चा उठाव मुख्यत: उत्तर भारतात झाला होता, तरीही महाराष्ट्र, दक्षिण भारत यातही अनेक ठिकाणी सशस्त्र उठाव झाले होते. ५७ सालच्या उठावास अनेक प्रकारे मदत देणारे गट, कोल्हापूर आणि सातारा या भागात संघटित झालेले दिसतील.

इंग्रजी राज्य स्थिरावल्यावर इंग्रजी-शिक्षित पिढी पुढे येऊ लागली आणि मग १८८५ साली अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना झाली. तीत लवकरच जहाल व नेमस्त असे तट पडले. या दोन्ही गटांचे पाठिराखे सातारा जिल्ह्यात होते. या विचारपंथांचे नेते मुंबई-पुण्याहून साताऱ्यास येत; त्यांची व्याख्याने होत. लोकमान्य टिळक सातारला भाषणासाठी आले होते. तर मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या निमित्ताने लोकमान्य व गोपाळ कृष्ण गोखले यांचा सातारा जिल्ह्यातील कर्त्या लोकांशी संपर्क होता. कराडचाही याच कारणास्तव मुंबई पुण्याच्या पुढाऱ्यांशी संपर्क येत असे. नरसिंह ऊर्फ तात्यासाहेब केळकर हे सातारचे. ते लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'त साहाय्यक म्हणून पुण्यास गेले. पण त्यांचा जिल्ह्याशी नित्य संबंध येत होता. ते व शिवरामपंत परांजपे यांची १९२० नंतर कराडमध्ये जी भाषणे झाली, ती यशवंतरावांना अगदी लहान वयात ऐकण्यास मिळाली होती. वाईत नारायणशास्त्री मराठे यांनी प्राज्ञपाठशाळा स्थापन केली होती. ती निव्वळ प्राच्यविद्येचा अभ्यास करण्यासाठी नव्हती, तर तीत स्वदेशी, स्वावलंबन व राष्ट्रवाद यांचीही संथा मिळत होती. या प्राज्ञपाठशाळेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दिनकरशास्त्री कानडे, परचुरेशास्त्री असे विद्वान तयार झाले होते आणि ते लोकशिक्षण व जागृतीचे महत्त्वाचे काम करत होते.

काँग्रेसचा हा एक राष्ट्रीय प्रवाह होता तसा आणखी एक विचारप्रवाह महाराष्ट्रात होता. तो सत्यशोधक समाजाने प्रवर्तित केला होता. नंतर याचेच रूपांतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीत झाले. या चळवळीचा बराच प्रसार सातारा जिल्ह्यात झाला होता. किंबहुना, तो जिल्हा सत्यशोधक समाजाचा मुख्य आधार होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यशवंतरावांचे वडीलभाऊ गणपतराव हे या समाजाचे वा ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे एक सक्रिय कार्यकर्ते होते.

कराडमध्ये तेव्हा भाऊसाहेब कळंबे या नावाची एक महत्त्वाची व्यक्ती होती. यशवंतरावांनी लिहिले आहे की, कळंबे उत्तम शिक्षक होते. पण त्यांचा क्रांतिकारकांशी संबंध असल्याचा सरकारला संशय असल्यामुळे त्यांना शाळा सोडावी लागली. मग त्यांनी कराडमध्ये 'विजयाश्रम' या नावाची संस्था स्थापन केली. सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने शिक्षण देणे हा या संस्थेचा हेतू होता.



बंधू ज्ञानोबा बळवंतराव चव्हाण



भगिनी श्रीमती राधाबाई



बंधू गणपतराव बळवंतराव चव्हाण

कळंबे यांच्याकडे कराड तालुक्याप्रमाणे वाळवे व पाटण तालुक्यातील अनेक जण येत असत व त्यांच्या चर्चा सत्यशोधक समाजाच्या विचारांबद्दल होत असत.

कळंबे हे शिल्पकार होते व त्यांनी संगमरवरी मूर्तीही बनवल्या होत्या. यशवंतराव सांगतात की कळंबे हे स्थिर बुद्धीचे नसल्यामुळे एक काम चालू असता नवी कल्पना सुचली की ते तिचा पाठपुरावा करत. त्यांच्या विजयाश्रमात यशवंतरावांचे वडीलभाऊ गणपतराव शिक्षणासाठी दाखल झाले होते. सत्यशोधक समाज व त्यातून निर्माण झालेली ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ यांमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर दूरवरचे परिणाम झाले होते; आणि म्हणून त्याचा जरा तपशिलात जाऊन परामर्श घेणे अगत्याचे आहे. 'ब्राह्मणेतर संघ' या नावाने एक संघटना १२ डिसेंबर १९२० रोजी पुण्यात जेधे मॅन्शनमध्ये स्थापन झाली आणि राजकीय कार्य तिच्यातर्फे होऊ लागले. या संघाचे लोक सत्यशोधक समाजाशी निगडीत होते. सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर चळवळ हे वासाहतिक समाजातील एक सांस्कृतिक बंड होते, असे वर्णन या विषयावर अभ्यासपूर्वक लिखाण करणाऱ्या गेल ऑम्वेट यांनी त्यांच्या पुस्तकात केले आहे. या उठावाचे स्वरूप व परिणाम केव्हाही अभ्यसनीय ठरतात.

सत्यशोधक समाजाचे संस्थापक होते महात्मा जोतिबा फुले. त्यांचा जन्म झाला १८२७ साली. म्हणजे मराठी राज्य संपुष्टात येऊन ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य आल्यावर नऊ वर्षांनी. अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना १८८५मध्ये झाली, यापूर्वी देशाच्या काही भागांप्रमाणे महाराष्ट्रात काही व्यक्ती, संघटना स्थापन करून निरनिराळी समाजसेवेची व जागृतीची कामे करत होत्या. जोतिबांनी बहुजन समाजात, विशेषत: स्त्रियांत, शिक्षणाचा प्रसार करण्यास प्राधान्य दिले. यासाठी त्यांनी १८४८ व ५१ या सालांत शाळा काढल्या. जोतिबा जातिभेदाचे विरोधक असल्यामुळे त्यांनी हरिजनांत शिक्षणाचा प्रसार करण्याचे ठरवून, दलित समाजातल्या मुलींसाठी १८५२मध्ये शाळा काढून एक क्रांतिकारक पाऊल टाकले होते. ही शाळा जोतिबांच्या पत्नी सावित्रीबाई या चालवीत. हे आणखी एक क्रांतिकारक पाऊल होते.

उल्लेखनीय गोष्ट ही की, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या सुधारक विचाराच्या काही ब्राह्मणांची जोतिबांना या शाळांच्या बाबतीत मदत झाली होती. न्यायमूर्ती रानडे यांनी जोतिबांच्या शाळेला शिष्यवृत्तीसाठी काही रक्कम दिल्याचे भास्करराव जाधव यांनी नमूद केले आहे.

जोतिबांच्या जीवनात १८७३ साल हे बरेच महत्त्वाचे ठरले. याच वर्षी त्यांचे *गुलामगिरी* हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. पुराणादी ग्रंथांच्या रूपाने ब्राह्मणांनी खोटा इतिहास लिहिला असल्यामुळे इतिहासाचे सत्य स्वरूप मांडले पाहिजे असे जोतिबांचे प्रतिपादन या ग्रंथात आहे. त्यांचे कार्यक्षेत्र पुणे व मुंबई असे होते. जोतिबांना मराठा समाजातून पाठिंबा मिळू लागला होता, तसेच मुंबईत तेलगू, माळी समाजाचाही मिळाला. माळी समाजातले जोतिबांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांच्या साहाय्याने त्यांनी 'दीनबंधु' हे पत्र सुरू केले. त्यानंतर आठ वर्षांनी हे पत्र कामगारांची संघटना बांधणाऱ्या नारायणराव लोखंडे यांनी चालवायला घेतले. जोतिबांचा लोखंडे यांच्या कार्यात सहभाग होता. सत्यशोधक समाजाचे कार्य पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यामधील ओतूर या बाजारपेठेच्या गावात सुरू झाले आणि तीन वर्षांत जोतिबांनी *शेतकऱ्याचा असूड* हे महत्त्वाचे पुस्तक लिहिले. शेतकरी समाजाच्या दुर्धर आर्थिक व धार्मिक अवस्थेचे वर्णन यात आले आहेच, पण ही अवस्था का आली, याची मीमांसा करून ती सुधारण्यासाठी उपाययोजना यात सुचवली आहे.

सरकारने १८७६ साली पुण्यात नगरपालिकेची स्थापना केली तेव्हा जोतिबांची एक सभासद म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तेव्हापासून सहा वर्षे ते नगरपालिकेचे सभासद होते. तथापि त्यांनी १८८२मध्ये शिक्षणसुधारणा करण्यासाठी सरकारने नेमलेल्या हंटर समितीपुढे दिलेली साक्ष लक्षणीय होती. उच्च शिक्षणाचा प्रसार करावा म्हणजे हे शिक्षण घेतलेले, समाजाच्या अनेक थरांत शिक्षणाचा प्रसार करतील असे विचार मांडले जात होते. पण या प्रकारे उच्च शिक्षण घेतलेल्या कितीजणांनी शिक्षणप्रसाराचे काम केले व बहुजनसमाजास त्याचा कितपत लाभ झाला, असा सवाल उपस्थित करून सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास प्राधान्य देण्याचा आग्रह जोतिबांनी आपल्या साक्षीत धरला. जोतिबांनी हेही दाखवून दिले की, प्राथमिक शिक्षणच बहुजनसमाजापर्यंत पोचत नसल्यामुळे व उच्च शिक्षण घेण्याची ऐपत बहुजनसमाजातील फारच थोड्या कुटुंबांत असल्यामुळे, उच्च शिक्षणाचा लाभ या समाजातल्या मुलांना मिळणे दुरापास्त असते. म्हणून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हे पायाभूत तत्त्व हवे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, गोपाळ कृष्ण गोखले यांचाही हाच दृष्टिकोण होता. म्हणून त्यांनी तेव्हाच्या केंद्रीय विधिमंडळात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचे विधेयक मांडले होते. यासाठी त्यांनी व त्यांच्या भारत सेवक समाजाने बराच प्रचारही केला होता. तथापि गोखले यांच्या प्रयत्नांचे स्वागत करूनही ब्रिटिश सरकारने सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा खर्च परवडणार नाही अशी बाजू मांडून, विधेयक स्वीकारण्यास नकार दिला.

जोतिबांनी शेतकरी गरीब का झाला, त्याची सर्व बाजूंनी नाडवणूक कशी होते याची मीमांसा करताना, हिंदू समाजाच्या धार्मिक परंपरेचेच कठोरपणे विश्लेषण केले. त्यांनी वेदान्तालाच आव्हान दिले. याच संदर्भात त्यांनी वर्णव्यवस्थेवर हल्ला केला. जोतिबांनी वेद, श्रुतिस्मृती इत्यादी नाकारली आणि वेद अपौरुषेय आहेत हे एक थोतांड ठरवले. पुराणांमुळे प्राचीन काळाच्या इतिहासाची थोडीशी कल्पना येण्यास मदत होईल. पण वेद व पुराणे हे खरे ज्ञान नव्हे. जोतिबांच्या पाच वर्षे अगोदर जन्मलेल्या लोकहितवादींची हीच विचारसरणी होती. जे ज्ञान प्रयोगसिद्ध नाही ते खरे ज्ञान नव्हे असे सांगून,

लोकहितवादींनी घटपटाची नसती खटपट करणे व्यर्थ असून, आधुनिक पाश्चात्त्य विद्या आत्मसात करण्याची आवश्यकता प्रतिपादली होती. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी या आधी हीच भूमिका घेऊन पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांचे व इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याचा आग्रह धरला होता.

इराणसारख्या देशातून ब्राह्मण इकडे आले आणि त्यांनी एतद्देशीय लोकांवर मात करून आपले वर्चस्व स्थापन केले. मग त्यांनी जी समाजव्यवस्था निर्माण केली ती इथल्या मूळ लोकांवर अन्याय करणारी होती. जातींची उतरंड रचण्यात येऊन शिवाशिवीचा प्रघात सुरू झाला. वेद व पुराणे ही एतद्देशीयांना वाचण्यास बंदी करण्यात आली. या रीतीने आर्थिक व सामाजिक बाबतीत अन्यायकारक व्यवस्था करून ब्राह्मणांनी धार्मिक कर्मकांड तयार केले व शूद्रांना मानसिक गुलामगिरीत ठेवण्याचा घाट घातला, अशी जोतिबांनी मीमांसा केली होती. इंग्रजी राजवटीमुळे जे बदल झाले आहेत त्याचा फायदा घेऊन शूद्रांनी शिक्षणाच्या द्वारे आपली उन्नती करून घ्यावी असा त्यांनी संदेश दिला.

जोतिबा, ब्राह्मण या शब्दापेक्षा धूर्त आर्य भट असे बहुतेक वेळी म्हणताना दिसतील. अस्पृश्यता ही या आर्य भटांनी निर्माण केल्याचे सांगून, ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध देशात अनेक ठिकाणी प्रतिकार झाले. गौतम बुद्धाचा धर्म हा या प्रतिकाराचाच भाग होता असे जोतिबा मानत. ते बुद्धाचा उल्लेख सांख्यमुनी असा करत. सांख्यमुनींनी अस्पृश्यांना जवळ केले कारण ते जातिभेदाच्या विरुद्ध होते असा निष्कर्ष जोतिबांनी काढला. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनाही यामुळे बौद्धमताचे आकर्षण वाटू लागले आणि अखेरीस त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

बाबासाहेबांनी रामानुजाचार्यांचे उदाहरण दिले आहे. रामानुजांनी जातिभेद व अस्पृश्यता मानली नाही तर चैतन्यांनी पुरीचे मंदिर अस्पृश्यांसह सर्वांना खुले केले होते व नंतरही ती परंपरा टिकली. महाराष्ट्रात हे झाले नाही. भागवत धर्म व संतमंडळी यांनी धार्मिक समतेचा संदेश दिला असला तरी सामाजिक समतेचा त्यात समावेश नव्हता, हे जोतिबा व डॉ० आंबेडकर दाखवून देत होते. याचे कारण या दोघांच्या मते भागवत धर्माने वैदिक धर्म मानला होता. यामुळेच आर्य समाज हा जरी जातीपातीच्या विरुद्ध होता तरी वेदप्रामाण्य मानणारा असल्यामुळे जोतिबा आर्यसमाजाबद्दल आत्मीयता बाळगत नसत. जोतिबांनी कोणत्याच प्रस्थापित धर्माचा आधार न घेता सत्य धर्माचा पुरस्कार केला. त्यांना मूर्तिपूजा अमान्य होती म्हणून त्यांनी विश्वाचा कर्ता असा एक निर्मिक असल्याचे मानले. या निर्मिकाची उपासना करण्यासाठी पुजारी इत्यादींच्या मध्यस्थीची गरज नाही; सर्व माणसे समान आहेत; त्यांना समान संधी मिळाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. यामुळे सत्यशोधकी विवाहादी विधी पुरोहिताशिवाय करण्याचा प्रघात त्यांनी पाडला.

देशातील बहुसंख्य सामान्य लोक शेती करणारे असून, त्यांच्या हलाखीबद्दल जोतिबा कळवळून लिहीत असत. शेतकऱ्यांच्या हलाखीची त्यांनी केलेली वर्णने प्रत्ययकारी आहेत. तसे पाहिले तर न्यायमूर्ती रानडे, अर्थशास्त्रज्ञ गणेश व्यंकटेश जोशी यांनी शेतकरी व शेती यांच्यासंबंधी भरपूर लिखाण केले होते. शेतीत भांडवलपुरवठा करण्याची गरज असून चार टक्क्यांपेक्षा अधिक दराने व्याज न घेता कर्जपुरवठा करावा; शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था योग्य प्रकारे करावी असे रानडे सांगत असत. त्यांनी व जोशी यांनी सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकातून या मताचा पाठपुरावा केला होता. लोकमान्य टिळकांनी 'केसरी'तून शेतकऱ्यांची बाजू अशाच प्रकारे मांडली. रानडे व टिळक यांनी दुष्काळात शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले. शेतकऱ्यांना द्यावा लागणारा सारा किती डोईजड आहे, याची चर्चा या दोघांनी



यशवंतराव बळवंतराव चव्हाण

केली तर गोखल्यांनी विधिमंडळात अशीच बाजू मांडली. असे असले तरी रानडे, टिळक, गोखले यांची व जोतिबांची हातमिळवणी होऊन एकत्रितपणे शेतकऱ्यांची बाजू मांडण्याचे प्रयत्न झाले नाहीत, याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. किंबहुना, हीही आश्चर्याची बाब आहे की, महाराष्ट्रातील तत्कालीन नेत्यांनी जोतिबांचे कार्य व विचार यांची दखलच घेतली नाही. ती तशी तेव्हा दखल घेतली नाहीच, शिवाय नंतरच्या काळात महाराष्ट्रात समाजवादी पक्ष स्थापन झाला असतानाही त्याने जोतिबांचा विचार केला नाही. नानासाहेब गोरे यांनी ही उणीव मान्य करून म्हटले होते की, आम्ही (म्हणजे समाजवाद्यांनी) मार्क्सचा अभ्यास केला, पण जोतिबांकडे उशिरा वळलो.

पुण्यात १८९५मध्ये काँग्रेसचे अधिवेशन भरले असताना मंडपाबाहेर गरीब शेतकऱ्याचे चित्र असलेला फलक कोणीतरी लावला होता व लोकमान्यांनी त्याचा उल्लेख करून, काँग्रेसने शेतकऱ्यांच्या समस्या निवारण्याच्या दृष्टीने कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. तो फलक जोतिबांनी वा त्यांच्या प्रेरणेने लावला होता असे मानले जाते. तेव्हा नेत्यांनी जोतिबांच्या या कार्यास साहाय्य करण्यास हरकत नव्हती. त्यांची सामाजिक व धार्मिक मते अमान्य असली तरी बहुजन समाजात एक नवा विचार मूळ धरत असताना त्याची नेत्यांनी गंभीर दखल घेण्याची अपेक्षा व्यर्थ नव्हती. केवळ नवा विचारच जोर धरून नव्हता तर सत्यशोधक समाजाला मिळणारा पाठिंबा वाढत होता. परंतु महाराष्ट्रातल्या तेव्हाच्या काँग्रेस नेत्यांनी जोतिबांच्या कार्याचे महत्त्व जाणले नव्हते, तर काँग्रेसबद्दल जोतिबांनाही आत्मीयता नव्हती. काँग्रेसचे धोरण व कारभार हा वरिष्ठ वर्गास व जातीस पोषक असल्याचे त्यांचे मत होते. काँग्रेस लोकप्रतिनिधींच्या हाती अधिकाधिक सत्ता देण्याची मागणी करत होती. जोतिबांचे म्हणणे असे होते की, मर्यादित मतदानाचा हक्क असल्यामुळे खरे लोकप्रतिनिधी निवडून येणार नाहीत आणि वरिष्ठ जातीच प्रबळ होतील. जोतिबांनी लिहिले, ''न्याशनल काँग्रेसांत समंजस असा शूद्रादि अतिशूद्र कधींच सामील होणार नाहीं, असे मी खात्रीनें सांगतो कारण, तसे केल्यानें आमच्या दयाळू इंग्रज सरकारचे शूद्रादि अतिशूद्राविषयीं मन विटणार आहे.'' अर्थात तसे झाले नाही. महात्मा गांधींच्या नेतृत्वाच्या प्रभावामुळे बहुजनसमाज काँग्रेसकडे आकर्षित झाला.

जोतिबांच्या विचारांचा व कार्याचा आढावा घेऊन मे० पुं० रेगे यांनी केलेले विवेचन उल्लेखनीय आहे. रेगे लिहितात, ''जोतिबांच्या धर्मविषयक विचारांत अनेक काहीसे परस्पर विसंगत असे घटक आहेत. पण त्यांची तर्कशुद्ध व सुसंगत बांधणी करण्याचे प्रयत्न त्यांनी केलेले दिसत नाहीत. जोतिबा स्वत: तत्त्ववेत्ते किंवा अभ्यासक नव्हते. ते कृतिशील समाजसुधारक होते. तेव्हा त्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले तर ते समजू शकते. पण महाराष्ट्रात नवीन सामाजिक विचार मांडण्यात आला आणि त्याला अनुसरून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन करण्यात आले. पण एक सुसंगत आणि समावेशक सामाजिक तत्त्वज्ञान निर्माण करण्याचे प्रयत्न फारसे झाले नाहीत. आपले बौद्धिक जीवन क्षीण होते ह्याचे ही वस्तुस्थिती एक गमक आहे.''(*विवेक आणि न्याय*, पृ० ५५.)

मुंबईत १८८८मध्ये बहुजनसमाजाची प्रचंड सभा भरून जोतिबांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना महात्मा ही पदवी देण्यात आली. त्यानंतर दोनच वर्षात त्यांचे निधन झाले. जोतिबांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे कार्य थोडे मंदावले होते. पण १८९४मध्ये कोल्हापूर संस्थानचे राजे म्हणून छत्रपती शाहू महाराज यांना पूर्ण अधिकार मिळाले. त्यांच्यामुळे बहुजनसमाजास एका प्रमुख नेत्याचा लाभ झाला. पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था ब्राह्मण पुढाऱ्यांनी स्थापन केली होती. त्यांनी शाहू

महाराजांची मदत मागितली असता महाराजांनी ती दिली होती. असे असले तरी थोड्याच काळात महाराजांनी सत्यशोधक समाजाचे धुरीणत्व अनौपचारिकरीत्या सांभाळल्यावर वातावरण बदलत गेले.

सत्यशोधक समाजाच्या कार्याला १९१०नंतर गती आलेली दिसेल आणि शाहू महाराजांचा सहभाग यातील महत्त्वाचा घटक होता. महाराजांनी बहुजनसमाजाला पुढे आणण्याचे अनेक प्रयत्न केले. मुख्यत: बहुजनसमाजात शिक्षणप्रसार व्हावा म्हणून त्यांनी केलेली कामगिरी लक्षणीय होती. महात्मा फुले व त्यांचे कार्य महाराज महत्त्वाचे मानत असत. शिवाय जोतिबांनी दलितांना अलगपणाची अन्याय्य वागणूक न देता त्यांना सामावून घेण्याचे धोरण स्वीकारले होते आणि महाराज ते नुसते मानत नव्हते, तर आचरणात आणत होते. पण जोतिबा व शाहू महाराज यांच्यात काही मूलभूत वृत्तिभेद होता. मुख्य भेद होता तो वैदिक धर्मासंबंधी. शाहू महाराज जोतिबांप्रमाणे वैदिक धर्म त्याज्य ठरवत नव्हते, तर आपण हिंदू आहोत, क्षत्रिय आहोत असे अभिमानाने सांगत असत. यामुळे वेदाचा अधिकार क्षत्रियांना आहे असे प्रतिपादून त्यांनी लोकमान्य टिळकांशी वाद घातला. जोतिबांनी पुरोहित वर्गाची आवश्यकता नाकारून शंकराचार्यांचा अधिकार अमान्य केला तर शाहू महाराजांनी शंकराचार्य हे पद न झिडकारता क्षात्रजगद्गुरूंची नेमणूक केली आणि धार्मिक विधी मराठा पुरोहिताच्या मदतीने करण्याची प्रथा पाडली.

सत्यशोधक समाजाची प्रगती शाहू महाराजांमुळे वेगाने होऊ लागली. त्याचप्रमाणे बाबुराव व केशवराव जेधे यांचे प्रयत्न यास कारणीभूत झाले. भोर संस्थानातले कारी-आंबवडे हे जेधे कुटुंबाचे मूळ गाव. या कुटुंबाचा पूर्वज कान्होजी याने अफझलखानाच्या वधाच्या वेळी शिवाजीमहाराजांना साथ केली होती. त्याला सर्जेराव हा किताब देण्यात आला होता. या परंपरेचा वारसा जेधेबंधू बाळगत होते. यामुळे दोघेही भाऊ नेकजात म्हणून ओळखले जात. यांपैकी बाबुराव जेधे कुटुंबाचा कारखाना इत्यादी व्यवहार बघत असत. केशवरावांनी इंटरपर्यंत शिक्षण घेतल्यावर ते सोडून सार्वजनिक कामात लक्ष घालण्यास सुरुवात केली. बाबुराव व केशवराव हे दोघेही महात्मा फुले यांच्या शिकवणुकीमुळे भारावले होते व त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कामास वाहून घेतले. यातच बाबुराव जेधे यांचा शाहू महाराजांशी परिचय झाला व महाराजांचा त्यांच्यावर विश्वास व लोभ जडला. पुण्यातले जेधे मॅन्शन हे सत्यशोधक समाजाचे मुख्य स्थान झाले आणि अनेक चळवळी व संस्था यांना त्याचा आश्रय मिळत गेला.

वेदोक्ताचा वाद हा सत्यशोधक समाजाच्या वाढीला चालना देणारा ठरला. मराठे हे क्षत्रिय असून ते त्रैवर्णिक असल्यामुळे त्यांना वेदोक्ताचा हक्क आहे असे मत, प्रथम बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मांडले. लोकमान्य टिळकांनी त्यांचे मत खोडून काढण्यासाठी प्रतिवाद केला. नंतर शाहू महाराजांनी हाच वाद पुढे चालवला आणि मग ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांत कटुता निर्माण होईल असे वादंग माजले. वास्तविक हा वेदोक्ताचा अधिकार नाकारण्यात लोकमान्यांची चूक झाली होती. तेली तांबोळ्यांचे पुढारी असे लोकमान्यांना त्यांचे नेमस्त विरोधक हिणवून म्हणत असत. पण या वेदोक्ताच्या वादामुळे लोकमान्य ब्राह्मणांचे पुढारी झाल्याचा देखावा निर्माण झाला. हे असे व्हायला नको होते. पण मोठे लोकही काही वेळा गफलत करतात,त्याचा अनुभव आला. वस्तुत: विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी महात्मा फुले यांच्यावर बरीच टीका केली होती.पण लोकमान्यांच्या या भूमिकेमुळे अधिक बिघाड झाला कारण ते लोकमान्य होते आणि सामान्य लोक त्यांना आपले नेते मानत होते.

सत्यशोधक समाजाची वाढ होण्यास हा वाद कारणीभूत झाला असला तरी त्याची एरवीही वाढ होतच होती. गेल ऑम्वेट यांनी त्यांच्या पुस्तकात, समाजाची वाढ चार टप्प्यांत झाली असे म्हटले आहे. पहिला

१८७३ ते १८९० हा काळ मूळ धरण्यात गेला. मुंबई, पुणे व त्याच्या आसपासचा काही ग्रामीण भाग यांत मूळ धरले गेले. नंतर १९१०पर्यंतच्या काळात शहरी भागात समाजाचे काम रुजले, पण कोल्हापूर, बेळगाव आणि पूर्वेकडे विदर्भात सत्यशोधक समाजाचा प्रसार होत गेला. तिसरा टप्पा १९११ ते १९१९पर्यंतचा. या काळात दक्षिण महाराष्ट्र व विदर्भाच्या प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या शाखा स्थापन झाल्याच, शिवाय नागपूर आणि मराठवाड्यातही अशीच वाढ झाली. या तिसऱ्या टप्प्यात अखिल महाराष्ट्राची म्हणून समाजाची परिषद होऊन मग अनेक भागांत परिषदा भरवल्या जात होत्या. १९१९ ते १९३० या काळात मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदा अमलात आल्यावर, प्रांतिक विधिमंडळाची वाढ होऊन अत्यंत मर्यादित प्रमाणात राजकीय हक्क प्राप्त झाले. याचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने सत्यशोधक समाजाचे ब्राह्मणेतर पक्षात रूपांतर होऊन राजकीय व आर्थिक कार्यात तो गुंतून राहिला. (*कल्चरल रिव्होल्ट इन ए कलोनियल सोसायटी*, पृ० १३९) पण ऑम्वेट यांनी असाही अभिप्राय दिला आहे की, सत्यशोधक समाजाचा विस्तार होत गेला हे खरे असले तरी महात्मा फुले यांनी सामाजिक व वैचारिक परिवर्तन आरंभिले होते, ते मागे पडत गेले.

सत्यशोधक समाजाचा हा विस्तार दक्षिण महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत झाल्यावर सातारा जिल्हा मागे राहणे शक्यच नव्हते. शिवाय तो राजकीयदृष्ट्या जागृत जिल्हा होता. तेव्हा कराडमध्येही समाजाचे कार्य वाढले. यात यशवंतरावांचे वडीलभाऊ, गणपतराव सहभागी असल्यामुळे माध्यमिक शाळेत जाणाऱ्या यशवंतरावांना त्या वेळच्या काही चर्चा ऐकावयास मिळू लागल्या होत्या. त्यांनी लिहिले आहे की, वडील माणसांच्या सर्वच चर्चांचा अर्थ समजण्याचे आपले वय नव्हते. पण गणपतराव त्यांना काही साहित्य वाचायला देत, 'राष्ट्रवीर' इत्यादी साप्ताहिके मिळत. त्याचबरोबर यशवंतराव मुंबई-पुण्याची पत्रेही लक्षपूर्वक वाचत होते. त्यामुळे देशात वेगळे वारे वाहत असल्याचे समजू लागले होते. याच काळात केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांची कराडमध्ये सभा झाली तेव्हा यशवंतराव हजर होते. जवळकर हे बोलण्यात व लिहिण्यात मोठे जहाल होते. *देशाचे दुष्मन* हे जवळकरांचे पुस्तक लोकमान्यांच्या संबंधात होते. हे भाषण व जवळकर यांचे पुस्तक यांच्याबाबत आपली प्रतिक्रिया काय झाली हे सांगताना यशवंतरावांनी म्हटले आहे की, महात्मा फुले व लोकमान्य टिळक ही दोन्ही मोठी माणसे. त्यांच्यापैकी कोणावरही अशी जहरी टीका होणे अयोग्य असा विचार आपल्या मनात आला. ते लिहितात की, स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला आणि गरीबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समता निर्माण झाली पाहिजे, हा विचार जोतिराव फुल्यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्त्वाचे, म्हणून दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत या निर्णयाला आपण आलो. पण याच संदर्भात त्यांनी आपली जी शंका व्यक्त केली ती महत्त्वाची होती. ते लिहितात की, 'लोकमान्य टिळक हे इंग्रजांविरुद्ध लढणारे एक सेनापती आहेत, अशी माझी भावना होती. अशा थोर माणसावर टीका करणारी माणसे ही इंग्रजांचे मित्र तर नाहीत ना?' (*कृष्णाकांठ*, पृष्ठ ३४ व ५०).

या रीतीने ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादातून यशवंतराव दूर राहिले. असाच प्रकार विठ्ठलराव घाटे यांचा झाला असे दिसून येईल. त्यांनी आत्मचित्रात लिहिले, "ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद माझ्या पिढीच्या डोळ्यांसमोर सारखा उभा होता. कधी जवळ, तर कधी दूर. कधी स्पष्ट दिसायचा, कधी धुक्यात असायचा; पण असायचा. माझ्या जीवनात या प्रश्नाने साताऱ्यात प्रवेश केला व मधूनमधून चोरपावलांनी भेटी दिल्या. मी पातळीवर होतो. प्रसंगविशेषी मन हेलकावे खात असे, पण वेळ टळून गेल्यावर मी

जागेवर येऊन स्थिर होई. अनेक प्रसंगी मन बावचळले, अस्वस्थ झाले, परंतु कधीच विकृत झाले नाही, हे मी माझे सुदैव समजतो'' (*दिवस असे होते,* पृ० २५)

जोतिबांची टीका ब्राह्मण्यावर होती; ते ब्राह्मणांच्या सरसकट विरोधी नव्हते हे स्पष्ट करताना घाटे यांनी म्हटले आहे की, 'ब्राह्मणवर्गातसुद्धा फुल्यांचे विचार समजणारे व त्यांची कदर करणारे पुण्यात थोडेच होते, पण होते. जे होते ते शंभर नंबरी सोने होते; त्या वेळच्या सुजाण हिंदू समाजाचे सर्वमान्य पुढारी होते. फुल्यांनी १८५१ साली मुलींची शाळा काढली. ख्रिस्ती नसलेल्या माणसाने काढलेली ही पहिलीच शाळा. तिच्या आठ जणांच्या कारभारी मंडळात सहा ब्राह्मण होते. त्यांत कृष्णशास्त्री चिपळोणकर प्रमुख होते. छोट्या शास्त्रीबुवांना फुले समजले नाहीत, पण मोठ्यांना समजले. बेटासे बाप सवाई! होतो असा उलटा प्रकार कधीकधी. फुल्यांनी महारमांगांसाठी शाळा काढल्या, त्यांच्या समितीवर बहुसंख्य ब्राह्मणच. अस्पृश्यांच्या एका शाळेस जागा मिळेना तेव्हा फुल्यांचे जिवलग ब्राह्मण मित्र व सहकारी रावबहादूर गोवंडे यांनी आपले घर दिले. धन्य ब्राह्मणवीराची'. (*दिवस असे होते,* पृ० २७९)

न्यायमूर्ती रानडे, रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे, विष्णुशास्त्री पंडित इत्यादी फुल्यांचे मित्र व सल्लागार होते असे सांगून घाटे यांनी अशी पुस्ती जोडली आहे की, 'फुल्यांनी काढलेल्या अनेक शिक्षणसंस्थांचे सखाराम यशवंत परांजपे हे ब्राह्मण गृहस्थ खजिनदार होते. फुल्यांनी मुलींची शाळा काढली ती बुधवारातल्या ब्राह्मण वस्तीत; विश्रामबागेशेजारच्या एका ब्राह्मणाच्या वाड्यात. त्या शाळेत मुली आल्या त्या ब्राह्मणांच्याच. कोल्हापूर प्रकरणात फुल्यांनीच टिळकांना दहा हजारांचा जामीन मिळवून दिला. टिळक-आगरकर सुटून आले तेव्हा फुल्यांनी त्यांचे मुंबईत व पुण्यात सत्कार केले.'

हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद केवळ महाराष्ट्रातच नव्हता. गुजरातेत एक काळ वैष्णव पंथाचा प्रभाव होता पण स्वामी नारायण पंथाने त्यास मागे टाकले. स्वामी नारायण पंथ हा पटेल लोकांच्या प्रभावाखाली होता व आहे. पटेल हे उत्तम शेती करत, शिवाय ते व्यापारातही होते. व्यापार व उद्योगामुळे त्यांची भरभराट झाली. पुढील पिढ्यांत शिक्षण व संपत्ती वाढत गेली. आज अमेरिका व इतर अनेक देशांत पटेलांची संख्या मोठी आहे. ते व्यापारात आणि कारखानदारीत आहेत, तसेच डॉक्टर, इंजिनियरिंग इत्यादी क्षेत्रांतही आहेत. त्यांचा आश्रय असलेल्या स्वामी नारायण पंथाची मोठमोठी मंदिरे अनेक देशांत आहेत. सरदार पटेल यांनी महाराष्ट्रातल्या मराठ्यांनी कॉंग्रेसमध्ये यावे असे आवाहन करताना, मराठे बहुसंख्य असताना तीन टक्के ब्राह्मणांची त्यांना भीती वाटण्याचे कारण काय, असे विचारले होते. हे सांगताना गुजरातमधील त्यांच्याच पटेल समाजाचे उदाहरण त्यांच्यापुढे असले पाहिजे.

महाराष्ट्रप्रमाणे वा त्याहीपेक्षा अधिक तीव्र प्रमाणात तामिळनाडमध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद होता.त्या काळात तामिळनाडमध्ये आजच्या आंध्रचाही समावेश होता. यामुळे दोन्ही भागांतल्या ब्राह्मणेतरांत साधारणत: एकाच वेळी जागृती झाली. तामिळनाड वा महाराष्ट्र यांत सरकारी उपाययोजनेमुळे शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता. त्याची गती व व्याप्ती मोठी नसेल, पण जी होती तिच्यामुळे ब्राह्मणेतर वर्गात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. तसेच नुसत्या शेतीवर अवलंबून न राहता, मराठा समाजातील अनेक जण व्यापार करू लागले आणि सरकारी कंत्राटे घेऊ लागले. पहिल्या महायुद्धाच्या काळात अशी अनेक कंत्राटे दिली जात होती. यामुळे मराठा समाजात ज्यास श्रीमंत म्हणता येईल असा वर्ग तयार होऊ लागला.

तामिळनाडमध्ये नाडर, मुदलियार, चेट्टी इत्यादी याच रीतीने पुढे आले. त्यात नाडर हे ताडी काढणे

व विकणे हा धंदा करत आणि यात त्यांची मिरासदारी स्थापन झाली होती. धान्याची वाहतूक व व्यापार यांही बाबतीत ते पुढे होते. रॉबर्ट हार्डग्रेव्ह यांनी *द नाडर्स ऑफ तामिळनाड,* असा ग्रंथच लिहिला आहे. तामिळनाडमधील ब्राह्मणेतर वर्गाचा इतिहास समजण्यास त्यामुळे मदत होऊ शकते. नाडर हे पूर्णत: अस्पृश्य मानले जात नव्हते. पण ताडीची विक्री करणारे ते कलाल असल्यामुळे, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास बंदी इत्यादी निर्बंध त्यांना लागू होते. रामनाड या भागात नाडर यांची वस्ती अधिक होती. त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता आणि व्यापारामुळे त्यांतले काही धनिक बनले होते. नाडर मंडळींनी 'नाडर महाजन संगम' या संस्थेची स्थापना केली. तिने वाचनालय, शाळा इत्यादी चालवण्याचा कार्यक्रम राबवला. ही संघटना ब्रिटिश सरकारच्या साहाय्याने नाडर लोकांची उन्नती करण्याच्या धोरणाने चालत असल्यामुळे २० सालानंतर प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची हाक गांधीजींनी दिली, तिला संगमने प्रतिसाद दिला नाही. या समाजातील कामराज नाडर हे विशेष शिकू शकले नाहीत, पण ते सार्वजनिक कार्य करताना एस० सत्यमूर्ती या राजकीय पुढाऱ्याचे साहाय्यक बनले आणि मग कामराज यांच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला, आणि कामराज यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. थोड्याच काळात संघटनचातुर्यामुळे काँग्रेसमध्ये ते चढत गेले.

सत्यशोधक समाजाच्या धर्तीवर तामिळनाडमध्ये नाडर संगम आणि इतर काही संघटना काम करू लागल्या होत्या. यातून जस्टिस पक्षाचा उदय झाला. इ० व्ही० रामस्वामी नायकार हे ब्राह्मणेतर आंदोलनाचे जहाल प्रवर्तक पुढे येऊ लागले होते. त्यांनी आत्मसन्मान आंदोलन चालवले होते. नाडर समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी नायकार यांनी रामनाडचे राजे सर ए० पी० डी० पात्रो तसेच सर आर० के० शणमुगम चेट्टीआर यांचे साहाय्य घेतले. नायकार यांनी हरिजनांना मंदिरे, पाणवठे इत्यादी खुले झाले पाहिजेत अशा मागण्या मांडल्या. नायकार यांनी आर्य व आर्येतर अशी विभागणी असल्याचे प्रतिपादून द्राविडी संस्कृती ही प्राचीन असल्याचा सिद्धान्त मांडला. आर्य म्हणजे ब्राह्मण, परकी ठरवले आणि तामिळनाड हे द्राविडीस्थान बनवण्याचा संकल्प सोडला. नायकार हे मूर्तिपूजेच्या विरुद्ध प्रचार करत. तथापि ते आणि महात्मा फुले यांच्या उद्दिष्टांत महत्त्वाचा फरक होता. एकतर नायकार यांच्याप्रमाणे जोतिबांनी ब्राह्मणांचे सहकार्य नाकारले नव्हते. त्याहूनही महत्वाचा फरक हा, की जोतिबांनी महाराष्ट्राची संस्कृती वेगळी असून ते एक स्वतंत्र राष्ट्र बनवावे अशी भूमिका कधी घेतली नाही. तामिळनाडमधील ब्राह्मणेतर पक्षाने दीर्घ काळ ही भूमिका घेतली आणि अद्यापही वेगळ्या द्राविडी संस्कृतीची भाषा, तामिळनाडूतील दोन्ही प्रमुख पक्षांतील काही जण करत असतात. उत्तर भारतास विरोध हा दुसरा एक विशेष या पक्षांत दिसून येईल.

महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजात सामील न होता, यशवंतराव त्याच्या कार्याचे केवळ निरीक्षण करत होते. ते माध्यमिक शाळेत शिकत असताना देशाच्या राजकारणात बऱ्याच घटना घडत होत्या. तसे पाहिले तर यशवंतरावांचा १९१३मध्ये जन्म झाल्यापासून महाराष्ट्रात व देशात अनेक खळबळजनक घडामोडी घडत होत्या. यशवंतरावांच्या जन्मानंतर एकच वर्षानी लोकमान्य टिळक यांची मंडालेतील सहा वर्षांच्या कारावासानंतर सुटका होऊन ते पुण्यात परत आले होते. यामुळे राजकारणात काही जीव आला. तसेच १४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी लोकमान्य तसेच हिंदी लोक युद्धविरोधी भूमिका घेतील आणि मग सैन्यभरतीचा कार्यक्रम पार पाडता येणार नाही, अशी ब्रिटिश सरकारला भीती



लोकमान्य टिळक स्मारक, रत्नागिरी येथे भाषण करताना. सोबत पी० के० सावंत, बॅ० ए० आर० अंतुले, वसंतराव नाईक व इतर

वाटत होती. पण झाले उलटेच. लोकमान्यांनी युद्धाला पाठिंबा दिला. महात्मा गांधी तर सैन्यभरतीच्या कामात सहभागी होते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीचा प्रतिकार, सविनय कायदेभंगाची अभिनव चळवळ करून गांधींनी चालवला होता. ते काम इतरांवर सोपवून स्वदेशी परत येण्याची सूचना गोखले यांनीच गांधींना केली होती. सात साली सुरतेला काँग्रेसमध्ये फूट पडल्यावर लोकमान्यांना काँग्रेसमध्ये मज्जाव झाला होता. तेव्हा मंडालेहून आल्यावर त्यांनी होमरूल लीगची प्रथम स्थापना केली व नंतर ते काँग्रेसमध्ये सामील झाले. १६ साली लखनौ इथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात लोकमान्यांनी मुस्लिम लीगचे नेते बॅरिस्टर जीना यांच्याशी विधिमंडळात मुसलमानांना किती जागा द्यायच्या याबाबत करार केला. हाच तो लखनौ करार.

लखनौच्या काँग्रेस अधिवेशनास महात्मा गांधी हजर होते. आफ्रिकेतील त्यांच्या कामगिरीमुळे

त्यांच्याबद्दल भारतात सर्वत्र कुतूहल होते व त्यांची मदत घेण्यासाठी अनेक जण उत्सुक होते. यांतले एक म्हणजे राजकुमार शुक्ला. ते बिहारच्या चंपारण भागातले होते आणि जमीनविषयक सरकारी धोरणाची झळ लागलेल्यात त्यांची गणना होत होती. त्यांच्या आग्रहामुळे गांधीजी १७ सालच्या प्रारंभी चंपारणमध्ये गेले. चंपारणमधील बहुतेक शेती तीन जमीनदारांकडे होती. ती ते खंडाने देत. त्यासाठी ठेकेदार निवडले जात. गांधी चंपारणमध्ये जाईपर्यंत निम्म्याहून अधिक शेती युरोपीय ठेकेदारांकडे होती. बंगालप्रमाणे चंपारणमध्ये कुळांना काही अधिकार नव्हते. यामुळे जमीनदार व ठेकेदार मन मानेल तसे विलासात राहत. सावकारीही त्यांच्याकडे असे. जमिनीची मोजणी, जिल्हा मंडळे इत्यादी सर्वच जमीनदारांच्या हाती होते. पहिले महायुद्ध संपल्यावर शेतीचे भाव खाली आले. या शेतीत निळीचेही उत्पन्न घेतले जात होते. भाव खाली आले म्हणून जमीनमालकांनी खंडाची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढवली. आपण सर्व करार कायदेशीरपणे केल्याचा दावा जमीनदार करत होते. या स्थितीत गांधींनी चौकशी समिती नेमण्याची मागणी केली. नायब राज्यपाल सर एडवर्ड गेट यांनी चौकशी समिती नेमून गांधींना तिचे सदस्य म्हणून काम करण्याची विनंती केली. ती गांधींनी स्वीकारली. समितीचे काम संपल्यावर तिने अहवाल दिला. चंपारणमध्ये तीन तिखिया या नावाची पद्धती रूढ होती. या पद्धतीखाली जमिनीचे वीस भाग करून त्यातील तीन निळीसाठी वापरले जात. ती रद्द करण्याची समितीने शिफारस केली आणि ठेकेदारांनी बेकायदेशीरपणे घेतलेल्या रकमा कुळांना परत कराव्या अशी सूचना केली. या दोन मागण्या मान्य झाल्यामुळे शेतकऱ्यांचा फार वर्षांचा प्रश्न सुटला. गांधीजींच्या या प्रयत्नामुळे एक नवे पर्व सुरू झाले.

गुजरातच्या खेडा जिल्ह्यात दुष्काळ व प्लेग यांमुळे शेतकरी हैराण झाले होते. तेव्हा १९१८ साली शेतकऱ्यांनी गुजरात सभेतर्फे सारामाफीची मागणी केली. ही सभा होमरूल लीगवाल्यांची असल्याच्या समजुतीमुळे मुंबई सरकारने ही मागणी अमान्य केली. तेव्हा सारा न भरण्याचा सत्याग्रह सुरू झाला. गांधीजींचे त्यास मार्गदर्शन होते. पुढे काही सधन शेतकरी सारा भरू लागले. तेव्हा इतर सधन शेतकऱ्यांनी सारा दिल्यास गरीब शेतकऱ्यांना माफी देण्याची तडजोड सरकारने मान्य केली. गांधींनी मग म्हटले की, तडजोड करावी लागून सर्व मागण्या मान्य झाल्या नसल्या तरी शेतकऱ्यांना काही लाभ झाला आणि मुख्य म्हणजे गुजरातचा शेतकरी यामुळे जागा झाला.

पहिले महायुद्ध संपण्याच्या सुमारास इंग्रज सरकारने देशातील क्रांतिकारी चळवळीची वाढ होईल या कल्पनेने, प्रतिबंधक उपाययोजनेचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली. रौलॅट यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीने भारतीयांवर काही बंधने लादली. त्याचा निषेध गांधी व इतर नेत्यांनी केला. युद्धात तुर्कस्तान जर्मनीच्या बाजूने लढत होता. जर्मनीचा पराभव झाल्यावर तुर्कस्तानच्या सुलतानाची सद्दी संपली. तो जसा राजा होता तसाच धर्मगुरू, खलिफा होता. ही दोन्ही पदे गेल्यावर भारतातले मुस्लिम संतप्त झाले. खिलाफतीचे पुनरुज्जीवन करण्याची त्यांची मागणी गांधींनी उचलून धरली. जीनांना या मागणीत तथ्य वाटत नव्हते. तथापि मुस्लिम पुढाऱ्यांच्या मागणीला दुजोरा दिल्यामुळे हिंदू-मुस्लिम एकी निर्माण होईल असा गांधींचा कयास होता. यामुळे रौलॅट कायदा व खिलाफत या दोन्हीसाठी त्यांनी असहकार चळवळ सुरू केली. ती सुरू होण्याच्या वेळी म्हणजे १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्यांचे निधन झाले. खिलाफत चळवळीमुळे हिंदू-मुसलमान एक होतील हा गांधींचा कयास मात्र खोटा ठरला. कारण, केरळात थोड्याच दिवसांत मोपल्यांनी बंड केल्यामुळे हिंदू व मुसलमान यांच्यातील तणाव वाढण्यास मदत झाली.



लोकमान्य टिळक यांच्या रत्नागिरीतील स्मारकास भेट. सोबत पी० के० सावंत,
बॅ० ए० आर० अंतुले, वसंतराव नाईक व इतर

पहिल्या महायुद्धात भारताची इंग्लंडला झालेली मदत लक्षात घेता, युद्ध संपल्यावर भरीव राजकीय सुधारणा अमलात येतील अशी अपेक्षा होती. पण जो कायदा आला तो निराशाजनक होता. म्हणून 'उजाडले, पण सूर्य कोठे आहे?' असा मोठा अन्वर्थक मथळा असलेला अग्रलेख लोकमान्यांनी लिहिला. या सुधारणा कायद्याचे गांधींनी स्वागत केले असले तरी मोतिलाल नेहरू इत्यादींनी नाराजी व्यक्त करून तो सशर्त राबवण्याचे धोरण काँग्रेसने ठरवले. या सुमारास अमृतसर येथील जालियनवाला बागेत जमलेल्या सभेवर जनरल डायरने अमानुष गोळीबार केल्यामुळे देशभर हाहाकार झाला. सरकारने मग चौकशी समिती नेमली. पण तीवर बहुसंख्य युरोपीय सभासद नेमल्यामुळे सत्य बाहेर आले नाही. नंतर मोतिलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसने समिती नेमली तेव्हा या अत्याचाराचे भीषण स्वरूप जगजाहीर झाले आणि ब्रिटिश पार्लमेंटमध्येही त्यावरून वादळ उठले.

सुधारणा कायदा राबवण्याविरुद्ध काँग्रेसमध्ये मतभेद होते आणि गांधीच्या असहकाराच्या चळवळीमुळे तो राबवावा म्हणणाऱ्यांना अडचण वाटू लागली. असहकाराच्या चळवळीमुळे गांधी कारावासात होते. ते सुटल्यावर त्यांच्याशी मोतिलाल व चित्तरंजन दास यांनी यासंबंधी चर्चा केली. तेव्हा या दोघांनी स्थापन केलेल्या स्वराज्य पक्षास कायदेमंडळाची निवडणूक लढवण्यास मुभा देण्यात आली, पण वर्षभर अनुभव घेऊन फेरविचार करावा असेही ठरले. या वेळी गांधींनी पुरस्कारलेली काँग्रेसची नवी घटना संमत झाल्यामुळे जीनांनी काँग्रेसचा त्याग केला. या घटनेप्रमाणे सविनय कायदेभंग हे काँग्रेसचे धोरण ठरले. मुंबई प्रांतात नव्या कायद्याखाली झालेल्या निवडणुकीत काही जुन्या नेमस्तांनी भाग घेतला तसेच ब्राह्मणेतर पक्षही निवडणुकीत सहभागी झाला. नंतर भास्करराव जाधव यांच्यासारखे ब्राह्मणेतर पक्षाचे नेते दिवाण नेमले गेले. तेव्हा मंत्र्यास 'दिवाण' म्हणत. अर्थात दिवाणास फारच थोडे अधिकार होते ही गोष्ट वेगळी. मतदारसंघाची रचना पाहता ब्राह्मणेतर पक्षाला मोठे बहुमत मिळणे शक्य नव्हते. पण तामिळनाडमध्ये जस्टिस पक्षास भरघोस बहुमत मिळाले होते.

यशवंतराव माध्यमिक शाळेत शिकू लागण्यापूर्वी या घडामोडी घडल्या होत्या. माध्यमिक शाळेत शिकू लागल्यानंतर गांधींचे असहकाराचे युग सुरू झाले होते आणि त्या वेळच्या राजकीय घडामोडींबद्दल यशवंतराव व त्यांचे मित्रमंडळ नेहमी चर्चा करत होते. इतकेच नव्हे, तर प्रभातफेऱ्या, झेंडावंदन इत्यादी कार्यक्रमांत ते भाग घेत. तथापि यशवंतरावांच्या मनावर राष्ट्रीयत्वाचा गाढ परिणाम करणारी एक घटना नमूद करण्यासारखी आहे. ती अर्थात सर्व देश हादरवून सोडणारी होती. ती म्हणजे यतीन्द्रनाथ दास यांनी प्रदीर्घ उपोषण करून केलेल्या आत्मार्पणाची. यतीन्द्रनाथ हे वीस सालच्या आंदोलनात कारावासात गेले होते. नंतरच्या पाच वर्षांत त्यांना चार वेळा बंदिवान करण्यात आले. या शेवटच्या शिक्षेच्या काळात ते मैमनसिंग इथल्या तुरुंगात असताना अधिकाऱ्यांनी त्यांचा भयंकर छळ केला, तेव्हा यतीन्द्रांनी अधिकाऱ्यावर हल्ला केला म्हणून त्यांना अंधारकोठडीत ठेवण्यात आले. तेव्हा राजकीय कैद्यांना दिल्या जाणाऱ्या अमानुष वागणुकीच्या निषेधार्थ यतीन्द्रांनी आमरण उपोषण सुरू केले. याच कारणास्तव सरदार भगतसिंग, बटुकेश्वर दत्त इत्यादींनी उपोषण चालू केले होते. साऱ्या देशाप्रमाणे यशवंतराव यतीन्द्राचे काय होते याकडे डोळे लावून होते व रोजच्या बातम्यांची वाट पाहत होते. अखेरीस यतीन्द्रनाथांची जीवनज्योत मालवली.

यतीन्द्रांच्या या बलिदानाची बातमी समजल्यावर यशवंतरांवांना प्रचंड मानसिक धक्का बसला. ते सांगतात, या ''घटनेमुळे माझ्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचा अर्थ समजावून घेण्याच्या मन:स्थितीपर्यंत पोहोचलो. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यातून बाहेर पडण्याचा माझा विचार पक्का झाला. आपण आपले जीवन देशकार्यालाच वाहायचे, हा निर्णय माझ्या मनाने घेतला. छोट्या छोट्या जातीय किंवा धार्मिक प्रश्नांचे थोडेफार आकर्षण त्यापूर्वी माझ्या बालवयात होते; पण माझे विचार आता हळूहळू स्पष्ट होत चालले होते, हेही तितकेच खरे. संकुचित वृत्तीने काम करण्यापेक्षा कुठल्या तरी व्यापक दृष्टीने काम केले पाहिजे, अशी मनाची घडण होत होती. यतीन्द्रनाथांच्या मृत्यूने माझा दृढनिश्चय झाला आणि तो प्रश्न मी माझ्यापुरता सोडविला'' (*कृष्णाकांठ*, पृष्ठे ७४-५)

ब्राह्मणेतर पक्षातही मतभेद निर्माण होऊन राष्ट्रसभेशी म्हणजे काँग्रेसशी फटकून वागायचे किंवा कसे याबद्दल चर्चा होत होती आणि दोन विचारप्रवाह असल्याचे स्पष्ट होत होते. ते होण्यास आणखी एक

कारण होते. ते म्हणजे भास्करराव जाधव यांचे सरकारधार्जिणे धोरण. याबाबत भास्करराव यांनी गुप्तता पाळलेली नव्हती. विदर्भात ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार करण्यास राज्यपाल विल्सन यांनी प्रोत्साहन दिल्याचे त्यांनी जाहीरपणेच कबूल केले होते. भास्कररावांनी भाऊराव पाटील यांना या संबंधात लिहिले होते. ते पत्र भाऊरावांनी ३० ऑक्टोबर १९२६ रोजी सातारच्या 'ऐक्य' पत्रामध्ये प्रसिद्ध केले. भास्कररावांनी म्हटले, ''सरकारच्या पाठिंब्याशिवाय ब्राह्मणेतर पक्षाची प्रगती होणार नाही.आपण जर सरकारची सहानुभूती गमावली तर आपला टिकाव लागणार नाही'' (*केशवराव जेधे*, पृ० ९१) भास्कररावांची ही भूमिका ब्राह्मणेतर पक्ष बळकट करणारी नसून, ती पक्षाला लिबरल पक्षासारखा बनवील अशी भीती अनेकांना वाटू लागली होती. ब्राह्मणेतर पक्षात चालू झालेल्या या विचारमंथनाचे एक दृश्य स्वरूप १९२४ साली, जेधे मॅन्शनमध्ये महात्मा गांधींना पानसुपारी समारंभ करून स्पष्ट झाले. आपल्या भाषणात ब्राह्मणेतरांनी आत्मबलाने उन्नती करावी, सरकारच्या आश्रयाने नव्हे, असा अभिप्राय गांधींनी सत्काराला उत्तर देताना दिला होता. यानंतर मद्रासमध्ये एका परिषदेत ब्राह्मणेतरांपैकी ज्यांना काँग्रेसमध्ये सामील व्हायचे असेल त्यांना तशी परवानगी देण्यात आली. ते पाहून केशवराव जेधे व जवळकर यांनी काँग्रेसमध्ये जाऊन ब्राह्मणेतरांनी ती काबीज करणे महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले व एक सभा बोलावली.

ब्रिटिश सरकारने ८ नोव्हेंबर १९२७ रोजी भारतात राजकीय सुधारणांचा नवा हप्ता देण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमल्याची घोषणा केली. समितीवर एकाही हिंदी सभासदाची नेमणूक झाली नसल्यामुळे काँग्रेसने बहिष्काराचा मार्ग स्वीकारलाच, शिवाय जीनांच्या लीगनेही तशीच भूमिका घेतली. यामुळे देशात सरकारविरोधी वातावरण तापत चालले होते. ब्राह्मणेतर पक्षात या समितीशी सहकार्य करायचे की नाही, या प्रश्नावरून दोन तट पडले. जेधेबंधू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी बहिष्काराच्या बाजूचे तर भास्करराव व जवळकर विरोधी होते. केशवराव जेधे शेतकरी चळवळीत भाग घेऊ लागले होते व यामुळेही त्यांच्यावर सरकारी धोरणास विरोध करण्याचे प्रसंग येत असत. याच वेळी म्हणजे १९२८मध्ये गुजरातमधील बार्डोली तालुक्यात शेतकऱ्यांनी लढा सुरू केला होता आणि त्याची प्रगती कशी होत आहे याकडे केशवरावांचे लक्ष होते. बार्डोलीत १९२५ साली एम० एस० जयकर या अधिकाऱ्याने तालुक्याचा दौरा करून, लोकांचे म्हणणे ऐकून न घेता पंचवीस टक्के सारावाढ करण्याची शिफारस केली. त्यामुळे शेतकरीवर्गात असंतोष निर्माण झाला. मुंबई विधिमंडळातही याकडे सरकारचे लक्ष वेधले असता सरकारने काही ऐकले नाही. मग महात्मा गांधींनी वल्लभभाई पटेल यांना चौकशी करण्यास सांगितले. त्यांनी बार्डोली तालुक्याचा दौरा केला आणि सरकारकडे पत्रव्यवहार केला. सरकारने दाद दिली नाही, तेव्हा १९२८ सालच्या फेब्रुवारीत साराबंदीची चळवळ सुरू करण्यात आली. वल्लभभाई तिचे नेतृत्व करत होते.

सरकारने दडपशाहीचे सर्व उपाय योजले. गुरेढोरे नेली, जप्त्या आणल्या. पण लोक बधले नाहीत. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांवरच बहिष्कार घातला. कन्हय्यालाल मुन्शी यांनी मग गव्हर्नरला पत्र लिहिले व ते वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यावर मोठी खळबळ उडाली. मुन्शींनी लिहिले की, सरकारी अधिकाऱ्यास दाढी करायची असेल तर नापित मिळत नाही, त्याला काही मैल जावे लागते. ज्यांनी शेतकऱ्यांची जप्त जमीन स्वस्तात खरेदी केली त्यांना सफाई कामगारही मिळत नाहीत. 'सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटी'चे कुंझरू व वझे यांनी, सरकारने सारावाढीसाठी आधारभूत धरलेली आकडेवारीच कशी



पंडित नेहरू यांचे समवेत

चुकीची हे दाखवून दिले. विल्सन यांच्या जागी गव्हर्नर म्हणून सर फ्रेडरिक साइक्स हे आले होते. त्यांच्या दोन अधिकाऱ्यांनी सारावाढ योग्य नसल्याचा अहवाल दिला. मग गव्हर्नरने सारावाढ रद्द केली; जप्त जमिनी परत करण्याचे जाहीर केले. ज्यांच्या नोकऱ्या गेल्या होत्या त्या त्यांना परत मिळाल्या.सर्व सत्याग्रहींची सुटका झाली. यापूर्वी गुजरातच्या खेडा जिल्ह्यात झालेल्या सत्याग्रहास अपुरे यश मिळाले होते. पण बार्डोलीचा लढा यशस्वी झाला होता. तेव्हापासून वल्लभभाई पटेल हे सरदार वल्लभभाई म्हणून ओळखले जाऊ लागले. नामदार गोखले यांचे आपण शिष्य असे महात्मा गांधी म्हणत, तर श्रीनिवास शास्त्री हे गोखले यांचे राजकीय वारस झाले. गांधी व शास्त्री हे एकमेकास गुरुबंधू समजत. या शास्त्रींनी गांधींचे व त्यातही सरदारांचे विशेष अभिनंदन केले. या बार्डोलीच्या सत्याग्रहामुळे केशवराव जेधे यांच्यासारख्यास, काँग्रेसच्या राजकारणाचा फेरविचार करणे अनिवार्य वाटले.

या वेळी पुण्यातील पर्वती मंदिरात हरिजनांना प्रवेश देण्याची मागणी वाढू लागली होती. १९२८मध्ये पुण्यात यूथ लीगची स्थापना झाली होती. एस० एम० जोशी, नानासाहेब गोरे इत्यादींच्या या संघटनेने हरिजनांना प्रवेश देण्याच्या मागणीस पाठिंबा दिला, आणि यासाठी स्थापन झालेल्या समितीत केशवराव जेधे होते. मग १३ ऑक्टोबर १९२९ रोजी सत्याग्रह करून हरिजनांसह मंदिरात प्रवेश करण्याचे ठरले. यांत काकासाहेब गाडगीळ, राजभोज, एस० एम० जोशी इत्यादी तीनशे सत्याग्रहींबरोबर केशवराव

जेधेही होते. एक नमूद करण्यासारखी गोष्ट अशी आहे की, महात्मा फुले यांनी सर्व मानव समान असल्याचे मानून दलितमुक्तीस प्राधान्य दिले असले आणि शाहू महाराजही याच मताचा पुरस्कार करून त्याप्रमाणे वागत होते तरी सत्यशोधक समाज वा ब्राह्मणेतर पक्ष यांतील अनेकांना या दलितमुक्तीच्या कामात रस नव्हता. काही तर विरोधीच होते. जेधेबंधू मात्र जोतिबांच्या दलितमुक्तीच्या कार्यक्रमाचे पाठीराखे होते. दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे. त्यांनी तर नंतरच्या काळात हरिजन सेवेलाच वाहून घेतले होते.

या अशा वातावरणात काकासाहेब गाडगीळ सांगतात की, ''महाराष्ट्रात एकभाव निर्माण करायचा तर ब्राह्मणेतरांचा विश्वास संपादन केला पाहिजे व त्याकरिता त्याग केला पाहिजे. म्हणून एके दिवशी केशवराव जेधे यांच्याकडे गेलो व म्हणालो, 'पाट आणा आणि चहा आणा.' त्यांना काही समजेना. मी म्हणालो, पाटावर बसतो, चहा पितो, जेवढ्या शिव्या वा टीका ब्राह्मणवर्गावर करावयाची असेल तेवढी करा, मग विचार करा की तुमचा प्रश्न सुटला का? तुमचा प्रश्न वास्तविक आर्थिक आहे. राजेरजवाडे, जमीनदार व सरदार सोडले तर मराठा समाज हा दरिद्री आहे. त्याने नांगरावे, लागवड करावी व मोत्यासारखे पीक सावकाराने मातीमोलाने घ्यावे. वरच्या समाजाची स्थिती अशीच आहे. मूठभर सोडले तर तीस रुपड्यांवर खर्डेघाशी करणारे असंख्य आहेत. त्यांची बुद्धी श्रीमंत अल्पवेतन देऊन घेतात. दोघांचे दुष्मन हा धनिक वर्ग व हा सावकारवर्ग आहे व त्याला राज्यकर्त्यांनी अभय दिले आहे. वाटेल तेवढी जानवी घाला. जेथे म्हणाल तेथे अधिकार घ्या, पण समान शत्रू नंबर एक म्हणजे इंग्रज व दुसरा धनिक व ऐतखाऊ वर्गही आहे.'' (*पथिक* खंड १, पृष्ठे १९१-९२)

थोड्या दिवसांनी केशवराव जेधे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसच्या दृष्टीने व महाराष्ट्राच्या दृष्टीने ही मोठी घटना होती. नंतरच्या काळात जेधे -गाडगीळ ही जोडी महाराष्ट्र काँग्रेसच्या राजकारणात गाजत राहिली. काँग्रेसची सभासदसंख्या लाखाने वाढली, पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे काँग्रेसचा पाया व्यापक झाला. अशा रीतीने केशवराव जेधे व यशवंतराव चव्हाण यांनी साधारणत: एका वेळी काँग्रेसचे कार्य करण्याचा निर्णय घेतला. दोघांच्या वयात तर फरक होताच, शिवाय इतरही बाबतींत होता. जेधे यांचे घराणे थेट शिवकालापर्यंतच पोचत नव्हते तर शिवाजी महाराजांच्या सैन्यात जेध्यांचे पूर्वज होते. हे घराणे मराठा समाजात प्रतिष्ठित होते आणि धनिक, मातबर असे होते. केशवराव जेधे व त्यांचे भाऊ बाबुराव सत्यशोधक समाज वा ब्राह्मणेतर पक्षाचे आधारस्तंभ होते. यशवंतरावांचे भाऊ सत्यशोधक समाजात सक्रिय असले तरी यशवंतराव त्या पक्षात कधी गेले नाहीत; पण घरात व बाहेर चालणारी चर्चा ऐकत होते. परंतु वृत्तपत्रांचे व ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वाचन यांचा वेगळा परिणाम होत होता. दिल्लीच्या नेहरू स्मारक ग्रंथालयाने अनेक प्रमुख व्यक्तींच्या स्वातंत्र्य-आंदोलनासंबंधीच्या आठवणी मुलाखतींच्या रूपाने संग्रहित केल्या आहेत. या ग्रंथालयाचे एके काळचे ग्रंथपाल हरिदेव शर्मा हे स्वत: या आंदोलनात सहभागी झालेले होते आणि एक अभ्यासू ग्रंथपाल म्हणून त्यांचा लौकिक होता. हरिदेव यांना दिलेल्या मुलाखतीत, या ऐतिहासिक कादंबरीवाचनाचा परिणाम राष्ट्रीय विचारांकडे वळण्यात झाला असे यशवंतरावांनी म्हटले आहे. याशिवाय लोकमान्य टिळकांच्या लिखाणाच्या वाचनाचा परिणाम झाला आणि देशासाठी त्यांच्यासारख्या विद्वानाने केलेला त्याग, यामुळे आपल्या विचाराला वेगळी दिशा मिळाली. स्वातंत्र्यवीर सावकरांचे काही साहित्य आपण तरुणपणी वाचले आणि



दे० भ० केशवराव जेधे यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी. सोबत वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई व इतर

सावरकरांचे साहसी जीवन, त्यांचा त्याग यानेही आपल्यावर प्रभाव टाकला होता असेही यशवंतरावांनी सांगितले. त्याचबरोबर महात्मा फुले यांच्या विचारांची महती यशवंतरावांनी स्पष्ट केली. तथापि जोतिबांनी दिलेली सामाजिक न्यायाची दृष्टी महत्त्वाची असली, तरी देशात होत असलेले परिवर्तन पाहून आपण ब्राह्मणेतर चळवळीत सामील झालो नाही, असा खुलासा यशवंतरावांनी या मुलाखतीत केला.

१९२९ साली लाहोर इथे रावी नदीच्या काठी, काँग्रेसचे अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली होऊन संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर करण्यात आला. देशभर व विशेषत: तरुण पिढीवर या ठरावाचा मोठा परिणाम झाला. तसा तो कराडमध्ये यशवंतराव व त्यांचे मित्रमंडळ यांच्यावर होणे अपरिहार्य होते. त्यांनी मग प्रतिज्ञापत्र तयार करून ते जाहीर सभेत वाचण्याचा निर्णय घेतला. ते प्रतिज्ञापत्र आपण लिहिले व त्यावर राम गणेश गडकरी यांच्या भाषेचा प्रभाव होता, असे यशवंतरावांनीच नमूद केले आहे. २६ जानेवारी १९३०ची सकाळ उजाडली आणि कराडमध्ये जाहीर सभेत देशसेवेचे व संपूर्ण स्वातंत्र्याच्या काँग्रेसच्या ठरावास पाठिंबा देणाऱ्या पत्राचे वाचन झाले. देशातील राजकीय वातावरण बदलले होते, त्याचा परिणाम विविध जातीजमातींवर कसा होत होता याची कल्पना यशवंतरावांनीच दिली आहे. कराडमधील भोई, कोष्टी, शिंपी समाजातल्या तरुणांत राष्ट्रीयत्वाचे वातावरण निर्माण झाले होते, पण मुसलमान तटस्थ तर अस्पृश्य उदासीन होते. कराडच्या आसपासच्या खेडेगावांतही सर्वसामान्य शेतकरी, नव्या वातावरणात होणाऱ्या सार्वजनिक हालचालीत कितपत भाग घ्यावा याबद्दल साशंक होते.

याचे कारण काय, असे विचारल्यावर यशवंतरावांचे भाऊ गणपतराव यांनी उलट सवाल केला की, शेतकऱ्यांनी तुमच्या असहकाराच्या चळवळीत का यावे? त्यांचे जे प्रश्न आहेत त्या संबंधात त्यांना सरकारच्याच दाराशी जावे लागते. त्यामुळे असहकाराबद्दल त्यांना उत्सुकता वाटण्याचा संभव कमी. तुम्ही कधी त्यांच्याकडे जाऊन त्यांचे प्रश्न समजावून घेतले नाहीत. यशवंतरावांच्या विचारांना यामुळे नंतरच्या काळात वेगळे वळण लागले, पण ३० सालच्या सुमारास आलेला अनुभव, हा त्यामागे बीजरूप होता असे मानता येईल.

महात्मा गांधींनी या वेळी मिठाच्या सत्याग्रहाची हाक दिली आणि १२ मार्च १९३० रोजी गुजरातमधील दांडी या गावाच्या दिशेने मोर्चा सुरू केला. मिठाबाबतचा सरकारी कायदा तोडण्यासाठी ही यात्रा होती. त्या आधी राजकीयदृष्ट्या अनिश्चतता होती व ती सरकारने निर्माण केली होती. सायमन आयोगाचा अहवाल प्रसिद्ध व्हायचा होता आणि ज्या गोलमेज परिषदेची घोषणा सरकारने केली होती ती वसाहतीचे स्वातंत्र्य देण्यासाठी होणार नसून लोकमत स्पष्ट होऊन सरकारने कोणत्या दिशेने जावे याचे दिग्दर्शन करण्यासाठी भरेल असे व्हॉइसरॉय लार्ड अर्विन यांनी जाहीर केल्यामुळे लोकांचा अपेक्षाभंग झाला. यावर महात्मा गांधींनी सरकारकडे चौदा मागण्यांचा खलिता पाठवला. त्यात सरकारी बड्या अधिकाऱ्यांच्या पगारात कपात, राजकीय राजबंद्यांची सुटका, लष्करावरील खर्च कमी करणे आणि मिठावरील कर रद्द करणे यांचा समावेश होता. या मागण्या अमान्य झाल्यास असहकाराची चळवळ सुरू होईल, असे गांधींनी जाहीर केले होते. मागण्या अमान्य झाल्या आणि म्हणून गांधींनी साबरमती आश्रमापासून दांडी यात्रेला सुरुवात केली. गांधींच्या या दांडी यात्रेने देशभर सत्याग्रहाचे वातावरण तयार होऊन हजारो लोक तुरुंगांत गेले. अनेकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या, तर सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालण्याचीही लाट उसळली. यातून मग राष्ट्रीय शिक्षणासाठी शाळाच नव्हे, तर महाविद्यालयेही स्थापन झाली. गांधींच्या या यात्रेच्या बातम्या देण्यासाठी देशातले व परदेशांतलेही बरेच वार्ताहर जमले होते. परदेशी वार्ताहरांच्या वार्तापत्रांमुळे अनेक देशांत या सत्याग्रहाची माहिती पसरत होती. विल्यम शिरर या अमेरिकन वार्ताहराने नंतर दांडीयात्रेतील अनुभवांवर एक पुस्तक लिहिले.

महात्मा गांधींच्या या व आधीच्या आंदोलनांमुळे आणि ग्रामीण भागातील अगदी सामान्य लोकांच्या प्रश्नांना त्यांनी हात घातल्यामुळे, देशात नवे नेतृत्व उदयाला आल्याची भावना सर्वत्र पसरली. वीस सालापूर्वीच्या आंदोलनांमुळे लोकमान्य टिळकांनी, गांधी हेच देशाचे भावी नेते असल्याचा निर्वाळा दिला होता. त्यांनी आपल्या काही अनुयायांना असेही सांगितले की, यापुढे गांधींबरोबर आपण सहकार्य करू आणि समजा, एखाद्वेळी त्यांच्याशी मतभेद झाला तरी आपण त्याची वाच्यता करणार नाही. देशाच्या कानाकोपऱ्यांत गांधीजींनी एक नवी आशा निर्माण केली. याचे पडसाद अनेक भाषांतल्या साहित्यातही उठू लागले. माधव जूलियन व विठ्ठलराव घाटे यांनी 'मधुमिलिंद' या जोडनावाने प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रहात 'तो पहा महात्मा आला', या मथळ्याची कविता आहे.त्या कवितेतील कल्पना अशी की, आसामच्या चहाच्या मळ्यात काम करणारा कामगार मरण पावल्यावर, त्याची पत्नी आपल्या लहान मुलास सांगते की, ही काळरात्र संपेल. आपले मूल हे तुमच्या आंदोलनातील एक शिपाई होईल असे ती गांधीजींना आश्वासन देते. ती अखेरीस आपल्या मुलाला म्हणते :

ते गेले आत्मा गेला तेव्हाच स्वर्ग लोकाला
हा देह राहिला तुजला द्यावया महात्माजीला

हो शूर शिपाई राजा,गांधीच्या सैन्यामधला
हा जीव मम ठेवा
तुज अर्पण गांधीदेवा
उद्धरा आम्हां गरिबाला,
तो पहा महात्मा आला.

जनमानसावर गांधीजींचा इतका प्रभाव पडण्याचे रहस्य काय? याचे उत्तर रवीन्द्रनाथांनी एका कवितेत दिले होते. त्या कवितेचे मराठी रूपांतर डॉ० उत्तमराव पाटील यांनी त्यांच्या 'क्रांतिपर्व' या बेचाळिसच्या स्वातंत्र्य संग्रामातील अनुभव कथन करणाऱ्या पुस्तकात दिले आहे. रवीन्द्रनाथ लिहितात :

हजारो दलितांच्या झोपड्यांशी तो थांबला
त्याचा पेहराव त्यांच्या पेहरावासारखाच होता
तो बोलत असलेली भाषा त्यांचीच होती.
ग्रंथवाचनातील सत्य त्यांना माहीत होते, पण उभे होते मूर्तिमंत सत्य.
तो जनतेशी एकरूप झाला
जनताही म्हणू लागली
किती शोभून दिसते त्याला हे नाव.
सर्व भारतीय माझ्याच हाडामासांचे आहेत असे त्याच्याखेरीज कोणाला वाटले?
भारतीय जनतेच्या द्वारापाशी जेव्हा मूर्तिमंत सत्य उभे राहिले, तेव्हा ते दार सताड उघडले गेले.
गांधीजींच्या हाकेसरशी देश जागृत झाला.
आयुष्यातील फार मोठे स्वप्न मी बघितले. मस्तक अधोवदन झाले.

गांधींच्या या आंदोलनांमुळे देशाच्या राजकारणातील कोंडी संपली. यापूर्वी बंगालच्या फाळणीला विरोध करताना बहिष्काराचा मार्ग स्वीकारला गेला होता. पण तो एका प्रांतापुरता मर्यादित होता. तसाच तो मर्यादित ठेवायचा की, देशभर त्याचा अवलंब करायचा यासंबंधी काँग्रेसमध्ये जहाल व नेमस्त यांच्यात मतभेद होऊन, १९०७ साली सुरतच्या अधिवेशनात काँग्रेस फुटली. या स्थितीत सरकारकडून आपली स्वातंत्र्याची मागणी मान्य करून घेण्याचा मार्ग कोणता, हा प्रश्न होता आणि कोणत्याच पुढाऱ्याकडे याचे उत्तर नव्हते. ते गांधींनी दिले आणि साहजिकच देशाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले.

महात्माजींची ही चळवळ चालू असली तरी सरकारविरोधी प्रयत्नांना दुसरीही दिशा यापूर्वीच मिळाली होती. गांधींनी वीस साली सुरू केलेली चळवळ, चौरीचौरा इथे पोलिसांना ठार मारले गेल्यामुळे मागे घेतली गेली, हे अनेकांना पसंत पडले नव्हते. यामुळे अनुशीलन या बंगालमधील क्रांतिकारी संघटनेचे पुनरुज्जीवन झाले आणि हिंदुस्तान रिपब्लिक असोसिएशन अशी संघटना स्थापन होऊन, कानपूरमध्ये तिचे अधिवेशन झाले. नंतर काकोरी इथे रेल्वेच्या गार्डाकडील रक्कम लुटण्यात आली. सोव्हिएत युनियनच्या सरकारतर्फे मानवेन्द्रनाथ रॉय, आशियाई देशांत कम्युनिस्ट कार्यकर्ते तयार करण्यासाठी एक शिक्षणसंस्था चालवत होते. त्याप्रमाणे भारतातही कम्युनिस्ट आंदोलन सुरू व्हावे म्हणून प्रयत्न करत होते. कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२५ साली झाली. त्याच वर्षात रॉय यांच्यासह डांगे, मुजफ्फर अहमद प्रभृतींवर सरकारने खटला भरला. कानपूर इथे कट केल्याचा त्यांच्यावर आरोप होता म्हणून हा कानपूर

खटला या नावाने ओळखला जातो. रॉय परदेशात असल्यामुळे त्यांना व इतरही हजर नसलेल्या आरोपींना वगळून चार आरोपींवर खटला चालवण्यात आला. आरोपींना शिक्षा देण्यात आली आणि रॉय भारतात परतल्यावर त्यांच्यावरही खटला होऊन सहा वर्षांची शिक्षा दिली गेली. याच काळात कामगार चळवळही मूळ धरत होती. अमेरिकेतल्या मंदीची झळ भारतासही लागून कामगार चळवळ अधिक संघटित होण्याचा धोका असल्याची सरकारची खात्री झाली. ब्रिटिश सरकार व व्हाइसरॉय अर्विन यांच्या घोषणेस या घडामोडीही कारणीभूत झाल्या होत्या.

गांधींच्या चळवळीमुळे कराड शहरात व तालुक्यात रोज प्रभातफेऱ्या, भाषणे इत्यादी कार्यक्रम उत्साहाने होत होते. त्या अनेक कार्यक्रमांचे वृत्तान्त यशवंतराव 'एक बातमीदार' या नावाने 'ज्ञानप्रकाश'कडे धाडत असत व ते प्रसिद्धही होत असत. काकासाहेब गाडगीळ यांचेही भाषण झाले आणि ते गाजले. प्राज्ञपाठशाळेचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी कराडमध्ये आठदहा दिवस मुक्काम करून रोज भाषणे दिली. त्यांनी स्वराज्याचा अर्थ विशद करून सांगितला आणि त्यासाठी चाललेल्या आंदोलनाचे महत्त्वही स्पष्ट केले. त्यांच्या भाषणांचा आपल्यावर फार परिणाम झाला असे सांगून, त्यांतील काही वाक्ये आपल्या कायमची लक्षात राहिल्याची आठवण यशवंतरावांनी नमूद केली आहे.

वाढत्या आंदोलनामुळे सरकारची दडपशाही वाढत गेली होती. अनेकांना विनाचौकशी तुरुंगात ठेवले होते. या सर्वांचा विचार करण्याकरिता एक बैठक झाली. तीत सातारच्या काही पुढाऱ्यांची उपस्थिती होती. तीत एकाने सांगितले, की बिळाशी भागातील दडपशाही विशेष उग्र स्वरूपाची आहे. त्याने याची काही उदाहरणेही कथन केली. तेव्हा वस्तुस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी प्रथम दोन तरुणांना धाडावे व त्यांनी जिल्ह्याच्या पुढाऱ्यांना अहवाल द्यावा असा निर्णय होऊन, यशवंतराव व त्यांचे मित्र राघूअण्णा लिमये यांची निवड झाली. बिळाशीच्या जवळच्या गावातील देशपांडे या जमीनदारांच्या घरी यशवंतराव व राघूअण्णा यांचा मुक्काम झाला. गावातील वातावरणामुळे त्यासंबंधी गुप्तता पाळलेली होती. दुसऱ्या दिवशी कार्यकर्ते येऊन आपले अनुभव सांगत होते. मग दोघेही बिळाशीत गेले. तिथे पोलिस बंदोबस्त बराच होता व त्यांनी अत्याचारही केले होते. पण तिथल्याच एका गृहस्थाने पोलिसांना बरीच दारू पाजून, यशवंतराव व राघूअण्णा यांची भेट व्यवस्थित पार पाडली होती. बिळाशीत लोकांनी सरकारी यंत्रणेला पर्यायी व्यवस्था स्थापन करून, ग्रामराज्याचा प्रयोग केला होता आणि त्यामुळे सरकारी अधिकारी संतप्त झाले आणि त्यांनी दरारा बसेल अशी दडपशाही केली होती. बिळाशीचे काम झाल्यावर आपले मूळ गाव साखरपे इथे आपल्या लिमयांपैकी कोणी आहे काय, हे पाहण्याची कल्पना राघूअण्णांनी काढली. त्या गावाला भेट देऊन दोघेही रत्नागिरीस गेले. हे व यापूर्वी जे राजकीय कार्य यशवंतरावांनी गुप्तपणे केले, त्याचा १९४२च्या आंदोलनात भूमिगत असताना काही उपयोग झाला असेल.

रत्नागिरीस जाण्याचे दोन हेतू होते. ते म्हणजे यशवंतरावांनी तोपर्यंत समुद्र बघितला नव्हता. तो पाहावा आणि रत्नागिरीत स्वातंत्र्यवीर सावरकर राहत होते, त्यांना पाहावे. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी यशवंतरावांनी बरेच ऐकले होते. शिवाय अंदमानातील अनुभवांवर आधारलेले *माझी जन्मठेप* हे पुस्तक, *श्रद्धानंद* या नियतकालिकात क्रमशः प्रसिद्ध होत असताना त्यांनी ते बरेचसे वाचले होते आणि त्याचा प्रभाव मनावर पडला होता. स्वातंत्र्यासाठी बेहोशीने जीवन झोकून देणाऱ्या या व्यक्तीला पाहण्याची उत्कंठा यशवंतरावांना होती. ती रत्नागिरीच्या भेटीत पुरी करण्याची त्यांना इच्छा होती. सावरकरांची अंदमानातून सुटका झाल्यानंतर त्यांना रत्नागिरीत ठेवून तिथून न हलण्याचा व राजकारणात भाग न



घेण्याचा निर्बंध लादण्यात आला होता. समुद्र पाहिल्यावर राघूअण्णा व यशवंतराव थक्क होऊन गेले. मग या दोघांची सावरकरांशी भेट झाली.

या भेटीचे यशवंतरावांनी केलेले वर्णन उल्लेखनीय आहे. ते लिहितात, ''मध्यम उंचीचे, काहीसे किरकोळ बांध्याचे, डोळ्यांवर चष्मा आणि पलीकडे पाहणारी त्यांची भेदक नजर; अशी ती मूर्ती नजरेसमोर आली. अंगात स्वच्छ सदरा आणि तितकेच स्वच्छ पांढरे सैलसे धोतर, पायांत साध्या वहाणा अशा या घरगुती वेषात ते होते–''एवढा लांबचा प्रवास कशासाठी केला, बाळ?'' मग राघूअण्णांनी आम्ही मिठाच्या सत्याग्रहातील काँग्रेसचे कार्यकर्ते आहोत, अशी माहिती दिली. बिळाशीच्या बंडाची हकिगत त्यांना सांगितली आणि तेथे नुकतेच जाऊन आलो, तीही हकिगत सांगितली. सावरकरांच्या तेजस्वी डोळ्यांत काहीसे हसू दिसले. ''मोठेच पराक्रमी दिसता तुम्ही'' खळखळून हसत ते म्हणाले.

थोड्या वेळाने ते म्हणाले, ''तुम्हांला काही विचारावयाचे आहे काय?'' मी सांगितले, ''निदान मला काही विचारावयाचे नाही. मला फक्त आपणांस डोळे भरून पाहायचे होते.'' ते उठून माझ्याजवळ आले. ''माझ्यात बघण्यासारखे काय आहे? मी तुमच्यासारखाच माणूस. तुमच्या आधी जन्माला आलो, देशसेवेचे व्रत घेतले आणि बलिदानाची प्रतिज्ञा करून कामाला लागलो. यात विशेष असे काय आहे? आमच्या पिढीने त्यांना योग्य वाटले, ते करायचा प्रयत्न केला. आता तुमची पिढी काय करते आहे ते पाहायचे'' आणि नंतर ते गंभीर होऊन खाली बसले.

त्यांना आठवण झाली नाशिकच्या कान्हेरेची. ते म्हणाले, ''तुम्ही मंडळी मोठ्या संख्येने चांगले काम करता आहांत. परंतु स्वातंत्र्य-आंदोलनासाठी जेव्हा कोणीच अवतीभोवती तयार होत नव्हते, तेव्हा एकाकीपणाने आम्ही हे राष्ट्रकार्य करीत होतो. अनंत कान्हेरे फासावर गेले. हल्लीचे तुम्ही लोक त्या बलिदानाला विसरला आहात, अशी मला उगीच हळहळ वाटते.'' राघूअण्णांनी सांगितले, ''ते आम्ही कसे विसरू? आपल्याकडूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी बलिदान केले, म्हणूनच आपले दर्शन घ्यायला आम्ही आलो आहोत.'' सावरकरांना बरे वाटले. सागर व सावरकर हे रत्नागिरीत एकाच वेळी पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे, रत्नागिरीची माझी आठवण ह्या भेटीशी कायमची संलग्न आहे. (*कृष्णाकांठ* पृ० ८८-९).

यशवंतराव व राघूअण्णा रत्नागिरीहून परत आल्यावर, कराडच्या नगरपालिकेने गव्हर्नर सर फ्रेडरिक साइक्स कराडला येतील तेव्हा त्यांना मानपत्र देण्याचा ठराव केला. यास विरोध करण्यासाठी जागृती करण्याचे ठरले व अनेक सभा झाल्या. गव्हर्नर आले तेव्हा निदर्शने झाली. जवळपास पंचवीस हजार माणसे त्यात सामील होती. यामुळे गव्हर्नरना मानपत्र मिळाले पण यास किती विरोध आहे हेही दिसून आले. या चळवळीचे नेतृत्व गणपतराव आळतेकर, बाबुराव गोखले इत्यादींनी केले होते. निदर्शनामुळे सरकारी अधिकारी चिडले आणि कराडमधील पाचपंचवीस प्रमुख व्यक्तींना पकडून त्यांना सातारला नेण्यात आले आणि शिक्षा देण्यात आली. या तीस सालच्या चळवळीच्या काळात किसन वीर व गौरीहर सिंहासने हे दोन मित्र यशवंतरावांना मिळाले व ते जन्मभर त्यांचे जवळचे मित्र राहिले.

यशवंतरावांना १९३१ सालच्या कराची इथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनास, स्वयंसेवक म्हणून हजर राहण्याची संधी मिळाली. पहिल्यांदाच त्यांना काँग्रेसचे अधिवेशन बघायला मिळत होते. या अधिवेशनात मूलभूत हक्कांचा ठराव काँग्रेसने संमत केला. अधिवेशनात एम. एन. रॉय हजर होते, पण गुप्त वेषाने, असे सांगितले जाते. तथापि इतके मात्र खरे की, जवाहरलाल नेहरू यांनी रॉय यांचा या अधिवेशनाच्या संदर्भात उल्लेख करून, बौद्धिकदृष्ट्या रॉय यांचा आपल्यावर मोठा परिणाम झाला असे

म्हटले. यशवंतरावांना मात्र रॉय यांच्या हजेरीची काही कल्पना नव्हती, असे त्यांनी हरिदेव शर्मा यांना दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

सातारा जिल्ह्यात राजकीय परिषद घेण्याची परंपरा होती. मिठाच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर ही परिषद मसूर इथे घेण्याचे ठरले. तिच्या आयोजनाच्या कामात यशवंतराव होते. परिषदेत कोणते ठराव आणायचे याची चर्चा विषयनियामक समितीत होणार होती आणि परिषदेसाठी कोल्हापूरहून माधवराव बागल यांना, विषयनियामक समितीत भाग घेण्यासाठी खास आमंत्रण होते. महात्माजी गोलमेज परिषदेसाठी लंडनला जाणार होते, तेव्हा कोणत्या मागण्या कराव्या हे सुचवण्यासाठी हा ठराव होता. माधवराव बागल यांनी उपसूचना मांडून सुचवले की, शेतकऱ्यांस नऊ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज द्यायला लागू नये; सावकाराने दामदुपटीपेक्षा कर्ज वसूल करू नये; जमीन कसणाऱ्या कुळांना शेती कसण्याचा कायमचा हक्क द्यावा. पण विषयनियामक समितीत बागल यांचा ठराव अध्यक्षांनी नामंजूर केला.समितीची बैठक संपल्यावर यशवंतराव व त्यांच्या तरुण सहकाऱ्यांनी बागलांना सांगितले की, त्यांनी खुल्या अधिवेशनात हेच मत मांडावे. त्याप्रमाणे माधवराव बागल यांनी ठराव मांडला व भाषण केले. त्याचे श्रोत्यांनी जोरदार स्वागत केले. परिषदेच्या विषयनियामक समितीच्या अध्यक्षांसारखे जे लोक होते ते महात्मा गांधींच्या आंदोलनाचे मर्मच विसरले होते. गांधींनी चंपारण, खेडा व बार्डोलीत सामान्य कुळांची बाजू घेऊन लढा दिला होता. तेव्हा सामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न डावलण्यात काही स्वारस्य नव्हते.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेल्या १९३० सालच्या आंदोलनात देशभरचा शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात सामील झाला होता. महाराष्ट्रात केशवराव जेधे काँग्रेसमध्ये सामील झाले होते व त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हेही आंदोलनात होते व कारावासात गेले होते. केशवराव व विठ्ठल रामजी यांच्या सहभागामुळे महाराष्ट्र काँग्रेसचे स्वरूप बदलले. पण काही नेत्यांना बदल करावासा वाटला नाही. गांधींच्या आंदोलनाचा व राजकारणाचा आणखी एक परिणाम झाला. लोकमान्य टिळकांच्या अनुयायांत दोन तट पडले. विदर्भाचे, दादासाहेब खापर्डे यांच्यासारखे टिळक अनुयायी सोडल्यास तात्यासाहेब केळकर, शिवराम महादेव परांजपे, काकासाहेब खाडिलकर इत्यादी, तीस-बत्तीस सालपर्यंत गांधींच्या काँग्रेसबरोबर राहिले. पण बत्तीसनंतर तात्यासाहेबांनी काँग्रेसचा त्याग केला. इतर मात्र काँग्रेसमध्ये राहिले. जे टिळक अनुयायी काँग्रेसबाहेर गेले, त्यांच्या राजकारणास जनसामान्यांचा पाठिंबा सतत कमी होत गेला. हीच अवस्था महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळचळीची झाली. गांधींच्या चळवळीत व आंदोलनात केशवराव जेधे सामील झाल्यावर, त्यांच्यामागे ब्राह्मणेतर चळवळीतील बहुजनसमाजातील बराच मोठा वर्ग गेला. यामुळे काँग्रेसचा सामाजिक पाया व्यापक बनला तर ब्राह्मणेतर पक्षाचा संकुचित झाला. महात्मा फुले यांची सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा या पक्षाचे भास्करराव जाधव यांच्यासारखे नेते विसरले होते आणि सरकारने आणलेल्या राजकीय सुधारणांखाली जे काही अधिकार मिळाले होते, त्यांतला जास्तीत जास्त वाटा मिळवणे हे उद्दिष्ट प्रमुख बनले.

हे केवळ महाराष्ट्रातच घडले नाही, तामिळनाडमध्ये जस्टिस पक्ष हाही ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करत होता. त्याचाही पाया ढासळत गेला. सामान्य शेतकरी हा जोतिबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांनी हा केंद्रबिंदूच दुर्लक्षित केला. जोतिबा व शाहू महाराज यांनी दलितांच्या उद्धारास प्राधान्य दिले होते. त्याचाही विसर ब्राह्मणेतर पक्षास पडला. या स्थितीत सत्यशोधक

म्हणवणारे हे 'सत्ताशोधक' झाले, अशी संभावना केशवराव जेधे यांनी केली आणि त्यांच्याशी फारकत घेतली. यामुळे मसूरच्या परिषदेच्या विषयनियामक समितीत माधवराव बागल यांची शेतकरीहिताची उपसूचना अध्यक्षांनी झिडकारल्याबद्दल, यशवंतरावांना आश्चर्य व विषाद वाटला तर ते रास्तच होते. तसाच विचार केला तर देशाच्या अनेक भागांत शेतकरी जागा होऊन चळवळी करू लागला होता. गांधींच्या चळवळीच्या नंतर कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडूत जंगल सत्याग्रह झाले. तर १९२६मध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली कामगार किसान पक्ष स्थापन होऊन, खंडकरी शेतकरी व शेतमजूर त्याने संघटित केले. यामुळे शेतकऱ्यांना काही संरक्षण देणारे विधेयक सरकारने आणले आणि त्यास जमीनदारांनी केलेला विरोध मानला नाही. बिहारमध्ये शेतकरी अधिकच कंगाल होता. पण तिथल्या किसानसभेत एकवाक्यता नव्हती. त्यामुळे शेतकरी हिताचे कायदे होऊ शकले नाहीत. पण शेतकरी अस्वस्थ होते. उत्तरप्रदेशाच्या प्रतापगड भागात किसानसभेची स्थापना १९१७ मध्ये झाली होती, पण तिच्या खऱ्या कार्याला आरंभ १९१९मध्ये झाला. रामचन्द्रबाबा हा किसानसभेचा नेता होता. त्याच्या आंदोलनास काही वेळा हिंसक वळण लागत असे. पुण्याजवळच्या मुळशी इथे, धरण बांधण्याची योजना टाटा कंपनीने १९२१ साली हाती घेतली व शेतकऱ्यांच्या जमिनी काही किंमत देऊन घेतल्या. ही किंमत पुरेशी नसल्यामुळे जमिनी परत करण्याची मागणी करण्यात तात्यासाहेब केळकर व त्यांचा 'केसरी' पुढे होता. मग बाळूकाका कानिटकर, शंकरराव देव, सेनापती बापट, शिवरामपंत परांजपे हे पुढे होते. तडजोड होत नसल्यामुळे सत्याग्रह झाला; पण बापटांनी मालमोटारीच्या ड्रायव्हरवर गोळी झाडली. यामुळे आंदोलनाला वेगळे वळण लागले. तथापि कंपनीने जमिनीच्या किमती वाढवून दिल्यावर धरण झाले आणि पुढे वीजनिर्मिती होऊ लागली. या आंदोलनाबद्दल लिहिताना त्र्यं० र० ऊर्फ मामा देवगिरीकर यांनी म्हटले आहे की, स्वराज्यात अनेकदा धरणासंबंधात वाद झाले. पण तेव्हा भूमिका बदललेली होती. देवगिरीकरांच्या लिखाणाचा रोख असा की, पारतंत्र्याच्या काळात जे योग्य वाटत होते ते अंतिमत: तसे होते असे नाही.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्या आत्मचरित्रात, उत्तरप्रदेशाच्या अवध भागातील किसानांची दुरवस्था व ती दूर करण्यासाठी चालू झालेले संघटित प्रयत्न यांची चर्चा केली आहे. ते लिहितात की, अवध भागात जमीनदारांचे वर्चस्व होते व शेतकरी हे खंडकरी होते. त्यांना काही संरक्षण नव्हते आणि वाढीव खंड देण्यास कोणी तयार झाल्यास, कमी खंड देणाऱ्यास हुसकावून लावले जाई. अवध, प्रतापगड, बरेली इत्यादी बऱ्याच भागांत किसान मेळाव्यांत नेहरू भाग घेत होते. अनेक ठिकाणी महात्मा गांधींच्या प्रभावामुळे शांततामय सत्याग्रह होत असे, पण काही ठिकाणी लूटमार, हिंसा इत्यादी प्रकार होत. काही जणांनी दिशाभूल केल्याचा हा परिणाम असल्याचे आढळले होते. ते कसेही असले तरी किसान जागृत झाला होता आणि त्याचे प्रश्न हाती घेणे अगत्याचे होते, असा अभिप्राय नेहरूंनी दिला आहे. (*ऑटोबायोग्राफी*, पृष्ठे ५९-६४.)

लंडनमधील गोलमेज परिषदेत निराश होऊन महात्मा गांधी परत आले आणि देशाच्या राजकारणाला वेगळी गती आली. तथापि गांधी इंग्लंडमध्ये असताना, डोईजड जमीन महसूल न देण्याचा निर्णय घेऊन उत्तरप्रदेशाच्या शेतकऱ्यांनी केलेल्या मोहिमेत, पंडित नेहरू सामील झाले होते. त्यामुळे ते अटकेत होते. या स्थितीत व्हॉइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनी महात्मा गांधींशी वाटाघाटी करण्याचे ठरवले असले तरी गांधी यास तयार झाले नाहीत. त्यांनी सत्याग्रहाची हाक दिली. तेव्हा त्यांना ४ जानेवारी १९३२ रोजी

अटक होऊन येरवडा तुरुंगात आणण्यात आले. मग देशभर पुन्हा सत्याग्रहाची लाट उठली. कराडमध्ये प्रभातफेऱ्या, झेंडावदन इत्यादी कार्यक्रम होऊ लागले आणि २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन इत्यादी कार्यक्रम झाला. तेव्हा दुसऱ्या दिवशी यशवंतराव शाळेत वर्गात बसले असताना पोलिसांनी त्यांना पकडून नेले. नंतर त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा झाली व येरवड्याला नेण्यात आले. यशवंतरावांचे ते मॅट्रिकचे वर्ष होते. त्या परीक्षेला न बसण्याचा निर्णय त्यांनी अगोदरच घेतला होता. येरवड्याचा तुरूंग पुरता भरला असल्यामुळे, सरकारने त्याच्या मागच्या बाजूस मैदानात तंबू टाकून राजबंद्यांना तिथे ठेवण्याची व्यवस्था केली होती. यशवंतरावांना प्रत्यक्ष कारावासात अठरा महिन्यांपैकी पंधरा महिने राहावे लागले. त्यातही वर्षानंतर विसापूरच्या कारावासात बदली करण्यात आली होती. त्यांनी लिहिले आहे की, आपल्या जीवनातला हा उत्तम काळ होता. याच काळात आपली भावनाशीलता कमी होऊन विचारांची खोली वाढवण्याची संधी मिळाली. कारावासात ज्या बराकी होत्या, त्यांत राजबंद्यांची कशी वाटणी करायची हे काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी ठरवले होते. त्यांतील बारा नंबरच्या बराकीत निवडक व नामवंत सत्याग्रहींना ठेवायचे आणि जे शाळा व महाविद्यालयाचे शिक्षण अर्धवट सोडून आले असतील, त्यांचे अभ्यासवर्ग या नामवंतांनी घ्यायचे अशी योजना होती. यामुळे या बारा नंबरच्या बराकीत यशवंतरावांना ठेवण्यात आले. बारा नंबरच्या बराकीत रावसाहेब पटवर्धन व आचार्य भागवत प्रमुख होते. रावसाहेबांना कारागृहाच्या कार्यालयात काम करण्यास सांगण्यात आले होते. यामुळे त्यांनी कारागृहाच्या प्रमुखास सांगून, सत्याग्रहींना वृत्तपत्रे व पुस्तके मिळतील अशी व्यवस्था केली. पुण्याच्या ग्रंथालयातूनही पुस्तके आणण्याची सोय झाली. इतक्या लोकांना काम देण्यासारखेही काही नव्हते. बराकीतील लोकांच्या ओळखी होऊ लागल्या तेव्हा वि० म० भुस्कुटे, एस० एम० जोशी अशांशी यशवंतरावांची गाठ पडली.

आचार्य भागवत यांनी यशवंतराव व त्यांच्या वयाच्या राजबंद्यांना सांगितले की, तुमचे शिक्षण अर्धवट झाले आहे. इथून केव्हा सुटाल हे सांगता येत नाही, तेव्हा पुस्तके वाचा व नामवंत लोकांशी संपर्क ठेवा. मग जे आले त्यांत ह० रा० महाजनी हे एक होते. ते सातारा जिल्ह्यातले. त्यामुळे यशवंतरावांशी चांगले परिचित. आचार्य भागवतांची सूचना यशवंतरावांनी महाजनींना सांगितली. त्यांना ती पसंत पडली. महाजनी संस्कृतचे पंडित होते आणि महाजनीशास्त्री म्हणून ओळखले जात. त्यांनी दुसऱ्या दिवसापासून *शाकुन्तल* शिकवण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी आचार्य भागवतांनी शेक्सपियरचे *ज्युलियस सीझर* हे नाटक शिकवण्यास घेतले. आचार्य भागवत हे निष्ठावान गांधीवादी. त्यांनी गांधींच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करणारी भाषणे दिली. गांधींचा विचार भारतीय संस्कृतीतून कसा निर्माण झाला याची उकल करून आचार्य सांगत असत. आचार्य भागवत यांनी, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हिंदुत्ववादावर कडक टीका करणारे भाषण कारावासातल्या अभ्यासवर्गात दिले होते. नंतर यशवंतरावांनी आचार्य भागवत यांना विचारले की, साहित्यिक म्हणून सावरकरांबद्दल तुमचे काय मत आहे? ते म्हणाले की, सावरकर साहित्यिक म्हणून आपल्याला प्रिय असून 'गोमंतक', 'कमला' अशी काव्ये आपल्याला फार प्रिय आहेत. मग 'कमला' व 'गोमंतक' या काव्यावर आचार्य भागवत यांनी रसाळ व्याख्याने दिली, अशी आठवण यशवंतरावांनी नमूद केली आहे.

गांधीवादाप्रमाणेच समाजवाद व मार्क्सवाद यांचेही शिक्षण होऊ लागले होते. ह० रा० महाजनी व

एस० एम० जोशी हे पूर्णपणे गांधीवादी नव्हते तर समाजवादाचे पुरस्कर्ते होते. वि० म० भुस्कुटे हे मार्क्सवादी होऊ लागले होते. मार्क्सवादाचा विचार शास्त्रीय पद्धतीने करून भारताच्या राजकीय लढ्यात त्याचा कसा उपयोग करायचा हे ठरवले पाहिजे, अशी भुस्कुटे यांची विचारसरणी होती. कम्युनिस्ट जाहीरनामा भुस्कुटे यांच्याकडूनच यशवंतरावांना वाचायला मिळाला होता. लेनिनचे चरित्र, रशियन क्रांतीचा इतिहास इत्यादींचे वाचन करण्याची संधी यशवंतरावांना याच काळात मिळाली. लेनिनसंबंधी महाजनी व डॉ० शेट्टी यांच्याशी बोलत असताना, यशवंतरावांना एम० एन० रॉय यांच्यासंबंधी माहिती झाली. कारावासात असलेल्या रॉय यांनी आपले विचार स्पष्ट करणारी काही पत्रे गुप्तपणे धाडली होती. त्यांची माहितीही मिळाली.

कारावासातील मंडळींत देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनासंबंधीही चर्चा होत. सामाजिक जीवनासंबंधीच्या चर्चेत अनेकजण काही चुकीच्या कल्पना बाळगून असल्याचे यशवंतरावांना आढळले होते. यास अपवाद होता महाजनी, एस० एम० व भुस्कुटे यांचा. ते समजूतदारपणे या विषयासंबंधी बोलत असत. यशवंतरावांनी म्हटले आहे, की एस० एम० यांनी युवक चळवळीसंबंधी मोठ्या उत्कटतेने दिलेल्या भाषणाचाही आपल्याला विसर पडला नाही. याच कारावासात आपल्याला बर्ट्रांड रसेल यांचे 'रोड्स टु फ्रीडम' हे पुस्तक वाचायला मिळाले; असे सांगताना इंग्रजी पुस्तक वाचण्याचा सराव नसल्यामुळे हे पुस्तक वाचताना अवघड गेले, पण त्यातल्या विचारांचा पगडा बसला आणि स्वातंत्र्याचा विचार हा किती व्यापक आहे याची कल्पना येऊन, इंग्रजी पुस्तके वाचण्याची सवय लागली असे यशवंतरावांनी सांगितले आहे.

येरवडा कारागृहात यशवंतरावांना येऊन वर्ष होण्याच्या सुमारास सरकारने जातीय निवाडा जाहीर केला. त्यानुसार हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आला होता. यास विरोध करून गांधीजींनी उपोषण सुरू केले. याची चर्चा कारावासातल्या बंदिवानांत होत होती. या संबंधात यशवंतरावांनी लिहिले आहे की, हरिजनांना स्वतंत्र मतदारसंघ दिल्यामुळे दुफळी वाढण्याचा धोका वर्तवला जात होता व त्यात तथ्य होते, पण ही वेळ कां आली, याचा विचार केला जात नव्हता. अखेरीस डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी सोडली व गांधीजींचे प्राण वाचवले. यामुळे त्यांच्याबद्दलचा आदर वाढला, अशी प्रतिक्रिया यशवंतरावांनी व्यक्त केली आहे. ती करत असतानाच बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणीच करायला नको होती असे मानणारांची टीका रास्त नव्हती, इत्यादी अभिप्राय यशवंतरावांनी दिला आहे. तो त्यांच्या प्रगत सामाजिक जाणिवेचा द्योतक म्हटला पाहिजे.

शिक्षेचा एक वर्षाचा काळ संपल्यावर यशवंतरावांची बदली विसापूर कारावासात झाली. तिथे ह० रा० महाजनी व स० का० पाटील आले होते. पाटील यांनी राजबंद्यांना पुस्तके मिळतील अशी व्यवस्था केली होती. विसापूरच्या या तुरुंगात गुजराती सत्याग्रहीही होते. त्यांच्याशी बोलताना गुजराती भाषेचा परिचय झाला. ह० रा० महाजनी यांनी एक दिवस अशी सूचना केली की, आपण वर्षभरात जी पुस्तके वाचत आलो, त्यांचे आपल्या मनावर काय परिणाम झाले व आपल्या विचारांना कोणती दिशा लागली, ते लोकांना समजावून सांगण्यापूर्वी बराकीतील मित्रांच्या मेळाव्यापुढे यशवंतरावांनी भाषण द्यावे. याप्रमाणे यशवंतरावांनी 'गांधीवाद' हा विषय निवडला व चाळीसएक मिनिटे भाषण दिले. भाषणाच्या अखेरीस यशवंतरावांनी खुलासा केला की, आपल्याला समजलेला गांधीवाद कसा आहे याबद्दल आपण बोललो, पण ती आपली जीवननिष्ठा आहे असे प्रामाणिकपणे म्हणणे शक्य नाही. गांधीवादाची सर्वात

महत्त्वाची देणगी, साध्यसाधन शुचिता ही आहे. ती मानवी जीवनात नित्य उपयोगी अशी आहे. गांधीजींचा राजकीय कार्यक्रम स्वीकारला वा न स्वीकारला तरी ही देणगी मोठी आहे. तत्त्व म्हणून नव्हे, तर व्यवहार म्हणून सुद्धा साध्यसाधनशुचिता हा सिद्धान्त उपयोगी पडणारा आहे. यशवंतरावांच्या या भाषणाचे महाजनी व निपाणीचे गांधीवादी कार्यकर्ते अनंतराव कटकोळ यांनी कौतुक केले.

यशवंतरावांच्या शिक्षेची मुदत १९३३ सालच्या मेमध्ये संपली व ते कराडला परतले. शाळा सुरू होण्याची वेळही आली होती. तेव्हा यशवंतरावांनी शाळेत दाखल होण्याचे ठरवले. अगोदरच त्यांची तीनएक वर्षे वाया गेली होती. त्यामुळे मॅट्रिकच्या वर्गात दाखल झाले तेव्हा ते वीस वर्षांचे झाले होते. अर्थात सार्वजनिक कार्याबद्दलचा उत्साह कायम होता. त्या वेळी गांधीजींनी तुरुंगातून सुटल्यावर हरिजन उद्धाराच्या कामास वाहून घेतले आणि मंदिरप्रवेशाचा कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाला खुद्द दलित समाजाचाच पाठिंबा नव्हता. तुमच्या विठ्ठलाला व रामाला भेटून आमचे पोट भरणार नाही, असे ते म्हणत. तेव्हा कोणता कार्यक्रम हाती घ्यावा, याचा विचार यशवंतराव व त्यांचे मित्र करू लागले. मग या सर्वांनी निरनिराळ्या गावांत जाऊन दलित समाजातल्या लोकांशी चर्चा केली. मातंग व चांभार या वर्गात प्रतिसाद मिळाला, पण महार समाज दूरच राहिला. त्यांचे विचार डॉ० आंबेडकरांच्या लिखाणाने पक्के झाले होते. या स्थितीत कराड नगरपालिकेतल्या मोहिते या नावाच्या गृहस्थांशी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले, की आमच्या समाजातले लोक मिळवल्याशिवाय तुमच्या कार्यात यश येणार नाही. यानंतर यशवंतराव व त्यांचे मित्र यांनी कराड व इतर भागांत दलितांसाठी रात्रीच्या शाळा काढायचे ठरवले. अशा शाळेच्या उद्‌घाटनास कोणीतरी मोठी व्यक्ती आणण्याचे ठरले आणि विठ्ठल रामजी शिंदे यांना आमंत्रण देण्याचा विचार पुढे आला. त्यांना आमंत्रण देण्यास यशवंतराव पुण्यास गेले. विठ्ठल रामजी यांनी यशवंतरावांची बराच वेळ चौकशी केली. आपल्याबरोबर हरिजनालाही घरी जेवायला आणावे लागेल, ही त्यांची एकच अट होती. ती यशवंतरावांनी ताबडतोब मान्य केली. कर्मवीर शिंदे यांचा ठरल्याप्रमाणे कार्यक्रम झाला आणि एक स्वतंत्र व्याख्यानही झाले. यशवंतरावांना या वेळी असा अनुभव आला, की स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतलेल्यांपैकी अनेकजण या कार्यक्रमापासून दूरच होते. कर्मवीर पुण्याला परत गेले आणि यशवंतराव रोज संध्याकाळी महार वस्तीत जाऊन शिक्षणाचे काम करू लागले. तथापि ते दोनतीन महिन्यांच्यावर चालले नाही. कारण शाळेत येणाऱ्या प्रौढांची संख्या रोडावत जाऊन शाळा बंद करण्याचाच प्रसंग आला. आमच्यावर अन्याय करणारे तुम्ही लोक असल्यामुळे तुमच्याकडून आमचे काही होणार नाही. डॉ० बाबासाहेब आंबेडकर हेच आमचे नेते आहेत. स्वबळावर आपली उन्नती करण्याचे शिक्षण त्यांनी दिले असून त्याप्रमाणे आम्ही जाणार असे उत्तर मिळाले. मग ही हकिगत यशवंतरावांनी कर्मवीर शिंदे यांना पत्राने कळवली आणि हा प्रयोग संपवला.

यशवंतराव १९३४ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर पुढे काय करायचे, हा प्रश्न आला. वडीलबंधूंनी शक्य ती मदत देण्याचे कबूल केले तरी त्यामुळे प्रश्न सुटणार नव्हता. तेव्हा राघूअण्णा लिमये म्हणाले, शंकरराव देव कराडला येत आहेत त्यांच्याशी बोलून पाहू. शंकररावांना आचार्य भागवत यांनी यशवंतरावांबद्दल माहिती दिली होती. पुढील शिक्षणाचा विचार राघूअण्णा यांनी काढला; तेव्हा 'कशाला शिकता, त्यापेक्षा काही तरी काम हाती घ्या.' कसले काम असे विचारले तर शंकररावांनी सासवडच्या आश्रमात या, वर्षभर राहा, म्हणजे ठरवता येईल असे सांगितले. यशवंतरावांनी घरी आल्यावर विचार केला आणि आश्रमात न जाता, कोल्हापूरला महाविद्यालयीन

शिक्षणासाठी जाण्याचा निर्णय घेतला आणि तोच योग्य होता. मित्र गौरीहर सिंहासने यांनी सांगितले की, कोल्हापूरला जा, पुढची व्यवस्था आम्ही मित्रमंडळी करू. त्याप्रमाणे यशवंतराव कोल्हापूरला राजाराम महाविद्यालयात जूनमध्ये दाखल झाले.

शंकररावांची व यशवंतराव यांची कुंडली जमणारी नव्हती आणि पुढील काळातही ती जमली नाही. आश्रमाचे वातावरण व जीवनही त्यांच्या विचारांशी व वृत्तीशी जुळणारे नव्हते. विसापूरच्या कारागृहात गांधीवाद ही आपली जीवननिष्ठा आहे असे आपण म्हणू शकत नाही, हे यशवंतरावांनी स्पष्ट केले होते. या संदर्भात तीस सालच्या चळवळीच्या काळात, भारताच्या निरनिराळ्या भागांतील राजकीय कार्यकर्त्यांत व पुढाऱ्यांत कशा प्रकारचे विचारमंथन चालू होते, याची माहिती करून घेणे युक्त होईल.

तुरुंगात गांधीवाद, समाजवाद, कम्युनिझम इत्यादी विचारपंथांचे लोक एकत्र आले होते. त्यांच्यात चर्चा होत असत. बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्ता असे मानत होता की, इंग्रज राजवटीशी संघर्ष करायचा असून महात्मा गांधी या संघर्षाचे नेते आहेत, त्यांचा आदेश मानणे हे आपले कर्तव्य. त्या पलीकडे वैचारिक वादविवादात पडणे व्यर्थ आहे. परंतु अनेक तरुण कार्यकर्ते व नेते वेगळा विचार करत होते. गांधींनी देशाला नेतृत्व देऊन नवा मार्ग दाखवला हे खरे असले, तरी स्वातंत्र्याचे उद्दिष्ट साध्य झाल्यावर कोणत्या प्रकारचा समाज हवा, याचे चित्र आपल्यासमोर असले पाहिजे. किंबहुना, असे चित्र नसेल तर उद्दिष्ट साध्य करण्यात अडचणी येऊ शकतील, असे या मंडळींना वाटत होते. शिवाय गांधीजी आध्यात्मिक विचारांना प्राधान्य देत होते; त्याविषयी साशंकता होती. इतकेच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेच्या गांधींच्या कल्पना तशाच्या तशा स्वीकारून चालेल काय, असा प्रश्न अनेकांच्या मनात आला होता. यांत जवाहरलाल नेहरू, आचार्य नरेन्द्र देव, जयप्रकाश नारायण, अच्युतराव व रावसाहेब पटवर्धन, युसुफ मेहरअली, एस० एम०, ह० रा० महाजनी अशी मंडळी होती. यशवंतराव हे त्यांच्यातले सर्वांत तरुण आणि त्या मानाने नवखे होते. परंतु अनुभव, कारागृहातील चर्चा आणि वाचन यांमुळे त्यांच्यावरही याच विचारांचा प्रभाव पडला. तो काळाचा महिमा होता. समाजवादी वाङ्मय भारतात आले होते आणि त्याचा अभ्यास होऊ लागला होता. यामुळे देशाच्या विविध भागांतील विविध व्यक्ती विचारांनी समान पातळीवर आल्या.

या दृष्टीने पंडित नेहरूंच्या आत्मचरित्रातला काही भाग या संदर्भात उल्लेखनीय ठरेल. महात्माजींनी अहिंसा हे एक उच्च धर्मतत्त्व असल्याचे मानले होते व त्यांनी या संदर्भात केलेल्या विवेचनाचा काही भाग, नेहरूंनी आत्मचरित्रात उद्धृत केला. नंतर ते लिहितात की, 'आम्हांला आणि काँग्रेसला अहिंसा हा धर्म वाटला नाही व वाटू शकतही नव्हता. एक धोरण म्हणून अहिंसेचा स्वीकार केला होता. व्यक्ती याचा धर्म म्हणून स्वीकार करू शकेल, पण एक राजकीय संघटना तसे करू शकत नाही'. यामुळे चौरी चौरा इथे हिंसा होऊन पोलिसांना जाळण्यात आले या कारणास्तव गांधींनी असहकाराची चळवळ बंद करण्याचा निर्णय घेतला; तो नेहरू व इतर अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना पसंत पडला नव्हता. नेहरू २६-२७मध्ये युरोपच्या दौऱ्यावर गेले होते व ब्रसेल्स इथे भरलेल्या पीडित लोकांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेस हजर होते. त्या परिषदेत समाजवादी विचारांचे अनेक लोक त्यांना भेटले. शिवाय ते व त्यांचे वडील सोव्हिएत युनियनला धावती भेट देऊन आले. तिथून परतल्यावर त्यांनी उत्तरप्रदेशाच्या काँग्रेस संघटनेत सौम्य समाजवादी विचारांचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले. तीस सालच्या आंदोलनात शेतकरी वर्गातले लोक बऱ्याच मोठ्या प्रमाणात सामील झाले होते व काँग्रेसने याची विशेष दखल घेण्याची आवश्यकता

असल्याचा अभिप्राय नेहरूंनी दिला. तथापि गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीचे कम्युनिस्ट पक्ष करत असलेले विश्लेषण चुकीचे असल्याचे नेहरूंचे मत झाले होते.

गांधीजींना प्रतिगामी ठरवणारी काही जहालांची टीका नेहरूंना अमान्य होती. तथापि गांधींच्या विचारांची चिकित्सा झाली पाहिजे याबद्दल त्यांना काही शंका नव्हती. गांधीजींचा सार्वजनिक जीवनावर इतका जबरदस्त प्रभाव होता की, कोणतीही प्रामाणिक टीकाही अशक्य होऊन बसणे नेहरूंना प्रशस्त वाटत नव्हते. असे असूनही ते स्वत: गांधीवादासंबंधात संभ्रमात होते. त्यांनी लिहिले की, भारतातल्या अत्यंत सामान्य लोकांचे प्रश्न हाती घेऊन, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गांधींनी लढा दिला. स्वातंत्र्यासाठी देशात जागृती निर्माण केली. लोकांना या रीतीने जागृत करण्याची अभूतपूर्व शक्ती केवळ त्यांच्यातच होती. असे असूनही गांधीजी काही बाबतींत पूर्णत: चूक करत असले पाहिजेत. गांधींनी रेल्वे, हॉस्पिटले, नवे वैद्यक, तारायंत्रे इत्यादींचा त्याग करण्याची शिफारस केली होती. नेहरूंना हे काहीच मान्य नव्हते. श्रीमंतीचा ध्यास व तिचे प्रदर्शन बरोबर नसले तरी गांधी करत असलेले दरिद्री जीवनाचे उदात्तीकरण निरर्थक होते. साधे शेतकऱ्याचे जीवन हेही गांधींना मोठे उदात्त वाटत असे. नेहरू म्हणतात की, ''शेतकऱ्यांना ग्रामीण जीवनातील अनेकविध अडचणींतून बाहेर काढून शहरातल्या साध्या सुविधा मिळवून देण्याची गरज आहे. स्वदेशीचा भक्त सारे जग बदलण्याचे कार्य आपल्या शिरावर घेत नाही, असे गांधींनी लिहिले आहे. मग ते स्वत: जग सुधारण्याच्या मार्गात कसे असतात,'' असा प्रश्न नेहरूंना पडला होता. (*ऑटोबायोग्राफी*, पृष्ठे, ८२, १९०-९१, २५८-९, ३१४-१६)

काँग्रेस समाजवादी पक्षाचा जन्म कारागृहात झाला असे मानले जाते. कारण निरनिराळ्या कारागृहांत ३० व ३२ साली बंदिवान झालेल्या अनेक तरुणांवर, समाजवादी विचारांचा प्रभाव पडला होता आणि त्यांनी या संबंधात बरेच ग्रंथवाचन केले होते. देशभर ही लाट पसरत होती; याचे निदर्शक म्हणजे बिहारमध्ये ३१ सालीच काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्याचे प्रयत्न झाले असले तरी असहकार आंदोलनामुळे ते तहकूब झाले. उत्तरप्रदेशमध्येही या प्रकारच्या हालचाली होऊ लागल्या होत्या. मग ३२ सालचा सत्याग्रह थांबला आणि काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्याच्या हालचालींना बळकटी आली. मुंबईत ३३ साली व त्या आधी पुण्यात काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्यासाठी परिषदा झाल्या होत्या. १९३४ सालच्या मेमध्ये पाटणा इथे पहिले अधिवेशन भरून, आचार्य नरेन्द्र देव यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. आचार्य नरेन्द्र देव वृत्तीने संयत व निष्ठावान गृहस्थ होते. ते एम० ए० झाले होते आणि वडिलार्जित श्रीमंतीकडे पाठ फिरवून राजकीय कार्यात सहभागी होण्याचे त्यांनी ठरवले. असहकार आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि मग काशी विद्यापीठ, या राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या विद्यापीठात ते शिकवू लागले. इंग्रजीबरोबरच फ्रेंच, जर्मन या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. तसेच ते संस्कृततज्ज्ञ होते आणि विद्यापीठात संस्कृतप्रमाणे पाली व प्राकृत भाषा ते शिकवत.

पाटणा इथल्या काँग्रेस समाजवादी पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात आचार्य नरेन्द्र देव यांनी, मार्क्सवादाच्या अभ्यासाचे महत्त्व मान्य केले आणि काँग्रेस संघटनेने आर्थिक समस्यांवर भर देण्याची गरज प्रतिपादन केली. पण ते म्हणाले की, ''काँग्रेसचे नेतृत्व काही वेळा पुरोगामी कार्यक्रम स्वीकारण्यास तयार नसल्याचे दिसत असले तरी काँग्रेस संघटनेत क्रांतिकारक बीजे आहेत याचा विसर पडता कामा नये. म्हणून समाजवादी विचारांच्या लोकांनी काँग्रेसमध्ये राहून तिला क्रांतिप्रवण केली पाहिजे. या बाबतीत आपले व मानवेन्द्रनाथ रॉय यांचे मत सारखे आहे.'' रॉय यांनी त्या वेळी ही मते प्रगट

केली होती. या उलट सुभाषचन्द्र बोस यांच्या भूमिकेवर व वक्तव्यांवर आचार्य नरेन्द्र देव हे पहिल्या अध्यक्षीय भाषणात आक्षेप घेताना दिसतात. ते म्हणतात की, सुभाषबाबू काँग्रेस बदलू पाहत असले, तरी ते जी मते मांडत आहेत ती काँग्रेस नष्ट करणारी ठरतील. आपला मुख्य प्रश्न राष्ट्रीय स्वातंत्र्याचा असून त्यासाठी देशव्यापी लढा देण्याचे सामर्थ्य काँग्रेसमध्ये आहे, याचे भान ठेवले पाहिजे. यशवंतराव कारागृहात असताना काँग्रेस समाजवादी व रॉयवादी यांची मते ऐकून घेत होते तेव्हा दोघांतला हा समान दुवा त्यांच्या लक्षात आला आणि नंतरच्या काळात त्यांना काँग्रेस नेत्यांच्या काही कार्यक्रमाबद्दल व धोरणांबद्दल शंका आल्या, तरी काँग्रेसचा त्याग करण्याची त्यांची तयारी नव्हती. या बाबतीत अपवाद करण्याची वेळ नंतर आली होती. त्याची व यशवंतरावांनी अखेर घेतलेले निर्णय यांची दखल पुढे घ्यायची आहे.

यशवंतरावांनी ३४ साली कोल्हापूरमध्ये राजाराम महाविद्यालयात नाव दाखल केले. कारण कोल्हापुरात शाहू महाराजांमुळे कमी खर्चात चांगल्यापैकी शिक्षण मिळण्याची व्यवस्था होती आणि कोल्हापूर हे अधिक परिचयाचेही होते. शाहू महाराजांनी केवळ शिक्षणाची सोय केली नाही तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचीही केली. यासंबंधात पांडुरंग चिमणाजी पाटील यांची आठवण नमूद करण्यासारखी आहे. ते पी० सी० पाटील या नावाने अधिक ओळखले जात असत. ते पुण्यातील शेती-महाविद्यालयात शिकले, पदवीधर झाले आणि शेती खात्यात संचालकपदापर्यंत चढले. लेफ्टनंट जनरल थोरात हे त्यांचे चिरंजीव, पी० सी० पाटील यांनी आत्मचरित्रात शाहू महाराजांच्या आठवणी दिल्या आहेत.

ते सांगतात की, महाराज बुकटे या गृहस्थाकडून रोजची वृत्तपत्रे वाचून घेत. १८९९च्या शेवटी पी० सी० पाटील हे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले व त्यांचे नाव वर्तमानपत्रात आले. तेव्हा बुकटे यांनी महाराजांना सांगितले, की आपल्या वडगावच्या पाटलांचा मुलगा मॅट्रिक झाला. शाहू महाराजांनी लगेच एक स्वार पाठवून, या मुलास बोलावून घ्या म्हणून सांगितले.

महाराज तेव्हा पन्हाळ्यावर होते. तिथे पी० सी० पाटील हजर झाल्यावर महाराजांनी त्यांची सर्व चौकशी केली. त्यांनी विचारले ''तुमच्या वडलांची शेती किती आहे? कर्ज किती?'' पाटील यांनी उत्तर दिले, ''पंधरावीस एकर जमीन आहे, चार बैल आहेत; उसाच्या फडात वाटा आहे आणि कर्ज नाही.'' महाराजांनी विचारले, ''तुमची सावकारी असेल ना?'' 'नाही', असे उत्तर आल्यावर त्यांनी विचारले, ''मग तुम्ही आमच्याकडे स्कॉलरशिप का मागितली नाहीत?'' ''हुजुरांपर्यंत दाद लागणे कठीण म्हणून काटकसरीने आतापर्यंत शिक्षण घेतले.'' ''कोणत्या खानावळीत जेवीत होता? तेथे तुम्हांला किती द्यावे लागे?'' ''मराठ्यांच्या खानावळी शहरात नाहीत. फक्त ब्राह्मणाच्या आहेत. त्या खानावळीत दरमहाचा दर पाच रुपये असतो. शिवाय मराठ्यांना आपल्या पत्रावळी आपणच उचलाव्या लागत. म्हणून मी ब्राह्मणाच्या खानावळीचा नाद सोडला आणि ओळखीच्या मराठ्याकडे महिना साडेतीन रुपये देऊन जेवणाची सोय केली होती.'' ''तेथे अभ्यास करण्यास जागा तरी होती काय?'' ''त्यांच्या घरात जागा कमी होती म्हणून हायस्कूलजवळ सरकारी तालीम आहे, तेथे मामा जाधव, बळिबा पाटील, हरिबा पाटील, हिंदुराव घाटगे वगैरे पाचसहा जणांनी तालिममास्तरांच्या परवानगीने, रात्री अभ्यासाची व झोपण्याची व्यवस्था केली होती. त्यांच्याबरोबर मीही होतो.'' आपण आता शेती करणार, कारण कॉलेजचे शिक्षण परवडणार नाही असे उत्तर पी० सी० पाटील यांनी दिल्यावर महाराजांनी विचारले,

''आम्ही खर्च दिला तर शिकाल काय?'' याचे उत्तर वडलांना विचारून देईन असे पाटील यांनी सांगितल्यावर, चार दिवस येथेच थांबून मग वडलांना विचारून येण्यास महाराजांनी सांगितले. थोड्याच दिवसांत कॉलेज सुरू झाल्यावर महाराजांनी पाटील यांना त्यात नाव घालण्यास सांगितले. त्याच वेळी आणखी तीन मराठा विद्यार्थी कॉलेजात दाखल झाल्याचे कळल्यावर, महाराजांनी कचेरीजवळच्या दत्ताच्या देवालयात हुजूरखाजगी खर्चातून तात्पुरते वसतिगृह सुरू केले. मग १९०१मध्ये कोल्हापुरात स्वतंत्र मराठा वसतिगृह बांधले गेले. त्या पाठोपाठ लिंगायत, जैन, सोनार, मुसलमान व महार वगैरे बहुतेक जातींच्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी वसतिगृहे बांधली. या सर्वांचा फायदा बहुजन समाजातल्या विद्यार्थ्यांना झाला. (*माझ्या आठवणी*, पृष्ठे २११-१४) बहुजन समाजात शिक्षणप्रसार होण्यास आणखी हातभार लावणारे म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. त्यांनी साताऱ्यात 'रयत शिक्षण संस्था' स्थापन करून शाळा व महाविद्यालये सुरू केली. या प्रकारे कोल्हापूर व सातारा ही बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार करणारी प्रमुख केंद्रे बनली.

पी० सी० पाटील यांच्यासारखा एक वेगळा अनुभव यशवंतरावांना आला होता. मॅट्रिकच्या वर्गात असताना त्यांचा संस्कृत विषय आवडता असला, तरी परीक्षेच्या दृष्टीने वर्गातील शिक्षण पुरेसे होणार नाही असे त्यांना वाटले. इतर मुलांनी वर्गाव्यतिरिक्त अधिक शिक्षणाची व्यवस्था केली होती. तशी ती झाली तर पाहण्याचा प्रयत्न यशवंतराव करत होते. त्यांचे मित्र राघूअण्णा लिमये यांनी मग कराडमधल्या एका शास्त्र्याला विचारले. तेव्हा, अब्राह्मणास आपण संस्कृत शिकवणार नाही, असे उत्तर मिळाले. यशवंतरावांनी झालेल्या अभ्यासावर परीक्षा दिली व ते यशस्वी झाले. तथापि महाविद्यालयात संस्कृत न घेता पाली ही भाषा त्यांनी घेतली. हा प्रसंग तेव्हाच्या कालस्थितीचा द्योतक होता. आता काळ बदलला आहे. आज ब्राह्मण मुलेही संस्कृतकडे वळत नाहीत; इतकेच काय, मराठीपेक्षा इंग्रजी माध्यम पसंत करण्याकडे ओढा अधिक आहे.

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधील वातावरणाने यशवंतराव उल्हसित झाले. त्या वेळी डॉ० बाळकृष्ण हे प्राचार्य होते. ते पंजाबमधून आलेले. बाळकृष्ण हे इतिहासाचे विद्वान होते. उत्तम वक्ते व कारभारकुशल होते आणि कोल्हापुरात त्यांना मान होता. ते पहिल्या वर्गास शिकवत नव्हते. म्हणून यशवंतरावांनी त्यांची घरी जाऊन भेट घेतली आणि आपली माहिती करून दिली. डॉ० बाळकृष्ण यांनी सर्व नीट ऐकून घेतले आणि यशवंतरावांना सांगितले की, ''काहीही कर, पण कोल्हापूर संस्थानच्या राजकारणात पडू नको.'' यशवंतरावांनी ते लगेच मान्य केले, ''पण आपण सातारा जिल्ह्याच्या राजकारणात आजवर गुंतलो असल्यामुळे सवड सापडेल त्याप्रमाणे त्यात लक्ष घालीन'' असे उत्तर दिले. त्यास डॉ० बाळकृष्ण यांची हरकत नव्हती. आपल्याकडे लक्ष ठेवण्याची विनंती यशवंतरावांनी केली. ती त्यांनी मान्य केली. राजाराम कॉलेजात तेव्हा ना० सी० फडके, माधव जूलियन हे दोन नावाजलेले प्राध्यापक होते. फडक्यांच्या शिकवण्याचा लाभ यशवंतरावांना इंटरच्या वर्गात गेल्यावर मिळाला. फडके तर्कशास्त्र उत्तमपैकी शिकवीत आणि त्यांच्या शिकवण्यावर विद्यार्थी खूश होते. फडक्यांनी संगीताचा एक क्लब काढला होता. त्याचे यशवंतराव सभासद होते. अनेक भाषणे होत. त्या वेळीही त्यांची हजेरी असे. माधव जूलियन यांच्याबद्दल यशवंतराव व इतर विद्यार्थी यांना आदर असला, तरी त्यांच्या शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल प्रेम वाटावे अशी स्थिती नव्हती. आणखी एक प्राध्यापक यशवंतरावांवर प्रभाव टाकणारे होते. ते म्हणजे डॉ० बोस. ते इंग्रजीचे प्राध्यापक होते.



यशवंतराव व कर्मवीर भाऊराव पाटील

यशवंतरावांनी लिहिले आहे की, इंग्रजी काव्य इतक्या आकर्षक रीतीने शिकवणारे बोस हे विरळा. पुढे यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस गेले असताना, प्रा० बोस दिल्लीत असतात व त्यांचा मुलगाही प्राध्यापक असल्याचे त्यांना समजले. तेव्हा यशवंतरावांनी त्यांना घरी चहाचे आमंत्रण दिले व त्याप्रमाणे प्राध्यापक बोस आपल्या मुलाबरोबर आले आणि तासभर गप्पागोष्टी करून गेले.

राजाराम कॉलेजच्या ग्रंथालयात अनेक विषयांवरील उत्तमोत्तम ग्रंथ होते. यशवंतरावांनी या ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. एच० जी० वेल्सचा जागतिक इतिहास वाचून त्यांना एक सम्यक् दर्शन झाले. शॉच्या नाटकांच्या विचारांना चालना देणाऱ्या प्रस्तावना वाचल्या. समाजवादासंबंधीची पुस्तके वाचली. व्हिक्टर ह्युगो इत्यादींच्या कादंबऱ्या वाचल्या. वर्तमानपत्रे व नियतकालिकांचे वाचन चालूच होते. तथापि गांधीजींच्या 'हरिजन'ची ते व त्यांचे मित्र आतुरतेने वाट पाहत असत. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्यावर त्याचे सामुदायिक वाचन झालेच, शिवाय यशवंतरावांनी नंतर त्याची पारायणे केली. याचे कारण असे की, गांधीवादासंबंधी नेहरूंची काहीशी द्विधा मन:स्थिती होती, तशी ती यशवंतरावांचीही होती. गांधींबद्दल आदर व निष्ठा बाळगूनही त्यांचा विधायक कार्यक्रम हा देशापुढील आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवण्यास पुरेसा आहे की नाही, याबद्दल यशवंतरावांचे मन साशंक होते. यामुळे ते नेहरूंच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाले. यशवंतराव व त्यांचे मित्र या विषयावर अनेकदा चर्चा करत. यांत आत्माराम पाटील व राघूअण्णा लिमये हे प्रमुख मित्र होते. हे दोघे अनेकदा कोल्हापूरला येत किंवा यशवंतरावांना कराडला बोलवून घेत.

ग्रामीण भागातल्या कार्यकर्त्यांची एक संघटना स्थापन करण्याचाही विचार या मंडळींनी केला होता. पण हे करताना काँग्रेस हाच आपला राजकीय पक्ष मानायचा व त्याच्या ध्येयधोरणानुसार या संघटनेला वळण द्यायचे आणि काँग्रेस समाजवादी बनवण्याचे प्रयत्न करायचे, असे या मित्रांनी पक्के केले होते.

काँग्रेस हाच आपला राजकीय पक्ष मानण्याबाबत यशवंतरावांचा या आधीच निश्चय झाला होता; पण कारागृहातून सुटून आल्यानंतर त्यांनी ज्या राजकीय हालचाली केल्या, त्यावेळी या निश्चयास धक्का लागला. या संबंधात एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, काँग्रेसमध्ये जवळपास १९३४पर्यंत तीनचार गट वावरत होते. एक होता लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचा. यात माधव श्रीधर अणे, तात्यासाहेब केळकर, शिवरामपंत परांजपे इत्यादींचा समवेश होत होता. यांपैकी अणे हे नव्या काँग्रेसनेतृत्वाशी जवळ होते. तथापि तात्यासाहेब केळकर यांची मन:स्थिती द्विधा होती आणि ३४ सालानंतर त्यांनी काँग्रेसचा त्याग केला. तसे पाहिले तर ३२ सालीसुद्धा महाराष्ट्र काँग्रेसची कचेरी 'केसरी'च्या आवारात होती. नंतर तिचे स्थानांतर झाले. काँग्रेसमध्ये समाजवादी, रॉयवादी व कम्युनिस्ट असे गट होते. यांपैकी कम्युनिस्ट गट हा काँग्रेसमध्ये असला तरी गांधींचे नेतृत्व त्यास प्रतिगामी वाटत होते; रॉयवादी व समाजवादी गट, काँग्रेसचे काही नेते पुरोगामी नाहीत असे मानत असला तरी काँग्रेस संघटनेत क्रांतिकारक अंश आहे आणि तोच बळकट करून संघटना समाजवादी, पुरोगामी बनवण्याचे प्रयत्न करायचे या मताचा होता. काँग्रेस सोडून जाण्याचा तेव्हा प्रश्न नव्हता. हे सांगण्याचा हेतू असा की, नंतरच्या काळात–विशेषत: संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाले तेव्हा–यशवंतराव काँग्रेसशी एकनिष्ठ नव्हतेच; समाजवादी व रॉयवादी इत्यादी पक्षात ते सामील झाले होते, अशी टीका काहींनी केली होती. तथापि हे पक्ष काँग्रेसबाहेर पडले नव्हते; त्यांना तेव्हा पक्षापेक्षा गट म्हणणे अधिक युक्त होते. शिवाय काँग्रेसला स्वातंत्र्य-लढा व्यापक पायावर उभा करायचा असल्यामुळे, तिने विविध विचारांच्या लोकांना मुक्तद्वार ठेवले होते. कारागृहात समाजवादी विचारांच्या लोकांच्या चर्चा यशवंतरावांनी ऐकल्या होत्या. कारागृहातून सुटल्यावर राघूअण्णा लिमये पुण्यात जात तेव्हा त्यांची एस० एम० जोशी, नानासाहेब गोरे इत्यादींशी चर्चा होत असे. त्यांची माहिती देऊन राघूअण्णांनी काँग्रेस समाजवादी पक्षात म्हणजे गटात सामील होण्याचा आग्रह केला तेव्हा यशवंतराव या गटात सामील झाले. पण या मंडळींच्या विचारांत पुस्तकीपणा अधिक असून ग्रामीण भागातल्या स्थितीची त्यांना हवी तितकी कल्पना नाही, अशी यशवंतरावांची भावना झाली होती.

१९३५ साली कराडमध्ये, राघूअण्णा लिमये यांनी महाराष्ट्र काँग्रेस समाजवादी पक्षाचे अधिवेशन भरवण्याचे ठरवले व आपल्याबरोबर यशवंतरावांची चिटणीस म्हणून नेमणूक केली. अधिवेशनाचे अध्यक्ष होते युसुफ मेहरअली. मेहरअली यांच्या व्यक्तित्वाचा यशवंतरावांवर परिणाम झाला. या सुमारास कराडमध्ये रॉयवादी मंडळीही आलेली होती व त्यांनी समाजवादी अधिवेशनातील कामकाजाची टिप्पणी केली होती. आत्मारामबापू त्या वेळेपर्यंत रॉयवादी बनले होते. तेव्हा आपली काँग्रेस समाजवादी पक्षासंबंधी जी परिस्थिती झाली तशी तुमची होऊ देऊ नका, असा सावधगिरीचा इशारा यशवंतराव यांनी त्यांना दिला होता. काँग्रेस संघटनेत राहून आपल्याला काम करायचे आहे. त्याच्याशी सुसंगत असे रॉयवाद्यांकडे जे असेल ते घ्यावे, पण जनतेपासून दूर जाता कामा नये असेही त्यांनी सांगितले. यासंबंधात रॉयवाद्यांशी यशवंतरावांची चर्चा झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ह० रा० महाजनी, वामनराव कुळकर्णी या रॉयवाद्यांशी बोलताना यशवंतरावांनी आपली भूमिका स्पष्ट

केली होती. या काळात यशवंतरावांना रॉय यांचे काही साहित्य वाचायला मिळाले होते. रॉय यांच्या विचारांचे सूत्र असे की, भारताच्या स्वातंत्र्याची लढाई ही समाजवादी क्रांतीच्या पूर्वीची लोकशाही क्रांती असेल. ही क्रांतीची लढाई करताना कामगार व शेतकरी यांनी एकत्र येऊन सामर्थ्य प्राप्त करून घेतले पाहिजे. या देशातील छोट्या शेतकऱ्यांना लढ्यात सामील करून घेणे आवश्यक आहे. हे ऐतिहासिक कार्य काँग्रेस करू शकेल आणि तिला या प्रकारे क्रांतिप्रवण करणे हे पुरोगामी विचारांच्या लोकांचे कर्तव्य आहे, असे रॉय यांचे विचार होते. ते आणि रॉय यांची विचार करण्याची पद्धती यांचा आपल्यावर परिणाम झाला अशी कबुली यशवंतराव देताना दिसतात. यशवंतराव यांनी रॉय यांची पुण्यात झालेली तीन व्याख्यानेही ऐकली. मग १९३९ सालच्या मे-मध्ये सातारा जिल्ह्यात राजकीय परिषद घेतली व रॉय यांना पाहुणे म्हणून बोलावले. ही परिषद तासगावला झाली. रॉय यांना आमंत्रित केल्यामुळे काही गट नाराज झाले. आत्मारामबापू हे रॉय यांना आमंत्रण देणारांत होते, म्हणून त्यांचे विरोधक नाना पाटील संतप्त झाले व त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उघडपणे विरोध केला. शेवटी ही परिषद उधळून लावण्यात आली. ती भरवण्यात यशवंतराव सहभागी असले तरी काँग्रेसच्या नेतृत्वाविरुद्ध रॉयवादी जाणार असतील, तर आपण काँग्रेस नेत्यांबरोबर राहिले पाहिजे याबद्दल यशवंतरावांच्या मनात कसलाही संदेह नव्हता.

यशवंतराव ज्यूनियर बी० ए०च्या वर्गात असताना १९३५च्या सुधारणा कायद्याखाली मुंबई विधिमंडळाची निवडणूक जाहीर झाली होती. त्या आधी केंद्रीय विधिमंडळाच्या निवडणुकीत काँग्रेसने काकासाहेब गाडगीळ आणि केशवराव जेधे यांना उभे केले होते आणि दोघेही चांगल्या मतसंख्येने निवडून आले. प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी सातारा जिल्ह्यातून कोणाला उभे करायचे याची चर्चा काँग्रेसजनात होऊ लागली होती. यशवंतराव व त्यांचे मित्र यांची एक बैठक झाली. असहकार आंदोलनात ग्रामीण भागातला फार मोठा समाज सामील झाला होता व यांत तरुणांचा सहभाग होता. तेव्हा या समाजाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेहमीच्या उमेदवारांच्यात निदान एका नव्या उमेदवाराचा समावेश व्हावा आणि हा उमेदवार म्हणजे आत्मारामबापू पाटील हे असावेत असे ठरले. या संबंधात यशवंतराव व त्यांचे सहकारी यांनी, सातारा जिल्ह्यातल्या जुन्या पुढाऱ्यांपुढे आपली बाजू मांडली. काहींनी घाई न करण्याचा सल्ला दिला तर काहींनी आत्मारामबापू हे मराठा समाजाचे खरेच प्रतिनिधित्व करतील काय, अशी शंका उपस्थित करून, जुन्या ब्राह्मणेतर पक्षातला एखादा मातबर मराठा उमेदवार यशस्वी होऊ शकेल असे सांगितले.

हे प्रकरण प्रांतिक काँग्रेसकडे गेल्यावर अनुकूल मत पडले नाही तेव्हा यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी, मुंबईत सरदार पटेल येणार होते तेव्हा त्यांना भेटण्याचा बेत केला आणि यशवंतरावांवर ही जबाबदारी सोपवण्यात आली. त्याप्रमाणे ते मुंबईला गेले आणि सुदैवाने यशवंतरावांची सरदारांशी भेट झाली.त्यांनी दोन-तीन महत्वाचे प्रश्न विचारले. त्यांना उत्तरे देऊन यशवंतरावांनी सरदारांना सातारा जिल्ह्यातील परिस्थिती थोडक्यात सांगितली. मग सरदार पटेल यांनी विचारले, की हा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी निवडणुकीत पडला तर जबाबदारी कोण घेणार? 'आम्ही जिल्ह्यातले सर्व कार्यकर्ते घेऊ' असे उत्तर यशवंतरावांनी दिले. नंतर काही दिवसांत आत्मारामबापू यांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. त्यांची निवडणूक या तरुण कार्यकर्त्यांनी हिरिरीने लढवली आणि आत्माराम बापू यांना सर्वाधिक मते मिळवून विजयी करण्यात यश मिळवले. यशवंतरावांचे राजकारणातले हे मोठे प्रगतीपर पाऊल होते.



सांगली शहरातील जनतेच्या स्वागताचा स्वीकार करताना
सोबत वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई

या संबंधात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची आठवण उल्लेखनीय आहे. ते लिहितात की, ''तीस साली ते स्वत: सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा प्रचार करत होते. ३४-३५च्या सुमारास काँग्रेसच्या नेतृत्वावर परंपरागत राष्ट्रवादी विचारांची छाप होती. पण सामान्य माणसाची सामाजिक व आर्थिक बंधमुक्ती हा खोल आशय बनला पाहिजे, अशी वैचारिक बैठक परंपरावादी राष्ट्रवादाला लाभलेली नव्हती–सातारा जिल्ह्यातील काँग्रेसजनांत असा नवा अर्थ पाहणारा जो नवा लहानसा गट तयार झाला होता, त्यांत माझ्याबरोबर जी विशीच्या आंतबाहेर असलेली तडफदार तरुण मंडळी सामील झाली; त्यांत श्री० यशवंतराव अधिक चमकून दिसू लागले. मनाने प्रौढ व वयाने लहान असे उमेदीने भरलेले हे तरुण गृहस्थ या आमच्या गटाचे नेतृत्व आत दाखल होताच थोड्याच वर्षांत करू लागले–

जहाल विचारांच्या या नव्या गटाच्या हातीअनेक वर्षे जिल्हा काँग्रेस कमिटी होती. हे पाहून १९३६मध्ये काँग्रेसच्या प्रांतीय (मध्यवर्तीसुद्धा?) नेत्यांकडून चक्रे फिरवली गेली. उजव्या गटाचे या जिल्ह्यातील प्रमुख भाऊसाहेब सोमण होते. त्यांचे कल्याणशिष्य श्री० बुवा गोसावी यांनी, सातारा जिल्हा कमिटीत उजव्या

गटाचे बहुमत केले—थोड्याच मतांनी या क्रांतिवादी गटाच्या हातांतून जिल्हा काँग्रेसची सूत्रे उजव्या गटाच्या हाती गेली. या प्रसंगी डावा गट हलकल्लोळ करील व दंगल माजवील अशी अपेक्षा उजव्या गटाची होती. परंतु वादविवाद वा कसलीही गरमागरमी न होता हे परिवर्तन घडले. ते पाहून श्री० बुवा गोसावी यांनी माझ्यापाशी याबद्दल आश्चर्य प्रगट केले. संघटनेची शिस्त ही राजकारणातील एक पवित्र गोष्ट आहे: याची जाणीव त्या लहान वयातच दाखविण्याचा श्री० चव्हाणांचा हा पहिला प्रसंग होता. समंजसपणा पुष्कळ वेळा जन्मसिद्धच असतो.'' (*श्री० यशवंतराव चव्हाण, अभिनंदन ग्रंथ,* पृष्ठे ७-८.)

संघटनेच्या शिस्तीसंबंधातील यशवंतरावांच्या वृत्तीबद्दल तर्कतीर्थांनी लिहिले आहे, याचा प्रत्यय यशवंतरावांच्या राजकीय जीवनात नंतरही आला. यामुळे त्यांच्या अनेक राजकीय कृतींचा तसेच अगदी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासंबंधात घेतलेल्या भूमिकेचाही उलगडा होण्यास मदत होऊ शकेल, असे वाटते. मग यशवंतराव १९४१मध्ये सातारा जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि पुढे भाऊसाहेब हिरे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष झाले तेव्हा यशवंतरावांची चिटणीस म्हणून नेमणूक झाली. काँग्रेस संघटनेत या पदापर्यंत त्यांनी मजल मारली होती.

यशवंतराव १९३८ साली बी० ए० झाले आणि नोकरी न करता स्वत:च्या पायांवर उभे राहण्याच्या हेतूने, त्यांनी वकिलीचा अभ्यास पुण्यात राहून सुरू केला. मग दोन वर्षांनी ते वकिलीच्या परीक्षेत यशस्वी झाले. तथापि १९३९मध्ये हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर स्वारी केली आणि ब्रिटन व फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. ब्रिटनने हिंदी पुढाऱ्यांशी विचारविनिमय न करता, भारतासही युद्धात सामील केल्यामुळे काँग्रेस कार्यकारिणीने विरोधी ठराव करून, युद्धहेतू जाहीर करण्याची मागणी केली. त्या काळात कम्युनिस्ट पक्ष, हे साम्राज्यवादी युद्ध असल्याचे मानत असल्यामुळे त्याने विरोधी भूमिका घेतली. सातारा जिल्ह्यातल्या अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवून कम्युनिस्ट पक्षाने आपलाच पक्ष ब्रिटिशांना खरा विरोध करील, काँग्रेस नाही असा प्रचार केला. यास लोक बळी पडू नये यासाठी यशवंतराव खटपटीला लागले. तथापि काँग्रेस नेत्यांनी प्रत्यक्ष विरोधाचा कोणताच कार्यक्रम लोकांपुढे ठेवला नव्हता. यामुळे यशवंतरावांना वाटू लागले की, कम्युनिस्ट प्रचारात काही तथ्य आहे आणि म्हणून ब्रिटिश सरकारशी संघर्ष करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षातही सामील व्हावे की काय, असा विचार ते करू लागले होते. पण सातारा जिल्ह्यातील त्यांच्या कार्यकर्त्या मित्रमंडळींनी हा विचार खोडून काढला आणि काँग्रेसमध्ये राहण्याचाच निर्णय घेण्यात आला.

यानंतर रॉय यांनी, हे फॅसिझमविरोधी युद्ध असून सर्व लोकशाहीवादी शक्तींनी, दोस्त देशांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे; युद्ध संपल्यावर ब्रिटनमध्ये राजकीय व सामाजिक परिवर्तन होऊन भारताच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होईल, अशी भूमिका घेतली. यशवंतरावांना युद्धसहकार्याची ही भूमिका पसंत पडली नाही. मग रॉयवादी मित्रांनी त्यांची व रॉय यांची मुंबईत भेट घडवून आणली. या भेटीत रॉय यांनी स्वत:ची भूमिका अगदी मोकळेपणाने आणि युक्तिवादपूर्वक मांडली. यशवंतरावांनी वाद घातला नाही; पण हा आपला मार्ग नसल्याची त्यांची खात्री झाली आणि युद्धविरोधासाठी काँग्रेसनेते जो मार्ग सांगतील तो स्वीकारून काम करायचे, असा निश्चय त्यांनी केला. म्हणजे निरनिराळ्या घराण्यांच्या गवयांची गाणी ऐकावी, पण अखेरीस आपल्या घराण्याचीच गायकी टिकवावी, अशातला हा भाग झाला.

पुढील काळात यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा सांगलीत झालेल्या सत्काराच्या उत्तराच्या भाषणात आपल्यावर कोणाचे संस्कार झाले या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले. ते म्हणाले, 'एका माणसाकडून

वन्देमातरम्!



## ॥ कुर्यात् सदा मंगलम्! ॥

प्रिय महाशय,

आमचे कनिष्ठ बंधु

**रा. यशवंतराव**

बी.ए.एलएल.बी.

यांचा विवाह कै. रा. रघुनाथराव मोरे मु. फलटण यांची कन्या

**सौ. कां. वेणू**

इजबरोबर जेष्ठ कृ. ४ ता. २ जून १९४२ मंगळवारी संध्याकाळी गोरज मुहूर्तावर (स्टॅ.टा.७।१०) वैदिक पद्धतीने होणार आहे. या सुमंगल प्रसंगी आपण उपस्थित होऊन वधुवरांस आशिर्वाद द्यावा अशी विनंति आहे.

| | |
|---|---|
| विवाहस्थळ– | आपले नम्र |
| **मराठा बोर्डिंग,** | **ज्ञानोबा बळवंत चव्हाण** |
| **कराड.** | **गणपती बळवंत चव्हाण** |

यशवंतरावजी व वेणूताई यांची लग्नपत्रिका, २ जून १९४२

मी हे सर्व शिकलो असे म्हणणे म्हणजे स्वत:ची फसवणूक करून घेण्यासारखे आहे; आणि दुसऱ्यांचीहि फसवणूक करणे आहे. माझ्यासारखा मनुष्य जो तीस वर्षे राजकारणाच्या धकाधकीमध्ये राहिला, त्याने मी सगळे गांधीजींच्याकडून शिकलो असे जर म्हटले, तर ती गांधीजींची स्तुति होईल. पण ते खरे असणार नाही. कारण कितीतरी लोकांकडून मी शिकलो आहे. लोकांशी कसे वागावे, कसे बोलावे, त्यांच्या पाठीवर कसा हात फिरवावा, हे कदाचित मी वसंतदादांकडून शिकलो असेन. समाजातल्या माणसांच्या दु:खाची तळमळ कशी जाणावी, हे कदाचित मी एखाद्या खेड्यातल्या शेतकऱ्याकडून शिकलो. राजकारणात मुद्देसूद विचार कसा करावा, हे मी रॉयपासून शिकलो. त्यांचे ऋण मी जाहीरपणे स्वीकारले आहे. अनेक माणसांकडून याप्रमाणे अनेक गोष्टी शिकलो'.

१९४० साली यशवंतरावांना वकिलीच्या परीक्षेत यश मिळाले आणि ते कराडमध्ये वकिलीही करू लागले. पहिल्यांदाच त्यांना काही कमाई करण्याचा योग आला होता. वकिलीत हळूहळू पाऊल पुढे पडत होते आणि यामुळे कुटुंबाला आपण थोडा हातभार लावू शकतो याचे समाधान मिळत होते. पण

देशातील वातावरण बदलत होते आणि काँग्रेस नेते कोणता आदेश देतात याकडे लक्ष होते. महात्मा गांधींनी प्रथम वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू करून, आचार्य विनोबा भावे यांना पहिले सत्याग्रही म्हणून निवडले. पुढे दीडएक वर्षात युद्धपरिस्थिती अधिकच उग्र बनली आणि ब्रिटिश सरकारने सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले. त्यांनी दिलेली योजना काँग्रेसने फेटाळली. यामुळे राजकीय पेच निर्माण झाला. महात्माजी व काँग्रेसनेते पुढे कोणते पाऊल टाकणार इकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले. काँग्रेसचे निश्चित काही ठरले नव्हते तेव्हा यशवंतराव यांचा फलटणच्या मोरे घराण्यातील वेणुताईंशी विवाह झाला. वेणुताईंचे घराणे हे राजकारणातील नव्हते. यामुळे यशवंतरावांच्या घरातील वातावरण त्यांना नवखे होते.

ऑगस्ट महिना उजाडला आणि मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन, ७ तारखेला दुपारी गोवालिया टँक मैदानावर भरण्याचे जाहीर झाले. त्यापूर्वी महात्मा गांधींनी 'हरिजन'मधून जळजळीत लिखाण सुरू केले होते. आता हा अखेरचा लढा असेल अशी भाषा ते करत होते, त्यांच्या लेखांची धग विलक्षण होती आणि देशातली तरुण पिढी यामुळे कधी संघर्ष सुरू होतो यासाठी उत्सुक होती. यांतील एक यशवंतराव होते. मुंबईतल्या अधिवेशनास यशवंतराव व त्यांचे सहकारी मित्र हजर होते. सकाळी काँग्रेस कार्यकारिणीने संमत केलेला ठराव जवाहरलाल नेहरूंनी मांडला. तो मांडताना आमचा हा ठराव वैराच्या भावनेतून केलेला नाही आणि तो धमकी देण्यासाठी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आठ तारखेला सकाळी व दुपारी पुन्हा अधिवेशन भरले. महात्माजींचे भाषण सर्वांत महत्त्वाचे होते. गांधीजी खालच्या आवाजात बोलत असत. हे भाषणही त्याच आवाजात होते आणि श्रोते ते कान देऊन ऐकत होते. महात्माजींनी हे स्पष्ट सांगितले की, आजपासून तुम्ही सर्व जण स्वतंत्र झाला आहांत, असे समजून कामाला लागा. हा अखेरचा लढा आहे आणि 'करू वा मरू' हा त्याचा मंत्र आहे. त्यांच्या या शब्दांनी सभेत चैतन्य निर्माण झाले. आजवरच्या गांधीजींच्या लढ्यांपेक्षा हा लढा वेगळा होणार याची खात्री श्रोत्यांना पटली.

यशवंतराव व त्यांचे मित्र रात्री दीर्घ काळ दिवसभरच्या अनुभवांची उजळणी करत होते आणि सकाळी उठून पाहतात, तो रस्ते लोकांनी फुलले होते आणि पोलिस बंदोबस्त वाढत होता. गांधीजी व इतर पुढारी यांना रात्रीच अटक करून गुप्त ठिकाणी नेल्याचे वृत्तही पसरले होते. यामुळे दंगल सुरू झाली. लाठीमार, अश्रुधूर यांचा वापर पोलिस करत होते. या स्थितीत यशवंतराव व त्यांचे सहकारी यांनी जिल्ह्यांत वेगवेगळे परत जायचे आणि पोलिसांना अटक करण्याची संधी न देता, यापुढे भूमिगत राहून काम करायचे असे या सर्वांनी ठरवले.याप्रमाणे यशवंतराव प्रथम पुण्यास व तेथून इंदोलीला गेले आणि मग कराडला पोचले. त्यांनी दुसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांची बैठक घेऊन कोणी कसे व कोठे जायचे याचा तपशील ठरवला आणि आठ दिवसांत अनेक गावांतल्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. यशवंतराव सांगतात की, अनेक पोलिस त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना ओळखत होते. पण अनेकांनी डोळेझाक केली. काही ठिकाणी सभाही घेण्यात आली. यशवंतरावांनी कार्याचा बराच तपशील दिला आहे. किसन वीर, वसंतदादा इत्यादी त्यांचे सहकारी होते आणि इतर अनेक. सरकारी यंत्रणा बंद पाडण्याच्या कामास महत्त्व होते आणि ते करून लोकांत आत्मविश्वास निर्माण करण्याचा हेतू होता.

अण्णासाहेब सहस्रबुद्धे व यशवंतराव यांची दोनदा भेट झाली. तेव्हा भूमिगत आंदोलनासाठी पैशाची

व्यवस्था करण्याची तयारी अण्णासाहेबांनी दाखवली आणि यशवंतरावांना मुंबईस येण्याचे आमंत्रण दिले. त्याप्रमाणे ते मुंबईत गेले तेव्हा अच्युतरावांची भेट होऊ शकली नाही, पण एस० एम० जोशी यांची झाली. अण्णासाहेबांनीच यशवंतरावांची डॉ० राम मनोहर लोहिया यांच्याबरोबर भेट घालून दिली. लोहियांनी उत्तरप्रदेश, बिहार इत्यादी भागांत चाललेल्या उठावाची माहिती यशवंतरावांना दिली. लोहियांनी यशवंतरावांना असेही सांगितले की, अगदी गरीब, मागासलेले, दलित अशा लोकांतही जा आणि त्यांच्यातून नवे कार्यकर्ते मिळवा. तासभर झालेल्या बैठकीचा यशवंतरावांवर बराच परिणाम झाला आणि लोकनेता कसा असावा याचे मूर्तिमंत चित्रच आपल्यापुढे उभे आहे असे त्यांना वाटले. मुंबईतच चार दिवसांनी काही कार्यकर्त्यांची बैठक होती. तिला हजर राहून मग परत जा, असे अण्णासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे यशवंतराव राहिले. बैठकीत काही कार्यकर्त्यांची नव्यानेच भेट झाली. यात कुलाबा जिल्ह्यातील कोतवाल हे लक्षात राहिले. त्यांनी विचारले की, घातपाताचे कार्य करताना काही शिक्षण देण्याची व्यवस्था कशी करता? त्यावर किर्लोस्कर व ओगलेवाडीच्या कारखान्यातले काही कामगार कार्यकर्ते असून ते मदत करतात, अशी माहिती यशवंतरावांनी दिली. हेच कोतवाल पुढे हुतात्मा झाले.

यशवंतरावांवर दडपण आणण्यासाठी पोलिसांनी प्रथम त्यांचे बंधू गणपतराव यांना कारागृहात धाडले आणि नंतर वेणुताईंना. वेणुताईंना सहाएक आठवडे तुरुंगात ठेवले होते. पण त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना सोडण्यात आले. याच काळात यशवंतरावांचे वडीलबंधू दादा, यांच्या पाठीला गळू आले म्हणून त्यांनी शस्त्रक्रिया करून घेतली व घरी आले तो आजार वाढला आणि त्यातच त्यांचे देहावसान झाले. ही सारी माहिती यशवंतरावांना कळण्यास काही दिवस लागले. या कौटुंबिक आपत्तींचा विचार करण्यास सवड नव्हती म्हणून यशवंतराव कामाला लागले; तेव्हा भूमिगत चळवळीचा नवा अध्याय सुरू झाला होता. त्याचे वर्णन करायचे तर ग्रामस्वराज्य स्थापन करण्याचा तो प्रयत्न होता. यासंबंधीचा बराच तपशील इतर भूमिगत कार्यकर्त्यांनीही लिहिला आहे. कासेगावकर वैद्य आणि डॉ० उत्तमराव पाटील यांनी गावागावांत केलेल्या कामाची आणि कार्यकर्त्यांच्या हालअपेष्टांची माहिती दिली आहे. उत्तमराव खानदेशाचे. तिथले काम संपवून ते सातारा जिल्ह्यात काम करू लागले होते. यशवंतरावांच्या वडील. बंधूंचे निधन झाल्यानंतर वेणुताईंची प्रकृती ढासळत गेली. यशवंतराव पुण्यात आले होते. तेव्हा त्यांनी वेणुताईंना पुण्यात आणण्याची व्यवस्था केली व डॉक्टरांकडून प्रकृती तपासून घेतली. वेणुताई अशक्त होऊ लागल्या होत्या आणि त्या बेशुद्ध होत. तेव्हा त्यांना फलटणला माहेरी पाठवण्यात आले, हे सर्व गुप्तपणे करणे ही आणखी जोखीम होती. यात यशवंतराव स्वतःच आजारी पडले आणि मग घोडनदी या गावी थोडे दिवस थांबले, तेव्हा बरे झाले. मग पुन्हा भूमिगत कार्याला सुरुवात झाली.

तथापि वेणुताईंची प्रकृती हा यशवंतरावांच्या काळजीचा विषय होता. तेव्हा फलटणला जाऊन चौकशी करावी व डॉक्टरकडून तपासून औषधोपचाराची व्यवस्था करावी म्हणून यशवंतराव फलटणला गुप्तपणे गेले. तथापि पोलिस मागावर होते. यामुळे त्यांना अटक झाली आणि त्यांनी तांबवे इथे केलेल्या भाषणाबद्दल खटला भरणार असल्याचे सांगितले. यात यशवंतरावांना सहा महिन्यांची शिक्षा होऊन येरवड्याला रवानगी झाली. या काळात फ्रेंच व रशियन क्रांतीबद्दल यशवंतरावांनी पाचसहा पुस्तके वाचली. सहा महिने झाल्यावर पुढचा हुकूम न आल्यामुळे यशवंतराव सुटून कराडला आले. तिथे बंधू गणपतराव कारागृहातून सुटून आले होते व क्षयरोगाचे दुखणे घेऊन आले होते. नंतर थोड्या दिवसांसाठी यशवंतराव व वेणुताई फलटणला गेले असता यशवंतरावांना पुन्हा अटक झाली. तीन महिने ते

HOME DEPARTMENT (SPECIAL).
Reg. No. S.D.V/7354

**Express Letter.**

Date 20.12.42

From

The Inspector General of Police,
Province of Bombay,
Poona.

6583/4
19 DEC 1942
20798

To

The Secretary to the Government of Bombay,
Home Department.

No: 7L-B.

Poona, 18 December 1942.

F-160/1

Subject:- Rewards.

------

The District Superintendent of Police, Satara, has, in anticipation of sanction, proclaimed reward of Rs. 1000 each for the arrest, or information leading to the arrest, of

(1) Nana Ramchandra Patil
of Yedemachindra, Taluka Walwa,
and
(2) Kashinath Rajaram Deshmukh
of Tambave, Taluka Karad.

These are reported to be organisers of gangs of dacoits and saboteurs and have been proclaimed. The Superintendent's action may be approved.

2. Sanction may also be accorded to the offer of a reward of Rs. 1000 each for the arrest, or information leading to the arrest, of the following Congress absconders who are declared as proclaimed offenders. These are under-ground Congress agitators, are mixed up with criminals and are strongly suspected to have formed a gang which is committing dacoities and sabotages in the Satara District

1. Pandurang Govind Patil of Yedenipani.
2. Yeshwant Balwant Chavan, Pleader of Karad.
3. Ramanand Swami Mysorkar of Shirala.
4. Gourihar Eknath Sinhasane of Katar-Khatav, Taluka Khatav.

For Inspector General of Police.

भूमिगत यशवंतरावांना पकडून देण्यासाठीच्या बक्षिसाविषयीचे पत्र

येरवड्याच्या तुरुंगात होते व मुदत संपल्यावर त्यांची पॅरोलवर सुटका झाली. या वेळची शिक्षा ही स्थानबद्धतेची होती. पॅरोलवर सुटल्यानंतर, घरी गेल्यावर यशवंतरावांना घरची परिस्थिती किती कठीण बनली आहे, याची कल्पना आली.

गणपतराव क्षयाने आजारी, आईचे वय वाढत गेलेले आणि वेणुताई आजारी; घरात मिळवते कोणी नाही. गणपतरावांना औषधोपचार झाला नाही तर त्यांचे कसे होणार, ही काळजी होती. म्हणून मग यशवंतरावांनी किसन वीर यांच्याशी चर्चा करून घरच्या परिस्थितीची कल्पना दिली. ते म्हणाले, की तुम्ही पॅरोल वाढवून घ्या आणि घर सांभाळा, आम्ही चळवळीचे काम करू. यशवंतरावांनी केलेल्या अर्जाचा विचार झाला आणि पॅरोल वाढवून देण्याऐवजी त्यांची स्थानबद्धताच रद्द करण्याचा आदेश गृहखात्याने दिला कारण तोपर्यंत सरकारी वर्तुळात भारतासंबंधी काही वेगळा विचार सुरू झाला होता आणि आंदोलनाची उग्रता केव्हाच संपली होती; पण सातारा जिल्ह्याने मात्र चळवळीची मशाल पेटती ठेवली होती. सातारा जिल्ह्यातल्या चळवळीचे वैशिष्ट्य हे होते की, त्या जिल्ह्यात अनेक कार्यकर्ते पूर्वापार सक्रिय होते आणि त्यांचे पुढारी होते. कराड इत्यादी भागात यशवंतराव होते. कोल्हापूर भागात रत्नाप्पा कुंभार, तर कुंडल इत्यादी भाग नाना पाटील यांचा होता. शिवाय किसन वीर, वसंतदादा इत्यादी होतेच. आंदोलनांच्या पुढाऱ्यांत विचारविनिमय होत होता असे नाही. प्रत्येकाने आपल्या भागातल्या परिस्थितीत जे योग्य ते कार्य चालू ठेवून सरकारी कारभार सुरळीत चालणार नाही हे पाहिले होते. अच्युतराव पटवर्धन हे मुंबईत असत आणि सातारा जिल्ह्यातले काही कार्यकर्ते त्यांच्याशी विचारविनिमय करून येत. आंदोलन वाढत गेले, पण त्यासाठी आर्थिक पुरवठा करण्यास मर्यादा असल्यामुळे तुमची सोय तुम्ही करा, असे अच्युतरावांनी सांगितल्यामुळे प्रत्येक जण तसा स्वतंत्र झाला होता. सातारा जिल्ह्यात उठाव करणारे चार ते पाच गट होते. यांपैकी ज्यांनी पत्रीसरकार स्थापन करण्यात भाग घेतला होता, त्यांच्यात यशवंतराव नव्हते. सरकारी मालमत्ता नष्ट करावी, खाजगी नव्हे अशी एक मर्यादा त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी घालून घेतली होती आणि व्यक्तिगत हिंसा टाळण्याचे धोरण स्वीकारले होते.

या काळात नाना पाटील आणि इतर पुढाऱ्यांना पकडण्यासाठी सरकार जितकी शिकस्त करत होते, तितके लोक या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना अधिक संरक्षण देत होते. यामुळे या सर्वांभोवती एक वलय तयार झाले. त्यातही नाना पाटील यांच्याभोवती विशेष. या सर्वांनी सातारा जिल्ह्याचे वातावरणच त्या आंदोलनाच्या काळात बदलून टाकले. राजकीय कार्यास शाहीर निकम हे पोवाड्यांची साथ देऊन लोकांत उत्साह निर्माण करत होते. हे पोवाडे व कविता ग० दि० माडगूळकर यांच्या होत्या, हे कालांतराने निकम यांनीच एकदा जाहीर केल्यामुळे समजले. ग० दि० माडगूळकर यांनी त्या दिवसांचे वर्णन 'मंतरलेले दिवस' असे केले होते. त्यासंबंधीच्या लेखात त्यांनी बेचाळीसच्या आंदोलनाच्या अखेरच्या पर्वात, शाहीर निकम यांच्या व जी० डी० लाड यांच्या विवाहसोहळ्याचे वर्णन केले आहे.

हे दोघेही अण्णा माडगूळकरांचे जुने दोस्त. त्यांच्या विवाहासाठी ते कोल्हापूरहून कुंडलला गेले होते. गावकऱ्यांनी कडेकोट बंदोबस्त करून या दोघा नवरदेवांना पोलिसांचा उपद्रव होणार नाही अशी व्यवस्था केली होती. काही हजार लोक जमले होते. माडगूळकर सांगतात की, 'निकम याचा विवाह सकाळी झाला तर लाड याचा संध्याकाळी. जी० डी० लाड नेहमीच्या वेषात होता. त्याची वाग्दत्त वधू उठली. तिच्या हातात एक दुधारी खंजीर होता. किटसन दिव्याच्या अपुऱ्या प्रकाशात, एखाद्या शस्त्रधारिणी देवतेसारखी ती दिसत होती. समारंभ कुठल्या पद्धतीने होणार हे कोणालाच माहीत नव्हते. सर्वांच्या दृष्टी

त्या तरुण जोडप्यावर खिळल्या होत्या. वधूने सुताची एक माळ वराच्या गळ्यात घातली. धीम्या गतीने हातातल्या खंजिराने तिने आपल्या तळव्यातले, लालभडक रक्त काढले. वराच्या कपाळावर त्याचा टिळा लावला. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. 'इन्किलाब झिंदाबाद'ची आरोळी उठली. लग्न लागले–

कुणीतरी मला चार शब्द बोलण्यास सांगितले. मी काय बोलणार? माझी वाचाच गोठली होती. उठलो. व्यासपीठावर उभा राहिलो. कुठून कोणास ठाऊक, काव्याच्याच ओळी माझ्या जिभेवर आल्या :

कृष्णाकांठीं नव्हतें कुंडल, अतांहि नाही
अंग चोरुनी, दुरून वाहते ती कृष्णामाई
गोविंदाग्रज कवी आपुल्या भगिरथ हातांनी
कुंडल गांवीं तिचें आणिती तीर्थरूप पाणी
तुम्हां आम्हां नव्हता कळला हा त्यांचा खेळ
आज उमगला परी तयांच्या शब्दांचा खेळ'

अखेरीस बेचाळीसचे आंदोलन संपले. देशातल्याच सर्व कार्यकर्त्यांपैकी ज्यांनी शस्त्रास्त्रे बाळगली होती, त्यांनी ती सरकारला परत करावी असे काँग्रेसने आवाहन केले. यामुळे खळबळ माजली. पण गांधीजी व जवाहरलाल नेहरू यांची वृत्ती व काही गांधीवाद्यांची वृत्ती वेगळी होती. लढ्याच्या अखेरच्या दिवसांतच आचार्य वि० प्र० लिमये, प्रेमा कंटक इत्यादी गांधीवादी सातारा जिल्ह्यात आले होते. त्यांनी हिंसक मार्गाचा अवलंब केल्याबद्दल टीका केली. तेव्हा त्यांना वस्तुस्थिती काय होती याची कल्पना कशी दिली, हे कासेगावकर-वैद्य यांनी त्यांच्या आठवणीच्या पुस्तकात स्पष्ट केले आहे. शंकरराव देवांनी तर साताऱच्या प्रतिसरकारचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना बराच दोष दिला. तुम्ही काँग्रेसच्या अहिंसक धोरणाशी प्रतारणा केली, तुम्ही खरे काँग्रेसजन नाहीत इत्यादी भाषा त्यांनी वापरली. याचा राग येऊन एक जण म्हणाला, 'आम्ही काँग्रेसजन नाही तर तुम्ही आलात कशाला? तुम्हांला आम्ही बोलावले नव्हते.' हा प्रसंग डॉ० उत्तमराव पाटील यांनी *क्रांतिपर्व* या त्यांच्या पुस्तकात नमूद केला आहे. नंतर मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर उत्तमराव मोरारजीभाईंना भेटले तेव्हा काँग्रेस कार्यकर्ता म्हणून न बोलता, मोरारजीभाई गृहमंत्र्याच्या भूमिकेतून कसे बोलले, हेही उत्तमरावांनी नमूद केले आहे.

वास्तविक गांधींनीच काँग्रेस कार्यकर्त्यांना, ते स्वतंत्र असून आपापल्या बुद्धीप्रमाणे स्वातंत्र्यासाठी काम करण्यास सांगितले होते. देशांतील हिंसक कृत्यांची जबाबदारी सरकारने काँग्रेसवर टाकली तेव्हा सरकारच्या हिंसक वर्तणुकीचा हा परिणाम असल्याचे प्रत्युत्तर गांधीजींनी दिले होते. सुटका झाल्यावर गांधींनी नाना पाटील यांना धाडलेल्या उत्तरात तुम्ही जो मार्ग अवलंबिलात तो आपल्या मार्गाशी जुळणारा नव्हता, पण तुम्ही तुमच्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे वागलात असे म्हटले होते. नेहरू सुटून आले तेव्हा अप्पासाहेब पंत यांच्याबरोबर त्यांनी उत्तमराव पाटील यांनी सांगितलेला वृत्तान्त ऐकून घेतला. पाच लाख रुपये सरकारी तिजोरीतून कसे लुटले आणि त्याचा विनियोग कसा केला, हे सर्व नेहरूंना सांगण्यात आले व अप्पासाहेबांनी त्यास दुजोरा दिला. तेव्हा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातले हे वेगळेच पान आहे, असा अभिप्राय देऊन नेहरूंनी संतोष व्यक्त केला. यावरून गांधी व गांधीवादी यांच्यातील तफावत फक्त

दिसून आली.

बेचाळीसच्या आंदोलनास आरंभ होण्यापूर्वी महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार पटेल यांच्यापासून अनेक काँग्रेस नेत्यांची वक्तव्ये व लिखाण लक्षात घेतल्यास, प्रत्यक्ष आंदोलनात हिंसाचाराचा अवलंब होणे क्रमप्राप्त होते आणि तसा तो होणार याची पूर्ण कल्पना या नेत्यांना होती, हे स्पष्ट होते. इतकेच नव्हे, तर यापूर्वीच्या आंदोलनाप्रमाणे बेचाळीसमधील आंदोलनास अहिंसात्मक स्वरूप राहिले नाही तरी ते मागे घेतले जाणार नाही, असे वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी स्पष्ट केले होते. या नेत्यांत शंकरराव देवही होते.

देव यांनी २५ जुलै १९४२ रोजी मुंबईत केलेले भाषण या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. ब्रिटिश सरकारने बेचाळीसच्या आंदोलनात झालेल्या हिंसाचाराची जबाबदारी कोणाची, याची चौकशी करून निर्णय देण्यासाठी तेव्हाच्या मध्यप्रांतातील न्यायमूर्ती विकेन्डन यांची नेमणूक केली होती. त्यांच्या अहवालात शंकरराव देव यांच्या या भाषणाचा उतारा मिळू शकतो. शंकरराव म्हणाले, 'या वेळी १९४० सालच्या (वैयक्तिक सत्याग्रहाप्रमाणे) नैतिक बळाचा वापर करण्याचा प्रश्न नाही, तर हे बंड होणार आहे. याच्या अखेरीस महात्मा गांधी बागी (बंडखोर) म्हणून ओळखले जातील. इतकेच नव्हे, तर या वेळी महात्मा गांधी आपले अहिंसेचे तत्त्वही दूर ठेवतील. कारण देश स्वतंत्र नसताना अहिंसेचा प्रसार करणे शक्य नाही, हे महात्मा गांधींनी जाणले आहे.'

गांधीजींनी जे बेचाळीसच्या आंदोलनाच्या आधी जाणले त्याप्रमाणे सातारा जिल्ह्यात तसेच देशाच्या अनेक भागांत आंदोलक वागले. असे असता शंकरराव देव वा वि० प्र० लिमये यांच्यासारखे गांधीवादी, साताऱ्यातील आंदोलकांची निर्भर्त्सना कशी काय करत होते, असा प्रश्न निर्माण होणे अनिवार्य होते. गांधींपेक्षा गांधी होण्यातला हा प्रकार झाला.

सातारा जिल्ह्यात पत्री सरकार खूनबाजीत गुंतले असून निरपराध लोकांचा छळ व हत्या होत असल्याच्या बातम्या ऐकल्यावर, अच्युतरावांनी भाऊसाहेब नेवाळकर यांना अहवाल देण्यासाठी साताऱ्यात धाडले होते. कासेगावकर-वैद्य व इतरांनी नेवाळकरांना निरनिराळ्या भागांत फिरवले. हे सर्व गुप्तपणे करायचे होते. अनेकांशी नेवाळकरांच्या भेटी झाल्या. तेव्हा त्यांचे समाधान झाले, असे कासेगावकर-वैद्य यांनी लिहिले आहे. या आंदोलनाच्या काळात ग्रामीण भागातील सावकार, सरकारी अधिकारी अशांपैकी जे उघड अन्याय करत होते त्यांना आंदोलकांनी शासन केले. अनेक पडून राहिलेली न्यायालयीन प्रकरणे निकालात काढली. पत्र्या मारणे या प्रकाराबद्दल गैरसमज पसरला होता. तळपायावर दंडुक्यांनी मारणे याचा अर्थ पत्री मारणे असा होता. या आंदोलनाचा फायदा काही भागांत काही रामोशांनी व दरोडेखोरांनी घेतला. ते 'गांधी महाराजकी जय' अशा घोषणा देत लूटमार करत. त्यामुळे स्वातंत्र्यसैनिकच यात गुंतल्याची हवा पसरली. इतके मात्र खरे की, बेचाळीसच्या आंदोलनात भाग घेऊन सातारा जिल्ह्यात जे चारपाच गट काम करत होते, त्यांत सामील असलेल्या काहींनी स्वातंत्र्यानंतरही हिंसाचार चालू ठेवला. गटबाजी व खूनबाजी हे सत्र काही काळ चालले. ते मुख्यत: वाळवा तालुक्यात होते. ते थांबण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा आचार्य जावडेकर यांनी एक लेख लिहून याकडे लक्ष वेधले. मग मुंबई सरकारने उपाययोजना केली.

१९४५ साल उजाडल्यावर राजकारण वेगळे वळण घेणार अशी चिन्हे दिसू लागली. महात्मा गांधी पाचगणी इथे विश्रांतीसाठी आले होते. सातारा जिल्ह्यात झालेल्या स्वातंत्र्य-आंदोलनाची माहिती त्यांना देण्यासाठी भाऊसाहेब सोमण व यशवंतराव गांधीजींना भेटले.गांधींनी दिलेल्या अर्ध्या तासात



कराड येथील विरंगुळा बंगला



सौ० वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड



मातोश्री विठाबाई व पत्नी सौ० वेणुताई यांच्यासमवेत



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय मुंबई ४०० ०२१
G02187
02106/2012



श्री० श्रीपाद डोंगरे व श्रीमती डोंगरे यांच्यासमवेत. सोबत सौ० वेणुताई



श्री० बी० पी० जोशी, अतिरिक्त खाजगी सचिव यांच्यासमवेत



विदेश मंत्रालयातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांसमवेत



श्री० राम खांडेकर, अतिरिक्त खाजगी सचिव यांच्यासमवेत. सोबत सौ० वेणुताई



सौ० वेणुताई चव्हाण आणि त्यांनी पाळलेला कुत्रा

कार्यकर्त्यांची बाजू त्यांना सांगण्यात आली, यशवंतराव लिहितात, ''सर्व ऐकून घेतल्यावर गांधीजींनी आम्हांला सांगितले, ''मी या संबंधाने सगळे ऐकले आहे, या चळवळीत काम करणारे सर्व देशभक्त आहेत, हे मी मान्य करतो. त्यांच्या पद्धती ह्या माझ्या पद्धती नाहीत, हेही मला स्पष्ट केले पाहिजे.'' आम्हांला एवढेही पुरे होते. गांधीजींच्या तोंडून भूमिगतांच्या कार्यक्रमाला आशीर्वाद मिळणे शक्य नव्हते आणि आवश्यकताही नव्हती. परंतु भूमिगतांच्या सर्व क्रियाशीलतेच्या पाठीमागे राष्ट्रीय स्वातंत्र्याची ऊर्मी होती, ही गोष्ट देशाच्या सर्वश्रेष्ठ नेत्याने मान्य केली, यात सर्व पोहोचले, अशी आमची भावना आहे.

त्यानंतर वृत्तपत्रांत पंडित नेहरूंची भूमिगत चळवळीसंबंधीची मुलाखत वाचली आणि अभिमानाने ऊर भरून आलं. 'जेव्हा राष्ट्र दडपशाहीखाली दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जात होता, तेव्हा जनता जर बंड करून उठली नसती, तरच आश्चर्य होते. हिंसा-अहिंसेचे हे प्रश्न हे तांत्रिक आहेत', अशा अर्थाचे ते पत्रक त्यांनी काढले होते आणि भूमिगत चळवळीला आणि कार्यकर्त्यांना नैतिक पाठबळ दिले होते.' (*कृष्णाकांठ*, पृ० ३०३).

बेचाळीसच्या या आंदोलनासंबंधी गेल ऑम्वेट यांनी वेगळी मीमांसा केली आहे. ज्ञानेन्द्र पांडे यांनी *द इंडियन नेशन इन १९४२* असे एक पुस्तक प्रसिद्ध केले होते. १९४२ सालच्या आंदोलनात विविध राज्यांत कोणत्या प्रकारचे आंदोलन झाले, याची बरीच माहिती यात आहे. निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेले लेख पांडे यांनी या पुस्तकात संग्रहित केले आहेत. महाराष्ट्रातील आंदोलनासंबंधी गेल ऑम्वेट यांचा लेख या संग्रहात आहे.

गेल ऑम्वेट या अमेरिकन. त्यांनी महाराष्ट्रातील सत्यशोधक समाज आणि बहुजनसमाज यांचा बराच अभ्यास केला असून त्यासंबंधी लिखाण केले आहे. पांडेसंपादित ग्रंथात इतर राज्यांत ४२ सालच्या आंदोलनात कोणत्या प्रकारचे आंदोलन झाले याची माहिती दिलेली असली तरी, ऑम्वेट यांनी असा सर्वांगीण आढावा न घेता, सातारा जिल्ह्यात पत्री सरकारची चळवळ कशा प्रकारे झाली, इतक्यापुरता आपला लेख मर्यादित केला आहे.

त्यांचे म्हणणे असे की, सातारा जिल्ह्यात पत्री सरकार स्थापन करून ब्रिटिश राज्ययंत्रणेला पर्यायी होईल, अशी व्यवस्था निर्माण केली गेली आणि इतर राज्यांतील आंदोलनापेक्षा साताऱ्यातील हा प्रयोग अधिक काळ चालला. याचे कारण वा मूळ सत्यशोधक समाजाची जी चळवळ पश्चिम महाराष्ट्रात झाली, तीत दिसते. पत्री सरकारचा प्रयोग करणारे नेते व कार्यकर्ते हे बहुतकरून सत्यशोधक चळवळीच्या संस्कारात वाढले होते. या चळवळीने सावकार, इनामदार इत्यादींविरुद्ध जागृती निर्माण केली होती आणि त्यांच्या अन्यायाविरुद्ध आंदोलनेही केली होती. यामुळे पत्री सरकार स्थापन करून, ब्रिटिश राज्ययंत्रणेला पर्याय निर्माण करून, एकप्रकारे सत्यशोधक समाजाच्या चळवळीचीच पुढची पायरी गाठण्यात आली.

तथापि ४२ सालच्या आंदोलनाची गती व व्याप्ती देशभरच कमी होत गेली आणि महात्मा गांधींची कारावासातून सुटका झाल्यानंतर परिस्थितीला वेगळे वळण लागले. गांधीजींनी, आंदोलकांनी आपली शस्त्रास्त्रे सरकारमध्ये जमा करावी, असे आवाहन केले. कॉंग्रेस पुढाऱ्यांचीही थोड्याच दिवसांत सुटका होणार अशी चिन्हे दिसत होती. या वातावरणात आपल्या आंदोलनाचे भवितव्य ठरवण्यासंबंधी आंदोलकांनी एकत्र येऊन चर्चा करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे १९४३ सालात कराड तालुक्यातील किवळे इथे एक सभा झाली. दुसरी बैठक ३ जून रोजी वाळवा तालुक्यातील कामेरी इथे झाली.

आंदोलकांत दोन मतप्रवाह असल्याची माहिती देताना ऑम्वेट यांनी म्हटले आहे की, एका गटाचे म्हणणे असे होते की, राज्याच्या वा देशाच्या इतर भागांत काय घडामोडी घडतात, याची दखल न घेता सातारा जिल्ह्यात जी पत्री सरकारची व न्यायदान मंडळाची चळवळ चालू आहे, ती तशीच चालू ठेवावी. या विरुद्ध दुसरे मत होते. त्या मताच्या पुढाऱ्यांत व कार्यकर्त्यात यशवंतराव चव्हाण यांचा समावेश होतो.

आम्वेट सांगतात की, यशवंतराव व इतर कार्यकर्त्यांनी कामेरीच्या बैठकीत असे मत प्रतिपादन केले की, देशभर आंदोलन ओसरले असून आपले आंदोलनही थांबवण्याची वेळ आली आहे. देशांतल्या घडामोडींची दखल न घेता, एकट्या सातारा जिल्ह्याने आंदोलन चालू ठेवण्यात स्वारस्य नाही. यामुळे ब्रिटिश सरकारचे लक्ष सातारा जिल्ह्यावर केंद्रित होऊन दडपशाही मात्र वाढेल. अच्युतराव पटवर्धनांनीही यास संमती दिली असल्याची माहिती, या कार्यकर्त्यांनी आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ दिली.

परंतु कामेरीच्या बैठकीत आंदोलन चालू ठेवण्याच्या बाजूने बहुमत झाले आणि अच्युतरावांनी ते मान्य केले, असे ऑम्वेट म्हणतात. त्यांनी अशीही पुस्ती जोडली आहे की, आंदोलन खंडित न करता, न्यायदान मंडळांचे काम पुढे चालू ठेवण्याचा आग्रह धरणारे हे काँग्रेससंघटनेत गुंतलेले नव्हते. त्यातले बरेच नवे होते आणि ब्राह्मणेतर चळवळीचा प्रभाव त्यांच्या विचारांवर होता.

यशवंतरावांची धारणा व वाढ वेगळ्या रीतीने झाली होती. प्रादेशिक व जातीय विचारांवर आधारलेले राजकारण न करता, राष्ट्रीय राजकारण करण्याचा त्यांनी आपला निर्णय अगोदरच पक्का केला होता. याच विचाराने त्यांनी काँग्रेस हीच आपली राजकीय संस्था हे निश्चित केले होते. काँग्रेसचे नेते कारागृहातून सुटू लागले असता आणि देशात राजकीय बाबतीत वेगळे वारे वाहू लागले असता, एका राज्याचेच नव्हे, एका जिल्ह्याच्या पातळीवरचे राजकारण करण्यास यशवंतराव तयार नव्हते. या स्थितीत त्यांनी आंदोलनासंबंधात घेतलेला निर्णय हा व्यवहार्य तर होताच, शिवाय व्यापक राजकारणास अनुकूल होता.

ऑम्वेट यांनी पत्री सरकारच्या आंदोलनाची परिणती कशात झाली, यासंबंधी लेखाच्या अखेरीस विवेचन केले आहे. त्या मार्क्सवादी असल्यामुळे त्यांनी त्या परिभाषेचा अवलंब केला आहे. म्हणून त्या म्हणतात की, पत्री सरकारच्या आंदोलकांत कनिष्ठ वर्गातील शेतकरी, कारागीर इत्यादींचा समावेश होता. शेतकऱ्यांच्या आंदोलनास डाव्या विचारसरणीच्या नेत्यांचे नेतृत्व मिळाले असते, तर खऱ्या क्रांतिकारक परिवर्तनाचा मार्ग मोकळा झाला असता. पण तसे नसल्यामुळे नव्याने उदयाला येत असलेल्या भांडवलदारी शेतकऱ्यांचे वर्चस्व स्थापन झाले. पाचदहा एकर किंवा त्याहीपेक्षा कमी जमीन असलेल्यांची, भांडवलदारी शेतकरी म्हणून संभावना करणे,फारच सैद्धान्तिक म्हटले पाहिजे.

ऑम्वेट सांगतात, की सातारा जिल्ह्यातील पत्री सरकार स्थापन करण्याच्या कार्यात जे सामील होते, त्यांना डाव्या विचारसरणीच्या नेत्यांचे नेतृत्व मिळाले नाही. पण तसे नेतृत्व द्यायचे म्हणजे कम्युनिस्ट व समाजवादी पक्षांनी एकत्रपणे वा विभक्तपणे ते द्यायचे. ते अशक्य होते. कारण कम्युनिस्ट पक्षाने युद्धसहकार्याची भूमिका घेतल्यामुळे बेचाळीसच्या आंदोलनास त्याचा विरोध होता. दुसरे असे की, त्या पक्षाचा महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या इतर भागांतील किसान चळवळीतील सहभाग अगदीच अल्प होता. यामुळे कम्युनिस्ट पक्षाने पत्री सरकारच्या नेत्यांना नेतृत्व पुरवण्याचा प्रश्नच येत नव्हता.

महाराष्ट्रातील काँग्रेस व समाजवादी बेचाळीसच्या आंदोलनात होते. ते भूमिगत तरी होते वा बंदिवान होते. तसेच महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये उत्तर प्रदेश, बिहार इत्यादी राज्यांतल्याप्रमाणे व्यापक

किसान चळवळ नव्हती. या खेरीज समाजवाद्यांचा भर मध्यमवर्गीय आणि काही प्रमाणात कामगार यांच्यावर होता. तेव्हा तेही ऑम्वेट यांची अपेक्षा पुरी करू शकत नव्हते.

सातारा जिल्ह्यात 'पत्री सरकार'ची स्थापना करून ज्या प्रकारचे आंदोलन झाले, ते देशातील बदलत्या वातावरणात मागे घ्यावे अशी भूमिका यशवंतराव व त्यांचे सहकारी यांनी घेतली होती. तिचा वृत्तान्त ऑम्वेट यांनी दिला आहे. या भूमिकेला अच्युतराव पटवर्धन यांची संमती असल्याचे यशवंतराव व त्यांचे सहकारी यांनी सांगितल्याचाही उल्लेख त्या करतात. उलट दुसऱ्या काही कार्यकर्त्यांनी आंदोलन चालू ठेवण्याची भूमिका घेतली असता, अच्युतरावांनी ती मान्य केली असा उल्लेख वर आला आहे. यामुळे गैरसमज होण्याचा संभव आहे.

या संदर्भात भाऊसाहेब नेवाळकर यांनी सातारा जिल्ह्यातील आंदोलनाची पाहणी करून, अच्युतरावांना दिलेल्या अहवालात काय म्हटले होते, हे पाहणे योग्य होईल. भाऊसाहेबांच्या अप्रकाशित आत्मचरित्रात पुढील मजकूर आहे. 'गटागटांना भेटून व व्यक्तिशः मते समजावून घेऊन ती मी न्याहाळली आणि अहवाल अच्युतरावांना सादर केला. त्यामध्ये ही चळवळ थांबवावी व अशा (हिंसक) प्रकारच्या चळवळीला आळा घालावा अशी अनेकांना अप्रिय वाटणारी शिफारस केली–

क्रांतिकार्यात कित्येकदा अतिरेक होतो. अपेक्षेप्रमाणे किंवा योजल्याप्रमाणे घडते असे नाही. हातात शस्त्रास्त्रं आली; पैसाअडका हाती खुळखुळू लागला आणि त्यांचा प्रभाव समजला, तर तो दाखवून व वापरून, पाहिजे ते स्वार्थबुद्धीने साध्य करण्याची प्रवृत्ती बळावत जाते. पुढे लोकांचा आसरा संकोच पावत गेला व क्रांतीचे उधाण ओसरत गेले की, हे कित्येक तथाकथित क्रांतिकारक स्वसंरक्षणासाठी व आपले ध्येय विसरून; व्यवहारी व स्वार्थी बनतात आणि तत्त्वच्युत होतात. साताऱ्याच्या बेचाळिशी क्रांतीची अशी शोकान्तिका होऊ नये म्हणून हे आंदोलन आटोपते घ्यावे असे मी अहवालात सुचवले होते.

या अहवालावर विचारविनिमय करण्यासाठी मुंबईत संबंधित गटांच्या प्रमुखांना पाचारण करण्यात आले. अहवालातील शिफारसी बहुतेकांना मान्य होण्यासारख्या नव्हत्याच. तथापि या समाजविरोधी कारवायांना तसेच अमानुष शिक्षाप्रकारांना त्वरित पायबंद घालण्याचा आपला निर्णय जाहीर केला. अर्थात त्यामुळे काहींच्या मनात माझ्याबद्दल कटुता निर्माण झाली. मात्र अहवालात जे घडत होते असे म्हटले होते, त्याचा प्रतिवाद कोणी केला नाही. परिस्थितीत फारसा फरक पडला असे जरी म्हणता आले नाही; तरी बैठकीचा परिणाम काहीसा झालाही. निदान समाजकंटकांना दूर करण्यात आले, यात शंका नाही'.

इंग्लंडमध्ये १९४५च्या जुलैत झालेल्या निवडणुकीत चर्चिल यांच्या नेतृत्वाखालील हुजूर पक्ष पराभूत होऊन, ॲटली यांच्या मजूर पक्षास भरघोस बहुमत मिळाले. मग भारतातही १९४६मध्ये निवडणूक झाली.यशवंतराव यांच्यासह चार उमेदवार काँग्रेस पक्षाने विधानसभेसाठी निश्चित केले. निवडणुकीत हे चारही उमेदवार प्रचंड बहुमताने यशस्वी झाले. मग मुंबईत विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक ३० मार्चला होऊन बाळ गंगाधर खेर यांची नेतेपदी एकमताने निवड झाली. सरदार पटेल या वेळी हजर होते. नंतर दोन दिवसांनी यशवंतरावांना दोन मित्रांनी आपल्याबरोबर बाळासाहेब खेर यांच्याकडे नेले. खेर म्हणाले, की आपण तुम्हांला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही, पण संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून

तुमची निवड केली आहे. आपल्या कामाचा विचार करता हे पद योग्यतेचे नाही, अशी यशवंतरावांची प्रतिक्रिया असल्यामुळे आपल्याला लगेच कामावर हजर होता येणार नाही, असे सांगून यशवंतरावांनी निरोप घेतला. त्यांच्या मित्रांना यशवंतरावांच्या मनात काय असेल याचा अंदाज आला आणि नकार देण्यात चूक होईल, असे त्यांनी सांगितले. कराडला गेल्यावर मग यशवंतरावांनी होकार देण्याचे ठरवले. मुंबईला जाऊन नवी जबाबदारी स्वीकारण्यास यशवंतराव निघाले, तो डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन होता. तेव्हापासून यशवंतरावांच्या संसदीय जीवनाला आरंभ झाला.

तथापि कौटुंबिकदृष्ट्या यशवंतरावांना ते वर्ष कटु अनुभव आणून देणारे ठरले. त्यांचे बंधू गणपतराव यांचे क्षयाचे दुखणे वाढत गेले आणि वर्षअखेरीस त्यांचे त्यातच निधन झाले. गणपतरावांच्या पत्नीलाही या रोगाची बाधा झाली होती. त्यानंतर चारएक वर्षांत त्याही इहलोक सोडून गेल्या. वेणुताईनाही क्षयरोगाने ग्रासले. त्यांना मग मिरजेच्या हॉस्पिटलात हलवण्यात आले. तिथल्या डॉ० जॉन्सन यांनी प्रयत्नांची शिकस्त केली आणि वेणुताईना सहा-सात महिन्यांनी क्षयरोगापासून मुक्त केले. मग त्यांना मुंबईला आणण्यात आले. पुढील काळात त्यांची प्रकृती यथातथाच राहिली.

यशवंतरावांनी लिहिले आहे की, १९४६ सालच्या निवडणुकीच्या वेळी त्यांची आणि इतर तिघांची निवड अगदी सुरळीतपणे झाली, पण महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीत इतक्या सुरळीतपणे गोष्टी घडल्या नाहीत. केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना शंकरराव देव व त्यांचे निकटचे सहकारी यांचा वरचष्मा होता. उमेदवारांची निवड करताना शंकरराव मोरे व बाबासाहेब घोरपडे यांना तिकिटे नाकारण्यात आली. या दोघांनी बेचाळीसच्या आंदोलनाच्या वेळी सरकारची माफी मागून सुटका करून घेतली, असा त्यांच्याबद्दल आक्षेप घेतला गेला. यासाठी काही कागदपत्रेही पुराव्यादाखल जोडण्यात आली. शंकरराव मोरे यांनी मग सरदार वल्लभभाई पटेल यांना सविस्तर पत्र लिहिले. त्यांनी म्हटले होते की, बेचाळीसच्या चळवळीस त्यांचा तात्त्विक विरोध होता व तो त्यांनी कधी लपविला नव्हता. असे असताना सरकारने अटक केली. तेव्हा सरकारच्या नजरेस हे आणून देण्यात आले आणि म्हणून सुटका झाली. यात माफी मागण्याचा प्रश्नच नव्हता. सरदारांनी उत्तरादाखल लिहिले की, हा आता इतिहास झाला असून त्याचा विचार करण्याचे कारण नाही. तथापि शंकररावांनी निवडणूक लढवली नाही.

बाबासाहेब घोरपडे यांच्याबाबतीत उघड अन्याय झाला होता. त्यांनी सरकारची माफी मागण्यासाठी पत्र लिहिल्याचा आरोप ठेवून, त्या पत्राची म्हणून एक प्रत पुराव्यादाखल देण्यात आली होती. ते पत्र बनावट होते. ते सिद्ध झाल्यावर बाबासाहेबांना तिकीट देण्यात आले. पुढे कालांतराने ह० रा० महाजनी यांच्याकडून या प्रकरणाची स्थूल स्वरूपाची माहिती मला मिळाली होती. मग मी स्वत: बाबासाहेबांना पुण्यात त्यांच्या घरी भेटलो. त्यांनी माहिती खरी असल्याचे सांगितले आणि अधिक तपशील दिला. ते म्हणाले, की ते मुंबईत सरदार पटेल यांना भेटले तेव्हा त्यांनी ते पत्र दाखवले. त्यावरची सही आपली नाही हे सांगून आपण सही कशी करतो त्याचा नमुना सरदारांना दाखवला. तसेच वाटल्यास आपण ज्या 'सकाळ'मध्ये काम करतो, तिथे कागदपत्रांवर कशी सही केली आहे हे पाहावे, असेही त्यांनी सुचवले. सरदारांनी, 'लगेच पुण्याला जा आणि उमेदवारीचा अर्ज भरा', असे सांगितले. इतक्यावर हे थांबले नाही. मोरारजीभाईंना सरदारांनी सांगितले, की ते जेव्हा पुण्यास जातील तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीत त्या बनावट पत्राचा बनाव कसा व कोणी केला, याची चौकशी करा, मोरारजीभाईंनी तशी ती



यशवंतराव आणि सौ० वेणुताई



कौटुंबिक हितगुज करताना सौ० वेणुताई यांच्यासमवेत

केल्यावर जिल्हाधिकाऱ्याच्या कचेरीतील एका कारकुनाकडून ते करून घेण्यात आले आणि तो कारकून प्रांतिक काँग्रेसच्या एका दुय्यम अधिकाऱ्याचा दूरचा नातेवाईक होता असे उघड झाले. शंकरराव देवांनीही याच प्रकारे सर्व घडल्याचे आपल्या नजरेस आणून देण्यात आल्याची जाहीर कबुली दिली. पण मग या सर्व प्रकरणास जातीय तेढीचे स्वरूप आले आणि बहुजनसमाजावर अन्याय करण्याचा हा प्रयत्न असल्याचा समज पसरला.

त्या वेळी केंद्रीय विधिमंडळाच्या निवडणुकीस केशवराव उभे राहण्यास तयार नसल्यामुळे काकासाहेब गाडगीळ व भाऊसाहेब हिरे यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. त्याच वर्षी प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदी केशवराव जेधे यांची पुन्हा निवड करण्यात आली होती. केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ यांना ३७ साली मंत्रिमंडळ बनवताना विश्वासात घेतले नव्हते आणि तसेच या वेळीही झाले. बेचाळीसच्या आंदोलनात ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात सामील झाले असल्यामुळे त्यांना केवळ विधानसभेतच अधिक जागा न देता मंत्रिमंडळ व प्रांतिक काँग्रेस समिती यांतही योग्य प्रतिनिधित्व मिळावे अशी अपेक्षा निर्माण झाली असेल तर ते स्वाभाविक होते. पण खेर व मोरारजी देसाई तसेच शंकरराव देव यांनी बदललेल्या सामाजिक परिस्थितीचा अर्थ लक्षात घेतला नाही. शिवाय ३७ साली खेर मंत्रिमंडळाची जी धोरणे होती, ती काकासाहेब गाडगीळ व केशवराव जेधे यांना पसंत नव्हती. यामुळे नव्या खेर मंत्रिमंडळावर हे दोघेही नाराज होते.

मंत्रिमंडळात बहुजनसमाजास मिळालेले अल्प प्रतिनिधित्व आणि शेतकरी व कामकरी वर्गाच्या हिताचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष, यामुळे जेधे व शंकरराव मोरे यांची निराशा झाली. केवळ या दोघांचीच ही प्रतिक्रिया नव्हती. यांत बहुजनसमाजातले इतरही आमदार व कार्यकर्ते होते. यांत भाऊसाहेब राऊत, नाना पाटील, तुळसीदास जाधव इत्यादी होते. यांनी मग काही बैठका मुंबईत व पुण्यात घेतल्या. यांत शेतकरी कामगार संघ स्थापन करण्याच्या प्रश्नावर चर्चा होत होती. या बैठकींना यशवंतराव चव्हाणही हजर होते. पुढे या गटाची वा संघाची घटना तयार करण्यासाठी समिती नेमण्यात आली. पण १९४७च्या ७ जानेवारीस झालेल्या बैठकीत, यशवंतराव व सोनूसिंग पाटील यांनी विरोधी मत व्यक्त केले.एका बैठकीत यशवंतरावांनी या प्रकारचा गट जातीय आहे असे वाटू शकेल, अशी शंका व्यक्त केली. नवा पक्ष हा ब्राह्मणेतर पक्षाचा नवा अवतार होईल, असे त्यांना सुचवायचे होते. बैठकीला आचार्य अत्रे हजर होते. आपण हजर आहोत तर जातीयतेचा आरोप कसा येऊ शकतो, असा अत्र्यांचा प्रश्न होता. यावर तुमचे गटात स्थान कोणते, असा उलट सवाल यशवंतरावांनी विचारला तेव्हा त्यांना काही स्थान नव्हते हे कोण सांगणार? इतकेच नव्हे, तर दुसरा प्रश्न असाही होता की, अत्रे या गटात किती काळ राहणार होते?

ऑगस्ट महिना उजाडला आणि १५ तारखेची पहाट ही स्वातंत्र्याची पहाट उजाडली. यासाठी झालेल्या प्रदीर्घ स्वातंत्र्य आंदोलनात, यशवंतराव हे असंख्यांपैकी एक सैनिक होते. यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या वेळी त्यांच्या भावना काय असतील याची कल्पना केलेली बरी! पहिल्या स्वातंत्र्यदिनास यशवंतराव संसदीय सचिव या भूमिकेत सचिवालयावर हजर होते. मुंबईत व इतरत्र आनंदाने जल्लोश चालू होता आणि रात्री झालेल्या रोषणाईने मुंबई तर एक स्वप्ननगरी झाली होती. लोकांच्या झुंडीच्या झुंडी मुंबईभर फिरत होत्या.आदल्या रात्री मध्यरात्रीच्या ठोक्याला स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संसदेत भाषण केले; ते देशातल्या लाखो लोकांनी आकाशवाणीवरून ऐकले आणि ते भारावून गेले.



सेनापती बापट यांच्यासमवेत

भारताच्या सरकारपुढे प्रचंड समस्या उभ्या झाल्या होत्या. अन्नधान्याची मोठी तूट होती आणि केरोसिनसुद्धा पुरेसे मिळणे अशक्य होते. त्याची आयात करण्यासाठी ब्रिटिश सरकारला विनंती करण्याची वेळ आली होती. फाळणीपूर्वीच जातीय दंगली सुरू झाल्या होत्या आणि निर्वासितांचे लोंढे नियोजित पाकिस्तानी प्रदेशातून भारतात येत होते आणि भारतातून पाकिस्तानी भागांत जात होते. पूर्व बंगालमधील हत्याकांडाने तर सीमा गाठली होती. खुद्द दिल्लीतच कत्तली होत होत्या.यामुळे महात्मा गांधींनी आमरण उपोषण सुरू केले. निर्वासितांना व अल्पसंख्याकांना संरक्षण देण्यासाठी हे उपोषण होते. यातच पाकिस्तानला फाळणीच्या योजनेप्रमाणे पन्नास कोटी रुपयांची रक्कम द्यायची असता, ती सरकारने थोपवून धरली होती. पण गांधींनी उपोषणासाठी हाही एक मुद्दा केल्यामुळे हिंदुत्वनिष्ठ संतप्त झालेच, शिवाय अनेक काँग्रेसजनांनाही गांधींचे धोरण अमान्य होते.

देशात कमालीची अस्थिर परिस्थिती होती. मिळालेले स्वराज्य कसे टिकवायचे हा खरा प्रश्न होता. देशातल्या ज्वालाग्राही वातावरणात, १९४८ सालच्या जानेवारीच्या तीस तारखेला महात्मा गांधींचा दिल्लीत प्रार्थनासभेत खून झाला. याची महाराष्ट्रात वेगळी व तीव्र प्रतिक्रिया झाली. खून करणारा नथुराम गोडसे व त्याचे साथीदार हे हिंदुमहासभा, रा० स्व० संघ इत्यादींचे कार्यकर्ते होते आणि ते ब्राह्मण होते. तेव्हा महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत ब्राह्मणांची घरेदारे लुटण्यात व जाळण्यात आली. जमावापुढे पोलिस कमी पडत होते आणि गुप्तहेर संघटनेला खून करणाऱ्यांच्या कटाचा काही सुगावा लागलेला नसल्यामुळे नंतरच्या बंदोबस्तातही सरकारी यंत्रणा अपुरी पडली. हे होत असताना अखिल भारतीय काँग्रेसचे चिटणीस असलेले शंकरराव देव, खासदार काकासाहेब गाडगीळ आणि महाराष्ट्र प्रांतिक



यशवंतराव

समितीचे अध्यक्ष केशवराव जेधे; दिल्लीतच आठएक दिवस राहिले. दंगलग्रस्त भागास त्यांनी भेट द्यायला हवी होती. खेर-मोरारजीही मुख्यमंत्री व गृहमंत्री या नात्याने दौऱ्यावर गेले नाहीत. कराडजवळील ओगलेवाडी इथे एका बैठकीतील चर्चेत भाग घेत असताना, यशवंतरावांना गांधींच्या खुनाची बातमी समजली. ते लगेच कराडला गेले आणि पुढील आठदहा दिवस त्यांनी तिथेच मुक्काम करून, कराडला हिंसाचार व जाळपोळ यांपासून वाचवले. अर्थात सातारा जिल्हा पेटला होता. यशवंतरांवांनी सांगितले की, कराड वाचवत असताना इतर गावांसंबंधी शक्य तितके आपण केले, पण पोलिस कमी व दंगल वणव्यासारखी पसरलेली. आठदहा दिवसांनी ते मुंबईला गेले आणि त्यांनी मोरारजीभाईना जिल्ह्यातील घटनांची माहिती दिली. प्रांताच्या काही भागातल्या दंगलीबाबत केशवराव जेधे, शंकरराव मोरे इत्यादींना जबाबदार धरण्याचा प्रयत्न काहींनी केला, पण हा या दोघांवर अन्याय होता. अशा वातावरणात काँग्रेसमधल्याच ब्राह्मण व ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी संयम दाखवायला हवा होता, पण त्यांच्यापैकी काहींनी अविवेकी भाषा वापरली आणि आगीत तेल पडले. हे सर्व दुर्दैवी होते.

महात्माजींच्या खुनानंतर महाराष्ट्रात अस्वस्थता वाढली असताना शेतकरी -कामकऱ्यांचा कार्यक्रम जाहीर करा, काँग्रेसला समाजवादी बनवा इत्यादी मागण्या अप्रासंगिक होत्या. देशव्यापी राजकारणाच्या संबंधाकडे दुर्लक्ष करून घेतलेली ही भूमिका होती. अर्थात तिला लोकमताचा पाठिंबा मिळाला नाही, असे नव्हे. तथापि ही भूमिका घेऊन काँग्रेसचा त्याग करण्याच्या तयारीत महाराष्ट्र काँग्रेसमधील काही शेतकऱ्यांचे प्रतिनिधीच नव्हते, तर काँग्रेसमधील समाजवादी गटही १९४८च्या मार्चमध्ये काँग्रेसमधून बाहेर पडला. त्यापाठोपाठ काँग्रेसमध्ये हा जो पुरोगामी गट तयार झाला होता त्याने काँग्रेस सोडण्याचे जाहीर केले. एक मात्र खरे की, शंकरराव देव यांनी संघटनेच्या तर बाळासाहेब खेर व मोरारजी देसाई

यांनी मंत्रिमंडळाच्या पातळीवर सामाजिक जाणीव व दूरदर्शीपणा दाखवला असता, तर काँग्रेसमधून निदान हा शेतकऱ्यांचा पक्ष घेणारा गट कदाचित बाहेर पडला नसता.

या पक्षास शंकरराव मोरे यांचे वैचारिक नेतृत्व लाभले होते. तर नाना पाटील, केशवराव जेधे यांच्यामुळे लोकांचे पाठबळ मिळवण्यात काही प्रमाणात यश आले होते. शंकरराव मोरे यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव होता आणि त्याच वेळी चीनमध्ये माओच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट पक्ष सत्ताधारी झाला; तेव्हा शंकररावांप्रमाणे अनेक डाव्या विचारांच्या लोकांना भारतातही तशीच क्रांती करण्याची स्वप्ने पडू लागली. दोन्ही देशांतली परिस्थिती, सत्ताधारी नेतृत्वांतील तफावत आणि क्रांती करण्यासाठी स्वपक्षाची कितपत ताकद आहे यांपैकी कशाचाच विचार न करता; ही क्रांतीची महत्त्वाकांक्षा शंकरराव व त्यांचा पक्ष आणि कम्युनिस्ट पक्षातलेही काही बाळगत होते. पण दोन्हींच्या पदरी अपयशच आले.

महाराष्ट्रातील परिस्थिती काँग्रेसची शक्ती खच्ची करू शकेल आणि शे० का० पक्ष जातीय प्रचार करून बहुजनसमाजाची दिशाभूल करील हे लक्षात घेऊन, ३० मार्च १९४८ रोजी मुंबईत काँग्रेस कार्यकर्त्यांचा एक मेळावा भरवण्यात आला. त्यास राज्यातले जवळजवळ पाऊणशे प्रमुख काँग्रेसजन हजर होते. त्यात बरीच चर्चा होऊन धोरणात्मक अशा पत्रकाचा मसुदा तयार करण्यात आला आणि ज्यांना तो मान्य असेल त्यांनी आपली सही करून, यशवंतराव चव्हाण यांच्या पत्त्यावर आपली संमती कळवावी असे सांगण्यात आले. ठरावाचा मसुदा पाहिल्यास काँग्रेस पक्षासंबंधात यशवंतराव तोपर्यंत घेत असलेल्या भूमिकेशी मिळताजुळता होता हे लक्षात येईल.

तो मसुदा असा : 'सत्तासंक्रमणानंतर जनतेच्या आशा-आकांक्षा वाढतात, वाढवल्या जातात. त्या फलद्रूप होण्यासाठी काँग्रेस पक्ष सामर्थ्यवान व शिस्तबद्ध बनणे हाच एक उपाय आहे. काँग्रेसला शेतकरी-कामकरी यांचे राज्य स्थापन करायचे आहे. भांडवलशाही वृत्तीचा बीमोड करून शोषणरहित समाज निर्माण करायचा आहे. हे बदल चुटकीसरशी होणे शक्य नाही व दांडगाई करणे इष्ट नाही, अशी महात्मा गांधींची आदर्श स्वराज्याची कल्पना होती. आमची संस्कृती, नीतीमत्ता आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा विशिष्ट प्रकारचा आहे. स्वातंत्र्य हे नुसत्या भौतिक शक्तीवर उभारता येत नाही, टिकवता येत नाही. जनतेच्या नैतिक शक्तीवरच ते टिकविता येते. म्हणून आदर्श लोकशाहीप्रधान राजकारणात, समाजकारणात अगर अर्थकारणात जे जे बदल घडवून आणायचे आहेत, ते काँग्रेसला आपल्या प्रवृत्तीला अनुसरूनच आणायचे आहेत. याच पद्धतीने घडलेले बदल हे चिरस्थायी होतील व राष्ट्राची शक्ती वाढवतील.

देशात निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या फुटीर प्रवृत्तींना आपण आपल्या तात्त्विक भूमिकेवरून विरोध केला पाहिजे व प्रसंगी धैर्याने व आत्मविश्वासाने पुढे पाऊल टाकले पाहिजे. कोणत्याही कारणाने काँग्रेसला व आपल्या सरकारला कमजोर होण्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करू तर आपण आपले स्वातंत्र्य धोक्यात आणू. म्हणून जातीयतेचे उच्चाटन करण्याकरिता, आर्थिक समता स्थापन करण्याकरता व उत्पादन वाढवण्याकरिता काँग्रेस-संघटना मजबूत केली पाहिजे. महाराष्ट्रात बुद्धिभेद करण्याचे जे निरनिराळे प्रयत्न चालू आहेत त्यांपासून जनतेने सावध राहिले पाहिजे. कारण हे प्रयत्न देशाचा घात केल्याशिवाय राहणार नाहीत.

महाराष्ट्रात कुणी अराजक माजवण्याचा, बेशिस्त वर्तन करण्याचा व जातिभेद अगर वर्णद्वेष

फुलवण्याचा प्रयत्न केला, तर त्याला उघडपणाने विरोध करण्याची आता वेळ आली आहे. महाराष्ट्रातील कुठल्याही पक्षोपक्षांशी द्वेष-बुद्धीने अगर वैरभावाने वागण्याचा काँग्रेसचा केव्हाही हेतू नव्हता व नाही. काँग्रेसशी निष्ठावंत राहून काँग्रेसच्या शिस्तीप्रमाणे काँग्रेसजनांनी वागावे असे आमचे आवाहन आहे. काँग्रेसबद्दल ते अनुदारपणा, अप्रीती निर्माण करतील अगर बाहेरून किंवा आतून काँग्रेस -संघटना दुर्बल करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्या प्रयत्नांना विरोध करणे हे हिंदी स्वातंत्र्याच्या दृष्टीने आमचे कर्तव्य होईल.' (*यशवंतराव, इतिहासाचे एक पान,* पृष्ठे ९९-१००.)

पुढे काँग्रेसने पक्षात स्वतंत्र गट स्थापन करण्यास बंदी घालण्याचा ठराव मंजूर केल्यावर स्वामी रामानंद तीर्थ यांनी २८ ऑक्टोबर १९५३ रोजी शंकरराव देव यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, ''काँग्रेस संघटनेत राहून शिस्तीच्या बाहेर गेल्याचा वास येऊ नये असे मला वाटते.'' म्हणजे मुंबईला जमलेल्या यशवंतरावांसारख्या काँग्रेस नेत्यांच्या भूमिकेसारखीच ही भूमिका होती.

शे० का० पक्ष स्थापन करायला निघालेल्या नेत्यांनी देशातील परिस्थिती लक्षात घेतली नव्हती आणि आपली स्वत:ची राजकीय ताकद किती आणि आपण ज्या प्रकारचा समाज निर्माण करायला निघालो आहोत ते उद्दिष्ट शक्य कोटीतील आहे की नाही, याचेही भान ठेवले नाही.या उलट ज्या काँग्रेसजनांनी मुंबईत जमून पत्रक प्रसिद्ध केले त्यांनी वास्तव दृष्टी दाखवली होती, हे नंतर घडलेल्या घडामोडीमुळे स्पष्ट झाले. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबईतील अधिवेशनात, देश स्वतंत्र झाल्यामुळे काँग्रेसमध्ये वेगवेगळे गट असू नयेत असा ठराव संमत झाला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसजनांपैकी काहींनी जी भूमिका घेतली होती, ती या घटनादुरुस्तीला पूरक होती.

या स्थितीत यशवंतराव संसदीय चिटणीस या नात्याने, गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांचे साहाय्यक म्हणून काम करू लागले.मोरारजींकडे नागरीपुरवठा, वन अशीही खाती होती. यामुळे विविध खात्यांच्या कामाची यशवंतरावांना चांगली ओळख झाली. त्या काळात पोलिस दलाचा विस्तार फार नव्हता आणि फाळणीमुळे झालेल्या वातावरणात हे दल अधिकच अपुरे पडू लागले होते. म्हणून नागरिकांचा संरक्षणात सहभाग असावा अशी कल्पना निघाली आणि यशवंतरावांना ही यंत्रणा उभारण्याच्या कामी बरीच जबाबदारी सांभाळावी लागली. मोरारजी देसाई हे कारभारात कार्यक्षम होते आणि आपल्या कामात ते यशवंतरावांना सहभागी करून जबाबदारी टाकीत असत. इतर काही मंत्र्यांनी याप्रकारचे धोरण अवलंबिले नसल्याचे दिसून आल्यामुळे, यशवंतराव कारकिर्दीच्या प्रारंभीच्या काळातच मोरारजींचे सहकारी झाले, हे बरे झाले.

सरकारने बंदी घातलेल्या पुस्तकांची तपासणी करून निर्णय देण्याचे कामही यशवंतरावांवर आले होते. मग लोककलेला सरकारी उत्तेजन देण्यासंबंधी यशवंतरावांनी एक टिपण तयार केले. ते मोरारजींनी मान्य केले व बाळासाहेब खेरही त्या टिपणावर खूश झाले होते. यातून मग तमाशा मंडळाची स्थापना झाली. असे असले तरी सरकारच्या धोरणासंबंधात पूर्णत: समाधान वाटावे अशी स्थिती नव्हती. बेचाळीसच्या आंदोलनात सहभागी झालेल्या ग्रामीण भागातल्या लोकांच्या गरजा व अपेक्षा काय आहेत, याची खेर व मोरारजींना काही कल्पना नव्हती आणि त्या जनतेचे खरे प्रतिनिधीही मंत्रिमंडळात जवळपास न घेतल्यामुळे, या अपेक्षांना मंत्रिमंडळात वाचा फुटण्यास संधी नव्हती.

या स्थितीत सामाजिक व आर्थिक प्रश्नांना प्राधान्य न देता खेरांनी शालेय शिक्षणातून इंग्रजीचा अभ्यासक्रम कमी करून काही पिढ्यांचे कायमचे नुकसान केले. महाविद्यालय, वैद्यकीय व वकिलीचे

शिक्षण अशा क्षेत्रांतील इंग्रजीचा वापर कमी होणार नव्हता. तेव्हा शालेय शिक्षणात तो कमी करून काय साधणार होते? शहरातील विद्यार्थी व त्यांतही श्रीमंत कुटुंबांतील विद्यार्थी शिकवण्या लावून वा मिशनरी शाळांत जाऊन सोय करून घेऊ शकत होते. पण इतरांना ती उपलब्ध नव्हती. या असल्या दिखाऊ भाषाभिमानाचे यशवंतरावांना आकर्षण नव्हते.दुसरा परिणाम असा झाला की, सरकारी कारभारयंत्रणा व खाजगी कंपन्या यांच्यात इंग्रजीचा वापर होत राहिल्यामुळे, त्यात परप्रांतीय, विशेषत: दाक्षिणात्यांचा, भरणा होऊ लागला. खेर व मोरारजी हे स्वत:स गांधीवादी मानत. यामुळे त्यांनी दारूबंदीचे धोरण अमलात आणले. यामुळे दारू बंद झाली नाही, ती भूमिगत झाली. यातून गुन्हेगारी आणि काळा पैसा यांना मुबलक वाव मिळाला. अमेरिकेत दारूबंदीचा प्रयोग झाला होता आणि तो सपशेल फसला होता. पण अमेरिकन व पाश्चात्त्य लोकांपेक्षा भारतीय हे आध्यात्मिक असल्याच्या अहंकारी व अवास्तव समजुतीमुळे मुंबई राज्यात दारूबंदी कायदा आला, पण तो यशस्वी झाला नाही व होणे शक्यही नव्हते.

महाराष्ट्र काँग्रेसमध्ये वैचारिक संघर्ष झाल्यावर प्रथम शंकरराव मोरे बाहेर पडले आणि शे० का० पक्षाच्या स्थापनेसाठी खटपट करू लागले. केशवराव जेधे नंतर त्यांना जाऊन मिळाले. प्रांतिक काँग्रेसमधील मातबर अशा व्यक्ती संघटना सोडून गेल्यामुळे राज्यात काँग्रेसला आव्हान मिळाले होते. त्या वेळी यशवंतराव चव्हाण प्रांतिकचे चिटणीस होते. मध्यंतरी, म्हणजे १९५० साली, शंकरराव देव यांनी नाशिकला होणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढविली होती. तीत त्यांचा पराभव झाल्यावर त्यांनी काँग्रेसचे सभासदत्व सोडून अपक्ष म्हणून विधायक कार्य करण्याचा निर्णय घेतला. तथापि राजकीय दृष्ट्या आणखी काही महत्त्वाच्या घटना याच काळात घडल्या होत्या, शे० का० पक्षाची स्थापना झाल्यावर अनेक ठिकाणी त्या पक्षातर्फे शेतकऱ्यांचे मोर्चे, कामगारांचे संप इत्यादी चळवळी होऊ लागल्या. त्या आवरण्यासाठी सरकारकडून काही ठिकाणी गोळीबारही झाल्यामुळे शे० का० पक्षाच्या प्रचारास अधिक धार आली. बावन्न सालची निवडणूकही जवळ येत होती. तेव्हा राजकीय पक्ष जुळवाजुळव करू लागले. शे० का० आणि समाजवादी या दोन पक्षांच्या काही नेत्यांची, आचार्य अत्रे यांच्या खंडाळ्यातील बंगल्यावर एक बैठक ९ एप्रिल १९५० रोजी झाली. सामाजिक समता स्थापन करण्यासाठी दोन्ही पक्षांनी सहकार्य करावे असा निर्णय या बैठकीत झाला.

तसे पाहिले तर या बैठकीला काही अर्थ नव्हता. विश्वास नाईकनवरे यांनी शंकरराव मोरे यांच्यासंबंधी लिहिलेल्या पुस्तकात, खंडाळा इथे शंकरराव मोरे व समाजवाद्यांपैकी अशोक मेहता, ना० ग० गोरे, मधू लिमये इत्यादींची जी चर्चा झाली तिचा वृत्तान्त दिला आहे. दोन्ही बाजूंच्या नेत्यांत इतरही काही सामील होते. पण मुख्य भूमिका या चौघांची होती, असे वृत्तान्तावरून म्हणायला हरकत नाही. या चर्चेत मधू लिमये रशियासंबंधीच्या प्रश्नावरून बोलताना शंकररावांना म्हणाले की, तुम्ही रशियाची व्याख्याच अशी केली आहे, की गैरसोयीच्या खऱ्या गोष्टी तिच्यामुळे अशक्यच ठराव्यात. याच रीतीने शंकरराव सतत रशियाची तरफदारी करताना, तर अशोक मेहता, नानासाहेब गोरे व मधू लिमये रशियाच्या अंतर्गत व परराष्ट्रविषयक धोरणावर टीका करताना दिसतात. शंकरराव म्हणाले की, शांततारक्षणार्थ मी रशियाशी जमवून घेईन; युद्ध उद्भवल्यास आम्ही रशियाच्या बाजूचे असू. नेहरू जर रशियाशी लढतील तर आम्ही नेहरूंच्या मागे असणार नाही. उलट युद्धाचे रूपांतर यादवीत करून अखेर रशियास मिळू. अशोक मेहता यांची यावर प्रतिक्रिया अशी : ही भयावह परिस्थती आहे. (*तिरकी टोपी ताठ मान,* पृष्ठे ३३५-३६.)

या पाठोपाठ शे० का० पक्षाचे अधिवेशन नाशिक जिल्ह्यातल्या दाभाडी इथे भरले व ते २९ ते ३१ मे असे तीन दिवस चालले. या अधिवेशनात पक्षाची उभारणी कोणत्या विचारांनुसार करायची यासंबंधी एक प्रबंध मांडण्यात आला. अधिवेशनास हजर राहण्यासंबंधीही नियम करण्यात येऊन, प्रतिनिधींची संख्या मर्यादित केलेली होती. सोव्हिएत युनियन व चीन या देशांतील कम्युनिस्ट पक्षाच्या धर्तीवर पक्षबांधणी करण्याच्या उद्देशाने हे सर्व झाले होते. शंकरराव मोरे हे या प्रबंधाचे प्रमुख निर्माते होते. प्रबंधात भारताने रशियाच्या गटात सामील व्हावे म्हणजे गरीबांचे हित साधेल असे मत व्यक्त झाले होते. नेहरूंचे सरकार भांडवलदारी अमेरिका व ब्रिटन यांच्या गोटात असल्याबद्दल टीका होती. चीनमधील कम्युनिस्ट पक्षाचे यश आणि पूर्व युरोपात रशियाने मुक्त केलेले देश पाहता, समाजवादी गटाचे प्राबल्य वाढण्याची खात्री व्यक्त झाली होती. कम्युनिस्ट पक्षाने सोव्हिएत युनियनने केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे वर्तन केले नाही आणि राष्ट्रीय चळवळीपासून तो दूर राहिल्यामुळे कामगारक्षेत्रात मध्यमवर्गीय समाजवाद्यांचे वर्चस्व स्थापन झाल्याची मीमांसा केलेली होती. अशा मध्यमवर्गीय समाजवाद्यांच्या बरोबर करार करण्यास आपला पक्ष का तयार झाला होता, याचा खुलासा करण्यात आला नाही. भारताचे स्वातंत्र्य वरकरणी व बेगडी आहे असाही अभिप्राय प्रबंधाने दिला होता. म्हणजे कम्युनिस्ट पक्षाची जी भूमिका होती त्यापेक्षा ही विशेष वेगळी नव्हती. शंकरराव जी तात्त्विक भूमिका घेत होते तशी ती पक्षातले किती पुढारी घेत होते याबद्दल शंका आहे. मोरे कम्युनिस्ट व समाजवादी या पक्षांचेही टीकाकार होते आणि मार्क्सवादाचा वेगळा अर्थ लावून काम करणाऱ्या नवजीवन या गटाचे धोरणही त्यांना मान्य नव्हते. आपण व आपला पक्ष हाच कम्युनिझम आणण्यात यशस्वी होईल आणि हे लक्षात घेऊन सोव्हिएत युनियन त्यास अधिकृतपणे मान्यता देईल असा विश्वास, शंकरराव कशाच्या आधारे बाळगत होते ते त्यांचे त्यांना माहीत. हे काही न होता, शे० का० पक्षातच नंतर फूट पडू लागली. त्यातले काही कम्युनिस्ट पक्षात गेले.

दाभाडी प्रबंधात भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या कारभारावर व धोरणावर झोड उठवून, समाजवादी क्रांती आपलाच पक्ष करील असा विश्वास व्यक्त झाला होता. या प्रबंधात नेहरूंच्या धोरणावर टीका होती. पण याच वेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाला सोव्हिएत नेत्यांनी वेगळेच मात्रेचे वळसे दिले होते. याची काही कल्पना शे० का० पक्षास नव्हती. हे वळसे देण्याचे कारण कम्युनिस्ट पक्षाचे तेव्हाचे चिटणीस बी० टी० रणदिवे यांची साहसवादी भूमिका. तेही शंकरराव मोरे यांच्याप्रमाणे पोथीनिष्ठ विचार करून क्रांती करू पाहत होते. म्हणून त्यांनी, माओने शेतकऱ्यांना हाताशी धरून क्रांती केली ती खरी कम्युनिस्ट क्रांती नव्हे, असा सिद्धान्त मांडला. स्टालिन प्रारंभी याच मताचा असला तरी त्याला चीनएवढा देश दूर ठेवणे परवडणारे नाही, हे समजले होते. म्हणून त्याने माओचा मार्ग हाही कम्युनिस्ट क्रांती घडवून आणू शकतो अशी भूमिका घेतली. मग रणदिवे यांच्यावर आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पक्षाची नियतकालिके टीका करू लागली व कम्युनिस्ट पक्ष गोंधळात पडला.

तेलंगण भागात कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते हिंसक उठाव करत होते, त्यामुळे मतभेद होऊ लागले होते. मुख्य म्हणजे नेहरूंचे सरकार प्रतिगामी व पाश्चात्त्य भांडवलदारी देशाचे हस्तक आहे की नाही, हा मतभेदाचा मुद्दा झाला होता.तेव्हा सोव्हिएत युनियनच्या नेत्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नव्याने नेमलेले चिटणीस अजय घोष, तसेच डांगे, बसवपुनिया,राजेश्वर राव इत्यादी नेत्यांना मॉस्कोस बोलावले. दोन दिवसांच्या या बैठकीस दुसऱ्या दिवशी स्टालिन स्वत: हजर होता. सर्व ऐकून घेतल्यावर स्टालिनने सांगितले की, माओ स्वत:च्या बळावर क्रांती करू शकत नव्हता. त्याला वारंवार एकेक भाग सोडून देणे

भाग पडत होते. अखेरीस तो मांच्युरियात आला आणि मग त्याला आधार मिळाला, तो सोव्हिएत युनियनचा. मांच्युरियाला लागून रशियाची हद्द आहे आणि त्यामुळे रसद मिळू लागली. तुम्ही ज्या भागात उठाव करत आहांत तिथे तुम्हांला मदत कोणाची मिळणार? शिवाय तुमच्यापाशी शस्त्रबळ किती आणि भारतीय सैन्याचे किती? तुमची अशी समजूत आहे की, नेहरू हे चँग कै शेकसारखे दुबळे आहेत. पण ही चुकीची समजूत आहे. नेहरूंची राजकीय मुळे जनतेत खोल रुजली आहेत. तुम्ही कम्युनिस्ट क्रांती करायला निघाला आहांत, पण तुमचा पक्ष अगदी दुर्बळ आहे. तेव्हा हा विचार सोडा आणि परत जाऊन सरकारकडे शस्त्रे परत करा. (*भारत व जग*, पृष्ठे १३३-३९) ही अधिकृत कागदपत्रे आता उपलब्ध असून त्याचे इंग्रजी भाषांतर दिल्लीहून दर सहा महिन्यांनी निघणाऱ्या 'रेव्होल्यूशनरी डेमॉक्रसी' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले होते.

स्टालिन, नेहरूंना भांडवलदारी देशांचे हस्तक मानत नव्हता, तर आपल्या देशाचे हित ते साध्य करत आहेत असे त्याचे मत होते. म्हणजे कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे शंकरराव मोरे व त्यांचे सहकारी यांचेही निदान चूक होते. तसेच जिथे भारतीय कम्युनिस्ट पक्षच स्टालिनला दुबळा वाटत होता तिथे त्यास बाजूला सारून, शे० का० पक्षाला अधिकृत मानून भारतात क्रांती घडवून आणण्यास त्याने मदत केली असती असे मानणे, हे निव्वळ स्वप्नरंजन होते. ज्याप्रमाणे भारतीय क्रांतीसंबंधी शे० का० पक्ष स्वप्नरंजनात मग्न होता तसाच तो आपल्या राजकीय ताकदीबद्दलही अवास्तव कल्पना करत असताना १९५२ सालची सार्वत्रिक निवडणूक आली. भारताची नवी राज्यघटना संमत झाल्यानंतर आलेली ही पहिली निवडणूक. तिचा मुख्य विशेष हा की, आजपर्यंत भारतात प्रौढ मतदानाचा अधिकार नव्हता, तो या घटनेमुळे मिळाला. काँग्रेसचा पराभव आपण करू याबद्दल शे० का० पक्षाला शंका नव्हती. काँग्रेसचा प्रचार मुख्यत: भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण आणि काकासाहेब गाडगीळ यांनी केला. निवडणुकीचा निर्णय लागला तेव्हा लोकसभा व विधिमंडळ या दोन्ही ठिकाणी काँग्रेसला भरघोस यश मिळून, शे० का० पक्षाची मोठी हार झाल्याचे दिसून आले. मग शे० का० पक्षात फाटाफूट होऊ लागली.

या आधीच केशवराव जेधे यांनी पक्षनेतृत्वावर अनेक गंभीर आरोप केले होते आणि मुलाखती देऊन पक्ष बळकट झाल्याचा आभास केला जात आहे असेही म्हटले. ही बहुतेक टीका शंकरराव मोरे यांच्यावर होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांना केशवराव जेधे व शंकरराव मोरे यांचे स्वभाव माहीत होते. त्यामुळे शे० का० पक्षाच्या स्थापनेच्या पहिल्या काळात या दोघांनी त्यांना पक्षाची माहिती दिली तेव्हा तुम्ही दोघे किती काळ एकत्र राहता हे पाहायचे, असा अभिप्राय त्यांनी दिला होता.हा काळ फार लवकर संपला. ५२ सालच्या लोकसभेच्या जागेसाठीच्या निवडणुकीत जेधे पराभूत झाल्यावर ते अधिकच संतप्त झाले आणि ५४ साली त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर ५६ सालच्या अखेरीस शंकरराव मोरे हेही काँग्रेसमध्ये परत आले. या रीतीने यशवंतराव व त्यांचे सहकारी यांनी मुंबईच्या बैठकीत घेतलेली भूमिका ही योग्य ठरली.

निवडणुकीनंतर खेर यांच्याऐवजी मोरारजी देसाई यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. त्यांच्या मंत्रिमंडळात यशवंतरावांकडे नागरी पुरवठा, समाजकल्याण, जंगल अशी खाती आली. भाऊसाहेब हिरे महसूलमंत्री झाले. यशवंतरावांकडे कॅबिनेट दर्जाचे खाते प्रथमच आले होते. पण यापूर्वीच्या कारभाराचा अनुभव गाठीला होता. त्यामुळे आपल्या खात्याच्या कारभारावर पकड बसवण्यास त्यांना अवघड गेले नाही. मंत्री या नात्याने कारभाराची काही शिस्त पाळावी लागते, पण त्याचबरोबर लोकमताचा विसर



वाढदिवस साजरा करताना

मंत्र्यास पडून चालत नाही. यशवंतराव या दोन्हींचा समन्वय घालण्यात यशस्वी झाले. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात अडथळे आणले नाहीत, पण लोकहितासाठी जे करायचे ते अधिकाऱ्यांचे अधिकार न डावलता, त्यांना राजी करून घडवून आणायचे, हा परिपाठ प्रथमपासून अखेरपर्यंत राज्यात व केंद्रात सत्तापदावर असताना त्यांनी पाळला. नागरी पुरवठा हे खाते त्या काळात जोखमीचे होते, कारण अन्नधान्यापासून सर्व जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा होता. विशेषत:, मुंबईला बराच धान्यपुरवठा करावा लागत असे. कारण लोकवस्ती वाढत होती आणि सिंध वगैरेमधून निर्वासितांचा मोठा लोंढा आलेला होता. राज्य धान्यतुटीचे होते, यामुळे केंद्र सरकारकडून ते मिळवणे जरूर होते. या संबंधात दिल्लीत पुरवठामंत्र्यांच्या बैठकीत यशवंतराव जी भूमिका मांडत, त्याचा परिणाम तेव्हाचे पुरवठामंत्री रफी अहमद किडवई यांच्यावर होत होता. पुढे तर त्यांचा बराच विश्वास बसला. एकदा केंद्रीय पुरवठा खात्याच्या अधिकाऱ्यांनी मुंबई प्रांताची मागणी अवास्तव ठरवली असता, यशवंतराव यांनी किडवई यांच्याशी बोलून आपली मागणी मान्य करून घेण्यात ते यशस्वी झाले. पुरवठामंत्र्याची तुटवडामंत्री अशी संभावना तेव्हा होत होती ती यशवंतरावांमुळे थांबली व ते खरेच पुरवठामंत्री म्हणून ओळखले जाऊ लागले. आपल्या कारकिर्दीत यशवंतराव मुंबईमध्ये क्रमाक्रमाने धान्यनियंत्रण उठवण्यात यशस्वी झाले, हे विशेष. पुरवठा खात्याच्या मागण्यांबद्दल यशवंतरावांनी ५५ साली विधिमंडळात केलेले भाषण, त्या

काळात किती व कोणत्या प्रकारच्या अडचणी होत्या यांची कल्पना देण्यास पुरेसे आहे.

स्थानिक स्वराज्य हे खाते सांभाळत असताना, तेव्हा देशभर अमलात आलेली सामूहिक विकास योजना महाराष्ट्रात यशस्वी करण्यात यशवंतरावांचा मोठा सहभाग होता. सामूहिक विकास योजना ही जनतेला विकासकार्यात सहभागी करून घेण्यासाठी होती आणि ती ग्रामीण भागात विकासाचे कार्यक्रम राबवणारी होती. एस० के० डे या खात्याचे केंद्रीय मंत्री होते आणि त्यांनी या योजनेची अंमलबजावणी हे आपले जीवितकार्य आहे असे मानून काम चालवले होते. ग्रामीण भागात लहानाचे मोठे झालेले यशवंतराव या योजनेकडे आकर्षित होणे साहजिक होते. त्यामुळे ती राज्यात चांगल्या प्रकारे राबवली जात होती. स्थानिक स्वराज्य मंत्री या नात्याने यशवंतरावांनी ग्रामपंचायतींचे काही अधिकार वाढवण्याचे विधेयक मांडले, ते संमत झाले. त्या विधेयकाप्रमाणे ग्रामपंचायतींना सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानात दुपटीने वाढ झाली. ती करताना यशवंतरावांनी एक उणीव मात्र नजरेस आणली. ती म्हणजे पंचायतींच्या पैशापैकी बहुतेक पैसा कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होत असल्यामुळे, पंचायतींकडून जी कामे व्हायची ती होत नाहीत. अर्थात हे दुखणे आजही चालूच आहे. पंचायतींना मर्यादित प्रमाणावर न्यायदानाचा अधिकार दिला असला तरी अनेक पंचायती तो वापरत नव्हत्या. म्हणून तो वापरणाऱ्या पंचायतींना अधिकार देणे हे वाजवी होते. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे विधेयक आले त्याचा पाया ५३ सालातील या विधेयकाने घातला.

तथापि महाराष्ट्रात वादळ उठण्याची चिन्हे दिसू लागली. हे वादळ राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नावरून निर्माण होणार होते. राज्यपुनर्रचनेचा वाद व त्यावरून उठलेले वादळ यांमुळे यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली, पण ते त्यातून यशस्वीपणे बाहेर पडले. हा सारा इतिहास जरा तपशिलात जाऊन तपासला पाहिजे. यात अनेक व्यक्ती व पक्ष गुंतले होते. अनेक जण गोळीबारात मृत्यू पावले तर अनेक लाठीमारात जखमी झाले. यामुळे हा इतिहास रक्तरंजितही आहे. अखेरीस महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यास आता पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. तेव्हा त्यावेळच्या घटनांचा थोड्या तटस्थपणे विचार करणे शक्य आहे.

राजकीय घटना घडतात तेव्हा त्यांत गुंतलेल्या व्यक्तींचे स्वभाव, त्यांचे हितसंबंध, पक्षोपक्षांच्या भूमिका आणि राजकारण; तसेच तत्कालीन समाजाची परिस्थिती इत्यादी अनेक घटकांचा आढावा घेणे इष्ट. त्या पर्वात ज्या व्यक्ती प्रमुख भूमिका पार पाडत होत्या, त्यांच्यापैकी अनेकांनी आपल्या आठवणी आणि विश्लेषण लिहून ठेवले आहे. या प्रत्येकाचे ग्रह, आग्रह व पूर्वग्रह या लिखाणात उघड झाले आहेत. काहींनी त्या पर्वाचा आढावा घेतला आहे. पण त्यांचेही पूर्वग्रह लपून राहत नाहीत. अनेकांच्या लिखाणात यशवंतराव हे टीकेचे विषय झालेले दिसतील. लिखाण करणाऱ्याच्या मनाचा कल असेल त्याप्रमाणे यशवंतरावांच्या धोरणांचे व वर्तनाचे विश्लेषण होणे हे अपेक्षित म्हटले पाहिजे. काहींनी यशवंतरावांसंबंधीच्या पूर्वग्रहामुळे, त्यांच्या पत्रांतील वा भाषणांतील वाक्ये संदर्भ सोडून देऊन आपला मुद्दा सिद्ध करण्याचाही प्रयत्न केल्याचे आढळेल. नेहरूंचीही काही बाजू होती याकडे दुर्लक्ष करण्यात आले. नेहरू जी बाजू मांडत होते ती त्यांची एकट्याची नसून सरदार पटेल, राजाजी, मौलाना आझाद यांचीही ती होती, हे विसरून चालणार नाही. तेव्हा जे लिखित वाङ्मय उपलब्ध झाले त्याच्या खोलात

जाऊन कोणते चित्र दिसते, ते दाखवण्याचा प्रयत्न इथे करायचा आहे.

सत्तांतर होऊन ब्रिटिश राजवट संपुष्टात येण्याची चिन्हे १९४५पासून दिसू लागली होती. देश स्वतंत्र झाल्यानंतर राज्यांच्या पुनर्रचनेची योजना अमलात आणण्याची निकड काही राज्यांतील लोकांना भासू लागली. ब्रिटिशांनी कारभाराच्या सोयीनुसार प्रांतांची रचना केल्याचे सांगितले जात असे. पण ते पटण्यासारखे नाही. कारण काही प्रांत अवाढव्य होते तर काही अगदी छोटे. या स्थितीत काँग्रेसने भाषावार प्रांतरचना करण्याचा ठराव १९२० साली केला होता. लोकशाही राजवटीत लोकप्रतिनिधींना त्यांच्या भाषेत कारभार करता आला पाहिजे, या कारणास्तव काँग्रेसचा हा ठराव झाला होता. स्वातंत्र्यानंतर राज्यपुनर्रचनेच्या मागे एवढेच तत्त्व असावे असा काहींचा आग्रह होता तर दुसऱ्या काहींनी यापलीकडे जाऊन विशिष्ट संस्कृतीचा परिपोष व विकास यास प्राधान्य देऊन, भाषावार राज्यरचना करावी अशी भूमिका घेतली होती. संस्कृतीचे रक्षण व विकास यांना महत्त्व दिले गेल्यावर या प्रश्नाला भावनात्मक स्वरूप येणे स्वाभाविक होते व तसे ते आलेही. देश स्वतंत्र होतानाच असंख्य कठीण समस्या उभ्या झाल्या होत्या. जातीय दंगली, निर्वासितांची आवक, काश्मीरमध्ये आलेले घुसखोर या जोडीला अवघड आर्थिक परिस्थिती आणि सहाशेएक संस्थानांचे भवितव्य अशा या समस्या होत्या. यामुळे भाषावार राज्यरचनेचा काँग्रेसचा ठराव त्याज्य न ठरवता, काही काळ त्याची अंमलबजावणी लांबणीवर टाकण्याकडे महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल. मौलाना आझाद, चक्रवर्ती राजगोपालाचारी अशा प्रमुख नेत्यांचा कल झाला. परंतु आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र यांतून घटनासमितीवर निवडून गेलेल्या अनेक प्रतिनिधींना, राज्यांची भाषावार रचना करण्यास दुय्यम स्थान देऊ नये आणि तो प्रश्न लांबणीवरही टाकू नये असे वाटत होते.

बेळगाव इथे मराठी साहित्य संमेलन ग० त्र्यं०, माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली १ मे १९४६ रोजी भरले असता, माडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी अध्यक्षीय भाषणात केली आणि त्याप्रमाणे संमेलनात ठरावही झाला. त्यानंतर ही मागणी तडीस नेण्याचे काम हे राजकीय स्वरूपाचे असल्यामुळे दत्तोपंत पोतदार, माडखोलकर, शंकरराव देव, केशवराव जेधे व श्रीपाद शंकर नवरे यांची एक समिती नेमली गेली. तिने २८ जुलै रोजी मुंबईत महाराष्ट्र एकीकरण परिषद भरवली. स० का० पाटील हे परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. परिषदेत संयुक्त महाराष्ट्र स्थापन व्हावा अशी मागणी करणारा ठराव संमत झाला. मग शंकरराव देव यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्याचा ठराव मांडला व तोही मंजूर झाला. काँग्रेससह सर्वपक्षीय अशी संघटना या ठरावान्वये स्थापन झाली.

आंध्र हा त्या वेळी मद्रास प्रांताचा एक भाग होता आणि त्यातून बाहेर पडून वेगळे आंध्र राज्य स्थापन करण्याची मागणी होती आणि पट्टाभिसीतारामय्या हे तिचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांनी १९४६च्या ऑगस्टमध्ये, घटना समितीने भाषावार प्रांतरचनेला अग्रक्रम देण्याचे आवाहन केले आणि मग दिल्लीत त्यांच्याच अध्यक्षतेखाली घटना समितीच्या काही सभासदांची एक बैठक झाली.तिने नेमलेल्या उपसमितीने एक ठराव करून आंध्र, कर्नाटक, केरळ व महाराष्ट्र अशी राज्ये स्थापन करण्याचा ठराव एकमताने संमत केला. या बैठकीला शंकरराव देव, जेधे तसेच स० का० पाटील हजर होते. महाराष्ट्र राज्य स्थापन करण्याबाबत विदर्भातले काही पुढारी उत्साही नव्हते, इतकेच नव्हे, तर त्यांना स्वतंत्र विदर्भ हवा होता. त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी शंकरराव देव यांनी माधवरावजी अणे, ब्रिजलाल बियाणी इत्यादी पुढाऱ्यांशी १९४७ सालच्या ऑगस्टमध्ये अकोला इथे बोलणी केली आणि त्यांच्याशी

जो करार झाला तो 'अकोला करार' म्हणून ओळखला जाऊ लागला. या करारात महाविदर्भ, मराठवाडा, मुंबई व उर्वरित महाराष्ट्र असे चार उपप्रांत करण्याची तरतूद होती. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात देव यांचा पुढाकार होता, तरीही अकोला कराराप्रमाणे ते चार उपप्रांत करण्यास तयार होते. हे जमले नाही तर विदर्भ राज्य स्थापन करण्याकरता सर्वांनी प्रयत्न करण्याचेही करारानुसार त्यांनी मान्य केले होते. यातील विसंगती उघड होती आणि तीमुळे देव यांचा वैचारिक गोंधळ स्पष्ट होत होता.

हा प्रश्न केंद्रीय कायदेमंडळात आला तेव्हा पंडित नेहरूंनी सरकारची बाजू स्पष्ट केली. त्यांनी भाषावार राज्ये स्थापन करण्याचे तत्त्वत: मान्य केले, पण त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी काळजीपूर्वक चौकशी करण्याची जरुरी प्रतिपादन केली. देशाची सुरक्षितता व स्थैर्य यांना महत्त्व दिले पाहिजे ; तसेच राज्यकारभार सामर्थ्यशाली राहील आणि त्यात कोणताही व्यत्यय येणार नाही, हे पाहिले पाहिजे असा इशारा दिला. देशापुढे इतर निकडीचे प्रश्न असल्यामुळे भाषावार राज्यरचना करण्यात शक्ती दवडणे उचित नाही अशी भूमिका मांडली. आंध्र राज्य निर्माण करण्यात विशेष अडचणी नाहीत; यापूर्वी १९३५च्या कायद्याखाली सिंध प्रांत वेगळा करण्यात आला होता त्याप्रमाणे आंध्र करता येईल, असा खुलासा करताना नेहरूंनी सांगितले की, आंध्र राज्य निर्माण करताना काय अडचणी व अनुभव येतात ते लक्षात घेऊन, इतर राज्यांच्या मागणीसंबंधात धोरण ठरवता येईल. नेहरूंच्या या उत्तरानंतर हरिभाऊ पाटसकर यांनी भाषावार राज्यरचनेसंबंधीचा ठराव मागे घेतला. भाषावार राज्यांमुळे देशाच्या सुरक्षिततेला कोठे धोका निर्माण झाला नसल्याचा युक्तिवाद तेव्हा व नंतर केला गेला. पण देशात त्या वेळी निर्माण झालेल्या परिस्थितीत नेहरू, पटेल, मौलाना आझाद यांना जर याबद्दल आशंका वाटली असेल तर त्यांच्या हेतूबद्दल शंका घेणे सयुक्तिक नव्हते. देशात खरोखरच विघटनात्मक प्रवृत्ती वाढत होत्या. यांत संस्थाने होती तसाच कम्युनिस्ट पक्षही होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानांचा प्रश्न सुरळीतपणे हाताळण्यात सरदार पटेल यांचे कौशल्य उपयोगात आले.

आंध्रचा प्रश्न सुरळीतपणे सोडवणे शक्य आहे असा खुलासा नेहरूंनी केल्यावर, आंध्र राज्याची स्थापना करताना कोणत्या समस्या येतील याची तपासणी करण्यासाठी, १९४८ साली एक समिती नेमण्याचे ठरले आणि काश्मीरचे मुख्य न्यायाधीश धर यांची एक सदस्य समिती नेमण्यात आली. केवळ आंध्रचाच नव्हे, तर एकंदरच भाषावार राज्यरचनेचा प्रश्न लांबणीवर न टाकण्याची सूचना काकासाहेब गाडगीळ यांनी धर समितीपुढे मांडली. डॉ० बाबासाहेब आंबेडकर त्या वेळी कायदेमंत्री होते, त्यांनी धर समितीपुढे भाषावार राज्यनिर्मितिसंबंधात वेगळाच मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले, की गुजरातच्या काही भागांत अनाविल ब्राह्मणांचा प्रभाव आहे तर दुसऱ्या काही भागात पाटिदार वा पटेल यांचा. या दोन्ही जमाती एक होण्याचा संभव असून तसे झाल्यास इतर जमाती त्यांच्या दडपणाखाली येतील. नंतर भाषावार प्रांतरचनेच्या आयोगासमोर साक्ष देताना बाबासाहेबांनी महाराष्ट्रात मराठा जमातीला राजकीय व इतर बाबतींत मोठी सत्ता प्राप्त होईल, म्हणून महार जातीच्या लोकांना संपूर्ण नागरी हक्क मिळतील अशी हमी मिळाली पाहिजे अशी मागणी केली. संसदेत भाषण करताना बाबासाहेबांनी आंध्रचे उदाहरण देऊन रेड्डी व खम्मा या दोन जातींचे प्राबल्य होऊन, ते सर्व सरकारी नोकऱ्या, उद्योग, व्यापार इत्यादी ताब्यात घेतील आणि अस्पृश्य समाजाचे परावलंबित्व वाढेल असा इशारा दिला होता. दक्षिणेतील एक हरिजन खासदार वेलायुधन यांनीही संसदेत भाषण करताना, भाषावार राज्यरचना करणे ही प्रतिक्रांतिकारक

योजना होणार असून जातवारीला जीवदान दिले जाणार आहे, असे मत व्यक्त केले होते. तेव्हा भाषावार राज्यरचनेच्या मागणीला केवळ भाषेचा निकष न लावता, तो संस्कृतीचाही प्रश्न करणारांनी, कोणाची संस्कृती आणि हरिजन व इतर अल्पसंख्य जातींच्या नागरी हक्कांचे संरक्षण कसे करायचे, याची उत्तरे दिली नव्हती. अर्थात ते प्रश्न धसास लावले गेले नाहीत. तेव्हा भाषावार राज्यरचनेचा प्रश्न हा साधा नव्हता तर गुंतागुंतीचा होता, हे कळून येण्यास हरकत नाही.

धर समितीने भाषावार राज्यरचनेचा प्रश्न लांबणीवर टाकावा असा अभिप्राय दिला. तथापि या समितीने महाराष्ट्रीय लोकांच्या स्वाभिमानाला डंख लागेल असे मत देण्याचे कारण नव्हते. तिने म्हटले, की महाराष्ट्र राज्याची मागणी करण्यामागे पुण्याची विचारपरंपरा आहे. यात पुण्याचा काही संबंध नव्हता. या समितीचे मदतनीस म्हणून हरिभाऊ पाटसकर यांनी काम केले होते. अहवाल लिहिण्याशी त्यांचा काही संबंध नव्हता. हरिभाऊंनी धर समितीच्या अहवालातील या वाक्यावर जोरदार टीका केली. त्यांनी सांगितले की, समितीपुढे सातशे लोकांच्या साक्षी झाल्या होत्या, पण कोणीही 'पुण्याचा विचारसंप्रदाय' असा उल्लेखही केला नव्हता. त्यांच्यावर प्रतिगामित्वाचा वा जातीयतेचा आरोप होत असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रात उमटली आणि विनाकारण कटुता निर्माण करण्यास हे न्यायमूर्ती कारणीभूत झाले. धर समितीचा अहवाल कोणासच मान्य झाला नाही. १९४९ साली जयपूर इथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी कार्यकारिणीची बैठक झाली व तीत शंकरराव देव, पट्टाभिसीतारामय्या यांनी भाषावार राज्यरचनेचा आग्रह धरला. मग या प्रश्नाचा विचार करण्याकरता जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभिसीतारामय्या या तिघांची समिती नेमण्यात आली. तिच्या अहवालात देशातल्या राजकीय परिस्थितीत भाषावार राज्यरचनेचा विचार करण्याची आवश्यकता नसल्याचे मत दिले होते. जातीवाद, प्रांतवाद इत्यादींमुळे स्वातंत्र्याला धोका निर्माण होणे गैर आहे असेही समितीने म्हटले होते. अर्थात समितीने भाषावार राज्यरचनेस कायमची मूठमाती दिली नव्हती. एखाद्या प्रदेशात लोकभावना तीव्र असतील तर त्यांची दखल घेणे हे लोकशाहीतील सरकारचे कर्तव्य असल्याचे मान्य केले होते. पण या मागणीची व्यवहार्यता तपासण्याची गरज प्रतिपादली होती. समितीने फक्त आंध्रची मागणी मान्य केली होती, पण आंध्र निर्माण करताना मद्रास शहरावर त्यास हक्क सांगता येणार नाही असे बजावून महाराष्ट्राच्या बाबतीत मुंबई अलग करण्याचे सुचवले होते.

या अहवालावर काकासाहेब गाडगीळ नाराज होते हे खरे, पण त्यांनी लिहिले आहे की, ''पहिल्या निवडणुकीनंतर व दुसऱ्या निवडणुकीच्या आत भाषाविषयक प्रश्न सुटावा असे माझे मत होते...शंकरराव देव, पट्टाभि व कन्नड कार्यकर्ते गुडघ्याला बाशिंग बांधून घोषणा करत होते–पट्टाभींनी त्या रिपोर्टात आंध्र प्रांत, मद्रासवरील आंध्राचा हक्क सोडल्यास व्हावा अशी शिफारस मान्य केली होती. त्यातच मुंबई स्वतंत्र ठेवावी व महाराष्ट्रीयांना महाराष्ट्र हवा असल्यास करावा अशी सूचना होती. देवांनी उतावीळपणा केला व त्याचे हे फळ होते'' (*पथिक*, खंड १, दुसरा, पृ० ४१५)

शंकरराव देव यांनी ४६ साली सर्वपक्षीय संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला व ते तिचे अध्यक्ष झाले खरे, पण महाराष्ट्रातले अनेक काँग्रेसजन अशा सर्वपक्षीय परिषदेची स्थापना करण्यास अनुकूल होते असे दिसत नाही. विशेषत: या परिषदेत कम्युनिस्ट पक्षास समाविष्ट करणे त्यांना अमान्य होते. मामा देवगिरीकर हे त्यांपैकी एक होते. त्यांनी लिहिले आहे की, ''भारत स्वतंत्र झाला हे कम्युनिस्ट पक्षाला खरे वाटत नव्हते. त्यांनी हे स्वातंत्र्य बेगडी ठरवले होते. भारतात क्रांती करण्यासाठी

जाळपोळ, हिंसा हा मार्ग त्या पक्षाने कलकत्त्याच्या अधिवेशनात स्वीकारला होता. आंध्र प्रांतासाठी झालेल्या चळवळीत तो पक्ष अग्रभागी होता आणि आंध्र राज्य झाले तरी कम्युनिस्ट पक्षाने जाळपोळीचे तंत्र अवलंबिले होते. विशेषत; तेलंगणामध्ये त्या पक्षाने हिंसक उठाव केला होता. सरदार पटेल यांनी संसदेतच कलकत्त्याच्या अधिवेशनात झालेला ठराव व त्याप्रमाणे कम्युनिस्ट पक्षाने चालवलेले आंदोलन याची माहिती दिली होती.'' सरदारांनी कठोर उपाय योजून हे आंदोलन मोडून काढले होते. असे असूनही शंकरराव देव यांनी कम्युनिस्ट पक्षाला बरोबर घेऊन संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करावी हे देवगिरीकरांसारख्या काँग्रेसजनास मान्य झाले नाही. देवगिरीकर लिहितात, ''शंकरराव देव हे नाशिक काँग्रेसनंतर निवृत्त झाले होते व काँग्रेसवर त्यांचा थोडा घुस्साही होता. राज्यपुनर्रचना समितीच्या नियुक्तीपूर्वी थोडे दिवस ते आमच्याकडे येऊ लागले होते. संयुक्त महाराष्ट्राबद्दलची त्यांची तळमळ विलक्षण होती. त्यांची काही वक्तव्ये आमच्या कानांवर येत व ती महत्त्वाकांक्षेची व अहंकाराची निदर्शक असत–इतक्या वर्षांनंतरही मला अजूनही वाटते की, संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात व त्या परिषदेत कम्युनिस्टांना स्थान देण्यात आमच्या नेत्यांची चूक झाली. चळवळीवरील त्यांचा (देवांचा) ताबा सुटला. मी स्वत: त्या परिषदेच्या कचेरीत कधी पाऊल टाकले नाही हे जसे खरे, तसे माझ्या सहकाऱ्यांना बंदी केली नाही, हेहि खरे.'' राज्यपुनर्रचना समितीला काँग्रेसने स्वतंत्र निवेदन द्यायला हवे होते, परिषदेतर्फे देणे बरोबर नव्हते असे सांगून, परिषदेने धनंजयराव गाडगीळ यांना निवेदन लिहायला सांगितले हेही आपल्याला पसंत नसल्याचे देवगिरीकरांनी नमूद केले आहे. (*राजकीय आठवणी,* पृ० २०७) काँग्रेसजनांपैकी काहींची मनस्थिती कशी होती, हे यावरून दिसून येते.''

राज्यपुनर्रचनेच्या संबंधात कम्युनिस्ट पक्षाची विशिष्ट भूमिका होती. तो पक्ष ही केवळ भाषिक कसोटीवर राज्यांची पुनर्रचना होणार असे मानत नव्हता. या पक्षाला भारतात केंद्रीय सरकारला विशेष अधिकार देणेच अमान्य होते. इतकेच नव्हे, तर भारत हे एक राष्ट्र नसल्याचा दावा त्याने केला होता. प्रत्येक राज्य हे एक राष्ट्र आहे आणि अशा राष्ट्रिकांचा (नॅशनॅलिटी) मिळून हा देश बनला आहे, असा त्याचा सिद्धान्त होता. या प्रत्येक राष्ट्रिकास स्वयंनिर्णयाचा अधिकार असून संघराज्यात राहायचे की नाही, हे त्याने सार्वमताने ठरवायचे असा त्याचा तोडगा होता. यासंबंधीचा बराच तपशील सेलिग हॅरिसन या भाष्यकाराने *इंडिया–द मोस्ट डेंजरस डिकेडस,* या ग्रंथात दिला आहे.

या ग्रंथावरून हे दिसून येईल की, आशियात क्रांतीचे काम करण्यासाठी शिकवून तयार होणाऱ्या उमेदवारांपुढे १९२५मध्ये भाषण करताना स्टालिनने म्हटले होते की,भारत हा एक देश असल्याचे बोलले जात असले तरी जेव्हा क्रांतिकारक उठाव होईल तेव्हा अनेक राष्ट्रिक पुढे येतील. या प्रत्येकाची भाषा, संस्कृती वेगळी असेल. स्टालिनने सोव्हिएत युनियनमधील विविध वंशांच्या व भाषांच्या लोकांचा प्रश्न कसा सोडवायचा यासंबंधी एक प्रबंध लिहिला होता व तो लेनिनने मान्य केला होता. या प्रबंधात ही राष्ट्रिकाची कल्पना मांडली होती. लेनिनने या सर्वांना स्वयंनिर्णयाचा हक्क जाहीर केला होता आणि सोव्हिएत युनियनच्या घटनेत तशी तरतूद केली होती. याप्रमाणे तिथे खरोखरच स्वयंनिर्णयाचे तत्त्व अमलात आले होते, हा एक भ्रामक समज अनेक देशांनी, विशेषत: अविकसित देशांतल्या राजकीय पक्षांनी बाळगला होता. पण कसेल त्याची जमीन असा घोष करून शेतकऱ्यांना वश करून घेतल्यावर, सामुदायिक शेतीच्या प्रयोगापायी सर्वांच्या जमिनी बोल्शेविकांनी काढून घेऊन त्या सरकारी मालकीच्या झाल्या तशीच स्वयंनिर्णयाची गत झाली.

पूर्णत: केंद्रानुवर्ती राज्य सोव्हिएत युनियनमध्ये स्थापन झाले. सरकारी कारभार, लष्कर, कम्युनिस्ट पक्ष यांत रशियन भाषा वापरली जात होती. वरच्या जागा मिळवायच्या तर प्रादेशिक भाषांचा काही उपयोग नव्हता. आर्थिक नियोजनामुळे तर केंद्रीकरण अधिकच पक्के झाले. हे माहीत असल्यामुळे जयप्रकाश नारायण यांनी, सोव्हिएत युनियनमधील राज्यांना दिलेले स्वातंत्र्य केवळ कागदावर होते असा अभिप्राय पूर्वीच दिला होता.बिगर रशियन राज्यांना कितपत स्वातंत्र्य होते याची चर्चा करणारे अनेक ग्रंथ आहेत. एकच पाहायचा असेल तर रॅचेल डेनबर यांनी संपादित केलेला द *सोव्हिएत, द नॅशनॅलिटी डिसइंटिग्रेशन रीडर इन कॉन्टेक्सट,* हा पाहावा.

बिगर रशियन विभागातल्या लोकांना स्वयंनिर्णयाचा हक्क देत असतानाच, लेनिनने मार्क्सवाद व समाजवाद यांवर आधारलेली पद्धती आणण्याची क्रांती ही महत्त्वाची असून स्वयंनिर्णयाचा अधिकार गौण आहे, असे १९१८ सालीच बजावले होते. तसेच २० साली स्टालिनने लिहिले की, जनतेच्या हितापेक्षा स्वयंनिर्णयाचा अधिकार हा प्रतिक्रांतिकारक ठरतो. सोव्हिएत युनियनने समाविष्ट करून घेतलेले बिगर रशियन विभाग सोडा, पण दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपातील जे देश त्याने आपल्या नियंत्रणाखाली ठेवले त्यांना कितपत स्वयंनिर्णयाचा अधिकार होता, हे त्यांचे उठाव ज्या रीतीने दडपले गेले त्यावरून दिसून आले होते. जेव्हा सोव्हिएत युनियनची समाप्ती झाली तेव्हा बिगर रशियन विभागांच्या नेत्यांनी आपली भाषा व संस्कृती दडपली गेल्याचे व आपली साधनसामग्री लुटल्याबद्दल उठाव करत असल्याचे स्पष्ट केले होते.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व त्याचे पाठीराखे हे लक्षात घेत नव्हते. यामुळे पाकिस्तानच्या मागणीचा हिरिरीने पुरस्कार कम्युनिस्ट पक्षाने केला. स्वयंनिर्णयाचा अधिकार मुस्लिमांना हवा ही त्यांची मागणी होती. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी नव्याने स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पक्षाने, भारतात सोव्हिएत पद्धतीचे राज्य स्थापन होईल तेव्हा या राज्यात सामील झालेल्या विविध घटकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार असेल अशी ग्वाही ३० साली दिली होती. कम्युनिस्ट नेते गंगाधर अधिकारी यांनी ३८ साली अशी कबुली दिली होती, की, भारत हा एक देश असून मुस्लिम हे केवळ एक धार्मिक अल्पसंख्य आहेत, अशी इतर राष्ट्रवाद्यांप्रमाणे आमची समजूत होती. यामुळे भारत हा एक देश नाही, हा स्टालिनचा विचार ऐकल्यावर अनेक कम्युनिस्टांना धक्का बसला. नव्या विचारसरणीचा स्वीकार केल्यामुळे मुस्लिमांचा स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य करून पाकिस्तान दिले पाहिजे तसेच बंगाली, कर्नाटकी, मराठी इत्यादींनाही हा हक्क देऊन फुटून जाण्याची मोकळीक दिली पाहिजे, असेही अधिकारी यांनी ४४ साली लिहिले.

भारतीय घटना तयार करण्यासाठी घटना समितीची नियुक्ती केल्यावर कम्युनिस्ट नेते पी० सी० जोशी यांनी सांगितले की, घटना समितीवर जाणारे प्रतिनिधी हे एकेका स्वतंत्र घटकाचे प्रतिनिधी असून त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे आणि संकल्पित संघराज्यात राहायचे की नाही, हेही त्यांनी ठरवायला हवे. संस्थानांनाही हा अधिकार ते द्यायला तयार होते. पंडित जवाहरलाल नेहरू यामुळे संतप्त झाले, नेहरूंनी ४६ साली निवडणूक दौऱ्यात भाषण करताना कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिकेचा समाचार घेतला. ते म्हणाले की, विश्वासघातकी कम्युनिस्ट पक्षास देशाचे बारा वा त्यापेक्षा अधिक तुकडे करायचे आहेत. गेल्या काही वर्षांत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने घेतलेली भूमिका व मार्क्सवाद यांचा काही संबंध नाही. भारत हा एक देश नाही हा सिद्धान्त स्वीकारून, स्वयंनिर्णयाचा हक्क प्रत्येकाला देणाची भाषा आंध्रचे कम्युनिस्ट करत होते आणि बी० टी० रणदिवे हे पुस्तकी व अधिक सिद्धान्तवादी असल्यामुळे, या दोन आयुधांनी



सौ० वेणुताई यांच्यासमवेत चहापान

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आपल्या पक्षाने पूर्वीच सामील व्हायला हवे होते, असे त्यांना वाटत होते. भाई डांगे यांचे विचार थोडे वेगळे होते. कम्युनिझमने सर्व कामगारांना एक होऊन क्रांती करण्याचे आवाहन केले होते. तेव्हा प्रादेशिक वा भाषिक भूमिका घेऊन लढा दिल्यास या आंतरराष्ट्रीय तत्त्वाचे काय होणार, असा त्यांचा प्रश्न होता. शिवाय डांगे राष्ट्रीय लढ्यात होते आणि लोकमान्य टिळक व इतिहासाचार्य राजवाडे यांचा त्यांच्यावर प्रभाव होता, तेव्हा भाषिक राज्ये ही स्वतंत्र राष्ट्रे आहेत हे त्यांना मानवणारे नव्हते.

कम्युनिस्ट नेत्यांची घटक राज्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्याची ही कल्पना दि० के० बेडेकर यांनी पुरस्कारलेली दिसेल. तेही मार्क्सवादी असल्यामुळे पक्षाचीच बाजू त्यांनी मांडली. *संयुक्त महाराष्ट्र* हे त्यांचे पुस्तक१९४७मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच्या प्रस्तावनेतच ते म्हणतात की, ''संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य जुलै १९४६पासून सुरू झाले आहे व त्यामुळे संयुक्त हा शब्द रूढही झाला आहे. पण मी जे विवेचन व प्रतिपादन केले आहे, त्यात महाराष्ट्राला एकात्म राष्ट्र मानावे असे आग्रहाने मांडले आहे–महाराष्ट्र हे एकात्म राष्ट्र मानले पाहिजे असे मांडत असतानाच संयुक्त भारतीय राज्याचा मी स्पष्ट पुरस्कार केला आहे.हे वाचकांनी लक्षात घ्यावे. तसेच एकात्म अशा या महाराष्ट्र राष्ट्रातील नागपूर, वऱ्हाड, कोंकण, मुंबई इत्यादी विभागांना (उपप्रांतांना) स्वायत्तता देण्याचे तत्त्वहि मी मानले आहे.'' (*संयुक्त महाराष्ट्र*, प्रस्तावना, पृ० ६) बेडेकरांनी महाराष्ट्र हे राष्ट्र मानल्यामुळे त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की,'महाराष्ट्र हा प्रांत की, राष्ट्र या प्रश्नावर संदिग्ध भूमिका स्वीकारल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीचे राजकीय ध्येय कमकुवत राहत आहे असे मला वाटते. आज अशी स्पष्ट नि:संदिग्ध भूमिका जाहीर करण्याची वेळ आली आहे की, महाराष्ट्र हे एक राष्ट्र आहे व ते हिंदी संघराज्यात आपखुशीने सामील होईल' (*संयुक्त महाराष्ट्र*, प्रस्तावना, पृ० ३२). बेडेकरांनी असेही म्हटले आहे की, संघराज्याचे घटक स्वतंत्र, समान, सार्वभौम व परस्परांशी सहकार्य करणारी राष्ट्रेच असली पाहिजेत. इतके सांगून त्यांनी, चीन इत्यादी ज्या देशांत कम्युनिस्ट क्रांती झाली तिथे हेच तत्त्व स्वीकारले असल्याची ग्वाही (इतिहास वेगळे सांगत असताना) दिली आहे.

प्रांत वा राज्ये ही सार्वभौम राष्ट्रे आहेत असे बेडेकर यांनी ज्या पुस्तकात प्रतिपादन केले आहे, त्यास शंकरराव देव यांनी पुरस्कार जोडला आहे. पण बेडेकर यांचा मूळ सिद्धान्त आपल्याला मान्य नाही असे त्यांनी म्हणू नये, हे आश्चर्य म्हटले पाहिजे. बेडेकर मार्क्सवादी दृष्टिकोणातून या प्रश्नाचा विचार करत होते तेव्हा त्यांचे प्रतिपादन अपेक्षित होते. पण देव मार्क्सवादी नव्हते. तथापि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा कोणीही पुरस्कार केला की, त्यास पाठिंबा द्यायचा असा देव यांचा सरधोपट मार्ग होता. डॉ० धनंजयराव गाडगीळ यांनी बेडेकर यांच्याच रीतीची मते अप्रत्यक्षपणे मांडली आहेत. त्यांनी राज्यघटना होण्यापूर्वी म्हणजे १९४५ साली प्रसिद्ध केलेल्या *फेडरेटिंग इंडिया* या त्यांच्या छोट्या पुस्तकात, भारत संघराज्य होणार या चर्चेसंबंधात आपली मते व्यक्त केली आहेत. त्यांनी घटनात्मक दृष्टीने विचार केला होता.

संघराज्य कसे होते, हे सांगताना म्हटले आहे की, अगोदर काही स्वतंत्र राज्ये एकत्र येतात आणि त्यांच्या संमतीने संघराज्याची स्थापना होते. अमेरिकेत असे झाले होते. भारतात अशी स्वतंत्र राज्ये नव्हती. म्हणून भारतातल्या प्रांतांना वा राज्यांना संघराज्यात सामील व्हायचे की नाही, हे ठरवण्याचे स्वातंत्र्य द्यावे. एक काळ यातील काही राज्यांनी स्वतंत्रपणे राज्य केले होते व त्यांची काही वेगळी संस्कृती आहे. संस्थानांनाही अशी सवलत द्यावी अशी गाडगीळ यांची सूचना होती. याचा दुसरा अर्थ असा की, जर राज्याची अनुमती नसेल तर त्यास वेगळे होऊ द्यावे. धनंजयरावांच्या या पुस्तकाच्या आधी, म्हणजे १९४१ मध्ये, 'केसरी'चा हीरक महोत्सवी अंक प्रसिद्ध झाला. त्यात लिहिलेल्या लेखातही गाडगीळ यांनी हिंदुस्तान हे एक 'महाराष्ट्र' आहे; त्यात अनेक 'पोटराष्ट्रां'चा समावेश होतो, असे विधान केलेले दिसेल. आपली घटना एकमुखी न होता ती संयुक्त असावी असे मत त्यांनी त्या लेखात दिले होते. त्या वेळचे प्रांत हे राष्ट्र असल्याचे मानण्याची कल्पना कम्युनिस्ट पक्षच मांडत होता. गाडगीळांना एकमुखी नव्हे तर संयुक्त घटना हवी होती. आपली घटना संयुक्तच झाली; पण अनेक राष्ट्रांनी ती तयार केली असे कोणी मानले नाही. अर्थात नंतर जी घटना झाली ती पूर्णत: संघराज्याची नव्हती. घटनेने भारत हा लोकशाही प्रजासत्ताक असल्याचे जाहीर केले आणि भारतीय संघ (युनियन) असे म्हटले, संघराज्य (फेडरेशन) नव्हे. यामुळे केंद्रसत्ता प्रबळ झाली. राज्यांना दिलेल्या अधिकाराबाहेरचे वा उर्वरित अधिकार केंद्राच्या हाती सोपवण्यात आले.

आंध्रप्रमाणेच महाराष्ट्रातले कम्युनिस्ट भाषावार राज्यरचनेबाबत विचार करत आहेत आणि नंतर आंध्रमध्ये त्यांनी जी पावले टाकली तशी ती महाराष्ट्रातही पडणार की काय, असे नेहरू, पटेल, राजाजी, मौलाना आझाद यांना वाटले तर त्यात त्यांचा दोष नाही. निदान मराठी काँग्रेसनेत्यांनी तरी याबाबत वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करणे युक्त होते. ते झाले नाही.राजाजी पक्ष सोडून गेले आणि सरदारांचे निधन झाले. यामुळे नेहरूंवरच निर्णय घेण्याची जबाबदारी मुख्यत: आली असली, तरी त्यांच्याप्रमाणेच इतरांचीही मते होती, हे मराठी काँग्रेसनेत्यांनी लक्षात घ्यायला हरकत नव्हती. ती न घेता नेहरूंवर हेत्वारोप करून

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी करावी तशी टीका, काकासाहेब गाडगीळ व शंकरराव देव करत असल्याचे त्यांच्या पत्रव्यवहारावरून व आठवणींच्या संग्रहांवरून स्पष्ट होते.

अशा वातावरणात नेहरू, पटेल व पट्टाभी यांचा अहवाल आला आणि त्याबद्दल मराठी काँग्रेसजनांत नाराजी पसरली.आंध्र राज्य स्थापन करण्यास काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचा नकार नव्हता. त्रिसदस्य समितीनेही मान्यता दिली होती. पण ती देताना आंध्रने मद्रास शहरावरील हक्क सोडला पाहिजे अशी अट होती आणि पट्टाभिसीतारामय्या तिचे सभासद होते तरी ते आपल्या भाषाबांधवांची यास संमती मिळवू शकले नाहीत. वास्तविक तेलगू भाषकांत यापूर्वीच असंतोष पसरला होता आणि म्हणून एक गांधीवादी कार्यकर्ते सीताराम यांनी १६ ऑगस्ट १९५१ पासून आमरण उपोषण सुरू केले. पण आचार्य विनोबा भावे यांनी मध्यस्थी केल्यामुळे त्यांनी ३५ दिवसांनी ते सोडले. कम्युनिस्ट पक्षाने ही संधी अनुकूल असल्याचे मानून आंदोलन तीव्र केले. मग जवाहरलाल, वल्लभभाई आणि पट्टाभी या तिघांच्या समितीच्या अहवालानंतरही आंध्र राज्य स्थापन होत नसल्याचे पाहून पोट्टी श्रीरामलू यांनी १९५२ सालच्या ऑक्टोबरमध्ये आमरण उपोषणास आरंभ केला. उपोषणाच्या ५८ व्या दिवशी म्हणजे १५ डिसेंबर १९५२ रोजी श्रीरामलू यांचा अंत झाला. त्याबरोबर तेलगू भाषक विभागात मोठ्या प्रमाणात हिंसक दंगली झाल्या, सरकारी मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले. त्यानंतर चार दिवसांनी पंतप्रधान नेहरूंनी आंध्र राज्य स्थापन करण्याची घोषणा केली. यामुळे सरकार दंगलीमुळे शरण आले असा समज पसरण्यास मदत झाली.

नंतर नेहरूंनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पत्रास दिलेल्या उत्तरात लिहिले की,श्रीरामलू यांचा उपोषणात अंत झाला व मग दंगली झाल्या म्हणून आंध्र राज्याची स्थापना झाली, हे वस्तुस्थितीचे निदर्शक नाही. कारण आंध्र राज्य स्थापन करण्यास सरकारने पूर्वीच मान्यता दिली होती. अडचण होती ती मद्रास शहराबद्दल. आंध्रने मद्रास शहरावरचा हक्क सोडला तर राज्य स्थापन होईल हे जाहीरच झाले होते. तो हक्क त्याने सोडला म्हणून आंध्र राज्य स्थापन करण्याची घोषणा केली गेली. नेहरूंचे हे म्हणणे खरे असले तरी लोकांचा समज मात्र दंगलीमुळे सरकारने आपला आग्रह सोडला, असाच झाला. यास पट्टाभी व इतर काँग्रेसनेते जबाबदार होते आणि केंद्र सरकारनेही लोकांपुढे आपली बाजू ताबडतोब व विस्ताराने मांडायला हवी होती.यानंतर हैद्राबाद इथे ५३ सालच्या मार्चमध्ये काँग्रेसचे अधिवेशन भरले. आंध्रचा प्रश्न निकालात निघाल्यावर इतर भाषिक प्रांतांची मागणी पुढे येणे अनिवार्य होते. काँग्रेस कार्यकारिणीत या संबंधी बरीच चर्चा झाली, पण पाच वर्षे तरी हा भाषिक राज्याचा प्रश्न आणू नये असा सूर होता. तशी मुदत न घालण्याची गाडगीळांची सूचना स्वीकारली गेली, पण खुल्या अधिवेशनात मौलाना आझाद यांनी पाच वर्षे दरवाजा बंद राहील अशी घोषणा केली तेव्हा दरवाजा बंद असला तरी तो ठोठावला की उघडतो, असे काकासाहेब गाडगीळ म्हणाले.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य हे विदर्भ व मराठवाड्यासह स्थापन करण्याचे उद्दिष्ट होते. यास काँग्रेसश्रेष्ठींची तयारी नव्हती. त्यांनी विविध अडचणी सांगितल्या. यात विदर्भाच्या लोकांची वेगळ्या राज्याची मागणी असून तिचा आधार घेण्यात आला होता. पण काँग्रेसश्रेष्ठींनी ही केवळ सबब सांगितली होती असे म्हणता येत नाही. या संबंधात विविध वैदर्भीय नेत्यांनी वेळोवेळी घेतलेली भूमिका लक्षात घेण्याची गरज आहे. वैदर्भीय नेत्यांपैकी संयुक्त महाराष्ट्रास विरोध करणारे किंवा काही शंका प्रदर्शित करणारे सर्वच नेते मारवाडी व्यापाऱ्यांच्या दडपणाखाली होते अशी पश्चिम महाराष्ट्रातले काही जण



सांताक्रूझ विमानतळावर चीनचे नेते चौ-एन लाय यांचे स्वागत करताना
श्री० छगला यांच्यासमवेत यशवंतराव

मीमांसा करत असत. पण संयुक्त महाराष्ट्रास विरोध न करणारांतही काही ना काही चलबिचल होती, हे नाकारून चालणार नाही.

अगदी मागे जायचे तर १९४८पर्यंत जाता येते. त्या वर्षीच्या जुलैच्या तीस तारखेला माडखोलकर यांनी शंकरराव देव यांना पत्र पाठवले होते ते पाहिले पाहिजे. त्या वेळी भाषावार प्रांतरचनेबाबत धर यांची समिती नेमलेली होती. तेव्हा बिहारचे राज्यपाल माधव श्रीहरी अणे नागपूरला आले असता माडखोलकर व त्यांचे सहकारी पटवर्धन यांनी अणे यांची भेट घेतली. माडखोलकर लिहितात, ''अणे म्हणाले, महाराष्ट्रात गेल्या पाच महिन्यांपूर्वी (गांधींच्या खुनानंतर) जी घटना घडली तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला आहे. गांधीजींच्या मृत्युमुळेच महाराष्ट्रात ह्या गोष्टी घडल्या व त्या क्षणिक स्वरूपाच्या होत्या असे मी मानीत नाही. महाराष्ट्रातील बुद्धिवादी लोकांना नष्ट करण्याचा हा जुनाच प्रकार आहे–नाना पाटलांचे नाव काढले की, माझ्या अंगावर काटा येतो.आपल्याला नाना पाटलांचे राज्य पसंत असेल तर माझे काही म्हणणे नाही. आणि विदर्भ-नागपूर भाग त्यास लागून असल्यामुळे महाविदर्भाचा संबंध महाराष्ट्राशी जोडणे मला इष्ट वाटत नाही. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याच्या मी विरुद्ध नाही; पण तो बनत असताना आज महाराष्ट्रात जी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा उपसर्ग आमच्या भागाकडे पोचू नये अशी माझी इच्छा आहे. यासाठी जो अकोला करार झाला तशी व्यवस्था व्हावयास पाहिजे. साधारणत: पाच वर्षेपर्यंत हा उपप्रांताचा करार ठेवावा व नंतर संयुक्त महाराष्ट्र प्रांत करण्याची मोकळीक

ठेवावी.'' यावर नागपूर-वऱ्हाडकडील काँग्रेसवाल्यांचा संयुक्त महाराष्ट्राला जो पाठिंबा आहे, तो अकोला-कराराच्या भूमिकेवरूनच असल्याचा खुलासा माडखोलकर यांनी केला. शंकरराव देव व श्रीपाद शंकर नवरे हे उपप्रांताच्या मुद्यावर पक्के असल्याचेही माडखोलकर यांनी सांगितले. (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृष्ठे १३-१५) यानंतर नागविदर्भातील संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस नेते व महाराष्ट्र काँग्रेसचे नेते व संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांच्यात एक करार नागपूर इथे २८ सप्टेंबर १९५३ रोजी झाला. 'नागपूर करार' म्हणून तो ओळखला जातो. संयुक्त महाराष्ट्राची जडणघडण होताना या करारातील अटी समाविष्ट केल्या गेल्या.

हे घडत असताना यशवंतरावांनी शंकरराव देव यांना १६ जून १९५३ रोजी लिहिलेले पत्र संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न आणि काँग्रेसजनांची जबाबदारी यांविषयी त्यांनी पहिल्यापासून घेतलेली भूमिका स्पष्ट करणारे आहे. यशवंतराव यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी होणाऱ्या प्रयत्नांत जे सहकार्य हवे ते देण्याचे अभिवचन दिले. पण याच पत्रात त्यांनी लिहिले, 'माझ्या मते हा प्रश्न चुकूनही आंदोलनाच्या स्वरूपात जाऊ देता कामा नये. याची प्राथमिक तयारी म्हणून मराठी भाषिक प्रदेशातील प्रतिनिधींची एक कन्व्हेन्शनवजा सभा घ्यावी व त्यात ठरला जाणारा निर्णय विशाल-महाराष्ट्रनिर्मितीस अनुकूल यावा; या दृष्टीने हैदराबाद, वऱ्हाड, नागपूर, महाराष्ट्र व मुंबई या प्रदेशांतील काँग्रेस संघटनांचे एकमत घडून आणण्याचा प्रयत्न व्हावा ही पहिली आणि महत्त्वाची गोष्ट आहे. आताचे प्रयत्न याच दोन गोष्टींकडे केंद्रित व्हावे असे माझे व्यक्तिशः मत आहे'. (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृ० १६)

यानंतर शंकरराव देव यांनी पंडित नेहरूंना ४ नोव्हेंबर १९५३ रोजी एक प्रदीर्घ पत्र लिहिले. शंकरराव यांनी या पत्रात महाराष्ट्राचीच नव्हे, तर एकंदर भाषावार राज्यरचनेची आवश्यकता प्रतिपादन केली होती. या प्रकारच्या पुनर्रचनेमुळे देशाची एकात्मता, तसेच संरक्षण आणि आर्थिक प्रगती यांना धोका निर्माण होणार नाही असा विश्वास प्रगट केला होता. यातच शंकरराव देव यांनी, हैद्राबाद संस्थानचे भाग शेजारच्या महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र या राज्यांत भाषेनुसार विलीन करण्यास पंडितजी विरोध करतात तो रास्त नाही असे म्हणून न थांबता, काही लोक हा विरोध ही विकृती असल्याचे म्हणतात, असाही शेरा मारला. याची काही गरज नव्हती. हैद्राबाद संस्थान विलीन करण्यास विरोध करण्यात नेहरूंनी केलेला विरोध चुकीचा होता हे खरेच आहे. पण त्या वेळी हैद्राबादचा प्रश्न यूनोत गेला होता. शिवाय विविध धर्मांचे लोक एका राज्यात राहिले तर एक मिश्र संस्कृती निर्माण होईल आणि तशी ती होणे नवभारताच्या दृष्टीने योग्य आहे अशी नेहरूंची समजूत होती. ती अवास्तव म्हणता येईल, पण काही अनामिक लोकांचा हवाला देऊन ही समजूत विकृत म्हणण्याचे शंकररावांना काहीच कारण नव्हते. शिवाय अकाली दलाच्या नेत्यांनी केलेल्या पंजाबी सुभ्याच्या मागणीमुळे नेहरूंना वाटणारी भीती अगदीच निराधार नव्हती. पंजाबी सुभ्याची मागणी केवळ भाषिक नव्हती तर धार्मिकही होती. (हैद्राबाद संस्थानाचे विभाजन करू नये, असा मौलाना आझाद यांचा आग्रह होता.) यानंतर देव यांनी लिहिले की, भाषावार राज्यरचनेच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी जरी उच्चस्तरीय आयोग नेमला, तरी त्याचा अहवाल जवाहरलालजींना हवा तसाच येईल. देव यांनी मग नेहरूंच्या आंध्रच्या दौऱ्यातील भाषणाचा उल्लेख केला. त्यात नेहरूंनी म्हटले होते की, उच्चस्तरीय आयोगाच्या अहवालाचा सरकार विचार करील. यावर देवांचे भाष्य असे की, नेहरूंच्या या वक्तव्यांमुळे लोकांच्या अपेक्षा धुळीला मिळाल्या. आयोगाच्या शिफारशी म्हणजे सरकारचा निर्णय असेल ही लोकांची अपेक्षा आहे. पण नेहरूंच्या या वक्तव्यामुळे

अशा आयोगाच्या नि:पक्षपातीपणास आणि सत्यतेस व स्वातंत्र्यास सुरुंग लावला जाणार आहे, असा अभिप्राय शंकररावांनी दिला.

नेहरूंना पत्र धाडण्याआधी देव यांनी ते दुसऱ्या कोणास दाखवले होते की नाही, हे कळण्यास मार्ग नाही. कसेही असले तरी या पत्राचा सूर बदलणे उचित झाले असते. नेहरू व देव काँग्रेस कार्यकारिणीत बरीच वर्षे एकत्र होते हे खरे असले तरी या प्रकारचे पत्र कोणी लिहिले नसते. स्वामी रामानंद तीर्थ, पट्टाभी इत्यादी काही काँग्रेसजन भाषावार प्रांतरचनेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी या प्रकारे पत्रे लिहिली असतील असे दिसत नाही. हे पत्र स्पष्टवक्तेपणाचे नसून मुत्सद्देगिरीच्या अभावाचे द्योतक होते.

शंकररावांच्या पत्राला नेहरूंनी २६ नोव्हेंबर रोजी उत्तर पाठविले. नेहरूंनी लिहिले की, भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न हाताळताना आपण विकृत वृत्ती प्रदर्शित केली असे तुम्हांला वाटते. कोणीही स्वत:बद्दल निर्णय देऊ शकत नाही. यामुळे विकृतीच्या संबंधात आपण काहीच बोलू शकत नाही. मग नेहरूंनी देशापुढील समस्यांचा ओझरता उल्लेख केला आणि असेही म्हटले की, कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचे या बाबतची माझी कल्पना कदाचित बरोबर नसेल. काही वर्षांपूर्वी या अशा प्रश्नांच्या बाबतीत आपण सरदार पटेल यांच्याशी विचारविनिमय करत होतो असे सांगून, त्यांची भूमिका आपल्यासारखी होती याची आठवण नेहरूंनी करून दिली. नेहरू मग लिहितात की, आपण प्रांतवादाची वारंवार निर्भर्त्सना करतो हे मान्य आहे, पण त्याचा भाषावार राज्यरचनेशी संबंध नाही. आपण बिहारमध्येही प्रांतवादाच्या विरुद्ध बोलतो. आपल्या देशात सांस्कृतिक एकता होती व आहे. पण आजच्या काळात ती पुरेशी नाही. राष्ट्रीय ध्येय व राष्ट्रीय जाणीव निर्माण होण्याची निकड आहे. मुंबईच्या भवितव्याबाबत आपला शब्द अखेरचा ठरेल अशी भीती वाटण्याचे कारण नाही. पण मुंबईबद्दल अनेक लोकांच्या कल्पना वेगळ्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. कोणते मत बरोबर व कोणते चूक हे कोण सांगणार? पण म्हणून दुसरे मत हे विकृत मानण्याचे काहीच कारण नाही. (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृष्ठे २७-४१).

शंकरराव देव यांनी नेहरूंना त्यांनी लिहिलेल्या पत्राची प्रत इतर काही जणांप्रमाणे यशवंतरावांना ५ डिसेंबर ५३ रोजी पाठवली होती. त्यास यशवंतरावांनी १९ डिसेंबरला उत्तर दिले (शंकररावांच्या प्रसिद्ध पत्रव्यवहारात ५५ साल चुकीने दिले असावे.) प्रथम शंकरराव व नेहरू यांच्यात पत्रव्यवहार झाला तसा तो यापूर्वीही झाला असता तर बरे झाले असते असा अभिप्राय देऊन यशवंतराव लिहितात. ''मात्र हा प्रश्न (भाषावार राज्यरचनेचा) लांबणीवर टाकण्याच्या बाबतीत संपूर्ण जबाबदारी पंडितजींवर टाकण्याचा तुमचा आग्रह, आरोपपत्रक तयार करण्याच्या वकिली थाटाचा वाटतो. त्याचप्रमाणे कमिशनच्या निर्णयावर सरकारने व लोकसभेने विचार करून बदल करू नये अशा अर्थाचे तुमचे मत सर्वग्राह्य होईल असे वाटत नाही. या निर्णयाबाबत लोकांना चळवळ करण्याचा अधिकार मागून किंचितशी विसंगतीही दाखविली गेली आहे, असे मला वाटते.''

भाषावार राज्यरचनेचा प्रश्न लांबणीवर टाकणे शक्य नव्हते आणि केवळ सरकारने त्याचा निर्णय करण्याऐवजी सर्वांगीण विचार करून अहवाल देण्यासाठी केंद्र सरकारने फाझल अली यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना केली. हृदयनाथ कुंझरू व सरदार के० एम० पणिक्कर हे दोघे सभासद म्हणून नेमले गेले. आयोगाने अनेक राज्यांना भेटी दिल्या व साक्षी घेतल्या. औपचारिक तशाच अनौपचारिक मुलाखती घेण्यात आल्या. त्यापूर्वी संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याच्या प्रयत्नात असलेले काँग्रेसनेते व त्यांचे पक्षाबाहेरील सहकारी यांनी मराठवाडा व विदर्भातील विविध नेत्यांशी चर्चा केली



निवांतक्षणी सौ० वेणुताई यांच्यासमवेत

होती. विदर्भ वेगळा करावा आणि त्यात मराठवाड्याचा काही भाग समाविष्ट करावा अशी हालचाल काहीजणांनी केली होती. मराठवाड्यातील प्रतिनिधींनी विदर्भास आपला कोणताही भाग जोडता कामा नये, असे एकमुखाने व निर्धारपूर्वक सांगितले. मग विदर्भातल्या नेत्यांचे काही मतभेद होते तेव्हा त्यांच्याशी मोकळेपणाने चर्चा करण्यासाठी शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातून एक शिष्टमंडळ नागपूरला गेले. तिथे झालेल्या चर्चेत असे दिसले की, 'अकोला करार' अव्यवहार्य ठरण्याचा संभव आहे. कारण एका राज्यात दोन विधिमंडळे स्थापन करणे घटनाबाह्य होईल. पण अकोला करार बाजूला ठेवला तरी त्यात विदर्भास दिलेल्या काही सवलती कायम ठेवणे शक्य होते. त्या संबंधात एकमत होऊन २८ सप्टेंबर १९५३ रोजी ज्यास 'नागपूर करार' म्हटले जाते, त्यावर सह्या झाल्या. या वाटाघाटींत मराठवाड्यातर्फे स्वामी रामानंद तीर्थ हजर होते.

महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर या नागपूर कराराला विशेष महत्त्व आले आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांवर आली. या कराराप्रमाणे मुंबई या राजधानीसह एकच महाराष्ट्र राज्य व्हावे; नागपूरला उच्च न्यायालयाचे एक पीठ असावे; न्यायालयावर नेमणूक करताना नागपूर विदर्भातील उमेदवारांची शिफारस व्हावी; दर वर्षी विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला घ्यावे; अशा तरतुदी होत्या. विकासकार्याबाबत राज्याचे तीन

विभाग करून विकासाच्या कामांची वाटणी करावी आणि मराठवाडा अविकसित असल्यामुळे त्याच्या विकासाकडे खास लक्ष द्यावे. अशा तरतुदी असलेल्या करारावर मग सह्या झाल्या. या करारावर सही करणारांत–धनंजयराव गाडगीळ हे एक होते. असे असताना दोन महिन्यांनी नागपूरमध्ये त्यांची दोन भाषणे व एक वार्तापरिषद झाली त्या संबंधात आर० के० पाटील यांनी शंकरराव देव यांना ५ नोव्हेंबर १९५३ रोजी पत्र लिहून कळवले, ''त्यामुळे (धनंजयरावांच्या भाषणांमुळे) सं० महाराष्ट्राच्या विचाराला इकडे पुष्कळच चालना मिळाली. त्यांनी एक विधान केले की, नागपूर कराराला संयुक्त महाराष्ट्राच्या घटनेच्या कायद्यात कायदेशीर स्थान मिळू शकणार नाही. मला त्यांच्या या विधानाबद्दल शंका वाटते. त्यामुळे हे पुण्याचे लोक पुन: बदलणार नाहीत कशावरून, या विचाराला थोडी पुष्टी मिळाली–दुसरी गोष्ट अशी की, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मुंबईवर अवलंबून नाही ही भूमिका बळकट करणे–संयुक्त महाराष्ट्राची कल्पना मुंबईवर अवलंबून नसायला पाहिजे. आम्ही मुंबईकरिता भांडू पण संयुक्त महाराष्ट्र मुंबईवर अवलंबून नसला पाहिजे'' (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृ० ४२.)

राज्यपुनर्रचना आयोग नेमण्याच्या पूर्वीच्या काळात प्रमुख मराठी काँग्रेस नेत्यांतील संबंध कसे होते, यावर काकासाहेब गाडगीळ व देवगिरीकर यांच्या आठवणींच्या पुस्तकांत काही प्रकाश टाकण्यात आलेला दिसेल. काकासाहेब लिहितात, 'भाषाविषयक प्रश्नामुळे मला १९५४मध्ये (वर्किंग कमिटीत) घेतले नाही. तथापि निमंत्रित म्हणून बोलावीत. वर्किंग कमिटीत हिरे होते व नंतर देवकीनंदन व नंतर देवगिरीकर. हिरे स्पष्ट बोलत नसत. किंबहुना जे तेथे घडेल तेही मला सांगत नसत. मी मात्र महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत जे जे होई ते त्यांना व देव यांना सांगे, पण त्या दोघांनी–देवकीनंदन अगर देवगिरीकर यांनी, वर्किंग कमिटीत काय झाले हे पुढे मला कधीच सांगितले नाही. देव तेथे नव्हते, पण ते काय करीत हेही मला त्यांनी सांगितले नाही. मला थोडे वाईट वाटले. पण माझा मार्ग स्पष्ट होता–श्री० हिरे मुख्य-प्रधानपदासाठी उतावीळ होते. देवकीनंदन यांना माझ्या मते संयुक्त महाराष्ट्र नको होता असे वाटते. मुंबई महाराष्ट्रात आली तर तिचे वर्चस्व महाराष्ट्रीय राजकारणात होईल असे मामांना वाटले. ही सर्व मंडळी काँग्रेसश्रेष्ठींशी बोलत व त्यांची भीड त्यांना जड होती'. (*पथिक*, भाग दुसरा, पृष्ठे ४९६) देवगिरीकर यांच्या आणखी वेगळ्या तक्रारी होत्या. संयुक्त महाराष्ट्र परिषदेत राज्यपुनर्रचना समितीला संयुक्त निवेदन सादर करीपर्यंत काँग्रेसने राहावयास हरकत नव्हती–पण काँग्रेसतर्फे स्वतंत्र निवेदन जावयास पाहिजे अशा मताचे देवगिरीकर होते. त्याप्रमाणे निवेदन तयार करण्यासाठी एक समिती नेमली. बापूसाहेब गुप्ते यांनी ते तयार केले व इतर सभासदांच्या सह्या होऊन ते पुनर्रचना समितीला पाठवले गेले–देवगिरीकर सांगतात की, 'आमच्या सहकाऱ्यांना एकच निवेदन जावयास हवे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निवेदनातच काँग्रेसला स्वतंत्र दृष्टिकोण असणार नाही अशी आमच्या सहकाऱ्यांची खात्री होती.

हिरे यांच्याकडे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे नेतृत्व होते. त्यांच्या सल्ल्याने आम्ही सर्व जण चालत होतो; पण त्यांनाहि बाहेरचे सल्लागार होते व ते आम्हांला पसंत पडत नसे.–माझ्याशिवाय इतर अनेक (राज्यपुनर्रचना) समिती सभासदांना भेटत होते–संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे सभासद कमिशनला भेटायला जात; पण मी केव्हांहि त्यांच्याबरोबर नसे. प्रदेश कमिटी अध्यक्षांना कळवून कोणी तिकडे जात नसत व गेले तरी काय मुलाखत झाली हेही कळवण्याची मेहेरबानी करीत नसत. उलट मी जर कमिशनला भेटावयाला गेलो तर तुम्ही कां गेलात, असा देव व काकासाहेबांनी प्रश्न विचारला. प्रदेश काँग्रेस कमिटी ही नावापुरती असावी व मुख्य महत्त्वाचे कार्य संयुक्त महाराष्ट्र परिषदेने करावे अशी काँग्रेसमधील काही

नेत्यांची इच्छा होती व त्याप्रमाणे ते वागत'' (*माझ्या राजकीय आठवणी*, पृष्ठे २०७-८)

राज्यपुनर्रचना आयोगाचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी अधिकृतपणे प्रसिद्ध झाला. आयोगाने मुंबई राज्यात मराठवाडा व सौराष्ट्र यांचा समावेश केला होता. कर्नाटकातल्या चंदगड तालुक्यात मराठी लोक नव्वद टक्के होते यामुळे तो महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची शिफारस होती. बेळगाव-कारवार इत्यादी भाग कर्नाटकास देण्यात आले. मुंबईचे स्वतंत्र राज्य करण्याची शिफारस होती आणि विदर्भ हेही तसेच स्वतंत्र राज्य होणार होते. अणे यांनी आयोगाला दिलेल्या निवेदनात महाराष्ट्रातील वादात आम्हांला ओढू नका; आमचे राज्य स्वयंपूर्ण होऊ शकते अशा प्रकारचा युक्तिवाद केला होता. आयोगाने तो मान्य केला. मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट केल्यावर आपल्याच हिताचा बळी देऊन, मराठी लोक मुंबईतल्या व्यापार-उद्योगातील लोकांना कशासाठी छळतील? हा युक्तिवाद आयोगाला पटला असला तरी मुंबईतील अन्य भाषकांत विश्वास निर्माण होईल असे वातावरण तयार व्हायला हवे, असेही आयोगाने म्हटले होते. मुंबईपासून महाराष्ट्रास वंचित ठेवले व ते करताना अन्य भाषकांच्या मनातील भीती गेली पाहिजे इत्यादी भाष्य करून, मराठी लोकांच्या जखमेवर मीठ चोळले. यामुळे महाराष्ट्रात कमालीचा असंतोष निर्माण झाला.

त्यातच हिरे यांनी जाहीर केले की मुंबई महाराष्ट्राला मिळेल असे फाजल अली यांच्या बोलण्यात आले होते, पण शेवटी अहवालात बाजू बदलली गेली. हिरे यांच्या 'गौप्यस्फोटा'मुळे गोंधळात भर पडली. काकासाहेब गाडगीळ यांनी हिरे यांचे म्हणणे बरोबर होते असे मत दिले आहे. ते म्हणतात की, शंकरराव देव, धनंजयराव व हिरे, आयोगाला भेटले असता मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट असेल असे त्यांना सांगितले गेले होते. पण आयोगाच्या या शिफारशीची बातमी लागताच काँग्रेसचे तेव्हाचे अध्यक्ष ढेबर यांनी वाच्यता न करता वेगाने हालचाली केल्या. गुजरात व मुंबईतून शेकडो तारा गेल्या आणि अनेकांनी दडपणे आणली. म्हणून अहवालातला हा भाग बदलला गेला. यासंबंधी निश्चित पुरावा नाही व मिळणे शक्य नव्हते. आयोगाचे सभासद हे काही कबूल करणे अशक्य होते. म्हणून मग धनंजयराव यांनी शंकररावांना लिहिले, की कोळसा उगाळत बसणे व्यर्थ असून काही बदलही होणार नाही, तेव्हा वाद न वाढवणे योग्य.

राज्यपुनर्रचना आयोगाने निजामाचे स्वतंत्र राज्य बरखास्त करण्याची शिफारस केली. यामुळे हैद्राबाद शहर आंध्रकडे जाण्याचा व त्याच्या राजधानीचा प्रश्न सुटला. तेलगू, कन्नड व मराठी जनतेला निजामाच्या राजवटीतून सुटण्याची उत्कंठा लागून राहिली होती. तीही पुरी होण्याची वेळ आली. नंतर जेव्हा निजामाचे संस्थान बरखास्त होऊन त्याचे तेलगू, मराठी व कन्नडभाषिक भाग त्या त्या राज्यांत विलीन करण्याचा निर्णय झाला तेव्हा संसदेत नेहरूंनी स्वामी रामानंदांचे अभिनंदन करून त्यांना आपला पराभव झाला, तुम्ही जिंकलात असे सांगितले. स्वामीजींनी हे अभिनंदन विनयपूर्वक स्वीकारले.

आयोगाचा अहवाल प्रसिद्ध होण्याच्या काही दिवस अगोदर, विदर्भ स्वतंत्र होणार अशी शिफारस अहवालात असण्याची चाहूल लागली असता, काकासाहेब गाडगीळ यांनी आपली या संबंधी काय प्रतिक्रिया असेल हे शंकरराव देव यांना सांगितले. मुंबई व मराठवाड्यासह महाराष्ट्र व दुसरा विदर्भ असे दोन महाराष्ट्र झाले तर आपण मान्य करू. पण तसे झाले नाही. विदर्भ व मुंबई महाराष्ट्रापासून अलग करण्याची आयोगाची शिफारस होती. तथापि पंडित नेहरूंनी अहवाल हा शेवटचा शब्द नसून त्यात बदल होऊ शकतो असे म्हटल्यामुळे आशेला थोडी जागा निर्माण झाली, पण ती थोडीच. धनंजयराव गाडगीळ

यांनी एक पुस्तिका प्रसिद्ध करून अहवालाची कठोर चिकित्सा केली. अहवालातील अनेक विसंगती दाखवून त्यांनी एकट्या महाराष्ट्रावर अन्याय झाल्याचे दाखवून दिले. आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर १३ व १४ ऑक्टोबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेत एकंदर परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. मुंबईप्रमाणे इतरही काही विभागांबद्दल तक्रारी होत्या. म्हणून नेहरू, पंत, ढेबर व आझाद यांची उपसमिती नेमून वाटाघाटी करण्याचा निर्णय झाला. तसेच काँग्रेसजनांनी आंदोलनाच्या मार्गाने जाऊ नये आणि जे इतर पक्ष वा गट जात असतील त्यांच्याबरोबरही जाऊ नये असा आदेश काढण्यात आला.

महाराष्ट्राबद्दलच्या चर्चेसाठी महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांना दिल्लीला बोलावण्यात आले. दिल्लीला जाण्यास निघण्यापूर्वी शंकरराव देव यांनी मुलाखतीत सांगितले की, आता संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीआड ब्रह्मदेवही येऊ शकणार नाही. मी तो अमृतकलश घेऊन मुंबईस येणार. १७ व १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीस शंकरराव देव, हरिभाऊ पाटसकर, काकासाहेब गाडगीळ, भाऊसाहेब हिरे, देवगिरीकर, यशवंतराव चव्हाण, नानासाहेब कुंटे, डॉ० नरवणे यांना आमंत्रण होते. बैठकीला नेहरू, पंत व मौलाना आझाद हजर होते. नानासाहेब कुंटे यांनी दोन्ही दिवसांच्या बैठकीत काय झाले याची थोडक्यात माहिती दिली आहे. त्यांनी हा वृत्तान्त लिहिताना प्रथम पंडितजींच्या स्वागतशील वृत्तीचे विशेष कौतुक केले आहे. शंकरराव व इतर काहींनी आयोगाचा अहवाल महाराष्ट्रावर कसा अन्याय करणारा आहे हे दाखवून दिले. नव्या राज्यात सौराष्ट्र जोडायचा पण विदर्भ व मुंबई यांना अलग करायचे यामुळे हा अन्याय होतो असा युक्तिवाद करण्यात आला. तथापि देवगिरीकर यांनी असेही नमूद केले आहे की, या बैठकीत शंकरराव नेहरूंना उद्देशून म्हणाले, तुम्ही सूर्य आहां. तुमचा एक किरण आमच्यावर पडू द्या, म्हणजे कशी क्रांती होते ते पाहा. तुम्ही आमच्या बाजूने आलात तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र खास निर्माण होईल. भाषिक राज्यनिर्मितीच्या प्रश्नाबाबत आपली प्रवृत्ती विकृत असल्याचे म्हणणारे शंकरराव, आपल्याला सूर्य ठरवू लागल्याचे पाहून नेहरू आश्चर्यचकित झाले असतील.

कुंटे सांगतात की, नेहरूंनी अहवाल चांगल्यापैकी वाचला होता. म्हणून त्यांनी अहवालाचे पान दाखवून मराठी लोकांबद्दल मुंबईत संशय असल्याचे आपल्याला अनेकांनी सांगितल्याचे नमूद केले आहे, पण आयोगाने ते आपले मत असल्याचे म्हटले नाही असा प्रतिवाद केला. यामुळे नेहरूंनी शंकरराव देव यांची नकळत अडचण केली. परंतु यापेक्षा पंडितजींनी शंकररावांची अधिक अडचण नंतर केली. तुम्ही एका प्रांताचे आहांत या दृष्टीने या प्रश्नाकडे कां बघता? तुम्ही आम्ही खांद्याला खांदा लावून हा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असे नेहरू म्हणाले. दुसऱ्या दिवशी मौलाना आझाद यांच्या निवासस्थानी बैठक झाली. त्यांनी सांगितले की, मुंबई महाराष्ट्रात जाण्यास आपली काही हरकत नाही, पण मुंबईतील व्यापारी व उद्योगपती यांना दहशत वाटते, तिचाही विचार करायला हवा आणि तुमच्याप्रमाणे मुंबईतून जी इतर शिष्टमंडळे आली आहेत, त्यांचेही म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. यानंतर मराठी नेत्यांनी एकत्र विचारविनिमय करून, मुंबईसह एकभाषिक राज्याची आमची मागणी कायम असून तुम्हीच निर्णय करा, असे काँग्रेसश्रेष्ठींना सांगण्याचा निर्णय झाला.

तथापि दुसऱ्या दिवशी सकाळी भाऊसाहेब यांच्याबरोबर नानासाहेब कुंटे, शंकररावांनी बोलावल्यावरून त्यांना भेटायला गेले. तिथे धनंजयरावही होते. मग शंकरराव म्हणाले की, काँग्रेसश्रेष्ठींनी आपली मागणी नाकारली तर दुसरा पर्याय सुचवावा. आयोगाने सुचवलेल्या द्वैभाषिकाच्याऐवजी विदर्भही सामील करून विशाल द्वैभाषिक बनवण्याचा हा पर्याय होता. म्हणजे सर्व

गुजराती व सर्व मराठी भाषी एकत्र येतील. पाच वर्षानंतर काय अनुभव येतो तो पाहावा आणि वाटल्यास गुजरातने अलग होण्याची मागणी करावी. धनंजयरावांनी या पर्यायाचे समर्थन केले. कुंटे सांगतात की, या विशाल द्वैभाषिकाचा पर्याय मूळचा धनंजयराव यांचाच असावा. हिरे यांनी थोडे आढेवेढे घेऊन अखेरीस नवा पर्याय मान्य केला. कुंटे म्हणाले की, आपण काल ठरवले त्यापेक्षा हे वेगळे आहे, पण मुंबई मिळत असेल तर हा पर्याय आपण स्वीकारू. तथापि अगोदरचा निर्णय सर्वांनी घेतला असल्यामुळे नवा निर्णयही सर्वांनी घ्यावा अशी सूचना त्यांनी केली व ती मान्य होऊन दुसऱ्या दिवशी पाटसकर यांच्या निवासस्थानी जमण्याचे ठरले.काकासाहेब गाडगीळ यांनीही मान्यता दिली, असे कुंटे यांनी लिहिले आहे.

पाटसकर यांच्या घरच्या बैठकीत नेहरूंची भेट घेण्याच्या वेळी जे होते त्यांना मग आमंत्रण देण्यात आले. चिंतामणराव देशमुखही पाटसकर यांच्याकडील बैठकीस आले होते. या बैठकीत देशमुखांनी नवा पर्याय योग्य ठरवला.त्यांचे म्हणणे असे की, यामुळे मराठी लोकांचे नव्या राज्यात चांगले बहुमत होईल आणि संमिश्र राज्यामुळे गटबाजी होणार नाही. धनंजयरावांनी यास दुजोरा दिला. यशवंतराव व इतर काहींनी विचारले की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करायची असे ठरले असताना हा बदल कां करावा? एकभाषी राज्याचे तत्त्व सोडून द्वैभाषिक राज्य कां व कसे मागावे? आणि इतक्या घिसाडघाईने निर्णय कां घ्यावा? तथापि शंकरराव आपल्या शिष्टमंडळाचे नेते आहेत तेव्हा त्यांनी सुचवलेला पर्याय मान्य करावा, त्यास विरोध करू नये असे सर्वानुमते ठरले. (*वाटचाल,* पृष्ठे २०९-११) कुंटे यांनी अशी आठवण दिली आहे की, सर्वांत प्रतिकूल प्रतिक्रिया यशवंतरावांनी दिली. तुम्हीच श्रेष्ठींकडे जा, आपण येत नाही असेही ते म्हणाले. तेव्हा त्यांची समजूत घालण्यात आली.

कुंटे यांनी जे लिहिले आहे त्यापेक्षा काकासाहेब गाडगीळ यांनी वेगळी हकिगत सांगितली आहे. त्यांनी आत्मचरित्रात विशाल द्वैभाषिकाची कल्पना आपण पूर्वी सरदार पटेल यांना सांगितली आणि सरदारांनी ती पसंत केली असे लिहिले आहे. आता पुन्हा त्यांनी प्रथम ढेबरभाईंना ती सांगितली व सरदारांचा हवाला दिला. मग काकासाहेबांनी देव, धनंजयराव व हिरे यांना आपली योजना समजावून सांगितली. ती त्या तिघांनी मान्य केली.हे कथन करून गाडगीळांनी काँग्रेसश्रेष्ठींच्या मनोवृत्तीचे आपले विश्लेषण ऐकवले. ते लिहितात, ''मी देव, हिरे व नानासाहेब (धनंजयराव) यांनी काय होईल याची चर्चा केली. मी म्हणालो, आपण मख्ख बसू. ही द्विभाषिक योजना गुजरात नाकारील. मुंबईचा पाटील लाथाडील. नेहरूंचा महाराष्ट्राला भयंकर विरोध आहे. त्यांचे पूर्वग्रह क्वचित नाहीसे होतात. ह्या परिस्थितीत जे नैतिकदृष्ट्या योग्य ते आपण मांडले आहे. त्यांनी नाकारले म्हणजे संयुक्त महाराष्ट्र. माझ्या मते काही संकटातून जावे लागेल व शेवटी काँग्रेसश्रेष्ठी जुळवून देतील'' (*पथिक* भाग २, पृ० ५६३)

हे कथन करण्यापूर्वी काकासाहेबांनी जी प्रस्तावना केली तीत काँग्रेसश्रेष्ठी अट्टल धूर्त, क्लृप्तिबाज असून, सोयीप्रमाणे दृष्टिकोण बदलून राष्ट्रहिताच्या नावावर एखादा मुद्दा मांडीत व आमची गांधीभक्ती व काँग्रेसनिष्ठा यांचा भरपूर फायदा घेत अशी विधाने केली. गांधींइतकी नीतिमत्ता व श्रेष्ठ चारित्र्य एकाचेही नव्हते, राजकारण; त्यांना व्रत उरले नव्हते तर वृत्ती झाली होती. नेहरू इत्यादींबद्दल काकासाहेबांनी हे विचार बोलून दाखवल्यावर देव, हिरे, धनंजयराव यांपैकी कोणी विरोध केल्याचे नमूद नाही. तेव्हा कोणत्या मन:स्थितीत हे दिल्लीत चर्चा करत होते याची कल्पना येते. हे सर्व लिहिण्याचा उद्देश असा की, काही मराठी नेत्यांच्या या मानसिक भूमिकेचा उल्लेख फारसा झाला नाही. पण यावरून मराठी काँग्रेस नेत्यांचे आपापसात कसे संबंध होते आणि त्यांच्या काँग्रेसश्रेष्ठींच्या संबंधीच्या भावना काय होत्या हे



निवासी कर्मचारी सरवरखान यांच्या मुलासमवेत



लहान मुलांशी हितगुज करताना. सोबत सौ० वेणुताई

समजून यावे. काकासाहेबांची ही मते आणि देव यांनी नेहरूंना लिहिलेल्या पत्राची भाषा यांत काही तफावत नाही. नंतर जेव्हा मराठी नेत्यांचे शिष्टमंडळ आझाद, पंत इत्यादींना भेटले तेव्हा मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करता येणार नाही, असा निर्णय त्यांनी ऐकवला. त्यावर आपल्या योजनेचा अधिक विचार व्हावा अशी अपेक्षा मराठी नेत्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीची सभा २१ ऑक्टोबर रोजी पुण्यात झाली. विशाल द्वैभाषिक राज्याचा ठराव काकासाहेब गाडगीळ यांनी मांडला. मुंबईचे वेगळे राज्य केल्यास ती कम्युनिस्ट पक्षाच्या हाती जाईल असा इशारा त्यांनी दिला. ठरावास दुजोरा देणारे भाषण यशवंतराव यांनी केले व ते बरेच गाजले. यशवंतराव म्हणाले की, जरी भारताने परदेशी वसाहतवादास मूठमाती दिली असली, तरी 'स्वदेशी वसाहतवादा'चा पराभव करण्यात भारताला अद्याप यश मिळालेले नाही. आपण एकदा पुढे पाऊल टाकले असून ते मागे घेता येणार नाही. स्वातंत्र्यलढ्यात कारावास भोगलेले आपण आहोत तेव्हा मंत्रिपदाचा मोह आपल्याला नसून स्वातंत्र्यसैनिक केव्हाही राजीनामे देतील. व्यक्तिशः आपण नेत्यांबद्दल आदर बाळगून असून त्यांचे अनुयायी म्हणून वागत आलो आहोत. मात्र आपल्यासारखे स्वातंत्र्यसैनिक स्वातंत्र्यलढ्यात कारावास सोशीत असताना, परकी सरकारशी हातमिळवणी करणाऱ्या रँग्लर परांजपे यांच्यासारख्या पक्षाबाहेरच्या मंडळींनी राजीनामा देण्याबाबत कितीही दडपण आणले, तरी आपण ते जुमानणार नाही अशीही घोषणा यशवंतरावांनी या भाषणात केली. केशवराव जेधे यांना द्वैभाषिकाचा पर्याय मान्य नव्हता पण आपला देव यांच्यावर विश्वास असल्याचा खुलासा त्यांनी केला आणि मतदानाच्या वेळी ते तटस्थ राहिले. प्रदेश काँग्रेसने द्वैभाषिकास मान्यता देणारा ठराव मान्य केला.

संयुक्त महाराष्ट्राचे राज्य झाले तर ते मराठा समाजाच्या नियंत्रणाखाली राहील म्हणून हा द्वैभाषिकाचा पर्याय सुचवण्यात आला काय, असा प्रश्न डॉ० जयंत लेले यांनी विचारला असता, आपल्या मनात असा संशय आला होता, पण तो मनातून लगेच काढून टाकल्याची कबुली यशवंतरावांनी दिली. त्यांनी असेही सांगितले की, मोरारजी देसाई यांपैकी काही लोकांना बोलवत असत आणि तुम्ही संयुक्त महाराष्ट्राच्या या चळवळीत कशासाठी पडता? असे विचारत. उलट सध्याच्या राज्यात तुमच्यापैकी काही सत्तेवर राहतील असा त्यांचा युक्तिवाद होता. अर्थात या भेटी जातीय दृष्टीने विचार करणाऱ्यांबरोबरच होत, असा खुलासा यशवंतरावांनी केला. तसेच सर्वानुमते हा पर्याय काँग्रेस श्रेष्ठीपुढे ठेवण्याचे ठरल्यावर आपणही द्वैभाषिकाच्या ठरावास दुजोरा दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाची बैठक २३ ऑक्टोबर रोजी मुंबईत भरली. जे मराठी नेते दिल्लीत काँग्रेसश्रेष्ठींना भेटले ते परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीस हजर होते. त्या सभेत द्वैभाषिकाचा प्रस्ताव हा वादाचा विषय ठरला. धनंजयराव गाडगीळ यांनी महाराष्ट्राची मागणी इतरांना पटलेली नसल्यामुळे हा द्वैभाषिकाचा पर्याय मांडण्यात आला असा खुलासा केला. (दिल्लीत शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ इत्यादींच्या बैठकीत आपण द्वैभाषिकाचा पर्याय मान्य केला होता, हे मात्र धनंजयरावांनी सांगितले नाही.) पण संयुक्त महाराष्ट्र परिषदेला ही भूमिका घेता येणार नाही असे धनंजयरावांनी बजावले. शंकरराव देव यांची यामुळे पंचाईत झाली. काँग्रेसच्या शिष्टमंडळाचे नेते म्हणून त्यांनी या पर्यायाचा प्रस्ताव मांडला होता, पण संयुक्त महाराष्ट्र परिषद तो स्वीकारणे तत्त्वतः शक्य नव्हते. यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने सुचवलेला पर्याय व परिषदेची भूमिका यांत तफावत असून, परिषदेने आपल्या तात्त्विक भूमिकेचा त्याग करू नये असा अभिप्राय दिला. परिषदेच्या

कार्यकारिणीचा ठराव तिच्या मूळ मागणीशी सुसंगत होता. या द्वैभाषिकाच्या पर्यायाचे अगोदर स्वागत आचार्य अत्रे यांनी केले होते आणि विनोबांशी बोलतानाही ते तसेच केले, पण नंतर त्यांची भूमिका बदलली. हे सर्व य० दि० फडके यांनी *विसाव्या शतकातील महाराष्ट्र* या ग्रंथाच्या सातव्या खंडात, पुराव्यानिशी दाखवून दिले आहे.

तथापि काँग्रेसश्रेष्ठी, मुंबई वेगळी ठेवून त्रिराज्याची योजना जाहीर करण्याची चिन्हे दिसू लागल्यावर प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, शे० का० पक्ष इत्यादींच्या नेत्यांनी ५ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत १२० कामगार संघटनांतर्फे संयुक्त महाराष्ट्र परिषद घेतली आणि पुढाऱ्यांना अटक केली तर कामगारांनी उत्स्फूर्त निदर्शने करावी असे एस० एम० जोशी यांनी आवाहन केले. मग एक कृती-समिती स्थापन झाली आणि त्रिराज्य योजना जाहीर झाल्यावर तिला विरोध करण्याचा प्रस्ताव संमत करण्यात आला. यानंतरच्या सर्व घटना विस्ताराने इथे द्यायच्या नसून काही ठळक घटनाच नमूद करायच्या आहेत. त्रिराज्य योजना ८ नोव्हेंबरला जाहीर झाल्यावर विधानसभेत १८ नोव्हेंबरला त्रिराज्य योजनेला संमती देणारा ठराव सरकार आणील तेव्हा विरोधी मोर्चा काढण्याचेही मान्य झाले. हा मोर्चा अडवून सरकारने अनेक नेत्यांना कारागृहात ठेवले व दुसऱ्या दिवशी त्यांची सुटका झाली. एस० एम० व इतर विरोधी सदस्यांनी या योजनेची चिरफाड करणारी भाषणे केली. २१ तारखेला एक दिवसाचा संप करून विधानसभेवर मोर्चा नेण्याचा कार्यक्रम जाहीर झाला होता. त्या आधी एक दिवस अगोदर मुख्यमंत्री मोरारजी देसाई व स० का० पाटील यांनी लोक बिथरतील अशी भाषणे केल्यामुळे, विधानसभेवरील मोर्चा अनर्थकारक होईल अशी एस० एम० यांना धास्ती वाटली. मोर्चा विधानसभेवर येत असल्याचे कळताच त्यांनी नौशेर भरुचा आणि अमूल देसाई यांना बरोबर घेऊन तो चौपाटीकडे वळवला. तिथे त्यांनी व डांगे यांनी ठरवले, की संप बेमुदत झाला तर मराठी व गुजराती असा संघर्ष होईल व ते बरोबर नाही. म्हणून या दोघांनी दुसऱ्या दिवशी कामाला जाण्याचे आवाहन केले. यामुळे अनर्थ टळला. कुंटे यांनी लिहिले आहे की, जे एस० एम०, भरुचा व अमूल देसाई यांनी केले ते शंकरराव देव, हिरे, देवगिरीकर यांनी करायला हवे होते. कुंटे यांनी याबद्दल शंकररावांना विचारले तेव्हा आपण आदल्या दिवसापासून उपोषण सुरू केल्याचे कारण त्यांनी दिले. पण मोर्चाच्या ठिकाणी न जाण्याइतके तुम्ही अशक्त झाला नव्हता, असे उत्तर कुंटे यांनी दिले. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे देव यांचे नेतृत्व तेव्हाच संपुष्टात आले. मग संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन होऊन तिच्याकडेच नेतृत्व गेले.

या त्रिराज्य योजनेच्या निषेधार्थ काँग्रेसचे मंत्री राजीनामे देतील, मुख्यत: हिरे देतील असे शंकररावांनी एस० एम० यांना सांगितले होते. पण राजीनाम्यासारखी कोणी कृती करायची नाही व विरोधी पक्षांबरोबर जाऊन काही करायचे नाही असा आदेश काँग्रेसश्रेष्ठींनी दिल्यावर विधानसभेतील या योजनेवरील चर्चा तहकूब करण्याची सूचना हिरे यांनी मांडली आणि राजीनामे विधानसभा अध्यक्षांकडे न देता, प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांकडे देण्याचे नंतर ठरले. म्हणजे हे पाऊलही चुकीचे पडले. चर्चा तहकुबीला काँग्रेसश्रेष्ठींनी अनुमती दिल्यामुळे आता राजीनाम्याची आवश्यकता नसल्याचे मत यशवंतरावांनी दिले. मंत्र्यांनी राजीनामे देण्याचा निर्णय झाल्याचे देवगिरीकर यांनी चिंतामणराव देशमुख यांना घाईने कळवले म्हणून त्यांनी केंद्रीय अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला. तो बराच गाजला. तो देताना केलेल्या भाषणात त्यांनी नेहरूंवर बरीच कडक टीका केली आणि महाराष्ट्राबद्दल आकस असल्याचा आरोप केला. पण महाराष्ट्रातल्या मंत्र्यांचे राजीनामे आले नाहीत आणि आपली फसगत झाली म्हणून देशमुख उद्विग्न झाले.

त्रिराज्य योजनेला मंजुरी देणाऱ्या ठरावावरील विधानसभेतील चर्चा, तहकूब करण्याची सूचना काँग्रेसश्रेष्ठींनी मान्य केल्यावर राजीनामे देण्याची गरज नाही, अशी भूमिका यशवंतरावांनी घेतल्यामुळे शंकरराव देव संतापले. मग हिरे, कुंटे, देवगिरीकर शंकररावांना भेटायला गेले असता, देव हिऱ्यांना म्हणाले, यशवंतरावांना काढून टाका. हे देवगिरीकरांनी यशवंतरावांना सांगितले. त्यावर यशवंतरावांनी शंकरराव देव यांना २३ नोव्हेंबर १९५५ रोजी लिहिले, ''आपल्या इच्छेवरून भेटण्यास येणार होतो. दरमान्य माझी व श्री० मामा देवगिरीकर ह्यांची भेट झाली व त्यांच्याकडून व इतर स्नेह्यांशी जी चर्चा झाली तिचा सारांश समजला. विशेषत: माझ्यासंबंधी झालेल्या चर्चेनंतर तुमच्या उपोषणाच्या काळात मी आपल्याशी चर्चा करून आपणांस मनस्ताप देणे योग्य नाही असे मला वाटते. माझ्या स्वाभिमानाच्या दृष्टीनेही मी अधिक चर्चा करणे युक्त नाही असे मला वाटत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी स्वीकारायच्या मार्गासंबंधात तुमच्या व माझ्यामध्ये स्वच्छ फरक आहे. हे परवा पुन्हा एकदा स्पष्ट झाले व पुन्हा पुन्हा त्याच त्याच गोष्टींची उजळणी करून आपणास त्रास द्यावा अशी माझी इच्छा नाही. काँग्रेसनिष्ठेतूनच अंती संयुक्त महाराष्ट्र निर्माण होईल असा माझा विश्वास आहे व याच मार्गाची चोखाळणी, शक्य त्या आत्मक्लेशांतून करण्याची मनाची तयारी केली आहे.'' (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृष्ठे १०९, ११०) हा मार्ग थोड्याच दिवसांत जाहीररीत्याच वेगळा झाला. यशवंतरावांनी आपल्या स्वाभिमानाच्या दृष्टीने शंकररावांना भेटणे युक्त वाटत नसल्याचा उल्लेख केला आहे. तो कां? याबद्दल य० दि० फडके यांनी चौकशी केल्यावर शंकररावांनी यशवंतरावांसंबंधी अशिष्ट भाषा वापरल्याचे कळून आले. तिचा इथे पुनरुच्चार करण्याचे कारण नाही. यानंतर शंकररावांनी यशवंतरावांची माफी मागितली, पण तीत अर्थ नव्हता.

त्रिराज्य योजना जनतेने उग्र निदर्शने करून धुडकावून लावली होती. पोलिसांनी अनेक कठोर उपाय योजले. अनेकदा गोळीबार झाला आणि अनेकांचा बळी जात होता. कित्येक तुरुंगात गेले. मोरारजीभाईंनी काहीही समजुतीने न घेण्याचा पणच केल्याचे दिसले. पुढे दादर इथे लोकांची निदर्शने चालू असता एका पोलिसाचा जीव धोक्यात येत असल्याचे कळताच, त्याला संरक्षण देण्यास पुन्हा एस० एम०च आले. त्यांच्या या कृत्यामुळे संघर्षाला हिंसक वळण लागू नये यासाठी ते किती शिकस्त करत होते हे दिसून आले. पण याची जाणीव न ठेवता, सरकार मात्र दडपशाही कमी करत नव्हते. राज्यात अनेक ठिकाणी लोक निदर्शने करत होते, पण आंदोलनाचे मुख्य केंद्र मुंबई हेच होते.

मुंबईत झालेल्या हिंसक प्रकाराविरुद्ध आणि महाराष्ट्रावर अन्याय झाल्याबद्दल शंकरराव देव यांनी उपोषण आरंभले तेव्हा मुंबईत पोलिसांच्या गोळीबारात अनेकांचा बळी जात असताना यांनी उपोषण कां केले नाही आणि आताच ते कां करत आहेत, असा उघड प्रश्न लोक विचारत होते. या दीर्घ उपोषणाच्या संबंधात शंकररावांच्या जवळ असलेल्या काहींची प्रतिक्रिया लक्षात घेण्यासारखी आहे. आचार्य जावडेकर यांनी लिहिले, ''आत्मशुद्धी आणि सार्वजनिक जीवनशुद्धी या उद्देशाने शक्तीनुसार उपोषण करणे ही गोष्ट वेगळी आणि महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे, त्याचे निराकरण केल्यावाचून मी जगूच शकत नाही, म्हणून प्राणांतिक उपोषण करणे ही गोष्ट अगदी निराळी. दुसऱ्या प्रकारचा अधिकार आपणास मिळविता येईल असे वाटत नाही. भाषिक राज्य आणि त्यासंबंधीचा स्वयंनिर्णयाचा हक्क यांचा लढा चालविण्यासाठी महाराष्ट्राने कोणत्या गोष्टी केल्या? त्यांपैकी कोणत्या गोष्टी घडवून आणल्या, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे दिल्यावाचून आपल्या अधिकाराचा हा प्रश्न सुटणार नाही–सर्व देशावरील

दु:खाबद्दल एकट्यानेच शोक करणे योग्य नाही, असे एक सूत्र महाभारतातून गीतारहस्यात घेतलेले आहे; त्याचा या ठिकाणी पण विचार करावा''.

प्रसिद्ध गांधीवादी अप्पा पटवर्धन यांनी लिहिले की, अमर्याद उपास असमर्थनीय आहे–उपासाचा अवलंब करून तुम्ही प्रतिपक्षावर लोभ-मदाचा आरोप करता तो करण्याचा तुम्हांला अधिकार काय?–हे आमदार,खासदार आपले राजीनामे देऊन स्वार्थत्यागी आणि पंत, ढेबर, जवाहरलाल मात्र अधिकारलोलुप म्हणून अधिकाराला चिकटून राहतात, असा (अर्थ) होत नाही काय?–आठवडाभर उपास बेतशीर. अधिक करायचा तर लिंबू-मधाला सवड ठेवावी' (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, पृष्ठे ९१ व १५३.)

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबाबत काँग्रेसश्रेष्ठी व इतरांचे मन वळवण्यास अपयश आल्याचा अभिप्राय, धनंजयराव गाडगीळ यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या बैठकीत दिला होता. तसेच आपण मुंबईतील व्यापार व उद्योग क्षेत्रातील लोकांना वळवू शकलो नाही असे त्यांच्या व इतरांच्या निदर्शनास आले होते. मुंबईतील गुजराती, मारवाडी, पार्शी इत्यादी व्यापार व कारखानदारीच्या क्षेत्रांतल्या प्रमुखांनी मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास विरोध केला होता हे खरे आहे. तसेच सी० एन० वकील, दातवाला अशा अर्थशास्त्रज्ञांनीही जाहीरपणे विरोध दर्शवून तसे लिखाण प्रसिद्ध केले होते.संयुक्त महाराष्ट्रासाठी हालचाली करण्यास प्रारंभ झाला तो १९४६मध्ये. त्यानंतर राज्यपुनर्रचना आयोगाचा अहवाल येण्यास काही वर्षे गेली, त्या काळात मुंबईतील या प्रमुख पुढाऱ्यांशी संबंध प्रस्थापित करून, त्यांचे मत वळवण्यास बराच अवसर होता. पण कोणी लक्ष दिले नाही. या उलट अनेक काँग्रेस पुढाऱ्यांनी व इतरांनी वारंवार व्यापार व उद्योग क्षेत्रांतील लोकांविरुद्ध वक्तव्ये केली. अगदी संसदेतही केली. बहुतेक मराठी नेत्यांचा असा दृढ समज होता की, महाराष्ट्र राज्य स्थापन झाले, की तो समाजवादाच्या दिशेने वेगाने पावले टाकील आणि भारतात त्याचे अनुकरण होईल. समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र असे न मानता, समाजवादी महाराष्ट्रामुळे समाजवादी भारत असे समीकरण बांधले जात होते. शे० का० पक्षाची ही भूमिका होती. महाराष्ट्रात समाजवाद स्थापन करण्यासाठी चीनच्या धर्तीवर क्रांती करण्याची स्वप्ने तो पक्ष रंगवत होता. काकासाहेब गाडगीळ यांनी अनेकदा व्यापारी व कारखानदार यांचा बंदोबस्त करण्याची भाषा केली होती. लोकसभेत भाषण करताना त्यांनी या प्रकारचे विचार मांडल्यावर एन० सी० चतर्जी यांनी विचारले, मुंबईतल्या गुजराती समाजाला उद्देशून हे आहे काय? गाडगीळांनी उत्तर दिले, एकट्या महाराष्ट्राचा हा प्रश्न नाही; बंगालमध्येही ही विषवल्ली आहे. म्हणून सरकारने व्यापार, सर्व बँका आपल्या ताब्यात घेतल्या पाहिजेत. जी० डी० सोमाणी या मुंबईच्या उद्योगपतींनी शंकरराव देवांच्या प्रश्नास उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात, काकासाहेब गाडगीळ यांच्या हैद्राबादमधील भाषणाचा उल्लेख केला : काकासाहेबांनी व्यापारी समाज हा देशाचा नंबर एकचा शत्रू आहे असे म्हटले होते. सोमाणींनी लिहिले की, 'या अशा वक्तव्यांमुळे व्यापारी समाजात जर संशयाचे वातावरण असले तर ते स्वाभाविक आहे.धनंजयराव गाडगीळ यांनीही लिहिले होते की, मुंबईत व्यापार व उद्योग केंद्रित झाले आहेत, पण महाराष्ट्राचे सरकार झाले की, व्यापार व कारखाने कोणत्या भागांत किती ठेवायचे हे ठरविले जाईल आणि त्यांची फेरवाटणी केली जाईल.' वस्तुत: भारत सरकारचे औद्योगिक धोरण जाहीर झाले होते. राज्यघटना अमलात येऊन केंद्र व राज्य यांचे अधिकारक्षेत्र ठरवून दिले होते. तेव्हा महाराष्ट्र राज्य किती स्वातंत्र्य घेऊ शकणार होते? तसेच महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर समाजवाद कितपत आला? तेव्हा

या प्रकारच्या हवेतल्या गोष्टी करण्याने काही साधले नाहीच, शिवाय विरोधी प्रचाराला मात्र वाव दिला गेला.

मुंबईतील भांडवलदारांच्या दडपणामुळे काँग्रेसश्रेष्ठी मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करू इच्छित नाहीत हा प्रचार केवळ विरोधी पक्षांनी चालवला होता असे नव्हे. अनेक काँग्रेस नेते असेच मानत व म्हणत होते. काँग्रेसश्रेष्ठी म्हणजे नेहरू, गोविंदवल्लभ पंत, आझाद, आणि काँग्रेसचे अध्यक्ष ढेबर. यांपैकी ढेबर हे गुजराती म्हणून त्यांचे हितसंबंध उघड होते. पण मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करण्याची तयारी नाही म्हणून नेहरू, पंत व आझाद यांच्यावर भांडवलदारांचे दडपण होते असे मानायचे, तर महात्मा गांधींच्या बाबतीत काय म्हणायचे? माडखोलकरांनी शंकररावांना १९५६मध्ये लिहिलेल्या पत्रात त्यांच्या महात्माजींशी ४२सालच्या एप्रिल-मेमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती दिली होती. महाराष्ट्र राज्यात मुंबई समाविष्ट करण्याबाबत प्रश्न विचारला असता गांधीजींनी कळवले की, '१९२० साली काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेचा ठराव केला आणि उपसमितीने काँग्रेस संघटनेची भाषावार रचना करण्याची सूचना केली होती. त्याप्रमाणे मुंबई राज्यात चार प्रदेश काँग्रेस समित्या स्थापन करण्यात आल्या. या उपसमितीचे अध्यक्ष होते तात्यासाहेब केळकर. महाराष्ट्राच्या नेत्यांशी चर्चा करूनच या प्रदेश समित्या नेमल्या गेल्या होत्या. तेव्हा यात काँग्रेसचा दोष नाही.' नंतर गांधींचे निधन होण्यापूर्वी प्रेमा कंटक यांनी गांधींची भेट घेतली असता, महाराष्ट्रात मुंबई सामील करण्याबाबत बोलताना गांधींनी बरोबर याचीच पुनरावृत्ती केली. तेव्हा भांडवलदारांचे काँग्रेसश्रेष्ठींवर दडपण आल्याची टीका निदान काँग्रेसजनांनी करण्यात अर्थ नव्हता. समाजवादी, कम्युनिस्ट, शे० का० इत्यादी पक्षांनी तशी टीका केली तर ती समजण्यासारखी होती. आणखी एक प्रश्न असा निर्माण होतो की, काँग्रेसचे मुख्य पुढारी भांडवलदारांच्या दडपणाखाली आल्याचे मराठी काँग्रेसनेत्यांना केव्हा समजले? पूर्वीपासून समजले असेल तर ते अशा पक्षात राहिले कशासाठी? इतर पक्षांची दारे त्यांना बंद नव्हती.

मुंबईचे स्वतंत्र राज्य करण्याची योजना डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांना मान्य होती. याची कारणे मात्र वेगळी होती. मुंबईत गुजराती इत्यादींनी भांडवल गुंतवले म्हणून ती वेगळी करण्यासंबंधीचा युक्तिवाद बाबासाहेबांनी खोडून काढला. तसेच मुंबईत मराठी लोकांची पूर्ण बहुसंख्या नाही, या विधानाचाही त्यांनी समाचार घेतला. त्यांनी लिहिले की, मुंबईत मराठी लोकांची वस्ती पन्नास टक्क्यांहून कमी आहे पण भौगोलिकदृष्ट्या ती महाराष्ट्राची आहे हे उघड असून, मोरारजींनीही ते मान्य केले होते. दुसरा प्रश्न भांडवल कोणी गुंतवले, हा. ते मराठी लोकांनी गुंतवले नाही, हे खरे. पण कलकत्त्यात गुंतवलेले भांडवल बंगाल्यांचे नाही आणि मद्रासमध्ये ते तामिळी लोकांचे नाही. त्यामुळे मुंबईचा अपवाद करता येणार नाही. इतके सांगून बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतून गुजराती व इतर लोकांनी भांडवल काढून घेतले वा नंतर अधिक गुंतवले नाही, तर काय होईल, याचा विचार करण्याची सूचना केली आहे. ते म्हणतात की, मराठी लोक व्यापार-उद्योगात नाहीत. ते कारकुनीपेशाचे आहेत किंवा मजूर आहेत. उद्या मुंबईतील व्यापार-उद्योग कमी झाला तर आपली काय अवस्था होईल, याचा विचार मराठी लोकांनी केला पाहिजे. यानंतर बाबासाहेबांनी चार राज्यांची योजना मांडली. मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र व पूर्व महाराष्ट्र अशी चार राज्ये केल्यास बाबासाहेबांच्या मते दलित वर्गासच नव्हे तर ब्राह्मण, गुजराती व मारवाडी यांनाही संरक्षण मिळेल. गांधींच्या खुनानंतर या तीन जमातींचे अनेक लोक महाराष्ट्राचा ग्रामीण भाग सोडून शहरात आले याचा दाखला बाबासाहेबांनी दिला. त्यांना सर्व महाराष्ट्राचे एक राज्य करणे

युक्त वाटत नव्हते. एवढे मोठे राज्य चालवणे कठीण जाईल असे त्यांचे म्हणणे. या अशा विभाजनामुळे मराठी भाषेवर अन्याय होईल असेही नाही. तीन राज्यांत मराठी भाषाच प्रमुख राहील. ज्यास आपण मध्य महाराष्ट्र (मराठवाडा) म्हणतो तो निजामाने दुर्लक्षित ठेवला. दुसरे दोन महाराष्ट्रीय विभाग त्याला न्याय देतील याची खात्री काय? असा बाबासाहेबांचा सवाल होता. मराठा समाजास राजकीय शिक्षणाची गरज असल्याचे मतही डॉ० आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे.

विदर्भाच्या नेत्यांनाही मुंबईसह महाराष्ट्र मिळवण्याच्या मागणीची तितकी आच नव्हती. अशा रीतीने महाराष्ट्र राज्य झाले तर ठीक, पण होत नसेल तर मुंबईसाठी अडून न बसता महाराष्ट्र राज्य स्थापन करावे आणि हे पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांना नको असेल तर विदर्भाचे स्वतंत्र राज्य स्थापन करावे ही त्यांची भूमिका प्रथमपासून होती व तीतही बदल झाला नाही. अणे यांनी विदर्भ वगळून महाराष्ट्र व गुजरात यांचे द्वैभाषिक राज्य करावे अशी सूचना केली होती, तर गोपाळराव खेडकर यांनी मुंबई मिळत नसल्यास तिचा मोह सोडून पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे मराठी भाषिक राज्य स्वीकारावे असे सुचवले होते. विदर्भासह महाराष्ट्र स्थापन करण्याचा सुयोग आला असता शंकरराव देव यांच्या आग्रही व अव्यवहार्य धोरणामुळे हा योग गमावला जाणार आणि विदर्भ महाराष्ट्रापासून कायमचा दुरावणार अशी विदर्भातल्या लोकांची भावना असल्याचे माडखोलकर यांनी देवांना कळवले होते; तर आणखी एका पत्रात मुंबईसह महाराष्ट्र होत नसेल तर मुंबईचा नाद आता सोडावा; नाही तर विदर्भ वेगळा होऊ द्यावा अशीही भावना नागपूर- विदर्भात असल्याची माहिती माडखोलकर यांनी दिली होती.

नानासाहेब कुंटे यांनी त्यांच्या आत्मचरित्रात असा एक मुद्दा मांडला आहे की, आपण राज्यघटना स्वीकारली व तिने संसदीय राज्यपद्धती अमलात आणली. या स्थितीत राज्यपुनर्रचना इत्यादी प्रश्न संसदेच्या पातळीवर हाताळले जाणे अनिवार्य होते. पण मराठी नेत्यांनी संसदेच्या सभासदांपुढे आपली मागणी कशी न्याय्य आहे हे पटवण्याचे पद्धतशीर प्रयत्न कधी केले नाहीत. नुसता महाराष्ट्रात प्रचार करून उपयोग नव्हता. मराठी लोकांना महाराष्ट्र राज्य हवे हे पटलेलेच होते. प्रश्न होता, इतर राज्यांतल्या खासदारांचा. तो हाताळण्यास काहीच स्थान नव्हते. याचा उपयोग होवो वा न होवो, पण हा मार्ग चोखाळण्याची आवश्यकता होती हे निर्विवाद. काकासाहेब गाडगीळ यांनी हाच मुद्दा, औरंगाबादमध्ये भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनातील अनंत काणेकर यांच्या भाषणापासून अनेकांनी केलेल्या भाषणांच्या संदर्भात लिहिताना मांडला आहे. काकासाहेब लिहितात, 'एक गोष्ट निर्विवाद होती, ती ही की, पश्चिम महाराष्ट्राला महाराष्ट्र हवा होता. मुंबईत कॉंग्रेसचे बहुमत होते. पण वऱ्हाडात व नागपूरभागात वस्तुस्थिती निराळी होती–एक गोष्ट स्पष्ट होती की, वऱ्हाड, नागपूर महाराष्ट्रात येण्यास उत्सुक नव्हते–लोकसभा व राज्यसभा म्हणजे संसदेने हा कायदा पास करून द्विभाषिक अमलात आले आहे. तो बदलून नवा कायदा पास करून ते नष्ट करावयाचे आहे. मुर्दाबाद म्हणून ते मरणार नाही. ५०० सभासद लोकसभेचे आहेत. त्यातील २५१ जणांची मने वळवून हे कार्य करावयाचे आहे. विरोधी पक्ष १५० पेक्षा कमी आहे. शिवाय यांतील सर्व संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल नाहीत–आपण संयम व मर्यादा सांभाळून कार्यभाग साधावयाचा आहे. (*पथिक*, खंड ३ पृष्ठे ११ व १५)

संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या मागणीचा असा घोळ चालू राहण्याची जबाबदारी कॉंग्रेसश्रेष्ठींची होती, पण महाराष्ट्र कॉंग्रेसच्या नेत्यांतही एकमत नव्हते. त्यातच शंकरराव देव व हिरे यांचे धोरण धरसोडीचे होते. दोघेही वैचारिकरीत्या गोंधळलेले होते हे नाकबूल करून चालणार नाही. या वातावरणात यशवंतरावांनी

वेगळा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला. शंकरराव देव यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याबाबतचे आपले दोघांचे दृष्टिकोन भिन्न आहेत असे लिहिले होते. तेव्हा उपायही भिन्न होणे क्रमप्राप्त होते. तसे त्यांनी २ डिसेंबर १९५५ रोजी फलटण इथे मनमोहन राजवाड्यात केलेल्या भाषणात जाहीर केले.

यशवंतराव म्हणाले, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी पदरात पाडून घेण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे सर्वाधिकारी श्री० शंकरराव देव यांचे नेतृत्व मान्य करण्यास आपण तयार नाही. शंकरराव यांनी पाच वर्षापूर्वीच काँग्रेसचे सभासदत्व सोडले होते. तेव्हा त्यांनी काँग्रेसचे प्रतिनिधित्व करू नये असे यशवंतरावांचे मत होते. तेच या भाषणात प्रगट झाले. म्हणून संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याचे महाराष्ट्र काँग्रेस व शंकरराव यांचे मार्ग भिन्न आहेत असा अभिप्राय त्यांनी दिला. देव यांच्या नेतृत्वासंबंधी यशवंतराव यांनी सांगितले की, मनात एक ठेवायचे व लोकांना दुसरेच सांगायचे हे आता बंद करण्याची वेळ आली आहे. राजीनामे, उपास, निदर्शने, संप हे संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याचे मार्ग नाहीत. उलट यामुळे मुंबईत नुकतीच जी निदर्शने झाली त्यामुळे मुंबई व महाराष्ट्र यांतील अंतर वाढले आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या वतीने शंकरराव देवांनी उपासाची भाषा बंद करावी नाहीतर काँग्रेसच्या वतीने न बोलता बाजूस राहावे. देव व काँग्रेस यांच्यात आपण काँग्रेसचे नेतृत्व मान्य करतो, असा खुलासा यशवंतरावांनी केला. महाराष्ट्राला मुंबई काँग्रेसश्रेष्ठींकडूनच मिळवायची आहे. यामुळे वरिष्ठांशी वाटाघाटी करून तडजोडीचा मार्ग काढला पाहिजे. तोच मार्ग श्रेयस्कर आहे. याच भाषणात यशवंतरावांनी स्पष्ट केले की, संयुक्त महाराष्ट्र व पंडित नेहरूंचे नेतृत्व असा प्रश्न आल्यास नेहरूंच्या नेतृत्वावर आपली पूर्वीप्रमाणेच श्रद्धा राहील.नंतर वृत्तपत्रांत यशवंतरावांच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या व अधिक खुलासे झाले. यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी करताना द्वैभाषिकाचा पर्याय देवांनी आयत्या वेळी आणला आणि दुही पडल्याचे दिसू नये म्हणून आपण त्यास मान्यता दिली, आणि ती देताना हा देवांचा पर्याय असल्याचेही स्पष्ट केले, असे सांगितले.

राजीनामे देण्याच्या प्रश्नावरून मतभेद झाले काय? या प्रश्नाचे उत्तरही यशवंतरावांनी दिले. ते म्हणाले की, २१ नोव्हेंबरच्या खाजगी बैठकीत शंकरराव यांनी राजीनाम्यास अनुकूलता दाखवल्यामुळे आपण चकित झालो. १७ नोव्हेंबरला झालेल्या ठरावाने नेहरूंशी वाटाघाटी कराव्या असे नमूद होते. यामुळे ही भूमिका नुसती चुकीचीच नव्हे तर नैतिकदृष्ट्या चुकीची होती. जे राजीनामा देतील ते आपले प्रतिनिधी असे देव यांनी आपल्याला सांगितले तेव्हा आपण यास नकार दिला, असे यशवंतराव म्हणाले. देव व आपण यांचा काँग्रेस संघटनेबद्दल मतभेद असल्याची माहिती यशवंतराव यांनी दिली. ते म्हणाले की, काँग्रेसनिष्ठा याचा अर्थ काँग्रेसच्या तत्त्वांशी निष्ठा असा देव यांनी अर्थ लावला आहे. यामुळे काँग्रेस संघटनेविषयीच्या निष्ठेला ते कमी लेखतात असे झाले. आम्हांला नुसती काँग्रेसशी निष्ठाच नव्हे, तर काँग्रेस संघटनाही सांभाळायची आहे. कालांतराने महाराष्ट्र काँग्रेस अखिल भारतीय काँग्रेसमधून बाहेर पडणे अपरिहार्य होईल अशी कोणतीही पावले पडता कामा नयेत. स्वराज्यप्राप्तीनंतर कोणत्याही कारणास्तव उपोषणाचा मार्ग अवलंबिण्यास आपला विरोध असल्याचाही खुलासा यशवंतरावांनी केला.

फलटणच्या भाषणानंतर सर्व बाजूंनी टीकेचा वर्षाव होत होता आणि महाराष्ट्रद्रोहापासून अनेक आरोप केले गेले.यशवंतरावांनी हा मुद्दा अधिक विस्ताराने त्या भाषणातच मांडला असता तर बरे झाले असते. त्यांना भाषिक राज्य हवे होते आणि मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क आहे असेच ते मानत होते. पण हे उद्दिष्ट



सौ० वेणुताई यांच्यासमवेत श्रीमती मंगला



नातेवाइकांसमवेत सौ० वेणुताई व श्रीमती वासंती शेवाळे

साध्य कसे करायचे हा त्यांच्या दृष्टीने विवाद्य मुद्दा होता. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट काँग्रेससंघटनेत राहून व काँग्रेसश्रेष्ठींशी वाटाघाटी करूनच साध्य करायचे; ही संघटना दुर्बळ करून नव्हे याबद्दल ते ठाम होते. कारण देशव्यापी असा पक्ष केवळ काँग्रेस हाच होता आणि त्या पक्षाचे एकमेव नेते पंडित जवाहरलाल नेहरू होते, हेही निर्विवाद होते. या नेतृत्वामुळे काँग्रेस टिकेल आणि ती टिकेल तर नव्याने स्वतंत्र झालेला आपला देश टिकेल; म्हणून नेहरूंच्या नेतृत्वास यशवंतरावांनी इतके प्राधान्य दिले. महाराष्ट्राचा विचार हा सबंध देशाच्या संदर्भात करण्याची ही दृष्टी होती. आजही यशवंतरावांच्या त्या विधानाचा संदर्भ व अर्थ लक्षात घेण्याची काळजी न घेता, अनेक राजकीय भाष्यकार टीका करत असताना दिसतात. आपण जे बोललो त्या मागची कल्पना काय होती, याची फोड यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत केली. ते म्हणाले की, नेहरू व महाराष्ट्र यांत मी नेहरू पसंत करीन असे बोललो तेव्हा नेहरूंचे नेतृत्व हेच आपल्या मनात होते. हा व्यक्तीचा प्रश्न नव्हता तर नेतृत्वाचा होता. नेहरूंचे धोरण, कार्यक्रम, दृष्टिकोन हे सर्व अभिप्रेत होते. नेहरू हे भारताशी एकरूप झालेले नेते होते आणि त्याचाच मी पुरस्कार करत होतो.

आंध्रमधील भाषिक राज्याच्या चळवळीत कम्युनिस्ट पक्षाने पुढाकार घेतला होता. प्रत्येक भाषिक गट हे एक वेगळे राष्ट्र आहे, ही भूमिका त्या पक्षाने मांडली होती.यामुळे नेहरू अस्वस्थ होते. महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्ष चळवळीचे नेतृत्व करू लागला तर अनर्थ ओढवेल अशी त्यांना धास्ती होती. या प्रकारचा धोका यशवंतरावांनाही वाटू लागला होता. त्यातच काँग्रेसनिष्ठा म्हणजे पक्षनिष्ठा नसून काँग्रेसच्या तत्त्वांवर निष्ठा, असे समीकरण शंकरराव देव यांनी मांडले होते. यामुळे काँग्रेस पक्षच नष्ट होण्याचा धोका यशवंतरावांना दिसला. म्हणून मराठी काँग्रेसजनांनी काँग्रेसमध्ये राहून व नेहरूंचे नेतृत्व मानून आपले उद्दिष्ट साध्य केले पाहिजे, असा निष्कर्ष त्यांनी काढला.

यशवंतरावांच्या फलटणच्या या भाषणामुळे त्या वेळी दिल्लीत दाखल झालेल्या शंकररावांच्या नेतृत्वाला खरा धक्का बसला आणि काँग्रेसश्रेष्ठींशी वाटाघाटी करताना त्यांच्या शब्दाला काही वजन राहणार नाही, हेही उघड झाले. या पाठोपाठ संसदेत राज्यपुनर्रचना अहवालावर चर्चा झाली तेव्हा लोकसभेत काकासाहेब गाडगीळ आणि राज्यसभेत देवगिरीकर यांनी अहवालाची चिरफाड केली आणि काकासाहेबांनी तर, महाराष्ट्राची न्याय्य मागणी डावलली तर लोक रस्त्यावर येतील असा इशारा दिला. लोक रस्त्यावर यापूर्वीच आले होते आणि यापुढे अधिक रणकंदन होणार अशी चिन्हे स्पष्ट दिसत होती. संसदेतील चर्चेचा सूर पाहून गृहमंत्री पंत यांनी मोरारजी, देव व गाडगीळ यांनी एकत्र बसून चर्चा करण्याची सूचना केली. अशी चर्चा होण्यापूर्वी मुंबई महापालिकेच्या बैठकीत प्रजासमाजवादी पक्षाचे सदस्य प्रा० राम जोशी यांनी मुंबईसह महाराष्ट्र राज्य स्थापन करण्याचा ठराव आणला, त्यास मुंबईतील काँग्रेसचे सभासद डॉ० नरवणे, महाशब्दे इत्यादींनी पाठिंबा दिला आणि ठराव संमत झाला. यामुळे स० का० पाटील यांच्या नेतृत्वाला शह मिळाला. परिणामत: पाटील यांनी या काँग्रेसच्या नगरसेवकांना पक्षातून दूर केले. पण मुंबईची काँग्रेस संघटना आपल्या शब्दाबाहेर जाणार नाही, या पाटील यांच्या विश्वासास तडा गेला.

गोविंदवल्लभ पंत यांच्या सूचनेप्रमाणे मोरारजी व देव यांची भेट झाली, पण पाच वर्षांनी गुजरातने वेगळे व्हावे ही अट मान्य करण्यास मोरारजी तयार नव्हते. नंतर नेहरू मुंबईत आले असताना त्यांची व मोरारजीभाईंची बोलणी झाली. तथापि देवांनी पुनरुज्जीवित केलेल्या द्वैभाषिकाची योजना येण्याची लक्षणे

दिसत नव्हती. तेवढ्यात नेहरूंनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून मुंबई केंद्रशासित करण्याचे १६ जानेवारी १९५६ रोजी जाहीर केले. यामुळे मुंबई व महाराष्ट्रात असंतोष पसरला. हा निर्णय होण्यापूर्वी समितीचे चारशेएक प्रमुख नेते व कार्यकर्ते यांना अटकेत ठेवण्यात आले. मुंबईत गाड्या, ट्रॅम वगैरे जाळण्यात आल्या. पोलिसांनी गोळीबार, लाठीमार यांचा सर्रास वापर केला. गोळीबारात अनेक जण मरण पावले. हा आकडा पंचाऐंशीपासून एकशे पाचपर्यंत सांगितला जाऊ लागला आणि एकशे पाच हा आकडा मुंबई महापालिकेने अधिकृत धरला. मुंबईबाहेर महाराष्ट्राच्या अनेक भागांत दंगली झाल्या. या दंगलीचे अहवाल मोरारजीभाईंनी केंद्राकडे पाठवले असले, तरी राजकीय परिणामांची त्यांनी तमा बाळगली नाही. गृहमंत्री पंत मात्र यामुळे अस्वस्थ झाले. त्यांनी नेहरू, आझाद इत्यादींशी चर्चा केली असावी. म्हणून १० फेब्रुवारी ५६पासून अमृतसर इथे काँग्रेसचे अधिवेशन भरले असता, त्यांच्या प्रेरणेने काहीजणांनी महाराष्ट्र व गुजरातच्या प्रतिनिधींशी अनौपचारिक चर्चा करून अंदाज घेतला. या अधिवेशनास काकासाहेब गाडगीळ, देवगिरीकर, यशवंतराव इत्यादी हजर होते.

एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन, पंडित पंत द्वैभाषिक राज्य स्थापन केल्यास मुंबई व महाराष्ट्रातले वातावरण निवळेल या निष्कर्षास आले. त्यांनी या संबंधात नेहरू, आझाद, ढेबर इत्यादींशी चर्चा केली. मोरारजी हा पर्याय मान्य करत नव्हते, पण द्वैभाषिक आणण्याचा निर्णय काँग्रेसश्रेष्ठी घेणार असल्यास आपण आड येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. गुजरातचे मन पर्यायाच्या बाजूने वळवणे आपल्या आटोक्याच्या बाहेरचे असल्याची कल्पनाही त्यांनी दिली. लालबहादूर शास्त्री यांनी देवगिरीकर, गाडगीळ व यशवंतराव यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली तेव्हा या तिघांनीही महाराष्ट्राची बाजू मांडली. दरम्यान द्वैभाषिकासंबंधी काँग्रेसश्रेष्ठींचा निर्णय जाहीर होण्यापूर्वी राज्यपुनर्रचनेच्या संबंधात, आयोगाने सुचवलेल्या योजनेप्रमाणे तयार झालेले विधेयक मुंबई विधिमंडळात आले. त्यात त्रिराज्य निर्माण करण्याची तरतूद होती. यशवंतरावांनी २८ मार्च १९५६ रोजी या विधेयकावर एक मंत्री या नात्याने भाषण केले. त्यावरून असे दिसेल की, त्रिराज्य योजना त्यांना पसंत नव्हती आणि महाराष्ट्र राज्य स्थापन व्हावे याची आच होती. पण महाराष्ट्र राज्य निर्माण करायचे ते काँग्रेस संघटनेच्या मार्फत अशी त्यांची धारणा होती. आपल्या मनातील हे द्वंद्व त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले आहे. यशवंतराव यांनी सांगितले की, आर्थिक व सामाजिक समता या दोन प्रकारच्या आकांक्षा स्वातंत्र्यानंतर निर्माण झाल्या. राज्यपुनर्रचनाही या आकांक्षा पुऱ्या करण्याच्या उद्देशानेच हाती घ्यायला हवी. म्हणूनच लोकांच्या भाषेतून राज्यकारभार व्हायला हवा. केंद्र सरकारने पाठवलेल्या विधेयकाची तपासणी केली तर किती ठिकाणी हे भाषिक राज्याचे तत्त्व लागू करण्यात आले आहे हे समजून येईल. हे तत्त्व कोठे लागू केले व कोठे केले नाही, याच्या तपशिलात जाऊन विचार केल्यास मतभेद निर्माण होऊ शकतात.

केंद्र सरकारने केलेल्या विधेयकाने कर्नाटकास जे पाहिजे ते शंभर टक्क्यांहून अधिक मिळाले आहे, गुजरातलाही जे पाहिजे ते मिळाले. महाराष्ट्र राज्य निर्माण करताना जो अपुरेपणा राहिला आहे त्याबद्दल दु:ख आहे.विदर्भासह महाराष्ट्र निर्माण होत आहे हा आनंदाचा भाग झाला. मराठवाडाही महाराष्ट्रात समाविष्ट होणार आहे. पण मुंबई महाराष्ट्रात न घातल्यामुळे आपल्यालाही दु:ख झाले आहे. मुंबई महाराष्ट्राचीच आहे आणि भूगोलानेच ते दाखवून दिले आहे. मुंबईबाबत एक विभागीय समिती महाराष्ट्राच्या मंडळात नेमून प्रश्न सोडवता आला असता. महाराष्ट्राचा प्रश्न सोडवण्याच्या उपायांबद्दल मात्र आपला विरोधी पक्षांशी मतभेद असल्याचे सांगताना, यशवंतरावांनी आपली निष्ठा काँग्रेस पक्षाशी

असल्याचे पुन्हा एकदा सांगितले. नंतर १६ ऑक्टोबर रोजी राज्य सरकारवर अविश्वास व्यक्त करणारा ठराव, विरोधी पक्षांनी विधिमंडळात आणला असता यशवंतरावांचे भाषण झाले. त्यांनी प्रथमच स्पष्ट केले, की या प्रकारचा ठराव आणण्याचा विरोधी पक्षास अधिकार आहे. इतके सांगितल्यावर यशवंतरावांनी एस० एम० जोशी यांना आवाहन केले, की ते कोणत्या मार्गाने जात आहेत याचा त्यांनी विचार करावा. राष्ट्रप्रेमाचे धडे ते गेली वीसपंचवीस वर्षे महाराष्ट्रात एका पिढीला देत आले त्या पिढीतील आपण एक आहोत. पण आज तुम्ही लोकांच्या मनातील असंतोषाच्या भावना तीव्र ठेवण्याच्या हेतूने चर्चा करीत असून राष्ट्रसेवा करत नाही.

एकभाषी राज्याचे आपणही पुरस्कर्ते आहोत, पण कोणत्या टोकापर्यंत जायचे याला काही मर्यादा आहेत. एकदा लोकसभेने एखाद्या प्रश्नासंबंधी निर्णय जाहीर केल्यानंतर त्याच प्रश्नासंबंधी शेंडी तुटो अगर पारंबी तुटो, आमचे म्हणणे मान्य झालेच पाहिजे असा आग्रह धरणे योग्य नाही. पक्षनिष्ठेला राजकीय जीवनात फार महत्त्व आहे. पक्ष म्हटला की त्याला एक प्रकारची शिस्त असली पाहिजे व राजकीय प्रश्न सोडवताना त्यांनी ती पाळली पाहिजे. ती जर पाळता आली नाही, तर पक्षाची जरुरी काय? असा यशवंतरावांचा प्रश्न होता. समाजवादी निष्ठा असलेल्या एस० एम० जोशी यांनी भाषावादात फार गुंतून राहू नये, अशी यशवंतरावांनी अखेरीस विनंती केली.

अमृतसरमध्ये जी बोलणी झाली ती द्वैभाषिक आणण्याच्या दृष्टीने अनुकूल असल्याची चाहूल मराठी नेत्यांना लागली; आणि अमृतसरहून परत आल्यावर यशवंतराव यांनी, सांगली इथे वसंतदादांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभेत भाषण करून अमृतसर काँग्रेसचा संदेश तर सांगितलाच, शिवाय महाराष्ट्र राज्यासंबंधीची आपली भूमिकाही स्पष्ट केली. यशवंतरावांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'आपण संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध नाही, तर चळवळीचे विरोधक आहोत. काँग्रेसबाहेर या आणि संघर्ष करा हे आवाहन आपल्याला मान्य नाही. संघर्ष करून मुंबई मिळणार नाही. मुंबईचा प्रश्न सुटेल याची खात्री असू द्या, त्याचे वेळापत्रक मात्र आपल्यापाशी नाही. यशवंतराव नंतर म्हणाले की, आपल्याविरुद्ध बराच अपप्रचार झाला आहे.पण त्यामुळे आपण डगमगणार नाही. आपण पंचवीस वर्षे राजकारणात काढली असून पालापाचोळ्याप्रमाणे उडून जाणार नाही. गांधी-नेहरूंना आपण मोठे मानले म्हणून जे टीका करतात, त्यांना विचारले पाहिजे की, गांधी-नेहरूंना मोठे मानायचे नाही तर कोणाला? ज्यांनी स्वत: झिजून स्वातंत्र्य आणले त्यांना मोठे म्हटले म्हणून मला सूर्याजी पिसाळ म्हणण्यात आले. मी सूर्याजी पिसाळ असेन तर शिवाजी कोण आणि औरंगजेब कोण? संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबद्दल माझा वाद नाही, तर ती मागणी मिळवण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा, त्याबद्दल आहे. सर्व देशाचे भले होण्याबरोबरच महाराष्ट्राचे भले होणार आहे याचा विसर पडता कामा नये'. यशवंतरावांनी याच धर्तीवर अनेक ठिकाणी मग भाषणे केली. सातारा-सांगली या भागांत काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांना साथ दिली.

यानंतर दिल्लीत पुन्हा एकदा काँग्रेसश्रेष्ठींच्या गाठीभेटींचे सत्र सुरू झाले. मग मुंबईत काँग्रेसचे अधिवेशन जूनमध्ये झाले असता व नेहरूंची जाहीर सभा चालू असता, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आवाहनास प्रतिसाद देऊन लोकांनी निदर्शने केली. यामुळे नेहरू संतप्त झाले आणि मुंबई केंद्रशासित राहील अशी घोषणा त्यांनी पुन्हा एकदा केली. यामुळे लोक संतापले आणि त्यांनी दगडफेक केली आणि पोलिसांनी लाठीमार केला. यात अनेकजण जखमी झाले. पुढे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीसाठी

नेहरू पुण्यात आले असता, त्यांच्या सभेवर बहिष्कार पुकारण्यात आला. हे वातावरण त्रिराज्य योजनेला पोषक नव्हते. मग ऑगस्टमध्ये २८२ खासदारांनी द्वैभाषिकाच्या योजनेचा पुरस्कार करणारे निवेदन काँग्रेस कार्यकारिणीकडे धाडले आणि ते मंजूर करण्यात येऊन, हिरे, चव्हाण, कुंटे इत्यादी नेत्यांना दिल्लीत बोलावण्यात आले. काँग्रेसश्रेष्ठींचा निर्णय झालाच होता आणि लोकसभेतही ही योजना मंजूर होणार हे निश्चित झाले होते. काँग्रेस खासदारांपैकी बहुतेक सर्वांनी होकार दिला. तसेच प्रजासमाजवादी खासदार अशोक मेहता यांनीही द्वैभाषिकाच्या बाजूने मत दिले. २४१ विरुद्ध ४० अशी मतविभागणी होऊन लोकसभेने शिक्कामोर्तब केले.द्वैभाषिकाच्या निर्णयाने गुजरातेत अनेक ठिकाणी दंगली झाल्या आणि गोळीबारात अनेक लोक मरण पावले. अहमदाबाद शहरातले लोक अधिक पेटले होते.

एस० एम० जोशी यांनी आचार्य विनोबा भावे यांची ७ एप्रिल १९५६ रोजी मुलाखत घेतली आणि तिचा वृत्तान्त 'साधना'त प्रसिद्ध केला. या मुलाखतीत विनोबा म्हणाले, 'राज्यपुनर्रचना अहवालातील द्विभाषिक राज्याची योजना मला पसंत होती. श्री० शंकरराव देव यांची सूचनाही मला पसंत होती. काँग्रेस श्रेष्ठींनी तिचे वेळीच स्वागत कां केले नाही, ती कां उचलून धरली नाही, हे मला अद्याप न समजलेले कोडे आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने एकदा द्विभाषी राज्य जवळजवळ मान्य केले असता नंतर ते अमान्य केले, हेही कोडे मला अजून उलगडले नाही. यामुळे महाराष्ट्रावर धरसोडीचा आरोप बाहेरचे लोक करीत आहेत—महाराष्ट्राच्या साहित्याचा व संत वाङ्मयाचा मी अनेक वर्षे मोठ्या प्रेमाने व निष्ठेने अभ्यास केलेला आहे. परंतु शंकरराव देवांसारखी महाराष्ट्राची अस्मिता व हट्ट माझ्यात नाही. हैद्राबादचे राज्य काही दिवस तसेच राहू द्यावे, असे पंडित नेहरूंचे मत होते. पण रा० पु० समितीने त्याचे तीन भाषिक भाग पाडून ते बरखास्त करायचे ठरवले, ही काही लहानसहान गोष्ट नाही. पण आज त्याचे कौतुक कोणालाच वाटत नाही असे दिसते.' अखेरीस महाराष्ट्रात चार दोष असल्याचा अभिप्राय विनोबांनी दिला. ते म्हणजे जातीवाद, मध्ययुगाचा वृथा अभिमान, हिंसेचे समर्थन करणारे तत्त्वज्ञान आणि न्यूनगंड. (*संयुक्त महाराष्ट्र आंदोलन,* पृष्ठे २५९-६१.)

स्वामी रामानंद तीर्थ यांनाही द्वैभाषिकाचा निर्णय मनापासून आवडलेला नव्हता. परंतु अंबेजोगाई इथे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या मेळाव्यात १३ सप्टेंबर १९५६ रोजी भाषण करताना स्वामीजी म्हणाले, ''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हायला पाहिजे हे मलाही पटते. पण लोकसभेने द्विभाषिकाचा निर्णय घेतला. आपल्याप्रमाणे मलाही ती गोष्ट पटली नाही. मी मतदानात भाग घेतला नाही. घेतलेला निर्णय आजच्या अवस्थेत आपण मानला पाहिजे व तो लोकशाही पद्धतीने बदलून घेतला पाहिजे.'' (*कर्मयोगी संन्यासी,* पृष्ठे ३७९-८०) म्हणजे स्वामीजींना द्वैभाषिकाचा निर्णय मान्य नव्हता व तो बदलायचा तर लोकशाही पद्धतीने, असे त्यांनी ठरवले होते. आंदोलनाचा मार्ग यात बसत नव्हता असे त्यांच्या भूमिकेवरून म्हणायला हरकत नाही.

प्रत्यक्षात, द्वैभाषिक मुंबई राज्य ऑक्टोबरमध्ये अस्तित्वात आणण्याचा निर्णय झाला होता. मग या नव्या राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवण्यासाठी हालचाली सुरू झाल्या. मोरारजी देसाई यांनी आपली एकमताने निवड झाली तरच आपण नेतेपद घेऊ अशी अट घातली होती. उलट शंकरराव देव यांनी काँग्रेसमधून संन्यास घेतला असला तरी नेतानिवडीच्या प्रयत्नात ते हिरिरीने भाग घेत होते. त्यांना हिरे यांना मुख्यमंत्री करायचे होते. पण भाऊसाहेबांना कितपत पाठिंबा मिळणार हे अनिश्चित होते. तेव्हा

चिंतामणराव देशमुख वा वैकुंठभाई मेहता ही नावे त्यांनी पुढे केली होती. पण दोघेही तयार नव्हते. यशवंतराव मुख्यमंत्री होऊ नयेत यासाठी देव यांचा हा खटाटोप चालू होता. पण यशवंतरावांना विदर्भ, मराठवाडा येथल्या आमदारांपैकी काहींचा पाठिंबा मिळवण्यात यश आले होते. तथापि मोरारजीभाईनीही त्यांनाच पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यामुळे, हिरे यांचे व त्यांचा पुरस्कार करणाऱ्या शंकररावांचे पारडे खाली गेले. नंतर असे आढळून आले की, हिरे यांना ज्यांची खात्री होती तेही त्यांच्याबरोबर गेले नाहीत. १६ ऑक्टोबर रोजी विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक होऊन यशवंतरावांना ३३३ तर भाऊसाहेब हिरे यांना १११ मते पडली. द्वैभाषिकाचे नवे मंत्रिमंडळ १ नोव्हेंबर १९५६ रोजी अधिकारावर आले. हे मंत्रिमंडळ बनवताना यशवंतरावांनी कारभारावर आपली पकड राहील हे पाहिले. खात्यांची वाटणीही धोरणाने केली. यशवंतराव हे तरुण आहेत तेव्हा डॉ० जीवराज मेहता त्यांना सल्लामसलत देतील, असा मोरारजीभाईंचा होरा होता; पण यशवंतरावांनी अशा सल्लामसलतीला जागा दिली नाही व तिची आपल्याला गरज नाही हे थोड्याच दिवसांत दाखवून दिले. नव्या मंत्रिमंडळात भाऊसाहेब, बियाणी व दिगंबरराव बिंदू यांचा समावेश नव्हता, हे अनेकांना खटकले. यांपैकी बियाणी यांना वगळल्यामुळे विदर्भातला एक मोठा वर्ग संतुष्ट झाला होता.

द्वैभाषिकाचा निर्णय संयुक्त महाराष्ट्र समितीने धुडकावला होता आणि लोकसभेने केलेला निर्णय बदलता येतो आणि तो बदलून घेण्यासाठी समिती कार्यरत राहील असे एस० एम० जोशी यांनी जाहीर केले. यामुळे नव्या राज्याच्या पुढचा मार्ग निष्कंटक नाही हे समजून आले. यशवंतरावांनी द्वैभाषिक राज्याच्या आरंभीच याची जाणीव ठेवली होती. म्हणून एकभाषी राज्याची मागणी महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही भागांत होती, पण संसदेने दोन्ही भाषिकांनी एकत्र नांदावे असे ठरवले आहे आणि तो प्रयोग यशस्वी करण्याची जबाबदारी आपली आहे असे जाहीर केले. कराड, सांगली इत्यादी भागांत यशवंतरावांचे प्रचंड स्वागत झाले. तिथल्या व इतर ठिकाणच्या भाषणांतील त्यांचे एक सूत्र होते. ते म्हणजे विरोधी पक्ष आवश्यक आहेत आणि त्यांना राज्य बदलण्याचा हक्क आपल्या राज्यघटनेनेच दिला आहे. पण हा हक्क लोकशाही मार्गाने बजावायचे बंधन आहे. राज्य बदला, पण राज्य मोडू नका. भाषिक चळवळ आता संपली आहे व ती संपवलीही पाहिजे.

मुख्यमंत्रिपदावरील आपल्या निवडीचा अर्थ यशवंतरावांनी लावला, तो त्यांच्या वैचारिक भूमिकेवर प्रकाश टाकणारा होता. 'मी मुख्यमंत्री झालो याचा अर्थ पुरोगामी वृत्ती भारतात काम करू लागली आहे.कोणी कोणत्याही ठिकाणी जाऊ शकतो हे दिसून आले. बहुजनसमाजाला शिक्षणाचा लाभ करून देणारे महात्मा फुले व शाहूमहाराज झाले नसते, स्वातंत्र्य चळवळ चालवताना मातीचे सोने बनवणारे महात्मा गांधी नसते, समाजवादाचा साक्षात्कार घडवून देणारे पं० नेहरू नसते, तर देवराष्ट्र या गावचा यशवंतराव गुराखीच राहिला असता. आता महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व गुजरात असा सर्व प्रदेश राज्यात आला आहे, त्याच्या विकासाचे काम करणे ही खरी जबाबदारी आहे.' यशवंतरावांवर आणखी एक जबाबदारी होती. मुंबई महाराष्ट्राला नाकारताना मराठी लोकांबद्दल विनाकारण संशय निर्माण करण्यात आला होता. तेव्हा मुंबईतल्या बिगरमराठी लोकांचा विश्वास संपादन करणे आवश्यक होते. पण हे करताना मराठी लोकांची नाराजी होणार नाही, याचीही खबरदारी घ्यायची होती. शिवाय मोरारजींनी ज्या रीतीने कारभार केला त्यामुळे मुंबईतच नव्हे, तर महाराष्ट्रात आणि नंतरच्या काळात गुजरातमध्ये तणावाचे वातावरण होते. त्यात बदल करण्यात यशवंतरावांना थोड्याच अवधीत यश आले.

द्वैभाषिक राज्याची स्थापना झाली १ नोव्हेंबर १९५६ रोजी आणि ५७ सालच्या फेब्रुवारीत विधानसभेची निवडणूक आली. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रभाव कमी झालेला नव्हता. इतके मात्र खरे, की समितीतही सर्व सुरळीत चालले नव्हते. विधानसभा निवडणुकीसाठी कोणत्या पक्षाला किती व कोठे जागा द्यायच्या हा वादाचा विषय होणे साहजिक होते. एस० एम० यांनी नमूद केल्याप्रमाणे मुंबई व पुणे इथल्या जागावाटपाच्या संबंधात थोड्या अडचणी निर्माण झाल्या. मुंबईत डांगे यांनी मागितलेल्या जागेबद्दल मतभेद होते, पण डांगे यांना हवा तो मतदारसंघ देण्यात आला. पुण्यात एस० एम० यांनी बाबूराव सणस यांच्या विरुद्ध उभे न राहण्याचे ठरवले होते; पण समितीतल्या घटक पक्षांनी अशा मागण्या केल्या, की एस० एम० यांना सणसांविरुद्ध निवडणूक लढवणे अनिवार्य झाले. या पूर्वी मुंबईतले प्रजासमाजवादी व कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांत तणाव निर्माण झाला होता. याचे कारण हंगेरीत सोव्हिएत युनियनने केलेल्या लष्करी हस्तक्षेपाचा निषेध करणारा ठराव, प्रजासमाजवादी पक्षाने महापालिकेत आणला हे होते.

असे असले तरी जागावाटपाचा प्रश्न सुटल्यावर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रचारास जनतेचा मोठा प्रतिसाद मिळू लागला होता. यशवंतराव मुख्यमंत्री झाले याबद्दल लोक संतुष्ट होते, पण बहुसंख्य लोकांना संयुक्त महाराष्ट्र हवा होता; द्वैभाषिक नको होते. याचा परिणाम मतदानावर झाला. मुंबईत काँग्रेसला २४ पैकी १३ जागा मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसच्या हाती फक्त ३३ तर समिती १०२ जागांवर विजयी झाली. मराठवाडा व विदर्भ यांत काँग्रेसचे यश मोठे होते व तीच स्थिती गुजरात व सौराष्ट्र यांत होती. पश्चिम महाराष्ट्रातल्या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, काँग्रेसचे भलेभले उमेदवार पराभूत झाले आणि काँग्रेसपेक्षा समितीला पडलेली मते कितीतरी अधिक होती. खुद्द यशवंतराव यांचे बहुमत अगदीच थोडे होते. या संबंधात एस० एम० जोशी यांनी नमूद केलेली आठवण अशी : ''निवडणुकीनंतर यशवंतरावांनी एस० एम० यांना सांगितले की ''तुम्ही येऊन गेलात आणि माझी आठशे मते गेली, पण आचार्य अत्रे तेथे गेले आणि पंधराशे मते मला मिळाली.'' (*मी-एस० एम०*, पृ० २१४) अत्र्यांच्या अर्वाच्य भाषणाचा हा परिणाम होता.नंतर विधानसभेत समितीला अधिकृत विरोधी पक्ष म्हणून थोड्या खटपटीने मान्यता मिळवता आली आणि समितीतील घटक पक्षातील एकेका पक्षास आळीपाळीने विरोधी नेता करण्याचे समितीने ठरवले.

द्वैभाषिक राज्य स्थापन झाल्यानंतर प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्याचे ठरले. वास्तविक निवडणुकीच्या आधी हा समारंभ होणार होता, मालोजीराव नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वीच एक पुतळा-समिती स्थापन झालेली होती आणि तिने वर्षापूर्वी नेहरूंना आमंत्रण दिले होते. पण नेहरूंच्या इतर कार्यक्रमामुळे त्यांनी नंतर येण्याचे आश्वासन दिले. तेवढ्यात निवडणूक आली. मग निवडणुकीसाठी शिवाजी महाराजांचा उपयोग केला अशी टीका होऊ नये म्हणून समारंभ पुढे ढकलला होता. मुळात तेव्हाचे राज्यपाल महताब प्रतापगडावर गेले असता, शिवाजी महाराजांचा पुतळा तिथे हवा अशी कल्पना त्यांना सुचली होती. ती त्यांनी यशवंतराव व हिरे यांना सांगितल्यावर सातारच्या राजमाता सुमित्राराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन होऊन महाराजांचा पुतळा तयार करण्याची योजना मार्गी लागली.

हे सर्व लक्षात न घेता, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी द्वैभाषिक दृढ करण्यासाठी हा खटाटोप

असल्याची समजूत करून घेऊन, समारंभाच्या वेळी निदर्शने करण्याचे ठरवले. एस० एम० जोशी यांनी पुण्यातल्या भाषणात नेहरूंनी अनावरण करण्यास विरोध केला. ते म्हणाले की, शिवाजीमहाराजांनी येथे स्वराज्य स्थापन केले. त्या स्वराज्यस्थापकांचा तो पुतळा. पं० नेहरूंनी तर महाराष्ट्राची घटक राज्याची मागणीच नामंजूर केली आहे, त्यांना पुतळ्याचे अनावरण करण्याचा मुळीच अधिकार नाही. मग नेहरूंनी पूर्वी अफझल खानाच्या वधाबाबत शिवाजी राजांवर टीका केली होती याचा काहींनी दाखला दिला. पण नेहरूंनी नंतर लगेचच आपली चूक कबूल केली होती. असा विरोध होऊ लागल्यावर जुन्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादालाही उजाळा मिळाला.

या अनावरण समारंभास नेहरूंना बोलावल्यावरून समिती विरुद्ध काँग्रेस असा वाद सुरू झाला असे नव्हे, तर समितीतच दोन मते असल्याचे दिसून आले. शिवाजीमहाराजांचा पुतळा व त्याचे अनावरण नेहरूंच्या हस्ते करायचे असे ठरले तेव्हा द्वैभाषिक बळकट करण्याचा विचार येण्याचे कारण नव्हते, कारण तेव्हा द्वैभाषिक येणार याची कल्पनाही नव्हती. यामुळे समितीत फूट पाडण्याचा यशवंतरावांचा हा डाव होता, ही टीकाही निरर्थक ठरते. समितीत याबाबतीत मतभिन्नता असल्याचे दिसलेच; पण राजकारणात नसलेल्या अनेकांनी समितीचा आग्रह चुकीचा ठरवला. पुण्यातल्या रँगलर परांजपे, विठ्ठलराव घाटे इत्यादींनी असा विरोध न करण्याचे आवाहन केले. य० दि० फडके यांनी त्यांच्या *विसाव्या शतकातील महाराष्ट्र* या ग्रंथाच्या आठव्या खंडात या विविध भूमिका दिलेल्या आहेत. भाई डांगे यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून म्हटले की, मोरारजीभाईंनी शिवाजीमहाराजांवर टीका केली होती, म्हणून नेहरूंना विरोध करण्याची आवश्यकता नाही आणि नेहरूंनी पूर्वीच आपली टीका दुरुस्त केल्यामुळे तो वाद उकरून काढणेही योग्य नाही. भारतास स्वातंत्र्य मिळवण्यात नेहरूंनी पुढाकार घेतला होता व तो घेऊन त्यांनी महाराष्ट्रही स्वतंत्र केला. तेव्हा त्यांनी शिवस्मारकाचे अनावरण करण्यात चूक नाही. पण नेहरूंनी महाराष्ट्राचे राज्य मारले म्हणून आपला विरोध आहे. जनसंघाचे रामभाऊ म्हाळगी यांनी महाराष्ट्र होऊ दिले नाही, म्हणून विरोध करावा, पण नेहरू पुण्यास विमानतळावर येतील तिथे निदर्शन व्हावे, समारंभाच्या ठिकाणी नको, असे जाहीरपणे सुचवले. रियासतकार सरदेसाई यांनी आजच्या राजकारणाचा संपर्क शिवाजी महाराजांना होऊ नये अशी इच्छा प्रदर्शित केली. तर शिवस्मारक समितीचे सदस्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी, मोरारजींवर राग काढण्यासाठी पंडित नेहरूंना काळी निशाणे दाखवणे ही शुद्ध फसवेगिरी आहे, असे म्हटले. रावसाहेब पटवर्धन यांचा द्वैभाषिकास विरोध नव्हता. त्यांना ही निदर्शने अमान्य होती. त्यांनी लिहिले, ''संयुक्त महाराष्ट्रवाल्यांनाच छत्रपतींचा कैवार आहे, असे म्हणायचे काय? द्विभाषिक मानणारे अनेक नागरिक कोणत्याही संयुक्त महाराष्ट्रवाद्याइतकेच छत्रपतींचे चाहते व भक्त आहेत. युद्धाच्या प्रचारासाठी इंग्रजांनी छत्रपतींच्या नावाचा उपयोग केला तेव्हा त्याविरुद्ध कोणी काही मोहीम केली नाही अन् नेहरूंसारखा थोर नेता छत्रपतींच्या पुतळा अनावरण करण्यास आला तर आम्हांला अपमान वाटतो.''

या स्थितीत प्रतापगडावर ३० नोव्हेंबर १९५७ रोजी होणाऱ्या समारंभाच्या वेळी वातावरण अतिशय तंग झाले. पण एक गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे, की निदर्शने करणारांचे नेतृत्व एस० एम० यांच्यासारख्यांकडे होते. त्यांच्या व त्यांच्या सहकारी नेत्यांच्यामुळे निदर्शनास अनिष्ट वळण लागले नाही. सरकारनेही निदर्शकांना चिथावणी दिली नाही. पोलिसांचा बंदोबस्त अर्थातच जोरदार होता. समारंभाच्या मार्गावर अनेक ठिकाणी स्वागताच्या कमानी होत्या व समारंभ थाटात पार पडला. मात्र वाईपासून



मुंबईत व्यापार आणि उद्योग या परिषदेचे उद्‌घाटन करताना. सोबत सी० डी० देशमुख, धनंजयराव गाडगीळ

प्रतापगडापर्यंत संयुक्त महाराष्ट्र समितीचे निदर्शक विरोधी घोषणा देऊन रांगेने उभे होते. नेहरूंना जाताना-येताना हे दृश्य दिसले. त्यांनी यशवंतरावांना विचारले, की हे लोक काय घोषणा देत आहेत? यशवंतरावांनी सांगितले, की तुम्हांला शुभेच्छा देत आहेत, पण मुंबई आपल्यापासून हिरावून घेऊ नका, असे म्हणत आहेत. नेहरूंनी विचारले, त्यांच्यापासून मुंबई कोण हिरावून घेत आहे? यानंतर नेहरू असेही म्हणाले की, पंजाबी लोक रागावतात, पण त्यांचा राग लवकर संपतो, तुम्हा महाराष्ट्रीयांचं तसं होत नाही.

प्रतापगडावरील शिवस्मारकाच्या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या निदर्शकांना सरकारने पक्षपाती धोरण दाखवले अशी टीका करून, समितीच्या सदस्यांनी विधानसभेत २३ डिसेंबर रोजी चर्चा घडवून आणली. त्या चर्चेला उत्तर देताना यशवंतराव यांनी सांगितले की, प्रतापगडावरील समारंभाच्या निषेधाची मोहीम उघडणे आणि त्या संबंधी सभागृहात चर्चा घडवून आणणे अशा दोन चुका समितीने केल्या आहेत. हे सांगून प्रतापगडावर शिवाजीमहाराजांचा पुतळा उभारण्यामागचा इतिहास यशवंतरावांनी कथन केला आणि तो समितीच्या नेत्यांना माहीतही असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. या वेळी वादाला सुरुवात झाली. तेव्हाच पंडित नेहरूंना समारंभास यायचे असेल तर आमची प्रेते पडतील अशी भाषा करण्यात आली. यशवंतरावांनी सांगितले, आम्हांला प्रेते पाडायची नव्हती व नाहीत. पण हे सांगत असताना समितीच्या काही प्रमुख मंडळींनी ही परिस्थिती मोठ्या संयमाने हाताळण्याचा प्रयत्न केल्याचे मान्य करून, त्यांनी त्यांचे आभार मानले. इतका बंदोबस्त कां ठेवला याचा खुलासा करताना, समितीनेच छावण्या टाकण्याची भाषा केली होती आणि त्यामुळे सावधगिरी बाळगणे आवश्यक होते, असे यशवंतराव म्हणाले. संयुक्त महाराष्ट्रासाठी निदर्शने करण्याचा समितीचा अधिकार अमान्य नाही, पण

शिवस्मारकाच्या समारंभाच्या वेळी ती करायची नसतात. या चर्चेत भाग घेताना अत्रे यांनी आपण स्वत:ला प्रतिशिवाजी म्हणवून घेत असल्याची टीका केली असे सांगून यशवंतराव म्हणाले की, ''प्रतिशिवाजी म्हणवून घेण्याइतका मी मूर्ख किंवा अहंकारी नाही. तीनशे वर्षे लोटल्यानंतरही ज्या थोर पुरुषाला जनतेने आपल्या अंत:करणाच्या सिंहासनावर सतत जागा दिली, त्या महात्म्याच्या स्मारकाला मानाचा मुजरा करण्यासाठी ३०-४० कोटी जनतेचे मुकुटमणी, भारताचे प्रतिनिधी पंडित नेहरू ज्या वेळी येतात, त्या वेळी निषेध करून अडथळे आणण्याची जी गोष्ट आहे ती चांगली नाही, असे सर्वसामान्य माणसाला वाटले तर त्यात काही चूक आहे असे मला वाटत नाही.''

यशवंतरावांच्या भाषणाचा एक विशेष असा की, त्यांनी प्रतिपक्षाच्या टीकेला चोख उत्तर दिले असले तरी त्याला डिवचण्याची त्यांची दृष्टी नव्हती. याच भाषणात ती दृष्टी प्रगट झाली असे नाही, इतर अनेक वेळा चर्चा झाली तेव्हा हीच वृत्ती होती. यात कोठे लाठीमार, तर कोठे गोळीबार झाल्याबद्दल झालेल्या चर्चांचा समावेश होतो. सभागृहाबाहेरही आपला मुद्दा न सोडता विरोधकांना समजावून घेण्याचे व समजावून देण्याचे त्यांचे धोरण होते. काही वेळा कामगारांचे संप झाले आणि कामगार-पुढारी वा समितीचे पुढारी मोर्चा काढत असत, त्या मोर्चाच्या नेत्यांना भेटण्यास यशवंतरावांनी अनमान केला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात बळी पडलेल्या हुतात्म्यांचे स्मारक, मुंबईच्या महापालिकेने फ्लोरा फौन्टन इथे उभे केले व यशवंतरावांना आमंत्रण दिले होते. ते त्यांनी स्वीकारले. अशा अनेक प्रसंगांनी विरोधकांचा राग शांत करण्याची आलेली कोणतीही संधी यशवंतरावांनी सोडली नाही. हे धोरण म्हणून झाले नाही, तर ती त्यांची वृत्ती होती. यामुळे मोरारजीभाईच्या काळापेक्षा लोकांना वेगळाच अनुभव येत होता आणि कायदा व सुव्यवस्था ढळू न देताही लोक विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाणार नाहीत याची



चिखलठाणा विमानतळावर मुख्यमंत्री म्हणून स्वागत करताना नगराध्यक्ष द्वारकादास पटेल,
सोबत सहकार मंत्री भगवानराव गाढे, ग्रामविकास मंत्री खेडकर व इतर



केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांचे चिखलठाणा विमानतळावर मुख्यमंत्री म्हणून स्वागत करताना

खबरदारी घेता येते, हे यशवंतरावांनी दाखवून दिले.

याचबरोबर विधानसभेत आलेली काही विधेयकेही लक्षात घेण्यासारखी होती. मराठवाडा विद्यापीठ स्थापनेसंबंधी अहवाल देण्यासाठी न्यायमूर्ती एस० एम० पळनीटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. तिचा अहवाल १९५७ सालच्या डिसेंबरमध्ये सरकारला सादर करण्यात आला. या अहवालात ५८ सालच्या जूनपासून विद्यापीठाचे काम सुरू व्हावे अशी शिफारस केली होती. ती मान्य होऊन त्याप्रमाणे नव्या विद्यापीठाची स्थापना झाली व २३ ऑगस्ट रोजी त्याचे उद्घाटन पंडित नेहरूंच्या हस्ते झाले. नेहरूंनी आपल्या भाषणात यशवंतरावांच्या कारभाराची मुक्तपणे प्रशंसा केली. याच वेळी कोल्हापूरमध्येही दक्षिण महाराष्ट्रासाठी विद्यापीठ स्थापनेचा निर्णय घेण्यात येऊन प्राथमिक हालचाली सुरू झाल्या. कराड व औरंगाबाद इथे नवी इंजिनियरिंग महाविद्यालये स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आणि नागपूरच्या सरकारी इंजिनियरिंग महाविद्यालयास भारत सरकार पुरस्कृत महाविद्यालयाचा दर्जा मिळवून देण्यात आला. साताराची सैनिक शाळा, हे द्वैभाषिकाच्या काळात यशवंतरावांनी टाकलेले आणखी एक पाऊल होते.

औद्योगिक वसाहतींची स्थापना हे एक प्रगतिशील पाऊल होते. या वसाहती स्थापन करण्यासाठी पायाभूत सोयी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारने घेतली होती, पण त्या वसाहतींत उद्योगधंदे स्थापन करण्याचे काम हे खाजगी गुंतवणूकदारांचे होते. राज्याच्या अविकसित भागांत लहान व मध्यम कारखानदारी वाढीला लागावी हा या मागे उद्देश होता. तसेच केवळ शेतीमुळे ग्रामीण भागाचा विकास होणार नसून त्यास उद्योगधंद्यांची जोड मिळाली पाहिजे या दृष्टीने या वसाहतींची कल्पना निघाली. या

विधेयकांमुळे खरी अडचण समितीची झाली. कारण या विधेयकांत किरकोळ दुरुस्त्या सुचवण्यापलीकडे जाऊन विरोध करणे शक्य नव्हते.

दुसरी आघाडी होती मंत्रिमंडळाची. त्या आघाडीवर काम करताना गुजराती मंत्र्यांचा फार विरोध होणार नाही हे पाहावे लागत होते. ते कठीण गेले नाही. महाराष्ट्राच्या काही योजनांसाठी योजनेतील आर्थिक तरतूद वापरली न गेल्याचे आढळून आले. यशवंतरावांनी एक उदाहरण दिले आहे. मुंबई व पुणे या विभागांच्या म्हणजे पश्चिम महाराष्ट्राच्या, तरतुदीपैकी तीन कोटी रुपयांची रक्कम खर्च झाली नव्हती. हा प्रश्न मंत्रिमंडळापुढे आला तेव्हा तो कसा सोडवायचा, असे यशवंतरावांनी विचारले; तेव्हा गुजराती मंत्र्यांनी ती रक्कम पश्चिम महाराष्ट्रावर खर्च करण्यास अनुमती दिली. हे काम या रीतीने कौशल्याने पार पडले.

याप्रमाणे मुंबई राज्यातील वातावरण सुधारण्यात यशवंतराव यशस्वी झाले; हे त्यांचे विरोधक तसेच काँग्रेसश्रेष्ठी यांना मनोमन पटले होते. मुंबईतील व्यापार व उद्योग क्षेत्रांतील ज्या व्यक्ती महाराष्ट्राच्या संबंधात खरीखोटी भीती बाळगत होत्या किंवा तशी भीती असल्याचा बहाणा करत होत्या, त्यांचाही संशय दूर झाला. पण राज्य सुरळीतपणे चालणे, त्यात सलोखा राहणे ही गोष्ट निराळी. तथापि लोकांच्या मनाला लागलेली खरी बोच नष्ट झाली होती काय? याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागत होते. याचा प्रत्यय मधूनमधून विधानसभेच्या पोटनिवडणुका होत किंवा नगरपालिकांच्या निवडणुकी होत तेव्हा येत असे. मराठवाड्यात ५७ सालच्या निवडणुकीत काँग्रेसला यश मिळाले होते. पण नंतरच्या काळात विधानसभेच्या पोटनिवडणुकांत यश आले नाही. पाच जिल्हा बोर्डांच्या निवडणुकांपैकी काँग्रेसला चार जिंकता आल्या. याचा अर्थ मराठवाड्यातही काँग्रेस दुर्बळ झाली होती. या निवडणुका व पोटनिवडणुकांची परिणती काय होणार, याची कल्पना पंडित नेहरू व गोविंदवल्लभ पंत यांना आली. काँग्रेसच्या अध्यक्षपदी इंदिरा गांधी यांची निवड झाली होती. त्या अनेक राज्यांचे दौरे करत होत्या. महाराष्ट्राच्या काही भागाचा त्यांनी दौरा केला तेव्हा परिस्थितीचा अंदाज त्यांनी घेतला. यामुळे ५९ साल उजाडल्यावर या प्रमुख नेत्यांच्या द्वैभाषिकासंबंधीच्या विचारात बदल होऊ लागला. त्या सुमारास चीनने भारताच्या सीमेवर चालवलेल्या हालचाली, चिंता करण्यासारख्या होऊ लागल्या होत्या. देशातले वातावरण सीमेवरील घटनांमुळे कसे व किती बदलेल याची कल्पना येणे शक्य नव्हते, पण ते बदलेल असे मानण्यास जागा होती. लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुका ६२ साली होणार होत्या. सध्याचे वातावरण असेच टिकले किंवा अधिक बिघडले, तर महाराष्ट्र व गुजरात हे काँग्रेसला भरघोस पाठिंबा देणारे विभागच हातचे जाण्याचा धोका काँग्रेसश्रेष्ठींना दिसू लागला असावा. यामुळे द्वैभाषिकाच्या फेरविचारास चालना मिळाली.

प्रतापगडच्या समारंभानंतर व निदर्शनांनंतर यशवंतराव दिल्लीला गेले असता, पंडित नेहरूंनी त्यांना हैद्राबाद इथे काँग्रेस महासमितीची बैठक होईल तेव्हा भेटण्यास सांगितले. याबद्दल वाच्यता होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. याप्रमाणे यशवंतराव नेहरूंना भेटले. या भेटीसंबंधी यशवंतरावांनीच लिहून ठेवले आहे. त्यावरून असे दिसेल की, नेहरूंनी त्यांना महाराष्ट्र व गुजरातमधील परिस्थिती कशी आहे; गुजरात व विदर्भातल्या काही व्यक्तींची नावे घेऊन त्यांच्याशी संबंध कसे आहेत; कारभारयंत्रणा कशी चालू आहे आणि अधिकाऱ्यांचा प्रतिसाद कसा आहे? असे प्रश्न विचारले. यशवंतरावांनी या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले. कारभाऱ्यांचा प्रतिसाद उत्तम असून विकासाची कामे होत आहेत, परंतु–इतके म्हणून

ते थांबले. तेव्हा, 'हे परंतु काय,' असा प्रश्न नेहरूंनी विचारला. त्यास यशवंतरावांनी उत्तर दिले की, विकासाची कामे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी द्वैभाषिकाची गरज नाही अशी लोकभावना असून ते संतुष्ट नाहीत. इतके बोलून यशवंतरावांनी इतर मंत्र्यांशीही तुम्ही बोलणे बरे, तुम्हांला ते त्यांच्या मनातले सांगतील, अशी नेहरूंना सूचना केली. तेव्हा नेहरूंनी हसत सांगितले की, आपण अगोदरच काही मंत्र्यांशी बोललो असून त्यावरून तुमचे विश्लेषण बरोबरआहे. शासकीय दृष्ट्या द्वैभाषिक चांगले चालले आहे, पण राजकीय दृष्ट्या ते तसे नाही, हाच तुमच्या म्हणण्याचा अर्थ आहे ना? तुमच्या मनातले आहे हे खरे काय? त्यावर यशवंतरावांनी होकार दिला आणि आपल्या बोलण्यासंबंधी कोणाला काही कळू नये अशी इच्छा व्यक्त केली. (*ऋणानुबंध*, पृष्ठे ८८-९.)

यानंतर ५८ सालच्या नोव्हेंबरमध्ये नेहरू मुंबईत आले होते. उपनगरात त्यांचा कार्यक्रम होता. तिथे दुपारी नेहरूंनी यशवंतरावांना भेटीला बोलावले. त्यांनीच हैद्राबादच्या बोलण्याची आठवण दिली. मग विचारले की, द्वैभाषिक तोडून दोन स्वतंत्र राज्ये केली तर काँग्रेसला बहुमत मिळेल काय? यशवंतरावांनी सांगितले, की आपण याचा विचार केला नाही आणि कोणाशी या संबंधी बोललो नाही. पण याचे उत्तर पुढच्या भेटीत देऊ शकेन. पुढे काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला जानेवारीत झाले तेव्हा नेहरूंनी यशवंतरावांना काँग्रेसला बहुमत मिळेल की नाही, याबद्दल खाजगीत विचारले, त्यावर विरोधकांतील पंधरा जण तरी काँग्रेसला पाठिंबा देतील, कारण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळेच ते विरोधी गटात आहेत. ते काँग्रेस पक्षात येतील किंवा नाही हे सांगता येणार नाही, पण पाठिंबा देतील, असे



यशवंतराव यांच्या मातोश्री विठामाता, पंतप्रधान पंडित नेहरू, सौ० वेणुताई चव्हाण व इतर नातेवाईक



एका समारंभाप्रसंगी पंतप्रधान पं० नेहरू, मा० यशवंतराव, सौ० वेणुताई

यशवंतरावांनी उत्तर दिले. मग मार्च वा एप्रिलअखेर मोरारजीभाईशी याबद्दल बोलावे लागेल, असे नेहरू म्हणाले व ती बैठक तिथे संपली. पण मध्यंतरी यशवंतरावांचा मूत्रपिंडाचा विकार बळावला आणि शस्त्रक्रिया करावी लागली. यामुळे द्वैभाषिकाच्या संबंधीची चर्चा ऑगस्टमध्ये करण्याचे ठरले.

याप्रमाणे ऑगस्टमध्ये यशवंतराव दिल्लीस गेले. नेहमीप्रमाणे ते मोरारजीभाईकडे उतरले. दिल्लीला नेहरूंनी आपल्याला बोलावले असून, द्वैभाषिकाचा आढावा घ्यायचा असल्यामुळे तुमची उपस्थिती अपेक्षित असल्याचे यशवंतरावांनी मोरारजीभाईना सागितले. मोरारजीभाईनी द्वैभाषिकाचा आढावा हे काय आहे? असा प्रश्न विचारला तेव्हा यशवंतरावांनी आपले मत त्यांना सांगितले. यावर मोरारजी रागावले नाहीत, पण आपल्याला दु;ख झाले असे बोलून, तुमचे जर हे प्रामाणिक मत असेल तर त्याबद्दल आपण काही बोलू शकत नाही, असे ते म्हणाले. दुसऱ्या दिवशी सकाळी मोरारजीभाईच्या बरोबरच यशवंतराव पंडित पंत यांच्या निवासस्थानी गेले. तिथे नेहरू आले होते. बैठकीत यशवंतरावांना त्यांची भूमिका मांडण्यास सांगण्यात आले. त्यांनी सांगितले की, गुजरातमधले लोकही द्वैभाषिकाबद्दल संतुष्ट नाहीत. या संबंधीचा आपला अनुभव त्यांनी कथन केला. मोरारजीभाईनी द्वैभाषिक तोडण्यास आपला विरोध असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले आणि आपण ते तोडा असे सांगणार नाही, पण विरोधही करणार नाही, असे बोलून दाखवले. पंडित पंत म्हणाले की, चव्हाण जर या प्रकारे विचार करत असतील तर आपल्यालाही काही करावे लागेल. पण इतक्यावर हे संपणार नव्हते. ढेबर यांनी गुजरातच्या लोकांची कशी समजूत काढायची हा प्रश्न उपस्थित केला. तसेच विदर्भात अणे इत्यादीही महाराष्ट्रात विलीन होण्यास विरोध करत होते. या सर्वांची समजूत काढण्याची जबाबदारी नेहरूंनी

यशवंतरावांवर सोपविली. तेव्हा यशवंतरावांनी दादासाहेब कन्नमवार यांच्याशी चर्चा केली. त्यातून एक मार्ग निघाला. विदर्भातील वसंतराव नाईक, वानखेडे, तिरपुडे अशा काही जणांनी दिल्लीत जाऊन आपल्या लोकांशी बोलण्याची जबाबदारी घेतली. पण गुजरातचा पेच सोडवण्यासाठी यशवंतरावांनी मोरारजीभाईंचेच साहाय्य घेतले. तुम्हांला द्वैभाषिक तोडणे मान्य नसले, आपला विश्वासभंग झाला असे वाटत असले तरी आता माघार घेऊन चालणार नाही. तेव्हा आपण दोघांनी चर्चा करून हा प्रश्न सोडवू, असे यशवंतरावांनी सांगितल्यावर मोरारजींनी मान्यता दिली. दोघांत बोलणी झाली तेव्हा डांग व गुजरातची राजधानी हे दोन प्रश्न आहेत, असे ते म्हणाले. तेही कसे सोडवायचे याबद्दल चर्चा होऊन तोडगा निघाला.

ही सर्व हकिगत यशवंतरावांनी पंडित पंत यांना निवेदन केली व नेहरूंनाही सांगितली. त्यामुळे नेहरू आनंदित झाले. विदर्भासाठी एक समिती नेमण्याचे ठरले व पंत अध्यक्ष असलेली नऊ जणांची समिती नेमून मराठवाड्याचाही तीत समावेश झाला. या समितीच्या दोनतीन बैठका होऊन अखेरीस संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला. काँग्रेसच्या अध्यक्षा या नात्याने इंदिरा गांधी यांनी द्वैभाषिक बरखास्त करून, महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये निर्माण करण्याच्या कामी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. पंडित पंत यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या नऊ जणांच्या समितीचा अहवाल, काँग्रेस कार्यकारिणीने मंजूर करून द्वैभाषिक संपुष्टात आणण्याचा निर्णय ३ डिसेंबरला घेतला. गुजरात राज्याला येणारी तूट, राजधानी उभारण्याकरिता येणाऱ्या खर्चात महाराष्ट्राचा वाटा इत्यादी तपशील मुंबई राज्याच्या सचिव समितीने ठरवला. महाराष्ट्र राज्य स्थापन करण्याचा काँग्रेसचा निर्णय झाल्यानंतर संसदेने अखेरचे शिक्कामोर्तब करायचे होते. त्यापूर्वी मुंबईच्या द्वैभाषिक सरकारने विभाजनाचे विधेयक राज्याच्या विधिमंडळापुढे ठेवून, ते मान्य करून घ्यायची प्रक्रिया १९६० सालच्या मार्चमध्ये सुरू झाली. गांधींच्या खुनानंतर अनेक ब्राह्मणांची घरेदारे जाळली गेली होती त्यांना दिलेली कर्जे माफ करण्याची सूचना या वेळी जयंतराव टिळकांनी, यशवंतरावांना चिठी पाठवून केली आणि यशवंतरावांनी लगेच तसा निर्णय विधानसभेत जाहीर करून महाराष्ट्राची मागणी मंजूर झाल्याचा आनंद द्विगुणित केला.

विधिमंडळात या राज्यपुनर्रचना विधेयकावर तीन दिवस चर्चा झाली आणि ३ मार्चला यशवंतरावांनी या चर्चेत भाग घेतला. कठीण राजकीय समस्या सोडवताना नव्या समस्या निर्माण होणार नाहीत या दृष्टीने विधेयकावर चर्चा व्हावी, या आपल्या सूचनेचा आदर सभागृहाने केला याबद्दल यशवंतरावांनी विरोधीपक्षीयांचे आभार मानले. द्वैभाषिकाचा पर्याय आपला नव्हता, पण ते चालवण्याची जबाबदारी आपण स्वीकारली, असा खुलासा यशवंतरावांनी या भाषणात केला. विभाजनाच्या संबंधात योजना ठरवताना देवाणघेवाण करण्याचाच मार्ग रास्त होता. तीच दृष्टी आर्थिक तरतुदींबाबत स्वीकारली असा खुलासा यशवंतरावांनी केला. गुजरातला आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत काही आक्षेप घेतले गेले, पण यशवंतरावांनी त्याची बरीच फोड करून कारणमीमांसा दिली. डांगचा प्रश्न सोडवताना तिथल्या लोकल बोर्डाने गुजरातमध्ये डांगचा समावेश करण्याचा ठराव केला होता, हे लक्षात घेतले गेले. डांगची वाटणी करून तिथल्या लोकांची ताटातूट करणे बरोबर नाही, असा युक्तिवाद यशवंतरावांनी केला. ऊकाई धरण बांधण्याच्या कामात अडथळा येऊ नये म्हणून गुजरातला आमची काही गावे दिली आहेत. पण यापुढे अधिक गावे मिळणार नाहीत हेही त्यांनी स्पष्ट केले. विदर्भाबाबत नागपूर करार पूर्वीच झाला आहे.




मराठवाडा विद्यापीठ ग्रंथालय या इमारतीची कोनशिला, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते रविवार १६ ऑक्टोबर १९६०ला औरंगाबाद येथे बसविण्यात आली. सोबत रजिस्ट्रार डोंगरकेरी

त्या कराराला कायदेशीर मान्यता देण्यासाठी विधेयकात तरतूद केली असून, तिच्याकडे सभासदांनी लक्ष देण्याची विनंती यशवंतरावांनी केली. नवबौद्धांची मागणी, सवलती यांचा विचार पुनर्विभागणीनंतर ताबडतोबीने करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दुसऱ्या दिवशीच्या भाषणात त्यांनी महाराष्ट्राच्या सर्व भागांत शैक्षणिक सवलती चालू राहतील आणि म्हणून सालिना कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील मुलांना मोफत शिक्षण मिळत राहील, असे आश्वासन दिले. मराठवाड्यात विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता असून त्याबद्दलचा आग्रह धरला गेला आहे. मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून जितके प्रयत्न करता येतील तितके करण्याचे आश्वासन यशवंतरावांनी दिले. राज्याचे विभाजन होणार असल्यामुळे अस्तित्वात असलेल्या विधिमंडळाचे स्वरूप २५ मार्च रोजी संपणार होते. या शेवटच्या दिवशी सर्व सदस्यांचे आभार मानताना गुजरातच्या सभासदांचा त्यांनी खास उल्लेख केला. राजकीय शिस्त आणि निष्ठा यांचे शिक्षण गुजरातकडून घ्यावे असे ते म्हणाले. या रीतीने द्वैभाषिक राज्याचा प्रयोग वैधानिक क्षेत्रात संपुष्टात आला.

महाराष्ट्र राज्याची स्थापना होणार असल्यामुळे काँग्रेस पक्षात उत्साह निर्माण झाला होता तर १९५९ सालच्या आरंभापासून संयुक्त महाराष्ट्र समितीत बेबनाव होऊ लागला. मुंबई व पुण्याच्या नगरपालिकांत वादाला सुरुवात झाली असली तरी विधानसभेच्या निवडणुकीपासून मतभेद वाढू लागले होते. केरळमधील कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाविरुद्ध तिथे जनआंदोलन होऊन केंद्र सरकारने ते सरकार बरखास्त केले. त्यास पाठिंबा देणारा ठराव काँग्रेसने मुंबईच्या महापालिकेत आणला असता, समितीच्या

सदस्यांनी विरोध करावा अशी कम्युनिस्ट पक्षाची मागणी होती. पण समितीच्या आठ सभासदांपैकी काही तटस्थ राहिले तर कॉंग्रेसच्या ठरावाच्या बाजूने काहींनी मत दिले. यांत जे प्रजासमाजवादी पक्षाचे होते त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी अशी कम्युनिस्ट पक्षाने मागणी केली. यावरून बराच वाद झाला. आचार्य अत्रे यांनी प्रजासमाजवादी व विशेषत: एस० एम० जोशी यांच्याविरुद्ध टीका सुरू केली. ती वाढत जाऊन बेबंद होऊ लागली तेव्हा समितीच्या मध्यवर्ती सभेच्या बैठकीत डांगे यांच्यासह अनेकांनी अत्रे यांचा निषेध केला. पंडित नेहरू आधुनिक औरंगजेब असून महाराष्ट्राचे दुश्मन असल्याचा प्रचार, महाराष्ट्रात दुसरा गोडसे निर्माण करील असा इशारा दत्ता देशमुख यांनी एका भाषणात दिला. कम्युनिस्ट पक्षाचे प्रभाकर संझगिरी यांनीही अशिष्ट भाषा वापरण्याच्या प्रथेवर टीका करणारा लेख लिहिला होता.

संयुक्त महाराष्ट्र समितीतील वाद नंतर अधिकच चिघळला. कारण महाराष्ट्र राज्य स्थापन झाले तरी समितीतील घटक पक्षांनी समितीत विलीन व्हावे आणि एक पक्ष बनवावा असा कम्युनिस्ट नेत्यांचा आग्रह होता आणि अत्रे त्या प्रकारचा प्रचार आग्रहपूर्वक करत होते. एस० एम० जोशी यांना या प्रकारचा पक्ष बनवणे अमान्य होते. त्यांनी स्वच्छ सांगितले की, महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यासाठी समिती आहे. ते राज्य होत आहे. यानंतरच्या प्रश्नांबाबत प्रत्येक पक्षाने कोणती भूमिका घ्यायची हे स्वतंत्रपणे ठरवावे. समितीतील घटक पक्षांचा एक पक्ष करून तो चालणार नाही. सतत भांडणे होतील. निवडणुकीच्या वेळी ती वाढतील. तेव्हा आपल्याला चिटणीस या नात्याने असा नवा पक्ष चालवणे अशक्य आहे. याही स्थितीत मुंबईमधील कामगार क्षेत्रात प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट इत्यादी पक्षांनी एकत्र येऊन संघटना चालवण्यास एस० एम० जोशी यांची अनुमती होती, पण त्यांच्या पक्षीय सदस्यांना हे नामंजूर होते. शेवटी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर समितीतून प्रजासमाजवादी पक्ष बाहेर पडला.

अखेरीस संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेतील सर्व अडथळे दूर होऊन, महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांची स्थापना १ मे १९६० या दिवशी होणार असल्याचे जाहीर झाले. या समारंभाच्या आधी २७ एप्रिल या शिवजन्माच्या मुहूर्तावर, यशवंतरावांच्या हस्ते बालशिवाजी व मातोश्री जिजाई यांच्या पुतळ्याचे अनावरण शिवनेरीवर झाले. या प्रसंगी यशवंतरावांनी यथोचित शब्दांत महाराजांचा गौरव करताना त्यांच्या लोकाभिमुख कारभाराची व दूरदृष्टीची उदाहरणे दिली. नवा महाराष्ट्र घडत असताना शिवाजी महाराजांच्या स्मृतीला व मूर्तीला प्रणाम करण्याचे भाग्य लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना, यशवंतरावांनी नव्या कर्तृत्वाचे दालन उघडले असून महाराष्ट्रातल्या बुद्धिमंत व कर्तृत्ववान लोकांना आवाहन देणारा काळ आल्याची जाणीव करून दिली. तसेच महाराष्ट्राबद्दल बोलत असताना आपण देशाच्या भवितव्याबरोबर महाराष्ट्राचे भवितव्य जोडले गेल्याचे विसरून चालणार नाही, असे सांगण्यास ते विसरले नाहीत.या भाषणात त्यांनी आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकासाचे महत्त्व प्रतिपादन केले आणि या नंतरच्या यशवंतरावांच्या अनेक भाषणांचे मुख्य सूत्र हेच राहिले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सोहळा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर मोठ्या समारंभपूर्वक पार पडला. सभेला अलोट गर्दी होती आणि लोकांच्या उत्साहाला व आनंदाला उधाण आले होते. शुभेच्छा देताना नेहरूंनी विदर्भाकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता प्रतिपादून, विकासाच्या कामास वेग येईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यशवंतरावांनी महाराष्ट्रातर्फे व स्वत:तर्फे पंतप्रधानांचे आभार मानताना विकासाचे कार्य सर्व ताकदीसह करण्याची हमी दिली. त्याच संदर्भात यशवंतराव म्हणाले, ''आम्ही आज त्यांना परत आश्वासन देतो की, महाराष्ट्राचे हे जे राज्य



संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मंत्रिमंडळ. सोबत राज्यपाल श्रीप्रकाश

निर्माण झाले आहे ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम तर करीलच, शिवाय मराठी भाषिकांच्या जवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदात्त आहे, त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू, कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल.'' या समारंभानंतर नव्या राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. त्या प्रसंगी यशवंतरावांनी सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या धोरणाच्या निदर्शक अशी, सरकारच्या काही खात्यांची नावे बदलली असल्याचे जाहीर करून राज्याच्या सर्व विभागांच्या विकासाची दृष्टी ठेवली जाईल असे घोषित केले. यापुढे कारभारात मराठीचा वापर करण्यासाठी भाषासंचालनालय स्थापन करण्याचा निर्णयही त्यांनी घोषित केला. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून त्यांनी धर्मांतर करून बौद्ध झालेल्यांना, हरिजनांप्रमाणे सर्व सवलती चालू राहतील असेही जाहीर केले. हे एक लक्षणीय पाऊल होते.

याच दिशेने त्यांनी महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्यापूर्वीच पाऊल टाकले होते. ते म्हणजे महार वतनाची समाप्ती. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री असताना, म्हणजे १९५८ साली महार वतने नष्ट करण्याचे विधेयक आणून ते संमत करून घेतले. महार वतन ही एक गुलामी वा वेठबिगार होती. ब्रिटिश राज्यात ही पद्धती सुरू झाली. तीनुसार महार जमातीच्या लोकांना वतनी जमीन द्यायची आणि तिच्या बदल्यात वाटेल ते व तितके काम करून घ्यायचे. काम कोणीही सांगावे. ज्यास वतन दिले असेल तोच नव्हे, तर त्याच्या घरातल्या कोणालाही वेठीला धरले जात होते. थंडी, वारा, ऊन, पाऊस अशा कोणत्याही अवस्थेत व कोणत्याही वेळी काम सांगितले जात असे, त्याला वतन म्हणून दिलेली जमीन कसदार नसे व मोठीही नसे. महार गावकामगार हा सरकार व लोक यांचा नोकर होता. ही गुलामी नष्ट करण्यासाठी डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२२ व ३७ साली मुंबईच्या विधिमंडळात विधेयके आणली. पण ती तेव्हा संमत झाली नाहीत. यशवंतरावांनी द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून बाबासाहेबांची ही एक इच्छा पुरी

केली होती. तेव्हा बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतरही पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या सवलती चालू ठेवण्यात त्यांनी पुढाकार घ्यावा हे साहजिक होते. या सवलती देण्याचा प्रश्न नंतरच्या काँग्रेस कार्यकारिणीत आला असता, यशवंतरावांनी त्याचे समर्थन केले आणि कामराज प्रभृतींचा विरोध दूर करण्यात यश मिळवले, हे फारसे कोठे नमूद झालेले दिसले नाही. अस्पृश्य तसेच या समाजातून बौद्ध धर्माचा स्वीकार केलेले नवबौद्ध यांना, राज्यातील पडीक जमिनीपैकी काही जमीन मिळावी यासाठी दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न चालू झाले होते. यशवंतरावांनी या संबंधात सहानुभूतीची भूमिका घेऊन हा प्रश्न हाताळला.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर एस० एम० जोशी यांच्या षष्ट्यब्दीपूर्तिनिमित्त प्रसिद्ध झालेल्या अभिनंदन ग्रंथात, यशवंतराव व एस० एम० यांनी लिहिलेले लेख दोन्ही नेत्यांच्या एकमेकांबद्दलच्या भावना आणि त्यांनी दाखवलेले कर्तृत्व यांवर प्रकाश टाकणारे आहेत. यशवंतरावांनी लिहिले, ''मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना ते (एस० एम०) विधानसभेत विरोधी पक्षाचे नेते होते व संयुक्त महाराष्ट्र चळवळीचेहि ते धुरीण होते. विधानसभेतील त्यांच्या भाषणामुळे चर्चेची पातळी नेहमी वरची राहत असे. विरोध करताना कणखरपणे विरोध करूनहि त्यांनी निष्कारण कटु शब्द वापरले नाहीत आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी विधानसभेचे व्यासपीठ कुशलतेने वापरूनहि संसदीय प्रथांचा भंग होऊ दिला नाही.संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचेहि नेतृत्व त्यांनी अशाच कौशल्याने केले. पण समितीसारख्या आघाडीच्या राजकारणात यशस्वी होण्यासाठी ज्या गोष्टी लागतात त्या मात्र त्यांच्याजवळ नाहीत. त्यांना कशाचा लोभ नाही. तत्त्वासाठी सर्वार्पण करण्यातच त्यांना आनंद वाटतो. असा त्यांचा स्वभाव असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे काम संपल्यानंतर त्यांचे समितीमधील नेतृत्वहि संपुष्टात आले. ते काही असले तरी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करून त्यांनी महाराष्ट्राच्या दृष्टीने एक ऐतिहासिक कार्य केले आहे, असे मला वाटते. समितीच्या काळात ते विरोधी पक्षाचे नेतृत्व करीत असले तरी त्यांच्या मूलभूत भावनांशी मी सहमत होतो. कोणताहि पूर्वविचार न करता जणू आमच्यामध्ये एक प्रकारचा समझोता झाला असे आमचे संबंध त्या वेळी प्रस्थापित झाले होते''

याच अभिनंदन ग्रंथात एस० एम० यांनी ४ सप्टेंबर १९५९ रोजी त्यांच्या पत्नी ताराबाई यांना लिहिलेले पत्रही समाविष्ट केले आहे, त्यात एस० एम० लिहितात, ''या वेळी (प्रतापगड मोर्चाच्या वेळी) आंदोलन शांततामय राहील किंवा नाही, याबद्दल मला मात्र शंका वाटत होती. कारण समितीमध्ये पूर्वीसारखा एकोपा नाही आणि केरळातील राज्य गेल्यामुळे कम्युनिस्ट कसे वागतील याबद्दल चिंता वाटत होती. आज कलकत्त्यात जे प्रकार घडत आहेत ते पाहिले म्हणजे माझी भीति अकारण होती असे म्हणता येणार नाही. तरीहि सर्व विचार करून ते साहस करण्याचे मी योजले होते. या प्रकरणामध्ये यशवंतराव मात्र मुत्सद्देगिरीने वागले असेच मला वाटते. त्यांना 'मराठा'कारांनी कितीहि नावे ठेवली तरी त्यांनी अतिशय हुशारीने पावले टाकली. सहासात महिन्यांखाली माझे व त्यांचे जे बोलणे झाले ते मी तुला सांगितले होते. जवाहरलालजींना त्यांनी आपले मनोगत सांगितले होते. या वर्षअखेर काहीतरी निर्णय होईल अशी त्यांची उमेद होती. त्यामुळे १ नोव्हेंबरपर्यंत लढा वगैरे करू नये, असे ते म्हणत होते, ते त्यांना बरोबर वाटत असावे. तसे त्यांनी बोलून दाखवले नाही. परंतु मी त्यांच्या बोलण्याचा भावार्थ समजलो. त्यांना त्यांचे श्रेय दिलेच पाहिजे.

'विदर्भातील जनतेला आवाहन' हा लेख मी नागपूरच्या 'तरुण भारत'ला पाठवला आहे. 'साधने'तही



मा० पंडित नेहरू आणि मा० यशवंतराव व पद्मश्री विखे पाटील

प्रसिद्ध झाला आहे. विदर्भातील जनतेचे मन वळवण्याचे कार्य यशवंतराव करीत आहेत, ते आपलेच काम आहे. आणि आपली जबाबदारी आहे. ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने तो लेख लिहिला आहे.'' (*एस० एम० जोशी गौरव ग्रंथ*, पृ० १४३-४४)

त्या वेळच्या सर्व घटनांचा विचार आता शांत चित्ताने केल्यास यशवंतराव व संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते विशिष्ट मर्यादा सांभाळून वागत होते आणि उघड व अंतस्थ योजना न करूनही, त्यांनी एकच उद्दिष्ट गाठण्यात यश मिळवले असे म्हटले पाहिजे. दोन्ही बाजूंच्या नेत्यांच्या समंजस धोरणामुळे इतर काही राज्यांत घडले तसे उग्र हिंसक प्रकार झाले नाहीत. हा प्रश्न हाताळताना पंडित नेहरू व इतर काँग्रेसश्रेष्ठी यांनी वेळीच उदारता दाखवली असती आणि महाराष्ट्र काँग्रेसच्या नेतृत्वाने धरसोडीचे वर्तन केले नसते,

तर आंदोलन लवकर संपुष्टात आले असते. त्याचप्रमाणे लोकभावना तीव्र झाल्या असताना मोरारजीभाईऐवजी यशवंतराव मुख्यमंत्री असते तर इतके बळी गेले नसते आणि लोक प्रक्षुब्ध झाले नसते असे वाटले, तर ते वावगे ठरणार नाही. एस० एम० व यशवंतराव यांना श्रेय जाते तसेच कम्युनिस्ट पक्ष आगीत तेल ओतील ही भीतीही व्यर्थ ठरल्यामुळे त्यासही श्रेय दिले पाहिजे. बी० टी० रणदिवे यांच्यासारख्या अतिजहाल कम्युनिस्ट नेत्याने, सरकारशी पूर्ण असहकार करून विधिमंडळाचे कामकाजही होऊ द्यायचे नाही, अशी सूचना केली असली तरी भाई डांगे यांच्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने ती स्वीकारली नाही, हेही नमूद करणे अगत्याचे आहे.

ह० रा० महाजनी यांनी यशवंतरावांच्या यशाची मीमांसा करताना लिहिले आहे की, ''आंदोलनात (संयुक्त महाराष्ट्राच्या) त्यांची खरी कसोटी लागली. लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध जाण्याला विचारांचे बळ असावे लागते. आपल्या वैचारिक भूमिकेवर ठाम श्रद्धा असल्याखेरीज हे बळ अंगी येत नाही. या दिव्यातून पार पडल्यानंतर महाद्विभाषिकाचे सतीचे वाण पत्करणे ही दुसरी कसोटी होती. या कसोटीलाही ना० यशवंतराव उतरले. कारण महाद्विभाषिक राबवीत असताना त्यांनी दोन गोष्टी केल्या. त्यामध्ये त्यांच्या अंगी असलेले विचारप्राधान्य आणि मुत्सद्देगिरी हे दोन गुण प्रकर्षाने प्रकट झाले. एक, लोकमताचे वास्तव स्वरूप कधीही दृष्टिआड केले नाही व त्याला तुच्छ लेखले नाही, किंवा त्याचे फाजील लाड केले नाहीत. लोकमत विरोधी आहे हे सत्य ओळखणे ही बुद्धिवादाची पहिली पायरी. पण तें विरोधी आहे म्हणून बदलून घेण्याची खटपट करावयाची नाही असा याचा अर्थ होत नाही. द्विभाषिक राबवणे याचा अर्थ लोकमत बदलण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे असा होता. यापुढची पायरी म्हणजे असा प्रयत्न करूनही लोकमत बदलले नाही तर आपला प्रयत्न अयशस्वी झाला अशी प्रांजल कबुली देणे. स्वपक्षातील आपल्या सर्वश्रेष्ठ नेत्यांना आपले स्पष्ट मत सांगण्यासही तितकेच धैर्य लागते. —ना० यशवंतरावांनी घेतलेल्या ठाम बुद्धिवादी भूमिकेचा हा महान् विजय आहे.''(*श्री० यशवंतराव चव्हाण-अभिनंदन ग्रंथ*, पृ० ५९)

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमधील काही प्रमुख नेत्यांसंबंधी कोणती मते होती याची कल्पना, यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत व्यक्त झाली असून, ती नमूद करणे उचित होईल. या मुलाखतीवरून असे दिसेल की, शंकरराव देव यांच्यासंबंधी यशवंतरावांची मते संमिश्र स्वरूपाची होती. देव, गाडगीळ व जेधे यांनी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. परंतु शंकरराव देव यांची कार्यपद्धती आपल्याला पसंत नव्हती हे त्यांनी स्पष्ट केले. नंतर ते सांगतात की, काँग्रेसश्रेष्ठींनी त्यांना नाशिकच्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास सांगितले होते, पण सरदार पटेल यांनी टंडन यांना पाठिंबा दिला व नेहरूंनी कृपलानी यांना. यामुळे आपला पराभव झाला असे देव यांचे म्हणणे होते. त्यांना महाराष्ट्र वगळल्यास कोठूनही मते मिळाली नाहीत. यानंतर देव यांनी काँग्रेस सोडली. यशवंतराव म्हणतात की, काँग्रेस सोडल्यानंतर नेहरू व सरदार यांना नेते म्हणून मानायला देव तयार नव्हते. काँग्रेस लोकप्रिय करायची असेल व सर्वोदयी तत्त्वांनुसार चालवायची असेल तर या दोघांचे नेतृत्व सोडले पाहिजे, अशी देव यांची धारणा झाली होती. पण काँग्रेसजनांना हे अमान्य होते. तरीही आम्ही देव यांचा मान राखत होतो व आदर दाखवत होतो. आमच्या सल्लामसलतीत व निर्णयप्रक्रियेत देव यांना सहभागी करून घेत होतो. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत मतभेद होऊ लागले आणि यशवंतराव सांगतात की, १९५३-५४पासून आपण तरी देव यांना



महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या समक्ष स्वाक्षरी करताना

आपले नेते मानण्याचे सोडले होते. त्या काळात शंकरराव यांनी नेहरू व पटेल यांना ते नेते मानत नसल्याचे सांगितले त्यावर आपण शंकरराव देव यांना मानत नाही, असे एकच वाक्य काँग्रेसच्या बैठकीत बोललो. यामुळे खळबळ उडाली होती अशी माहिती दिली.

काकासाहेब गाडगीळ यांच्यासंबंधी यशवंतराव म्हणाले की, प्रथमपासून काका संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत सुसंगत भूमिका घेत होते. तसेच ते जे बोलत त्यात बदल करत नसत. देवांप्रमाणे त्यांची मते इतर प्रश्नांबाबतही होती असे नाही. नेहरूंनी त्यांना ५२ नंतर मंत्रिमंडळात स्थान दिले नाही यामुळे नेहरू सरकारबद्दल ते निराश झाले होते. पण कोणत्याही प्रश्नासंबंधी त्यांची मते स्पष्ट असत व सुसंगतही असत. महाराष्ट्राच्या राजकारणातील काकासाहेबांची कामगिरी, देव यांच्याइतकीच लक्षणीय होती. ते कडवे देशभक्त, त्यागी, उत्तम वक्ते होते. त्यांना वाङ्मयीन विषयाची आवड होती. त्यांनी अनेक विषयांवर पुस्तके लिहिली. काकासाहेब द्वैभाषिकाच्या विरुद्ध होते व आपणही होतो असे सांगून यशवंतराव म्हणाले की, आम्हां दोघांना महाराष्ट्र काँग्रेसमध्ये द्वैभाषिकाचा ठराव मांडण्यास सांगण्यात आले. मग काकांनी ठराव मांडला व आपण दुजोरा दिला. द्वैभाषिकाचा ठराव मांडल्यानंतर ते राबवण्याची जबाबदारी घेण्याऐवजी संयुक्त महाराष्ट्राचा आग्रह धरावा अशी काकांची भूमिका होती, पण ठराव केला तर द्वैभाषिक राबवण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे अशी आपण भूमिका घेतली. द्वैभाषिकाच्या



मा० आचार्य अत्रे यांच्यासमवेत

मंत्रिमंडळात भाऊसाहेब हिरे यांना आपण घेतले नाही, हे काकांना पसंत नव्हते. पण आपण त्यांचा आशीर्वाद मागायला गेलो असता त्यांनी तो दिला.

भाऊसाहेब हिरे यांच्याशी कोणत्या प्रकारचे संबंध होते, या प्रश्नाला यशवंतरावांनी उत्तर देताना सांगितले की, भाऊसाहेब हे स्वत:चा आब राखून वागणारे गृहस्थ होते. त्यांच्यात अनेक गुण होते, पण अवघड प्रसंगात पक्षाला तारून नेण्यासाठी लागणारे नेतृत्व करू शकणारे ते नव्हते. भाऊसाहेब आपल्या मतांशी प्रामाणिक राहिले, पण आमचा पक्ष त्या वेळी मोठ्या संकटकाळातून जात होता आणि यातून पार पडण्याचा मार्ग ते दाखवत नव्हते. भाऊसाहेब एक मत व्यक्त करत, पण शंकरराव देव वगैरेंशी बोलल्यावर मत बदलत. आपण संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली, मग द्वैभाषिकाचा पर्याय सुचवला आणि मग मुंबई स्वतंत्र करून त्रिराज्य योजना आली. तेव्हा काहीतरी निश्चित ठरवले पाहिजे आणि जी परिस्थिती येईल, तीमधून आपल्याला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे असे आपण भाऊसाहेबांना सांगितले होते, अशी माहिती यशवंतरावांनी दिली. एकदा राजीनामे देण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. तरीही नंतर आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीला जाऊ असेही ते म्हणाले. असे केले तर आपले हसे होईल, असे आपण म्हणालो. हे सर्व पाहिल्यावर आता निर्णय घेतलाच पाहिजे, नाहीतर आपला दुसरा भाऊसाहेब हिरे होईल, असे मला वाटले आणि मग फलटणला आपली भूमिका जाहीररीत्या मांडली. द्वैभाषिकाच्या मंत्रिमंडळात येण्याचे आमंत्रण भाऊसाहेबांना दिले नाही, याबद्दल काकासाहेब गाडगीळ, नानासाहेब कुंटे इत्यादी नाराज झाले होते. पण आपण कां बोलावले नाही याचा खुलासा यशवंतरावांनी मुलाखतीत केलेला आहे. त्यांचे म्हणणे असे की, आपण द्वैभाषिकाची अतिशय गंभीर जबाबदारी

घेतलेली असताना मंत्रिमंडळात एकोपाच असावा असा आपला कटाक्ष होता. हे मात्र खरे की, भाऊसाहेबांनी आपल्या मार्गात कधी अडचण निर्माण केली नाही, हे कबूल करून संयुक्त महाराष्ट्र होण्याच्या वेळची आठवण, यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत सांगितली.

त्यावरून असे दिसते की, यशवंतरावांनी द्वैभाषिक समाप्त करण्याच्या सुमारास भाऊसाहेबांशी चर्चा केली होती. तेव्हा गुजरातच्या राजधानीसाठी खर्च देण्यास व डांग गुजरातला देण्यास आपण संमती देणार नाही, असे भाऊसाहेब म्हणाले. नंतर महाराष्ट्र राज्य स्थापन झाले आणि ६२ सालची निवडणूक आली. त्या आधी महाबळेश्वरला काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर घेण्यात आले असता भाऊसाहेबांना आमंत्रण दिले होते व ते हजरही राहिले. निवडणुकीची यादी करताना नाशिक व जळगाव या जिल्ह्यांतील काही उमेदवारांचा आग्रह भाऊसाहेबांनी धरला असता चर्चा होऊन मार्ग काढला अशी पुस्ती यशवंतरावांनी जोडली. दुर्दैवाने भाऊसाहेबांचे लगेचच आकस्मिक निधन झाले.

स० का० पाटील यांच्यासंबंधी यशवंतरावांनी असे मत दिले की, पाटील यांची एकमेव चिंता मुंबईतील स्वत:चे स्थान कसे राहील, याबद्दलची होती. यामुळे मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास त्यांचा विरोध होता आणि महाराष्ट्राचे राज्य स्थापन झाल्यावर मुंबई प्रदेश काँग्रेस समिती ही वेगळीच राहिली पाहिजे असा आग्रह सोडायला ते तयार नव्हते. पाटील व्यक्ती म्हणून संबंध ठेवायला चांगले होते. पण त्यांची व आपली मते जमणारी नव्हती असे यशवंतराव म्हणाले. मुंबई प्रदेश काँग्रेसचे अस्तित्व संपुष्टात आणण्याची त्यांची तयारी नसल्यामुळे पेच निर्माण झाला व नेहरूंना निर्णय देण्याची वेळ आली. तेव्हा पाटील यांच्याशी बोलणी करून मार्ग काढण्याची नेहरूंनी सूचना केली. तसा तो निघाला नाही म्हणून मग यशवंतरावांनी सुचवले की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीला मुंबईत स्वतंत्र शाखा स्थापन करण्यास परवानगी द्यावी. ही तडजोड नेहरूंनी मान्य केली आणि मग मुंबईत महाराष्ट्र काँग्रेसची कचेरी स्थापन होऊन पुढे टिळक भवन ही इमारतही उभी झाली. मुंबई प्रदेश काँग्रेस समिती ही दीर्घ काळ अस्तित्वात असली तरी मुंबईच्या कामगार वर्गात तिला स्थान नव्हते. आंबेकर यांनी राष्ट्रीय मजूर संघ ही संघटना बांधली व जोपासली. ती राष्ट्रवादी होती. पण राजकीय घडामोडींवर ती अवलंबून असे. म्हणजे कामगारांना काही निधी हवा असेल किंवा आर्थिक मागण्या सरकारकडे करून लवादाकडे वगैरे जायचे असेल तर ते आंबेकरांच्या संघटनेकडे येत, पण संयुक्त महाराष्ट्रासारखी राजकीय चळवळ उभी राहिली तेव्हा मुंबईचा कामगार समाजवादी इत्यादी पक्षांच्या बाजूने गेला. यामुळे काँग्रेस नेते हे मुंबईच्या कामगारांचे वकील आहेत तर समाजवादी, कम्युनिस्ट इत्यादी नेते आहेत, असे वर्गीकरण यशवंतरावांनी केले होते.

यानंतर हे सर्व झाले खरे, पण सीमेवरील मराठी मुलुखाचा प्रश्न तसाच अधांतरी राहिल्याची उणीव तेव्हापासून बोचत राहिली. महाराष्ट्र राज्याची स्थापना होत असतानाच यशवंतरावांनी कर्नाटकच्या सरकारशी या संबंधात बोलणी सुरू केली होती. पण आयोगाने व केंद्र सरकारने जे दिले ते सोडण्यास ते राजी नव्हते. नंतरच्या काळात सर्व प्रकारे हा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न वाया गेले.

महाराष्ट्र राज्य हे मराठा राज्य होणार की मराठी, असा प्रश्न ग० त्र्यं० माडखोलकर यांनी यशवंतरावांना जाहीरपणे विचारला होता. याचे उत्तर ५ जानेवारी १९६० रोजी सांगलीतल्या जाहीर सभेत बोलताना यशवंतरावांनी दिले. माडखोलकर विचारवंत व साहित्यिक असून आपले मित्र असल्याचा निर्वाळा यशवंतरावांनी प्रारंभीच दिला आणि मग ते म्हणाले, ''असले प्रश्न उभे करणे ही भंगलेले मन सांधण्याची



साथी एस० एम० जोशी यशवंतरावांना हार घालताना

प्रक्रिया नाही. परंतु अशा तऱ्हेचा प्रश्न उभा करून जातीय आणि संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा कोणी प्रयत्न केला तर मला त्यांना जरूर सांगायचे आहे की, हे मराठा राज्य मुळीच होणार नाही. जोपर्यंत माझ्या हातात सत्तेची सूत्रे असतील तोपर्यंत निदान, मी हे राज्य एखाद्या जातीचे होऊ देणार नाही.'' या प्रकारे एका जातीचे राज्य होत आहे असे आपल्या कारकिर्दीत दिसले तर आपण अधिकारत्याग करू, अशीही घोषणा यशवंतरावांनी केली. तथापि ते एवढ्यावर थांबले नाहीत. सरकारी नोकऱ्यांत जातीच्या दृष्टीने पक्षपात होणार नाही, असा विश्वास निर्माण व्हावा म्हणून यशवंतरावांनी लोकसेवा आयोगाच्या (पब्लिक सर्व्हिस कमिशन) अध्यक्षपदी लेफ्टनन्ट-जनरल थोरात यांची नेमणूक केली. थोरात व थिमय्या हे कोरियन युद्धानंतर युद्ध कैद्यांचा प्रश्न सोडवण्याच्या कामगिरीवर होते. त्या दोघांच्या कामाची प्रशंसा नेहरूंनी संसदेत केली होती. नंतर नागा बंडखोरांचा प्रश्न हाताळण्याच्या कामीही थोरात यांनी लक्षणीय कामगिरी बजावली होती. यामुळे महाराष्ट्राच्या सर्व भागांत व सर्व थरांत थोरातांच्या संबंधी आदराची भावना होती. यशवंतरावांनी त्यांची नेमणूक करून अभिज्ञताच दाखवली.

महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर आर्थिक विकासाला गती देण्यासाठी विचारपूर्वक काही धोरणे आखण्यास व त्यांच्या अंमलबजावणीची व्यवस्था करण्यास यशवंतरावांनी प्राधान्य दिले. मराठी लोक व्यापारधंद्यात पुढे नसल्यामुळे भांडवलसंचय होण्यास कमी वाव होता. खाजगी भांडवलास मोकळीक देण्याचे धोरण स्वीकारूनही मराठी लोकांतच उद्योगधंद्याची दृष्टी यायची आवश्यकता होती. यावर उपाय म्हणून सहकारी तत्त्वावर कोणते उद्योग सुरू करता येतील आणि ते मराठी लोकांना चालवता येतील याचा तपशील ठरवण्यात आला. सहकाराचे तत्त्व महाराष्ट्रास नवे नव्हते व अवघडही नव्हते. विठ्ठलराव विखे पाटील यांनी डॉ० धनंजयराव गाडगीळ यांच्या सहकार्याने नगर जिल्ह्यांत सहकारी साखर कारखाना चालवला होता. त्या रीतीने साखर व इतर उद्योग सुरू करण्यासाठी साहाय्य देण्याचे धोरण ठरवण्यात आले. हे केवळ सहकारी साखर कारखान्यांपुरते मर्यादित न ठेवता, ग्रामीण भागांत शेती व उद्योग यांची वाढ करण्याच्या प्रयत्नांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे यशवंतराव व त्यांचे सरकार यांना पटले होते. ग्रामीण महाराष्ट्राचा विकास हा केवळ शेतीवर अवलंबून राहून होणार नाही, हे यशवंतरावांचे मत पूर्वीच बनले होते. अगदी लहानशा खेड्यात त्यांचे बालपण गेले होते आणि नंतरही अशाच वातावरणात ते अनेक वर्षे राहिले होते. यामुळे ग्रामीण भागांच्या प्रश्नांचे, त्यांचे व त्यांच्या बहुतेक सहकाऱ्यांचे ज्ञान हे पुस्तकी नव्हते तर स्वानुभवावर आधारलेले होते. खेड्यातले जीवन हलत नाही; त्यात काही जिवंतपणा वा चैतन्य आणायचे तर लोकांना उद्योग मिळाला पाहिजे, हे यशवंतरावांच्या मनाने पक्के घेतले होते.

त्या काळात व नंतर ग्रामीण भागाचा विकास करण्याचा विचार करताना, यशवंतराव ग्रामोद्योग, स्वयंपूर्ण खेडी, ग्रामस्वराज्य अशा गोष्टी करताना दिसत नाहीत. तसेच सरसकट कारखानदारी निर्माण करणे शक्य नसल्याची कल्पना त्यांना होती. यामुळे महात्मा गांधींच्या राजकीय नेतृत्वापासून प्रेरणा घेऊनही यशवंतरावांनी ग्रामोद्योगाचा पुरस्कार केला नाही. याचा अर्थ ग्रामीण उद्योग त्याज्य मानले असा नव्हे, पण हे सर्व आधुनिक शास्त्र व तंत्र यांच्या आधारे केल्याशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा होती. या बाबतीत पंडित नेहरूंसारखी त्यांची भूमिका होती. *ए बंच ऑफ लेटर्स* या नावाचा नेहरूंच्या पत्रांचा संग्रह आहे. त्यात त्यांना आलेली व त्यांनी लिहिलेली पत्रे असून काही गांधीजींना लिहिलेली आहेत. एका पत्रात नेहरूंनी गांधींना सरळच लिहिले आहे की, खेड्यात काही स्वयंभूच उच्च, उदात्त आहे असे आपल्याला वाटत नाही. त्याचे जीवन आधुनिक यंत्रसामग्रीने सुधारण्याची गरज आहे. या सर्व

यंत्रतंत्राचा उपयोग मूठभर लोकांच्या सुखासाठी न होता, सर्व समाजासाठी झाला पाहिजे हा आग्रह रास्त आहे, पण या सर्वांना निरोप देण्यात काहीच हित नाही अशी नेहरूंची धारणा होती; यशवंतरावांचीही तशीच होती.

या दृष्टीमुळे कोकणच्या प्रश्नांबाबत दिलेल्या भाषणात यशवंतरावांनी तिथल्या बंदरांची सुधारणा, खाड्या मोकळ्या करणे आणि मासेमारीचा विकास करण्याबरोबर फळबागा वाढवण्यास प्राधान्य देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. हे फळबागा वाढवण्याचे काम कोकणात ठळकपणे सुरू होण्यास काही वर्षे लोटली आणि त्याचे महत्त्वही सर्वमान्य झाले. केवळ कोकणच नव्हे, तर कमी व अनिश्चित पावसाच्या महाराष्ट्रासारख्या राज्यात, जिथे शक्य असेल तिथे फळबागांची वाढ ही शेतकऱ्यांना लाभदायक ठरणारी असून राज्याच्या अनेक भागांत याचे प्रत्यंतर गेल्या काही वर्षांत आले आहे.

महाराष्ट्रात भांडवलसंचय मर्यादित प्रमाणात होईल तेव्हा नवे उद्योग निर्माण करण्यासाठी सहकाराचा प्रसार करण्यासाठी यशवंतरावांनी आवश्यक ती धोरणे अमलात आणली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ते स्वत: दोन अडीच वर्षे मुख्यमंत्रिपदावर होते. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, बँका, दूध सोसायट्या इत्यादींचा विस्तार नंतर झाला. त्याचा पक्का पाया यशवंतरावांच्या कारकिर्दीत घातला गेला. विदर्भात विणकरांची सहकारी सूत गिरणी निघाली तिला सरकारतर्फे पन्नास लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले. या सहकारी क्षेत्रात नंतर काही अपप्रवृत्ती वाढल्या हे त्यांना मान्य होते. पण सहकारी क्षेत्राचा विस्तार झाल्यामुळे महाराष्ट्राच्या सर्व नव्हे पण काही विभागांत नवे जीवन फुलले. शाळा, महाविद्यालये यांची संख्या वाढून शिक्षण घेतलेल्यांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली. विशेष म्हणजे ग्रामीण भागात पैसा आला आणि लोकजीवन बदलत गेले. तसेच साखरकारखाना, बँका इत्यादी चालवणारे कोट्यवधींचा व्यवहार करू लागल्यामुळे आधुनिक जीवनात ते सामील झाले. यामुळे पारंपरिक दृष्टी बदलण्यास मदत झाली. सामाजिक अभिसरणास यामुळे चालना मिळाली.

ग्रामीण भागातील या परिवर्तनासंबंधी लिहिताना किंवा पंचायत राज्यासंबंधी लिहिताना त्यांतील जातीपातींवर विशेष भर देऊन लिहिले जाते. याच रीतीने राजकारणाचीही चिकित्सा काही विद्वान करतात आणि सहकारी संघटना, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यांवर यशवंतरावांनी पकड ठेवून आपले राजकीय आसन बळकट कसे केले याची चिकित्सा काही विवेचक करताना दिसतात. या संबंधी एक गोष्ट दृष्टिआड केली जाते ती ही की, भारतीय समाज हा जातिबद्ध आहे. शिवाय या समाजाने लोकशाही पद्धती स्वीकारली आहे. यामुळे जी जमात जिथे बहुसंख्य, ती त्या भागात प्रबळ होणार हे उघड आहे. अर्थात बहुसंख्य जमातीच्या लोकांनी सामाजिक न्यायाची जाणीव ठेवून इतरांनाही सहभागी करावे ही अपेक्षा रास्त आहे. हे केवळ महाराष्ट्रातच झाले नाही, सर्व राज्यांत अशीच परिस्थिती निर्माण झाली. उत्तर भारतातील अनेक राज्यांत बहुजनसमाजाच्या हाती सत्ता आली नव्हती. त्यामुळे मोठा उद्रेक पंचवीसएक वर्षांपूर्वी झाला. महाराष्ट्र व तामिळनाडूत तसा तो झाला नाही.

या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे की, राज्यपातळीवरच्या बहुसंख्य जातींना इतर बहुजन समाजाची उपेक्षा करून चालणार नाही हे दिसून येऊ लागले आहे. हेही निवडणुकीच्या राजकारणाचे फलित आहे. हे चित्र बदलण्यास वेळ लागेल. जेव्हा कारखानदारी अधिक वाढेल, यंत्राधिष्ठित समाज वाढेल तेव्हा लोक एकाच भागात गर्दी करून राहणार नाहीत आणि आपोआपच जात, भाषा, धर्म यांची बंधने आजच्यासारखी राहणार नाहीत, निदान ती खूपच कमी होतील. आजच महाराष्ट्रातील काही शहरांचे



मा० यशवंतराव चव्हाण

स्वरूप आधुनिक अर्थव्यवहारामुळे बदलत आहे. अमेरिकेत अनेक देशांतून आलेले लोक राहतात. आधुनिक अर्थव्यवहारामुळे हे शक्य झाले आहे. तरीही सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर असे दिसेल की, आयरिश, ज्यू, इतकेच काय, कॅथलिक इत्यादी विविध पंथांचे लोक आपल्या मतदारसंघात असले, की उमेदवार जी भूमिका घेतो तशी ती एकाच गटातले मतदार असल्यास घेत नाही.

यशवंतरावांनी समाजवादी विचारांचा अभ्यास केला होता आणि त्यांतील काहींचा त्यांच्यावर प्रभाव होता. मार्क्सवादाच्या व त्यातही सोव्हिएत युनियनने आर्थिक नियोजनाचे जे स्वरूप स्वीकारले होते, त्याच्या आकर्षणामुळे पंडित नेहरूंनाही काही काळ विशेष प्रभावित केले होते. यामुळे सामुदायिक

शेतीचा प्रयोग निदान मर्यादित क्षेत्रात प्रथम करून पाहण्याची त्यांची कल्पना होती. काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात तसा ठराव आणण्यात आला. चौधरी चरणसिंग यांनी या ठरावास विरोध केला. पण ठराव मंजूर झाला. तथापि चरणसिंग जे उघड बोलले ते अधिवेशनास जमलेल्या बहुसंख्य काँग्रेसजनांचे मत होते. यामुळे ठराव संमत झाला असला तरी कोणीही तो अमलात आणणार नाही, हे इंदिरा गांधी यांनी मात्र ओळखले होते; असे इंदर मल्होत्रा यांनी त्यांच्या इंदिरा गांधींच्या चरित्रात म्हटले आहे. इंदिरा गांधींनी बघितले होते की, उत्तर भारत, ओरिसा इत्यादी राज्यांतल्या जमीनदारांच्या मालकीच्या जमिनी कमी करून, जमीनसुधारणा करण्याच्या कामी राज्य सरकारातील काँग्रेसजनच विरोध करत आहेत. यशवंतरावांना सामुदायिक शेतीची कल्पना अव्यवहार्य वाटत होती. महाराष्ट्रात उत्तरेप्रमाणे जमीनदारी नव्हती. तेव्हा तिकडच्या काँग्रेसजनांशी यशवंतरावांचे जमणारे नव्हते. तरी त्यांना सामुदायिक शेतीची योजना अव्यवहार्य वाटत होती. कारण ग्रामीण भागात वाढल्यामुळे, शेतकऱ्याची सर्वात मोठी आकांक्षा स्वत:च्या मालकीची जमीन असणे ही असल्याची त्यांना जाणीव होती. म्हणून आपण सामुदायिक शेतीचा पुरस्कार करत नाही, असे त्यांनी म्हटल्याचे आढळेल.

शेतकरी व शेती यांच्या दृष्टीने यशवंतरावांनी केलेला आणखी एक प्रयत्न उल्लेखनीय होता. नियोजन मंडळ कमाल जमीनधारणेचे समान धोरण सर्व देशभर अमलात आणण्याबाबत आग्रही होते. प्रत्येक राज्याची परिस्थिती वेगळी होती. तेव्हा समान धोरणाच्या आग्रहामुळे महाराष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितीची दखल घेतली जात नव्हती. इथे बंद पडणाऱ्या खाजगी साखर कारखान्यांकडे बरीच जमीन होती. ती कमाल जमीनधारणेच्या कायद्याखाली आणल्यास गोंधळ उडणार होता. कारण ही जमीन स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनकडे जाणार होती. तिचे तुकडे झाल्यास या कॉर्पोरेशनला व्यवहार करता आला नसता. या प्रश्नाची चर्चा नियोजन मंडळाच्या व अखिल भारतीय विकास मंडळाच्या बैठकांत होत असे. गुल्झारीलाल नंदा हे नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष होते आणि ते काही लवचिकपणा दाखवत नव्हते. यामुळे चर्चेचे गुऱ्हाळ चालू राहिले आणि त्या अवधीत महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यामुळे यशवंतरावांचे हात अधिक मोकळे झाले. नियोजन मंडळाच्या बैठकीत नंदा आपल्या धोरणात काहीच बदल करत नाहीत असे पाहून, यशवंतरावांनी हा प्रश्न धसाला लावायचे ठरवले आणि त्यांनी नेहरूंपुढे आपली बाजू मांडली. यात काही तथ्य असल्याचे नेहरू म्हणाले आणि मग त्यांनी नियोजन मंडळाला एक टिपण पाठवले. यामुळे यशवंतरावांना महाराष्ट्राबाबत कमाल जमीन धारणेबद्दलच्या बाबतीत जो बदल हवा होता तो झाला आणि एक मोठा अडसर दूर झाला.

राज्यात औद्योगिक विकास करण्यासाठी यशवंतरावांच्या कारकिर्दीत औद्योगिक विकास मंडळ स्थापन झाले. या संबंधीच्या विधेयकावर विधिमंडळात बोलताना ते म्हणाले की, सहकारी वा खाजगी क्षेत्रातील उद्योग कोठे सुरू करायचा हे सरकारने सांगण्यात अर्थ नसतो. पाणी, वीज, कच्च्या मालाचा पुरवठा तसेच वाहतुकीची सुविधा अशा विविध घटकांच्या अनुकूलतेवर कारखान्याचे ठिकाण उद्योजक निवडत असतो. त्याला या सुविधा मिळवून देणे हे या महामंडळाचे काम असेल.मुंबई शहराबाहेर उद्योगधंदे जावेत व सरकारने तसे धोरण जाहीर करावे असे काहींचे म्हणणे असले, तरी यात मुंबईचे व महाराष्ट्राचेही नुकसान असल्याचे यशवंतरावांनी दाखवून दिले. या महामंडळाने स्वत:च्या पतीवर कर्ज उभारले पाहिजे. तसेच औद्योगिक वसाहती कोठे स्थापन करायच्या याचा निर्णय सरकार घेणार असले तरी त्या वसाहतींचा विकास महामंडळ व गुंतवणूकदार यांनी करायचा आहे, सरकारची ही लवचीक व



प्रमुख उद्योजक श्री० शंतनुराव किर्लोस्कर, श्री० रामनाथ पोतदार, श्री० रावसाहेब गोगटे आदी उद्योगपतींसह

वस्तुनिष्ठ भूमिका होती. नंतरच्या काळात स्थानिक नेत्यांच्या राजकीय दडपणाखाली अशा वसाहतींची स्थापना होत गेली. यामुळे अनेक वसाहती नावापुरत्या उरल्या.

केंद्र सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. तिचा अहवाल आल्यानंतर महाराष्ट्र राज्यात ही योजना कशा रीतीने अमलात आणावी याचा तपास करण्याकरिता, तेव्हाचे महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती यशवंतरावांनी नेमली. त्या समितीने दिलेल्या अहवालावर विधानसभेत चर्चा झाली आणि नंतर जिल्हा परिषदांचा कायदा होऊन त्याची अंमलबजावणी सुरू झाली. जिल्हा परिषदा स्थापन करून जिल्हा पातळीवर काही अधिकार दिले गेले आणि ग्रामपंचायतीही विकसित होऊ लागल्या. या अहवालावर विधानसभेत झालेल्या चर्चेच्या वेळी यशवंतरावांनी जे विचार मांडले, ते आधुनिक काळाच्या गरजा लक्षात घेणारे होते. विधेयक संमत होऊन जिल्हा परिषदांचे काम सुरू होताना ६१ साल उजाडले. नंतरच्या काळात 'टाइम्स ऑफ इंडिया'त गुजरात, महाराष्ट्र, आंध्र अशा राज्यांतील जिल्हा परिषदांच्या कार्याचा आढावा नियमितपणे घेणारे लेख येत होते. त्यावरून तेव्हा हा प्रयोग बराच यशस्वी झाल्याचे दिसून आले.

ग्रामस्वराज्य इत्यादी संबंधात काही काव्यमय गोष्टी ऐकवल्या जात असतात. तसेच पाश्चात्त्य देशांत लोकशाही येण्यापूर्वी कितीतरी आधी भारतात ग्रामपंचायतीच्या रूपाने ती आली होती असा दावाही केला जातो; तो फसवा आहे. या संबंधात लोकमान्य टिळक व पंडित सातवळेकर यांच्यातील संभाषणाचा काही भाग उल्लेखनीय ठरेल. एकदा पंडित सातवळेकरांच्या हातात नारायण भवानराव पावगी या विद्वानांचे *सेल्फ गव्हर्नमेंट इन इंडिया–वैदिक अँड पोस्ट वैदिक डेज* हे पुस्तक होते. ते पाहून ही पूर्वीची श्राद्धे करून करायचे काय? असा प्रश्न टिळकांनी विचारला. यावर सातवळेकर म्हणाले 'वैदिक काळापासून आमच्या पूर्वजांनी स्वराज्यविषयक काय काय उलाढाली केल्या हे जर आज लोकांस समजले तर पुष्कळच उपयोग होईल'. तेव्हा लोकमान्यांनी प्रश्न केला, कसला उपयोग? आणि मग ते



वसंतराव नाईक यांच्यासमवेत यशवंतराव

म्हणाले, 'त्या वेळचे ते ट्रायबल गव्हर्न्मेंट, टोळ्यांचे राज्य घेऊन आज काय त्याचा उपयोग? आज राज्यशास्त्राचा केवढा विस्तार झाला आहे व किती गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत. त्या सर्वांचा उलगडा काही जुने शब्द फोडीत बसल्याने होणार नाही'. हे लक्षात घेतल्यास यशवंतरावांचे पुढील विचार कसे कालानुरूप होते याची कल्पना येईल. ते म्हणाले, 'काही लोकांना वाटते की, पंचायतींची कल्पना आपल्या देशात फार जुनी आहे. मी असे सांगू इच्छितो की, ग्रामपंचायतींची कल्पना आपल्या देशात जुनी असली तरी तिला आजच्या काळात एक नवीन अर्थ प्राप्त झाला आहे. या शब्दप्रयोगाच्या बाबतीत माझा व्यक्तिश: जो विचार आहे तो असा की, आमचे जे ग्रामीण जीवन आहे ते संघटित करून आम्हांला एक नवे ग्रामीण जीवन निर्माण करावयाचे आहे—माझ्या नजरेपुढे केवळ भूतकाळातीलच ग्रामीण जीवनाचे चित्र उभे राहते असे नाही—आज दुनियेमध्ये ज्या नव्या शक्ती निर्माण झाल्या आहेत आणि जे नवे सामर्थ्य निर्माण झाले आहे, त्या नव्या शक्तींनी व नव्या सामर्थ्याने आपल्या सामाजिक जीवनात प्रवेश केला आहे. या शक्तींच्या आणि सामर्थ्याच्या मदतीने घडणारे उद्याच्या नवीन ग्रामीण जीवनाचे मी एक चित्र पाहात आहे.'

याच भाषणात यशवंतरावांनी स्पष्ट केले की, 'आम्हांला सत्तेचे विकेंद्रीकरण करायचे आहे, सत्तेचे विसर्जन नाही. हीच गोष्ट अगदी साध्या शब्दांत सांगावयाची तर असे म्हणता येईल की, जिच्यामुळे खुर्दा निर्माण होईल अशा तऱ्हेने आम्हांला सत्तेची वाटणी करायची नाही. कारण आम्हांला ज्या जबाबदाऱ्या वाढवावयाच्या आहेत त्यांतील राज्य चालले पाहिजे ही मुख्य जबाबदारी आहे.' सत्तेचे इतके विकेंद्रीकरण करायचे की केंद्राकडे वा राज्याकडे काही सत्ताच राहणार नाही, अशा प्रकारचे विचार काही गांधीवादी म्हणवणारे आजकाल करत असतात. राजकीय पक्ष विसर्जित करून पक्षविरहित



पंचायत राज याविषयी भाषण करताना. सोबत बॅ० शेषराव वानखेडे, मुख्यमंत्री कन्नमवार, आबासाहेब खेडकर

लोकशाही स्थापन करण्याचीही कल्पना हीच मंडळी मांडत असतात. कोणत्या तरी काल्पनिक भूतकाळात असा समाज असल्याची त्यांची समजूत आहे आणि तसाच काल्पनिक भविष्यकाळ निर्माण करण्याचा भूलभुलैया ते निर्माण करू पाहतात. त्यांना यशवंतरावांच्या या भाषणात उत्तर मिळू शकेल.

नव्या राज्याच्या स्थापनेनंतर हिवाळा आला व विधानसभेचे अधिवेशन नागपूरला भरले. याच अधिवेशनाच्या वेळी, म्हणजे २२ डिसेंबर १९६० रोजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना यशवंतरावांच्या हस्ते झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मंडळाचे अध्यक्ष निवडले गेले. उद्घाटन करताना यशवंतरावांनी प्रारंभीच स्पष्ट केले की, सरकारने हे मंडळ स्थापन केले असले तरी त्याच्यावर सरकारचे बंधन नाही. त्यानंतर ते म्हणाले, भौतिकदृष्ट्या जगात जे जे शास्त्र उंचावले आहे त्या त्या शास्त्रातील ज्ञान आपल्यात उतरविण्याचे सामर्थ्य मराठी भाषेला प्राप्त झाले पाहिजे–ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचविले पाहिजेत. मग यशवंतरावांनी मराठी इतिहासाचे नव्याने लेखन होण्याची निकड प्रतिपादन केली. विदर्भ आणि मराठवाड्यात इतिहासाची जुनी साधने विखुरली आहेत, ती जमविण्याचे काम मंडळाने करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पण केवळ भूतकालाचे उत्खनन करून तितकेच ज्ञान लोकांपुढे न आणता वर्तमान काळाकडे लक्ष द्यावे आणि भविष्यकाळाकडे नजर ठेवून आम्हांला मदत करावी, अशी इच्छाही त्यांनी बोलून दाखवली. मंडळाने नंतर विश्वकोशाची योजना मांडली ती, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी. साहित्य संस्कृती मंडळाने अनेक उत्तम ग्रंथ प्रसिद्ध केले वा प्रसिद्ध करण्याकरिता हातभार लावला. विश्वकोशामुळे अनेक प्रकारचे शास्त्रीय ज्ञान मराठीत येण्यास मदत झाली. मंडळाचा पसारा नंतर वाढत गेला. प्रारंभीच्या काळात त्याचे सभासद थोडे होते, पण कालांतराने प्रादेशिकतेची कसोटी लावली जाऊ लागली आणि सभासदांची संख्या वाढत गेली,

यामुळे जे व्हायचे तेच झाले. मंडळाच्या कार्याचे परीक्षण करण्याचे इथे प्रयोजन नाही.

अशा रीतीने महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर विविध उपक्रम सुरू झाले आणि त्यात स्वत: यशवंतराव लक्ष घालत होते. राज्यभर उत्साह व अपेक्षा निर्माण झाल्या व वाढत गेल्या.काहीतरी नवे घडत आहे याची जाणीव निर्माण झाली;

नव्या जीवनाचा नाद
मला ऐकू येत आहे
लक्ष शून्यातून
काही श्रेय आकारत आहे

अशी दाद कुसुमाग्रजांनी दिली.

ग० दि० माडगूळकर यांनी कविता लिहिली :

कोटि मुखांनी आशिर्वच दे महाराष्ट्र माता
औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा, प्रियतम यशवंता !
तुमच्या लेखीं नगरी नगरी देवराष्ट्र होई
घराघरांतुन उभ्या ठाकल्या वरद विठाबाई
'स्वस्ति' वांछितो जनपुरुषोत्तम, उंचावून शतां–
सह्याद्रीच्या शिखरीं उठती स्वायंभव नाद
सातपुड्याच्या कड्यांत घुमती त्याचे पडसाद
'अजातशत्रू', आज लाभला अम्हां राष्ट्रनेता !
शिवस्मृतीची शाल अर्पिती, लोक लोकमान्यां,
टिळकपणाचा टिळक लाविती तुम्हां नागकन्या
प्रतिपदच्चंद्रापरी वाढु द्या अशिच यशोगाथा–
लोकशाहिचे तुम्ही पेशवे, सेवेचे स्वामी
तुमच्या मागें राहो जनता नित्य पुरोगामी
समर्थ होवो महाराष्ट्र हा, भारत-भूमि-त्राता

६१ साल उजाडले आणि त्याने आपल्याबरोबर काही संकटे आणली. १२ जुलैला पुण्यास आणि साऱ्या महाराष्ट्रास हादरा देणारी घटना घडली. त्या दिवशी पानशेत धरण कोसळले आणि पुण्यात पुराचे पाणी शिरले. नुसती नदीकाठची वस्तीच नव्हे, तर शहराचा बराच मोठा भाग पाण्याखाली गेला. सर्वत्र हाहाकार उडाला. यशवंतराव तातडीने पुण्यात दाखल झाले. त्यांनी पाहणी केली आणि तडकाफडकी काही निर्णय घेतले. जिल्हाधिकारी स० गो० बर्वे हे कार्यक्षम अधिकारी होते. त्यांना यशवंतरावांनी अनेक अधिकार देऊन नोकरशाहीची गुंतागुंत राहणार नाही हे पाहिले. लष्कराची मदत घेण्यात आली आणि सर्व कामे युद्धपातळीवर सुरू झाली. बर्वे यांनी नागरिकांना पाणी व वीज लवकरात लवकर मिळवून देण्यावर कटाक्ष ठेवला. पूरग्रस्तांची व त्यामुळे आश्रय घेणारांची संख्या वाढत गेली. त्यांच्यासाठी मदत केंद्रे स्थापन झाली. पूरग्रस्तांना मदत देण्याचे आवाहन यशवंतरावांनी करताच, साऱ्या महाराष्ट्रातून



उद्‌घाटनप्रसंगी. सोबत मुख्यमंत्री वसंतराव नाईक, स० गो० बर्वे, मधुकरराव चौधरी

मदतीचा ओघ सुरू झालाच, शिवाय इतर राज्यांनीही मदतकार्यात भाग घेतला. यात आर्थिक मदत होती तसेच धान्य, कापड, साखर यांचाही समावेश होता. सहा दिवसांत मुख्यमंत्र्यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन लोकांनी ५ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी उभा केला. पंतप्रधान पंडित नेहरूंनी पूरग्रस्त पुण्याची पाहणी केली आणि मग केंद्र सरकारकडून तीन कोटी रुपयांची रक्कम आली.

पुण्यावर ही आपत्ती कोसळल्यावर धरणफुटीची चौकशी करण्याची मागणी होणे साहजिक होते. पण सरकार व धरण बांधणारे इंजिनिअर्स यांच्यावर हलगर्जीपणाचा आरोप करण्यासही काहींनी कमी केले नाही. पानशेतचे धरण मातीचे होते व म्हणून ते फुटले असा गैरमाहितगार लोकांनी समज करून घेतला असता तर ते समजण्यासारखे होते. पण जे विचार करू शकतात त्यांनीही हाच समज करून घेतला. मातीचे धरण हे आपल्याकडेच प्रथम बांधले असे नव्हे. अशी धरणे प्रथम बांधणारा प्रख्यात इटालियन इंजिनिअर होता. त्याने अशी धरणे बांधूनसुद्धा त्याचे एक धरण फुटले होते. आपल्या इंजिनिअर्सनी कौशल्याने काम केले होते. पण अपघात होतात आणि तसा तो पानशेत धरणाच्या बाबतीत झाला.

विधिमंडळात या अपघाताबद्दल चर्चा झाली आणि चौकशीची मागणी घेऊन सरकारने न्यायमूर्ती बावडेकर यांची नेमणूक केली.त्यांचे काम चालू असता काही वृत्तपत्रांनी व पुढाऱ्यांनी टीकासत्र चालू ठेवले. त्यातच न्यायमूर्ती बावडेकर यांनी आत्महत्या केली. मग अफवा व टीका यांना काही धरबंदच राहिला नाही. बावडेकरांच्या जागी न्यायमूर्ती नाईक यांची नियुक्ती झाली. त्यांच्या अहवालात सर्व माहिती दिली गेली. यामुळे हे प्रकरण थांबले. दुसरा कोणी असता तर त्याच्या राजकीय जीवनाची समाप्तीच झाली असती. पण यशवंतरावांनी सर्व बाजू लोकांपुढे मांडली होती आणि यामुळे त्यांना काही काळ मनस्ताप सहन करावा लागला, पण राजकीय स्थानाला धक्का लागला नाही.



गोविंदवल्लभ पंत, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासमवेत

६२ साल हे निवडणुकीचे होते. महाराष्ट्रात काँग्रेस व इतर पक्षांनी यासाठी ६१ सालपासून वा त्या वर्षाच्या उत्तरार्धापासून तयारी सुरू केली. यापूर्वी ५७ सालात द्वैभाषिक असताना निवडणूक आली होती. ती काँग्रेसला अतिशय जड गेली आणि संयुक्त महाराष्ट्र समितीने पश्चिम महाराष्ट्रात विशेष जोर केला होता. या वेळी परिस्थिती बदलून ती काँग्रेसला अनुकूल झाली होती. महाराष्ट्र राज्याची स्थापना आणि मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी दाखवलेले नेतृत्व यामुळे काँग्रेस बळकट झाली. जे महाराष्ट्र राज्याच्या प्रश्नावर काँग्रेस सोडून गेले होते ते परत आले. शिवाय प्रजासमाजवादी व शे० का० पक्ष यांतूनही काही काँग्रेसमध्ये आले. दोनचार कम्युनिस्टही पक्षांतर करून आले. या संबंधात काहींनी यशवंतरावांवर पक्षफोडीचा आरोप केला आणि आजही तसाच तो निराळ्या शब्दांत करतात. ज्यांनी पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला त्यांना आमिषे दाखवली; त्यांनी सत्तालोभामुळे पक्षत्याग केला अशी टीका होत आली आहे. शिवाय यशवंतरावांनी बहुजनसमाजाला आकर्षित करून काँग्रेसमध्ये मराठा समाजाचे प्रस्थ वाढवले, असे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सुचवण्याचे धोरण आजही काहींनी अवलंबिलेले दिसते. या बाबतीत काही गोष्टी दृष्टिआड केल्या जातात. एक ही की, केशवराव जेधे व शंकरराव मोरे संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी शे० का० पक्ष सोडून काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. त्या वेळी यशवंतराव मुख्यमंत्री नव्हते. शे० का० पक्षास ५२ सालच्या निवडणुकीतील पराभवामुळे गळती लागली होती आणि त्याच्या सदस्यांना आमिष दाखवण्याचा प्रश्न नव्हता. महाराष्ट्र राज्य होण्यापूर्वीच हा बदल होऊ लागला होता आणि ते राज्य स्थापन झाल्यानंतर शे० का० पक्षातल्या काहींनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

बेचाळीस सालचे आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यामुळे प्रजासमाजवादी पक्षात अनेकजण राहिले होते. पण स्वातंत्र्य आले आणि संयुक्त महाराष्ट्र नंतर आला तेव्हा प्रजासमाजवादी पक्षातल्या काही

जणांना काँग्रेस पक्षात सामील व्हावेसे वाटले. या पक्षातही दुफळी माजण्याचे प्रकार अगोदरपासून घडले होते. यामुळे काही जण कम्युनिस्ट पक्षात गेले. दुसरी दुफळी पडली तेव्हा डॉ० राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखाली वेगळा पक्ष स्थापन झाला. यावरून हे दिसून येईल की, शे० का० पक्ष व प्रजासमाजवादी या दोन्ही पक्षांची फुटीची परंपरा जुनी होती. त्या मानाने कम्युनिस्ट आणि जनसंघ यांच्यात फाटाफूट होऊन काँग्रेसचा आश्रय घेणाऱ्यांची संख्या दुर्लक्षित करावी अशी होती. शे० का० व प्रजासमाजवादी या दोन पक्षांतच ही फाटाफूट कां झाली व त्यांतले काही जण काँग्रेसमध्ये कां दाखल झाले, याची चिकित्सा करणे अधिक युक्त होईल. तसेच प्रजासमाजवादी पक्षातले जे कम्युनिस्ट पक्षात गेले त्यांच्याबद्दल टीकेचा सूर न निघण्याचे कारण शोधायला हवे. बरे, काँग्रेसमध्ये शे० का० पक्षातून आलेल्या बहुतेकांना मंत्रिपदे मिळाली असेही म्हणता येणार नाही. यशवंतराव मोहिते काही वर्षे राज्यमंत्रीच राहिले होते. समाजवाद्यांपैकी विठ्ठलराव गाडगीळ यांना मंत्रिपद काही वर्षांनी मिळाले व तेही केंद्रात. शिवाजीराव पाटील यांना महाराष्ट्रात राज्यमंत्रिपद मिळण्यास काही वर्षे लागली.

मराठा समाज बळकट करण्याचे यशवंतरावांचे प्रयत्न या पक्षांतराच्या मागे होते असे म्हणताना, राजकीय वास्तवाचा विचार केला पाहिजे. काँग्रेसमध्ये शे० का० पक्षातून बरेच जण आले, ते मराठा होते हे खरे. पण त्या पक्षातच मराठा लोकांचा मुख्य भरणा होता. प्रजासमाजवादी पक्षातून काँग्रेसकडे वळलेल्यांत काही मराठा होते. या स्थितीत मराठा समाजाचा आपला पाया मजबूत करण्यासाठी खास प्रयत्न यशवंतरावांनी केले हे विधान अतिव्याप्त म्हटले पाहिजे. शिवाय महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या जागृत व सक्रिय झालेल्या बहुजनसमाजातील मराठा लोकांची संख्या अधिक होती. तेव्हा त्यांचा भरणा



एका कार्यक्रमानंतर सतरंजीवर बसलेले यशवंतराव, विनायकराव पाटील (नाशिक) व इतर नेते

काँग्रेसमध्ये अधिक होणे हे तेव्हा साहजिक होते. नंतरच्या काळात काँग्रेसमध्ये फाटाफूट झाली तेव्हाही मराठा आमदार, खासदारांची संख्या अधिक होती, कारण तेच राजकारणात अधिक प्रमाणात होते. तथापि आता महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती बदलत आहे. ज्यांना इतर मागासलेल्या जाती म्हणतात, त्यांच्यात राजकीय जागृती होत असून तेही सत्तेत भागीदार होऊ पाहत आहेत. शिवाय दलितही जागृत आहेत. ते संघटित मात्र नाहीत. अशा वेळी स्वातंत्र्योत्तर काळात शंकरराव देव इत्यादींनी दूरदृष्टी दाखवली नाही तशी आता मराठा नेतृत्वाने इतर मागास जाती व दलित यांच्याबद्दल न दाखवून चूक करू नये.

राज्यात काँग्रेस पक्ष बळकट करण्यात यशवंतराव यशस्वी होऊ लागले असताना, ६१ साली भावनगर इथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी कार्यकारिणीच्या काही जागा मतदानाने भरायच्या होता, त्यांत यशवंतरावांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर इंदिरा गांधी पहिल्या क्रमांकावर होत्या. या विजयामुळे अखिल भारतीय काँग्रेस संघटनेच्या पातळीवर यशवंतरावांना स्थान प्राप्त झाले. पुढील काळात ते काँग्रेसच्या संसदीय मंडळाचे (पार्लमेंटरी बोर्डाचे) सभासद म्हणून नियुक्त झाले. हे मंडळ लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करत होते.

काँग्रेस पक्षात यशवंतराव या प्रकारे एकेक पायरी वर चढत असताना, ६२ सालच्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला अभूतपूर्व विजय मिळाला. विधानसभेच्या २६५ जागांपैकी काँग्रेसला २१४ जागा



भाऊसाहेब नेवाळकर यांच्यासमवेत, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ दशवार्षिक समारंभ, १९७२



गुलझारीलाल नंदा यांच्यासमवेत

मिळाल्या. निवडणुकीच्या प्रचाराच्या बाबतीत यशवंतरावांनी नवा पायंडा पाडला. त्यांनी एक प्रचारसमिती स्थापन केली. तिने उमेदवार व तिचे प्रचारक यांना उपयोगी पडतील अशा लहान लहान पुस्तिका तयार केल्या. तसेच महाबळेश्वर इथे कार्यकर्त्यांचे शिबिर घेऊन प्रचाराची दिशा ठरवण्यात आली. हे सर्व वेगळे होते. प्रचारसमितीची मुख्य जबाबदारी भाऊसाहेब नेवाळकर यांच्याकडे होती तर कलापथकासाठी ग० दि० माडगूळकर यांनी कवने केली. शिबिरांची ही कल्पना यशवंतरावांच्या पक्ष घडवण्याच्या विचारांची निदर्शक होती. कार्यकर्त्यांनी केवळ नेत्यांच्या जयजयकारावर न भागवता, लोकांपुढील प्रश्नांची चर्चा प्रचारात करावी हा हेतू होता. या शिबिरात उत्सवीपणाला रजा दिलेली असे. कार्यकर्त्यांना मन मोकळे करून बोलण्याची मुभा होती आणि त्यांच्या प्रश्नांना यशवंतराव, त्यांचे मंत्री व काही नेते उत्तरे देत. केवळ शिबिरातच नव्हे, तर यशवंतरावांच्या दौऱ्यातही कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात अनेकदा प्रश्नोत्तराचा वा शंकासमाधानाचा कार्यक्रम होई. सातारा, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यांतले अनेक कार्यकर्ते खोचक व मर्मभेदक प्रश्न विचारण्यात तरबेज होते. मेळाव्यातील त्यांचे प्रश्न व यशवंतरावांची उत्तरे हे सर्वच ऐकण्यासारखे असे.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर शे० का० पक्ष व प्रजासमाजवादी पक्षातले काहीजण काँग्रेसमध्ये आले. मग विरोधी पक्षांचे झाले काय? असा एक प्रश्न जयंत लेले यांनी घेतलेल्या मुलाखतीत होता. यशवंतराव यांनी सांगितले की, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांबरोबर आपली अनेकदा बोलणी होत असत. प्रतापगडच्या मोर्चाच्या वेळी काही गोंधळ होऊ नये म्हणून आपण दत्ता देशमुख यांच्यातर्फे प्रथम बोलणी केली होती, अशी माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर इतर विरोधी पक्षांची ताकद कमी झाली तशी ती शे० का०पक्षाचीही झाली. या प्रकारे वेगळा पक्ष काढण्याची गरज नाही;

काँग्रेसमध्ये जाऊन तीत बदल करणे शक्य आहे. राष्ट्रीय प्रवाहात राहिले पाहिजे ही भूमिका आपण घेतली होती. शे० का० पक्ष फार काळ एक प्रबळ पक्ष म्हणून राहू शकणार नाही, असे आपले मत होते. शिवाय पूर्वीच्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचा पगडा या पक्षावर काही प्रमाणात राहिला होता. शंकरराव मोरे हे बुद्धिमान होते, त्यांची लेखणी व वाणी धारदार होती. पण पक्ष चालवायचा तर लोकांशी जमवून घेऊन वागावे लागते, मोरे यांचा स्वभाव याविरुद्ध होता. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळे या पक्षाचा प्रसार झाला, पण महाराष्ट्राचे राज्य स्थापन झाल्यावर पक्षातून अनेकजण बाहेर आले. नंतर सीमाप्रश्नावर या पक्षाने बरेच दिवस राजकारण केले. मग काहीजण लोकसभेत आले. त्यांनी लोकसभेच्या कामात लक्ष घालून नाव मिळवले नाही. महाराष्ट्राचे प्रश्न त्यांनी लोकसभेत मांडावे, देशापुढील प्रश्नांची चर्चा करावी असे आपण सुचवत होतो, पण त्यांचे मन विशेष लागत नव्हते. तुम्ही एका संकुचित प्रश्नावरच सर्व लक्ष केंद्रित केले तर लोकसभेत करण्यासारखे काही राहत नाही, असा अभिप्राय यशवंतरावांनी दिला.

निवडणुकीनंतर नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी ९ मार्च १९६२ रोजी झाला. प्रारंभीच्या दिवसांतच अगोदर संमत झालेले सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊन, पंचायती व जिल्हा परिषदा स्थापन झाल्या. त्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या तेव्हा काँग्रेसला अपेक्षेप्रमाणे बहुतेक ठिकाणी बहुमत मिळाले. नव्या विधानसभेचे उद्‌घाटन करताना राज्यपालांचे भाषण झाले व त्यावर चर्चा झाली. या चर्चेत भाग घेताना आमदार फाटक यांनी केलेल्या काही विधानांचा प्रतिवाद करताना विकासाची दृष्टी, समाजवाद व सहकार यांसंबंधी यशवंतरावांनी केलेले विवेचन उल्लेखनीय आहे. ते म्हणाले, 'सन्माननीय सभासद श्री० फाटक यांनी सैद्धान्तिक समाजवादाचा उल्लेख करून सरकारच्या धोरणावर टीका केली–सरकार ज्या मार्गाने समाजवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे तोच मार्ग योग्य आहे, असा सरकारचा विश्वास आहे. त्यांनी आपल्या भाषणात 'सधन शेतकरी' असा शब्दप्रयोग केला आणि म्हटले की, सहकारी चळवळीचा प्रमुख 'सधन शेतकरी' आहे. कोणत्या अर्थाने त्यांनी हा शब्दप्रयोग केला हे मला समजत नाही. पाच-दहा एकर जमिनीचा जो शेतकरी मालक आहे त्याला कोणी सधन शेतकरी म्हणणार नाही–महाराष्ट्राच्या शेतकरी समाजाबद्दल त्यांच्या काही चुकीच्या कल्पना आहेत.महाराष्ट्रात सधन शेतकरी नाहीत– सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्र पुढे आहे असे जेव्हा आम्ही म्हणतो, तेव्हा केवळ साखर कारखान्याच्या दृष्टीने म्हणतो असे नाही. महाराष्ट्रात सहकारी चळवळीने अनेक क्षेत्रांत प्रवेश केला आहे.'

मुख्यमंत्री या नात्याने यशवंतराव निरनिराळ्या योजना व उपक्रम राबवत असताना, भारताच्या उत्तर सीमेवर कम्युनिस्ट चीनने आक्रमण केले आणि आपल्या सैन्याची त्याच्याशी गाठ पडली. या सीमावादाच्या तपशिलात जाण्याचे इथे प्रयोजन नाही. हा वाद काही वर्षे चालू होता आणि त्यात तडजोड न होऊन चीनने आक्रमणाचा मार्ग स्वीकारला. सर्व देश यामुळे खडबडून जागा झाला. सीमेवर आपल्या सैन्याला माघार घ्यायला लागल्यावर लोकसभेत एकच गदारोळ झाला आणि काँग्रेस पक्षानेही तेव्हाचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांचा राजीनामा मागितला. पंतप्रधान पंडित नेहरूंनी मेनन यांना संरक्षण देण्याचा बराच प्रयत्न केला, पण तो अयशस्वी होऊन मेनन यांना राजीनामा देण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. नोव्हेंबरच्या तीनचार तारखांना विकास मंडळाची बैठक होती व मुख्यमंत्री त्या बैठकीसाठी हजर होते.



सौ० वेणुताई चव्हाण यांच्यासमवेत एका समारंभात

भूमिपूजन समारंभात सौ० वेणुताईंसह





सौ० वेणुताई यशवंतराव चव्हाण



बाळासाहेब देसाई, सौ० वेणुताई यांच्यासह एका सभेत


इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष सोकार्नो यांच्यासमवेत सोबत पत्नी सौ० वेणुताई चव्हाण


पद्मश्री विखे पाटील, पंडित नेहरू व अण्णासाहेब शिंदे यांच्यासमवेत


कोयना जलविद्युत केंद्राच्या बोगद्याची पाहणी करताना पंतप्रधान पं० जवाहरलाल नेहरू यांच्यासोबत



पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासमवेत






श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराड (जिल्हा सातारा) सायन्स कॉलेज या इमारतीचे उद्घाटन
राष्ट्रपती डॉ० राजेंद्रप्रसाद करत असताना, त्यांच्यासमवेत–बुधवार दिनांक १४ डिसेंबर १९६०




ग्रंथालयाची पाहणी करताना



१९५२मध्ये झालेल्या राज्य विधीमंडळ सार्वत्रिक निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरताना.
सोबत माजी आमदार आबासाहेब पार्लेकर



साहित्यसंमेलन (इचलकरंजी) प्रेक्षकांच्या समवेत. सोबत मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वि० स० पागे व बाळासाहेब देसाई



मोरारजी देसाई यांच्यासमवेत



डॉ० राजेंद्र प्रसाद यांच्यासमवेत



आगाखान यांच्यासमवेत



राणी एलिझाबेथ यांच्यासमवेत. सोबत पत्नी सौ० वेणुताई चव्हाण



इंग्लंडची राणा एलिझाबेथ आणि प्रिन्स फिलीप यांच्यासमवेत



वृक्षारोपण करताना प्रिन्स फिलीप, इंग्लंडची राणी एलिझाबेथ आणि यशवंतराव चव्हाण



इंग्लंडची राणी एलिझाबेथ, प्रिन्स फिलीप आणि राज्यपाल श्रीप्रकाश यांच्यासमवेत



पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते मुंबई येथे ब्रेबॉर्न स्टेडियमवर साहित्यिक परिषदेचे उद्‌घाटनप्रसंगी



सहावे पोप पॉल यांच्यासमवेत



राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन्, विजयालक्ष्मी पंडित, कन्नमवार यांच्यासमवेत




पंतप्रधान पंडित नेहरू, पुणे येथे महिला मेळाव्यात भाषण करताना



आगरकर स्मारकात त्यांच्या पुतळ्याजवळ न्या० व्ही० ए० नाईक, आचार्य अत्रे यांच्यासमवेत



एका निवांत क्षणी



राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन्, पंतप्रधान पंडित नेहरू, मोरारजी देसाई, स्वर्णसिंग यांच्यासमवेत



पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्वागतप्रसंगी



राष्ट्रपती राधाकृष्णन, विजयालक्ष्मी पंडित यांच्यासमवेत. सोबत मोहन धारिया, कन्नमवार, राम प्रधान



पंतप्रधान इंदिरा गांधी, दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून झोपडीत जाऊन चर्चा करीत असताना त्यांच्यासोबत



पूना पीपल्स को० ऑपरेटिव्ह बँकेच्या सुवर्ण महोत्सवप्रसंगी भाषण करताना



भाषण करीत असताना. सोबत शंकरराव बाजीराव पाटील



पुणे येथील शेती माल बाजार समितीच्या कार्यक्रमात यशवंतराव मोहिते भाषण करीत असताना
त्यांच्यासोबत यशवंतराव चव्हाण व शरद पवार



राष्ट्रपती झाकीरहुसेन यांच्यासमवेत एका समारंभात



राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्यासमवेत एका समारंभात



राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्याबरोबर. सोबत मुख्यमंत्री वसंतराव नाईक, अण्णासाहेब शिंदे, अनंतराव पाटील

यात यशवंतरावही होते. त्यांनी डॉ० जयंत लेले यांना या बैठकीसंबंधात अशी माहिती दिलेली दिसेल की, बैठकीस जमलेल्या मुख्यमंत्र्यांत कृष्ण मेनन यांच्या भवितव्याची अनौपचारिक चर्चा होणे साहजिक होते. तशी ती झाली, तेव्हा आपापल्या राज्यात मेननविरोधी वातावरण तापलेले असल्याचा सर्वसाधारण सूर होता. यानंतर पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांना याची कल्पना देण्याची सूचना केली गेली. इंदिरा गांधी यांनी आपल्याला निरोप पाठवून मुख्यमंत्र्यांना घेऊन पंतप्रधानांना भेटणे अगत्याचे आहे असे सांगितले. या कठीण काळात आपल्या पिताजींनी मेनन यांना त्वरित दूर करण्याचा निर्णय घ्यावा व मुख्यमंत्र्यांच्या भेटीमुळे हे सुलभ होईल, असे इंदिरा गांधी यांना वाटत असावे. पंतप्रधानांना भेटण्यास इंदिरा गांधींनी सांगितले. त्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांची व नेहरूंची भेट झाली. प्रतापसिंग केरॉं, कामराज, संजीव रेड्डी, यशवंतराव व बिजू पटनाईक हे त्या वेळी हजर होते.

या बैठकीत नेहरूंनी प्रत्येकाला त्याचे मत विचारले. कामराज यांचे मत पक्के झाले होते की नाही, हे स्पष्ट झाले नाही. मेनन यांना यशवंतरावांनी लिहिलेले पत्र नेहरूंनी वाचले होते, हे त्यांच्या बोलण्यावरून कळून येण्यासारखे होते. यशवंतरावांनी नेहरूंना सांगितले की, मेनन यांच्याबद्दल आपल्याला आत्मीयता आहे. त्यांना दूर करावे लागणे ही दु:खद गोष्ट आहे. पण दिल्लीतल्या दोन दिवसांच्या वास्तव्यात लोक मेनन यांच्यावर रागावले आहेतच, पण तुमच्यावरही टीका करू लागले आहेत, हे मला दिसून आले. तेव्हा तुमची सूचना काय, असा प्रश्न नेहरूंनी केला. यशवंतरावांनी उत्तर दिले की, आपण आताच जे म्हणायचे ते म्हटले आहे. या प्रसंगी जपूनच बोलले पाहिजे. हे ऐकल्यावर नेहरू उद्विग्न झाले. मग जरा तीव्रतेनेच त्यांनी विचारले की, हे लोक मेनन यांचा बळी मागत आहेत म्हणून मी त्याप्रमाणे वागू काय? आज जर मी हे ऐकले तर उद्या ते माझा बळी मागतील. यानंतर पाचदहा मिनिटे नेहरू अतिशय त्वेषाने बोलत राहिले. ते एक भाषणच होते. यशवंतरावांनी लेले यांना सांगितले की, नेहरूंच्या मेनन यांच्याबद्दलच्या काय भावना होत्या हे यामुळे कळून आले. ते म्हणाले की, मंत्रिमंडळात मेनन यांच्या तोडीचा कोणी नाही; मंत्रिमंडळातील चर्चेत तेच काही भरीव सूचना करतात. तथापि अखेरीस नेहरू म्हणाले, तुम्हा मंडळींचे विचार आपण जाणू शकतो आणि त्यामागे सद्भावना आहेत, हेही मला मान्य आहे. आता काय करायचे ते आम्ही ठरवू. यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मुंबईला परतण्याचा निर्णय यशवंतरावांनी घेतला.

या सर्व घडामोडीनंतर नेहरूंनी मेनन यांचे संरक्षणखाते स्वत:कडे घेतले आणि मेनन यांना मंत्रिमंडळातून न काढता संरक्षणसाहित्याचे उत्पादन खाते दिले. पण मेनन यांनी एका मुलाखतीत सांगितले की, आपले खाते बदलले असेल, पण तो तांत्रिक स्वरूपाचा बदल आहे. आपण पूर्वी जे काम करत होतो तेच आताही करतो. या त्यांच्या वक्तव्यामुळे संसदेत व देशात वादळ उठले. कॉंग्रेस पक्षाची बैठक घेण्याची भाषा सुरू झाली. तेव्हा नेहरूंनी मेनन यांना बोलावून राजीनामा मागितला. संसदेत या घोषणेचे स्वागत झाले.

पुढील घटनांबद्दल यशवंतरावांनी लेले यांना सांगितले की, नेहरूंनी संरक्षणखाते स्वत:कडे घेतले असले तरी ते त्यांनी स्वत:कडे न ठेवता, कोणाची तरी संरक्षणमंत्री म्हणून निवड करावी अशी चर्चा दिल्लीत सुरू झाल्याचे आपल्या कानांवर आले. तसेच मोरारजीभाई, कृष्णम्माचारी आणि सर्वांत महत्त्वाकांक्षी असे बिजू पटनाईक हे संरक्षण खाते मिळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आपल्या कानांवर आले. मुख्यमंत्र्यांच्या या बैठकीपूर्वी यशवंतराव व कृष्ण मेनन यांची भेट झाली होती.

आपल्याविरुद्धच्या वातावरणाची मेनन यांना कल्पना होती. तेव्हा या विषयावर बोलत असताना यशवंतरावांनी मेनन यांना सांगितले की, त्यांनी तिन्ही सेनादलांतील काही निवृत्त सेनाधिकाऱ्यांना बोलवावे आणि त्यांच्याशी चर्चा करावी. तेही देशभक्त आहेत, तेव्हा त्यांच्याशी सल्लामसलत करण्यात काही वावगे नाही. अशांची एक संरक्षणविषयक समिती का स्थापन करू नये? या सेनाधिकाऱ्यांवर लोकांचा विश्वासही असेल. या भेटीनंतर यशवंतरावांनी मेनन यांना याच धर्तीवर एक पत्रही लिहिले. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. नेहरूंच्या भेटीत ज्या पत्राचा निर्देश अप्रत्यक्षपणे झाला, त्याचा मथितार्थ हा होता.

यानंतर ६ नोव्हेंबर १९६२ रोजी दुपारी यशवंतराव सचिवालयात काम करत बसले असताना पंतप्रधान नेहरू यांचा फोन आला. त्यांनी यशवंतरावांना सांगितले की, तुमच्या कार्यालयात कोणी असतील तर त्यांना थोडा वेळ दूर होण्यास सांगा, कारण मला अत्यंत खाजगी बोलायचे आहे. नेहरू म्हणाले, मी जे सांगणार आहे ते पूर्णपणे गुप्त राहिले पाहिजे. याची वाच्यता होता कामा नये. नेहरू नंतर म्हणाले की, तुम्ही मला दिल्लीत संरक्षणमंत्री म्हणून यायला पाहिजे. यावर यशवंतराव म्हणाले, की आपल्याला थोडा वेळ द्यावा आणि निदान एका व्यक्तीला हे सांगावेच लागेल. नेहरूंनी विचारले, अशी कोण व्यक्ती आहे? यशवंतराव म्हणाले, माझी पत्नी. नेहरू यावर हसले आणि त्यांनी पुन्हा एकदा गुप्तता पाळण्यास सांगितले. यशवंतरावांनी उत्तर दिले की, आपण तुम्ही बोलवाल तिथे येऊ, पण तुम्हांला मी खरोखरच यायला हवा काय, याचा निर्णय तुम्ही घ्या. नेहरूंनी, त्यांनी यायला हवे असल्याचा त्यांचा निर्णय सांगितला. नंतर केंद्रीय गृहमंत्र्यांचाही फोन आला. संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला जाण्याची गोष्ट यशवंतरावांनी वेणुताईना सांगितली तेव्हा त्यांना प्रथम तितका उत्साह वाटला नाही. तिथले वातावरण पूर्णत: अपरिचित तेव्हा कसे होणार, इत्यादी विचार त्यांच्या मनात आले. पण यशवंतरावांना कर्तव्याची ही हाक ऐकावी लागेल याची त्यांना कल्पना असल्यामुळे, वेणुताईनी आलेली जबाबदारी स्वीकारणे योग्य असल्याचे मत दिले. यशवंतराव मग नेहरूंच्या आमंत्रणावरून १० तारखेला दिल्लीला गेले आणि नेहरूंना भेटले. लालबहादूर शास्त्रीही नेहरूंबरोबर होते. त्या दोघांनी यशवंतरावांना अखेरचा निर्णय सांगितला. आपल्याला संरक्षणविषयाची काही माहिती नाही, ती करून घेण्यास थोडा अवधी लागेल असे यशवंतरावांनी सांगितले; तेव्हा तुम्ही ती लवकर करून घ्याल याची आपल्याला खात्री असल्याचे उत्तर नेहरूंनी दिले. त्याचबरोबर ते म्हणाले की, संरक्षणमंत्रिपद त्यांना न देता तुम्हांला दिल्यामुळे टि०टि० कृष्णमाचारी बरेच प्रक्षुब्ध झाले आहेत. आपल्याला भेटून त्यांनी संरक्षणमंत्रिपद देण्याची विनंती केली. याबद्दल ते बरेच भावनाशील झाले होते अशीही माहिती नेहरूंनी दिली. पण तुमच्याबद्दल आपण अखेरचा निर्णय घेतला असून तुम्ही शक्य तितक्या लवकर दिल्लीत हजर व्हा. यानंतर ठरवण्यासारखे काही राहिले नव्हते. संरक्षणमंत्रिपद मिळवण्यासाठी काहीजण इतकी खटपट करत असता यशवंतरावांकडे ते आपणहून चालत आले.

यशवंतराव संरक्षणमंत्री होणार ही बातमी अधिकृतरीत्या प्रसारित झाल्याबरोबर साऱ्या महाराष्ट्रात आनंद व अभिमानाची लाट पसरली. यशवंतरावांनी महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून अजून पाच वर्षे राहावे असे वाटत असतानाच त्यांची संरक्षणमंत्रिपदाची निवड झाली. मग त्यांनी राज्यात काही ठिकाणी भेटी दिल्या त्यांच्या स्वागताला पूर आला होता. विधानसभेत निरोपाची भाषणे सर्व पक्षांच्या नेत्यांनी केली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलन-काळात आचार्य अत्रे यांनी यशवंतरावांवर टीकेचा भडिमार करताना



पंडित जवाहरलाल नेहरू आणि यशवंतराव चव्हाण

कसलाही धरबंद ठेवला नव्हता. पण यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला जात असल्याबद्दल विधानसभेत निरोपाचे भाषण करताना अत्रे म्हणाले: ''नामदार यशवंतरावांच्या अंगात काही अलौकिक गुण आहेत–त्यांचा स्वभाव, त्यांचे वागणे, त्यांचे चालणे व त्यांचे बोलणे असे आहे की, त्यांचे शत्रुत्व करू इच्छिणाऱ्या माणसालासुद्धा यशस्वीपणे फार काळ त्यांचे शत्रुत्व करणे शक्य होत नाही, असे मी माझ्या अनुभवावरून सांगतो! नामदार यशवंतराव हे शंभर टक्के मराठी माणूस आहेत. कराडला बोलताना ते म्हणाले की, मला जर यश मिळाले नाही तर मी आत्मसमर्पण करीन! यातच मराठी माणसाचे मन, त्याचा स्वाभिमान आणि त्याच्या मनगटातील कणखरपणा हा दिसून येत आहे. त्यांच्यासारखा शंभर टक्के स्वाभिमानी माणूस आज (संरक्षणमंत्री म्हणून) दिल्लीच्या दरबारात जात आहे–ते आपल्या नावाप्रमाणे काम यशस्वी करूनच जेव्हा महाराष्ट्रात परत येतील, तेव्हा तीन कोटी महाराष्ट्रीय जनता त्यांना डोक्यावर घेऊन नाचल्याशिवाय राहणार नाही!'' पुढे अत्रे यांनी आपले एक नाटक यशवंतरावांना अर्पण केले, आणि काही व्यक्तिगत प्रश्नांसंबंधीही ते यशवंतरावांशी चर्चा करत असत. नाशिकच्या लोकसभा मतदारसंघातून यशवंतराव निवडणुकीसाठी उभे राहिले तेव्हा राज्यातल्या सर्व राजकीय पक्षांनी आपला उमेदवार उभा न करून, यशवंतरावांना बिनविरोध निवडून दिले. त्यानंतरच्या नाशिकच्या सभेत बोलताना कुसुमाग्रज म्हणाले. भूगोलात कृष्णा व गोदावरीचा संगम झाला नसला तरी तो आज झाला आहे.

मुंबई सोडण्यापूर्वी काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक होऊन मारोतराव कन्नमवार यांची मुख्यमंत्री म्हणून एकमताने निवड झाली. या रीतीने सर्व महाराष्ट्राच्या सद्भावना पाठीशी घेऊन यशवंतराव २० नोव्हेंबरला संध्याकाळी दिल्लीत पोचले. गेल्या गेल्याच आपल्यापुढे अडचणी उभ्या राहणार याची त्यांना थोडी कल्पना होती. बिजू पटनाईक व कृष्णम्माचारी हे दोघेही संरक्षणमंत्री होण्यासाठी अधीर असल्याची कल्पना नेहरूंनीच त्यांना दिली होती. पण दिल्लीत पाऊल ठेवल्यापासून या दोघांच्या विरोधाला तोंड द्यावे लागेल असे वाटले नव्हते. २० तारखेच्या रात्री दहाच्या सुमारास बिजू पटनाईक त्यांना भेटायला आले. पटनाईक यशवंतरावांना म्हणाले, 'तुम्ही भारताच्या संरक्षणासाठी दिल्लीत कशासाठी आलात? तुम्हांला देशाचे रक्षण करायचे असेल तर ते मुंबईतून करता येईल, कारण दोनतीन दिवसांत चिनी सैन्य मुंबईपर्यंत येईल. यावर यशवंतरावांनी उत्तर दिले की, आपण सेनापतीच्या आज्ञा मानतो व सेनापतीने मला दिल्लीत येण्याची आज्ञा केली आहे. पटनाईक यांचा पुढचा प्रश्न असा, की तुमची काय योजना आहे? यशवंतराव म्हणाले की, आपल्याला खात्याची सूत्रे घेऊ द्या, मग योजना ठरवता येईल. ही कठीण परिस्थिती कशी हाताळणार? हा आणखी एक प्रश्न. यशवंतरावांनी उत्तर दिले, की आपण लष्करी माणूस नाही. आपल्याला या विषयाची माहिती नाही; पण परमेश्वरकृपेने आपण काहीतरी करून दाखवू. यानंतरही पटनाईक तासभर बोलत होते. ते बोलणे भाषणवजा होते. शेवटी जाताना ते म्हणाले, आपण तुमचे मित्र आहोत आणि तुम्हांला यश चिंतितो. मग रात्री दोनच्या सुमारास पी०टी०आय०च्या वार्ताहराचा फोन आला. तो म्हणाला, एक चांगली बातमी आहे. चीनने स्वत:हून आपले सैन्य सीमेवरून काढून घेण्याचे जाहीर केले आहे. हा एक नाट्यमय क्षण होता. दुसऱ्या दिवशी सकाळी यशवंतराव शपथविधीसाठी राष्ट्रपतीभवनावर गेले. तिथे नेहरूंनी तुम्ही काही शुभदायक घेऊन आला आहात असे म्हणून स्वागत केले. नेपोलियन विचारत असे की, सेनाधिकारी नशीबवान आहे काय? नेहरूंना कदाचित याचे स्मरण झाले असावे. शपथ घेतल्यावर नेहरू स्वत: संरक्षणखात्याच्या मुख्य कार्यालयात



राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याकडून केंद्रीय संरक्षण मंत्री पदाची शपथ घेताना. सोबत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू

यशवंतरावांना घेऊन गेले. तिथे नेहरूंनी त्यांना पुन्हा शुभेच्छा दिल्या आणि अर्ध्या तासात लोकसभेत येण्यास सांगितले. यशवंतरावांना घेऊन नेहरूंनी लोकसभेच्या सभागृहात प्रवेश केला तेव्हा सर्वांनी उत्स्फूर्त स्वागत केले. दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून जाण्यापूर्वी यशवंतरावांची पुण्यात सत्काराची सभा झाली. त्या वेळी 'प्रावदा'मध्ये रशियन सरकारचे मत व्यक्त करणारा लेख आला होता. त्यात चीन हा आपला भाऊ आहे तर भारत हा मित्र, असे विधान होते. यशवंतरावांनी या विधानासंबंधात लेले यांना अशी माहिती दिली की, आपल्याला या विधानाचा राग आला. अखेरीस एकाच विचारसरणीमुळे रशियनांचे हे मत बनले असेल, पण हा लाल नेपोलियनवाद झाला. (लाल नेपोलियनवाद हा रॉय यांनी पूर्वी वापरलेला शब्द आहे). आपण इतरही टीका केल्याचे सांगून यशवंतराव म्हणाले की, आपल्या भाषणाचा वृत्तान्त दिल्लीच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध होऊन तो नेहरूंच्या पाहण्यात आला. नेहरूंनी याबद्दल यशवंतरावांशी बोलताना नाराजी व्यक्त केली. उत्तरादाखल यशवंतरावांनी सांगितले की, रशियनांशी आपण चांगले संबंध ठेवले पाहिजेत हे आपल्याला पटते, पण या टीकेमुळे आपल्यातला राष्ट्रवादी जागा झाला. नेहरू म्हणाले, तुमच्या भावना समजण्यासारख्या आहेत. पण तुम्ही संरक्षणमंत्री आहांत. या प्रकारची राजकीय वक्तव्ये करणे उचित नाही. हे अर्थात तिथेच संपले.

यशवंतरावांनी संरक्षण खात्याचे काम समजून घेण्यास लगेच सुरुवात केली. पण बिजू पटनाईक व कृष्णम्माचारी यांच्यामुळे चित्त विचलित होऊ लागले. या संबंधात यशवंतरावांचे सचिव, श्री० राम प्रधान व राजकीय चरित्र लिहिणारे कुन्ही कृष्णन यांनी या पटनाईक प्रकरणासंबंधी लिहिले आहे. ती माहिती उपयुक्त असली, तरी लेले यांना दिलेल्या मुलाखतीत यशवंतरावांनी स्वत:चे विचार व अनुभव व्यक्त



संरक्षणमंत्रिपदाच्या शपथविधीनंतर पंतप्रधान व नवे संरक्षण मंत्री सेनाप्रमुख जनरल चौधरी व नौसेना प्रमुख व्हाइस ॲडमिरल सोमण यांच्याबरोबर

केले असून थोडी अधिक माहिती दिली आहे. स्वत: यशवंतरावांनीच दिलेली माहिती नमूद करणे उचित असल्यामुळे तिचा उपयोग इथे केला आहे. पटनाईक ओरिसाचे मुख्यमंत्री होते आणि तरीही चिनी युद्धानंतर मेनन यांचा राजीनामा घेणे अनिवार्य झाल्यानंतर, नेहरूंनी पटनाईक व कृष्णम्माचारी यांच्यावर संरक्षण खात्याच्या काही कामाची जबाबदारी टाकली. यशवंतरावांची नेमणूक झाल्यावर या दोघांना संरक्षण खात्यात काहीच काम ठेवण्याची आवश्यकता नव्हती. पण ज्या व्यक्ती विशेष मर्जीतील असतील त्यांना दुखवण्यास नेहरू सहसा तयार होत नसत. तो त्यांच्या स्वभावाचा एक विशेष होता. पटनाईक यांच्याबद्दल लोकसभेत प्रश्न विचारला असता, ते काही विशिष्ट कामाबाबत सल्ला देतात व त्यांना संरक्षणविषयक प्रश्नांची माहिती असल्याचा खुलासा करताना पटनाईक हे ओरिसाचे मुख्यमंत्री आहेत अशीही पुस्ती नेहरूंनी जोडली. (एक मुख्यमंत्री आपले राज्य सोडून महिन्यातून आठदहा दिवस केंद्र सरकारच्या खात्यात काम करण्याकरता दिल्लीत वेळ दवडतो, हे कितपत घटनात्मक होते, हा एक प्रश्नच होता.)

यशवंतरावांनी लेले यांना सांगितले की, पटनाईक त्यांना भेटून गेल्यावर आणि आपला शपथविधी झाल्यानंतर ते नेहरूंना भेटले. नेहरूंना ते म्हणाले की, तुम्ही चव्हाणांना इथे संरक्षणमंत्री म्हणून आणले आहे, पण मला संरक्षणविषयक काही अनुभव आहे. या खात्यात मला काही करून दाखवायचे आहे. मग नेहरूंनी पटनाईक यांना शांत करण्याकरता संरक्षणखात्यात काही काम देण्याचे ठरवले व



यशवंतराव आणि पंडित नेहरू

पंतप्रधानांच्या कार्यालयाच्या शेजारची खोली त्यांना दिली. पटनाईक हे एक काळ हवाई दलात असल्याने त्यांना संरक्षणविषयक माहिती होती. पण नेहरूंचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. व्यक्ती म्हणून नेहरूंची त्यांच्यावर मर्जी होती. नेहरूंनी केलेल्या नव्या व्यवस्थेनंतर आपण संरक्षणखात्यास सल्ला देत असल्याच्या गोष्टी पटनाईक करू लागले आणि थोड्याच दिवसांत आपणच खरे संरक्षणमंत्री आहोत अशा बढाया मारून, चव्हाण नावापुरते संरक्षणमंत्री आहेत असा प्रचार करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पुढे पटनाईक १९६३च्या मार्चमध्ये अधिकृतपणे नव्हे, तर स्वत:च्या खर्चाने अमेरिकेस गेले. पण जाताना ते संरक्षणविषयक कामासाठी गेल्याची बातमी प्रसिद्ध करण्याची व्यवस्था त्यांनी केली. यामुळे यशवंतरावांची स्थिती अडचणीची झाली. त्यांनी लेले यांना सांगितले की, आपण सुरक्षा दलांच्या विविध थरांवरील अधिकाऱ्यांशी नवे संबंध प्रस्थापित करू लागलो होतो. मेनन यांनी संरक्षणखात्यातील शिस्त बिघडवली होती; अधिकाऱ्यांची एक उतरंड व साखळी असते, ती त्यांनी मोडली. लेफ्टनंट जनरलच्या ऐवजी मेनन मेजर जनरलला बोलवीत आणि त्याच्याशी सल्लामसलत करत. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विश्वास ढासळला होता. हे सर्व सुरळीत करत असताना पटनाईक यांच्यामुळे आपली अवस्था अवघड झाल्याचे यशवंतरावांना जाणवले. लष्करी अधिकाऱ्यांनी यशवंतरावांना सांगितले की, पटनाईक यांच्यामुळे तुम्ही धोक्यात याल; ते तुमचे कार्य नष्ट करतील; ते विधिनिषेधशून्य तर आहेतच, शिवाय धोकादायकही आहेत. यशवंतराव कलकत्ता इथे गेले असता त्यांना हेच ऐकायला मिळाले. त्यामुळे या सर्वांचा त्यांना वीट आला.

याच वेळी पटनाईक यांच्या बढाईखोरीमुळे व उपद्व्यापी स्वभावामुळे नेहरूंना लोकसभेत अडचणीच्या प्रश्नांना उत्तर देण्याची वेळ आली. पटनाईक यांनी अमेरिकेत वार्ताहरांना सांगितले की, गनिमी काव्याच्या लढाईच्या तंत्राचे शिक्षण भारतीय पथकांना लाभदायक होईल व त्यासाठी आपण अमेरिकेत आलो आहोत. चिनी गनिमांच्या तंत्राचा वापर करून त्यांच्याशी मुकाबला करता येऊ शकेल. भारतीय सैन्याचे संख्याबळ व त्याच्या छावण्याची ठिकाणे यांचीही माहिती पटनाईक यांनी दिली. संरक्षण खाते आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा पंतप्रधानांचा विचार आहे काय, असा प्रश्न वार्ताहरांनी विचारल्यावर चव्हाण संरक्षणमंत्री आहेत, आपण वारंवार दिल्लीला जाऊन सल्ला देत असतो आणि इतरही काही तरुण या खात्यात येतील, असे उत्तर पटनाईक यांनी दिले. पटनाईक यांच्या या वक्तव्याबद्दल लोकसभेत प्रश्न उपस्थित केल्यावर नेहरू म्हणाले की, पटनाईक यांच्या काही विधानांमुळे व संरक्षणमंत्र्यांबद्दलच्या उल्लेखामुळे आपल्याला उद्वेग वाटला. पटनाईक यांची संरक्षणमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा असल्याची टीका खासदार हेम बरुआ यांनी केली असता, आपल्याला हे मान्य नसल्याचे नेहरूंनी उत्तर दिले.

पटनाईक यांचे वक्तव्य आणि दिल्लीत व कलकत्त्यात लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेले इशारे ऐकल्यावर यशवंतराव दिल्लीत परतले तेव्हा त्यांनी या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरवले. मग त्यांनी स्वत:च्या हस्ताक्षरात पंतप्रधानांना उद्देशून पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले की, अजूनही तुम्हांला दोन संरक्षणमंत्री आहेत. यापुढे तुम्हांला व मला अडचणीत टाकण्याची माझी इच्छा नाही. तेव्हा मी परत जाण्याचा विचार केला आहे. परत जाऊन मला मुख्यमंत्री व्हायचे नाही. तिथल्या लोकांना कशा प्रकारे कारभार करावा हे माहीत आहे. मला फक्त परत जाण्याची इच्छा आहे. इतके लिहून शेवटी पंतप्रधानांना आभाराच्या काही ओळी लिहिल्या. हे पत्र पंडित नेहरूंच्या हातात पडेल अशी व्यवस्था करण्यात आली. दुसऱ्या दिवशी रात्री नेहरूंनी यशवंतरावांना बोलावले. नेहरूंनी आपल्या टेबलाच्या खणातले यशवंतरावांचे पत्र काढले. मग एखादा पिता आपल्या मुलाशी बोलेल त्या तऱ्हेने नेहरूंनी विचारले, तुम्हांला काय झाले आहे? हा वेडेपणा काय आहे? हे पत्र मला कां लिहिले? यावर यशवंतरावांनी आपल्या दृष्टिकोनातून विचार करून पाहण्याची नेहरूंना विनंती केली. वृत्तपत्रांत कोणत्या प्रकारचे लिखाण या संबंधात येते ते पाहावे. नेहरू म्हणाले, 'वृत्तपत्रे ठेवा बाजूला. पटनाईक यांना मला सांभाळून घ्यायचे आहे हे तुम्हांला माहीत नाही काय? त्यांचा लष्करी वर्तुळाशी जवळचा संबंध आहे.' इतके बोलणे झाल्यानंतर नेहरूंनी यशवंतरावांचे पत्र फाडून टाकले.

यशवंतरावांनी मग इंदिरा गांधींची भेट घेतली. ते सांगतात की, ते दोघेही एकमेकांशी त्या काळात बराच विचारविनिमय करत. यानंतर नेहरू, यशवंतराव व इतर काही सहकाऱ्यांना राजकीय व इतर विषयावर चर्चा करण्यासाठी बोलवू लागले. या संदर्भात यशवंतरावांनी मला सांगितलेल्या एका प्रसंगाचा उल्लेख करणे योग्य होईल. यशवंतराव कॉंग्रेस कार्यकारिणीबरोबरच संसदीय मंडळाचे सभासद होते. विधानसभा आणि लोकसभा यांच्या निवडणुकीच्या वेळी राज्यवार उमेदवारांची यादी अंतिम निर्णयासाठी संसदीय मंडळाकडे येत असे. ६२ साली लोकसभेच्या निवडणुकीसाठीच्या उमेदवारांच्या यादीचा विचार करण्यासाठी, नेहरूंच्या निवासस्थानी संसदीय मंडळाची बैठक होती, यशवंतराव बैठकीसाठी जात असता इंदिरा गांधींनी त्यांना थांबवून घेतले व त्या म्हणाल्या, बिजू पटनाईक लोकसभेत येऊ इच्छितात, पण त्यांना येऊ देऊ नये. ओरिसात ते ठीक आहेत. मग बैठक सुरू झाली. थोड्या वेळाने नेहरू काही



मिसामारी (आसाम) येथील सैन्याच्या छावणीला भेट देत असताना पंतप्रधान व संरक्षणमंत्री–डिसेंबर १९६२

काम असल्याचे सांगून उठून गेले पण इंदिराला काही सांगायचे आहे ते ऐकून घेतले तर बरे होईल, असे ते म्हणाले. इंदिरा गांधींनी इतर काही उमेदवारांबद्दल आपले मत सांगून पटनाईक यांना ओरिसातच ठेवणे त्या राज्याच्या हिताचे असल्याचा अभिप्राय दिला. पटनाईक-प्रकरणात यशवंतराव नेहरूंना भेटल्यानंतर इंदिरा गांधींशी चर्चा करताना, पटनाईक यांच्याबद्दल इंदिरा गांधींच्या मताची त्यांना आठवण होती, असे मानता येईल.

नेहरूंशी झालेल्या भेटीचा परिणाम नंतर दिसू लागला. पटनाईक यांचे प्रस्थ संपले. कृष्णम्माचारी यांना संरक्षणखात्याचे जे काम दिले होते, त्याची जबाबदारी त्यांच्याकडे राहणे अशक्य होते. पण त्यांची समजूत काढण्याची जबाबदारी नेहरूंनी यशवंतरावांवर सोपवली. ती त्यांनी काढली. कृष्णम्माचारी यांचा अहंकार दुखावला जाणार नाही, असा तोडगा काढण्यात आला. संरक्षण खात्याच्या संबंधात नेहरूही काही हस्तक्षेप करत नव्हते; याचा प्रत्यय लगेच आला. चिनी युद्धाच्या काळात बी० एम० कौल यांच्या अकार्यक्षमतेबद्दल बरेच लिहिले गेले होते. त्यांना काढून टाकावे अशी लष्कराच्या मुख्य कार्यालयाची शिफारस होती. काहीजणांच्या मते लष्करी न्यायालयाकडून चौकशी करणे योग्य होणार होते. यशवंतरावांनी कौल यांच्यासंबंधीची कागदपत्रे वाचली आणि त्यांचा लगेच राजीनामा घ्यावा, असा शेरा मारला. ती फाईल रीतीप्रमाणे नेहरूंकडे गेली. त्यांनी सही करून लगेच परत पाठवली. लष्करी अधिकाऱ्यांना नेहरूंच्या संमतीबद्दल खात्री नव्हती, पण ती मिळाल्यामुळे त्यांना समाधान वाटले आणि नव्या संरक्षणमंत्र्यांबद्दल विश्वास निर्माण झाला.

कृष्ण मेनन यांच्याबद्दल यशवंतरावांची व यशवंतरावांची संरक्षणमंत्री म्हणून नेमणूक झाल्याबद्दल मेनन यांची काय प्रतिक्रिया झाली असे जयंत लेले यांनी विचारले असता, यशवंतरावांनी दिलेले उत्तर

नमूद करण्यासारखे आहे. ते म्हणाले की, आपल्या नेमणुकीनंतर दुसऱ्याच दिवशी मेनन यांचा फोन आला व केव्हा भेटू असे त्यांनी विचारले. आपण सांगितले की, औपचारिकपणा दाखवण्याचे कारण नाही, या. मेनन यांच्याशी आपले संबंध चांगले होते. ते तीक्ष्ण बुद्धीचे होते. तथापि मेनन यांचे कम्युनिस्ट पक्षाशी असलेले जवळचे संबंध आपल्याला पसंत पडत नसत. त्यांचे व आपले वैचारिक मतभेद मात्र होते. चीन, पाकिस्तान इत्यादींच्या बाबतीतील त्यांची व आपली मते जुळत नसत. ते कम्युनिस्ट देशांवर टीका करत नसत; पण पाश्चात्त्य देश व अमेरिका यांच्यावर मात्र जहरी टीका करत. तुमचे व मेनन यांचे मैत्रीचे संबंध होते काय? या लेले यांच्या प्रश्नाला यशवंतरावांनी नकारात्मक उत्तर दिले. ते म्हणाले की, एक पंडित नेहरू सोडल्यास मेनन यांचे कोणाशी मैत्रीचे संबंध असतील असे वाटत नाही.

यशवंतरावांना या सुमारास कानपूरपासून अनेक ठिकाणांहून भाषणासाठी आमंत्रणे येऊ लागली होती. ती त्यांनी टाळली. मग ते व नेहरू दोघेही लडाख व आसाम येथील लष्करी ठाण्यांच्या भेटीवर एकत्र गेले. नेहरूंनी यशवंतरावांना सांगितले, की देशातल्या इतर ठाण्यांना भेट देऊन माहिती करून घ्या. तथापि मंत्रिमंडळाच्या आणीबाणीच्या उपसमितीपुढे तातडीच्या शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी अमेरिकेला एक मंडळ पाठवण्याचा विषय आला असता नेहरू यशवंतरावांना म्हणाले की, तुम्ही इथेच राहा व कृष्णम्माचारी यांना जाऊ दे. यशवंतराव यांच्या मनात पुन्हा एकदा शंका आली, पण त्यांनी लगेच होकार



चीनच्या आक्रमणाच्यावेळी जखमी जवानांची विचारपूस करताना पंतप्रधान पं० नेहरू,
संरक्षणमंत्री यशवंतराव व श्रीमती इंदिरा गांधी



पंतप्रधान पंडित नेहरू व संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांची तेजपूरला सेनानींबरोबर भेट
यशवंतरावांच्या डावीकडे ले० ज० मोतीसागर, ले० ज० सेन, ले० ज० माणेकशॉ

दिला. लष्कराच्या तिन्ही दलांत नव्या संरक्षणमंत्र्यांच्या कारभाराबद्दल व वर्तनपद्धतीबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण होत होते. संसदेत त्यांना भक्कम पाठिंबा मिळत होता. नेहरूंनाही कळून आले की, लष्कराचा कारभार सुधारत आहे आणि त्याचे नीतिधैर्य वाढले आहे. संरक्षणविषयक उत्पादन प्रकल्प मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू झाल्यावर, पुन्हा एकदा पटनाईक यांचा अडसर तापदायक ठरणार असे वाटू लागले होते. त्यात मिग विमानांच्या उत्पादनाचा कारखाना हा एक महत्त्वाचा प्रकल्प होता. पटनाईक यांनी तो ओरिसात नेण्यासाठी खटपट केली होती. ओरिसाच्या मागास भागात असा आधुनिक कारखाना काढला तर आवश्यक तो कुशल कामगारांचा व तंत्रज्ञांचा वर्ग उपलब्ध होणार नाही, असे संरक्षण खात्यातल्या तज्ज्ञांचे मत होते. मग यशवंतरावांनी जे० आर० डी० टाटा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिने सर्व तपासणी करून नाशिक इथे विमानाच्या सर्व भागांचे व उपकरणांचे उत्पादन करण्याची शिफारस केली. तरीही यशवंतरावांनी त्याचे इंजिन बनवण्याचा कारखाना ओरिसात कोरापूट इथे काढण्याचा आणि बाकीचे उत्पादन नाशिकला करण्याचा निर्णय घेतला. पटनाईक यांना हे आवडले नाही व त्यांनी नेहरूंकडे तक्रार केली. नेहरूंनी टाटा समितीच्या अहवालाचा हवाला दिला आणि सर्व भाग नाशिकला बनवण्याची शिफारस असताना, यशवंतरावांनी इंजिन कोरापूटला तयार करण्याचा निर्णय घेतल्याचे पटनाईक यांच्या निदर्शनास आणले.

मुख्यमंत्री असतानाच अधिकारीवर्गाचा विश्वास संपादन करण्यात यशवंतराव यशस्वी झाले होते.

विश्वास द्यावा व घ्यावा असे त्यांचे सूत्र होते. हेच संरक्षणमंत्रिपदावर आल्यानंतर उपयोगी पडले. राम प्रधान यांनी *डिबॅकल टु रिव्हायव्हल* या पुस्तकात संरक्षण खात्यात निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या संबंधात यशवंतरावांनी स्वीकारलेले धोरण कसे यशस्वी झाले, याची उदाहरणेच दिली आहेत. लष्करप्रमुख जनरल जे० एन० चौधरी यांनी त्यांच्या आत्मचरित्रात यशवंतरावांकडे फायली गेल्यावर त्याबद्दल निर्णय घेण्यासाठी व त्यांवर सही करण्यासाठी ते विलंब लावत नसत व खळखळ करत नसत, असा अनुभव नमूद केला आहे. वेल्स् हॅन्गन या अमेरिकन लेखकाने *आफ्टर नेहरू हू?* असे पुस्तक ६२ साली प्रसिद्ध केले. त्यात त्याने यशवंतरावांच्या कामाचा झपाटा वर्णन केला आहे आणि म्हटले आहे की, आपल्या अधिकाऱ्यांकडून ते जितके काम करून घेण्यात यशस्वी झाले आहेत तितके दुसरे कोणी झाले नसेल. हे अधिकारी अधिक काम पडते अशी तक्रारही कधी करत नसत. माधवराव गोडबोले यांनी *अपुरा डाव* या त्यांच्या आठवणींच्या पुस्तकात म्हटले आहे की, यशवंतरावांचे कार्यालयातील टेबल नेहमी स्वच्छ असे. कारण संध्याकाळपर्यंतच्या फायली रात्री घरी वाचून त्यावर शेरे मारून, त्या दुसऱ्या दिवशी सकाळी परत येत. एक दिवस त्या परत न आल्यामुळे गोडबोले यांना वाटले, यशवंतरावांची प्रकृती बरी नसावी. म्हणून चौकशी केली तेव्हा यशवंतराव म्हणाले, ना० सी० फडके यांनी त्यांचे आत्मचरित्र धाडले होते व त्यावर मत देण्याची विनंती केली होती. त्यामुळे रात्री बराच वेळ ते वाचण्यात गेला. हे अर्थात अपवादात्मक. काही अधिकारी तरआपण यशवंतरावांचे कुटुंबीय आहोत असे मानत. यांत राम प्रधान, माधवराव गोडबोले, शरद काळे, शरद उपासनी इत्यादींचा समावेश होतो. श्रीपाद डोंगरे हे त्यांच्या



संरक्षणमंत्री व संरक्षणविषयक समितीचे सभासद–यशवंतरावांच्या उजवीकडून व्हाइस ॲडमिरल सोमण, जनरल चौधरी, वायुसेना प्रमुख एअर मार्शल इंजिनीअर, निवृत्त लेफ्टनंट जनरल थोरात, निवृत्त लष्कर सेनानी ज० राजेन्द्रसिंग, मंत्र्यांच्या डावीकडे हरीश सरीन, संयुक्त सचिव, संरक्षण विभाग



लष्करी अधिकाऱ्यां समवेत, राष्ट्रपती डॉ० राधाकृष्णन्, यशवंतरावजी व आनंदराव चव्हाण

घरातल्यासारखेच होते. अशी इतरही नावे घेता येतील. गोडबोले यांच्या आठवणींच्या पुस्तकाच्या एका प्रकरणाचा मथळाच मुळी 'माझे दुसरे घर' असा आहे.

यशवंतरावांच्या या कार्यपद्धतीमुळे संरक्षण खात्याच्या सर्व थरांत नवे वारे निर्माण झाले तर ते साहजिक होते.मुख्यत: मेनन यांच्या कारकिर्दीतील संशय, गटबाजी, आणि विनाकारण गुप्तता हे संपुष्टात आले आणि सर्वांनाच मोकळे वाटू लागले. तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांची रोज सकाळी होणारी बैठक अनेक प्रश्नांवर तोडगा काढण्यास उपयुक्त ठरत असल्याचे प्रत्ययास येत होते. याच सुमारास खात्याच्या मागण्या लोकसभेत चर्चेला येणार होत्या आणि त्यासंबंधीचे यशवंतरावांचे भाषण हे लोकसभेतील त्यांचे पहिले भाषण होते. परीक्षेला जावे तशी आपण यासाठी तयारी केल्याचे यशवंतरावांनी सांगितले. लोकसभेत जाण्यापूर्वी नेहरूंचा फोन आला आणि पहिलेच भाषण असल्यामुळे आपण शुभेच्छा देत असल्याचे ते म्हणाले, आणि प्रत्यक्ष या भाषणाच्या वेळी ते हजर होते. यशवंतरावांची संसदेतील भाषणे चार खंडांत प्रसिद्ध झाली आहेत. हे पहिले, तसेच इतर भाषणे वाचल्यावर पहिल्या प्रथम जाणवते ते हे की, त्यांत कोणतीही लपवाछपवी नाही. देशाच्या संरक्षणाची जी अवस्था होती, ती सभागृहापुढे ठेवण्यात काही कसूर होत आहे असे वाटण्यासारखे काही नव्हते. नंतरच्या भाषणांबद्दलही हेच म्हणता येईल. तरीही यशवंतरावांनी लेले यांच्याजवळ बोलताना सांगितले की, आपण राज्यपातळीवरील राजकीय जीवनातून आल्यामुळे लोकसभेत भाषण करताना आपल्याला संपूर्ण विश्वास वाटत नसे. शिवाय या पहिल्या भाषणाच्या आधी लोकसभेतील प्रश्नास उत्तर देताना यशवंतरावांकडून

एका इंग्रजी शब्दाच्या उच्चारात चूक झाल्यामुळे सभागृहात हशा पिकला होता. त्यामुळेही त्यांना अवघडल्यासारखे वाटत असेल. पण नंतर हे सर्व मागे पडले आणि त्यांच्या भाषणात धिटाई दिसू लागली. शिवाय त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषांत चांगल्यापैकी भाषण करता यावे या दृष्टीने खास प्रयत्न सुरू केले.

चीनशी झालेल्या युद्धात भारतीय सैन्यास माघार घ्यावी लागली होती. याची चौकशी करण्यासाठी हेन्डरसन-ब्रुक्स यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. तिचा अहवाल आला होता आणि तो संपूर्ण स्वरूपात प्रसिद्ध न करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. अहवाल आल्यावर यशवंतरावांनी तो बारकाईने वाचून, त्यातील मुख्य मुद्दे ग्रथित होतील अशा रीतीने त्याची संक्षिप्त आवृत्ती तयार केली. नेहरूंनी अहवाल व ही आवृत्ती वाचली आणि आवृत्तीत थोड्या सुधारणा केल्या, पण बाकीचे टिपण चांगले असल्याचे सांगितले. या अहवालात चिनी युद्धाच्या काळात राजकीय नेतृत्वाच्या काही चुका झाल्या असतील त्याबद्दल मतप्रदर्शन असू शकेल. त्या युद्धाला आता चार दशके होऊन गेल्यानंतरही तो पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध झालेला नाही. अशा या अहवालावर सविस्तर चर्चा घडवून आणण्यास विरोधी पक्ष उत्सुक असला तर नवल नाही व चूकही नाही. पण राजकीय व इतर काही गोष्टी बाहेर येणे हे नेहरू व त्यांच्या मंत्रिमंडळास योग्य वाटले नसावे. तसे पाहिले तर पुढील काळात काँग्रेसेतर पक्षांच्या आघाड्यांची मंत्रिमंडळे केंद्रात अधिकारावर आली होती. पण त्यांनीही हा अहवाल प्रसिद्ध केला नाही. तेव्हा लष्करी दृष्ट्याही काही गोष्टी बाहेर येणे सोयीचे नव्हते की काय, असा प्रश्न पडतो.



कामराज, चंद्रशेखर व मोहन धारिया यांच्यासमवेत



माउंटबॅटन व संरक्षणमंत्री शाही खान्याच्या वेळी विचारविनिमय करताना

राज्यसभेत हा अहवाल सादर केल्यानंतर २० सप्टेंबर १९६३ रोजी त्यावर चर्चा झाली आणि यशवंतरावांनी उत्तरादाखल भाषण केले. त्याचे सभासदांनी स्वागत केले. नंतर दुसऱ्या दिवशी राष्ट्रपती भवनात एक-दोन मंत्र्यांचा शपथविधी होता. तो पार पडल्यानंतर राष्ट्रपती डॉ० राधाकृष्णन यशवंतरावांपाशी आले आणि त्यांनी राज्यसभेतील भाषणाची तारीफ नेहरूंच्या समोरच केली. त्यानंतर लोकसभेतील चर्चेच्या वेळी आपण भाषण करावे काय? असे नेहरूंनी विचारले. यशवंतरावांनी नम्रपणे ते करू नये असे सांगितले, तुम्ही भाग घेतला तर तुमच्यावरच टीका होईल; तेव्हा तुम्ही ती कशाला ओढवून घेता? आम्ही आहोत. कृष्ण मेनन यांनी केलेल्या आपल्यावरील टीकेला उत्तर द्यावे काय, हा नेहरूंचा दुसरा प्रश्न होता. त्यामुळे तर मोठेच वादळ उठेल असे यशवंतरावांनी सांगितले व प्रश्न इथेच संपला. ही माहिती राम प्रधान यांनी त्यांच्या वर उल्लेखिलेल्या पुस्तकात दिली आहे.

हेन्डरसन-ब्रुक्स समितीच्या अहवालावरील चर्चेत नाथ पै, फ्रॅन्क ॲन्थनी, इत्यादींची अभ्यासपूर्ण व वक्तृत्वपूर्ण भाषणे झाली. दोघांनीही चीनच्या आक्रमणाच्या वेळी भारत तयारीत नव्हता, हे सरकारच्या अहवालाच्या आधारे सिद्ध होत असल्याचे दाखवून दिले. त्या वातावरणात सरकारची बाजू मांडणे सोपे नव्हते. विरोधकांचा रोख या माघारीच्या बाबतीत दोषी कोण, हे स्पष्ट व्हावे या मागणीवर होता. यशवंतरावांनी सांगितले की, चौकशीचा हेतू आपल्या संरक्षणसिद्धतेत कोणत्या उणिवा आहेत ते शोधून



नोरॅडचे मुख्यालय, कोलोरॅडो स्प्रिंग, कोलोरॅडो २६ मे, १९६४ मेजर जनरल पॉल टी० प्रीअस,
श्री० आर० डी० प्रधान, संरक्षणमंत्री यशवंतराव, जनरल जॉन के० गेर्हार्ट

काढून त्यांवर उपाय करणे हा होता. कोण दोषी होते यावर लक्ष केंद्रित केल्यास हा मूळ हेतू बाजूला पडेल. चीन वरचढ ठरण्याची मुख्यत: तीन कारणे होती. एक म्हणजे चीनचे लष्करी प्राबल्य. गेली तीस वर्षे तो सैन्य तयार करत व वाढवत आला आहे. दुसरे कारण, त्याला भौगोलिक परिस्थिती अनुकूल होती. तिसरे कारण म्हणजे हुकूमशाही देश, लोकशाही देशापेक्षा अशा संघर्षाच्या पहिल्या अवस्थेत नेहमीच विजय मिळवत असल्याची उदाहरणे घडली आहेत. पंतप्रधान पंडित नेहरू यांनी शत्रूला घालवून देण्याचा आदेश दिला याबद्दल टीका झाली होती. यशवंतरावांनी तिला उत्तर देताना सांगितले की, राजकीय नेतृत्वाने याच प्रकारचा आदेश द्यावा हे अपेक्षित होते. नाहीतर चिनी सैन्याचे स्वागत करायचे होते काय? पण आदेश दिल्यानंतर केव्हा व कोठे प्रतिकार करायचा हा लष्करी कक्षेतला भाग झाला. एकदा लष्कराला आदेश दिल्यानंतर राजकीय नेत्यांनी लढाईच्या कामात कसलाही हस्तक्षेप केला नाही. बी० एम० कौल यांच्यावर टीका झाली खरी, पण वालाँग भागात त्यांनी चांगली लढाई दिली, हेही लक्षात घेतले पाहिजे. यशवंतरावांचे भाषण सभागृहाने चांगल्या रीतीने ऐकून घेतले. किंबहुना, या भाषणानंतर यशवंतरावांनी विरोधाची धार कमी करण्यात यश मिळवले आणि आत्मविश्वासही मिळवला.

इतक्या दिवसांच्या अभ्यासानंतर संरक्षणसिद्धतेच्या बाबतीत काय उणिवा राहिल्या, याची यशवंतरावांना चांगली कल्पना आली होती. संरक्षणसाहित्याच्या उत्पादनात कमतरता होती आणि



ॲडमिरल नंदा यांच्यासमवेत

त्यासंबंधी खरी माहिती सरकारला दिली जात नव्हती. मेनन यांनी खात्यातील वातावरण दूषित केल्यामुळे नीतिधैर्य नष्ट झाले होते आणि म्हणून अनेक दृष्टीने खात्याची पुनर्रचना निकडीची झाली होती. संरक्षण खात्याचा कारभार हाती आल्यावर यशवंतरावांनी यालाच प्राधान्य दिले. कृष्ण मेनन यांना संरक्षणसाहित्य खरेदी करण्यासाठी अर्थमंत्री या नात्याने मोरारजीभाई देसाई वेळेवर व पुरेसे आर्थिक साहाय्य देत नव्हते, विशेषत: परकी चलनाचा पुरवठा पुरेसा नव्हता. अनेक डाव्या प्रवृत्तीच्या लोकांनी हा मुद्दा मांडून मोरारजीभाईवर टीका केली होती. पण संरक्षण खात्याच्या फायली पाहिल्यावर यशवंतरावांना असे काही आढळले नाही. उलट मेननच अनेकदा मंत्रिमंडळापुढे आपल्या मागण्या मांडत नसत किंवा त्याकरता विलंब लावत असे दिसले. कलकत्त्याजवळच्या इशापूर इथल्या संरक्षणसाहित्याच्या कारखान्यात स्वयंचलित बंदूक तयार करण्याचे प्रयोग होत होते. पण काही लष्करी अधिकारी बेल्जियम कंपनीच्या बंदुका आयात करण्याचा आग्रह धरत होते. मग राम प्रधान यांनी इशापूर कारखान्यास भेट देऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. नंतर कॅबिनेट सेक्रेटरीने सर्व पुरावा तपासावा असे ठरले. त्याने इशापूरमध्ये उत्पादन करण्याची योजना योग्य असल्याची शिफारस केल्यावर यशवंतरावांनी ती योजना मंजूर केली. मेनन यांना हे करता आले असते. २२ नोव्हेंबर १९६३ हा भारतास एक काळा दिवस ठरला. त्या दिवशी जनरल दौलत सिंग, जनरल विक्रम सिंग, जनरल नानावटी व हवाई दलाचे एअर व्हाइस मार्शल पिंटो यांचे हेलिकॉप्टर पूंच भागात कोसळून सर्व जण ठार झाले. जनरल चौधरी यांनी ही बातमी यशवंतरावांना



संरक्षणमंत्री यशवंतराव आणि अमेरिकेचे संरक्षण सचिव रॉबर्ट मॅक्नामारा



ब्लॅक सी येथील नौसेनादलाची मानवंदना घेताना



यु० एस० शिष्टमंडळासमवेत चर्चा करताना गव्हर्नर ॲव्हरेल हॅरिमन, यु० एस० ॲम्बेसॅडर जे० के० ग्रॅलब्रेथ

फोनवरून दिली. वास्तविक एकाच विमानातून इतक्या सेनाधिकाऱ्यांनी प्रवास करण्यास मनाई होती. पण या अधिकाऱ्यांनी ती मोडली आणि ही दुर्घटना घडली. पिंटो यांना यशवंतराव मुंबईपासून ओळखत होते. ही भयंकर बातमी यशवंतराव ऐकत असताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असल्याचे राम प्रधान यांनी नमूद केले आहे.

संरक्षणखात्यातील अनुभवावरून यशवंतरावांचे मत असे झाले की, आंतरराष्ट्रीय गुप्त माहिती काढण्याची यंत्रणाही सुधारण्याची आवश्यकता आहे. गृहखात्याकडून लष्करी बाबतीतील गुप्त माहितीचा विभाग संरक्षणखात्याकडे देणे युक्त असे त्यांना वाटले. त्यांनी तसा प्रस्ताव नेहरूंकडे पाठवला. नेहरूंनी त्यांना सांगितले की, तत्त्वत: हा प्रस्ताव रास्त आहे. पण तसे करायचे तर गृहमंत्री लालबहादूर शास्त्री यांची संमती घ्यावी लागेल. ती घेण्यासाठी शास्त्री यांच्याशी बोलण्याची सूचना नेहरूंनी केली. पण शास्त्री यांना भेटून त्यांच्या खात्याचा विभाग काढून घेण्यासंबंधी चर्चा करणे, यशवंतरावांना अवघड वाटल्यामुळे हा प्रश्न अनिर्णित राहिला.

नंतर केंद्र आणि राज्यातील काँग्रेसच्या काही ज्येष्ठ मंत्र्यांनी आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देऊन पक्षकार्य करण्यासाठी एक योजना नेहरूंनी संमत केली. कामराज तिचे जनक असल्यामुळे 'कामराज योजना' म्हणून ती ओळखली जाते. कामराज योजनेत इंदिरा गांधींचा हात होता काय, असे विचारल्यावर यशवंतराव म्हणाले, त्यांचा थोडाफार हात असावा. आपले व इंदिरा गांधींचे संबंध चांगले विश्वासाचे झाले होते. कामराज योजनेच्या दिवसांत त्या माझ्या घरी आल्या असता आम्ही बाहेर फेऱ्या मारत होतो, तेव्हा त्यांनी मला विचारले की, तुम्ही गृहमंत्रिपद का घेत नाही? त्यावर मी उत्तर दिले की, मी महाराष्ट्रातून इथे आलो ते संरक्षणखाते घेण्यासाठी. तेव्हा ते बदलणे योग्य नाही. विशेष काही कारण घडले तर गोष्ट वेगळी. इतके बोलून मी विचारले की, पिताजींनी असा उल्लेख केला काय? त्यावर त्या म्हणाल्या, नाही. त्यांच्याशी बोलण्याआधी तुमचे मत काय आहे, हे आपल्याला कळले पाहिजे अशी पुस्ती त्यांनी जोडली. यशवंतरावांनी नंतर असेही सांगितले, की त्या वेळच्या एका बोलण्यात त्यांनी इंदिरा गांधींना सांगितले, की तुम्ही पंतप्रधान व्हायला हवे आणि त्यासाठी आतापासून तुम्ही तुमचे बस्तान बसवले पाहिजे व तुम्हांला पंतप्रधान व्हायचे असेल तर तुम्ही आपली मते बोलून दाखवण्याची आवश्यकता आहे. मात्र आपल्याला पंतप्रधान व्हायचे नाही, असे इंदिरा गांधी निक्षून म्हणाल्या.

चीनने आपले सैन्य उत्तर सीमेवरून काढून घेण्याचे जाहीर केल्यानंतर, संरक्षणसिद्धता वाढवण्याचे प्रयत्न कोणत्या दिशेने करायचे याबद्दल अभ्यास करण्यासाठी काही तज्ज्ञ-समित्या नेमल्या होत्या. तसेच चिनी आक्रमणाच्या काळात अमेरिका व इंग्लंड यांचे संबंधित अधिकारी चर्चेसाठी दिल्लीला येऊन गेले होते. अमेरिकेचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांचे लष्करी सल्लागार वॉल्टर रोस्टॉव व परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी दिल्लीला भेट दिली. माउंटबॅटनही येऊन गेले. अमेरिका व इंग्लंड यांच्या सरकारांचा चिनी आक्रमणाच्या काळातला उत्साह कमी झाला होता. त्यांनी मग भारताची खरोखर गरज किती, चीनचे एकंदर धोरण काय राहील, भारतास मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत दिल्यास चीनची पावले कशी पडतील आणि पाकिस्तानवर काय परिणाम होईल इत्यादी प्रश्न उपस्थित केले. यावरून अमेरिका व इंग्लंड यांच्याकडून मोठ्या प्रमाणात मदत होण्याची अपेक्षा करण्यात अर्थ नाही असा निष्कर्ष यशवंतरावांनी काढला.

असे असले तरी जी मदत होईल ती घ्यावी असे मंत्रिमंडळाने ठरवले आणि मग यशवंतरावांनी १९६४



पेंटॅगॉन भेटीत अमेरिकेचे संरक्षण सचिव रॉबर्ट मॅक्नामारा व भारतीय राजदूत श्री० बी० के० नेहरू यांच्यासमवेत



१५ ऑगस्ट १९६३. स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावर संरक्षण मंत्री यशवंतराव, पंतप्रधान पंडित नेहरूंचे स्वागत करताना



एव्हरेस्टचे विजेते तेनझिंगबरोबर संरक्षण मंत्री



संरक्षणमंत्री कार्यालयात



राष्ट्रीय विकास परिषदेच्या (एनडीसी) सभेत–जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद बक्षी, पंतप्रधान नेहरू व संरक्षणमंत्री



भारतीय नौसेनेच्या अधिकाऱ्यांसमवेत यशवंतरावांच्या उजवीकडे व्हाइस ॲडमिरल सोमण, डावीकडे श्री० राम प्रधान



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक व नौसेना प्रमुख व्हा० ॲडमिरल सोमण यांच्यासमवेत



मिलिटरी हॉस्पिटलला तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी भेट दिली असता, त्यांच्यासमवेत



काश्मीर खोऱ्यात मराठा लाइट इन्फन्ट्रीला भेट देतेवेळी शिवाजी महाराजाच्या पुतळ्यास हार घालताना



एका पदवीदान समारंभात सहभागी होताना



ताश्कंद (रशिया)




ताश्कंद करारासंबंधी बोलताना पंतप्रधान मा० लालबहादूर शास्त्री, बाजूला अनुक्रमे स्वर्णसिंग व यशवंतराव



संरक्षण मंत्र्यांचा लष्करी अधिकाऱ्यांशी विचारविनिमय



काश्मीर खोऱ्यात लेफ्टनंट जनरल विक्रमसिंह व जनसंपर्क अधिकारी श्री० मीरचंदानी टिप्पणी घेताना



संरक्षणमंत्री या नात्याने लष्करी अधिकाऱ्यांसमवेत सीमा भागात दौऱ्यावर



ॲडमिरल करमरकर यांच्याबरोबर यशवंतराव



वैमानिकांसमवेत हालवारी या ठिकाणी



मा० राम प्रधान, यशवंतराव



पंडित नेहरू, श्रीप्रकाश, काकासाहेब गाडगीळ यांच्यासमवेत



लोकमान्य टिळक यांच्या
५०व्या पुण्यतिथीदिनी
दिल्ली येथील कार्यक्रमात
राष्ट्रपती व्ही० व्ही० गिरी
यांच्यासमवेत



मोरारजी देसाई यांच्यासमवेत



राष्ट्रपती व्ही० व्ही० गिरी व पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत



राष्ट्रपती व्ही० व्ही० गिरी यांच्यासमवेत



पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या ८व्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात. सोबत राष्ट्रपती व्ही० व्ही० गिरी, उपराष्ट्रपती जी० एस० पाठक, पंतप्रधान इंदिरा गांधी व इतर



जर्मनीमध्ये डॅन्युब नदीच्या काठी. सोबत आय० जी० पटेल; सचिव, वित्त मंत्रालय व शरद उपासनी; निजी सचिव



जर्मनीमध्ये डॅन्युब नदीच्या काठी



जर्मनीमध्ये श्री० शरद उपासनी यांच्यासमवेत



महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या देवगिरी टेक्सटाइल्स मिलच्या उद्घाटनप्रसंगी




देवगिरी टेक्सटाइल्स मिल्स लिमिटेडच्या उद्घाटनप्रसंगी उपपंतप्रधानपदी असताना.
सोबत मुख्यमंत्री शरद पवार, शरद उपासनी




महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या देवगिरी टेक्सटाइल्स मिलच्या उद्घाटनप्रसंगी



मॉस्को भेटीत भारतीय राजदूताबरोबर अनौपचारिक चर्चा करताना. सोबत निजी सचिव शरद उपासनी



मॉस्कोमधील बोल्शॉय थिएटरमधील कार्यक्रमाच्या वेळी



मॉस्को भेटीत




मॉस्को विमानतळावर आगमनप्रसंगी



मॉस्को भेटीत भारतीय व रशियाच्या शिष्टमंडळातील चर्चेच्या प्रसंगी



इंडो-युएस जॉइन्ट कमिशनच्या करारावर सही करताना. सोबत युएस सेक्रेटरी ऑफ स्टेट हेन्री किसिंजर



बांगलादेशचे पंतप्रधान शेख मुजीबुर रेहमान यांच्याशी चर्चा करताना




श्रीमती इंदिरा गांधी यांना पुस्तक देत असताना



फ्रान्सचे सांस्कृतिक मंत्री व प्रसिद्ध लेखक आंद्रे मालरॉस यांच्यासमवेत



श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासमवेत यु० एस्० एस्० आर०च्या सर्वोच्च नेत्यांबरोबर (राष्ट्राध्यक्ष ब्रेझनेव्ह, क्रुशॉव्ह, ग्रोमिको व कोसिजिन)

सालच्या 'मे'मध्ये अमेरिकेला भेट दिली. वॉशिंग्टनला जाऊन पेन्टागॉनच्या अधिकाऱ्यांशी व विशेषत: संरक्षणमंत्री रॉबर्ट मॅक्नामारा यांच्याबरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली. वॉशिंग्टनमध्ये भारताचे राजदूत बी० के० नेहरू यांनीही वाटाघाटीत भाग घेतला होता. मॅक्नामारा यांनी अनेक प्रश्न विचारले. परंतु एकंदर रागरंग, भारतास एफ-१०४ अशी लढाऊ विमाने मिळणे अवघड आहे असा होता. ही विमाने खरेदी करण्याकरता अमेरिकन काँग्रेस पुरेसे आर्थिक साहाय्य मंजूर करणार नाही असे मॅक्नामारा यांनी सांगितले. यामुळे अत्यंत आधुनिक लष्करी साहित्य सामग्री देण्याची अमेरिकन सरकारची तयारी नसल्याचे स्पष्ट झाले. यशवंतराव यामुळे नाराज झाले आणि आपली ही नाराजी त्यांनी डीन रस्क यांच्याशी बोलताना लपवून ठेवली नाही. भारताने आधुनिक सामग्री देण्याची विनंती केली असता ज्या रीतीने तिचा विचार झाला, त्यामुळे आपण निराश झालो असे ते म्हणाले. यानंतर अमेरिकेतील संरक्षण-उत्पादनाचे काही कारखाने, लष्करी महाविद्यालये इत्यादी पाहण्यासाठी यशवंतराव गेले. २८ तारखेला त्यांची अध्यक्ष जॉन्सन यांच्याबरोबर भेट ठरली होती. भारतात परतल्यावर काही दिवसांनी कुन्ही कृष्णन यांनी त्यांची भेट घेतली तेव्हा अमेरिकन अधिकाऱ्यांना पाकिस्तानचीच विशेष काळजी असल्याचा आपला ग्रह झाल्याचे यशवंतराव म्हणाल्याची आठवण, कुन्ही कृष्णन यांनी दिली आहे.

यशवंतरावांना या प्रकारचा अनुभव येणार हे सरकारी वर्तुळातही अपेक्षित होते. त्यांच्या आधी कृष्णम्माचारी यांची अमेरिकेची भेट निष्फळ झाली होती. रशियाकडून मिग विमाने भारताने घेणे अमेरिकेला पसंत पडले नव्हते. भारतासारख्या गरीब देशास अशी आधुनिक विमाने कशाला हवीत व कशी परवडतील, असा अमेरिकन अधिकाऱ्यांचा प्रश्न होता. कृष्णम्माचारी व यशवंतराव यांच्या भेटीपूर्वी चीनच्या आक्रमणानंतर कुन्ही कृष्णन अमेरिकेस गेले असता, बी० के० नेहरू यांनी फिलिप टाल्बट यांच्याशी त्यांची भेट घालून दिली होती. टाल्बट हे तेव्हा अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यात उपपरराष्ट्रमंत्री होते. पत्रकार म्हणून ते भारताशी परिचित होते. कुन्ही कृष्णन यांना ते म्हणाले की, तुमचे जवाहरलाल नेहरू हे हळूहळू मादाम चँग कै शेक होऊ लागले आहेत. नेहरूंची लोकप्रियता झपाट्याने घसरत असून अमेरिकन सरकार त्यांना मोठे नेते मानेनासे झाले आहे. (*चव्हाण अँड द ट्रबल्ड डिकेड*, पृ० १०८.) या टाल्बट यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची परंपराच चालू राहिल्यामुळे, भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांबाबतचे अमेरिकन सरकारांचे मूल्यमापन अनेकदा चुकत गेले.

जॉन्सन यांच्याबरोबर २८ तारखेला भेट होण्याच्या आदल्या दिवशीच्या पहाटेस, पंडित जवाहरलाल नेहरूंचे निधन झाल्याची बातमी यशवंतरावांना दिल्लीहून कळवण्यात आली. यशवंतरावांनी त्यांचे सचिव राम प्रधान यांना बोलावले. हे दु:खद वृत्त सांगत असताना यशवंतरावांना अश्रू आवरत नव्हते. नेहरू हे आपल्या पक्षाचे नेते व देशाचे पंतप्रधान एवढीच यशवंतरावांची भावना नव्हती. सर्व देशाचे एकमेव नेते असे नेहरूंचे स्थान होते. शिवाय यशवंतरावांप्रमाणे देशातल्या लक्षावधी तरुणांची वैचारिक घडण नेहरूंचे जीवन, व्यक्तित्व आणि लिखाण यांमुळे घडली होती. यामुळे केवळ देशाच्याच नव्हे, तर स्वत:च्या जीवनातले एक महत्त्वाचे पर्व संपले याची दुख:द जाणीव नेहरूंच्या निधनामुळे झाली. अमेरिकन सरकारकडे नेहरूंच्या निधनाचे वृत्त आलेच होते. तेव्हा मॅक्नामारा यांनी अमेरिकन हवाई दलाच्या खास विमानाची व्यवस्था केल्याचे कळवले. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डीन रस्क, राजदूत चेस्टर बौल्स, बी० के० नेहरू हे यशवंतरावांच्या बरोबर दिल्लीस जाण्यास निघाले. विमानाच्या प्रवासात यापुढे भारताचे राजकारण कोणती दिशा घेणार, नेहरूंनंतर कोण पंतप्रधान होईल, इत्यादीबाबत चर्चा होणे



'शांतिचितेचे भस्म' स्मारकाचे कलावंत बुखटेक व यशवंतराव

व्होल्गा नदीवर एका वीजनिर्मिती केंद्रास भेट



अपरिहार्य होते. वास्तविक नेहरूंनंतर कोण? या प्रश्नाची चर्चा इंग्लंड, अमेरिका इत्यादी देशांतली वृत्तपत्रे या आधी तीनचार वर्षे उघडपणे करू लागली होती. भारतात उघड चर्चा झाली नाही, तरी अनेक वर्तुळांत ती होतच असे. हॅन्गन यांच्या *आफ्टर नेहरू हू?* या पुस्तकात लालबहादूर शास्त्री, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी इत्यादींच्या बरोबर यशवंतरावांचेही नाव होते. लेखकाने म्हटले होते की, पंतप्रधान होण्यासाठी लागणारे गुण यशवंतरावांपाशी आहेत. केंद्र सरकारात त्यांनी दोनतीन वर्षे काम केल्यावर त्यांची यासंबंधीची योग्यता अधिकच वाढेल.

अमेरिकेहून परतताना याच विषयावर कोणत्या प्रकारची बोलणी रस्क, बोल्स, बी० के० नेहरू यांच्यासमवेत झाली, याची माहिती यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिली. ते म्हणाले, नेहरूंचा राजकीय वारस निवडताना काँग्रेसचे नेते एकोपा ठेवतील यात काहीच शंका नाही, असे आपण विश्वासपूर्वक सांगितले. इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर येतील काय, हा प्रश्न निघाला तेव्हा यशवंतराव म्हणाले की, आपल्याला ती शक्यता वाटत नाही. नेहरूंच्या निधनानंतर लगेच पंतप्रधानपद त्या स्वत:च घेणार नाहीत व ते बरेही दिसणार नाही. मतदान वगैरे न घेता पंतप्रधानाची निवड करणे श्रेयस्कर असून, एकोपा पाळणे हे काँग्रेसच्या व देशाच्या हिताचे ठरेल व तसेच होईल. पुढे लालबहादूर शास्त्री यांची निवड याच रीतीने झाली.

ही निवड करण्याच्या कामी काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांनी प्रमुख भूमिका बजावली. मोरारजीभाईंना त्यांचा विरोध होता. तसेच काँग्रेसच्या वरिष्ठ वर्तुळात अतुल्य घोष, स० का० पाटील इत्यादी होते. त्यांचे मत कामराज यांच्यासारखेच होते. यामुळे मतदान न घेता पंतप्रधानपदाचा वारस निवडायचा प्रस्ताव मान्य झाला. तो आपल्याला डावलण्यासाठी असल्याचे मोरारजींनी ओळखले; पण त्यांनी काही खळखळ केली नाही. लालबहादूर शास्त्री यांना उत्तरप्रदेशच्या काँग्रेस खासदारांचा पाठिंबा होता. शिवाय त्यांनी कामराज यांच्याशीही संबंध प्रस्थापित केले होते. मग लालबहादूर शास्त्री यांची पंतप्रधान म्हणून निवड झाली. ती होण्यापूर्वी शास्त्री यांनी इंदिरा गांधींना हे पद घेण्याबद्दल विचारले होते, तेव्हा त्यांनी नकार दिला. मंत्रिमंडळात ज्येष्ठताक्रमाने नंदा यांचा दुसरा क्रम लावला होता. मोरारजीभाईंना आपल्याला ते पद मिळावे असे वाटत होते. पण नंदांना बाजूस करण्यास शास्त्री तयार नसल्यामुळे मोरारजींचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. यशवंतरावांकडे संरक्षणमंत्रिपद राहिले. इंदिरा गांधी या मंत्रिमंडळात माहिती व आकाशवाणी खात्याच्या मंत्री म्हणून नेमल्या गेल्या होत्या. काहीही करून त्यांचा आपल्या मंत्रिमंडळाशी संबंध हवा, अशी शास्त्री यांची भूमिका होती.

शास्त्री मंत्रिमंडळाचे काम सुरू झाल्यावर यशवंतरावांनी अमेरिकेच्या भेटीबाबतचा तयार केलेला अहवाल नव्या पंतप्रधानांनी वाचला. यशवंतरावांची इंग्लंडची भेट ठरली होती. पण लालबहादूर शास्त्री यांनी त्या अगोदर रशियाला भेट देण्याची सूचना केली. त्याप्रमाणे यशवंतराव आपल्या खात्याच्या शिष्टमंडळाला घेऊन ऑगस्टमध्ये मॉस्कोला रवाना झाले. या वेळी त्यांच्याबरोबर वेणुताईही होत्या. मॉस्कोला पोचल्याचा दुसरा दिवस रविवार असल्यामुळे अधिकृत कार्यक्रम नव्हता. तेव्हा टॉल्स्टॉयचे स्मारक बघण्याची इच्छा यशवंतरावांनी व्यक्त करावी हे त्यांच्या साहित्यप्रेमामुळे साहजिक होते. टॉल्स्टॉयचे स्मारक व त्याची समाधी पाहणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता.त्याच वेळी चेकॉव्हचेही



सोव्हिएत रशियाचे पंतप्रधान निकिता क्रुश्चॉव यांच्यासमवेत

स्मारक त्यांनी पाहिले. नंतरच्या काळात यशवंतरावांनी अनेक देशांना भेटी दिल्या तेव्हा तिथल्या साहित्यिक, कलावंत इत्यादींची स्मारके पाहण्यावर त्यांनी कटाक्ष ठेवलेला दिसेल. ते हॉलंडला गेले तेव्हा प्रख्यात परीकथा लेखक हॅन्स ख्रिश्चन ॲन्डरसन याचे स्मारक त्यांनी पाहिले. तर फ्रॅन्कफर्ट इथे जर्मन कवी, नाटककार गटे याचा जन्म जिथे झाला ते घर पाहण्यास ते विसरले नाहीत. लंडनला गेल्यावर शेक्सपिअरच्या जन्मगावी जाऊन त्यांनी त्याच्या *रिचर्ड द थर्ड* या नाटकाचा प्रयोग पाहिला व तो अप्रतिम झाल्याचे त्यांनी लिहून ठेवले आहे.

सोव्हिएत युनियनचे संरक्षणमंत्री मार्शल मॅलिनॉव्हस्की व त्यांचे अधिकारी यांच्याबरोबर संरक्षणसाहित्य व भारतातील उत्पादनाची शक्यता या संबंधीची बोलणी सुरू झाली. ती चार-दिवस चालली. नंतर लेनिनग्राड व व्होल्गोग्राड म्हणजे जुने स्टालिनग्राड इत्यादी शहरातल्या युद्धस्मारकांना भेटी झाल्या. ९ सप्टेंबर रोजी सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष निकिता क्रुश्चॉव यांची भेट झाली. भारतास जी शस्त्रास्त्रे हवी होती ती रशिया देण्यास तयार असल्याचे मॅलिनॉव्हस्की यांनी सांगितलेच होते. पण यासाठी रशिया देऊ करत असलेल्या कर्जाची मुदत रशियाने सुचवली होती; त्यापेक्षा अधिक मुदतीची करण्याची यशवंतरावांनी मागणी केली होती. क्रुश्चॉव यांनी यातला सुवर्णमध्य काढून मुदत वाढवण्याचे मान्य केले. यामुळे एक मोठा प्रश्न सुटला. थोड्याच अवधीत क्रुश्चॉव यांना त्यांचे पद सोडावे लागले. त्यापूर्वीच भारताबरोबर करार झाला ही चांगली गोष्ट झाली.

रशियानंतर यशवंतरावांनी ब्रिटिश सरकारशी संरक्षणसाहित्याची मदत मिळण्यासाठी इंग्लंडला



रशियातील प्रेक्षणीय स्थळास भेट देताना सौ० वेणूताई

११ नोव्हेंबरपासून भेट दिली. मजूर पक्ष नुकताच सत्तेवर आला होता. पण यामुळे भारतास विशेष अनुकूल वातावरण निर्माण झाले नव्हते. यशवंतराव व पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांची भेट झाली. भारतास नौदलाची सुधारणा करायची होती. यासाठी जुन्या विनाशिका, पाणबुड्या इत्यादींची मागणी करण्यात आली होती. पण ब्रिटनचे संरक्षण खाते आणि स्वत: पंतप्रधान राजी नव्हते. एकंदरीत ही भेट यशस्वी झाली नाही. यशवंतरावांची पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांच्याशी बोलणी झाली तेव्हा आपले उच्चायुक्त जीवराज मेहता हेही त्यांच्याबरोबर होते. विल्सन यांनी जेव्हा विनाशिका, पाणबुड्या वगैरे देऊन भारतीय नौदल बळकट करण्याचे नाकारले तेव्हा जीवराज मेहता यांनी त्यांना, ते विरोधी पक्षाचे नेते असताना काय म्हणाले होते याची आठवण करून दिली. विल्सन तेव्हा म्हणाले होते की, आमच्या व हिमालयाच्या सीमा एकच आहेत. त्यावर विल्सन यांनी उत्तर दिले की, त्या वेळी मी तसे म्हणालो खरा, पण हिमालयाच्या संरक्षणासाठी तुम्हांला पाणबुड्या हव्यात, हे मला माहीत नव्हते. हे उपहासात्मक उत्तर जीवराज व आपल्याला अपेक्षित नव्हते असे जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत यशवंतराव म्हणाले. त्यांनी मग अशीही पुस्ती जोडली की, पाश्चात्त्य लोकशाही देश भारताच्या प्रतिनिधीशी कसे



यशवंतराव, यू०एस०एस०आर०चे प्रमुख क्रुश्चॉव,
भारतीय राजदूत श्री० टी० एन० कौल, एच० सी० सरीन, सहसचिव, संरक्षण विभाग

वागत हे यावरून दिसून येऊ शकते. यशवंतराव असेही म्हणाले की, या मानाने अमेरिकनांचे वागणे अधिक बरे व मोकळेपणाचे होते. ते आपल्याजवळची सर्व माहिती मांडून मग आपले निष्कर्ष सांगत. ही माहिती व निष्कर्ष कदाचित चुकीचेही असतील, पण ते आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण देत, नुसते 'हो', वा 'नाही', म्हणत नसत. ब्रिटन व अमेरिका यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे सोव्हिएत युनियनवर अवलंबून राहण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाही.

भारतास या प्रकारच्या भूमिकेची कल्पना असल्यामुळे निराश होण्याचे कारण नव्हते. काही अवधीनंतर मात्र ब्रिटिश कंपन्यांनी भारतातच आधुनिक लढाऊ बोटी बांधल्या व अद्ययावत फ्रिगेटही बांधून दिली. पण ती मदत नव्हती; तर कंत्राट घेऊन हे काम केले गेले. या भेटीत यशवंतरावांनी ब्रिटिश संरक्षणमंत्री डेनिस हिली यांना मेजवानी दिली तेव्हा लॉर्ड ॲटली यांना आमंत्रण दिले होते. यशवंतरावांना ॲटली यांची जीवनकहाणी चांगली माहीत होती आणि भारतात सत्तांतर करण्याचा निर्णय घेऊन अमलात आणणारे ॲटलीच असल्यामुळे, त्यांच्यासंबंधी यशवंतरावांना आदर होता. ॲटली यांच्या उपस्थितीबद्दल यशवंतराव नंतरही कौतुकाने बोलत असत. या मुक्कामात यशवंतरावांनी



भारत व इंग्लंड शस्त्रपुरवठा चर्चा करताना यशवंतराव व डंकन सॅण्डी,
ब्रिटनचे संरक्षणमंत्री व श्री० राम प्रधान



विदेश यात्रेमध्ये इंग्लंडच्या मंत्र्यांबरोबर डावीकडून संरक्षणमंत्री डेनिस हिले, यशवंतराव,
राष्ट्रकुलविषयक संबंध मंत्री आर्थर बॉटमले व भारताचे उपउच्चायुक्त केवलसिंग



इंग्लंडमधील भेटीत सर्वांत आनंदाचा क्षण लॉर्ड ॲटली व संरक्षणमंत्री डेनिस हिले यांच्याबरोबर

संरक्षणसाहित्याचे उत्पादन करणारे काही कारखानेही पाहिले.

विमानांचा कारखाना ब्रिस्टल इथे होता. त्या वेळी मी थॉम्सन फौन्डेशनची वृत्तपत्रविद्येची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे वेल्सची राजधानी कार्डिफ इथे होतो. तिथून यशवंतरावांना भेटण्यासाठी ब्रिस्टलला गेलो. तिथे राजा राममोहन रॉय यांची समाधी आहे. ती पाहण्यासाठी राम प्रधान व मी यशवंतरावांबरोबर होतो. भारतात आधुनिक विद्येचा प्रसार होऊन विवेकी समाज निर्माण व्हावा अशी अपेक्षा बाळगून, त्याप्रमाणे कार्य करणारे राममोहन रॉय हे आपल्याकडील वैचारिक क्रांतीचे प्रवर्तक होते. अशा या दूरदर्शी समाजसुधारकाच्या समाधीस स्वतंत्र भारताचा संरक्षणमंत्री भेट देऊन आदरांजली वाहत होता. हा एक महत्त्वाचा क्षण होता.

यशवंतराव संरक्षणमंत्री होऊन आता दोन वर्षे झाली होती. त्यांनी अगोदरचा गोंधळ दूर केला होता आणि सैन्य व त्याच्या तिन्ही दलांच्या साहित्यात लक्षणीय वाढ करण्यात यश मिळवले होते. संसदेला पुढील वर्षाची योजनाही वेळेवर सादर करण्यात आली आणि कधी नव्हे इतकी माहिती सभासदांना या अहवालामुळे मिळाली. त्याचबरोबर अमेरिका व इंग्लंड यांनी संरक्षणसाहित्याच्या संबंधी कोणती आश्वासने दिली होती व त्यांपैकी किती प्रमाणात पाळली याचीही आकडेवारी देण्यात आली. पाकिस्तान व चीन भारतास उसंत मिळू देण्यास तयार नव्हते. चीनने १९६४ सालीच अणुबॉम्बचा स्फोट केला होता. तसेच आपल्या सीमेवरील त्याचे सैन्यही वाढले होते. चीनच्या एकंदर लष्करातच मोठी वाढ झाली होती. हे चिंताजनक होते.

हे होत असताना पाकिस्तानने आक्रमक पवित्रा घेऊन सीमेचा भंग करणारी पावले टाकली. लवकरच

काश्मीरला धोका वाढणार असे दिसू लागले. तेव्हा पंतप्रधान शास्त्री व यशवंतराव यांनी जम्मू-काश्मीर भारतीय संघराज्यात सामील करून घेतले. पाकिस्तानात जनरल अयूब खान यांनी मर्यादित मतदानाचा हक्क देणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीत विजय मिळवला होता. त्यांचे परराष्ट्रमंत्री होते झुल्फिकार अलि भुत्तो. दोघेही भारत व नेहरू यांच्याबद्दल द्वेषभावना बाळगणारे. पाकिस्तानला अमेरिका लष्करी मदत देत असली आणि अमेरिका व चीन यांचे वैर असले तरी अयूब खान व भुत्तो यांनी चीनबरोबर सख्य जमवले होते. अयूब व भुत्तो यांनी चीनला भेट दिली. चीनबरोबर अयूब यांनी सीमाविषयक करार केला. याचमुळे अक्साईचीन भागात चीन हमरस्ता बांधू शकला. नंतर अयूब यांनी सोव्हिएत युनियनला भेट दिली. रशियाने पाकिस्तानला काही मदत दिली, ती आपल्याशी तो देश जमवून घेत असेल तर त्याचे स्वागत करावे या हेतूने.

या प्रकारे पाकिस्तानने आपली बाजू बळकट करण्याचे प्रयत्न चालू ठेवले व त्या पाठोपाठ कच्छच्या रणात आक्रमक हालचाली सुरू केल्या. या वाळवंटी प्रदेशाच्या काही भागावर जुन्या करारानुसार तो हक्क सांगत होता. याच वेळी त्याने काश्मीरची नियंत्रण रेषा ओलांडण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू केले. काश्मीरमध्ये घुसखोरी करताना भारतीय सैन्य कच्छमध्ये गुंतवता आले तर ते पाहण्याचा हेतू होता. पण ब्रिटनने मध्यस्थी केली आणि राष्ट्रकुल परिषदेच्या निमित्ताने शास्त्री व अयूब यांची भेट झाली तेव्हा भारत व पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी घडवून आणणारा तोडगा सुचवला; तो दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी मान्य केला. या कराराबद्दल लोकसभेत बोलताना यशवंतरावांनी स्पष्ट केले की, भारत सरकार उत्तर सीमेबाबत विशेष दक्षता घेत आहे आणि तिथेच आपले हितसंबंध आहेत. कच्छसारख्या वाळवंटी भागाचा आग्रह न धरता तो पाकिस्तानला द्यावा असा विल्सन यांचा सूर होता. पण पंतप्रधान शास्त्री यांनी अमेरिकेतले राजदूत बी० के० नेहरू यांच्यामार्फत आपल्या सरकारचे धोरण काय राहील हे अमेरिकनांना कळवले आणि त्याचा परिणाम होऊन विल्सन थोडे नरमले.

या कच्छच्या संघर्षासंबंधी यशवंतरावांनी जयंत लेले यांना सांगितलेली आठवण नमूद करण्यासारखी आहे. त्यांनी सांगितले की, मुंबईतील एक ज्येष्ठ गृहस्थ, राष्ट्रपती डॉ० राधाकृष्णन यांना भेटले आणि म्हणाले की, नेफाच्या बाबतीत जे घडले तसेच कच्छमध्ये झाले आहे. त्या वेळी मेनन यांना काढून टाकण्यात आले तोच न्याय यशवंतरावांना लागू करावा. यशवंतराव दर आठवड्यास राष्ट्रपतींना औपचारिक रीत्या भेटून अहवाल देत असत. अशा भेटीत राष्ट्रपतींनी आपल्याला कोण भेटले व त्याने काय सांगितले हे कथन केले. यशवंतरावांनी यावर अशी प्रतिक्रिया दिली की, त्या व्यक्तीचे म्हणणे तर्कशास्त्रदृष्ट्या बरोबर असून तुम्ही कृती करा. यावर डॉ० राधाकृष्णन नुसते हसले. वास्तविक त्या गृहस्थास आपल्या राज्यघटनेची थोडी माहिती असायला हवी होती. आपल्या घटनेप्रमाणे मंत्री नेमण्याचा व त्यास काढून टाकण्याचा अधिकार पंतप्रधानाचा आहे, राष्ट्रपतीचा नाही. सत्तेची दोन केंद्रे निर्माण केलेली नाहीत. मेनन यांना काढून टाकावे असे राधाकृष्णन यांना केव्हापासून वाटत होते, पण ते काही करू शकले नाहीत.

कच्छच्या रणासंबंधी करार झाल्यावर स्वस्थ न बसता, पाकिस्तानने त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या काश्मीरच्या प्रदेशात काही तरुणांना लष्करी शिक्षण देऊन त्यांची पथके तयार केली, तसेच पाकिस्तानी लष्कराच्या तीस हजार सैनिकांना काश्मीरमध्ये घुसखोरी करून लढाई करण्याचे शिक्षण देण्यात आले. पाकिस्तानने एक रेडिओ केंद्रही सुरू करून काश्मीरी लोकांना मुजाहिदांना मदत करण्याचे आवाहन



जनरल जे० एन्० चौधरी यांच्यासमवेत



ब्रिस्टल येथील राजा राममोहन रॉय यांच्या समाधीसमोर यशवंतराव, श्री० राम प्रधान व गोविंदराव तळवलकर



१ रेसकोर्स रोड, दिल्ली येथील शासकीय निवासस्थान



युद्धनौकेच्या जलावतरणप्रसंगी सौ० वेणुताई यांच्यासमवेत



श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासमवेत सौ० वेणुताई



श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासमवेत हास्यविनोद



राष्ट्रपती व्ही० व्ही० गिरी यांच्याकडून केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेताना. सोबत श्रीमती इंदिरा गांधी



राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांच्याकडून भारताचे उपपंतप्रधान म्हणून शपथ घेताना

केले. वरिष्ठ जातीच्या हिंदू लोकांनी दडपशाही चालवली आहे व दक्षिण भारतीय, शीख इत्यादींवर अन्याय चालवला असल्यामुळे त्यांनीही मदत करावी, असा प्रचाराचा रोख होता. नुसत्या प्रचारावर न थांबता, १९६५च्या ऑगस्टच्या पाच तारखेपासून पाकिस्तानी घुसखोर काश्मीरच्या काही भागात शिरायला लागले. त्यांना स्थानिक लोक मदत करून सादिक यांचे सरकार नष्ट करतील अशी पाकिस्तानची अपेक्षा होती, ती पुरी झाली नाही आणि पंचाहत्तर टक्के गनीम पकडण्यात भारतास यश आले. पाकिस्तानच्या संभाव्य हल्ल्यास कसे तोंड द्यायचे याची योजना शास्त्री व यशवंतराव यांनी लष्करी प्रमुखांशी चर्चाकरून जुलैतच निश्चित केली होती.

पाकिस्तानने केवळ घुसखोर पाठवून न थांबता जेव्हा नियंत्रणरेषा ओलांडली तेव्हा तिथवल, छंब इत्यादी भागात भारतीय सैन्याने पाकिस्तानी घुसखोर आणि त्यांना मदत करणारे पाकिस्तानी सैनिक यांना परतवून लावण्यात यश मिळवले. मग लष्करीदृष्ट्या काही महत्त्वाची ठाणी घेतली गेली. यांत हाजी पीरसारखी ठाणी होती.ज्या तळांचा उपयोग करून पाकिस्तानी घुसखोर भारतीय हद्दीत येत आहेत त्या तळांवर हल्ला करण्यात येईल अशी घोषणा पंतप्रधान शास्त्री यांनी लोकसभेत केली. मग पाकिस्तानने युद्धच सुरू केले. त्याचे टँक काश्मीर व पंजाबचा भाग व्यापतील असे चित्र दिसू लागले तेव्हा हवाई दलाचा उपयोग केल्याशिवाय टँकचा मारा थोपवता येणार नाही, असे लष्करी अधिकाऱ्याने कळवताच सरसेनापतींनी तशी परवानगी मागितली आणि यशवंतरावांनी स्वत:च्या अधिकारात ती दिली आणि मग पंतप्रधानांना कळवले. त्यांनी केले ते बरोबर केले, असे शास्त्री यांनी मत दिले.

पाकिस्तानची चढाई वाढत गेल्यावर भारताने सरळ लाहोरच्या रोखाने जाण्याची योजना अमलात आणली. अयूब यांना हे अपेक्षित नव्हते. ते व भुत्तो यांनी अशी समजूत करून घेतली होती की, चीनबरोबरच्या युद्धात भारताला माघार घ्यावी लागल्यामुळे भारतीय सैन्याचे नीतिधैर्य खचले असणार व लष्कराची तयारीही झाली नसेल. शिवाय हिंदूंपेक्षा मुसलमान अधिक लढवय्ये आहेत असा त्यांचा एक आवडता सिद्धान्त होता. नेहरूंनंतर आलेले लालबहादूर शास्त्री राजकीय दृष्ट्याही दुर्बळ असणार अशी अयूब यांची खात्री होती. पण यातले काहीच खरे नव्हते. अमेरिकन टँक वरचढ ठरतील हा विश्वासही खोटा ठरला. अमेरिकेने दिलेले पॅटन टँक भारतीय सैन्याने निकामी करण्यात यश मिळवले. खेमकरण भागात मोठी लढाई झाली. भारताकडे ब्रिटिश सेंच्युरिऑन या जातीचे टँक होते. त्यांनी उत्तम काम दिले. तसेच नॅट ही लढाऊ विमानेही ब्रिटिश होती व लहान होती पण त्यांची कामगिरी मोठी होती.

पाकिस्तान हे बगदाद व आग्नेय लष्करी करारात सामील असल्यामुळे, अमेरिका पाकिस्तानच्या मदतीला येण्यास बांधली असल्याचा युक्तिवाद अयूब व भुत्तो अमेरिकन सरकारच्या प्रतिनिधींबरोबर बोलताना करत होते. पण हे करार कम्युनिस्ट देशांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी असून, अमेरिका पाकिस्तानला भारताबरोबर युद्ध करण्यासाठी लष्करी मदत देणार नाही, असे त्यांना उत्तर मिळत होते. उलट युद्ध सुरू होताच अमेरिकन सरकारने भारत व पाकिस्तान यांना दिली जाणारी आर्थिक मदत थांबवली व त्याचबरोबर पाकिस्तानची लष्करी मदतही बंद झाली. याचा पाकिस्तानला विशेष फटका बसला. या लढाईचा ताळेबंद पाहिला तर पाकिस्तानला आधुनिक शस्त्रे देऊनही अमेरिकेने त्यास भारताचा पराभव करता येईल इतके प्रबळ बनवले नसल्यामुळे अमेरिकेची नाचक्की झाली. आपल्या लष्कराच्या तिन्ही दलांनी उत्तम कामगिरी केली आणि शास्त्री व यशवंतराव यांचे राजकीय नेतृत्व वरचढ ठरले. पाकिस्तानचा पुरता पराभव मात्र झाला नाही, आपली हानीही बरीच झाली. पण चीनच्या युद्धामुळे

गेलेले नीतिधैर्य परत आले. त्या वेळी अयूब यांनी अमेरिकेचे अध्यक्ष यांना पाठवलेले खलिते आणि पाकिस्तानातल्या अमेरिकन राजदूताशी झालेली त्यांची बोलणी; ही सर्व आता उपलब्ध आहेत. ती कागदपत्रे वाचल्यावर पाकिस्तान किती घाईला आले होते याची कल्पना येते. अमेरिकन तज्ज्ञांनीही लिहिले की, आणखी आठपंधरा दिवस युद्ध चालविणे पाकिस्तानच्या आवाक्याबाहेरचे होते. त्याची सामग्री संपत आली होती आणि सुटे भाग अगदीच थोडे राहिले होते. औद्योगिक पाया नसल्यामुळे हे असे होणे अनिवार्य होते. अखेरीस २२ सप्टेंबरपासून शस्त्रसंधी अमलात आली. मग रशियाने तडजोडीची बोलणी करण्यासाठी मध्यस्थी करण्याकरता पुढाकार घेतला आणि ४ ते १० जानेवारी या काळात ताष्कंद इथे शास्त्री आणि अयूब यांच्यात बोलणी झाली. रशियन पंतप्रधान कोसिजिन यांनी जरूर पडेल तेव्हाच हस्तक्षेप केला आणि मग एक करार झाला. अर्थात दोन्ही पक्षांचे पूर्ण समाधान होणे शक्य नव्हते व तसे ते झाले नाही. परंतु लालबहादूर शास्त्री यांचे ताष्कंद इथे आकस्मिक निधन झाले आणि ताष्कंदच्या बैठकीस हजर असलेल्या यशवंतरावांवर, शास्त्रींचा मृतदेह स्वदेशी परत आणण्याची वेळ आली.

पंडित नेहरूंच्या निधनानंतर शास्त्री यांनी देशाच्या आर्थिक परिस्थितीचा संपूर्ण आढावा घेतला होता. तो घेतल्यावर ही परिस्थिती बिकट होत चालल्याची जाणीव त्यांना झाली. योजनेने ठरवून दिलेली लक्ष्ये पुरी करणे अशक्य असल्याचे त्यांना दिसून आले. परकी चलन, तसेच अंतर्गत आर्थिक सामग्री मागणीपेक्षा कमी पडत असून यात लवकर सुधारणा होणे शक्य नव्हते, तेव्हा शास्त्री यांनी आर्थिक धोरणात काही बदल केले. धान्याची वाढती तूट लक्षात घेऊन त्यांनी धान्योत्पादनास प्राधान्य दिले व शेतीमंत्री सी० सुब्रमण्यम यांच्यावर ती जबाबदारी टाकली. त्यांनी सुधारलेली बियाणे इत्यादी बाबतीत नवी धोरणे अमलात आणली आणि अमेरिकेची मदत मिळवण्यात ते यशस्वी झाले. पीएल० ४८० या कायद्याखाली अमेरिकेने भारतास धान्यपुरवठा करण्याची योजना राबवण्यास सुरुवात केली. अणुबॉम्ब तयार करण्याचा खर्च होमी भाभा यांनी दिला होता त्यापेक्षा बराच अधिक येणार असे दिसल्यावर, शास्त्री यांनी त्याची गती मंद केली. युद्धसमाप्तीनंतर ताष्कंद इथे वाटाघाटी सुरू होण्याच्या मधल्या काळात, शास्त्री यांनी आर्थिक समस्यांचा अधिक विचार केला तेव्हा युद्धानंतर या समस्या अधिकच वाढणार हे स्पष्ट झाले. या अशा चिंतांचा भार वाहत असताना शास्त्री यांचे निधन झाले.

नवा पंतप्रधान निवडण्यासाठी काँग्रेसच्या वर्तुळात हालचाली सुरू झाल्या. मोरारजीभाई या वेळी काहीही झाले तरी निवडणूक लढवण्याच्या मन:स्थितीत होते. या निवडणुकीच्या बाबतीत अध्यक्ष कामराज आणि त्यांचे निकटचे सहकारी यांना महत्त्व प्राप्त झाले होते. हे सहकारी म्हणजे अतुल्य घोष, स० का० पाटील, संजीव रेड्डी इत्यादी. शास्त्री यांची पंतप्रधानपदी निवड झाली त्याहीपेक्षा या वेळी काँग्रेसच्या या पुढाऱ्यांना अधिक महत्त्व आले होते. मोरारजीभाईंना कामराज व त्यांचे सहकारी यांचा पाठिंबा नव्हता. १९६३ सालच्या प्रारंभीच्या दिवसांत कामराज व त्यांच्या सहकाऱ्यांची तिरुपती इथे बैठक होऊन, मोरारजींना नेहरूंचा वारस होऊ न देण्याचे ठरले होते व हीच त्यांची भूमिका शास्त्री यांच्या निधनानंतर कायम होती. गुल्झारीलाल नंदा यांची पंतप्रधान होण्याची इच्छा असली तरी त्यांना कोणी महत्त्व दिले नाही. मग दोन उमेदवार राहिले; एक इंदिरा गांधी व दुसरे यशवंतराव.

यांपैकी इंदिरा गांधी व यशवंतराव यांची या वेळी एकजूट झाली होती. दोघांनाही मोरारजी देसाई



संरक्षणमंत्री म्हणून नौदलाची पाहणी करताना

पंतप्रधान होणे मान्य नव्हते. ते झाले तर काँग्रेसमध्ये दुही होईल आणि आतापर्यंतच्या धोरणांत बदल होईल अशी या दोघांची भीती होती. तशी दोघांत चर्चाही झाली होती. यशवंतरावांनी नंतरच्या काळात मला सांगितल्याप्रमाणे असे दिसते की, ते इंदिरा गांधींना भेटले आणि त्यांनी सांगितले की, नेहरूकन्या म्हणून तुमचा अधिक हक्क आहे व आपला तुम्हांला पाठिंबा राहील. पण कोणत्याही कारणांनी तुम्हांला निवडणूक लढवायची नसेल तर तुम्ही आपल्याला पाठिंबा द्यावा. इंदिरा गांधी यांनी हे ऐकून घेतले. उत्तरप्रदेशाच्या काँग्रेसच्या खासदारांनी उठाव करून इंदिरा गांधींनाच पंतप्रधान करण्याची मागणी केली. पंतप्रधानपदाची निवडणूक पार पडल्यानंतर काही वार्ताहरांनी, तुम्ही व चव्हाण एकजुटीने निवडणुकीचे काम करत होता काय, असा प्रश्न विचारला तेव्हा इंदिरा गांधींनी होकारार्थी उत्तर दिले होते.

कामराज यांचा यशवंतरावांना पाठिंबा नव्हता व अतुल्य घोष, संजीव रेड्डी यांचाही नव्हता. स० का० पाटील उघडपणेच विरोधी होते. या वेळी कामराज यांनी आणखी एक खेळी केली. राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा कौल त्यांनी घेतला. द्वारकाप्रसाद मिश्र हे मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री होते. त्यांनी पुढाकार घेऊन इंदिरा गांधींना पंतप्रधान करणे देशाच्या हिताचे असल्याचे पत्रक काढले. मग पुढे ज्यांना सिंडिकेट म्हणून ओळखले जाऊ लागले, त्यातील कामराज व त्यांचे सहकारी यांनी आपला कल स्पष्ट केला. तथापि मोरारजीभाईंनी आपले नाव मागे न घेतल्यामुळे मतदान झाले आणि इंदिरा गांधी यांना ३५५ तर



संरक्षण व्यवस्थेची पाहणी करताना

मोरारजींना १६९ मते पडली व इंदिरा गांधी पंतप्रधान म्हणून निवडल्या गेल्या. त्यांना पाठिंबा देणाऱ्या अनेकांनी लवकरच येणाऱ्या लोकसभा निवडणुकीचा विचार केला असावा. कारण इंदिरा गांधी नेहरूकन्या होत्या आणि देशातल्या सामान्य लोकांत त्यांना पाठिंबा असल्याचे यापूर्वी दिसून आले होते.

पंतप्रधानपदासाठी तुमचा हक्क पहिला असून तुम्ही उभ्या राहणार नसल्यास आपण राहू असे सांगून, यशवंतरावांनी आपली बाजू कमकुवत केल्याची टीका महाराष्ट्रात पुढील काळात होत असे. पण ती गैरमाहितीवर आधारलेली होती. यशवंतरावांनी इंदिरा गांधींना जे सांगितले ते वास्तव परिस्थितीचा विचार करूनच सांगितले होते. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांतील कामराज, अतुल्य घोष, स० का० पाटील, निजलिंगप्पा, संजीव रेड्डी यांपैकी कोणीही आपल्याला पाठिंबा देणार नाहीत, हे यशवंतरावांनी ओळखले होते. ज्या मुख्यमंत्र्यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा जाहीर केला त्यांत वसंतराव नाईक सोडल्यास इतरांचे मत यशवंतरावांना मिळणे अशक्यप्राय होते. याखेरीज खुद्द इंदिरा गांधी पंतप्रधानपद मिळवण्यास राजी नसतील यावर त्यांचा पूर्ण विश्वास नव्हता. तसेच नेहरूकन्या म्हणून मतदारांत त्यांना अधिक पाठिंबा मिळेल, हे कोणालाही समजण्यासारखे होते.

इंदिरा गांधींच्या मनस्थितीसंबंधात इंदर मल्होत्रा यांचे पुस्तक उपयुक्त आहे. त्यांनी लिहिले आहे की, लालबहादूर शास्त्री यांनी इंदिरा गांधी यांना आपल्या मंत्रिमंडळात समाविष्ट केले खरे, पण नंतर अनेक वेळा त्यांची उपेक्षा केली. पंतप्रधान झाल्यानंतर लगेच राष्ट्रकुलातील देशांची बैठक लंडनमध्ये होती. शास्त्री आजारी होते म्हणून त्यांनी कृष्णम्माचारी व इंदिरा गांधी यांना पाठवले. तिथे त्यांना सरदार स्वर्णसिंग यांना परराष्ट्रमंत्री नेमल्याचे वृत्तपत्रांवरून समजले. ही बातमी प्रसिद्ध झाली तेव्हा इंदर मल्होत्रा



ताष्कंद करारसमयी सरदार स्वर्णसिंग, शास्त्रीजी व यशवंतराव

लंडनमध्ये होते व ते इंदिरा गांधींना भेटले तेव्हा स्वर्णसिंगांबद्दलची बातमी वाचली काय, असा प्रश्न विचारून इंदिरा गांधी रागानेच म्हणाल्या की, आपल्याला हे पद नको होते, पण आपण व कृष्णम्माचारी यांच्याशी विचारविनिमय करायला हरकत नव्हती. नंतर तामिळनाडमध्ये हिंदीच्या प्रश्नावरून मोठे आंदोलन सुरू झाले तेव्हा इंदिरा गांधी स्वत:हून मद्रासला गेल्या. आंदोलन पेटले असताना शास्त्री वा कामराज यांपैकी कोणीच मद्रासला गेले नाहीत. तथापि शास्त्री यांना इंदिरा गांधींची ही मद्रासभेट पसंत पडली नाही. त्या आपल्या डोक्यावर नाचत असल्याचे ते आपल्या वर्तुळातल्या लोकांशी बोलताना म्हणाले. मल्होत्रा यांनी हा विषय काढला तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या की, त्या केवळ आकाशवाणी खात्याच्या मंत्री नसून नेत्या आहेत. हे सरकार फार काळ टिकेल असे तुम्हांला वाटते काय? असा इंदिरा गांधींचा प्रश्न होता. पुन्हा असे काही घडले तर आपण असेच वागू, असेही त्या म्हणाल्या. लालबहादूर शास्त्री यांना इंदिरा गांधींबद्दल आत्मीयता नव्हती तशीच, इंदिरा गांधींना शास्त्री यांच्याबद्दल नव्हती.यासंबंधी यशवंतरावांना आलेला अनुभव त्यांनी मला सांगितला होता. तो होता शास्त्री यांच्या वाढदिवसाच्या वेळचा. वाढदिवसाच्या निमित्ताने लालबहादूर यांच्या निवासस्थानी मंत्री, खासदार व इतर

अनेक लोक यांनी हारतुरे व मिठाई वगैरे आणून बरीच गर्दी केली होती. यशवंतराव गेले तेव्हा इंदिरा गांधी एका बाजूला एकट्याच उभ्या असलेल्या दिसल्या म्हणून ते त्यांच्यापाशी गेले. तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या हे सर्व अधिकारपदामुळे चालू आहे. पण ते किती काळ चालणार?

पाकिस्तानने घुसखोर व नंतर सैन्य काश्मीरमध्ये धाडले तेव्हा इंदिरा गांधी काश्मीरमध्ये गेल्या व आपल्या सैनिकांना भेटल्या. त्यांचे मोठे स्वागत झाले. मग परतल्यावर त्यांनी एक टिपण लिहून शास्त्रींना दिले. यासंबंधात त्यांनी मल्होत्रांना सांगितले की, शास्त्री यांनी ते हातात घेतले आणि याचे काय करायचे असे त्यांचे सचिव धर्मवीर यांना विचारले. धर्मवीर म्हणाले, आपल्याकडे ते द्यावे. पुढे शिखांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी शास्त्री यांनी मंत्र्यांची एक समिती नेमली व इंदिरा गांधींना तिचे अध्यक्ष केले. समितीचा अहवाल लिहिण्यापूर्वी पंतप्रधानांना त्याची कल्पना देऊन काही सूचना असल्यास विचारावे म्हणून इंदिरा गांधींनी मागितलेली भेट मिळाली नाही आणि मिळाली तेव्हा कृष्णम्माचारी यांना शास्त्री यांनी त्याच वेळी बोलावल्यामुळे इंदिरा गांधी घरी परतल्या. (*इंदिरा गांधी, ए पर्सनल ॲन्ड पोलिटिकल बायोग्राफी*, पृष्ठे ८२-३.)

इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर असताना लेले यांनी मुलाखत घेतली असता त्या म्हणाल्या, की ६५ सालचे युद्ध हे शास्त्रींचे युद्ध मानले गेले असेल, पण त्या युद्धाचे काही वाईट परिणामही झाले. या त्यांच्या विधानाबाबत लेले यांनी यशवंतरावांचे मत विचारले तेव्हा ते म्हणाले की, युद्ध शास्त्री यांनी सुरू केले नाही. ते आपल्यावर लादले गेले होते आणि प्रत्येक युद्धाचे बरे व वाईट परिणाम देशावर होतात. तसे ते



ताष्कंद येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चर्चेच्या वेळी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री व परराष्ट्र मंत्री स्वर्णसिंग यांच्यासह उपस्थित पाकिस्तानचे अध्यक्ष अयूब खान व सोव्हिएत राष्ट्राचे पंतप्रधान कोसिजिन



नामदार स० का० पाटील यांच्यासमवेत

६५च्या युद्धाचेही झाले.

यशवंतरावांनी ६३ सालीच इंदिरा गांधींना तुम्ही पंतप्रधान व्हायला हवे व त्या दृष्टीने आतापासून आपली मते तुम्ही बोलून दाखवली पाहिजे असे सांगितले होते आणि आपल्याला पंतप्रधान व्हायचे नाही, असे उत्तर इंदिरा गांधींनी दिले होते. यामुळे शास्त्री यांच्या निधनानंतर त्यांनी इंदिरा गांधींना अगोदरच पाठिंबा असल्याचे सांगायला नको होते, या म्हणण्यात काही तथ्य नव्हते. त्याचबरोबर पंतप्रधानपद आपल्याला नको असे त्या म्हणत, हे तितपत खरे नव्हते. मल्होत्रा लिहितात की, शास्त्री यांच्या निधनानंतर इंदिरा गांधी यांची निवड झाल्यावरही त्यांनी अभिनंदन करणाऱ्या मित्राशी बोलताना, फ्रॉस्ट याची कविता म्हणून दाखवली. तिचा आशय असा होता की, एका राजपुत्रास सिंहासन नको होते आणि जेव्हा त्याच्या पित्याने ते देऊ केले तेव्हा त्याने आपला हात मागे घेतला. असे असले तरी बरोबर तीनच दिवसांनी इंदिरा गांधी यांनी आपला इंग्लंडमध्ये असलेला पुत्र राजीव यास याच, फ्रॉस्ट याच्या त्याच कवितेतील पुढील ओळी लिहून कळवल्या होत्या :

To be king is within the situation
And within me–(*इंदिरा गांधी, पर्सनल अँड पोलिटिकल बायोग्राफी*, पृष्ठे ८७-८८)

इंदिरा गांधींनी पंतप्रधानपद घेतले तेव्हा देशाची स्थिती खालावली होती. अर्थशास्त्रज्ञ पी० एन० धर यांचे *इव्होल्यूशन ऑफ इकॉनॉमिक पॉलिसी इन इंडिया,* हे पुस्तक तेव्हाच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना देणारे आहे. लालबहादूर शास्त्री यांनी राष्ट्रीय नियोजन मंडळ या नावाचे एक सल्लागार मंडळ

स्थापन केले होते. धर हे त्यावर एक सभासद होते. नंतर इंदिरा गांधींचे सचिव पी० एन० हक्सर निवृत्त झाल्यावर त्यांना हक्सर यांच्या जागी नेमण्यात आले. त्यांची मते महालनवीस इत्यादींशी जुळणारी नसतानाही इंदिरा गांधींनी त्यांची नेमणूक केली होती. धर यांनी या पुस्तकात, ६० सालनंतरच्या आर्थिक परिस्थितीबद्दल लिहिले आहे की, स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात आपल्या नेत्यांनी स्थापन केलेल्या संस्था इत्यादींमुळे जगभर देशाला प्रतिष्ठा मिळत होती. कम्युनिस्ट चीनला पर्यायी अशी व्यवस्था भारतात स्थापन होत असल्याचे मानले जात होते. पण महालनवीस यांनी स्वीकारलेल्या नियोजनविषयक धोरणामुळे, भांडवली मालाच्या उत्पादनास प्राधान्य मिळून या क्षेत्रात बरेच भांडवल गुंतून पडू लागले. कच्चा माल निर्यात करणे आपल्याला शक्य होते व पक्का व भांडवली माल आयात होत होता. यामुळे परकी चलनाचा तुटवडा वाढत गेला. त्यातच ६५ व ६६मध्ये लागोपाठ दुष्काळ पडले. मग अन्नधान्याची गंभीर प्रमाणात तूट पडली. लागोपाठच्या दोन युद्धांमुळे अर्थव्यवस्थेवरचा ताण अधिकच वाढला. जागतिक बँकेने बर्नार्ड बेल यांच्या नेतृत्वाखाली एक मंडळ भारतात ६१ साली पाठवले होते. त्याने आर्थिक धोरणात बदल करण्याची शिफारस केली होती. शेतीस प्राधान्य, रुपयाचे अवमूल्यन, आयातीवरील नियंत्रण कमी करणे; अशा काही सूचना होत्या. शास्त्री यांनी काही सुधारणा स्वीकारून बदल करण्यास आरंभ केला होता. स्वत: धर यांनी भारताने परकी भांडवलाच्या गुंतवणुकीस अधिक वाव देण्याची शिफारस केली होती.

या स्थितीत शास्त्री यांचे निधन होऊन इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यावर, त्यांनी शेतीवर अधिक खर्च करण्याचा निर्णय घेतला.पण धान्याचा तुटवडा, भाववाढ इत्यादींमुळे देशात ठिकठिकाणी दंगली होऊ लागल्या. विद्यार्थी, मध्यमवर्गीय कर्मचारीही रस्त्यावर येऊ लागले. उत्पन्नाची साधने वाढवून व रोजगार वाढवून अधिक प्रमाणात सरकारला उत्पन्न मिळते हे लक्षात न घेता, करात वाढ करण्याचे धोरण चालू ठेवण्यात आले. आतापर्यंत आर्थिक विकासासंबंधीची गृहीतकृत्ये फोल ठरली असताही तीच चालू राहिली. याचे अपरिहार्य परिणाम टाळणे शक्य नव्हते. पुढील काळातील उलथापालथींचे मूळ या आर्थिक परिस्थितीत होते.

निवडणूक जवळ येत होती आणि आर्थिक अडचणींची झळ लागलेल्या लोकांकडून अनेक ठिकाणी निदर्शने व दंगली होत असताना काँग्रेस पक्षात एकी राहिली नव्हती. मोरारजी देसाई यांचा पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधींनी पराभव केला असला तरी संसदीय काँग्रेस पक्षापैकी एक तृतीयांश मते मोरारजींना पडली होती. त्यांच्या पाठीराख्यांना सांभाळून घेण्याचे प्रयत्न इंदिरा गांधींनी करायला हवे होते, पण तसे ते झाले नाहीत. शिवाय आपल्याला कामराजप्रभृती ज्येष्ठ नेत्यांवर अवलंबून राहावे लागते, हे इंदिरा गांधींना डाचत होते. मग त्यांनी स्वत:चा एक गट बनवला. हाच 'किचन कॅबिनेट' म्हणून उपहासाने ओळखला जात असे. या गटातील लोक नवखे होते आणि त्यांच्यापाशी उत्साह असला तरी शहाणपण व पाचपोच यांचा अभाव होता. आपण पंतप्रधानांच्या आतल्या गोटातील आहोत या घमेंडीत ते अनेक जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांचा अवमान करत. इंदिरा गांधींच्या विरुद्ध नाराजी पसरण्यास हेही एक कारण झाले होते. या स्थितीत जयपूर इथे अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक भरली असता, डावे व उजवे या दोन्ही गटांतून टीकेचा भडिमार सुरू झाला. प्रतिनिधींना ताष्कंद करारातील काही कलमे पसंत नव्हती. तथापि यापेक्षा धान्यपरिस्थितीमुळे सभागृहात वातावरण अधिक तापले होते. त्या काळात धान्यवाटपासाठी काही विभाग केले होते. अधिक पिकाची काही राज्ये व तुटीची राज्ये यांचे गट



संरक्षण मंत्रालयात पहिल्या दिवशी–नोव्हेंबर १९६२

केलेले होते. पण यामुळे शिलकी राज्यांतील सुखवस्तू शेतकरी नाराज होते. त्यांची बाजू घेऊन काँग्रेसचे प्रतिनिधी सरकारला धारेवर धरत होते. त्यांना चोख उत्तर देणे इंदिरा गांधींना जमले नाही. धान्यविषयक धोरणाचा फेरविचार होईल इतके सांगून त्यांनी सभागृह सोडल्यामुळे त्यांचे नेतृत्व सिद्ध झाले नाही. संसदेतही त्यांचा प्रभाव पडत नव्हता. यामुळे डॉ० लोहिया यांनी त्यांना 'गुंगी गुडिया' असे नाव दिले.

इंदिरा गांधींनी अशोक मेहता यांना नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष नेमले होते. सी० सुब्रमण्यम शेतीमंत्री म्हणून चांगले काम करत असले तरी धान्योत्पादन वाढण्यास अवधी लागणे अनिवार्य होते. त्यात दुष्काळामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली. मग पंचवार्षिक योजनेत कपात करून एकेक वर्षासाठी योजना करणे भाग झाले. शास्त्री यांनी हे केले तेव्हा काँग्रेसमधील डावा गट टीका करत होता. या आर्थिक अडचणीमुळे अमेरिकेला भेट देण्याचे इंदिरा गांधींनी ठरवले. त्याप्रमाणे त्यांनी भेट दिली व अध्यक्ष जॉन्सन आणि त्यांचे सहकारी यांच्याशी बोलणी केली. या भेटीचा एक परिणाम असा झाला की, पीएल. ४८० या कायद्याखाली मिळणारी धान्याची मदत वाढली. पण शेतीवर अधिक खर्च आणि रुपयाचे अवमूल्यन या सूचना मान्य करण्याचा आग्रह मोडणे अशक्य झाले. इंदिरा गांधींनी हा जो निर्णय घेतला तो वास्तव परिस्थितीची योग्य जाणीव ठेवणारा होता. पण त्याबाबत प्रमुख सहकारी व काँग्रेस नेते यांना विश्वासात घेण्यात आले नाही. कामराजसुद्धा संतप्त झाले आणि आपण इंदिरा गांधींना पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत पाठिंबा देण्यात चूक केली, असे ते म्हणू लागले.

हे होत असता नोव्हेंबरमध्ये त्रिशूलधारी साधूंनी अत्यंत हिंसक व उग्र निदर्शने दिल्लीत करून संसदभवनास वेढा घातला. गोवधबंदीच्या मागणीसाठी ही निदर्शने होती. गृहमंत्री नंदा यांना परिस्थिती

हाताळता आली नाही. याचे एक कारण त्यांनाच गोवधबंदीची मागणी बरोबर वाटत होती. शिवाय साधू इत्यादींबद्दल त्यांना आत्मीयता होती. गोंधळास तोंड देण्यात त्यांना अपयश आल्याबद्दल संसदेत व बाहेर टीका होऊ लागली व पंतप्रधानांनी आपल्याला पाठिंबा दिला नाही या कारणास्तव नंदा यांनी राजीनामा दिला. दिल्लीत हे घडत असता यशवंतराव मुंबईच्या गोदीत नौदलाच्या एका कार्यक्रमासाठी आले होते. तो चालू असताना त्यांच्या पोटात दुखू लागले म्हणून हॉस्पिटलमध्ये हलवले तर अॅपेन्डिसायटिसचे दुखणे असल्याचे निदान डॉक्टरांनी केले आणि लगेच शस्त्रक्रिया करणेही भाग झाले. ते थोडे जोखमीचे होते. शस्त्रक्रियेनंतर अशक्तपणा बराच आला म्हणून यशवंतराव मुंबईतच विश्रांती घेत होते. त्याच वेळी निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी तयार करायची होती म्हणून यशवंतरावांच्या घरीच बैठक चालू असताना, दिल्लीहून सुब्रमण्यम यांचा फोन आला. प्रकृतीची चौकशी करून त्यांनी दिल्लीला कधी येऊ शकता, असे विचारले. ती सहज केलेली चौकशी नव्हती. दुसऱ्या दिवशी सुब्रमण्यम यांनी इंदिरा गांधींचा निरोप सांगून नंदा यांचा राजीनामा स्वीकारला असून, गृहखात्याचे मंत्रिपद घेण्यासाठी दिल्लीला बोलावले. इंदिरा गांधींना सचिन चौधरी व व्यापारमंत्री मनुभाई शहा यांचाही राजीनामा हवा होता.पण कामराज वगैरेंनी ते होऊ दिले नाही.

यशवंतराव गृहमंत्रिपद घेण्यासाठी दिल्लीत आले तेव्हा वातावरण अतिशय तंग होते. उत्तरप्रदेश, बिहार आणि इतर काही राज्यांत विद्यार्थी उग्र निदर्शने करत होते. सार्वजनिक मालमत्तेची नासाडी सर्वत्र होत होती. विद्यार्थ्यांच्या या निदर्शनांना डॉ० लोहिया यांचा संयुक्त समाजवादी पक्ष पाठिंबा देत होता. तसेच चंदिगड हे पंजाब व हरयाणा या दोन राज्यांची संयुक्त राजधानी न ठेवता, केवळ पंजाबलाच ती मिळाली पाहिजे अशी मागणी होती आणि ती मान्य होत नसल्यामुळे संत फतेसिंग यांनी आत्मदहन करण्याचे जाहीर केले होते; तर पुरीच्या शंकराचार्यांनी साधूंच्या गोवधबंदीच्या मागणीला पाठिंबा दिला होता. साधूसमाज ही संघटना नंदा यांनीच स्थापन केली होती. सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार घालवण्याचे काम साधूंच्याकरवी होईल, असा त्यांचा विश्वास होता. अनेक साधू विविध प्रकारचा भ्रष्टाचार करतात व गांजेकस असतात हे नंदा यांच्या गावी नसावे. या समाजाला काही प्रतिगामी शक्ती आणि सावकार, जमीनदार यांनी हाताशी धरले आणि त्यातच जनसंघही पाठीराखा बनला. गोवधबंदीची मागणी नवी क्रांती घडवून आणील अशी त्याची समजूत होती. नंदा गृहमंत्री असतानाच विविध राज्यांत विद्यार्थ्यांच्या आंदोलनांनी हिंसक वळण घेतले होते. त्यासंबंधात पंतप्रधानांनी एक टिपण तयार करून काँग्रेस कार्यकारिणीपुढे ठेवले असता ते अमान्य झाले. मोरारजी देसाई यांनी आंदोलन निपटून काढून गुन्हेगारांना शिक्षा केली पाहिजे अशी सूचना केली तर गृहमंत्रिपदाची अपेक्षा करणाऱ्या स० का० पाटील यांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुंड ठरवले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात याच दोघांनी, याच प्रकारची ताठर भूमिका घेतला होती आणि पुन्हा एकदा यशवंतरावांवर अग्निशामक म्हणून कामगिरी बजावण्याची वेळ आली.

विद्यार्थ्यांची आंदोलने केवळ भारतातच सुरू झाली नव्हती. जर्मनीपासून अमेरिकेपर्यंत अनेक देशांत ६६ सालपासून जवळपास ७० सालपर्यंत ती चाललेली दिसतील. तेव्हा एकीकडे हिंसाचाराला पायबंद घालत असताना, या आंदोलनांच्या कारणांचाही विचार करण्याची आवश्यकता यशवंतरावांना वाटली. दिल्लीत शेजारच्या राज्यांतून विद्यार्थ्यांचे जथे आणण्याचा कार्यक्रम लोहिया व त्यांचा पक्ष पार पाडू पाहत असल्यामुळे, यशवंतरावांनी लोहिया प्रभृतींना अटक केली आणि दिल्लीत कडक बंदोबस्त ठेवला.



आंतरराष्ट्रीय जवाहरलाल नेहरू हॉकी स्पर्धेच्या वेळी शिवाजी स्टेडियम, नवी दिल्ली येथे भाषण करताना



क्रांतिवीर भगतसिंग यांच्या आईला भेटताना

संसदेवर या आंदोलकांचा हल्ला होता कामा नये व त्यांचा वेढा पडता कामा नये अशी दक्षता त्यांनी घेतली. पण त्याचबरोबर हा प्रश्न केवळ कायदा व सुव्यवस्थेचा आहे असे मानून चालणार नाही, असा अभिप्राय गृहखात्याशी संबंधित सल्लागार समितीच्या बैठकीत बोलताना दिला. ज्या उत्तरप्रदेश, बिहार इत्यादी राज्यांत आंदोलन सुरू झाले होते, त्या राज्यांच्या सरकारांनी मात्र तो कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न समजून दडपशाहीचे उपाय योजिले आणि म्हणून असंतोष अधिकच वाढला. लाठीहल्ला व गोळीबार हेच उपाय पोलिसांना शिकवले होते. यामुळे रक्तपात होतो आणि लोकांचे बळीही घेतले जातात. हे टाळावे म्हणून विद्यार्थी वा इतर आंदोलक व त्यांचे पुढारी यांच्यात संपर्क टिकवण्याची व्यवस्था करणे निकडीचे असते, ही यशवंतरावांची भूमिका होती. नंतर त्यांनी अशा प्रकारच्या मोठ्या आंदोलनांना पायबंद घालण्यासाठी इतर देश कोणते उपाय योजतात याचा अभ्यास केला. तेव्हा जपानचे सरकार जी पद्धती अवलंबिते ती अधिक परिणामकारक असल्याचे त्यांचे मत झाले. या पद्धतीप्रमाणे मोठ्या प्रमाणात नि:शस्त्र पोलिस आंदोलकांच्या पुढे जातात आणि हिंसा न करण्याचे आवाहन करतात. यात काही पोलिसांना मार पडतो, पण रक्तपात टळून आंदोलन अधिक व्यापक होत नाही व उग्रही होत नाही. तथापि पोलिस यंत्रणेत या दृष्टीने बदल करायचा तर तो मुख्यत: राज्यपातळीवर व्हायला हवा. तसा तो झाला नाही आणि आजतागायत पूर्ववत उपाययोजनाच चालू आहे.

विद्यार्थी आंदोलनानंतर लगेचच पुरीच्या शंकराचार्यांनी, साधूसमाजाच्या गोवधबंदीच्या मागणीला पाठिंबा देण्याकरिता दिल्लीत उपोषण सुरू केले. हे शंकराचार्य एक काळ स्वामी करपात्रजी महाराज यांचे चिटणीस होते. या महाराजांनी रामराज्य परिषद स्थापन करून ५२ साली निवडणूक लढवली होती. हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी ही पुनरुज्जीवनवादी संघटना स्थापन झाली होती. शंकराचार्य होण्यापूर्वी चंद्रशेखर द्विवेदी या नावाने ते ओळखले जात आणि रामराज्य परिषदेतर्फे त्यांनी पूर्वीही गोवधबंदीसाठी सत्याग्रह केला होता. दिल्लीत उपोषण करण्यापूर्वी त्यांनी आर्यसमाज आणि सनातन धर्मसभा यांच्या पुढाऱ्यांशी चर्चा केली होती व गोवधबंदीच्या आंदोलनासाठी स्वयंसेवक पुरवण्याची मागणी केली होती. शंकराचार्यांच्या उपोषणामुळे दिल्लीत बराच गोंधळ उडेल हे लक्षात घेऊन, यशवंतरावांनी आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि शंकराचार्यांना दिल्लीतून हलवण्याचे ठरवले. हा निर्णय अमलात आणण्यापूर्वी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची संमती घेतली गेली. मग पुरीच्या शंकराचार्यांना खास विमानातून प्रथम पाँडेचरीस नेले आणि काही दिवसांनी पुरीला पोचवण्यात आले. तिथे उपोषण चालू करण्याचे त्यांनी जाहीर केले असले तरी दिल्लीतील उपोषणाचे परिणाम विशेष गंभीर होणार होते, ते टळले.

शंकराचार्यांना अटक होईल अशी अटकळ जनसंघाच्या नेत्यांना नव्हती. जनसंघाशी संबंध नसलेले काही खासदारही या अटकेमुळे अस्वस्थ झाले. माधवराव अणे यांनी हिंदू धर्माच्या प्रमुखास ही वागणूक दिल्याबद्दल टीका केली; तर एन० जी० रंगा यांनी सारा देश पेटेल असा इशारा दिला. लोकसभेत भाषण करताना यशवंतरावांनी जनसंघाने या आंदोलनास नैतिक, आर्थिक आणि मनुष्यबळाची मदत केली असे सांगितले तेव्हा अटल बिहारी बाजपेयी यांनी जनसंघाचा हिंसेला पाठिंबा नसल्याचा खुलासा केला. त्यावर यशवंतरावांनी हिंसेला पाठिंबा नसल्याचे सांगून भागणार नाही. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्यांनी हिंसा होणार नाही, हेही पाहिले पाहिजे असे उत्तर दिले. पुरीत शंकराचार्यांचे उपोषण चालू होते व देशातल्या काही ठिकाणी यास पाठिंबा मिळत होता. मग मंत्रिमंडळाने विचारविनिमय करून संपूर्ण गोवधबंदी करणे व्यवहार्य नसल्याचा निर्णय घेतला आणि यशवंतरावांनी गोवधबंदीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक



वाई येथील विश्वकोश कार्यालयास गृहमंत्री म्हणून भेट. सोबत अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

आयोग नेमल्याचे जाहीर केले.

कुन्ही कृष्णन यांना दिलेल्या मुलाखतीत यशवंतरावांनी सांगितले की, 'देशातले काही बडे उद्योगपती, व व्यापारी गोवधबंदीला निष्ठापूर्वक पाठिंबा देणारे होते व त्यांनी या आंदोलनास आर्थिक साहाय्य पुरवले. आयोगाची स्थापना झाल्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख गोळवलकर गुरुजी यांनी, आयोगाचे सभासद असतानाही काम करण्याचे नाकारले. इतर काहींचे हेच धोरण असल्यामुळे आयोगाचे काम बंदच पडले. ६७ सालच्या निवडणुकीत जनसंघाला या आंदोलनाचा काही फायदा झाला'. (*चव्हाण अँड द ट्रबल्ड डिकेड*, पृ० १७९) पण पुढील काळात त्याने गोवधबंदीचा पाठपुरावा केला नाही. तेव्हा हा खटाटोप निवडणुकीसाठी होता, असे म्हणण्यास जागा होती. हा गोवधबंदीचा प्रश्न यशवंतराव प्रथमच हाताळत नव्हते. १९५३ साली तेव्हाच्या मुंबई राज्यात हा प्रश्न पुढे आला होता आणि काही विरोधी पक्षांनी गोवधबंदीचे विधेयक विधानसभेत मांडले होते. सरकारतर्फे उत्तर देण्याची जबाबदारी भाऊसाहेब हिरे यांची होती, पण ते आजारी असल्यामुळे पुरवठामंत्री यशवंतराव यांच्यावर ती आली. यशवंतरावांनी आपल्या भाषणात, सरसंघचालक गोळवलकर गुरुजींच्या दिल्लीच्या जाहीर सभेतील वक्तव्याचा हवाला दिला. त्यांनी आपण या प्रश्नाचा विचार आर्थिक दृष्टीतून करत नसून भावनात्मक दृष्टीने करत असल्याचा निर्वाळा दिला होता. यशवंतरावांनी या प्रश्नाचा सरकार आर्थिक दृष्टिकोणातूनच विचार करत असल्याचे स्पष्ट केले.

यशवंतरावांनी आपल्या भाषणात, सरकारने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालाचा उल्लेख केला.

त्या अहवालात म्हटले होते की, देशात १ कोटी ४० लक्ष जनावरे अशी आहेत की, ज्यांचा उत्पादनाच्या दृष्टीने किंवा शेतीच्या दृष्टीने काही उपयोग नाही. त्यांच्यासाठी कडबा व इतर वस्तूंसाठी शंभर कोटी रुपये खर्च होतात. तेव्हा जे लोक गाई व इतर जनावरे पाळतात त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार महत्त्वाचा असल्याचे सांगत असताना, यशवंतरावांनी घटनेतील संबंधित कलमही आर्थिक बाजूचा विचार करूनच स्वीकारले गेले होते, हे स्पष्ट केले. जनसंघाने हे विधेयक ५३ साली मुंबई विधानसभेत आणले होते. जनसंघ हा स्वातंत्र्यवीर सावरकरांना मानणारा असला तरी गाईच्या संबंधात त्याने सावरकरांचे विचार झुगारले होते. सावरकरांनी गाय ही माता नसून एक उपयुक्त प्राणी असल्याचे मत व्यक्त करणारा लेख लिहिला होता. जनसंघाने ५३ साली गोवधबंदीची मागणी करणारे विधेयक आणले असले तरी महाराष्ट्रात त्यावरून आंदोलन झाले नाही. नंतर पंधरा वर्षांनी मात्र उत्तरप्रदेशात ते झाले. दोन राज्यांतल्या सामाजिक परिस्थितीचा हा परिणाम म्हटला पाहिजे.

डिसेंबरच्या १७ तारखेला संत फतेसिंग यांनी चंदिगड पंजाबचीच राजधानी करावी आणि हरयाणात जे पंजाबी भाषी भाग असतील ते पंजाबमध्ये सामील करावेत या मागणीसाठी उपोषण सुरू केले आणि २७ तारखेपर्यंत या मागण्या अमान्य झाल्यास आत्मदहन करण्याचेही त्यांनी जाहीर केले. आणखी सात शिखांनीही तोच मार्ग पत्करला. मग फतेसिंग यांना काही आश्वासन देऊन उपोषण सोडण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी, जयप्रकाश नारायण इत्यादींचे प्रयत्न सुरू झाले. पण उपोषणाच्या धमकीमुळे यशवंतरावांनी वाटाघाटीस नकार दिला. तेव्हा लोकसभेचे सभापती सरदार हुकुमसिंग हे अमृतसरला गेले व त्यांनी फतेसिंग यांच्याबरोबर बोलणी सुरू केली. उपोषण थांबल्याशिवाय चौकशी आयोग नेमला जाणार नाही, असे यशवंतरावांनी हुकुमसिंग यांना स्पष्टपणे सांगितले होते. हुकुमसिंग यांच्या मध्यस्थीला यश येऊन, संत फतेसिंग व इतर सात जणांचे उपोषण थांबले.

या पाठोपाठ दिल्लीतील पोलिसांच्या आंदोलनाचा प्रश्न उपस्थित झाला. किंबहुना, यशवंतराव गृहमंत्री होण्यापूर्वीच पोलिसांत असंतोष वाढत होता आणि त्यांच्यात काही शिस्त राहिली नव्हती. असंख्य पोलिस त्यांची कामे करत नव्हते आणि दिलेले आदेश पाळत नव्हते. पोलिसांच्या या असंतोषाचा फायदा लोहिया व त्यांचा संयुक्त समाजवादी पक्ष घेत होता. या असंतोषाची परिणती पोलिसांचा मोर्चा यशवंतरावांच्या निवासस्थानाशी येण्यात झाली आणि ते घोषणा करत राहिले. मग यशवंतरावांनी त्यांच्यापुढे भाषण करून कामावर हजर राहण्यास सांगून, कोणालाही शिक्षा न करण्याचे आश्वासन दिले. पोलिस निघून गेले, पण पुढाऱ्यांनी त्यांना आंदोलन चालवण्यासाठी चिथावणी दिली. यामुळे धोक्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचे दिसल्यावर, यशवंतरावांनी लष्कर बोलावले आणि आठशे पोलिस आंदोलकांना अटक झाली. मग शांतता प्रस्थापित झाली. त्यानंतर पोलिसांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येऊन काही मागण्या मंजूर झाल्या. या रीतीने यशवंतरावांनी गृहमंत्रिपदाची सूत्रे घेतल्यानंतर महिनाभरातच एवढी संकटे उभी राहिली होती, पण त्यांनी ती यशस्वीपणे हाताळली.

या वातावरणात ६७ सालची सार्वत्रिक निवडणूक आली. इंदिरा गांधी यांच्या विरुद्ध कामराज व इतर काही नेते एक झाले होते. काँग्रेसच्या मध्यवर्ती संघटनेतील दुही लोकांना दिसून आली होती. राज्य पातळीवरील अनेक मंत्रिमंडळे अंतर्गत भांडणे व भ्रष्टाचार यांमुळे लोकांच्या मनातून उतरलेली होती. त्यातच धान्याची तूट, महागाई इत्यादींचा परिणाम सत्ताधारी या नात्याने काँग्रेसला भोगावा लागणे अपरिहार्य होते. डॉ० लोहिया यांनी बिगर-काँग्रेसवादाचा आपला सिद्धान्त या वेळी मांडला. ते सांगत होते



१९६६मध्ये पंतप्रधान गांधी यांच्या मंत्रिमंडळासह राष्ट्रपती डॉ० सर्वपल्ली राधाकृष्णन् इतर मान्यवर–मोरारजीभाई
मागे : बाबू जगजीवनराम फकरुद्दिन अलि अहमद, छगला, अशोक मेहता, करणसिंग, स्वर्णसिंग

त्याप्रमाणे काँग्रेसविरोधकांची युती झाली नाही, पण विरोधक अधिक संघटित होऊन निवडणुकीत उतरले होते. काँग्रेसचे काही नेते स्वत: किंवा आपल्या हस्तकांच्या करवी केंद्रात काँग्रेसच्या हाती सत्ता राहील पण इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर येणार नाहीत, असा प्रचार करत होते. मुंबईत याचा प्रत्यय येत होता. स० का० पाटील यांच्या गटातले काही, पाटील पंतप्रधान किंवा गृहमंत्री होणार आणि इंदिरा गांधी व यशवंतराव यांना निवृत्त व्हावे लागणार, अशी हवा तयार करत होते. मुंबईच्या काही वृत्तपत्रांत याचे अप्रत्यक्षपणे दर्शन होत होते. अशा वेळी यशवंतराव मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश यांच्या काही मतदारसंघांत प्रचारसभा घेऊन मुंबईत आले असता मी त्यांची भेट घेतली होती. मुलाखतीला प्रसिद्धी द्यायची नाही, अशी त्यांची अट होती. त्यांनी सांगितले की, उत्तर भारतात काँग्रेसची परिस्थिती कठीण झाली असून काही राज्यांत काँग्रेसची मंत्रिमंडळे येतील की नाही, याची शंका आहे. केंद्रात काँग्रेसला सरकार स्थापन करता येईल, पण लोकसभेतील जागा बऱ्याच कमी होतील.याचा परिणाम इंदिरा गांधी व तुम्ही यांची सत्तास्थाने जाण्यात होईल काय? असे विचारले असता यशवंतराव म्हणाले की, मुंबईतून पसरलेल्या बातम्यांवर विसंबणे बरोबर नाही. निवडणुकीनंतर पराभव झाल्यामुळे काँग्रेसच्या जुन्या नेत्यांच्या विरुद्ध वातावरण तापेल, आणि काँग्रेस पक्षात या नेत्यांवर टीकास्त्र सुटून त्यांचे आसन डळमळीत होईल. यशवंतरावांचे हे निदान अचूक ठरले.

लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला ४०.७८ टक्के मतदान होऊन, ५२१ पैकी २७३ जागा मिळाल्या. हे बहुमत १३ मतांचे होते.महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र या राज्यात काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्या. महाराष्ट्रात ५६ सालपासून व त्यातही १९६० सालपासून संघटना मजबूत करण्याच्या

यशवंतरावांच्या प्रयत्नांना यश आले. यामुळे ६७ साली महाराष्ट्रात काँग्रेस चांगल्या रीतीने यशस्वी झाली. सादिक अलि यांनी ए० आय० सी० सी० 'इकॉनॉमिक रिव्ह्यू' या काँग्रेसच्या प्रकाशनाच्या अंकात, (ऑक्टोबर १९६७) महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेसंबंधी प्रत्यक्ष पाहणी करून लेख लिहिला व त्यात राज्यात काँग्रेसचे शक्तिस्थान कोणते याचे विवेचन केले. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्रात काँग्रेस ही बळकट व चैतन्यशील संघटना आहे. कारण तिने पाठवलेले आमदार व खासदार तरुण आहेत. पक्षात आलेल्या या नव्या रक्तामुळे तो समर्थ झाला आहे. यशवंतरावांना एकूण ३ लाख १७ हजार २३१ मतांपैकी २ लाख, ७ हजार, ८९५ मते मिळाली. 'न्यूयॉर्क टाइम्स', 'लंडन टाइम्स' अशा पत्रांच्या दिल्लीतील प्रतिनिधींनी केंद्रात डळमळीत पायावरचे सरकार येणार, अशी भाकिते केली. विधानसभांच्या निवडणुकीत मात्र काँग्रेसला अनेक राज्यांत पराभव पत्करावा लागला तर काही राज्यांतील बहुमत अगदीच तुटपुंजे असल्यामुळे मंत्रिमंडळ बनवणे व बनल्यास टिकवणे अवघड होणार असल्याचे दिसून आले. एकूण सतरा राज्यांतील निवडणुकांत आठमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. त्यांतील सात राज्यांत मंत्रिमंडळ बनवणे तिला शक्य नव्हते. ज्या राज्यांत काँग्रेसला बहुमत होते तिथेही पक्षांतराच्या रोगामुळे मंत्रिमंडळ अधांतरी राहण्याचा धोका निर्माण होत होता. केंद्रात काँग्रेसचे सरकार व अनेक राज्यांत विरोधी मंत्रिमंडळे ही परिस्थिती पहिल्यांदाच निर्माण झाली होती. यामुळे गृहमंत्री या नात्याने यशवंतरावांना कठीण परिस्थितीला तोंड देण्याची वेळ येणार होती. राजस्थानपासून बंगालपर्यंत काँग्रेस कोठेच मंत्रिमंडळ बनवू शकत नव्हती. कामराज, अतुल्य घोष, स० का० पाटील हे सर्व पराभूत झाले. राज्यात बरेच मंत्री व मुख्यमंत्री निवडून आले नाहीत. काँग्रेसची इतकी वाताहत प्रथमच झाली होती.

वास्तविक या व्यक्तिगत पराभवानंतर या मंडळींनी काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद राहणे योग्य नव्हते. लोकांनी केवळ त्यांनी उभे केलेलेच पाडले नाहीत, तर त्यांचाच पराभव करून त्यांच्या नेतृत्वाविरुद्ध मत दिले होते. निवडणूक निकालांनंतर काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. एरव्ही एका दिवसात व त्यांतही काही तासांत संपणारी बैठक, लागोपाठ आठवडाभर चालली आणि इतका दारुण पराभव का झाला, याविषयी खल झाला. आपण अनेक आश्वासने देत आलो पण ती अमलात आली की नाहीत, हे पाहण्याची काळजी घेतली नाही; भ्रष्टाचार वाढला आणि संघटना शिथिल होऊन लोकांशी संपर्क राहिला नाही, इत्यादी निष्कर्ष निघाले. पण यावर उपाय कोणते याचा निर्णय झाला नाही. संघटनेला नवे वळण द्यायचे आणि नवे रक्त आणायचे तर जुने व पराभूत झालेले नेतृत्व तसेच ठेवून चालेल काय, हा प्रश्न टाळण्यात आला. मतदार इंदिरा गांधींच्या विरुद्ध गेलेला नव्हता. त्या अधिकारावर येऊन थोडाच काळ लोटल्याची जाणीव मतदारांना होती. त्यांनी देशातल्या बिघडलेल्या परिस्थितीला काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना जबाबदार धरले होते. हे लक्षात न घेता, काँग्रेसच्या कारभारात बदल न केल्याचे परिणाम थोड्याच दिवसांत दिसून आले.

इंदिरा गांधी पंतप्रधानपदासाठी एकमेव उमेदवार नव्हत्या. कारण मोरारजी देसाई यांनी ती लढवण्याचा निर्धार केला होता. पण बिघडलेल्या वातावरणात निवडणूक नको हा विचार बळावला आणि मोरारजीभाईंना उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री अशी दोन पदे देण्यात आली. मोरारजी देसाई व इंदिरा गांधी या दोघांनाही हा तोडगा मनापासून आवडलेला नव्हता. मग इंदिरा गांधींनी जुन्या नेत्यांशी संबंधित अशा कोणालाच मंत्रिमंडळात घेतले नाही. संजीव रेड्डी यांना लोकसभेचे सभापतिपद देण्यात आले. जे मुख्यमंत्री निवडून आले होते त्यांच्या काही उमेदवारांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले होते. त्याचबरोबर

इंदिरा गांधी यांच्याभोवती मंत्रिमंडळातले व संघटनेतील काहीजण जमा होऊन, एक आतला गट स्थापन झाला. याच वेळी परमेश्वर नारायण हक्सर यांची नेमणूक पंतप्रधानांचे सल्लागार म्हणून झाली.नंतर राजकारणाला जे वळण लागले त्यात हक्सर यांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरली. देशात हे जे राजकीय वादळ निर्माण झाले होते त्यातून कोणतेही निश्चित असे फलित हाती लागले नाही. जनमताचा कौल डाव्या प्रवृत्तीच्या बाजूचा आहे की, उजव्या हे ठरवणे शक्य नसले तरी समग्र चित्र पाहिल्यास डाव्या पक्षांपेक्षा उजव्यांना अधिक यश मिळालेले दिसले. कधी नव्हे इतके माजी संस्थानिक व जमीनदार वा सरंजामदार वर्गाच्या प्रतिनिधींची संख्या लोकसभेत व विधानसभांमधून वाढली. ओरिसात तर स्वतंत्र पक्षाचे राज्य स्थापन झाले. प्रारंभी केरळ, ओरिसा, बिहार, पंजाब व पश्चिम बंगाल यांत संयुक्त आघाड्या होऊन त्यांची मंत्रिमंडळे आली.नंतर उत्तरप्रदेश, हरयाणा व मध्यप्रदेश या राज्यांतील काँग्रेसची मंत्रिमंडळे अंतर्गत दुफळीमुळे बरखास्त होऊन आघाडीचे सरकार आले. यामुळे सतरा राज्यांपैकी नऊ राज्यांत बिगर काँग्रेसपक्षांची वा आघाड्यांची मंत्रिमंडळे आली.

राज्य पातळीवरील पक्षांतराची ही लाट लोकसभेपर्यंत पोचली नाही, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होती. सुभाष काश्यप यांनी १९६७ सालच्या निवडणुकीचा अहवाल घेणारे *दि पॉलिटिक्स ऑफ डिफेक्शन* हे अभ्यासपूर्ण पुस्तक लिहून तेव्हाच्या घडामोडी आकडेवारीसह वर्णन केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, पक्षांतराचा रोग बराच बळावला होता. यामुळे ६७ सालच्या निवडणुकीनंतरच्या एका वर्षात सर्व राज्यांत मिळून ४३८ पक्षांतराचे प्रकार घडले तर त्यापूर्वीच्या दहा वर्षात मिळून ५४२ वेळा पक्षांतर झाले. सर्व विधानसभांचे एकूण आमदार साडेतीन हजार होते आणि त्यांतील पाचशे जणांनी पक्ष बदलले. काही जणांनी एकापेक्षा अधिक वेळा पक्षांतर केलेले आढळेल. या वेळच्या पक्षांतराचा फायदा काँग्रेसला न मिळता विरोधी पक्षांना मिळाला. यापूर्वी दुसऱ्या पक्षांतून काँग्रेसमध्ये येत. त्यात बदल झाला. अपक्ष सभासदांची वाढीव संख्या हा पक्षांतरात वाढ होण्यास कारणीभूत ठरलेला घटक होता. काश्यप यांनी दोन अपवाद नमूद केले आहेत. एक आचार्य कृपलानी यांचा. त्यांनी प्रजासमाजवादी पक्षाचा त्याग करून अपक्ष म्हणून लोकसभेत बसायला सुरुवात केली आणि ते अपक्षच राहिले. दुसरे कृष्ण मेनन. काँग्रेसने त्यांना उमेदवारी न दिल्यामुळे अपक्ष म्हणून ते निवडून आले आणि नंतरही कोणत्याही पक्षात न जाता ते अपक्ष राहिले. पक्षांतराचे प्रकार आपल्याकडेच घडतात असे नाही. इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया अशा देशांत ते अनेकदा घडले आहेत. विन्स्टन चर्चिल हे पक्षांतराचे गाजलेले उदाहरण होते. ऑस्ट्रेलियात पक्षांतराची उदाहरणे वारंवार घडली व घडतात आणि सरकार अस्थिर बनते. अमेरिकेत वेगळ्या प्रकारचे पक्षांतर होत असते. प्रतिनिधीसभा व सेनेट या दोन्हीमध्ये रिपब्लिकन व डेमॉक्रॅटिक पक्षांतील सभासद पक्षाच्या शिस्तीला बांधलेले नसतात. त्यांना मतदानाचा हक्क बजावण्याची मोकळीक असते. यामुळे दोन्ही पक्षांचे सभासद विरोधी पक्षाच्या बाजूने मतदान करताना अनेकदा दिसतात.

पक्षांतराच्या कामात हरयाणा राज्याने कळस गाठला. हिरानंद आर्य या हरयाणाच्या आमदाराने चार वेळा पक्ष बदलला आणि मंत्रिपद मिळवले पण ते पाच दिवसांपुरतेच टिकले. राव बीरेन्द्र सिंग व देवीलाल या दोन पुढाऱ्यांत स्पर्धा होती व ते एकमेकाचे आमदार फोडण्यात गुंतलेले असत. वीरेन्द्र सिंग यांच्यावर पैसे देऊन आमदार विकत घेतल्याची टीका जाहीरपणे होत होती व लोकसभेतही तिला वाचा फुटली. हरयाणाच्या राज्यपालाने राष्ट्रपतींना पाठवलेल्या अहवालात म्हटले होते की, वीरेन्द्र सिंग यांच्यावर काँग्रेस हा विरोधी पक्ष भ्रष्टाचार व लाचबाजी करून आमदार फोडण्याचा आरोप करतो, पण

काँग्रेस पक्षही हेच करत असतो. विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाला उसंतच मिळू देत नाही. तसेच सत्ताधारी पक्ष अधिकारपदावर राहण्यासाठी मंत्र्यांची संख्या सतत वाढवत राहतो. या स्थितीत विधानसभा बरखास्त करून निवडणूक घेणे हाच उपाय असल्याचे मत राज्यपालाने दिले होते. हरयाणाच्या राज्यपालाने आपल्या अहवालात वारंवार होणाऱ्या पक्षांतराचा उल्लेख करताना, 'आया राम, गया राम' असा शब्द वापरला होता. गृहमंत्री यशवंतराव यांनी लोकसभेत बोलताना 'आया राम, गया राम' असा उल्लेख तर केलाच, शिवाय पक्ष बदलण्यासाठी वीस हजारांपासून चाळीस हजार रुपयांपर्यंत लाच दिली जात असल्याचे आपल्या कानांवर आल्याचीही कबुली दिली. ते म्हणाले, सर्व राजकीय पक्ष अयशस्वी ठरले आहेत. यावर उपाय काय? अखेरीस लोकमताचा कौल हाच उपाय आपल्याला दिसतो. विधानसभा बरखास्तीची राष्ट्रपतींची घोषणा ही दीर्घ काळ सत्ता हाती ठेवण्यासाठी नाही. काही महिन्यांनंतर निवडणूक घेतली जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

पक्षांतरामुळे निर्माण झालेला राजकीय घोळ ६८ सालच्या मध्यापर्यंत चालला. मग ऑगस्टमध्ये लोकसभेत याच विषयासंबंधी एक बिनसरकारी ठराव येऊन संसदीय समिती नेमण्याची सूचना केली गेली. या ठरावावर लोकसभेत नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये चर्चा होऊन एक समिती नेमण्यात आली. मूळ ठरावात पक्षांतराला पायबंद घालण्यासाठी कायदेशीर उपाय योजण्याची तरतूद होती. मधू लिमये यांनी ठरावाचा हा भाग दुरुस्त करण्याची सूचना केली. लोकशाहीत पक्ष बदलण्याचा अधिकार घटनाच देत असल्यामुळे कायदेशीर उपाय करून चालणार नाही, असे त्यांचे म्हणणे होते. तशी दुरुस्ती होऊन एक समिती नेमली गेली. यशवंतराव तिचे अध्यक्ष होते आणि कायदा व संसदीय कारभार यांचे मंत्री सभासद होते. समितीत मधू लिमये, एन० जी० रंगा, भूपेश गुप्ता, करणसिंग इत्यादी सभासद होते. पण लोकसभेच्या बाहेरचे काही घटना व कायदेतज्ज्ञ व नेते नेमण्यात आले होते. यांत जयप्रकाश नारायण, दफ्तरी, सेटलवाड, कुंझरू, मोहनकुमार मंगलम् अशांचा समावेश होता. समितीच्या सहा बैठका झाल्या. अखेरीस एक अहवाल तयार झाला. त्यात पक्षांतरावर सरसकट बंदी घालण्याचे टाळावे म्हणजे योग्य कारणासाठी होणाऱ्या पक्षांतरास वाव राहील असे म्हटले होते. राजकीय पक्षांनीच आचारसंहिता तयार करून ती पाळावी आणि गैरवाजवी पक्षांतराविरुद्ध लोकमत तयार करावे अशा शिफारशी होत्या. या सूचना या प्रकारे काहीशा तात्त्विक स्वरूपाच्या असणे अपरिहार्य होते. अर्थात त्या कधीच अमलात आल्या नाहीत आणि पक्षांतरापासून कोणताच पक्ष अलिप्त राहिला नाही.

उत्तरप्रदेश, हरयाणा, बिहार व मध्यप्रदेश या राज्यांत पक्षांतर होऊन काँग्रेसेतर पक्षांची आघाडी झाली असली तरी या चार राज्यांत काँग्रेसमधून बाहेर पडलेल्यांच्या हाती राज्याची सूत्रे राहिली. काही राज्यांत दोन-तीन वेळा राष्ट्रपती राजवट आणणे अनिवार्य झाले. सर्वच नियुक्त राज्यपाल हे घटनेचा अभ्यास केलेले असणे शक्य नव्हते. यामुळे राज्यपालांच्या निर्णयांत तफावत पडत होती. तेव्हा राज्यपालांनी ॲटर्नी-जनरलशी विचारविनिमय करून निर्णय घ्यावा असा तोडगा यशवंतरावांनी सुचवला होता. बहुसंख्य राज्यांत काँग्रेसविरोधी पक्ष वा आघाड्या अधिकारावर आल्यानंतर, केंद्र व राज्ये यांच्यांतील संबंधाचा प्रश्न उपस्थित झाला. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दोन्हीत सहकार्याची आवश्यकता प्रतिपादन केली. यशवंतरावांनी याच तऱ्हेची भूमिका मांडली. पण त्यांनी सांगितले की, बहुतेक राज्यांबरोबर केंद्राचे सहकार्य होत आहे पण बंगाल व केरळ या राज्यांतील डाव्या आघाडीच्या कायदा व सुव्यवस्था यासंबंधीच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे मतभेद होतात. या दोन्ही राज्यांत मार्क्सवादी कम्युनिस्ट व कम्युनिस्ट


रेडिओवर बातम्या ऐकताना

पक्ष यांची आघाडी सरकार चालवत होती. केरळचे मुख्यमंत्री नंबुद्रिपाद यांनी केंद्र सरकार व आपले सरकार यांचे तात्त्विक मतभेद असल्याचे मान्य केले होते. केरळची धान्याची मागणी पुरी होत नाही म्हणून त्यांच्या सरकारनेच एक दिवसाचा बंद पुकारला होता.

बंगालमध्ये सरकारात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्राबल्य होते आणि कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे बांगला काँग्रेस, हा काँग्रेसशी मतभेद होऊन स्थापन झालेला पक्ष आघाडीत होता. किंबहुना, बांगला काँग्रेसचे अजय मुखर्जी मुख्यमंत्री तर ज्योती बसू उपमुख्यमंत्री होते व त्यांच्याकडे गृहखाते होते. बंगालमध्ये तेव्हा घेरावची लाट पसरली होती. कारखानदार व इतर व्यावसायिकांना कामगार घेराव घालत आणि काम बंद पाडत. हे प्रकार सतत होत. बंगाल सरकारनेच अशा घेरावाला कायदेशीर मान्यता दिली होती. यशवंतरावांनी यास गृहमंत्री या नात्याने आक्षेप घेतला आणि अजय मुखर्जी हतबल झाले असल्याचे मत दिले. या घेरावमुळे आणि संपांच्या सत्रामुळे बंगालमधून कारखाने हळूहळू दुसऱ्या राज्यांत हलले. अंदमानच्या भेटीनंतर परतताना यशवंतरावांनी कलकत्त्यात मुक्काम केला. तिथे मुख्यमंत्री अजय मुखर्जी हे किती अडचणीत आले होते हे त्यांना प्रत्यक्ष पाहायला मिळाले. याच वेळेला बंगालमध्ये नक्षलवादी आंदोलन वाढत होते. त्या राज्याच्या नक्षलबारी या भागात शेतकऱ्यांचा उठाव करण्यात आला आणि त्याचे नेतृत्व अति जहाल गटाने घेतले होते आणि हिंसाचार हे त्याचे मुख्य साधन होते. शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांवर उपाय करण्याची मागणी समजून घेता येते, पण हिंसाचार करून राज्ययंत्र बंद पाडण्याच्या प्रयत्नांना पायबंद घालण्याचे केंद्राचे धोरण राहील, हे यशवंतरावांनी स्पष्ट केले. हा नक्षलवादी गट चीनवादी असून हिंसक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी अधिकृतपणेच केंद्र सरकारला कळवले



मा० यशवंतराव एका कार्यक्रमात बोलताना. मा० शरद पवार, आबासाहेब गरवारे व इतर मान्यवर

होते. पण गृहखाते ज्योती बसू यांच्या हाती असूनही त्यांनी हा हिंसाचार आर्थिक व सामाजिक न्यायासाठी उपेक्षणीय मानला होता. यामुळे लोकांचेच हाल होत होते. मुख्य प्रश्न धान्याच्या वाहतुकीचा होता. तीत अडथळा येत असल्यामुळे कलकत्त्यात तांदळाचे भाव वाढले. केंद्र सरकारने पोलिस मदत देऊ केली असता, तीबाबत मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्यात मतभेद झाले. या स्थितीत राज्यपाल धर्मवीर यांनी विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस करणारे पत्र राष्ट्रपतींना धाडले. त्याप्रमाणे विधानसभा बरखास्त होऊन नंतर मध्यावधी निवडणूक झाली तेव्हा पुन्हा डाव्या आघाडीला बहुमत मिळाले.

तथापि मुख्यमंत्री अजय मुखर्जी आणि गृहमंत्री ज्योती बसू यांच्यात जाहीर वाद होऊ लागले. बसू यांनी मुख्यमंत्र्यांवर केंद्राशी संगनमत करत असल्याचा आरोप केला तर पोलिस खाते हे राजकारणग्रस्त केल्याची टीका मुखर्जी बसू यांच्यावर करत होते. हे सगळे असह्य होऊन अजय मुखर्जी यांनी उपोषण आरंभले. वास्तविक अगोदरचा अनुभव लक्षात घेऊन त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाबरोबर पुन्हा आघाडी कशासाठी केली, हे त्यांचे त्यांना माहीत. या वादामुळे बंगाल सरकार काही कामच करू शकत नव्हते. त्यातच विधानसभेत राज्यपालांचे भाषण बंद पाडण्यात आले तर विधानसभेच्या अध्यक्षांनी ती बेमुदत बंद केली. हे सर्व घटनाबाह्य होते. केंद्र सरकारची हतबलता यशवंतरावांनी संसदेत दिलेल्या उत्तरात व्यक्त झाली. या संबंधात यशवंतरावांना इंदिरा गांधींची भूमिका काय आहे हे समजत नव्हते. कारण त्यांचे मंत्रिमंडळातील बोलणे एकप्रकारचे व प्रत्यक्ष आचरण दुसऱ्या प्रकारचे असे होत होते. यासंबंधी यशवंतरावांनी जयंत लेले यांना मुलाखतीत दिलेली माहिती लक्षात घेतली पाहिजे. ते सांगतात



हुसेनवाला येथे सरदार भगतसिंग यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करताना.
सोबत डॉ० सुभाग सिंग, केंद्रीय दळणवळण मंत्री (दिनांक १९ ऑक्टोबर १९६८)

की, बंगालच्या राज्यपालपदी नेमणूक करण्याची वेळ आली तेव्हा इंदिरा गांधी व यशवंतराव यांच्यात चर्चा झाली. ती काही दिवस चालून अखेरीस धर्मवीर यांचे नाव निश्चित झाले. नंतर बंगालमधील घडामोडींची चर्चा मंत्रिमंडळात होत असे तेव्हा मोरारजीभाईंनी, हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असून मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या संबंधात मवाळपणे वागून चालणार नसल्याचे ठाम मत दिले होते. पंतप्रधानांनाही बंगालमधील वातावरण बदलले पाहिजे असे वाटत होते, पण त्यांचा काही निर्णय होऊ शकत नव्हता. पुढे राज्यपालांनी केलेली शिफारस स्वीकारण्याचे ठरले, ते इंदिरा गांधींच्या संमतीने.

असे असले तरी इंदिरा गांधींना मार्क्सवादी कम्युनिस्टांशी राजकीय संबंध ठेवायचे होते. यामुळे त्यांनी गृहमंत्र्यांच्या बरोबर न राहता, स्वतंत्रपणे बंगालच्या कम्युनिस्टांशी संपर्क ठेवण्यास सुरुवात केली. कलकत्त्याहून कम्युनिस्ट नेत्यांचे शिष्टमंडळ दिल्लीत येई आणि यशवंतरावांना न भेटता, पंतप्रधानांशी चर्चा करून जाई. बंगालच्या काँग्रेसमधून बाहेर पडलेले काँग्रेसचे नेते मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या दांडगाईला विटले असले तरी काँग्रेसशी सहकार्य करण्याची त्यांची तयारी नव्हती. असा पेचप्रसंग निर्माण झाला असताना, तुम्ही लोक एक दिवस कम्युनिस्ट पक्षाचे बंदिवान होणार असा धोका दिसत असल्याचा अभिप्राय, यशवंतरावांनी बांगला काँग्रेसच्या पुढाऱ्यांना दिला आणि तो खरा झाला.

मुख्यमंत्री अजय मुखर्जी यांनी आघाडीकडे सत्ता जाणार हे पाहून यशवंतरावांना कळवले की, काही कागदपत्रे अशी आहेत की, ती संयुक्त आघाडीच्या हाती जाता कामा नयेत. त्यांत सरकारला माहिती देणाऱ्या काही व्यक्तींची नावे असून ती आघाडीच्या लोकांना कळू नयेत. म्हणून त्या फायली दिल्लीला गृहखात्याकडे दिल्या. अजय मुखर्जी आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री ज्योती बसू



झैलसिंग यांच्यासमवेत पुष्पार्चन–सोबत खाजगी सचिव श्री० श्रीपाद डोंगरे

यांच्या वादाला तेव्हापासून सुरुवात झाली. मार्क्सवादी कम्युनिस्टांनी त्या वेळी इंदिरा गांधींशी प्रत्यक्ष संपर्क ठेवला नव्हता, पण तो अप्रत्यक्ष म्हणजे कोणा इतर व्यक्तीमार्फत होता. त्या असे सांगत की, त्या स्वत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी सहकार्य करण्यास तयार आहेत, पण गृहमंत्री वेगळी भूमिका घेतात, त्यामुळे अडचण होते. म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळात यशवंतराव हे विरोधी आहेत, असा ग्रह तयार करण्यात आला. त्यातच विधानसभेचे अधिवेशन केव्हा घ्यायचे हा एक वादाचा विषय होता. राज्यपालाने त्याबाबत निर्माण झालेल्या पेचप्रसंगात विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस केली. ॲटर्नी-जनरलने तसे करणे कायदेशीर ठरवले. मग बराच खल झाल्यावर पंतप्रधानांनी बरखास्तीचा निर्णय घेतला. आमचा तो निर्णय घातक ठरला, अशी कबुली यशवंतरावांनी दिली.

विविध राज्यांत अंतर्गत प्रश्न होते. तसेच काही राज्यांच्या सीमेबद्दल तक्रारी होत्या. यापैकी महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमा-भागाबद्दलचा वाद हाताळण्यासाठी महाजन आयोगाची नेमणूक, यशवंतराव

गृहमंत्री होण्यापूर्वीच झाली होती. पंजाबमध्ये अकालींचा प्रश्न होता. या अशा अंतर्गत प्रश्नांची चर्चा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका उपसमितीत करण्याची तरतूद करण्यात आली. आसाममधील अनेकविध टोळ्यांचे प्रश्न होते. त्यातच मिझो इत्यादींनी बंडच पुकारले होते. या बंडापुढे न नमण्याचा सरकारचा इरादा यशवंतरावांनी स्पष्ट केला. आसामच्या विविध डोंगरी जमातींना स्वायत्त राज्य हवे होते तर आसामच्या मैदानी भागात राहणाऱ्यांना ही मागणी मान्य नव्हती. हा पेच सोडण्यासाठी बऱ्याच वाटाघाटी होऊ लागल्या. नंतर मैदानी प्रदेशातील लोकांनी तडजोडीस तयारी दाखवली. मग मेघालयाचा जन्म झाला.

गृहमंत्री या नात्याने यशवंतरावांनी अनेकविध कठीण प्रश्न यशस्वीपणे हाताळले. कुन्ही कृष्णन यांनी १९६७च्या संसदीय हंगामातील कामगिरीबद्दल काही इंग्रजी वृत्तपत्रांनी दिलेले अभिप्राय उद्धृत केले आहेत. यशवंतरावांच्या यशाचे रहस्य सांगताना 'स्टेट्समन'ने लिहिले, यशवंतरावांना वक्तृत्वाची देणगी आहे. त्यांच्या भाषणात भाषेचा फुलोरा नसतो, पण कितीही अवघड प्रश्न असला तरी तो ते खंबीरपणे व सहजतेने हाताळतात. 'हिंदु'ने लिहिले होते की, संसदेतील सर्व पक्षांच्या सभासदांवर प्रभाव टाकण्यात चव्हाण त्यांच्या कौशल्याने यशस्वी झाले आहेत. खरे तर, (काँग्रेस) पक्षास आणखी काही चव्हाणांची आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने त्यांच्या यशामुळे असूया मात्र निर्माण झाली आहे. गृहखात्याचा कारभार चांगल्या रीतीने करत असतानाच दहा कलमी कार्यक्रमातील मूळ गाभ्याशी ते एकरूप झाले आहेत. या बाबतीत पंतप्रधान व उपपंतप्रधान मात्र या संबंधीचे प्रश्न टाळताना दिसतात. 'इंडियन एक्सप्रेस'ने यशवंतराव हे पट्टीचे संसदपटू ठरवले होते. त्या पत्राने लिहिले की, १९६७ सालचे संसदीय अधिवेशन हे चव्हाणांचे म्हणून ओळखले जाईल. ते संरक्षणमंत्री होते तेव्हा त्यांचा आवाज फारसा ऐकू येत नव्हता. त्यांना आत्मविश्वास आला नसल्याचे वाटत असे. पण आता सरकार पक्षाचे ते एक पहिल्या दर्जाचे वक्ते बनले आहेत. (*चव्हाण अ‍ॅन्ड दि ट्रबल्ड डिकेड*, पृ० २२८.)

नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, त्या वेळी लोकसभा व राज्यसभा यांत काँग्रेस व विरोधी पक्षाचे नावाजलेले खासदार होते. विरोधी खासदारांत डॉ० लोहिया, डांगे, भूपेश गुप्ता, ज्योतिर्मय बसू, एस० एम० जोशी, हिरेन मुखर्जी, गोपालन, सेटलवाड, नाथ पै, मधू लिमये, अटल बिहारी बाजपेयी, पिलू मोदी, एन० दांडेकर, रंगा असे एकापेक्षा एक वाक्पटू होते. हे व इतर अनेक, प्रश्न व उपप्रश्नांची सरबत्ती करत. त्यांच्या व यशवंतरावांच्या ज्या शाब्दिक चकमकी होत त्यांचा वृत्तान्त आजही वाचणे उद्बोधक वाटते. राम प्रधान यांनी यशवंतरावांच्या संसदेतील भाषणांचे चार संग्रह संपादित केले आहेत, ते या दृष्टीने पाहणे युक्त होईल. ६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला होता, त्यावर अनेकदा विरोधक भर देत असत; तेव्हा काँग्रेसचा पराभव झाला खरा, पण तिच्या जागी तुम्ही आणले काय? तर संयुक्त मंत्रिमंडळे आणि त्यासाठी कोणताही पक्ष कोणाही बरोबर युती करत असतो, हे किती दिवस चालणार आहे? असा यशवंतरावांचा उलटा सवाल असे. राज्यांतील संयुक्त आघाडीच्या मंत्रिमंडळात व आमदारांत पक्षांतराची साथ होती व त्यामुळे राज्यपालाची जबाबदारी वाढली होती. राज्यपालाचे अधिकार कोणते हा एक वादाचा विषय होत असे. यासंबंधात तेव्हाच्या विरोधी सदस्यांनी घेतलेल्या भूमिका आज पाहिल्या, तर पक्षीय विचारामुळे त्या कशा बदलत याची कल्पना येते. खंबीरता आणि समजूतदारपणा हे यशवंतरावांच्या यशाचे मर्म होते. त्यांनी हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजले, पण दिल्लीत निदर्शकांवर विनाकारण लाठीहल्ला झाल्याबद्दल त्यांनी माफीही मागितली.

देशातील हिंसक कृत्ये दिवसेंदिवस वाढत चालली होती. गृहखात्याने १९६७पासून १९७०

सालपर्यंतचे अहवाल प्रसिद्ध केले असून या सर्व हिंसाचाराची, जातीय, भाषिक वा प्रादेशिक दंगलीची आकडेवारी दिली आणि त्यांचे विश्लेषण केले. यात विद्यार्थ्यांच्या दंगलींचाही समावेश केलेला होता. जातीय दंगली अनेक ठिकाणी जनसंघ, रा० स्व० संघ इत्यादींच्या प्रचारामुळे झाल्याचे दाखवून दिले होते. यशवंतरावांनी त्यांच्या अनेक भाषणांत असा उल्लेख केला होता. काही ठिकाणी भाषेवरून दंगली झाल्या. या सर्व दंगलींचा आढावा घेताना केवळ कायदा व सुव्यवस्थेची दृष्टी चालणार नाही, तर सामाजिक व आर्थिक दृष्टीही हवी, यावर यशवंतरावांनी भर दिला होता. महाराष्ट्रात शिवसेनेचा जन्म झाला होता. तिने मराठी विरुद्ध बिगर मराठी हा वाद उपस्थित केला आणि यातच सीमावादही आणला. यशवंतरावांनी म्हटले होते की, शिवसेनेने घेतलेली भूमिका ही महाराष्ट्र राज्य स्थापन करण्यासाठी ज्या पक्षांनी काम केले, त्या कोणालाच मान्य होणारी नाही. सेनेने फासिस्ट प्रवृत्ती जोपासली असल्याचे मत यशवंतरावांनी मुंबईतच भाषणात सांगितले व लोकसभेतही तेच विचार मांडले. तरीही संसदेत त्यांच्यावर काहींनी सेनेला आतून सहानुभूती दाखवल्याची टीका केली, तेव्हा आपण सेनेसंबंधात महाराष्ट्रात जे बोलतो त्यास इथे दिल्लीत प्रसिद्धी मिळत नाही, पण आपल्यावर टीका होते तिला मात्र ती मिळते, अशी त्यांनी तक्रार केली. आंध्रमधील तेलंगण भागात स्वायत्ततेची मागणी जोर करत होती. काही मंत्र्यांनी त्यासाठी राजीनामेही दिले. आसामच्या धर्तीवर स्वायत्तता देण्याचा विचार यशवंतरावांपुढे होता. पण यामुळे अनेक राज्यांत उपराज्ये निर्माण करण्याची मागणी होऊन पुन्हा एकदा राज्यपुनर्रचनेचा प्रश्न निर्माण होईल, तेव्हा अशा अविकसित भागांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे योग्य; असे यशवंतरावांच्या मनाने घेतले.

नक्षलवादी हिंसाचार वाढत असल्याची यशवंतरावांनी संसदेत अनेकदा दखल घेतली. केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी कमाल जमीनधारणेसंबंधात कायदे केले होते. पण ते सर्वच राज्यांत व सर्वच भागांत योग्य रीतीने अमलात येत होते असे नव्हे. नक्षलबारी हा असा भाग होता. यातून जमिनीसाठी आंदोलन सुरू झाले आणि सैद्धान्तिक विचारांच्या प्रभावामुळे ते हिंसक बनत गेले. बंगालच्या सरकारने नक्षलबारीतही जमीनवाटपाचे कायदे अमलात आणण्याचे खास उपाय केले. पण, नक्षलवाद हा पंथ झाला होता आणि चीनमध्ये माओने केलेल्या क्रांतीच्या धर्तीवर तो क्रांती करायला निघाला होता. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने हा पंथ डोईजड झाल्यामुळे त्याच्याशी संबंध तोडले, पण त्यास उशीर झाला होता. या नक्षलवादी आंदोलनाचा अभ्यास यशवंतरावांनी गृहखात्यातर्फे करून घेतला होता. त्यांच्या खात्याशी संबंधित अशा संसदीय समितीला याची माहिती देताना, हा प्रश्न व्यापक दृष्टिकोन स्वीकारून हाताळावा लागेल हे त्यांनी स्पष्ट केले. पण त्याचबरोबर लोकांचे प्रश्न हाताळण्यास प्रतिबंध होणार नाही, पण जर कोणी बंडाचा, सशस्त्र उठावाचा मार्ग अवलंबणार असेल तर त्यास पायबंद घातला जाईल असा इशारा दिला. तथापि केंद्र सरकार कोणत्याही राज्यात कितपत हस्तक्षेप करू शकते यास घटनेने काही मर्यादा घातल्या आहेत. नक्षलवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी मुख्यत: बंगालच्या सरकारने पावले टाकणे आवश्यक होते. पण त्याने ती टाकली नाहीत. बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व नक्षलवादी यांच्यातील वाद वाढत गेला आणि २३ एप्रिल १९६९ रोजी नक्षलवाद्यांनी वेगळा पक्ष स्थापन केला आणि माओच्या शिकवणुकीप्रमाणे क्रांती करण्याचे त्याने जाहीर केले.



मा० चंद्रशेखर यांच्यासमवेत

गृहमंत्री म्हणून यशवंतरावांच्या कामगिरीची प्रशंसा विरोधी पक्ष व अनेक वृत्तपत्रे करत होती, पण मंत्रिमंडळातील अधिकारासंबंधात समाधानी राहावे अशी परिस्थिती नव्हती. कारण एक दिवस इंदिरा गांधींनी गृहखात्यातील परराष्ट्र गुप्तहेर भाग, यशवंतराव गृहमंत्री असताना काढून घेऊन पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली आणला. यासंबंधात तेव्हा व नंतर काहींनी चर्चा केली आहे. यशवंतरावांनी जयंत लेले यांना सांगितलेली हकिगत अशी की, ते गृहमंत्री झाल्यानंतर त्यांनी, संरक्षणमंत्री असताना नेहरूंना गुप्तहेर यंत्रणांतर्फे जमणारी माहिती एका ठिकाणी म्हणजे पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली असावी असे जे सुचवले होते, त्या अनुरोधाने इंदिरा गांधींशी नव्या व्यवस्थेबद्दल बोलणे केले. त्यावर त्यांनी त्या टिपणाचे स्मरण दिले. यशवंतराव पूर्वीपेक्षा वेगळी भूमिका घेऊ शकत नव्हते. नंतर इंदिरा गांधींनी हालचाल सुरू केली आणि गृहखात्याचा गुप्तहेर विभाग आपल्या नियंत्रणाखाली आणला. संरक्षणमंत्री असताना यशवंतरावांचे जे मत झाले होते, त्यात गृहमंत्री झाल्यावर कामाच्या अनुभवामुळे बदल झाला. म्हणून लेले यांच्याशी बोलताना ते म्हणाले की, गृहखाते हे जर राजकीय खाते आहे तर त्यास गुप्तहेर विभागाकडून येणाऱ्या माहितीचा आधार हवा. म्हणजे कोणत्या माहितीचे विश्लेषण व्हायला पाहिजे, कोणत्या माहितीची अधिक छाननी व्हायला हवी हे गृहमंत्री ठरवू शकेल. कोणी जर विश्लेषण करून टिपण दिले तर कोणत्या अंगासंबंधी अधिक संशोधन करण्याची गरज आहे, हे गृहमंत्री अधिक चांगल्या प्रकारे ठरवू शकेल. यशवंतरावांनी या संबंधीचे आपले मत इंदिरा गांधींना सांगितले, पण पंतप्रधानांनी तो विभाग स्वत:कडे घेतला. नंतर अर्थखात्याचाही असा विभाग इंदिरा गांधींनी आपल्या नियंत्रणाखाली आणला. या सगळ्याचा अर्थ काय, हे सर्वांच्याच लक्षात आले.

नेहरूंना दिलेल्या त्या टिपणाची हकिगत यशवंतरावांकडून मला समजली होती. संरक्षणमंत्री असताना

यशवंतरावांकडे त्यांच्या खात्यातर्फे येणारी गुप्त माहिती आणि परराष्ट्र गुप्तहेर खाते, अर्थखाते इत्यादींची माहिती यात तफावत असल्याचे काही वेळा दिसून येत होते. तेव्हा यशवंतरावांनी एक टिपण तयार करून सर्व प्रकारची गुप्त माहिती एका ठिकाणी केंद्रित करणे सोयीचे होईल अशी सूचना केली होती. नेहरूंनी ते टिपण वाचले आणि मग यशवंतरावांशी बोलताना ते म्हणाले की, तुम्ही केलेली सूचना तत्त्वत: बरोबर आहे. इंग्लंडमध्ये तशी व्यवस्था असल्यामुळे सर्व गुप्तहेर विभागांकडून येणारी माहिती पंतप्रधानांच्या कार्यालयात केंद्रित केली जाते. पण आपल्याकडे हे करणे योग्य नाही. कारण हा देश मोठा आहे, त्याने लोकशाहीचा प्रयोग नुकताच सुरू केला असून, आपण सर्व माणसे छोटी आहोत. तेव्हा कोणा एकाकडे अमर्याद सत्ता असणे योग्य होणार नाही. इंदिरा गांधींनी यशवंतरावांनी दिलेल्या टिपणाचा आधार घेतला, पण नेहरूंनी घेतलेल्या भूमिकेचा विचार केला नाही.

यशवंतरावांचा अवमान होईल असे आणखी एक पाऊल उचलले गेले होते. माधवराव गोडबोले यांनी त्यांच्या आठवणींच्या पुस्तकात ते नमूद केले आहे. इंदिरा गांधींनी संशोधन व विश्लेषण विभाग, रॉ, स्थापन केला होता. परदेशविषयक गुप्त माहितीचे विश्लेषण करण्याचे काम त्याच्याकडे होते. पण ते अनेक वेळा देशांतर्गत गुप्त माहिती मिळवण्याच्या कामात गुंतलेले असे. या वेळी केंद्रीय मंत्र्यांच्या पूर्वेतिहासाची माहिती जमा करण्याचे व त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम चालत होते. एक दिवस आपलीही अशी माहिती जमा केली जात असल्याचे, विश्वसनीय गोटातून यशवंतरावांना समजले तेव्हा ते अतिशय संतप्त झाले. आपल्या सहकाऱ्यांना या रीतीने वागवणे चुकीचे आहे असे त्यांचे मत होते. या प्रकरणाचा इंदिरा गांधींकडे जाऊन छडा लावण्याचे यशवंतरावांनी ठरवले व गोडबोले यांच्याशी ते या संबंधी बोलले असता, इंदिरा गांधींकडे यासाठी न जाण्याचा त्यांचा सल्ला होता. पण यशवंतराव गेले व त्यांनी इंदिरा गांधींना आपल्याबद्दल माहिती जमा करण्याचे काम चालू आहे काय, असा प्रश्न विचारला असता इंदिरा गांधींनी तसे नसल्याचे सांगून राजीव व संजय यांची शपथ घेतली. यशवंतरावांनी मग हे ताणले नाही, पण त्यांचा विश्वास बसला नाही, असे गोडबोले लिहितात. (*अपुरा डाव,* पृ० ९०)

काँग्रेसचा ६७ सालच्या निवडणुकीत मोठा पराभव झाल्यावर कार्यकारिणीत बरीच चर्चा झाली खरी, पण काही निश्चित कार्यक्रम स्वीकारण्यात आला नाही. या निवड़णुकीच्या आधीच काँग्रेसने काही लोकाभिमुख पुरोगामी कार्यक्रम आखावा व त्याची अंमलबजावणी करावी असा आग्रह धरणारा गट तयार झाला होता. यात चंद्रशेखर, मोहन धारिया, कृष्णकांत अशांचा समावेश होता. निवडणुकीत पक्षाचा पराभव झाल्यानंतर या गटाने जोर केला आणि दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय समितीच्या अधिवेशनात एक दहा कलमी कार्यक्रम मंजूर झाला. तोपर्यंत इंदिरा गांधींनी आपण अवलंबिलेल्या आर्थिक उपाययोजनांची तपासणी करून घेतली होती आणि डावा कार्यक्रम स्वीकारणे निकडीचे असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला होता.

अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी तरुण तुर्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटाने केली. पण मोरारजींनी तिला विरोध केला. बँकांवर सामाजिक नियंत्रण घातले असून त्यास पुरेशी संधी न देता राष्ट्रीयीकरण करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले व इंदिरा गांधींनी मोरारजींना दुजोरा दिला. नंतर महासमितीची बैठक लांबत गेली आणि इंदिरा गांधी, मोरारजी व इतर काही नेते निघून गेले असता आणखी एक सूचना पुढे आली. संस्थानिकांच्या खास सवलती रद्द करण्याचे एक कलम, यापूर्वीच दहा कलमी कार्यक्रमात समाविष्ट झाले होते. या रात्रीच्या



काँग्रेस अध्यक्ष श्री० निजलिंगप्पा यांच्यासमवेत यशवंतराव

बैठकीत मोहन धारिया यांनी सवलतीच रद्द करून न थांबता, संस्थानिकांचे तनखे बंद करण्याची दुरुस्ती सुचवली आणि ती मंजूर झाली. या महासमितीच्या अधिवेशनास ३१५ प्रतिनिधी हजर होते. त्यातले तुरळक हा ठराव आला तेव्हा हजर होते. मग दुरुस्तीसह ठराव १७ विरुद्ध ४ अशा मतांनी मंजूर झाला. हे रास्त झाले नाही, अशी तक्रार मोरारजीभाईंनी केली तेव्हा पुढच्या अधिवेशनात पुन्हा चर्चा करण्याचे ठरले. इंदिरा गांधींच्या जवळ असलेल्या काहींनी मात्र यशवंतरावांच्या प्रेरणेने ही दुरुस्ती धारिया यांनी सुचवून, इंदिरा गांधींना अडचणीत टाकले अशी चर्चा सुरू केली. इतकी महत्त्वाची दुरुस्ती अशा तुटपुंजा मतदानाने संमत करून घेणे उचित नव्हते, हे खरे आहे.

या संबंधात यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत काय घडले याची माहिती दिली आहे. त्यावरून असे दिसते की, बँकांच्या राष्ट्रीयीकरणास यशवंतरावांचा पाठिंबा असला तरी मोरारजीभाई बँकांवरील सामाजिक नियंत्रणाच्या प्रयोगास काही अवधी द्या असे सांगत असताना आणि पंतप्रधानही विशेष आग्रही नसताना तुम्ही हा प्रश्न चिघळवू नका, असे यशवंतरावांनी मोहन धारिया यांना सांगितले. धारियांनी ते मानले. या संबंधात यशवंतरावांनी असाही युक्तिवाद केला की, मोरारजीभाई चार एक वर्षांनी मंत्रिपदावर आले असून त्यांना या पदावर राहता येणार नाही, असे काही धारिया इत्यादींनी न केलेले बरे. दुसरा प्रश्न होता संस्थानिकांचे तनखे व खास सवलती यांचा. त्याही बाबतीत बोलणी करण्यास अवसर देण्याची यशवंतरावांची सूचना होती. ती मात्र आपण मान्य करू शकत नाही, असे धारियांनी उत्तर दिले आणि महासमितीचे अगदी थोडे सदस्य हजर असताना तनखे व सवलती रद्द करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला. दुसऱ्या दिवशी सकाळीच इंदिरा गांधींनी यशवंतरावांशी बोलताना



१९व्या वर्षाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त खास टपाल तिकिटाचे अनावरण करताना.
सोबत केंद्रीय परिवहन आणि दळणवळण मंत्री जगजीवन राम व इतर

त्यांनीच फूस दिली असे काही म्हटले नाही, पण ज्या रीतीने ठराव संमत झाला त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. तेव्हा धारिया यांच्याशी आपले काय बोलणे झाले हे यशवंतरावांनी निवेदन केले.

या दुरुस्तीमुळे इंदिरा गांधींचे सरकार काहीसे अडचणीत आले. संसदेत जनसंघ इत्यादी काही पक्षांनी टीका केलीच शिवाय काँग्रेसमध्येही नाराज असलेले लोक होते. यामुळे जबलपूरला भरणाऱ्या अधिवेशनात या विषयावर चर्चा करण्याचे ठरले. तथापि या ठरावाच्या निमित्ताने संस्थानिकांशी चर्चा करणे आवश्यक झाले. यशवंतरावांचा धारियांच्या दुरुस्तीसहच्या ठरावाला पाठिंबा होता. पुढे माजी संस्थानिकांशी बोलणी करण्याची वेळ आल्यावर त्यांनी त्यात कसूर केली नाही. पण तनखे रद्द करण्याचे कलम संस्थानिकांना खटकत होते. सरदार पटेल यांनी त्या वेळच्या सरकारतर्फे दिलेल्या अभिवचनाचा हा भंग असल्याची त्यांची तक्रार होती. काही संस्थानिकांनी इंदिरा गांधींकडे यशवंतरावांच्या विरुद्ध तक्रार केली. एक माजी संस्थानिक मंत्रिमंडळातच होता. त्याचा या संबंधात पुढाकार होता. हा तुम्हांला शह देण्याचा डाव असल्याचे त्याने इंदिरा गांधींना सांगितले. यशवंतरावांनी या प्रस्तावाचे संसदेत समर्थन केले होते. त्यांच्यावर संस्थानिकांचा विश्वास नाही आणि म्हणून त्यांनी बोलणी करू नयेत असा सूर

काँग्रेसमध्ये निघू लागला. तेव्हा पंतप्रधान वा उपपंतप्रधान यांनी ही जबाबदारी घ्यावी असे यशवंतरावांनी सुचवले. मग मोरारजीभाईंनी बोलणी केली, पण एकमत होऊ शकले नाही. तेव्हा घटना दुरुस्तीशिवाय तरणोपाय उरला नाही.

म्हणून गृहमंत्रालयाने दुरुस्ती विधेयक तयार केले, तथापि ते लोकसभेत मांडण्याच्या वेळी पंतप्रधानांनी ते पुढे ढकलण्याची सूचना केली. पण तेव्हा ते परत घेणे अशक्य झाले असल्यामुळे इंदिरा गांधींनी मान्यता दिली. हा संस्थानिकांच्या खास सवलती व तनखे नष्ट करण्याचा ठराव, काँग्रेस महासमितीच्या जबलपूर अधिवेशनात मंजूर झाल्यावर यशवंतरावांनी सरकारी धोरणाचा खुलासा संसदेत केला. त्यावर चर्चा झाली तेव्हा लोकसभेत व राज्यसभेत यशवंतरावांनी जोमदारपणे समर्थन केले. संस्थानिकांना पूर्वी दिलेल्या वचनांचा उल्लेख झाला तेव्हा सामान्य लोकांना पुरेसे उत्पन्न मिळवून देण्याचे आश्वासनही दिले होते व त्यास प्राधान्य दिले पाहिजे असा प्रतिवाद त्यांनी केला. हे विधेयक १९७० सालामध्ये चर्चेला आले तेव्हा यशवंतराव गृहमंत्री न राहता अर्थमंत्री झाले होते. हे जे काही घडले त्यामुळे इंदिरा गांधी अस्वस्थ झाल्या आणि त्यांच्या मनात यशवंतरावांच्या संबंधात संशयाचे बीज रुजले.

इंदिरा गांधींच्या संबंधात काँग्रेसच्या कामराज प्रभृती नेत्यांत आता विरोधाची भावना बळावत चालली होती. कामराज व मोरारजी देसाई स्वतंत्रपणेच इंदिरा गांधी पंतप्रधानपदी असता कामा नयेत या निर्णयास पोचले होते. माजी संस्थानिकांचे तनखे व त्यांचे खास अधिकार रद्द करण्याच्या ठरावामुळे स० का० पाटील नाराज झाले होते आणि अतुल्य घोष, निवडणुकीत अपयशी होऊन बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्टांचा जोर वाढण्याची भर पडल्यामुळे कमालीचे अस्वस्थ होते. नंतर कामराज यांच्या जागी निजलिंगप्पा काँग्रेसच्या अध्यक्षपदी आले. त्यांना हे पद नको होते. कर्नाटकचे मुख्यमंत्रिपद सोडण्यास ते तयार नव्हते. आपल्याला हे पद नको असून तुम्ही गृहमंत्री असल्यामुळे तुमचे इंदिरा गांधींकडे वजन आहे तेव्हा माझ्यासाठी शब्द टाका, अशी विनंतीही त्यांनी यशवंतरावांना केली होती. पण अध्यक्ष झाल्यावर संघटनेच्या प्रश्नांसंबंधातही इंदिरा गांधी निजलिंगप्पा यांना अनेकदा विचारत नसत; यामुळे दोघांत कटुता वाढत होती. तथापि कामराज व मोरारजीभाई यांच्याप्रमाणे इंदिरा गांधींचे पंतप्रधानपद लगेच काढून घेण्यास आपण तयार नव्हतो; कारण विविध राज्यांत काँग्रेस सत्ता गमावून बसली असता ती सावरण्यास अग्रक्रम द्यावा, असे आपले मत असल्याचे त्यांनी त्यांच्या रोजनिशीत लिहून ठेवले आहे.

तरुण तुर्क दिवसेंदिवस अधिकच आक्रमक पवित्रा घेऊ लागले होते. त्यांचा रोख उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्यावर होता आणि त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दलच चंद्रशेखर यांनी लोकसभेत बोलताना संशय व्यक्त केल्यामुळे वादळ निर्माण झाले आणि संसदीय काँग्रेस पक्षाने चंद्रशेखर यांना समज देण्याचा अधिकार इंदिरा गांधींना दिला. पण त्यांनी तो बजावला नाही. काँग्रेसमधील तणाव फरिदाबाद येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात अधिकच वाढला. निजलिंगप्पा यांनी या अधिवेशनात केलेल्या अध्यक्षीय भाषणात इंदिरा सरकारच्या आर्थिक धोरणावर टीकास्त्र सोडले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग तोट्यात असल्याबद्दल या भाषणात टीका होती. तेव्हा त्यांच्याविरुद्ध अविश्वास व्यक्त करण्याचा प्रयत्न झाला. मात्र निजलिंगप्पा यांनी अध्यक्षीय भाषण हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही, असे सांगून हा प्रयत्न बाद केला. तथापि इंदिरा गांधींनी आपल्या सरकारच्या आर्थिक धोरणाचे समर्थन करताना सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग नफ्यासाठी चालवले जात नाहीत तर आर्थिक स्वयंपूर्णता आणि देशाचे राजकीय व आर्थिक हितसंबंध यांच्या रक्षणासाठी चालवण्यात येतात, असे उत्तर दिले. त्याचे जोरदार स्वागत झाले.



मा० यशवंतराव आणि मा० जगजीवन राम

निजलिंगप्पा यांनी चुकीच्या मुद्यावर विरोध करून स्वत:ची फजिती करून घेतली.

वरिष्ठ काँग्रेस नेत्यांत या प्रकारे तणाव वाढत जात असताना आणि एकमेकांबद्दल कमालीचे संशयाचे वातावरण निर्माण झाले असताना, विद्वान व शिक्षणतज्ज्ञ राष्ट्रपती डॉ० झाकीर हुसेन यांचे निधन झाले. यामुळे नवा राष्ट्रपती निवडण्याची वेळ आली. तसे पाहिल्यास ही एक वादाची बाब होण्याचे कारण नव्हते. पण या वेळेला ती झाली. या वेळच्या घडामोडींसबंधात बरेच लिहिले गेले आहे. यशवंतराव यांनी इंदिरा गांधींच्या बरोबर व्हि० व्हि० गिरी यांना राष्ट्रपती करण्याच्या बाजूने मतदान केले नाही आणि कामराज व मोरारजी यांच्याप्रमाणे संजीव रेड्डी यांना पाठिंबा दिला, म्हणून एकीकडून विश्वासघाताचा तर नंतर यशवंतरावांनी इंदिरा गांधींबरोबर जाण्याचा मार्ग पत्करला म्हणून कोलांटीउडी मारल्याचा आरोप करण्यात आला आणि स्वत:चे मंत्रिपद टिकवण्यासाठी हे केले, अशी टीका होत आली आहे.

राष्ट्रपतिपदासाठी प्रथम जगजीवन राम यांचे नाव पुढे आले होते व नंतर ते मागे पडले. याबद्दल एका वार्ताहराने जगजीवनबाबूंनाच विचारले असता, त्यांनी उत्तर दिले की, याबद्दल बोलायचे तर आपले मित्र यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेबद्दल बोलायला लागेल आणि त्यास आपली तयारी नाही. या संबंधी यशवंतरावांना खुलासा विचारला तेव्हा ते म्हणाले की, मी पूर्वी मित्र नव्हतो आता तो झालेला दिसतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, या राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारासंबंधी इंदिरा गांधी त्या वेळी आपली भूमिका सतत बदलत होत्या.जगजीवन राम यांचे नाव आपण नव्हे, तर इंदिरा गांधींनीच प्रथम जाहीरपणे सुचवले होते. वृत्तपत्रांत हे प्रसिद्ध झालेले दिसेल अशी पुस्तीही त्यांनी जोडली.



संजीव रेड्डी यांच्यासमवेत यशवंतराव

या प्रश्नाने नंतर कोणते वळण घेतले ते यशवंतरावांनी नोंदून ठेवले होते. त्यांच्या निधनानंतर १२ जुलै १९९२ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी ते प्रसिद्ध केले. त्याची रूपरेषा अशी, गिरी यांची उमेदवारी पहिल्यापासूनच त्यांना पसंत नव्हती. उमेदवारीबद्दल अनेक जण अनेक पातळ्यांवर बोलत, चर्चा करत असत. एक दिवस इंदिरा गांधींनी आपल्याला बोलावले आणि त्यांनी काय करावे, असा प्रश्न विचारला.आपण अजून या प्रश्नाचा गंभीरपणे विचार केलेला नाही. तरीही एका गोष्टीबद्दल आपले मत स्वच्छ आहे आणि ते म्हणजे उपराष्ट्रपती गिरी यांना उमेदवार निवडू नये असे यशवंतरावांनी सांगितले. असे कां? असा हा दुसरा प्रश्न इंदिरा गांधींनी विचारला. तेव्हा आपण सांगितले की, उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने आपण त्यांची कार्यपद्धती पाहिली असून ती आपल्याला आवडली नाही. व्यक्ती म्हणून ते भले आहेत, वृद्ध आहेत आणि नावाजलेले आहेत, पण आपण त्यांच्या बाजूचे नाही. इंदिरा गांधी यांचाही असा कल असल्याची आपली समजूत झाली, असे यशवंतरावांनी म्हटले आहे.

यानंतर सेठ गोविंद दास यांचे एक पत्रक वृत्तपत्रांत आलेले वाचले. त्यांनी जगजीवन राम यांचे नाव सुचवले होते आणि महात्मा गांधींच्या शताब्दीचे हे वर्ष असल्यामुळे, एका हरिजन पुढाऱ्याला राष्ट्रपती करणे उचित होईल असेही म्हटले. आपल्याला ही सूचना पसंत पडली. दुसऱ्या दिवशी के० के० शहा आपल्याला भेटले. त्यांनी या सूचनेचा उल्लेख केला आणि ही सूचना चांगली असल्याचे ते म्हणाले. यावर पंतप्रधानांशी या संबंधी बोलण्याची सूचना आपण केली असे यशवंतराव म्हणाले. नंतर जेव्हा पंतप्रधानांनी इतर काही शासकीय कामासाठी बोलावले तेव्हा ते काम संपल्यावर राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराचा विषय

निघाला. त्यावर के० के० शहा यांच्याशी आपले बोलणे झाले होते व तुमच्याशी चर्चा करण्यास आपण सांगितल्याची माहिती दिली. तेव्हा बाबूजींचे नाव मान्य नाही, असे उत्तर इंदिरा गांधींनी दिले. असे कां? असे विचारले असता त्या म्हणाल्या की, काँग्रेस कार्यकारिणीतील आपली बाजू हलकी होईल. त्या बाबूजी या व्यक्तीसंबंधी काही विरोधी बोलल्या नाहीत.

मग आणखी एक व्यक्ती यात आली. ती म्हणजे संजीव रेड्डी. यशवंतराव सांगतात,एक दिवस त्यांचा फोन आला आणि आपण भेटायला येतो असे ते म्हणाले. लोकसभेचे अधिवेशन संपत आले होते आणि नंतर ते परदेशी जाणार होते. यावर तुम्ही येऊ नका, मीच येतो, असे उत्तर दिले. सभापतीने मंत्र्यांकडे जायचे नसते म्हणून मी असे म्हणालो. तेव्हा ते कां भेटायला येत होते हे प्रत्यक्ष भेटीत सांगितल्यावर स्पष्ट होईल, असे त्यांचे म्हणणे होते. मग दुसऱ्या दिवशी पंतप्रधानांना भेटायला आपण तुमच्या बाजूला येणार आहोत तेव्हा तुमच्याकडे येतो, असा खुलासा त्यांनी केला. इतर काही बोलणी झाल्यावर त्यांनी राष्ट्रपतिपदाचा विषय काढला. ते कामराज यांच्या जवळचे असल्यामुळे कामराज यांचे मत काय आहे? ते तुमच्याशी काय बोलले, अशी विचारणा केली. रेड्डी यांचे उत्तर असे होते की, कामराज स्वत:च्या मनातले काही बोलत नाहीत. या पाठोपाठ रेड्डी यांनी स्वत:च्या उमेदवारीसंबंधी मत विचारले. ते असेही म्हणाले की, इंदिरा गांधींना भेटलो असता त्यांनी आपल्याला विचारले की, तुम्ही कां उभे राहत नाही? हे ऐकल्यावर आपण सांगितले की, जर पंतप्रधानांना तुम्ही हवे असाल तर आम्ही सर्व तुम्हांला पाठिंबा देऊ. पंतप्रधानांना तुम्ही हवे आहांत याबद्दल तुमची खात्री आहे काय? असे पुन्हा विचारले असता त्यांनीच आपल्याला तुम्ही उमेदवार कां होत नाही, असा प्रश्न विचारल्याचे रेड्डी यांनी सांगितले. मग कामराज यशवंतरावांना भेटले असता त्यांचे मत काय असे विचारून संजीव रेड्डी यांचा विषय काढला. कामराज यांचे उत्तर असे होते की, त्यांनी निश्चित काही ठरवले नाही, पण गिरी नको याबद्दल आपले मत पक्के असल्याचा खुलासा त्यांनी केला. यशवंतराव म्हणतात की, त्या वेळी हे असे घडत होते आणि पंतप्रधानांचे निश्चित मत काय, हे मात्र समजले नव्हते. त्यातच आणखी काही नावे पुढे आली. हे सर्व लक्षात घेता, पंतप्रधानांना कोणीही स्वतंत्र वृत्तीची व्यक्ती नको असल्याचे आपल्या मनाने घेतले. अनेक प्रकारची अनौपचारिक चर्चा चालत होती. संजीव रेड्डी यांना संधी दिसते, कारण पंतप्रधानांनी त्यांना उभे राहण्यास सांगितले आहे, असे आपण काही जणांशी बोललो असा खुलासा यशवंतरावांनी केला.

१० जुलै रोजी बंगलोर इथे काँग्रेस महासमितीची बैठक सुरू झाली. कार्यकारिणी आणि संसदीय मंडळाची बैठक तिच्या बरोबरच होती. संसदीय मंडळात राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराची निवड निश्चित करायची होती. त्याच्या आदल्या रात्री इंदिरा गांधींनी यशवंतरावांना बोलावले होते. त्या वेळी फकरुद्दिन अली अहमदही हजर होते. इंदिरा गांधींनी पुन्हा एकदा राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारासंबंधी काय करायचे? असा प्रश्न विचारला. यशवंतराव सांगतात की, त्यावर आपण त्यांचेच मत काय आहे ते स्पष्ट करायला सांगितले. त्या म्हणाल्या, आपल्या डोळ्यांपुढे दोन नावे आहेत. एक गिरी व दुसरे जगजीवन राम. गिरी तुम्हां लोकांना पसंत नाहीत. यावर कामराज व मोरारजी यांच्याशी बोलून घेण्याची सूचना आपण केली. आपल्या सगळ्यांना हे ठरवायचे आहे तेव्हा असा विचारविनिमय करणे बरे, असे यशवंतरावांनी सांगितले. यावर उद्या सकाळी बोलू असे इंदिरा गांधींनी उत्तर दिले. सर्व बोलणे इतक्यावरच थांबले होते. गिरी की बाबूजी, असा पर्याय होता.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या बैठकीतील ठरावाचा मसुदा यशवंतरावांनी तयार केला होता. ठराव

आर्थिक धोरणासंबंधी होता. महासमितीच्या बैठकीच्या आधी इंदिरा गांधींनी आपली काही टिपणे धाडली होती. त्यांत पाचसहा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची प्रमुख सूचना होती आणि जमीनसुधारणेस चालना देण्यासंबंधीचे विचार होते. यशवंतरावांची यास संमती होतीच तेव्हा ठराव त्यांनी तयार करणे साहजिक होते. पण या ठरावातील सूचना, विशेषत: बँका सरकारी मालकीच्या करण्याची सूचना, वादग्रस्त झाली. पक्षात डावे व उजवे असे तट पडले होते आणि इंदिरा गांधींनी टिपणांच्या द्वारे आपला कल डाव्यांकडे असल्याचे जाहीर केले होते. निजलिंगप्पा, मोरारजी व स० का० पाटील यांचा बँकांच्या राष्ट्रीयीकरणास विरोध होता. कामराज, यशवंतराव, जगजीवन राम व फकरुद्दिन अली अहमद यांचा पाठिंबा होता. या स्थितीत कार्यकारिणीत याच प्रश्नावर फूट पडण्याचा संभव होता. परंतु सर्वांनी तडजोडीची तयारी दाखवल्यामुळे तसा ठराव करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार यशवंतरावांवर ठरावाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी आली. मोरारजींनी हा ठराव मांडला व यशवंतरावांनी दुजोरा देणारे भाषण केले.

आर्थिक विषयावरील ठराव तडजोड होऊन कार्यकारिणीने एकमताने संमत केला असला, तरी राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराच्या बाबतीत मतभेद झाले. जगजीवन राम व संजीव रेड्डी यांतून निवड करायची होती. यापैकी जगजीवन राम यांच्या बाजूने इंदिरा गांधी व फकरुद्दिन यांनी मत दिले तर बाकीच्या पाचांनी रेड्डी यांची निवड केली. बाबूजी स्वत:चे नाव असल्यामुळे तटस्थ राहिले. त्यांचे नाव इंदिरा गांधींनी सुचवले होते. सकाळच्या ठरावाच्या चर्चेत वेळ गेल्यानंतर महाराष्ट्रातल्या आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी, यशवंतराव मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना भेटले आणि मग महासमितीतील सहकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली. आता उशीर झाला असून रेड्डी यांच्या ऐवजी दुसऱ्यास मत देणे शक्य नाही, असे मत पडले. तुम्ही ठरवले ते आम्हांला मान्य असल्याचे सर्वांनी यशवंतरावांना सांगितले. एकदंर रागरंग पाहता निवड सहज रीतीने होणार नसल्याची अटकळ आल्यामुळे, यशवंतरावांनी फकरुद्दिन यांना इंदिरा गांधीशी बोलून बैठक लांबणीवर टाकण्याचे प्रयत्न करावे असे सुचवले. मग इंदिरा गांधींनी यशवंतरावांना बोलावून घेतले. त्यांनी विचारले की तुम्ही रेड्डींना मत देणार आहांत, हे खरे काय? यशवंतराव म्हणाले, खरे आहे. कारण रेड्डी आपल्याकडे आले होते व तुम्ही त्यांना पाठिंबा देणार असल्याचे त्यांनी सांगितले. मग मी त्यांना होकार दिला. तथापि आजची बैठक पुढे ढकलण्याची कल्पना फकरुद्दिन यांच्यातर्फे तुम्हांला सुचवली होती. पण इंदिरा गांधी म्हणाल्या, आपण अशी सूचना अध्यक्षांना करणार नाही. वाटल्यास तुम्हीच ती करा. यास यशवंतरावांनी नकार दिला आणि तिथेच निकाल कसा लागणार हे स्पष्ट झाले.

यानंतरचे यशवंतरावांचे विवेचन लेले यांना दिलेल्या मुलाखतीत आहे. यशवंतरावांचे म्हणणे असे होते की, इंदिरा गांधींनी प्रथमच जगजीवन राम यांची उमेदवारी, कार्यकारिणीतील समतोल बिघडतो म्हणून अमान्य केली. मग आयत्या वेळी त्यांनी मत बदलले. आपल्याला हवे त्याप्रमाणे लोकांनाही मत बदलायला लावण्याची त्यांची सवय आहे आणि हे आपल्याला मान्य नव्हते. आपल्या मतामुळे संसदीय मंडळातील मतदानाचे पारडे कोणत्या बाजूस फिरणार हे अवलंबून होते. तथापि पंतप्रधानांना हटवण्यासाठी एक गट तयार झाला होता व आपण त्यात सामील झालो अशातला काही भाग नव्हता. मोरारजीभाईनीही असा गट नव्हता व काही कट केलेला नव्हता, अशीच ग्वाही दिली आणि यशवंतरावांना ते मान्य होते.



जगजीवन राम मंत्रिपद सोडण्यास कसे तयार झाले, या प्रश्नावर यशवंतरावांचे मत असे की, ही एक खेळी होती. पुन्हा जर राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार निवडण्याची वेळ आली तर इंदिरा गांधी जगजीवन राम यांचे नाव सुचवणार नाहीत. हे मात्र खरे की, आपल्या विरुद्ध काहीजण खटपट करत आहेत अशी इंदिरा गांधींची भावना झाली होती. यशवंतरावांनी मग अशीही पुस्ती जोडली की, आपल्या विरुद्धही वाटेल त्या वावड्या उठवण्यात आल्या होत्या. एक अशी की, मोरारजी व आपण यांच्यात असे ठरले होते की, इंदिरा गांधींना दूर करून मोरारजींनी पंतप्रधान व आपण उपपंतप्रधान व्हायचे. हे पूर्णत: खोटे होते. उपपंतप्रधानपदाला कितपत किमत आहे हे आपण जाणत होतो. तुम्ही इंदिरा गांधींच्या संबंधात नाराज असल्यामुळे मोरारजीभाईंना तुम्ही काही संकेत दिल्याची माहिती मोरारजींनी दिली आहे, ती कितपत खरी? या लेले यांच्या प्रश्नांसंबंधी यशवंतरावांचा खुलासा असा की, असे काही संकेत दिले नाहीत. उरळी कांचनचे मणिभाई देसाई हे आपले मित्र आहेत. ते गांधीवादी असून उत्तम विधायक काम करतात. त्यांच्याबद्दल आपल्याला आदर असून आम्ही भेटलो, की अनेक विषयांवर चर्चा करतो,पण राजकारणाची चर्चा केली नाही. वसंतराव नाईक यांची गोष्ट वेगळी. आम्ही राजकीय चर्चा करतो. पण मोरारजीभाईंना संकेत पाठवण्याचे कारण नव्हते. एक गोष्ट झाली ती ही की, संसदभवनात आमच्या कचेऱ्या लगत होत्या. मोरारजीभाईंची तक्रार अशी होती की, आपण त्यांना नमस्कार वगैरे करत नाही. आम्ही सरकारी कामाच्या निमित्ताने दिवसातून अनेकदा भेटत असल्यामुळे सकाळी नमस्कार वगैरे म्हणणे आपल्याला औपचारिक वाटत होते. पण यामुळे मोरारजीभाई नाराज आहेत असे समजल्यावर, आपण रोज सकाळी भेट झाली की 'नमस्कार' असे म्हणू लागलो. मग ते आपल्या कचेरीत येत किंवा वेळ असल्यास भेटा म्हणून सांगत. या भेटीत कामाबद्दल बोलणी होत; काही वेळा एखादी गोष्ट आवडली नाही तर ती आम्ही बोलून दाखवत होतो. पण इंदिरा गांधींविरुद्ध कट करण्याचे मनात नव्हते, असे यशवंतरावांनी निक्षून सांगितले.

तेरा जुलै रोजी इंदिरा गांधींनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गिरी यांचे नाव सुचवण्यापूर्वी आपण जगजीवन राम यांचे नाव सुचवले होते, पण दोन्ही अमान्य झाली. ज्या रीतीने राष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरवण्यात आला त्यामुळे आपल्याला उद्वेग वाटला, असेही त्या म्हणाल्या. गिरी यांच्या नावाबद्दल देशात बरेच एकमत असून गांधीशताब्दी वर्षात जगजीवन राम यांचे नाव उचित होते, असाही अभिप्राय त्यांनी दिला. प्रजासमाजवादी, भारतीय क्रांती दल इत्यादी काही पक्षांचा गिरींना पाठिंबा होता आणि कम्युनिस्ट पक्षांचा पाठिंबा मिळणारच होता. दिल्लीला परतल्याबरोबर इंदिरा गांधींनी मोरारजीभाईंचे अर्थखाते काढून स्वत:कडे घेतले. ते खाते न देता उपपंतप्रधानपद त्यांच्याकडे ठेवण्यास इंदिरा गांधी तयार होत्या. पण मोरारजीभाईंनी राजीनामा दिला. त्याचबरोबर बँकांचे राष्ट्रीयीकरण, दहा कलमी कार्यक्रम इत्यादींची घोषणा झाली. यशवंतराव गृहखात्यात काही अधिकाऱ्यांबरोबर चर्चेत गुंतले असताना झालेली ही घटना त्यांना कळली नाही. मग मोरारजींनी त्यांना आपल्या कचेरीत बोलावले व इंदिरा गांधींचे पत्र त्यांना दाखवले. अर्थखाते गेले तरी राजीनामा देऊ नये हा यशवंतरावांचा सल्ला होता. मोरारजींना तो मानवला नाही.

मोरारजीभाईंची अपेक्षा अशी होती की, आपल्याला मिळालेल्या वागणुकीच्या निषेधार्थ यशवंतरावांनीही राजीनामा द्यावा. इंदिरा गांधी आपल्यालाही मंत्रिमंडळातून काढतील असा यशवंतरावांचा अंदाज होता. मोरारजीभाई त्यांना पंतप्रधानांचे पत्र आले काय, असे वारंवार विचारत



राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्याकडून केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेताना



सन १९७१मध्ये अर्थमंत्री म्हणून लोकसभेत आर्थिक अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी

असत. महाराष्ट्रातले आमदार इत्यादींनी यशवंतरावांशी चर्चा केली तेव्हा बंगलोरला जे घडले, त्या आधीच्या घटना त्यांनी निवेदन केल्या आणि संजीव रेड्डी हे स्वातंत्र्य लढ्यात होते, एका राज्याचे मुख्यमंत्री होते आणि नंतर लोकसभेचे सभापती; राष्ट्रपतिपदासाठी इतके कमी नाही, असे त्यांनी सांगितले.

यशवंतरावांनी लेले यांना मुलाखतीत सांगितले की, नंतर दोन दिवसांनी इंदिरा गांधींनी सचिवातर्फे बोलावले. पण इंदिरा गांधींनी यशवंतरावांना बोलावल्याचे वृत्त सर्वत्र पसरले होते. मग यशवंतरावांनी इंदिरा गांधींना फोन केला आणि सांगितले की, तुम्हांला भेटण्याच्या मन:स्थितीत आपण नाही, पण काही सांगायचे असेल तर फोनवर सांगितले तरी चालेल. आपल्याला काहीही सांगायचे नाही. पण शांतपणे चर्चा करायची आहे असे त्यांनी सांगितले. यशवंतराव म्हणाले की, झालेल्या घटनांमुळे मी अस्वस्थ होतो, पण त्या अगदी शांत होत्या. तेव्हा आपण म्हणालो की, तुम्हांला काही सल्ला देण्याचा आपल्याला काही अधिकार नाही, अशी आपली भावना आहे. त्या म्हणाल्या की, तसे काही नाही. तुम्हांला पूर्ण अधिकार आहे. यावर मोरारजींचा राजीनामा घाईने स्वीकारू नये, असे यशवंतरावांनी सांगितले. मग दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरले. भेट झाल्यावर इंदिरा गांधी म्हणाल्या की, संध्याकाळी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलावली असून बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घ्यायचा आहे. आपण याच विषयावर चर्चा करण्यासाठी काल बोलावले होते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणास आपला पूर्वीपासूनच पाठिंबा असल्यामुळे या असल्या मुद्यावर आपण तुमच्याशी संघर्ष करणार नाही, असे यशवंतरावांनी उत्तर दिल्यावर, माझ्याशी संघर्ष करण्याची भाषा तुम्ही कशासाठी करता? असा इंदिरा गांधींचा प्रश्न होता. यशवंतराव सांगतात की, इंदिरा गांधींचा शांतपणा पाहून त्याही स्थितीत आपल्याला कौतुक वाटले. मोरारजीभाईंशी बोलल्याशिवाय राजीनाम्याबद्दल निर्णय न घेण्याचेही इंदिरा गांधींनी मान्य केले. तशी भेट झाली, पण काही मार्ग निघाला नाही.

यशवंतरावांचा राजीनामा इंदिरा गांधींनी मागितला नाही व दोघांच्या भेटीत काय बोलणी झाली, ती यशवंतरावांकडून मला समजली होती. पण आणखीही एक गोष्ट त्यांनी तेव्हा सांगितली. ती अशी की, यशवंतराव भेटीला गेल्यावर आदल्या दिवशी कां आला नाहीत? असा प्रश्न करून तुमचा राजीनामा आपण मागू, असे तुम्हांला वाटले काय? असा प्रश्न त्यांनी केला. नंतर इंदिरा गांधी म्हणाल्या, 'तुम्हीच मला अगदी प्रथम पंतप्रधानपदासाठी उभे राहण्यास सांगितले होते आणि मी उभी राहणार नसल्यास, आपण निवडणूक लढवू असे तुम्ही म्हणाला होतात; हे सर्व माझ्या लक्षात आहे.' त्याचबरोबर हेही खरे दिसते की, हक्सर यांनी इंदिरा गांधींना असा सल्ला दिला होता की, जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांशी संघर्ष करायचा तर त्यास वैचारिक स्वरूप असले पाहिजे. म्हणून मग बँकांचे राष्ट्रीयीकरण, दहा कलमी कार्यक्रम इत्यादींचा पुरस्कार करणारे टिपण इंदिरा गांधी यांनी बंगलोरच्या बैठकीसाठी पाठवले होते. त्याचबरोबर मोरारजींचे अर्थखाते काढून घेतल्यानंतर, मोरारजींनी राजीनामा दिल्यावर यशवंतरावांचा राजीनामा मागण्याचे कारण नाही; तसे केल्यास वैयक्तिक सूड घेतल्यासारखे होईल, असे हक्सर यांचे म्हणणे होते व ते इंदिरा गांधींनी मान्य केले.

याच प्रकरणात लेले यांनी विचारले की, मोरारजी हे फार अडेल गृहस्थ असून त्यांच्यापाशी लवचीकपणा नाही. तेव्हा मोरारजींना दूर करावे, यशवंतरावांना तसे करण्याचे कारण नाही, असा सोव्हिएत युनियनचा सल्ला असल्याचे बोलले जाते, ते कितपत खरे? यशवंतराव म्हणाले की, यात काहीही तथ्य नाही. इंदिरा गांधींना अशा सल्ल्याची गरज नाही. त्या अनेकांना भेटतात, अनेकांशी चर्चा

होते आणि त्या आपला निर्णय घेतात. रशियाकडून सल्ला घेणाऱ्या त्या नाहीत. तसे असते तर आपण या मंत्रिमंडळात राहिलोच नसतो. बंगलोरलाही त्या काही ठरवून आल्या नव्हत्या. शेवटी त्यांनी जे केले त्यासाठीही त्यांनी काही वेळ घेतला. मुख्य म्हणजे निजलिंगप्पा यांनी हा प्रश्न नीट हाताळला नाही.

यानंतरच्या घटना यशवंतरावांनी कथन केल्या आहेत. मोरारजींच्या राजीनाम्यानंतर कार्यकारी मंडळाची बैठक होती. आपण बँकांच्या राष्ट्रीयीकरणास पाठिंबा दिलेला होता. त्यामुळे इंदिरा गांधी व आपल्यात विचारविनिमय होऊ लागला. कार्यकारिणीच्या बैठकीच्या आधी इंदिरा गांधी यशवंतरावांना म्हणाल्या की, या बैठकीत जर मोरारजींना परत मंत्रिमंडळात घेण्याचा प्रस्ताव आला तर आपण तो मानणार नाही. यशवंतराव म्हणाले की, तसे होऊ नये हे पाहता येईल. नंतर आणखी एका भेटीत इंदिरा गांधींनी उपराष्ट्रपतिपदासाठी एखादे नाव सुचते काय? असे विचारले. तेव्हा यशवंतरावांनी जी० एस० पाठक यांचे नाव सुचवले व ते इंदिरा गांधींना मान्य झाले. संसदीय मंडळातही पाठक यांची उमेदवारी एकमताने मान्य झाली. याच वेळी इंदिरा गांधींना आपण सांगितले की, झाले-गेले विसरू या. राष्ट्रपतिपदाच्या काँग्रेसच्या नियुक्त उमेदवाराच्या अर्जावर तुम्हीच सूचक म्हणून सही करावी. तेही त्यांनी मानले. या अशा बैठकीनंतर काँग्रेसच्या अध्यक्षाने पक्षाची बैठक घेण्याचा प्रघात आहे, त्याप्रमाणे ती बोलवावी हेही मान्य झाले.

परंतु या सभेच्या आधी तारकेश्वरी सिन्हा यांनी पाटण्याच्या 'नेशन' या पत्रात लेख लिहून पंतप्रधानांवर शिस्तभंगाची कारवाई करावी अशी सूचना केली होती. मग इंदिरा गांधींच्या काही लोकांनी हे लोक याप्रकारे वागत असता आपणही काही कृती केली पाहिजे असा आग्रह चालवला होता. तथापि त्या पक्षाच्या सभेला आल्या. या सभेत द्वारकाप्रसाद मिश्र व इतर काहींनी तारकेश्वरींच्या लेखाचा प्रश्न उपस्थित केला. तेव्हा आपण या लेखाबाबत विचार करतो वा लक्ष घालतो असे उत्तर न देता, निजलिंगप्पा म्हणाले की, तुम्हा कोणाला या लेखाबद्दल तक्रार करायची असेल तर मला तसे पत्र द्या; म्हणजे मी पाहतो. अगदी खाष्ट नोकरशहाही असे उत्तर देणार नाही. परंतु इंदिरा गांधी हे नुसत्या पाहत होत्या. मग त्या घरी परतल्या तेव्हा त्यांचे चाहते जमले होते. त्यांना इंदिरा गांधी म्हणाल्या की, आपले चुकले. हे लोक फार खुजे आहेत. याच वेळी निजलिंगप्पा यांना विरोध करण्याचा निर्णय झाला. हे घडले नसते तर संजीव रेड्डी यांची निवड सुरळीत पार पडली असती. राष्ट्रपती म्हणून रेड्डी इंदिरा गांधींना पूर्णतः एकनिष्ठ राहिले असते आणि रोज गुलाबांचा गुच्छ पाठवत राहिले असते, असा अभिप्राय यशवंतरावांनी दिला.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत गिरी विजयी झाल्यावर, पंतप्रधानांमुळे काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव झाल्याची टीका होऊ लागली आणि काहीजण पंतप्रधानांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या गोष्टी करू लागले. निजलिंगप्पा यांनी कार्यकारिणीची बैठक २५ ऑगस्ट रोजी बोलावली. त्या आधी यशवंतराव सुब्रमण्यम यांच्याशी बोलले आणि पंतप्रधानांविरुद्ध कारवाई होऊ न देता, पक्षात एकोपा राहण्यास महत्त्व देण्याची गरज असल्याबद्दल दोघांत एकमत झाले. मग यशवंतरावांनी सुब्रमण्यम यांना इंदिरा गांधींशी बोलून कार्यकारिणीत कोणती भूमिका घ्यायची याची चर्चा करण्यास सांगितले. त्यांनी तसे केल्यानंतर इंदिरा गांधींनी दुसऱ्या दिवशी एक बैठक घेण्याचे ठरवले. तिला जगजीवन राम, फकरुद्दिन यांनाही बोलावले होते. यशवंतरावांनी असा विचार केला की, वाद होण्याचे मुख्य कारण पंतप्रधान व पक्षाध्यक्ष यांच्यात अधिकारासंबंधीचा मतभेद हे आहे. तेव्हा ही कार्यकक्षा स्पष्ट केली पाहिजे.

या दृष्टीने चर्चा झाली व पुढे आलेल्या मुद्यांचा विचार करून यशवंतराव व सुब्रमण्यम यांनी एक मसुदा तयार केला. त्यावर पुन्हा चर्चा झाली.

कार्यकारिणीच्या बैठकीत निजलिंगप्पा व त्यांचे सहकारी बरेच संतप्त होते. पण सुखाडिया, वसंतराव नाईक व ब्रह्मानंद रेड्डी हे तीन सभासद एकोप्याच्या प्रस्तावास विरोध करणारे नव्हते. बैठक सुरू होताच यशवंतरावांनी जे झाले त्याची चर्चा न करता, काँग्रेसच्या भवितव्याचा विचार करून कसा एकोपा साधेल हे ठरवले पाहिजे असे सांगून, लिहून आणलेला ठराव मांडला. खरे तर दोन ठराव होते. पहिल्या ठरावात काँग्रेसच्या अध्यक्षांविरुद्ध करण्यात आलेले आरोप काही चुकीच्या समजुतीतून केले गेले, तेव्हा ते टिकणारे नाहीत असे होते. दुसऱ्या ठरावात काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव का झाला याचा उल्लेख होता. पक्षनेत्यांत ही फूट का पडली हे पाहिले पाहिजे असे म्हणून संघटना आणि प्रशासकीय विभाग यांत सहकार्य होण्याची गरज प्रतिपादण्यात आली होती. पक्षाच्या अध्यक्षावर मोठी जबाबदारी असते, पक्षाने व्यापक स्वरूपात धोरण मांडले पाहिजे व लोकांचा पाठिंबा मिळवला पाहिजे. तसेच पंतप्रधानांवर फार मोठी जबाबदारी असते. त्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हितसंबंध लक्षात घ्यायचे असतात. तेव्हा ही अधिकारपदे एकमेकांशी स्पर्धा करणारी नसून पूरक आहेत. काँग्रेसमधील दुफळीचे फार मोठे परिणाम संभवतात आणि म्हणून पक्षात एकोपा ठेवण्याची निकड आहे. शेवटी काँग्रेसजनांनी कोणत्याही प्रकारे या एकोप्याच्या वातावरणात बिघाड होऊ देऊ नये, असे आवाहन करण्यात आले होते.

तथापि हे वातावरण बिघडण्यास लगेचच सुरुवात झाली. संसदीय काँग्रेस पक्षाचे उपनेते एस. एन. मिश्र यांनी पक्षशिस्त मोडलेल्यांना कसलीच शिक्षा झाली नाही हे बरोबर नसल्याचे पत्रक काढले, तर पंतप्रधान ७२ सालच्या निवडणुकीपर्यंत अधिकारपदावर राहतील असेही वक्तव्य केले. मोरारजीभाईंना पुन्हा मंत्रिमंडळात घेऊन त्यांच्याकडे पूर्वीप्रमाणे खाती देण्याचा प्रश्न शिल्लक आहे, असेही त्यांनी म्हटले. इतक्यावरच हे न थांबता, कामराज यांनी सुब्रमण्यम यांना तामिळनाडच्या प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपद सोडण्यास भाग पाडले. ते पद गेले म्हणून निजलिंगप्पा यांनी सुब्रमण्यम यांना काँग्रेस कार्यकारिणीतून दूर केले. मग सुब्रमण्यम यांनी कामराज यांच्यावर टीका केली. गटाच्या स्वार्थासाठी पक्षाच्या हिताचा ते बळी देत असल्याचे सुब्रमण्यम यांनी म्हटले आणि राष्ट्रपतिपदाची निवड झाल्यानंतर इंदिरा गांधींना अधिकारावरून दूर करण्याचे डाव कामराज खेळत होते, असा आरोप केला. वातावरण या रीतीने बिघडत चालले असताना काँग्रेसच्या काही मुख्यमंत्र्यांनी तडजोडीचे प्रयत्न केले. निजलिंगप्पा यांनी ११ नोव्हेंबरला कार्यकारिणीची बैठक घेतली. तिला २१ पैकी ११ सभासद हजर होते. त्यांनी पंतप्रधानांना पक्षातून बाहेर काढण्याचा ठराव करून संसदीय काँग्रेस पक्षाने नवा नेता निवडावा, असे आवाहन केले. यशवंतरावांनी या ठरावावर टीका केली की, काही अल्प मतांतले लोक आपण म्हणजे काँग्रेस संघटना असे मानत आहेत.

बंगलोरला वरिष्ठ काँग्रेसनेत्यांत पडलेली फूट टाळणे शक्य होते काय. या प्रश्नाचे उत्तर शक्य होते, हे आहे. दोन्ही गटांच्या नेत्यांनी टोकाची भूमिका घेतली होती आणि एकमेकांबद्दल संशय इतका वाढला होता की, साध्या गोष्टीही काहीतरी भयंकर आहेत असे मानले जात होते. या दोन्ही गटांना एकत्र आणील अशी व्यक्ती नव्हती. इतका काळ लोटल्यानंतर असे वाटू लागते की, यशवंतरावांनी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीनंतर पक्ष एकत्र राहावा म्हणून जे प्रयत्न केले, ते अगोदरच केले असते तर बरे झाले असते. एक मात्र खरे की, राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराच्या नावाबद्दल इंदिरा गांधी यांचाच काही निश्चय होत नव्हता.



बैकल सरोवराच्या किनाऱ्यावर रशियन राजदूत मॉलेत्सेन्हा व यशवंतराव



राष्ट्रपती श्री० फक्रुद्दिन अली व पंतप्रधान श्रीमती इंदिराजींसमवेत अफगाणिस्थानच्या नेत्यांचे स्वागत करताना




प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्यासमवेत यूनोत १९७६



विदेश सचिव श्री० केवलसिंग यांच्यासमवेत



इजिप्त भेटीवर पिरॅमिड पाहताना बरोबर श्री० डोंगरे, श्री० सन्याल, सचिव, विदेश मंत्रालय,
श्री० के० आर० नारायणन्, संयुक्त सचिव, वि० मं०, श्री० खलिली



लंडन येथील लोकमान्य टिळकांच्या
स्मारक भवनाला भेट. सोबत
केसरीचे प्रतिनिधी ताम्हणकर व
भारताचे उच्चायुक्त जीवराज मेहता



मार्शल टिटो यांच्यासमवेत



इराकी शिष्टमंडळासमवेत चर्चा करताना (दिनांक २ जानेवारी १९७६)



नेपाळचे पंतप्रधान यांच्यासमवेत (दिनांक ११ डिसेंबर १९७४)



हंगेरियन पंतप्रधान यांच्यासमवेत (दिनांक २२ नोव्हेंबर १९७४)



यु० एस० सचिव, वित्त यांच्याशी चर्चा करताना (दिनांक १६ एप्रिल १९७५)



नवी दिल्ली येथे भुतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्यासमवेत (दिनांक ४ डिसेंबर १९७४)



अफगाणिस्तानच्या दौऱ्यावर, अफगाणिस्तानचे अध्यक्ष व पंतप्रधानांसमवेत करारावर सह्या करताना
(दिनांक २९ ऑक्टोबर १९७५)



नवी दिल्ली येथे सुदानचे अध्यक्ष यांच्याशी चर्चा करताना



श्रीमती एन० टी० बिन्ह, परराष्ट्र मंत्री पीआरजी साउथ व्हिएतनाम यांच्यासमवेत

सेठ गोविंददास यांनी जगजीवन राम यांना, गांधीशताब्दी वर्षात राष्ट्रपती करावे अशी सूचना केली होती. यशवंतरावांना ती मान्य झाली. पण इंदिरा गांधींना कार्यकारिणीत आपली बाजू अल्पमतात जाईल असे वाटले. म्हणून त्यांनी गिरी यांच्याबद्दल मत अजमावण्यास सुरुवात केली आणि संजीव रेड्डी यांनाही उमेदवार म्हणून उभे राहण्याची सूचना केली. मग आयत्या वेळी ज्यास सिंडिकेट म्हणून नाव पडले त्याचे रेड्डी उमेदवार असल्याचा त्यांनी ग्रह करून घेतला.

इंदिरा गांधी यांनी अखेरीस गिरी व जगजीवन राम यांची नावे सुचवली. मग त्यांनी हे प्रथमच केले असते तर एका कोणाची तरी निवड झाली असती. गिरी उपराष्ट्रपती होतेच आणि राष्ट्रपतीपदावर त्यांना बढती देणे हे एका रितीने रीतसरही झाले असते. पण यशवंतराव व कामराज यांनी आपल्याला गिरी पसंत नसल्याचे सांगितले होते. मग जगजीवन राम यांच्या नावास यशवंतरावांनी संमती दिली असती तर कार्यकारिणीत फूट पाडल्याचा व बाजू बदलल्याचा आरोप त्यांच्यावर आला नसता. इंदिरा गांधींनी एकदा एक व दुसऱ्या वेळी दुसऱ्या उमेदवाराचा पुरस्कार केल्यामुळे आपल्याला राग आला होता, असे यशवंतराव लेले यांना दिलेल्या मुलाखतीत म्हणाले होते. त्यांच्यासारख्या एरव्ही शांत स्वभावाच्या नेत्याने हा राग आवरता घेऊन, पक्षाच्या एकतेला अधिक प्राधान्य देण्याची अपेक्षा होती. आज इतकी माहिती बाहेर आल्यानंतर इंदिरा गांधींपासून यशवंतरावांसह सर्व काँग्रेस नेत्यांनी अधिक समंजस भूमिका घ्यायला हवी होती, असे म्हणावेसे वाटते. उमेदवाराच्या निवडीचा निर्णय पुढे ढकलणे शक्य व इष्ट होते आणि इंदिरा गांधी बैठक तहकूब करण्याची मागणी करण्यास तयार नव्हत्या, तर यशवंतरावांनी ती करून फूट टाळण्याचे शेवटपर्यंत प्रयत्न केले असते तर बरे झाले असते.

पक्षांतर्गत वाद विकोपाला गेल्यामुळे पंतप्रधानांवर विश्वासदर्शक ठराव १३ नोव्हेंबर १९६९ रोजी संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत मांडण्यात आला. तो यशवंतरावांनी मांडला. लोकसभा व राज्यसभा यांतील मिळून ४२९ सभासद होते. त्यांपैकी ३१० या बैठकीला हजर होते. त्यात लोकसभेचे २२० होते. यातल्या अडुसष्ट लोकसभा खासदारांनी ठरावाच्या विरुद्ध मतदान केले. संघटना (ओ) काँग्रेस आणि बैठक बोलावणारी (रिक्विझिशनिस्ट) अशी दोन पक्षांची नावे पडली. काँग्रेस पक्षात ही फूट पडल्यामुळे इंदिरा गांधींचे संसदेतील बहुमत घटून त्या अल्पमतात आल्या. परंतु कम्युनिस्ट व काही अपक्ष त्यांच्या बाजूने असल्यामुळे मंत्रिमंडळ बरखास्त होण्याची वेळ आली नाही. मग इंदिरा गांधींनी अखिल भारतीय काँग्रेस महासमितीची बैठक २२ नोव्हेंबरला दिल्लीत बेलावली. महासमितीच्या ७०५ सभासदांपैकी ४४६ जण तिला हजर होते. इंदिरा गांधींचे नेतृत्व मानणाऱ्या काँग्रेसचे अधिवेशन मुंबईत भरवण्यात आले आणि जगजीवन राम यांची अध्यक्षपदी निवड झाली. यशवंतराव यांनी या वेळी पुरोगामी कार्यक्रम राबवण्यासाठी इंदिरा गांधींचे हात बळकट करण्याची ग्वाही, 'मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून' दिली. या नंतर मार्च ७१ पासून १९७४पर्यंत संजीवय्या, शंकर दयाळ शर्मा व देवकांत बरूआ हे अध्यक्षपदावर आले.

काँग्रेसपक्षास इतके गंभीर वळण लागण्याचे कारणही लक्षात घेतले पाहिजे. काँग्रेस पक्षाची घटनात्मक रचना हे मूळ कारण होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यकारिणीला अतिशय महत्त्व होते आणि त्या परिस्थितीत ते स्वाभाविक होते. संघटनेत काही किमान शिस्त हवी म्हणून कार्यकारिणी सर्वोच्च ठरली. यामुळेच जेव्हा नेताजी सुभाषबाबूंनी महात्मा गांधी व कार्यकारिणी यांनी पुरस्कारलेल्या पट्टाभिसीतारामय्या यांच्या विरुद्ध अध्यक्षीय निवडणूक लढवली, तेव्हा सुभाषबाबूंच्या कार्यकारिणीत

जाण्यास आधीच्या सभासदांनी नकार दिला. त्यांना वगळून स्वत:ची कार्यकारिणी करण्याचा मार्ग सुभाषबाबूंनी स्वीकारला नाही. पुढे ३५ सालच्या कायद्याखाली काही राज्यांत काँग्रेसची मंत्रिमंडळे आली तेव्हा त्यांना मार्गदर्शन करणे व शिस्तीत ठेवणे हे काम संसदीय मंडळ करत असे. हीच परंपरा स्वातंत्र्यानंतरही कायम ठेवण्यात आली. पण स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य सरकारांच्या अधिकाराचे क्षेत्र व्यापक बनले होते आणि सरकारची जबाबदारीही खूपच वाढली होती. या स्थितीत संघटनेचा अध्यक्ष व पंतप्रधान यांच्यात एकमत झाले नाही तर काय करायचे, हे ठरवण्यात आले नाही. हीच अडचण राज्यपातळीवर मुख्यमंत्री व प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व कार्यकारिणी यांच्या बाबतीत जाणवू लागली.

पंडित नेहरूंच्या बाबतीत परिस्थिती अगदी वेगळी होती. आचार्य कृपलानी, पुरुषोत्तमदास टंडन या दोघांनी नेहरूंच्या धोरणास विरोध केला होता, पण त्यांनाच अधिकारपद सोडावे लागले. नेहरूंचे स्थान केवळ पंतप्रधानपदापुरते मर्यादित नव्हते. लोकांना आवाहन करून मते मिळवायची तर ती तेच मिळवू शकत होते. नेता व पंतप्रधान या दोन्ही दृष्टीने त्यांचे स्थान एकमेवाद्वितीय होते. यामुळे काँग्रेसच्या अध्यक्षाच्या अधिकाराच्या मर्यादा ठरवण्याची त्यांना निकड नव्हती. पण आपल्या मागे बदल होणार हे लक्षात घेऊन, त्यांनी इंग्लंड व इतर पाश्चात्त्य देशांच्या धर्तीवर बदल करायला हवे होते. अमेरिकेत अगदीच वेगळी स्थिती आहे. दोन्ही प्रमुख पक्षांचे अध्यक्ष हे नेहमीच पडद्याआड असल्यासारखे वावरतात. काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांचे सभासद व राष्ट्राचा अध्यक्ष निवडण्याचा त्यास वा पक्षसंघटनेला अधिकार नसतो.

इंग्लंडमध्ये पक्षाचा अध्यक्ष व त्याची कार्यकारिणी ही पंतप्रधानाच्या कामात ढवळाढवळ करू शकत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मजूर पक्षाचे पार्लमेंटमधील नेते ॲटली यांना, संयुक्त मंत्रिमंडळात त्यांनी व मजूर पक्षाने सामील व्हावे म्हणून आमंत्रण आले असता ॲटलींनी ते स्वीकारले. त्यांनी पक्षाला विचारून मग निर्णय घ्यायला हवा होता असा युक्तिवाद काहींनी केला होता. पण पक्षसंघटनेचा यात संबंध नाही, संसदीय पक्षाच्या नेत्याचा तो अधिकार आहे, अशी भूमिका ॲटली यांनी घेतली आणि तीच मान्य झाली. नंतर निवडणूक आल्यावर प्रचार मोहिमेत पक्षाध्यक्ष प्रा. हॅरॉल्ड लास्की यांनी सोव्हिएत युनियनला पोषक भाषणे करण्यास सुरुवात केली तेव्हा काही दिवस गप्प बसाल तर बरे होईल, इतकीच चिठी ॲटली यांनी पाठवल्यावर लास्कींची भाषणे थांबली. तसेच मंत्रिमंडळ बनवताना पक्षाला विचारावे इत्यादी मागण्या ॲटलींनी जुमानल्या नाहीत. संसदीय मजूर पक्ष त्यांनी या रीतीने स्वायत्त बनवला आणि आजपर्यंत तीच परंपरा चालू आहे. हुजूर पक्षाची अवस्थाही अशीच आहे.

नेहरूंनी हीच पद्धती अवलंबिली असती तर काँग्रेस संघटना आणि मंत्रिमंडळ यांच्यात जो सतत संघर्ष चालतो आणि अस्थिरता राहते, ती राहिली नसती. पक्षसंघटना निवडणुकीसाठी निधी जमा करतात म्हणावे तर तेही खरे नाही. मुख्यमंत्री निधी जमा करतात व करण्यास मदत करतात. संसदीय पक्ष स्वायत्त करण्याच्या दिशेने नेहरूंनी पावले टाकली असती तर लालबहादूर शास्त्री व इंदिरा गांधी यांना कामराज व इतर पक्षनेते यांचा सासुरवास सोसावा लागला नसता. इंदिरा गांधींच्या निवडणुकीच्या वेळी कामराज यांनी काँग्रेसश्रेष्ठींना अति महत्त्व आणून दिले. इतकेच नव्हे, तर मुख्यमंत्रीही या प्रक्रियेत गुंतवण्यात आले. नेहरूंच्या नंतर त्यांच्या उंचीचा कोणी नसून आता सामुदायिक नेतृत्व स्वीकारावे लागेल असे सांगून कामराज यांनी पंतप्रधानांचे हात बांधण्याची व्यवस्था केली. इंदिरा गांधींनी कोणाला खाते द्यायचे, कोणते आर्थिक धोरण स्वीकारायचे याची चर्चा आपल्याशी करण्याची कामराज यांची अपेक्षा, अशीच

अव्यवहार्य आणि अडथळे आणणारी होती. याचा कळस बंगलोरला गाठला जाऊन पक्षच फुटला.

उलट इंदिरा गांधींनी पक्षीय नेत्यांशी फटकून वागण्यास सुरुवात करताना, मंत्रिमंडळातही चर्चा करण्यास फारसे अनुकूल वातावरण ठेवले नाही. त्यांनी मंत्रिमंडळास गौण स्थान देऊन पंतप्रधानांचे कार्यालय समर्थ बनवण्यावर भर दिला. कोणत्याही लोकशाही देशात पंतप्रधान वा अध्यक्ष आपल्याला सल्ला देण्याकरिता निवडक अधिकारीवर्ग जमा करत असतो. पण मंत्रिमंडळ नगण्य करत नाही. ज्या काळात काहीजण इंदिरा गांधींच्या खास विश्वासातले गणले जाऊन किचन कॅबिनेटचे सभासद म्हणून ओळखले जात होते, तेव्हा अनेक सरकारी उपक्रम व धोरणे यांचा उगम मंत्रिमंडळात न होता या मर्यादित वर्तुळात होत असे. नंतर हे वर्तुळ बरखास्त झाले आणि पंतप्रधानांचे कार्यालय हे प्रमुख बनले. त्यातही हक्सर यांची नेमणूक पंतप्रधानांचे सल्लागार म्हणून झाल्यावर अधिकाधिक सत्ता पंतप्रधानांच्या म्हणजे या कार्यालयाच्या हाती केंद्रित होत गेली. हक्सर यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा पगडा होता आणि म्हणून त्यांनी काँग्रेस पक्षातल्या व बाहेरच्या मार्क्सवादी विचारांच्या लोकांचा गट तयार केला. हक्सर यांचे कम्युनिस्ट पक्षाशी जवळचे संबंध होते. यामुळे त्या पक्षाचा जितका पाठिंबा मिळेल तितका त्यांनी घेतला. यात भर पडली ती मोहनकुमार मंगलम यांची. कम्युनिस्ट पक्षाला जनतेत स्थान मिळालेले नाही म्हणून काँग्रेसमध्ये शिरून ती आपल्या धोरणाच्या दिशेने वळवण्याचा पुरस्कार ६४ सालपासून ते करत होते. मग तेच काँग्रेस पक्षात सामील झाले. इंदिरा गांधींची व त्यांची इंग्लंडमधील विद्यार्थीदशेपासून ओळख होती. मोहनकुमार मंगलम् काँग्रेसमध्ये येताच त्यांनी आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या.

तथापि अल्पमतांत राहून निर्वेधपणे कारभार करता येणार नाही हे ओळखून, इंदिरा गांधींनी लोकसभेची निवडणूक घेण्याची तयारी सुरू केली. ही निवडणूक ७२ साली होणार होती. पण ७० सालच्या अखेरीस इंदिरा गांधींनी लोकसभा बरखास्त करून निवडणुकीची मागणी केल्यावर, राष्ट्रपतींनी ७१ सालच्या मार्चमध्ये निवडणूक होणार असल्याचे जाहीर केले. या आधी पंतप्रधानांनी आपल्या मंत्रिमंडळात महत्त्वाचे बदल केले. मोरारजींचा राजीनामा घेतल्यानंतर अर्थखाते त्यांनी स्वत:कडे ठेवले होते. ते २६ जून १९७० रोजी यशवंतरावांकडे देण्यात आले. हा बदल यशवंतरावांना आवडला नाही. आपला अधिकार दाखवून देण्याचा हा इंदिरा गांधींचा एक प्रयत्न असल्याचे त्यांचे मत होते.

अर्थखाते आले तेव्हा देशापुढे गंभीर आर्थिक समस्या उभ्या होत्या. पाकिस्तानबरोबरच्या युद्धाचे आर्थिक परिणाम झाले होते. अन्नधान्याची तूट होती व त्यात दोनतीन वर्षे दुष्काळाची गेल्यामुळे धान्य, गोडे तेल यांचा तुटवडा अधिकच वाढला होता. चलनवाढ व त्यामुळे महागाई वाढली. अमेरिकेकडून येणाऱ्या धान्यावर अवलंबून राहावे लागत होते आणि अध्यक्ष जॉन्सन यांनी धान्यपुरवठ्याची दीर्घकालीन योजना न करता, वर्षापुरते धान्य पुरवण्याचा निर्णय घेतला होता. या वार्षिक योजनेमुळे अनिश्चितता निर्माण झाली होती. लालबहादूर शास्त्री यांनी धान्यउत्पादनास प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले होते आणि इंदिरा गांधींनी त्यास विशेष चालना दिल्यामुळे जिला हरित क्रांती म्हटले जाऊ लागले, तिची सुरुवात झाली. परंतु शिलकी धान्याची राज्ये तुटीच्या राज्यांना धान्य पुरवताना बरीच खळखळ करत आणि म्हणून तुटीच्या राज्यांची अडचण अधिकच वाढली होती. आमच्याकडे अधिकाधिक धान्याची मागणी करता, पण तुमच्या शिलकी धान्याच्या राज्यांना तुम्ही शिस्त लावू शकत नाही, याचे उत्तर काय,

असा सवाल अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांनी विचारला होता व त्याचे समर्पक उत्तर देणे भारतीय नेत्यांना कठीण झाले होते.

आर्थिक प्रश्न, शास्त्री वा इंदिरा गांधी यांच्याच कारकिर्दीत प्रथम उभा झाला ही चुकीची समजूत आहे. तो नेहरूंच्या वेळीच निर्माण झाला होता. दुसऱ्या योजनेने अवजड उद्योगांवर भर दिला होता आणि महत्त्वाचे उद्योग सरकारी क्षेत्रात घेण्याचे धोरण अवलंबिण्यात आले होते. निर्यातीचे जे प्रमाण गृहीत धरले होते तितकी निर्यात होत नव्हती आणि कच्च्या मालापेक्षा आपल्याकडे निर्यात करण्यासारखे विशेष काही नव्हते. यातून परकी चलनाची तूट मोठ्या प्रमाणात वाढली. परकी गुंतवणूक हा मार्ग होता, पण तिच्यावर बरीच बंधने होती. अवजड उद्योगांत रोजगारवाढीला मोठा वाव नसतो यामुळे उद्योगधंद्यात जी सरकारी गुंवणूक होत होती, तिने रोजगारी विशेष वाढणे शक्य नव्हते.

या स्थितीत आपल्या नियोजनाचाच आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज होती. नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेची घोषणा केली होती. अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने संमिश्र करण्याचे प्रयत्न करणे निकडीचे होते. पण राजकारणाने अर्थकारणावर मात केली. इंदिरा गांधींनी ज्येष्ठ कॉंग्रेस नेत्यांशी चाललेल्या संघर्षापायी अधिकाधिक डावे विचार अर्थकारणात आणले. पण त्या एकट्याच यास जबाबदार नव्हत्या. त्या पंतप्रधान झाल्या तेव्हा कॉंग्रेसमध्येच तरुण तुर्क या नावाने ओळखला गेलेला नवा वर्ग बराच कार्यरत झाला होता. अधिकाधिक सरकारीकरण हे उत्पादनवाढीवर गुणकारी ठरणारे औषध आहे असा त्याचा विश्वास होता. मग मोहनकुमार मंगलम्, नंदिनी सत्पथी, गणेश, रजनी पटेल इत्यादी कम्युनिस्ट पक्षातून कॉंग्रेसमध्ये आले आणि त्यांनी चंद्रशेखर, धारिया, कृष्ण कांत इत्यादींच्या सोशॅलिस्ट फोरममध्येच अधिक डावा गट तयार केला. प्रथम या सर्वांनी मोरारजीभाई व असेच काही ज्येष्ठ नेते हे टीकेचे लक्ष्य केले. पण चंद्रशेखर, धारिया इत्यादी माजी कम्युनिस्ट व कम्युनिस्ट यांच्याबरोबर जाऊ शकत नसल्यामुळे दोन वेगळे गट बनले. यातील अति डावा गट मग यशवंतराव, जगजीवनराम, उमाशंकर दीक्षित, सुब्रमण्यम यांना मवाळ मानू लागला. इंदिरा गांधींनी सोशॅलिस्ट फोरमच्या दोन्ही गटांना प्रथम उत्तेजन दिले, पण नंतर त्यांच्या प्रेरणेने उमाशंकर दीक्षित यांनी नेहरू फोरम स्थापन केला आणि या दोन्ही गटांना शह देण्यात आला. चंद्रशेखर, धारिया इत्यादी इंदिरा गांधींच्या सरकारचेही टीकाकार बनू लागल्यावर तो गट बाजूला करण्यात आला, पण अति डाव्यांची भूमिका पसंत नसूनही देशव्यापी राजकारणाचा विचार करून इंदिरा गांधींनी त्यांना महत्त्व दिले.

या रीतीने इंदिरा गांधी व यशवंतराव यांनी, समजा, नियोजनाची पद्धतशीर उजळणी करण्याचे ठरवले असते तरी त्यांनीच घेतलेल्या भूमिकेमुळे ते अशक्य होते. तथापि इंदिरा गांधी या समाजवादी अर्थव्यवहारावर निष्ठा बाळगत होत्या काय? या संबंधात त्यांचे प्रमुख सल्लागार म्हणून १९६७ सालपासून काम केलेल्या पी० एन० धर या अर्थशास्त्रज्ञांची साक्ष काढणे युक्त होईल. धर हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. जागतिक बँकेच्या काही योजनांत त्यांनी भाग घेतला होता. ते लिहितात की, शेतीसुधारणेच्या योजनेखाली शेतकऱ्यांना धान्याची किंमत वाढवून दिली तर धान्योत्पादन वाढते हे इंदिरा गांधींनी पहिले होते. पण अनेक डाव्यांचे व काही समाजशास्त्रज्ञांचे मत असे होते की, यामुळे शेतकऱ्यांतला एक वर्ग धनिक बनेल आणि विषमता वाढेल. तसेच हा धनिक वर्ग ट्रॅक्टर इत्यादींचा वापर करून बेकारी वाढवील. इंदिरा गांधींना परकी मदत व आयात यांवर धान्यासाठी अवलंबून राहणे अवमानास्पद वाटत होते. या स्थितीत त्यांची द्विधा मन:स्थिती झाली होती. म्हणून मग त्यांनी धर यांना बोलावले व संसदीय

राजकीय व्यवस्थेत समाजवादी अर्थविचार कितपत जुळतील याविषयी एक टिपण देण्यास सांगितले. ही ६७ सालच्या निवडणुकीनंतरची घटना आहे.

हे टिपण देण्यास सांगण्याआधी, इंदिरा गांधींच्या निवासस्थानी धर व इतर काहींना चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. या चर्चेच्या वेळी धर यांनी, एका जाट शेतकऱ्याशी त्यांचे बोलणे झाले होते त्याचा हवाला दिला. तो म्हणाला, तुम्हांला गोडेतेल मोफत वाटायचे आहे तर वाटा, पण त्यासाठी प्रथम तेलबिया शेतात पेरल्या पाहिजेत आणि त्या काढून तेल काढले पाहिजे. मग तेल वाटता येईल. धर यांनी त्यांच्या टिपणात म्हटले होते की, भारतात उत्पादनशक्ती अगदी कमकुवत आहे. ती वाढवण्यावर भर दिला नाही तर संपत्तीच्या वाटपात समानता आणण्याचा समाजवादाचा उद्देश साध्य होणार नाही आणि आर्थिक वाढही होणार नाही. इंदिरा गांधींनी या टिपणाचा लेखक गुप्त ठेवून ते काही जणांकडे पाठवले. मोरारजी, अशोक मेहता, स्वर्णसिंग, चेन्ना रेड्डी इत्यादींनी टिपणातल्या विचारांना दुजोरा दिला. जगजीवन राम यांनी संपत्तीच्या वाटपाच्या बाबतीतील युक्तिवाद सामान्य लोकांना पटणार नाही, असे लिहिले. व्ही० के० आर० व्ही० राव या अर्थशास्त्रज्ञांनी समाजवादावरील आपला विश्वास प्रथम नमूद करून, मग टिपण विचार करण्यासारखे ठरवले. धर यांची समजूत अशी होती की, आपल्या टिपणामुळे देशाच्या आर्थिक प्रश्नांच्या चर्चेला वाव मिळेल. तसे झाले नाही. राजकीय स्पर्धा तीव्र होत गेली. (*इंदिरा गांधी, द इमर्जन्सी अँड इंडियन डेमॉक्रसी*, पृष्ठे १११-१२)

१९६७ सालच्या निवडणुकीतील काँग्रेसचा अनेक राज्यांतला पराभव आणि अंतर्गत वाढता संघर्ष यांमुळे हक्सर व त्यांच्या भोवतीचे डावे यांनी चढाईचे धोरण अवलंबिले होते. मग बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. या आधी हक्सर यांनी मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ के० एन० राज तसेच पी० एन० धर यांना भोजनासाठी बोलावले होते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा विषय निघाला असता राज यांनी राष्ट्रीयीकरण झालेच पाहिजे, पण त्यासाठी गुप्तपणे सहा महिने तरी तयारी करणे आवश्यक असल्याचे मत दिले. त्यानंतर तीन दिवसांत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा झाली. याचा अर्थ असा की, एका मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञास सहा महिने तयारीसाठी हवे असे वाटत असले तरी राजकारणामुळे अशी मुदत न देता राष्ट्रीयीकरण झाले. आय० जी० पटेल या तेव्हाच्या अर्थखात्याच्या सचिवांनी, त्यांच्या आठवणींच्या पुस्तकात अशी माहिती दिली आहे की, डॉ. धनंजयराव गाडगीळ हे नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष होते आणि त्यांनी इंदिरा गांधींना दिलेल्या टिपणात, बँकांवरील सामाजिक नियंत्रणाच्या धोरणास काही अवधी देण्याची शिफारस करून राष्ट्रीयीकरणास पाठिंबा दिला नव्हता.

बँकांवर सामाजिक नियंत्रण होते व त्यास काही अवधी द्यावा ही मोरारजींची भूमिका होती आणि इंदिरा गांधी त्यांच्याशी प्रथम सहमत होत्या. बँकांचे राष्ट्रीयीकरण हेच समाजवादावरील निष्ठेचे द्योतक झाले असले तरी या मागणीबाबत केवळ मोरारजींना उत्साह नव्हता असे नाही. या संबंधात पंडित नेहरूंचे काय मत होते हे पाहणे उचित ठरेल. १९५७मध्ये कम्युनिस्ट नेते अजय घोष व नंबुद्रिपाद नेहरूंना भेटले असता त्यांच्यात जी बोलणी झाली, त्याचे टिपण नेहरूंनी तेव्हाचे गृहमंत्री गोविंदवल्लभ पंत यांना पाठवले होते. २ ऑक्टोबर ५७ या तारखेचे हे टिपण आहे. नेहरूंनी लिहिले की, अजय घोष व नंबुद्रिपाद भेटले व त्यांनी बँका व इतर अनेक उद्योग हे राष्ट्रीय मालकीचे करून पैसा गोळा करावा अशी सूचना केली. नेहरूंनी त्यांना हे सुज्ञपणाचे होणार नाही असे उत्तर दिले. गुंतवणुकीसाठी काही रक्कम हवी म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेची चौकटच विस्कळीत करायची आणि अधिक मोठ्या गुंतवणुकीत अडसर

निर्माण करायचा यात अर्थ नाही. आपल्या व्यापारी बँकांवर आमचे परिणामकारक नियंत्रण आजच आहे. यात थोडी भर घातल्याने काही फारसा फरक पडणार नाही. उलट आपल्या उद्योगधंद्यांत अडचणी येतील आणि भावी वाढीतही अडथळा येईल. आपल्या देशात नव्यानेच बँका सुरू झालेल्या नसून आपणांस ओनामा करायचा नाही. आज जी अवस्था आहे तिचाच उपयोग करून आपल्याला पुढील रचना करायची आहे. यात वेळोवेळी जे बदल आवश्यक असतील ते करता येतील. परंतु जो बदल (बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा) सुचवला आहे तो निदान काही काळ आपल्या अर्थव्यवस्थेत बरीच उलथापालथ घडवून आणील आणि उत्पादनयंत्रणेस धोका निर्माण होईल. (*सिलेक्टेड वर्क्स* खंड ३९, पृ० १२२) नेहरूंच्या या भूमिकेमुळे त्यांच्या समाजवादी निष्ठेबद्दल ज्यांना संशय घ्यायचा असेल, ते तसा घेण्यास अर्थातच मोकळे आहेत.

१९७१मध्ये बांगलादेशाचे युद्ध भारताने जिंकले होते. त्यानंतर ७२ सालात राज्यपातळीवर विधानसभांच्या निवडणुका व्हायच्या होत्या. त्या जिंकण्यासाठी काय करावे याबद्दल विचारविनिमय होत होता. एक दिवस इंदिरा गांधींनी धर यांना बोलावले, तिथे मोहनकुमार मंगलम् होते. इंदिरा गांधींनी धर यांना सांगितले की, टाटा आयर्न अँण्ड स्टील कंपनीचे राष्ट्रीयीकरण करण्याची मोहनकुमार मंगलम यांची सूचना आहे; यामुळे लोकांवर परिणाम होईल आणि निवडणुकीत काँग्रेसला मोठे यश मिळेल. धर म्हणाले की, टाटा कंपनी उत्तम चालली आहे. तिच्यामुळे सरकारी मालकीच्या पोलाद कंपन्यांत आपले उत्पादन सुधारण्याची ईर्ष्या निर्माण होईल. तेव्हा टाटा कंपनीचे राष्ट्रीयीकरण करणे हिताचे नाही. शिवाय बांगलादेश युद्धातील विजय हे निवडणूक जिंकण्याचे मोठे साधन ठरणार असल्यामुळे दुसऱ्या आकर्षणाची जरुरी नाही. (*इंदिरा गांधी, द इमर्जन्सी अँड इंडियन डेमॉक्रसी,* पृ० १०१-१०२)

इंदिरा गांधी डाव्या विचारसरणीवर निष्ठा ठेवून नव्हत्या. राजकारणासाठी त्यांनी ती स्वीकारली होती. काँग्रेसमधील व बाहेरील डावे चुकीची समजूत बाळगून होते. इंदिरा गांधींना गरिबांची गरिबी घालवण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे असे वाटत होते, यात शंका नाही. पण कोणत्याही सिद्धान्ताचे ओझे त्यांच्या खांद्यावर नव्हते. बँकांचे राष्ट्रीयीकरण इत्यादींबाबत यशवंतराव पहिल्यापासून आग्रही होते. हा मार्क्सवादाचा प्रभाव होता. यामुळे इंदिरा गांधींच्याही आधी त्यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केली होती. काँग्रेसने हे धोरण स्वीकारल्यावर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या वेळेला अर्थखाते यशवंतरावांकडे आले होते. संरक्षणखात्यात अगदी पहिल्या काळात ते काहीसे चाचपडत होते, तशीच अवस्था अर्थखात्याच्या बाबतीत झाली. पण नंतर ते त्यात रुळले. राष्ट्रीकृत बँकांचे अनेक प्रश्न होते. संसदेतील डावे, अशा बँकांची संख्या वाढवावी येथपासून या बँकांतील कर्मचाऱ्यांना अधिक संरक्षण व सोयी द्याव्या इत्यादी मागण्या करत, तर उजव्या विचारसरणीचे खासदार अनेक दोष दाखवत. या दोघांना यशवंतराव उत्तरे देत होते. संसदेतील त्यांच्या भाषणांवरून हे समजून येईल.

अर्थखाते काही काळ इंदिरा गांधी स्वत: सांभाळत होत्या तेव्हा त्यांनी नव्या धोरणानुसार मॅनेजिंग एजन्सी रद्द केली. यामुळे काही फरक पडला नाही. पण त्याचबरोबर त्यांनी मिरासदारी व अडवणुकीचे तंत्र वापरण्यास आळा घालण्यासाठी एका आयोगाची (मोनॉपोलिज अँड रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस कमिशन) स्थापना केली. कारखानदारीच्या क्षेत्रात कोणाचीही मिरासदारी असू नये हा हेतू होता. काही उद्योगपती सरकारी परवाने आपल्यालाच मिळतील यासाठी अनेक कारवाया करत होते. तेव्हा आर्थिक

सत्तेचे केंद्रीकरण थांबवण्यासाठी इंदिरा गांधींनी या आयोगाची स्थापना केली. पण यामुळे मोठ्या उद्योगपतींना मिळणाऱ्या औद्योगिक परवान्यांची संख्या विशेष प्रमाणात कमी झाली नाही. मिरासदारी थांबवण्याच्या धोरणामुळे नको असलेला एक परिणाम झाला. तो म्हणजे ज्यांच्याकडे भांडवल आणि तंत्रज्ञान होते, त्यांना नवे उद्योग सुरू करताना अडथळे येऊ लागले आणि प्रस्थापित धंद्याचीही वाढ करणे दुष्कर झाले. शिवाय कारखान्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचे प्रमाण वाढत होते आणि ते लक्षात न घेताना हा आयोग बंधने घालू लागला. आयोगावर नेमणूक झालेले अर्थतज्ज्ञ असतील, पण त्यांपैकी कोणाला कारखाने स्थापन करण्यापासून चालवण्याचा अनुभव नव्हता. याचे एक उदाहरण टाटांच्या मिठापूरच्या कारखान्याचे होते. त्यासाठी नव्वद एक कोटी खर्च येणार होता. तेव्हा एका कंपनीला बँकेकडून इतके कर्ज कसे द्यायचे, या घोळात काही काळ गेला आणि त्यामुळे प्रत्यक्ष कारखाना उभारण्याच्या वेळी अधिक खर्च आला. याबाबतीत इतका मंत्रचळेपणा दिसू लागला, की जर एखाद्या कारखान्याने कार्यक्षमता दाखवून उत्पादन वाढवले तर तो गुन्हा मानला जाऊ लागला. एकीकडे उत्पादनवाढीची घोषणा करताना, दुसरीकडे काही सैद्धान्तिक आग्रहापायी वाढीव उत्पादन हे गुन्ह्याच्या सदरात मोडत होते.

यशवंतराव मिरासदारीच्या विरुद्ध असल्यामुळे त्यांनी या आयोगाच्या उद्दिष्टाचे समर्थन मुंबई काँग्रेसच्या अधिवेशनात व इतर काही भाषणांत केले. ही त्यांची भाषणे 'भूमिका' या त्यांच्या संग्रहात समाविष्ट आहेत. सरकारला मिरासदारी नको होती तर परवाना-पद्धती रद्द करायची किंवा बरीच सुधारायची. पण त्याने अशा प्रकारची धोरणे स्वीकारली होती की, जे मिरासदार होते ते अधिक प्रबळ झाले आणि नव्याने कारखानदारीच्या क्षेत्रात शिरणाऱ्यांचा मार्ग मात्र कठीण होऊन बसला. एका भाषणात यशवंतरावांनी कच्चा माल तयार करणाऱ्या शेतकऱ्यास फारशी मिळकत होत नाही, पण त्या कच्च्या मालाचे कारखान्यात पक्क्या मालात रूपांतर झाले की, त्यास बरीच किंमत मिळते हे थांबले पाहिजे असे म्हटले होते. शेतकऱ्याच्या मालाला अधिक व वाजवी किंमत मिळाली पाहिजे याबाबत दुमत होणार नाही. पण त्यासाठी शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था व्हायला हवी. तशी ती सरकारने करावी किंवा खाजगीरीत्या होईल असे पाहावे. लहान दुकानदार वा गरीब शेतकरी यांना तारण देता येत नाही व व्याजाचा दर परवडत नाही, हे यशवंतरावांचे म्हणणे खरेच आहे. पण बँका राष्ट्रीय मालकीच्या झाल्यामुळेही यात बदल झाला नाही. चार टक्के व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज मिळावे, ही न्यायमूर्ती रानडे यांनी मागणी केली होती. ती बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊनही प्रत्यक्षात उतरली नाही व आजही तीच अवस्था आहे.

वास्तविक नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण जाहीर केले होते. इतकेच नव्हे, तर १९७० साली प्रा० धर यांनी इंदिरा गांधी यांची मुलाखत प्रसिद्ध केली तेव्हा त्यांनी संमिश्र अर्थव्यवस्थाच योग्य ठरवली होती. पण पक्षांतर्गत चढाओढीतून अधिकाधिक सरकारीकरणाचा मार्ग स्वीकारला गेला. यशवंतरावांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला असला तरी मोहनकुमार मंगलम्, डी० पी० धर, व इतर अति डावे ज्या सरसकट सरकारीकरणाचा आग्रह धरत होते, तसा त्यांनी धरला नाही. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांनी ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या कामात सहकारी बँका व सहकारी साखर कारखाने यांना प्राधान्य दिले आणि त्यामुळे काही ग्रामीण भागाचा विकास झाला आणि त्या भागाचे जीवन बदलत गेले. कृषि-उद्योग ही त्यांची कल्पना महत्त्वाची होती. पंजाबमध्ये वेगळ्या रीतीने ती अमलात

येऊन त्याने व नंतर हरयाणाने विकासाच्या कामात आघाडी मारली. पंजाबमध्ये कालव्याच्या पाण्याची सोय ही मोठी सुविधा होती; तसेच त्या राज्यातील निवृत्त सैनिकांचे मोठे प्रमाण हे आधुनिक शेतीला पूरक ठरले. हा विकास घडवून आणण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यासाठी कोणी वाट पाहिली नाही.

इंदिरा गांधी आपले संमिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण असल्याचे सांगत होत्या आणि त्याचबरोबर सरकारचा अर्थव्यवहारातला सहभाग वाढवण्याचे प्रयत्न करत होत्या. त्या वातावरणात यशवंतरावांनी केलेल्या एका भाषणात संयुक्त क्षेत्र असा शब्दप्रयोग वापरलेला दिसेल. पण त्याची फोड करताना ते म्हणाले की, संयुक्त क्षेत्राचा विकास म्हणजे सरकारी क्षेत्रात खाजगी भांडवलाचा भाग वाढवणे हा नसून खाजगी क्षेत्रात सरकारचा सहभाग वाढवण्याचे धोरण आहे. म्हणजे संमिश्र अर्थव्यवहार हळूहळू सरकारी होत जाणार. तथापि याही बाबतीत सरकारच्या धोरणात काही निश्चितता नव्हती. रशियन धर्तीच्या अर्थव्यवस्थेत सामुदायिक शेती येते. यशवंतरावांनी सामुदायिक शेती अव्यवहार्य असल्याचे मत पूर्वीच दिले होते. ते मूलत:च लोकशाही समाजवादी होते आणि नेहरूंप्रमाणे सामाजिक न्याय आणि लोकशाही प्रणाली यांची सांगड कशी घालायची या संबंधात दोघांच्याही मनात द्वंद्व चाललेले दिसेल. थोडक्यात म्हणजे इंदिरा गांधींच्या राजवटीत राजकीय व आर्थिक सत्तेचे जास्तीत जास्त केंद्रीकरण झाले. या केंद्रीकरणामुळे नोकरशाही मात्र वाढत गेली. कारण सरकारने ताब्यात घेतलेल्या बँका असोत, वा कारखाने असोत त्यांचा प्रमुख अधिकारीवर्ग वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांतूनच निवडला गेला. यशवंतरावांच्या मनात चालत असलेल्या द्वंद्वाची कल्पना त्यांच्या आणखी एका वक्तव्यावरून येऊ शकेल. इंदिरा गांधींनी ७१ सालच्या निवडणुकीनंतर व बांगलादेशाच्या निर्मितीनंतर अति डाव्या भूमिका घेणाऱ्या काही साहसवाद्यांना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व द्यायला सुरुवात केल्यावर, अनेक जुन्या काँग्रेसनेत्यांना यात धोका दिसू लागला होता. यामुळे जयंत लेले यांच्याशी बोलताना यशवंतरावांनी म्हटले की, एक दिवस आपली लोकशाही आपणच कम्युनिस्टांच्या हाती सोपवणार की काय, असे वाटते. यावरून ते लोकशाही समाजवादी होते आणि यात लोकशाही हा महत्त्वाचा घटक होता आणि सामाजिक कल्याण आणि संधीसमानता म्हणजे समाजवाद असे समीकरण त्यांनी बसवले होते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

सत्ताधारी पक्षाला सामान्य जनतेचे कल्याण व्हावे असे वाटत नव्हते, असे म्हणणे योग्य नाही. पण ते साधण्यासाठी केवळ सोव्हिएत धर्तीचेच नियोजन परिणामकारक होईल, हे गृहीतकृत्य बरोबर नव्हते. स्वीडन, नॉर्वे अशा देशांनी खरोखरच संमिश्र अर्थव्यवस्था राबवली आणि कल्याणकारी राज्य स्थापन केले. शिवाय हे करताना एकपक्षीय हुकूमशाही आणली नाही. संसदीय लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. बरे, ज्यांनी सोव्हिएत धर्तीच्या नियोजनाचा आदर्श ठेवला होता ते यशस्वी होत असल्याचा पुरावा नव्हता. स्टालिनच्या निधनानंतर क्रुश्चॉव अधिकारावर आल्यावर बुल्गानिन यांनी दिलेल्या अहवालात, रशियन नियोजनातील गंभीर दोष नमूद केले होते. पुढे क्रुश्चॉव यांच्या पदच्युतीनंतर ब्रेझनेव्ह यांनी क्रुश्चॉव्ह यांच्या राजवटीत विकासाची आकडेवारी किती खोटी होती, हे जगजाहीर केले आणि ब्रेझनेव्ह यांच्या काळातही अशाच खोट्या आकडेवारीचा आश्रय घेतल्याचे आन्द्रपॉव यांनी नमूद केले. हे केवळ सोव्हिएत युनियनमध्येच होत होते असे नाही, तर चीन व पूर्व युरोपमधील सर्व कम्युनिस्ट देशांत हेच चित्र होते. चीनमध्ये माओच्या सांस्कृतिक क्रांतीच्या पिसाटपणामुळे व दुष्काळामुळे कित्येक लाख लोक मरण पावले होते. तेव्हा चीन हाही आदर्श ठरू शकत नव्हता. आपले राज्यकर्ते यांपैकी कशाचीच दखल



चक्रवर्ती राजगोपालचारी, यशवंतराव, आण्णा दोराई व मान्यवर

न घेता सरकारीकरण अधिकाधिक व्यापक करण्यामुळे समाजवाद येईल आणि लोककल्याण साधेल अशी स्वप्ने रंगवीत होते. डी० पी० धर यांनी तर भारताचे नियोजन व सोव्हिएत युनियनचे नियोजन यांची सांगड घालण्याची सूचना केली होती. आपल्याकडे संसदीय लोकशाही असता एकपक्षीय हुकूमशाहीखालील नियोजनाशी कशी सांगड घालायची, याचाही विचार त्यांना करावासा वाटला नाही. तथापि सोव्हिएत नेत्यांनी तो केला आणि तुमची व आमची समाजस्थिती सारखी नाही तेव्हा तुम्ही हा मार्ग स्वीकारणे रास्त होणार नाही, असे त्यांनी धर यांना स्पष्टपणे सांगितले.

बँका राष्ट्रीय मालकीच्या करण्यासाठी जी व जेवढी पूर्वतयारी करायला हवी होती ती केली गेली नाही. नंतर राजकारणाचा हस्तक्षेप वाढत गेला. याचे उदाहरण केंद्रीय अर्थसचिव आय० जी० पटेल यांनी त्यांच्या आठवणीच्या पुस्तकात दिले आहे. हे १९७२च्या निवडणुकीच्या आधीचे आहे. पटेल सांगतात की, येऊ घातलेल्या निवडणुकीमुळे आपल्यावर प्रचंड दडपण येऊ लागले होते. अर्थसचिवास निदान नकार देण्याचा मोठा अधिकार असतो. पण या वेळी एल० एन० मिश्र यांच्याकडून दडपण येत व वाढत

होते. ते काँग्रेसचे खजिनदार होते आणि पंतप्रधान इंदिरा गांधी त्यांच्या मागे होत्या, हे सर्वांना माहीत होते. मिश्र यांच्याकडून सतत कोणत्या ना कोणत्या कंपनीला मेहरबानी करण्यासाठी आपल्याकडे फायली येत असत आणि आपण घरी असो वा कार्यालयात काम करत असो, मिश्र फोनवर आपल्याला व्याख्यान देत असत. हे जेव्हा अति झाले तेव्हा पटेल सांगतात, ते अर्थमंत्री यशवंतरावांकडे गेले आणि त्यांना, त्यांनी परिस्थिती समजावून सांगितली. आपण या फायली सरळ तुमच्याकडे धाडू काय, असे विचारले तेव्हा चव्हाण म्हणाले की, तुम्ही ज्या रीतीने ही कामे करता तशीच करत राहा. पण कोणत्याही कारणास्तव मीच फायलींचा निर्णय करावासा वाटले, तर माझ्याकडे धाडताना स्वतंत्र कागदावर तुमचे मत लिहून द्या. तिसरा मार्ग म्हणजे अशा फायली निवडणूक होईपर्यंत कुलुपबंद करा. निवडणुकीनंतर कोणाच्या त्या लक्षात नसतील. हे सांगून पटेल विचारतात, चव्हाण हे रंगतदार नाहीत असे कोण म्हणेल? आणि आज असे बोलणारे किती मंत्री असतील? (*ग्लिम्पसेस ऑफ इंडियन इकॉनॉमिक पॉलिसी*, पृ० १४७)

अनेक राज्यांत काँग्रेस अधिकारावर नव्हती, पण ज्या आघाड्या राज्यावर येत होत्या आणि बुडत होत्या त्यामुळे लोक विटले असणार हा इंदिरा गांधींचा अंदाज अचूक ठरला. त्यांनी लोकसभेची निवडणूक एक वर्ष अगोदर घेतली. संघटना काँग्रेसने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला, 'चरखा' हे निवडणूक चिन्ह वापरण्यास बंदी करावी असे अर्ज केल्यामुळे 'गायवासरू' हे चिन्ह घेण्यात आले. मतदारांनी या चिन्ह-बदलाची दखल घेतली नाही. संघटना काँग्रेस व संयुक्त समाजवादी पक्षांनी 'इंदिरा हटाव' ही घोषणा दिली होती, तर इंदिरा गांधींनी 'गरिबी हटाव' ही घोषणा पसंत केली. तिचा प्रभाव पडला आणि लोकसभेत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला ३५२ जागा मिळवून दिल्या. लोकमत केवळ संघटना काँग्रेसच्याच विरुद्ध गेले नाही तर सर्व विरोधी पक्षांच्या ते विरोधी गेले. महाराष्ट्रात १९६७ साली काँग्रेसला देशात प्रतिकूल हवा असतानाही चांगले यश मिळाले होते आणि बदललेल्या वातावरणात महाराष्ट्रातून लोकसभेच्या तेव्हाच्या ४४ पैकी ४३ जागा काँग्रेसने जिंकल्या. लोकसभेत जनसंघाच्या जागा ३५वरून २२ वर आल्या. स्वतंत्र पक्षांचे ४४ होते ते ८ वर आले आणि बिगर-काँग्रेसवादाचा पुरस्कार करणाऱ्या संयुक्त समाजवादी पक्षाचे खासदार १३ होते त्यास दोनांवर समाधान मानावे लागले. या पक्षांच्या मानाने कम्युनिस्ट पक्षाच्या २३ जागा टिकून राहिल्या तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १९ जागांवरून २५ वर मजल मारली. तामिळनाडमध्ये द्रविड मुन्नेत्र कळहमने कामराज यांच्या संघटना काँग्रेसचा पराभव केला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ इतके झाले की, घटनादुरुस्ती करण्यासाठी दोन्ही कम्युनिस्ट पक्ष वा इतर पक्षांची मदत घेण्याची तिला गरज राहिली नाही. विरोधकांचे निवडणूक निकालासंबंधीचे अंदाज चुकले आणि इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण इत्यादींच्या अपेक्षेबाहेर काँग्रेसला विजय प्राप्त झाला.

ही निवडणूक होण्यापूर्वी काँग्रेसमधील डाव्यांनी घटनादुरुस्ती करण्यासाठी नवी घटनासमिती बोलावण्याची मागणी अनेकदा केली होती. इंदिरा गांधींनी ती त्याज्य ठरवली. आपल्याला या प्रकारची मनोवृत्तीच पसंत नसून लोकशाहीला वळसा घालण्यास आपला विरोध असल्याचे त्यांनी जाहीर केले. या प्रकारच्या कम्युनिस्ट पक्षाच्या मागणीला आपण विरोध केला होता तसाच आपल्याच पक्षातल्या काही जणांच्या मागणीला करू असा निर्वाळा त्यांनी दिला. आता लोकसभेत दोन तृतीयांशाहून अधिक संख्या झाल्यावर, इंदिरा गांधींनी घटनेतील एकामागोमाग एक दुरुस्त्या मंजूर करून घेतल्या. त्यांनी अगोदर सर्वसाधारण विमाव्यवसायाचे राष्ट्रीयीकरण केले. त्या अगोदर नेहरूंच्या कारकिर्दीत आयुर्विम्याचे

राष्ट्रीयीकरण झाले होते. घटनेत नमूद केलेल्या मूलभूत अधिकारांत दुरुस्ती करण्याचा संसदेला अधिकार असल्याची पहिली दुरुस्ती केली व सर्वोच्च न्यायालयाचा अगोदरचा निर्णय बाद ठरवला. सार्वजनिक कारणासाठी कोणतीही मालमत्ता ताब्यात घेण्याचा आणि त्यासाठी किती भरपाई द्यायची हे ठरवण्याचा अधिकारही संसदेला मिळवून घेण्यात आला. घटनेत काही मार्गदर्शक तत्त्वे ग्रथित केली होती, ती सर्वोच्च न्यायालय बदल करू शकत नाही, अशीही दुरुस्ती झाली. या रीतीने घटना समिती न बोलावता अनेकविध दुरुस्त्या झाल्या.

हे घटना दुरुस्तीचे प्रकरण पुढे अधिकच वाढत गेले. आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधी व त्यांचा काँग्रेस पक्ष पराभूत झाला व त्यात कायदामंत्री हरिभाऊ गोखले हेही पराभूत झाले. त्यानंतर मी गोखले यांना भेटलो तेव्हा ते म्हणाले की, घटनादुरुस्ती ही आमच्या पक्षाने सवंग बनवली. पिठाच्या गिरणीत एका बाजूने धान्य टाकावे व दुसऱ्या बाजूने पीठ घ्यावे असे आमचे चालले होते; हे सांगून हरिभाऊ गोखले आपल्या हतबलतेची कबुली देत होते.

लोकसभेच्या निवडणुकीतील प्रचंड यशामुळे इंदिरा गांधींचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले. या पाठोपाठ पूर्व पाकिस्तानात राजकीय पेचप्रसंग निर्माण झाल्यामुळे नव्या सरकारला म्हणजे इंदिरा गांधींनी, त्या संबंधात सावध होऊन आवश्यक ती तयारी करणे निकडीचे झाले. पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या व त्यानंतर लष्कराच्या निर्घृणतेमुळे लाखो निर्वासित भारतात येत होते. त्यांची सोय करताना भारताच्या अर्थव्यवस्थेवरील ताण वाढत चालला. निर्वासितांसाठी म्हणून अमेरिका व इतर काही देशांनी मदत केली, ती गरजेच्या मानाने अगदीच थोडी होती. पाकिस्तान काही लष्करी कारवाई करण्याचा संभव असल्यामुळे आपली लष्करी सिद्धता वाढवणे आवश्यक होते.

पूर्व पाकिस्तानातील पेचप्रसंग जनरल याह्याखान व झुल्फिकार अलि भुत्तो यांच्या दुराग्रहामुळे वाढत जाऊन पूर्व पाकिस्तानी लोकांनी उठाव केला आणि भारतीय सैन्याला लष्करी हस्तक्षेप करणे अनिवार्य होऊन बसले. त्यातच रिचर्ड निक्सन व त्यांचे सुरक्षा सल्लागार डॉ० हेन्री किसिंजर यांनी पाकिस्तानला पाठिंबा देऊन भारतविरोधी धोरण अवलंबिल्यामुळे, याह्याखान आणि भुत्तो हे दोघेही अनिर्बंधपणे वागू लागले. या संघर्षात पाकिस्तानचा पराभव होऊन पाकिस्तानपासून पूर्व पाकिस्तान अलग होऊन, बांगलादेश म्हणून नव्या अवतारात वावरू लागले. या युद्धाच्या संबंधात इंदिरा गांधी यांनी दाखवलेल्या राजकीय नेतृत्वामुळे त्यांचे केवळ काँग्रेसमध्ये नव्हे, तर देशातील स्थान अतिशय बळकट झाले. जनसंघाचे नेते अटल बिहारी बाजपेयी यांनी इंदिरा गांधींचा 'दुर्गा' म्हणून गौरव केला.

यामुळे काँग्रेस पक्षात इंदिरा गांधींना पर्याय राहिला नाहीच, पण त्यांना काही वेगळ्या प्रकारचा सल्ला देणेही अशक्य होऊन बसले. सरदार पटेल यांचे निधन व राजगोपालचारी यांचा काँग्रेस पक्षाचा त्याग, यामुळे पंडित नेहरू यांची स्थिती अशी झाली होती. परंतु नेहरू हे मुळातच निर्घृण वृत्तीचे नव्हते. त्यामुळे ते पक्षात जितके जमवून घेता येईल तितके घेत होते. नेहरूंनी ठरवले असते तर अनेक वेळा ते कोणाला न विचारता काही धोरणे अमलात आणू शकले असते, पण ते लोकशाही समाजवादी होते. हे केवळ सोयीसाठी पत्करलेले तत्त्व नव्हते तर त्यांची वृत्तीच तशी होती. उलट इंदिरा गांधी या लहानपणातील अनुभवांमुळे संशयग्रस्त बनल्या होत्या आणि असुरक्षिततेची त्यांची भावना पक्की रुजलेली होती. यामुळे बांगलादेशाच्या युद्धानंतर आपल्याला कोणी प्रतिस्पर्धी राहिला नाही, यावर समाधान न मानता नव्या परिस्थितीत आपल्याविरुद्ध अधिकच कट व कारस्थाने होऊ लागतील असे त्या मानू लागल्या.



सहकार महर्षी वसंतरावदादा पाटील यांच्यासमवेत

बांगलादेशाच्या युद्धाच्या अगोदर ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांशी झालेल्या संघर्षात, आपण डावा कार्यक्रम स्वीकारल्यामुळे यशस्वी झालो असा त्यांचा ग्रह झाला होता आणि त्या काळात काँग्रेसमधील डावे व कम्युनिस्ट पक्ष सोडून आलेले जहाल, यांनी इंदिरा गांधींच्या भोवती कोंडाळे केले. मग आपल्या अधिकारास कसलाच अडथळा येऊ नये यासाठी त्यांनी पक्षाचे शुद्धीकरण सुरू केले आणि राज्यघटना दुरुस्त करून केंद्र सरकारच्या हाती सत्ता अधिकच केंद्रित केली. पक्षात व सरकारात दरबारी वातावरण तयार झाले. ते कसे होते, हे पी० एन० धर यांनी वर्णन केले आहे. ते सांगतात की, दोन प्रकारचे दरबारी असतात. एक प्रकार हा काही कल्पना असलेल्यांचा असतो. हे लोक राष्ट्रीय प्रश्नासंबंधी काही उपाय शोधण्याचा प्रयत्न करून आपले व आपल्या गटाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याच्या उद्योगात असतात. असाच एक गृहस्थ होता. तो इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ या संस्थेत बराच वेळ खर्च करून, इतरांनी आर्थिक विषयांवर जे लिहिले असेल त्याची गोळाबरीज करून स्वत:चे विचार म्हणून इंदिरा गांधींना निवेदन देत असे. धर यांना याच गृहस्थाने सांगितले, की इंदिरा गांधींना काही विचारांपेक्षा ते सांगणाऱ्या व्यक्ती महत्त्वाच्या वाटतात. हा गृहस्थ नंतर एका राज्यात मंत्री झाला.

दुसरा प्रकार परिस्थितीसंबंधी माहिती गोळा करणारांचा. असे इतर लोक कसे वागतात, कुठे काय कुजबूज चालू आहे, कोणत्या अफवा पसरलेल्या आहेत आणि कोणाचे काय हेतू आहेत, इत्यादींची माहिती देत. या लोकांपाशी चिकित्सक बुद्धी नव्हती. इंदिरा गांधींना हे दुसऱ्या प्रकारचे लोक जवळचे

वाटत. (*इंदिरा गांधी द इमर्जन्सी अ‍ॅन्ड इंडियन डेमॉक्रसी*, पृष्ठे १३५-३६). नंदिनी सत्पथी या अशा दुसऱ्या वर्गात मोडत असल्याचे त्या काळात दिल्लीत बोलले जात असे.

काँग्रेस पक्षातील वातावरण बांगलादेशाच्या युद्धापूर्वीच बदलू लागले होते आणि या युद्धानंतर तर त्यात आमूलाग्र बदल झाला. यामुळे इंदिरा गांधींनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या रचनेतच नव्हे, तर मंत्र्यांच्या अधिकारांतही बदल केले. पंतप्रधानांचे कार्यालय हे अतिशय प्रबळ झाले आणि त्याचे प्रमुख हक्सर यांनी पंतप्रधानांच्या हाती सत्ता केंद्रित करण्याची सीमा गाठली. हक्सर यांची प्रामाणिक समजूत होती की, या प्रकारे सत्तेचे केंद्रीकरण झाले नाही तर देश एकसंध राहणार नाही आणि विकासही होऊ शकणार नाही. म्हणून त्यांनी केंद्रीय मंत्री व राज्यपातळीवरचे मुख्यमंत्री यांचे अधिकार जितके कमी करता येतील तितके केले. गृह व अर्थ खात्यांतील काही विभाग पंतप्रधानांकडे आले ते या उद्देशाने. गृह खात्याचा परराष्ट्र गुप्तहेर विभाग पंतप्रधानांकडे गेला तसेच अर्थमंत्री व पंतप्रधान हे नेमणुका करण्याच्या समितीचे सभासद असत. पण दोघांच्या या समितीत यशवंतरावांच्या सूचना इंदिरा गांधी लक्षात घेईनाशा झाल्या. मग यशवंतराव सूचना करीनासे झाले आणि थोड्या दिवसांनी त्यांनी या समितीच्या बैठकीला हजर राहण्याचे सोडून दिले, अशी माहिती त्यांचे सचिव माधवराव गोडबोले यांनी त्यांच्या *अपुरा डाव* या पुस्तकात दिली आहे. पी० एन० धर यांनी, यशवंतराव अनेकदा मत देत नसल्याचे म्हटले आहे. पण बदलेल्या राजकारणाचा आणि कार्यपद्धतीचा हा परिणाम होता.

या सुमारास महाराष्ट्रात एक नवा वाद निर्माण झाला होता. सहकारी क्षेत्राबद्दल काहीजण बरेच नाराज होते. या क्षेत्रातल्या लोकांच्या हाती आर्थिक सत्ता बरीच असून ते राजकीय बाबतींतही वरचढ होण्याची भीती काहींना वाटत होती. काही मंत्र्यांना यामुळे आपल्या अधिकारास व आसनासच धोका निर्माण होणार असे वाटू लागले. यातून मग सहकारी क्षेत्राची पुनर्रचना करण्याची कल्पना पुढे आली. ती अमलात आणण्याचा उपाय म्हणून सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची मुदत सहा वर्षे राहील अशी कायदेशीर तरतूद करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. यामुळे सर्वांत अधिक वसंतदादा संतप्त झाले. आपल्याला दुर्बळ करण्याची ही खेळी असल्याचा त्यांचा समज होऊन त्यांनी सहकारी क्षेत्रातल्या इतर प्रमुखांना एकत्र आणले. दादांचा एक मुद्दा दुर्लक्ष करण्यासारखा नव्हता. त्यांचे असे म्हणणे होते की, सहकारी साखर कारखाना उभारण्यास तीनएक वर्षे लागतात व मग उत्पादन सुरू होते. यामुळे साखर कारखान्याचा अध्यक्ष व संचालक तीन वर्षेच खऱ्या अर्थाने अधिकारावर राहतात आणि हे अन्यायकारक आहे.

वास्तविक हा वाद प्रदेश-पातळीवर सुटायला हरकत नव्हती. पण तडजोड करण्यास कोणी पुढे येईना. या वादाच्या काळात वसंतदादांनी मला सांगितले की, वाद मिटला नाही तर डॉ० धनंजयराव गाडगीळ यांनी आपल्याला दिलेल्या सल्ल्याप्रमाणे जावे लागेल. हा सल्ला असा होता की, सहकारी कार्यकर्त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून आपला वेगळा पक्ष स्थापन करायचा. इंग्लंडमध्ये सहकारी कार्यकर्ते मजूर पक्षाशी सहकार्य करतात, पण ते स्वतंत्रपणे निवडून येतात आणि आपले वर्तन व धोरणस्वातंत्र्य टिकवतात. महाराष्ट्रात असेच करता येईल. यावर मी दादांना सांगितले की, इंग्लंडमधील सहकारी क्षेत्रातले दोन-तीन जण निवडणूक लढवतात. ब्रिटिश मजूर पक्ष सहकार क्षेत्रावर नव्हे, तर कामगार संघटनांवर अधिक अवलंबून असतो. तुम्ही काँग्रेसमधून बाहेर गेलात तर पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस सहकार क्षेत्रावर मुख्यत: अवलंबून असल्यामुळे तिचे भवितव्य लगेच नसले तरी थोड्या काळात

धोक्यात येईल. हे सर्व प्रकरण मग यशवंतरावांकडे गेले आणि सहकारी क्षेत्रातल्या प्रमुख पुढाऱ्यांची बैठक वसंतराव नाईक यांच्या निवासस्थानी झाली. यात दोन्ही मतांचे लोक होते. अखेरीस तडजोड झाली आणि पदाधिकाऱ्यांची मुदत सहा ऐवजी दहा वर्षांवर नेण्याची दुरुस्ती मान्य झाली.

१९७१ सालच्या निवडणुकीच्या वेळी विरोधकांनी 'इंदिरा हटाव' अशी घोषणा केली होती तर इंदिरा गांधींनी 'गरिबी हटाव' अशी प्रतिघोषणा केली होती. निवडणुकीत विरोधक इंदिरा गांधींना हटवू शकले नाहीत आणि निवडणुकीत प्रचंड बहुमत पडल्यावरही गरिबी हटाव ही घोषणा प्रत्यक्षात उतरवणे सहजसाध्य नाही, हे इंदिरा गांधी व त्यांच्या पक्षाच्या लक्षात आले. सर्वात मोठा प्रश्न धान्याच्या टंचाईचा होता. बांगलादेशाच्या निर्वासितांमुळे मर्यादित धान्यसाठा संपत आला. यामुळे ठिकठिकाणी धान्याची लूट होऊ लागली. इतरही जीवनावश्यक वस्तूंची टंचाई होती. धान्याच्या उत्पादनातील घट ७२-७३ सालात आठ टक्क्यांची होती. तेलउत्पादक देशांनी तेलाच्या किंमती वाढवल्यावर स्थिती अधिकच बिघडली. कारण तेलाच्या किंमती वाढल्यावर आयातीवर एक अब्ज डॉलर्स इतका जास्त खर्च होऊ लागला. एकंदर किमतीत ७३ साली वीस टक्क्यांनी वाढ झाली. औद्योगिक उत्पादनातही घट झाली. धान्यआयातीमुळे परकी चलनाच्या गंगाजळीवर ताण वाढला. पुढील वर्षी ती तीस टक्क्यांवर गेली. पण डाव्या व सामान्य लोकांना आकर्षित करणाऱ्या घोषणा म्हणजे सरकारी धोरण, असे समीकरण बांधण्यात आले. कोणत्याही अर्थमंत्र्यावर येऊ नये अशी वेळ यशवंतरावांवर आली होती आणि संसदेतील प्रक्षुब्ध खासदारांच्या सरबत्तीला त्यांना तोंड द्यावे लागत होते.

इतर कोणी त्या वेळच्या परिस्थितीचे वर्णन केलेले पाहण्यापेक्षा, स्वतः यशवंतरावांनीच आपल्या रोजनिशीत काय लिहून ठेवले होते ते पाहणे युक्त होईल. ७२-७३ सालाबद्दल ते लिहितात, ''७१ सालापासून आर्थिक आपत्तीचे सत्र सुरू आहे. ते संपण्याची लक्षणे अजून पूर्ण दिसत नाहीत. किमतीची वाढ कमालीची झाली आहे.जनमानसात असंतोष आहे. समजुतीने त्याने सहकार्य केले आहे.परंतु अधून मधून मीही अस्वस्थ होतो व धोरणाची एकसारखी तपासणी करीत राहतो. चलनपुरवठा वाढला हे एक कारण आहे. त्याचे दोन भाग : (१) अतिरिक्त गव्हर्नमेंट स्पेन्डिंग (सरकारी खर्च). एक्झॉस्टिव्ह क्रेडिट सिस्टिम. पहिल्याबद्दल मी पराकाष्टा करतो.

तथापि महाराष्ट्र काँग्रेसमध्येही चलबिचल होऊ लागली होती. परंतु डिफेन्सवरचा खर्च आणि राज्याराज्यांतील नैसर्गिक आपत्तीवरील खर्चास आळा घालणे कठीण झाले. या वर्गात केरळ, राजस्थान ही नेहमीची राज्ये आहेत. याबाबतीत आंध्र, यु० पी० या शेवटच्या महिन्यात काय करतात ते पाहावयाचे. दुसऱ्याबाबत क्रेडिट सिस्टिम रिझर्व बँकेने नोव्हेंबरमध्ये लावलेला तो नियम लावावा. परंतु या देशात कुठलीही गोष्ट नवी केली की, आरडाओरडा करण्याची सवय आहे. गेले दहाबारा दिवस उत्पादन घटले; बंद झाल्याच्या तक्रारी येऊन राहिल्या आहेत. क्रेडिट सिस्टिमचे उद्देश (प्रॉपर एंडयुज क्रेडिट (२) स्पेक्युलेटेड क्रेडिट युज (३) इन्व्हेन्टरीवर बंधने. परंतु जो पब्लिक सेक्टर गणला जातो, त्यावर बंधने आणण्याचा वा उत्पादन आणि निर्यात व्यापार रोखण्याचा प्रश्नच नाही. उलट त्याला मदत व्हावी हा प्रयत्न राहील.

भाववाढीच्या व टंचाईच्या वातावरणात आमचे सर्व प्रयत्न फुकट जात आहेत. गेल्या तीन वर्षांत ज्या प्रमाणात धनराशी उभारण्याचे मी प्रयत्न केले, तेवढे त्या पूर्वी दहा वर्षांत क्वचित झाले असतील. नॉन-प्लॅन खर्च आणि संरक्षण आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती व राज्यसरकारांची ओढाताण

यावरील खर्च बेसुमार होत आहे. राज्यांच्या ओव्हरड्राफ्टवर नियंत्रण घालून घोडे काहीसे काबूत आणले. परंतु त्यातूनही निसटण्याचा प्रयत्न केरळसारखी राज्ये करीत आहेतच. बहात्तर साली रब्बीची योजना आक्रमक पद्धतीने आखावी म्हणून दोनशे कोटी बजेटच्या बाहेर अधिक दिले. पैसे खर्च झाले पण त्या वर्षीचे रब्बीचे पीक त्या प्रमाणात हाती आले नाही. या सर्व आपत्तींमुळे आर्थिक अरिष्टाची परिस्थिती गेले वर्षभर राहिली. या वर्षी ऑइलच्या प्रश्नांनी या आगीत तेल ओतून समस्या अधिकच गंभीर केली आहे.

१९७३चे वर्णन श्री० रजनी कोठारीने जे केले आहे ते अर्थपूर्ण आहे. तो म्हणतो : १९७३मध्ये विशेष काही घडले नाही. विविध गटांत अस्वस्थतेची भावना वाढत्या प्रमाणात आहे. या अस्वस्थतेची दोन रूपे आहेत. (१) राज्याच्या कारभाराबद्दल असंतोष (२) प्रचलित विचारपद्धतीविषयी भ्रमनिरास. (इंग्रजीचे हे मराठी रूपांतर आहे). राजकीय, आर्थिक क्षेत्राकडे नजर टाकली तर त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या मन:स्थितीचे हे वास्तव चित्रण म्हटल्यास हरकत नाही.'' (*विरंगुळा*, पृष्ठे १३६-३८)

अशा या वातावरणात इंदिरा गांधी यांच्या भोवतीचे जहाल अधिकाधिक सत्तेच्या केंद्रीकरणाचा सल्ला देत होते आणि त्यांनाही तो मानवणारा होता. म्हणून मग राजस्थान, आंध्र प्रदेश, आसाम व मध्यप्रदेश यांच्या मुख्यमंत्र्यांच्या जागी इंदिरा गांधींनी दुसऱ्यांची नेमणूक केली. तशी करताना ज्यांना नेमायचे त्यांना कठीण होत चाललेल्या परिस्थितीला तोंड देण्याची कुवत आहे की नाही हे पाहिले नाही. ज्यांना त्यांच्या राज्यात काही राजकीय पाठबळ आहे, ते डोईजड होऊ नयेत हा विचार प्रधान ठरला. मुख्यमंत्री दुबळा चालेल, पण तो आपल्या हाताबाहेर जाता कामा नये ही दृष्टी ठेवून हे बदल झाले. साहजिकच जेव्हा दुष्काळ, धान्यटंचाई इत्यादीमुळे लोकांत असंतोष वाढून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा हे मुख्यमंत्री गडबडले. पुढे ७२ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या याद्या करण्याची वेळ आली. तोपर्यंत महाराष्ट्रातून जाणाऱ्या अशा याद्या बहुतांशाने तशाच्या तशा पसंत होऊन परत येत. आता छाननी सुरू झाली. बरेच मोठे बदल होण्याचा संभव निर्माण झाला होता. पण द्वारकाप्रसाद मिश्र हे इंदिरा गांधींच्या तेव्हा निकटच्या वर्तुळात होते, त्यांनी हे बदल टाळले.

सरकारच्या हाती आर्थिक सत्ता एकवटण्याचे प्रयत्न कमी न होता वाढू लागले होते. यामुळे कलकत्त्यानजीक कॉंग्रेसचे अधिवेशन झाले तेव्हा घाऊक धान्यव्यापार सरकारने हाती घेण्याचा ठराव मंजूर झाला. या बाबतीतही सखोल विचार व विश्लेषण केले नव्हते. हा ठराव झाल्याबरोबर धान्य गायब होऊ लागले आणि धान्यटंचाई वाढत गेली. धान्यव्यापाराची माहिती असलेल्या कॉंग्रेसजनांना, पक्षाच्या अधिवेशनात गप्प करण्यात आले होते. पण तेच कॉंग्रेसजन बरोबर असल्याचे लगोलग दिसून आले. देशाच्या अनेक भागांत आणि मोठ्या शहरांत धान्यासाठी दंगली होऊ लागल्या. कॉंग्रेस पक्षाची पुनर्रचना करून त्यास नवे स्वरूप देण्याच्या उद्देशाने पक्षांतर्गत निवडणुका घेण्यात आल्या. पण बनावट मतदारयाद्या व मतदान यांबद्दल तक्रारींचा पाऊस पडल्यावर निवडणुकी रद्द झाल्या.

मग कॉंग्रेसमधील नव्या जहालांचा मोर्चा सर्वोच्च न्यायालयाकडे वळला. इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसला ७१ सालच्या निवडणुकीत लोकसभेत जोमदार मताधिक्य मिळाल्यावर, सरकारने घटनेतील मूलभूत अधिकारांत दुरुस्ती केली होती आणि न्यायालयाचा अधिकार रद्द केला होता. पण यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्यावर, सरन्यायाधीश एस० एम० सिक्री यांनी त्यांच्यासह तेरा न्यायाधीशांच्या न्यायपीठाकडे हे प्रकरण सोपवले. याबाबत न्यायमूर्तीत सहा व सहा अशी विभागणी झाली तेव्हा सरन्यायाधीशांनी आपले निर्णायक मत सरकारी कायद्याच्या विरुद्ध दिले. या निकालानंतर दुसऱ्या




माथाडी कामगार मेळावा

दिवशी ते निवृत्त झाले. मग नव्या सरन्यायाधीशाची नेमणूक, तोपर्यंतच्या प्रथेप्रमाणे ज्येष्ठताक्रमाने व्हायला हवी. पण इंदिरा गांधींनी वरच्या सहा न्यायाधीशांना डावलून ए० एन० रे यांची नेमणूक केली. त्यांनी सरकारच्या बाजूने मत दिले होते. यामुळे तीन न्यायमूर्तींनी राजीनामे दिले. मोहनकुमार मंगलम् यांनी यापूर्वीच न्यायाधीश हे सरकारला एकनिष्ठ असले पाहिजेत असे प्रतिपादून, आपल्या कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीची झलक पुन्हा एकदा दाखवून दिली. हक्सर यांना सरकारी नोकर हेही सरकारी धोरणाशी एकनिष्ठ हवे होते. म्हणजे संसदीय प्रणालीच्या मुख्य तत्त्वांना हे दोघेही मूठमाती द्यायला निघाले होते.

ललित नारायण मिश्र हे परराष्ट्र व्यापार खात्याचे मंत्री होते. त्यांनी कॉंग्रेस पक्षासाठी निधी जमवण्याकरिता आपल्या खात्याचा कसा उपयोग चालवला होता, याचे एक उदाहरण आय० जी० पटेल यांच्या आठवणींत नमूद केले आहे व त्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. याच सुमारास मिश्र व हरयाणाचे मुख्यमंत्री बन्सीलाल यांनी संजय गांधी यांना सर्व प्रकारे पुढे आणण्याचा चंग बांधला होता. म्हणून मग संजय गांधींचे छोट्या मोटारींच्या कारखान्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी, गुरगाव या हरयाणाच्या हद्दीतील गावात बरीच मोठी जमीन स्वस्तात देण्यात आली. या व अशाच प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणे उजेडात येत असताना, देशात महागाई, टंचाई आणि बेकारी यांमुळे असंतोष वाढत होता. या आर्थिक परिस्थितीत इंदिरा गांधींना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे आर्थिक मदतीची मागणी करणे भाग झाले. त्याच्या अटी पाळायच्या तर आर्थिक धोरणात बदल करणे आवश्यक होते. अर्थात तसा तो करण्याची पंतप्रधानांची तयारी होती. या स्थितीत देशाच्या हिताच्या दृष्टीने एक गोष्ट घडली. ती म्हणजे पी० एल० ४८० या कायद्याखाली अमेरिकेतून घेतल्या जाणाऱ्या धान्याच्या विक्रीतून तयार झालेल्या प्रचंड गंगाजळीबद्दलचा करार. या कायद्याखाली आयात केलेल्या धान्याच्या विक्रीतून मिळणारी रक्कम एका

वेगळ्या खात्यात ठेवण्याचा आणि त्या रकमेचा विनिमय करण्याबद्दल अमेरिका व भारत यांच्या सरकारने योजना ठरवण्याचा करार झाला होता. यामुळे भारत सरकारला ही रक्कम खर्च करता येत नव्हती आणि अमेरिकेलाही तिचा उपयोग नव्हता. तेव्हा विनिमयाबद्दलच्या वाटाघाटी दिल्लीत व वॉशिंग्टनमध्ये होत राहिल्या. यशवंतराव अर्थमंत्री झाल्यावर या वाटाघाटींना गती मिळाली. अखेरीस दोन्ही सरकारांत एकमत होऊन करार झाला. त्यानुसार अमेरिकन वकिलातीच्या खर्चासाठी काही भाग ठेवण्याचे ठरले. तसेच अमेरिकन सरकारचे काही संशोधन इत्यादी उपक्रम होते त्यांच्यासाठीही तरतूद केली गेली आणि बाकीची रक्कम वापरण्यास भारतास मोकळीक मिळाली. यशवंतरावांची अर्थमंत्रिपदांची कारकीर्द संपत येण्याच्या सुमारास त्यांना हे यश मिळाले.

कामराज पुन्हा कॉंग्रेसमध्ये परतण्याच्या विचारात असल्याचे वृत्त या सुमारास प्रसिद्ध झाले. एकीकडे इंदिरा गांधी व दुसरीकडे द्र० मु० क० या दोघांशी आपण संघर्ष करू शकत नाही, हे त्यांनी ओळखले आणि म्हणून ते या निर्णयास आले. या संबंधात यशवंतरावांनी रोजनिशीत लिहिले : 'डी० एम० के०शी संबंध काहीसे दूरचे आहेत. कामराज परत येऊ इच्छितात. येवोत बिचारे! व्यक्तिश: मला समाधान आहे. परंतु दक्षिणेचे राजकारण त्यांच्या येण्याने सुधारणार नाही. डी० एम० के०शी संबंध दुरावल्यामुळे ते प्रश्न अधिक कडवट होतील ही भीती आहे. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाची चर्चाच होत नाही. टीटीके (कृष्णम्माचारी) वगैरे जहालांच्या व डी० एम० के०च्या बाबतीत सुडाच्या भावनेने पाहत आहेत. मूल्यांपेक्षा निवडणुका हा सर्वप्रथम महत्त्वाचा प्रश्न दिल्लीत मानला जातो आणि त्या केंद्राभोवती सर्व काही हालत-चालत असते. ओरिसाचा यक्ष प्रश्न. निवडणुकीत बहुमत कोणाचे होईल हे सांगणे अवघड झाले तरी ते किती वेळेपर्यंत टिकणार, हे त्याहीपेक्षा अवघड. चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी व इतर उपेक्षित वर्गाचे आमदार आहेत. ते पक्षांतर भराभर करतात, परिणामी अस्थिरता. या वर्गाच्या हातात राज्याचे नेतृत्व दिल्याशिवाय स्थैर्य (स्टॅबिलिटी) येणार नाही, हे माझे निदान आहे. भारतीय लोकशाही राजकारणाचा सामाजिक आशय डॉ० लोहियांना खरा समजला होता. परंतु दुर्दैवाने त्यांना नेहरूद्वेषाचे वेड होते. त्यामुळे ते एकांगी झाले आणि त्यांचे विचार दुर्लक्षिले गेले.' (*विरंगुळा,* पृ० १३८)

तसे पाहिले तर राजकीय व आर्थिक या दोन्ही विषयांची गंभीर दखल घेऊन चर्चा करण्याचे, कॉंग्रेस व इतर पक्षांनी बंद करून काही वर्षे लोटली होती. आता घोषणांना महत्त्व आले होते आणि त्वरित गुणकारी ठरणाऱ्या उपायांची प्रसिद्धी होऊ लागली होती. देशात अशी परिस्थिती असताना यशवंतरावांकडे परराष्ट्रमंत्रिपद देण्यात आले. १९७४च्या ऑक्टोबरमध्ये त्यांनी या खात्याचा कारभार पाहायला सुरुवात केली. आर्थिक व राजकीय परिस्थिती ढासळत असताना कोणत्याही परराष्ट्रमंत्र्यास परदेशात विशेष काही करण्यासारखे नसते. यशवंतराव अर्थमंत्री असताना बऱ्याच देशांना भेट देऊन आले होते आणि आता परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांचा जागतिक दौरा झाला. प्रथम श्रीलंका व बांगलादेश या देशांना त्यांनी भेटी दिल्या. अर्थमंत्री म्हणून जागतिक बँकेचे अध्यक्ष रॉबर्ट मॅक्नामारा यांच्याशी त्यांचे चांगले संबंध प्रस्थापित झाले होते. मॅक्नामारा अमेरिकेचे संरक्षणमंत्री असतानाची त्यांची भूमिका वेगळी होती आणि जागतिक बँकेचे अध्यक्ष या नात्याने ते अगदी वेगळी व अविकसित देशांना उत्साहजनक वाटेल अशी भूमिका घेऊ लागले. परराष्ट्रमंत्रिपद घेतल्यानंतर यशवंतरावांनी या जुन्या ओळखी दृढ केल्या. जिम कॅलाहान या ब्रिटिश नेत्याने गृह, अर्थ, परराष्ट्र अशा अनेक खात्यांची मंत्रिपदे भूषविली होती आणि त्यांच्याशीही यशवंतरावांचे जवळचे संबंध स्थापन झाले होते. पण अमेरिका व ब्रिटन यांच्या



भारतासंबंधीच्या धोरणात विशेष बदल होत नसल्याची जाणीव त्यांना होती. यशवंतरावांनी क्युबालाही भेट दिली. तेव्हा तिथे क्रांती कां झाली हे लक्षात आले, तरीही कॅस्ट्रो याने लोकजीवन अनेक निर्बंधांनी बांधून टाकल्याचा अनुभव आल्यावर 'हे किती काळ चालणार, आणि अशा बंधनांचा परिणाम काय', याबद्दल त्यांनी शंका करणारे पत्र लिहिलेले दिसेल.

भारतात लोकजीवनावर अनेक निर्बंध घालण्याचा काळ भारतातही येऊ घातला होता. गुजरात व बिहार या दोन राज्यांत महागाई, भ्रष्टाचार इत्यादींमुळे, विद्यार्थ्यांनीच कोणत्याही राजकीय पक्षाची मदत न घेता आंदोलन सुरू केले होते. विद्यार्थी वसतिगृहातील खानावळीसाठी अधिक पैसे देण्याची वेळ आल्यामुळे गुजरातमध्ये आंदोलनाला आरंभ झाला आणि तो वाढत जाऊन मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांचा व त्यांच्या मंत्रिमंडळाचा राजीनामा ते मागू लागले. जनमताच्या दडपणाखाली चिमणभाईंनी राजीनामा दिला तर बिहारमध्येही विद्यार्थ्यांनी याच तऱ्हेचे आंदोलन सुरू केले. मुख्यमंत्री अबदुल गफूर हे या वेळी कमकुवत असल्याचे दिसून आले. पण यामुळे वाटेल त्या व्यक्तीला मुख्यमंत्रिपदावर बसवून चालत नाही असा निष्कर्ष न काढता, इंदिरा गांधींनी अपात्र मुख्यमंत्री न बदलण्याचा निर्णय घेतला. बिहारमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन पाहिल्यावर जयप्रकाश नारायण यांनी सर्व देशभर या प्रकारची चळवळ सुरू करण्याचे ठरवले. यापूर्वी त्यांनी काँग्रेसच्या भ्रष्ट कारभाराविरुद्ध सर्व काँग्रेसेतर पक्षांना

एकत्र येण्याचे आवाहन केले असले तरी त्या पक्षांनी लक्ष दिले नाही. आता वातावरण बदलले असल्यामुळे जयप्रकाश यांच्या आवाहनास प्रतिसाद मिळू लागला. यात भर पडली, ती रेल्वे कामगारांच्या देशव्यापी संपाची. हा संप सरकारने अनेक कडक उपाय योजून मोडून काढला.

जयप्रकाश यांनी मग दिल्लीतच मोर्चा काढला. त्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. नंतर गुजरातमधील निवडणूक विनाकारण लांबवत नेली जात असल्याबद्दल मोरारजी देसाई यांनी आमरण उपोषण सुरू केले. इंदिरा गांधींनी ताठर भूमिका न घेता गुजरातमध्ये निवडणूक घेण्याची घोषणा केली. यामुळे मोरारजींनी उपोषण मागे घेतले, पण जयप्रकाश यांच्या आंदोलनाचा व्याप वाढत चालला. या स्थितीत गुजरात विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव होऊन, विविध पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या जनता आघाडीला बहुमत मिळाले. राज्य व केंद्र सरकारांच्या पातळीवरील भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर येत असताना इंदिरा गांधी यांच्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी सरकारी नियमांचा भंग झाल्याचा व म्हणून ती निवडणूक रद्द करण्याचा अर्ज संयुक्त समाजवादी पक्षाचे राजनारायण यांनी न्यायालयात केला होता. त्याचा निर्णय १२ जून १९७५ रोजी अलाहाबादच्या न्यायालयाने देऊन इंदिरा गांधींची निवडणूक बेकायदा ठरवली. संसदीय लोकशाहीची परंपरा असलेल्या देशांतील काही नेत्यांनी व घटनातज्ज्ञांनी, इंदिरा गांधींचा अपराध असलाच तर क्षुल्लक असल्याचा अभिप्राय दिला होता हे लक्षात घेतले पाहिजे. मग इंदिरा गांधींनी सर्वोच्च न्यायालयात अलाहाबादच्या न्यायालयाच्या निकालास स्थगिती देण्यासाठी दाद मागितली. सर्वोच्च न्यायालयाने २४ जून रोजी स्थगितीच्या अर्जावर निर्णय दिला. यापूर्वी मंत्री व आमदार, खासदार इत्यादींच्या अशा अर्जावर सर्वोच्च न्यायालयाने अर्जदारास संसद वा विधानसभेत मतदान करता येणार नाही असे निर्णय दिले होते. या वेळीही इंदिरा गांधींच्या अर्जाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत त्यांना संसदेत मतदान करता येणार नाही असाच निर्णय दिला.

यावर दोन उपाय होते : एक म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत इंदिरा गांधींनी पंतप्रधानपद सोडून, आपल्या विश्वासातील एखाद्या सहकाऱ्याची त्या पदावर नियुक्ती करणे किंवा लोकसभेची निवडणूक घेणे. पण इंदिरा गांधींनी हे केले नाही. त्यांचा कोणावर विश्वास नव्हता. वास्तविक सहाआठ महिन्यांच्या अवधीनंतर कोणाही हंगामी पंतप्रधानास, इंदिरा गांधींना दूर ठेवून पंतप्रधानपदावर राहता आले नसते आणि कोणी तसा प्रयत्नही केला नसता. केला असता तर लोक व काँग्रेसपक्ष यांना तोंड देणे त्यास अवघड गेले असते. पण हा मार्ग इंदिरा गांधींनी स्वीकारला नाही. त्यांनी देशात आणीबाणी जाहीर करून घटनाच स्थगित केली. जयप्रकाश आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. वृत्तपत्रांवर प्रसिद्धिपूर्व नियंत्रणे आली. हे करत असताना वीस कलमी कार्यक्रम जाहीर झाला. यात वेठबिगारी नष्ट करणे, अत्यंत गरीब लोकांसाठी निवासस्थाने बांधून देणे अशी कलमे होती. या प्रकारचा कार्यक्रम ७१ सालच्या निवडणुकीच्या आधी वा नंतर राबवला असता तर त्याचा काही उपयोग झाला असता. सरकारी उपायांमुळे व्यापाऱ्यांनी धान्यसाठे बाहेर काढले आणि वारंवार होणारे संप बंद झाल्यामुळे मध्यम वर्ग एकीकडून खूश झाला. पण हाच वर्ग आणीबाणीमुळे वृत्तपत्रांवर नियंत्रण येऊन भाषण व संघटना स्वातंत्र्य संपले म्हणून नाराज झाला. टागोरांच्या कविता व वचने यांच्या प्रसिद्धीवर बंधने आल्यावर बंगाल संतप्त झाला.

आणीबाणीत वृत्तपत्रांवर बंधने आली खरी, पण त्यापूर्वीच ती येण्याचा संभव होता. नंदिनी सत्पथी या माहिती व प्रसारण खात्याच्या मंत्री होत्या आणि त्यांच्या खात्याचे सचिव दत्त, हेही त्यांच्याप्रमाणे



शरद पवार यांच्यासमवेत

मार्क्सवादी होते. वृत्तपत्रांच्या, म्हणजे मुख्यत: मोठ्या वृत्तपत्रांच्या कंपन्यांवर सरकारी नियंत्रण आणू पाहणाऱ्या या विधेयकास, कंपनी कायदा खात्याने संमती द्यायला हवी होती. ती मिळण्यात काही अडचण येणे शक्य नव्हते; कारण कम्युनिस्ट पक्षातून आलेले रघुनाथ रेड्डी हे त्या खात्याचे मंत्री होते. या रीतीने वृत्तपत्रांना वेसण घालू पाहणारे हे विधेयक तयार झाले. पण त्याची वाच्यता होऊन वादळ उठल्यामुळे नंदिनी सत्पथींनी विधेयक मागे घेतले.

आणीबाणीत वृत्तपत्रांवर नियंत्रणे आल्यामुळे अफवांना जोर आला.त्यातच दिल्ली वगैरे भागांत आणीबाणीच्या अंमलबजावणीच्या कामात संजय गांधी यांना मुक्तद्वार देण्यात आले. हे नवे घटनाबाह्य केंद्र तयार झाले आणि त्यांनी संततिनियमनाच्या सक्तीचा कहर केला. शहरसुधारणेच्या नावाखाली अनेकांची घरेदारे व दुकाने जमीनदोस्त झाली. इंदिरा गांधींच्या खास विश्वासातील पुपुल जयकर यांनी, स्वत:चा अनुभव त्यांच्या आठवणींच्या पुस्तकात दिला आहे. त्या बनारसला गेल्या असता, हनुमान गल्ली या अतिशय जुन्या विभागाच्या पुनर्रचनेचे काम हाती घेण्यात असल्याचे त्यांना समजले. तिथे कित्येक पिढ्यांची दुकाने चालवणारे दुकानदार होते. जयकर यांनी हे इंदिरा गांधींना कळवल्यावर त्यांनी ही मोडतोड लगेच थांबवली.

घटनेतील अनेक तरतुदी रद्द करण्याबाबत कायदेशीर सल्ला देणारे सिद्धार्थ शंकर रे, यांना बंगालचे मुख्यमंत्रिपद सांभाळता आले नव्हते. त्यांनी दिलेल्या सल्ल्यामुळे आपण आतापर्यंत जे राजकीय यश मिळवले ते नष्ट होईल, हे इंदिरा गांधींच्या कसे लक्षात आले नाही, याची चर्चा नंतर होत राहिली. शिवशंकर हे इंदिरा गांधींच्या विश्वासातले होते. इंदर मल्होत्रा यांना त्यांनी त्यांचे व इंदिरा गांधींचे काय बोलणे झाले हे निवेदन केले होते. इंदिरा गांधी म्हणाल्या की, त्या काही वकील नव्हत्या. त्यामुळे सिद्धार्थ शंकर रे यांच्या सल्ल्यातला धोका लक्षात आला नाही. परंतु हा केवळ कायद्याचा प्रश्न नव्हता. तर राजकीय आणि लोकजीवनाचा, तसेच भारताने तोपर्यंत जी मूल्ये जपली त्यांचे रक्षण करण्याचा होता. याचे परिणाम नंतर काय होतील, हे इंदिरा गांधींसारख्या राजकारणात मुरलेल्या व्यक्तीच्या लक्षात आले नाही, हे पटण्यासारखे नाही. आणीबाणीस कम्युनिस्ट पक्षाने पाठिंबा दिला, पण बंगालमधील ज्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाबाबत इंदिरा गांधींनी सौम्य धोरण अवलंबिले होते, त्याने मात्र विरोधी भूमिका घेतली.

आणीबाणीच्या आदेशावर राष्ट्रपतींची सही घेऊन उपाययोजना सुरू झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्याच्या संमतीला काही अर्थ राहिला नव्हता. यशवंतराव मुंबईत आले असता त्यांनी आपल्या अर्थखात्यात असतानाचे सचिव माधव गोडबोले यांना बोलवून घेतले आणि लोकमत काय आहे अशी चौकशी केली. गोडबोले यांनी सांगितले की, तुम्ही व जगजीवन राम यांनी आपले विरोधी मत न नोंदवल्यामुळे लोक नाराज आहेत. असे असू शकेल की, आणीबाणीस विरोध करून पक्षाबाहेर पडायचे आणि विरोधी आघाडीत सामील व्हायचे हे यशवंतरावांना पसंत पडणारे नव्हते. जी विरोधी आघाडी तयार झाली होती तीमधील काही पक्षांशी त्यांचे तेव्हा व नंतर जमणारे नव्हते.

याशिवाय संसदीय लोकशाहीत जनआंदोलनाचे स्थान काय, आणि निवडून आलेले विधिमंडळ बदलण्यासाठी निवडणूक हा उपाय आहे की, आंदोलन? असे हे द्वंद्व असू शकते. हे सुचण्याचे कारण म्हणजे, त्यांनी १९६१मध्ये अहमदाबादच्या लास्की इन्स्टिट्यूटमध्ये केलेले भाषण.या भाषणात यशवंतरावांनी असे म्हटले होते की, प्रौढ मतदान आणि निवडणुका यांमुळे कोणालाही निवडणुकीसाठी उभे राहता येते आणि राजकीय पक्षांना सरकार बदलण्याची संधी असते. वैयक्तिक व सामुदायिक गाऱ्हाण्यांचे निवारण करून घेण्यासाठी शांततामय आंदोलन करण्यास हरकत नाही. पण संसदीय लोकशाहीत कायद्याचे राज्य असल्यामुळे, कायदा मोडण्यासाठी आंदोलन करण्याचा कोणालाही हक्क असता कामा नये.

हा विचार केवळ यशवंतरावांचा होता असे नाही. आपली राज्यघटना संमत झाल्यावर घटनासभेत डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या संस्मरणीय भाषणात आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट केल्याशिवाय व सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना केल्याशिवाय घटनेतील उद्दिष्टे साध्य होणार नाहीत आणि घटना खऱ्या अर्थाने जिवंत बनणार नाही असा इशारा दिला होता. त्याचबरोबर त्यांनी आणखी एक सावधगिरीचा इशारा दिला होता. त्याची तितकी आठवण ठेवली जात नाही. बाबासाहेब म्हणाले, 'आपल्याला वरवरची नव्हे तर खरी लोकशाही टिकवायची असेल, तर माझ्या मते आपण आपली आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, घटनात्मक साधनांचाच अवलंब केला पाहिजे. याचा अर्थ आपण सनदशीर कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह यांचा त्याग केला पाहिजे. सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी घटनात्मक साधने उपलब्ध असताना, घटनाबाह्य उपायांचा

अवलंब करणे समर्थनीय नाही. हे उपाय म्हणजे अराजकाचे व्याकरण आहे. आपण जितक्या लवकर त्यांचा त्याग करू तितके ते बरे.'

मायकेल फूट हे ब्रिटिश मजूर पक्षाचे नेते होते. ते निवृत्त झाले. जहाल विचारसरणीचे मायकेल फूट हे शैलीदार व चिकित्सक लेखक म्हणून नावाजलेले होते. त्यांनी संसदीय लोकशाहीतील संसदबाह्य आंदोलनांचे स्थान, या विषयावर लिहिलेल्या लेखात म्हटले आहे की, आंदोलनांमुळे संसदेच्या स्थानासच आव्हान न देता ती बळकट केली पाहिजे. हे सांगून त्यांनी इंग्लंडमधल्या चार्टिस्ट चळवळीपासूनच्या अनेक प्रमुख चळवळींचा आढावा घेऊन दाखवून दिले की, या प्रत्येक चळवळीमुळे ब्रिटिश संसद अधिक समर्थ व लोकाभिमुख होत गेली. फूट यांचे हे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत.

बाबासाहेब व यशवंतराव या दोघांनी ज्या वेळी त्यांचे संसदीय लोकशाहीतील लोकांच्या आंदोलनांसंबंधीचे विचार मांडले तेव्हा संसद रद्द करण्यासाठी आंदोलन होण्याची किंवा घटना तहकूब करून आणीबाणी जाहीर होण्याच्या शक्यतेची कल्पना दोघांनाही सुचणे असंभवनीय होते. त्यातल्या त्यात यशवंतरावांनी अनिर्बंध राजसत्तेने घटनाबाह्य वर्तन केल्यास काय करावे, याचा विचार केलेला दिसतो. अहमदाबादच्याच भाषणात यशवंतराव म्हणाले की, 'लोकशाहीच्या मार्गाने सत्तेवर आलेले सरकार जर संसदीय संकेत गुंडाळून ठेवू लागले तर अशा सरकारला सत्तेवरून दूर करण्यासाठी प्रत्यक्ष आंदोलन उभारण्याची गरज निर्माण होते. सरकारने संसदीय लोकशाहीचे रक्षण केले पाहिजे, म्हणून जर एखादे सरकार सत्तेचा दुरुपयोग करून लोकशाहीची मूल्ये नष्ट करू पाहील, तर त्या सरकारविरुद्ध प्रत्यक्ष आंदोलनाशिवाय अन्य मार्गच उरत नाही.' (*भूमिका,* पृ० २२) ही अशी वेळ गुजरात व बिहारच्या सरकारांनी प्रथम आणली आणि मग केंद्र सरकारने.

१९७५च्या जूनमध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली तरी लगेचच ती उठवण्याची वा निर्बंध सैल करण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळात चर्चा होत असावी, असे यशवंतरावांनी वेणुताईंना २२ सप्टेंबर ७५ रोजी न्यूयॉर्कहून लिहिलेल्या पत्रावरून दिसते. हे पत्र *विदेश दर्शन* या पुस्तकात समाविष्ट आहे. या पत्रात त्यांनी बी० के० नेहरू यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती देताना म्हटले आहे की, बी० के० नेहरू यांनी भारताची घटना बदलून ती अध्यक्षीय पद्धतीची करण्याची कल्पना सांगितली. यशवंतरावांना असा बदल मान्य नव्हता. नेहरू दिल्लीला जाणार असल्यामुळे तिथे इंदिरा गांधींशी चर्चा करण्याची सूचना यशवंतरावांनी त्यांना केली. मग आणीबाणी किती दिवस टिकणार इत्यादी विषय निघाले तेव्हा आणीबाणी हळूहळू सैल करण्याचा इंदिरा गांधींचा विचार होता, पंधरा ऑगस्टपासून ही प्रक्रिया सुरू होणार होती असा इंदिरा गांधींशी बोलल्यानंतर यशवंतरावांचा ग्रह झाला होता. परंतु बांगलादेशमध्ये मुजिबुर यांचा खून झाल्यामुळे हे थांबले. ७६ सालच्या फेब्रुवारीत निवडणूक घेणे योग्य, असे मत यशवंतरावांनी पंतप्रधानांशी बोलताना दिले होते व ते नेहरूंना त्यांनी सांगितले. आणीबाणी उठवली नाही तरी सर्व राजकीय नेत्यांना सोडावे लागेल आणि वृत्तपत्रांसाठी काही मार्गदर्शक सूचना तयार करून त्यांची अंमलबजावणी त्यांच्यावरच सोपवावी लागेल, असा अभिप्राय यशवंतरावांनी दिला.

परंतु आणीबाणीत दीडएक वर्ष काही बदल झाला नाही. मग १८ जानेवारी १९७७ रोजी यशवंतराव रुमेनियाच्या दौऱ्यावर असताना, राजधानी बुखारेस्टमध्ये भारतीय राजदूत कौल यांच्या निवासस्थानी दुपारी फोन वाजला. बेलग्रेडमधील आपल्या उपराजदूताचा तो होता. इंदिरा गांधींनी आदल्या दिवशी हिंदीत पाठवलेला संदेश त्याने वाचून दाखवला. त्यात म्हटले होते की, जो महत्त्वाचा निर्णय आपण घेणार



शरद पवार यांच्यासमवेत

होतो तो उद्या घेणार आहे. तुम्हांस निर्णय रेडियोवरून समजू नये, आधी माहीत व्हावा म्हणून कळवीत आहे. शक्य असेल तर कार्यक्रम संपण्यापूर्वी परत या. इंदिरा गांधींचा हा संदेश आल्यानंतर संध्याकाळी बी० बी० सी०ने आणीबाणी उठणार असल्याचे वृत्त प्रसारित केले. यशवंतरावांनी वेणुताईना लिहिलेल्या पत्रात हवा मोकळी होईल. आपण आनंदात आहोत, असे लिहिले होते.

आनंदात राहावे अशी मात्र परिस्थिती यशवंतरावांच्या व काँग्रेसच्या बाबतीत राहिली नाही. निवडणूक आली आणि उत्तर भारताप्रमाणे महाराष्ट्रात काँग्रेसला हादरा बसला नाही, तरी तिच्या निवडून आलेल्या खासदारांची संख्या घटली. पण मुख्य म्हणजे इंदिरा गांधींचाच पराभव झाला आणि ६७ साली जे झाले नाही ते झाले. म्हणजे केंद्रातील सरकार काँग्रेसच्या हातात राहिले नाही.स्वातंत्र्य मिळाल्यापासून हे प्रथमच घडत होते. जनता पक्षाचे मंत्रिमंडळ स्थापन होऊन मोरारजीभाई पंतप्रधान झाले. अल्पमतांतील काँग्रेस हा अधिकृत विरोधी पक्ष म्हणून मान्य होऊन, यशवंतराव विरोधी पक्षाचे नेते बनले. त्यांनी १९४६मध्ये मुंबई विधानसभेवर निवडून आल्यानंतर प्रथम संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून काम करायला सुरुवात केली. तेव्हापासून ७६ सालपर्यंत ते या ना त्या मंत्रिपदावर प्रादेशिक पातळीवर व नंतर केंद्रात राहिले. परराष्ट्रमंत्री हे त्यांचे शेवटचे मंत्रिपद. त्यांची संसदीय कारकीर्द ही अधिकारपदस्थ

म्हणून झाली असता, आता प्रथमच विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे आले.

इंदर मल्होत्रा लिहितात की, निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर काही महिन्यांनी यशवंतराव व हक्सर यांची भेट झाली असता यशवंतरावांनी विचारले की, आपण आणीबाणीला केव्हा विरोध करायला हवा होता, असे तुम्हांला वाटते? हक्सर म्हणाले, की अगदी पहिल्या दिवशीच. हे सांगून हक्सर यांनी यशवंतरावांनी बेचाळिसच्या आंदोलनात केलेल्या धैर्यशील कामगिरीची आठवण करून दिली. (*इंदिरा गांधी*, पृ० १७२) हक्सर हे स्वत:च आणीबाणीची झळ लागलेले गृहस्थ होते. संजय गांधी यांच्या मोटार कंपनीची योजना त्यांना नापसंत होती व त्यामुळे ते मर्जीतून उतरले. इतकेच नव्हे, तर त्यांच्या दिल्लीतील मोठ्या व्यापारी नातेवाइकांची प्राप्तीकर खात्याने झडती घेतली. वास्तविक इंदिरा गांधीच्या हातात जास्तीत जास्त सत्ता केंद्रित करण्याचे धोरण हक्सर यांनी राबवले होते. त्यांच्या अखेरच्या काळात त्यांची दृष्टी गेली होती. त्यांना मी भेटलो तेव्हा ते बोलण्याच्या भरात म्हणाले की, आपली स्वत:ची विकेट एकदा नव्हे, तर दोन वेळा स्वत:च उडवणाऱ्या व्यक्ती आपण पाहिल्या आहेत. आणीबाणी पुकारून संजय गांधी यांना दिलेले मोकळे रान आणि नंतर पुन्हा अधिकारावर आल्यानंतर पंजाबच्या प्रश्नात भिंद्रनवाले यास हाती धरण्याचे संजय व झैल सिंग यांच्या राजकारणास दिलेले मुक्तद्वार; हे बहुधा हक्सर यांना अभिप्रेत असावे. आणीबाणी व त्याआधीचे जयप्रकाश यांचे आंदोलन यांचे विश्लेषण करताना प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ आन्द्रे बेटेल यांनी म्हटले आहे की, इंदिरा गांधी व जयप्रकाश नारायण यांनी लोकशाहीच्या रक्षणाची भूमिका घेतली खरी, पण दोघांनी दोन विरुद्ध बाजूंनी ती ताणली.यामुळे गोंधळ निर्माण झाला.

संसदेचे अधिवेशन सुरू होताना राष्ट्रपतींचे भाषण झाल्यानंतर, आभारप्रदर्शनाच्या वेळी यशवंतरावांनी विरोधी पक्षाचा नेता म्हणून भाषण करताना, सत्ताधारी पक्षाला साखरेत घोळलेली कडू गोळीही दिली. ते म्हणाले की, आम्ही ३५० होतो तर तुम्ही आज २७० आहांत. तसे राहालच याची खात्री नाही. जनतेने आणीबाणी झिडकारली पण तिने जनता पक्षाचा स्वीकार केला असे ठामपणे म्हणता येत नाही. आणीबाणी ही चूक होती आणि आम्ही ही चूक कबूल केली आहे. आणीबाणी ही काँग्रेसची परंपरा नाही. आणीबाणीच्या आधीच्या काळात काही पक्षांनी निर्माण केलेल्या वातावरणामुळे आणीबाणी आली. त्या काळात नोकरशाही आणि सत्ता राबवणारे यांच्याकडून अतिक्रमण झाले. पण ही काँग्रेसची परंपरा नाही. तुम्ही काँग्रेसवर टीका करा पण देशाचे नुकसान करू नका. तुमच्यातलेच काही काँग्रेसमध्ये होते आणि अधिकारपदावरही होते. तेव्हा काँग्रेसने केले ते सर्वच त्याज्य ठरवणे तुम्हांला शोभणारे नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेताना यशवंतरावांनी विविध मंत्र्यांमधील मतभिन्नता कशी स्पष्ट होते, हे दाखवून दिले आणि जनता पक्षाच्या आर्थिक धोरणाची दिशा कोणती हे समजू शकत नाही, असे मत दिले. जनता सरकारने आपण खरे अलिप्ततावादी धोरण अमलात आणू अशी ग्वाही दिली होती. त्याबद्दलही सभागृहात बऱ्याच चकमकी उडाल्या. तथापि मोरारजी देसाई यांनी अणुबॉम्बच्या विरोधी मत व्यक्त केले तेव्हा जनता सरकारला पेचात पकडण्याची संधी यशवंतरावांना मिळाली. त्यांनी विचारले की, हे पंतप्रधानांचे वैयक्तिक मत आहे, की जनता सरकारची ती भूमिका आहे?. यावर आपले ते वैयक्तिक मत असल्याचा खुलासा करणे पंतप्रधानांना भाग पडले.

या प्रकारे यशवंतराव विरोधी नेता म्हणून काम करत असताना, जनता सरकार व इंदिरा गांधी यांच्यातला तणाव वाढत होता. जनता सरकारने इंदिरा गांधींच्या विरुद्ध अनेकविध खटले न्यायालयात

चालवण्याची तयारी केली होती व चौकश्या केल्या जात होत्या. यास त्या तोंड देत असल्यामुळे, त्यांनी संसदेच्या बाहेर जनता सरकारविरुद्ध उग्र विरोध करण्याचा पवित्रा घेतला. त्यांना असेही वाटू लागले की, यशवंतरावांनी तसाच तो लोकसभेत घ्यावा. पण संसदेच्या पातळीवरील विरोधाला काही मर्यादा असतात व असाव्यात अशी यशवंतरावांची धारणा होती. विरोधी नेता म्हणून त्यांनी केलेली भाषणे वाचली, तर कोणत्याही आधुनिक व प्रगत देशांतल्या संसदेत भाषणे होतात तशीच ती होती, हे कबूल करावे लागेल. शिवाय यशवंतराव म्हणत की, त्यांनी दीर्घ काळ राज्याच्या व नंतर केंद्राच्या मंत्रिमंडळात काम केले होते आणि त्यामुळे देशापुढच्या अडचणींची त्यांना कल्पना होती. या स्थितीत केवळ विरोधी नेता झाल्याबरोबर हे विसरून, सरसकट विरोध करणे आपल्याला शक्य नाही व मानवतही नाही. ही त्यांची खरोखरीची संसदीय वृत्ती होती. हे सर्व लक्षात घेऊन जयंत लेले यांनी जेव्हा म्हटले की, तुमची वृत्ती व राजकीय क्षेत्रातील कार्यपद्धती पाहिल्यास, इंग्लंडसारख्या प्रगत संसदीय लोकशाहीत वावरणे अधिक सुलभ झाले असते. यशवंतरावांनी, ते बरोबर आहे असे उत्तर दिले होते.

काँग्रेस सत्ताभ्रष्ट झाल्यानंतर पुन्हा ती अधिकारावर येईल की नाही, व आल्यास यशवंतरावांचे स्थान काय असेल, हे सर्व अनिश्चित झाले होते. जयंत लेले यांनी मग ज्या तीन पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळांत मंत्री म्हणून यशवंतरावांनी काम केले त्यांचे स्वभाव, कार्यपद्धती इत्यादी स्पष्ट करण्यास सांगितले असता, यशवंतरावांनी प्रथमच सांगून टाकले, की पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विचार ते केवळ पंतप्रधान म्हणून करत नसत. ते आपले नेते आहेत, इतकेच नव्हे, ते आपले दैवत आहे अशी त्यांची भावना होती. हे सांगून मग द्वैभाषिकाच्या मंत्रिमंडळासंबंधी माहिती देत असताना आपल्याला आलेला अनुभव यशवंतरावांनी निवेदन केला. यशवंतराव माहिती देत असताना नेहरूंचे लक्ष नसल्याचे त्यांना जाणवले. मग ते उठले व आपला आशीर्वाद असू दे, असे म्हणाले. तेव्हा माझा आशीर्वाद असा सहज मिळणारा नाही, असे नेहरूंनी उत्तर दिले. त्याबद्दल यशवंतरावांना खंत वाटली. नंतर वर्षभरात नेहरू जेव्हा मुंबईत येत, तेव्हा विमानतळावरून राजभवनपर्यंत राज्यपाल श्रीप्रकाश यांच्यासमवेत नेहरूंचा प्रवास होई, हे यशवंतराव पाहत व ते स्वत: दुसऱ्या मोटारीत बसत. तथापि वर्ष संपल्यावर नेहरू परदेश दौऱ्यावरून पहाटे चारच्या सुमारास परतले तेव्हा यशवंतराव स्वागतास हजर होते आणि राज्यपाल नव्हते. यामुळे नेहरूंबरोबर मोटारीतून जाण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. मोटारीत बसल्यावर नेहरूंनी विचारले, चव्हाण, आज तुम्ही प्रथमच माझ्याबरोबर प्रवास करत आहात. तेव्हा राज्यपाल नेहमी असतात आणि तुमचा व त्यांचा जुना स्नेह असल्यामुळे त्यांच्याबरोबर तुम्ही जाणे योग्य असे आपण मानत होतो, असा खुलासा यशवंतरावांनी केला. मग नेहरू म्हणाले, ते खरे नाही. मग आपण वर्षापूर्वी काय म्हणालो ते आठवते काय? यशवंतरावांनी उत्तर दिले की ते विसरले नाहीत. तुम्ही जे बोललात ते आपण कसे विसरणार? यावर नेहरू म्हणाले आता ते विसरा. अनेकदा मला वाटत असे की मी आशीर्वाद कसा काय देणार? पण मी तुम्हांला माझा पाठिंबा दिला पाहिजे. हे सांगून यशवंतराव म्हणाले की, ही त्यांची पद्धती होती. यावरून त्यांचा स्वभाव समजू शकतो.

आपण दिल्लीत संरक्षणमंत्री म्हणून आलो तेव्हा दुर्दैवाने नेहरू शारीरिक व राजकीयदृष्ट्या दुर्बळ झाल्याचे यशवंतरावांना दिसले. नेहरू तेव्हा फारसे काही निर्णय घेत नसत. पहिल्यापासून मंत्रिमंडळ वा काँग्रेस कार्यकारिणीत नेहरू सर्वांना बोलायला सांगत आणि मग सर्वांच्या बोलण्याचा सारांश ते सांगत. हे सारांश सांगणे फार महत्त्वाचे असे. मग नेहरू अशा प्रकारे आपला निर्णय सांगत, की प्रत्येकाला



सूतगिरणीचे अवलोकन मा० वसंतदादा पाटील व श्री० आबासाहेब कुलकर्णी यांच्यासमवेत

आपण सहभागी होतो असे वाटत असे. यशवंतराव दिल्लीत आले तेव्हा काही वेळा नेहरूंच्या या वैशिष्ट्याचा प्रत्यय येत होता, पण अनेकदा ते आत्मचिंतनात गढलेले दिसत. तेव्हा मंत्रिमंडळातील त्यांच्या कार्यशैलीची इतरांशी तुलना करणे बरोबर होणार नाही. नेहरू सर्वांच्यापेक्षा वरच्या पातळीवर होते. त्यांच्या समोर वाद वा चर्चा करण्याची कोणाची हिम्मत होत नसे. पण तेच इतरांना बोलायला लावत.

लालबहादूर शास्त्री यांच्या कार्यशैलीत नेहरूंची नजाकत नव्हती. तेही सहकाऱ्यांना त्यांची मते देण्यास सांगत. पण अनेकदा असे वाटत असे की, शास्त्री अगोदरच आपले मत बनवून आले आहेत. काही प्रश्न व्यापक असत व त्यांवर चर्चा होत होती. मात्र अनेक राजकीय व प्रशासकीय बाबतीत त्यांचे स्वत:चे मत बनलेले असे. यामुळे मंत्रिमंडळ निर्णय घेत असल्याचे जाणवत नव्हते. पण उत्तरप्रदेशमधील पेचप्रसंगाच्या बाबतीत त्यांचे ज्ञान पक्के असल्याचे दिसून आले.तसेच काही कृती करायची असेल तर शास्त्रीच्याबरोबर आपण विश्वासाने जाऊ शकतो अशी आपली भावना होती, असे यशवंतरावांनी म्हटले आहे. शास्त्री त्यांच्या विशिष्ट वर्तुळातल्या लोकांच्या पलीकडे कोणाशी विश्वासाने बोलत नसत.

इंदिरा गांधींच्या कार्यशैलीसंबंधात यशवंतरावांचे म्हणणे असे होते की, प्रारंभीच्या काळात त्या जरा चाचपडत होत्या. पण नंतर त्या बदलल्या. मंत्रिमंडळाच्या बैठकीस त्या पूर्ण तयारीनिशी येत. त्यांनी आपल्या कार्यालयात विविध शाखा तयार केल्या होत्या आणि त्यांच्याकडून त्यांना आवश्यक ती सर्व माहिती मिळण्याची व्यवस्था केली होती. परदेशी राजकारणाच्या बाबतीत त्या अधिक माहीतगार होत्या.

जगातल्या महत्त्वाच्या व्यक्तींची त्यांची चांगली ओळख होती. छगला हे विचारवंत असले तरी परराष्ट्र राजकारणाच्या बाबतीत ते इंदिरा गांधींपुढे फिके पडत. कारण इंदिरा गांधींची जाणीव व निर्णयशक्ती मोठी होती. इंदिरा गांधी मंत्रिमंडळाच्या उपसमितीत सगळ्यांना बोलून देत आणि मग मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या अगोदर निर्णय झालेला असे. आणखी एक वैशिष्ट्य होते. कोणताही निर्णय घेताना देशात कोणती प्रतिक्रिया होईल हा त्यांचा पहिला प्रश्न असे.

इंदिरा गांधींच्या संबंधात नाराजी असली तरी यशवंतरावांनी जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत, नेहरू व इंदिरा गांधी हे दोनच राष्ट्रीय पातळीवरचे नेते असल्याचा अभिप्राय दिला होता. ७१ सालच्या निवडणुकीनंतर पक्षाच्याही पलीकडे जाऊन सरळ जनतेलाच आवाहन करण्याची क्षमता, इंदिरा गांधींनी दाखवली असे ते म्हणाले. अशी क्षमता नेहरूंपाशी होती व तिचा प्रत्यय आला असल्यामुळे नेहरूंशी मतभेद असतानाही वरिष्ठ काँग्रेस नेते त्यांच्या मागे जात हे दिसून आले होते. यशवंतरावांना या संबंधात स्वत:बद्दल काय वाटते असे विचारल्यावर, त्यांनी वेगवेगळ्या राज्यांतले कोणते काँग्रेस नेते आपल्याला मत देतील हे नावनिशीवार स्पष्ट केले. पण ते करताना पंतप्रधान व आपण, असा विकल्प आला तर त्यांतले बरेच पंतप्रधानांच्या बाजूने जातील हेही कबूल केले. इंदिरा गांधी लोकांना प्रत्यक्षच आवाहन करू शकतात असे सांगताना आपणही तसे करू शकत असल्याचा दावा त्यांनी केला नाही. यशवंतराव पंतप्रधान होऊ शकले असते पण इंदिरा गांधींना स्वत:हून त्यांनी पाठिंबा देऊन संधी घालवली असे मानणारांनी हेही लक्षात घेतले नाही, असे म्हटले पाहिजे. अर्थात हेही खरे की, पंतप्रधानपद त्यांच्याकडे आले असते तर ते त्यांनी समर्थपणे सांभाळले असते.

यशवंतरावांनी इंदिरा गांधींच्या बाबतीत आणखी एक गोष्ट मान्य केली होती. वेणुताईंना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले होते की गेल्या सहा वर्षांत म्हणजे १९६९ साली झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसंबंधातील मतभेदानंतरही, इंदिरा गांधी आपल्याशी न्याय्य रीतीने वागल्या. इंदिरा गांधींनी पंतप्रधानांचे कार्यालय बरेच प्रबळ केले. या संबंधी यशवंतराव तक्रार करताना दिसत नाहीत. उलट त्यांनी म्हटले होते की, जगभर पंतप्रधान वा अध्यक्ष यांनी या प्रकारे आपले खास कार्यालय प्रबळ केले असल्यामुळे भारतात काही वेगळे झाले नाही. मग अडचण कोठे होती? यशवंतरावांची अपेक्षा अशी होती की, मंत्रिमंडळातील मंत्र्यांना आपणही कारभारात वा निर्णय प्रक्रियेत सहभागी आहोत असे वाटले पाहिजे व तसे वाटावे असे वातावरण तयार करायला हवे. इंदिरा गांधींनी ते न करता आपल्या कार्यालयाचे वर्चस्व स्थापन केले हे बरोबर झाले नाही.

असे हे तीन पंतप्रधान. या तिघांच्या संबंधांत यशवंतरावांनी जितके वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येईल तितके केले आहे. त्याचप्रमाणे बेचाळीसच्या आंदोलनातील काही साथीदार आणि नंतर काँग्रेस संघटनेतील व मंत्रिमंडळातील काही पुढारी, यांच्या संबंधांतही त्यांनी या प्रकारचे विवेचन जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीत केले आहे.

इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस फेबियन सोसायटीची स्थापना झाली. तिचा संस्थापक औपचारिकरीत्या विचार केल्यास थॉमस डेव्हिडसन, पण ती नावारूपाला आली ती सीडनी व बेट्रिस वेब, विल्यम मॉरिस व बर्नार्ड शॉ यांच्यामुळे. हा मग एक पंथ तयार झाला. सार्वजनिक क्षेत्राची वाढ, सामाजिक व आर्थिक न्याय इत्यादी विचार या पंथाने स्वीकारले असले तरी कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी व वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान त्यास अमान्य होते. पंडित जवाहरलाल नेहरू या पंथाच्या विचाराने प्रभावित झाले

होते आणि नेहरूंच्या विचारांचा पगडा यशवंतरावांवर असल्यामुळे, त्यांचेही राजकीय विचार व वर्तन या फेबियन पंथाशी अधिक जवळचे होते. फेबियन सोसायटीने संशोधनावर भर दिला होता. साहजिकच अभ्यास व विचारमंथनास महत्त्व आले. बर्नार्ड शॉ यांचे चरित्रकार मायकेल हॉलरॉइड यांनी म्हटले आहे की, फेबियनांनी समाजवाद रस्त्यावरून दिवाणखान्यात आणला. त्यांना हिंसक उठाव अमान्य होता. शॉ याने तर म्हटले आहे की, अश्रुंविना समाजवाद हे आपले उद्दिष्ट असल्यामुळे तो केव्हा आला, हेही कळणार नाही.

भांडवलशाहीतील सरकारातही शिरून अनेक सुधारणा घडवता येतात, अशी फेबियनांची धारणा होती. यामुळे सिडनी वेब हे तेव्हाच्या ब्रिटिश प्रशासनात अधिकारी म्हणून काम करत होते, त्यांनी नगरपालिकांच्या कारभारात सुधारणा करण्यास आरंभीच्या काळात प्राधान्य दिले. रक्तपात, हिंसक उठाव इत्यादी मार्गाचा अवलंब न करता उत्क्रांतिवादच प्रभावी ठरेल अशी शॉ याची खात्री होती. ते व सिडनी वेब यांनी क्रमाक्रमाने प्रगती हा अनिवार्य मार्ग असल्याचे मत दिले होते. तसेच गरिबांना न्याय देणे हे आपले उद्दिष्ट असून श्रीमंतांचा द्वेष हे नव्हे, हे फेबियनांनी स्पष्ट केले होते.

आयर्लंडच्या होम रूलच्या प्रश्नावरून सरकारचा निषेध करण्यासाठी लंडनमध्ये सभा होऊ लागल्या तेव्हा पोलिसप्रमुखांनी ट्रफाल्गार चौकात सभाबंदी जाहीर केली. ती मोडण्यासाठी हिंडमन यांनी स्थापन केलेल्या समाजवादी पक्षाने, १३ नोव्हेंबर १८८७ रोजी मोठा मोर्चा नेला. यास हिंसक वळण लागले. शॉ, ॲनी बेझंट इत्यादी शांततेचे आवाहन करत होते, पण ते फोल ठरले आणि पोलिसांनी लाठीहल्ला केला. यानंतर हिंसक निदर्शने झाली नाहीत. लोकही त्यास तयार नव्हते. शॉ याने लिहिले की, कामगारांचा सशस्त्र उठाव घडवून सत्ता ताब्यात घेण्याचा मार्ग मार्क्सने प्रतिपादन केला असेल, पण अखेरीस मार्क्स इंग्लंडमध्ये परदेशीच राहिला. त्याला ब्रिटिश जनतेच्या स्वभावाची काही जाणीव नव्हती.

हे सगळे इथे सांगण्याचे कारण, पंडित नेहरूंची वैचारिक व मानसिक ठेवण कशी घडली होती ते स्पष्ट व्हावे. सरकारी सत्ता वापरून जितके लोककल्याण साधता येईल तितके साधावे; शांततामय निदर्शने रास्त असली तरी हिंसक वा सशस्त्र उठाव समर्थनीय नाही; क्रांतीऐवजी उत्क्रांती अधिक चिरस्थायी ठरते हे, नेहरू फेबियन पंथापासून शिकले आणि नेहरूंच्या विचारांच्या प्रभावामुळे यशवंतरावांची धारणा तशीच झालेली होती व त्यांची मनोवृत्तीही यास अनुकूल होती.

या दृष्टिकोणातून यशवंतराव देशातल्या परिस्थितीचा आणि विविध व्यक्तींचा विचार करत होते; त्याचबरोबर ते आत्मपरीक्षणही करत. आपल्या धोरणांचा व कृतींचा ते काहीशा अलिप्तपणे आढावा घेताना दिसतील. असे आत्मपरीक्षण करण्याची वृत्ती १९७२-७३पासून अधिकच वाढली वा ती काही जणांशी बोलताना प्रगट होत असताना दिसत होती. या संदर्भात वेणुताईंना ४ मे १९७५ रोजी जमेकामधून लिहिलेले पत्र उल्लेखनीय असल्यामुळे, ते अधिक विस्ताराने देणे आवश्यक आहे. यशवंतराव लिहितात, 'गेल्या दोन-तीन दिवसांत प्रश्नांनी काहूर केले आहे. याचा अर्थ ते प्रश्न काही दोन तीन दिवसांत निर्माण झालेले नाहीत. गेले अनेक महिने व काही वर्षे म्हटले तरी चालेल, हे प्रश्न जमून गेले आहेत–पुढल्या वर्षी तीस वर्षे होतील, मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमध्ये आलो. अनेक अडचणी आल्या. परिश्रम करावे लागले.अनेकांचे आशीर्वाद मिळाले. लौकिक अर्थाने नावलौकिक मिळाला. सत्तेची अनेक स्थाने पाहिली. राज्यात व केंद्रात. सामान्य अर्थाने कुणालाही हेवा वाटावा अशी.

मीही अशा स्थानांची महत्त्वाकांक्षा धरली होती हे म्हणणे खरे नाही. किंवा त्यासाठी कुणाच्याही

पाठीमागे लाचारीने गेलो नाही–टीकाकार स्वाभाविकच सत्तेच्या मागे लागले आहेत वगैरे म्हणणार, याची मला कल्पना आहे. मी त्यांच्याशी वाद घालायला जाणार नाही–जाणीवपूर्वक सत्तेचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा माझा प्रयत्न राहिला. नव्या विचारांना सामोरा गेलो. मुख्यत: दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे, ही माझी प्रेरणा प्रथमपासूनची होती. माझ्या हातात संपूर्ण (?) सत्ता होती तेव्हा त्या सत्तेचा आग्रहाने व योजनापूर्ण दृष्टीने आणि वर उल्लेखिलेल्या उद्दिष्टासाठी उपयोग करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

जे आपणासाठी कोणी केले नाही ते आपण इतरांसाठी करावे आणि सत्तेच्या केंद्रस्थानी असताना ते केले तर अधिक फलदायी होते म्हणून अधिक मित्रभावाने, हळुवारपणे, पण विचारांच्या दिशा कायम ठेवून मी माणसे वागविली व वाढविलीही. हे सर्व ठीक आहे. पण आज जेव्हा राजकारणातले चित्र पाहतो तेव्हा माझे मन अस्वस्थ होते. खरोखरीच आपण काही नव्या कामाचा पाया घातला का? खरी जिव्हाळ्याची माणसे अवतीभोवती होती का?–काही काही माणसांचे नमुने पाहिले म्हणजे आश्चर्यही वाटते–खरे म्हणजे दु:ख होते.

श्रीमतीजी अजून महत्त्वाच्या कामात सल्लामसलत घेतात. पण सत्तेच्या केंद्रवर्तुळाच्या बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात, असा अनुभव आहे.मग मन धुमसत राहते.असे अवमानीत राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो, त्यांचाही अवमान तर नाही ना होत, अशी बोचणी असते. मी माझी समजूत घालतो, की नाही, असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वत:ला विसरले पाहिजे–भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे असा विचार करून काम चालू राहते. पण खऱ्या अर्थाने काम चालू आहे का? की एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे?' (*विदेश यात्रा*, पृष्ठे १३६-८)

या आधी महाराष्ट्र काँग्रेस व मंत्रिमंडळ या दोन्हीतील वादामुळे यशवंतराव बरेच व्यथित झाले होते. त्यांनी १९७४मध्ये वेणुताईंना लिहिलेली काही पत्रे याची साक्ष देतात. *विरंगुळा* या संग्रहात ती समाविष्ट आहेत. एका पत्रात सातारा जिल्ह्यातील वातावरण कार्यकर्त्यांतील दुफळीमुळे दूषित झाल्याचा उल्लेख असून, मंत्रिमंडळही गटबाजीत ग्रस्त झाल्याबद्दल विषाद व्यक्त झाला आहे. चाणक्य नीती वापरून मराठा-मराठेतर असा वाद सुरू करण्याचा प्रयत्न काहीजण करत असून, या लोकांना योग्य वेळी उघडे पाडण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही, असे म्हटले आहे. हा वाद मागे टाकण्याचे प्रयत्न यशवंतरावांनी केले होते. यामुळेच कन्नमवार यांच्या निधनानंतर मराठा मुख्यमंत्री हवा यासाठी काही मराठा पुढाऱ्यांनी खटपट केली असताना, यशवंतरावांनी ते मान्य केले नाही. सर्व मंत्रिमंडळाला कोण बरोबर घेऊन जाऊ शकतो, कारभाराचे कौशल्य कोणापाशी आहे, इत्यादी कसोट्या कां लावल्या पाहिजेत आणि केवळ जातीने मराठा म्हणून मुख्यमंत्र्याची निवड करणे कसे चूक होईल, हे त्यांनी एका उमेदवाराची शिफारस करण्यास आलेल्या मंडळींना समजावून सांगितले. दुसऱ्या पत्रात मंत्रिमंडळात वेगवेगळे गट पडले असून वसंतराव नाईक यांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये असा सूर आहे. त्याचबरोबर नाईक अंतर्गत गटबाजीला प्रोत्साहन देत आहेत की काय, असा प्रश्न पडत असल्याची कबुली आहे. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची एक बैठक शरद पवार यांच्या घरी घेऊन, वाद मिटवण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दिली असून, प्रत्यक्षात ही मंडळी कशी वागतात हे महत्त्वाचे असल्याचे मत दिले आहे. वसंतराव नाईक यांना



श्री० आण्णासाहेब शिंदे, दे० भ० किसन वीर समवेत

मुख्यमंत्रिपद सोडण्यास सांगावे अशी भाषा इंदिरा गांधींनी चालवली होती. तुम्ही पंतप्रधान आहांत तेव्हा काय ते ठरवा, तुमचा निर्णय मानला जाईल, असे यशवंतरावांनी सांगितल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर वसंतराव नाईक यांना प्रतिष्ठेने वागवले पाहिजे, असाही अभिप्राय त्यांनी दिला.

अखेरीस वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. आणीबाणीच्या काळात शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले आणि नंतर राजकारणास वेगळी दिशा लागत गेली. आणीबाणीनंतरच्या काळात इंदिरा गांधींच्या बरोबर राहिलेले यशवंतराव, ब्रह्मानंद रेड्डी, स्वर्णसिंग यापैकी कोणावरच त्यांचा विश्वास नव्हता. तर ज्या प्रकारचे संघर्षाचे राजकारण त्या करू पाहत होत्या, ते या तिघांना मानवणारे नव्हते. जनता पक्षाच्या सरकारने इंदिरा गांधींच्या विरुद्ध मोहीमच काढली होती. गृहमंत्री चरणसिंग यांनी आणीबाणीच्या काळात स्थानबद्ध नेत्यांना ठार मारण्याचा इंदिरा गांधींचा कट होता, असे अतिशय बेजबाबदार विधान केले होते. इंदिरा गांधींवर खटलाही भरण्यात आला. त्यात सरकारची फजिती झाली आणि मग सामान्य लोकांच्या सहानुभूतीचा ओघ इंदिरा गांधींकडे वळू लागला. बेल्ची या बिहारमधील खेडेगावातील हरिजनांवर झालेल्या अत्याचाराच्या वेळी, गृहमंत्री चरणसिंग यांनी नव्हे, तर इंदिरा गांधींनी भेट दिली. इंदिरा गांधींनी त्या वातावरणात कर्नाटकमधील चिकमंगळूर या मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली आणि त्यात त्या विजयी झाल्या. त्यानंतर काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासदत्व त्यांनी सोडले आणि १ जानेवारी १९७८ रोजी काँग्रेसचे प्रतिनिधित्व करणारी एक राष्ट्रीय परिषद घेतली. देशापुढील आव्हानांना सामोरे जाऊन परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी, या परिषदेने इंदिरा गांधी

यांना अध्यक्ष निवडले. इंदिरा गांधींनी स्पष्ट वैचारिक मार्गदर्शन करण्याची आवश्यकता प्रतिपादून, समाजवादाकडे आगेकूच करण्याची घोषणा केली. या रीतीने काँग्रेसमध्ये आणखी एक फूट पडली.

अशा या दुभंगलेल्या काँग्रेसने आणीबाणीनंतरची विधानसभा निवडणूक लढवली तेव्हा महाराष्ट्रात एकूण २८८ जागांपैकी जनता पक्षाला ९९, रेड्डी काँग्रेस ६९, इंदिरा काँग्रेस ६२, कम्युनिस्ट ९, शे० का० पक्ष १२ आणि अपक्ष ३६ असे जागावाटप झाले. यामुळे दोन काँग्रेसने एकत्र येण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पण रेड्डी काँग्रेसला अधिक जागा मिळाल्या असल्या तरी तिला इंदिरा गांधी मुख्यमंत्रिपद देण्यास तयार नव्हत्या. तथापि यशवंतराव मोहिते यांनी इंदिरा गांधींची भेट घेऊन तडजोडीची आवश्यकता पटवल्यावर, दोन्ही काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ आले आणि वसंतदादा मुख्यमंत्री व नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री झाले. हे मंत्रिमंडळ फार काळ टिकणारे नव्हते. तिरपुडे यांनी कमालीचा आक्रमक पवित्रा घेतला. वसंतदादा मुख्यमंत्री असले तरी त्यांना निष्प्रभ करून अनेक महत्त्वाचे निर्णय तिरपुडे घेऊ लागले. काँग्रेसचा, विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसचा खरा आधार सहकार क्षेत्र होते. त्यावरच घाला घालण्याच्या दिशेने तिरपुडे पावले टाकत होते आणि वसंतदादा सहकार क्षेत्रात इतके पाय रोवून असतानाही, त्यांनी तिरपुडे यांना आवरले नाही किंवा तसे आवरण्यात ते कमी पडले. यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांत व कार्यकर्त्यांत अस्वस्थता वाढू लागली.

महाराष्ट्रात या प्रकारचा असंतोष वाढत होता तेव्हा मी दिल्लीस गेलो असताना, यशवंतराव कमालीचे अस्वस्थ दिसले. वसंतदादा तिरपुडे यांना कसे आवरत नाहीत? याचा परिणाम महाराष्ट्र काँग्रेस नष्ट होण्यात होईल, हे त्यांच्या कसे लक्षात येत नाही? असे त्यांचे प्रश्न होते. त्यांना महाराष्ट्रातून अनेकांनी अडचणी कशा वाढत चालल्या आहेत याची कल्पना दिली होती. या स्थितीत मंत्रिमंडळास विरोध करून त्याचा पराभव करण्याचे विचार काहीजण करत असल्याचे मी सांगितले तेव्हा हे मंत्रिमंडळ गेलेच पाहिजे असे मत यशवंतरावांनी दिले. जयंत लेले यांना दिलेल्या मुलाखतीतही हा विचार यशवंतरावांनी अप्रत्यक्षपणे मांडलेला दिसेल. मग शरद पवार, किसन वीर, सुशीलकुमार शिंदे, विनायकराव पाटील, गोविंदराव आदिक, प्रतापराव भोसले इत्यादींनी हालचाली चालवल्या होत्या त्या अधिक वाढवल्या. या सर्वांनी शरद पवार यांना पुढारी निवडले. पवारांच्या घरी, या आणि इतर अनेक कार्यकर्त्यांची बैठक चालू असताना, यशवंतरावांनी मला फोन करून लगेच निर्णय घेऊ नये असा निरोप पवार व त्यांचे सहकारी यांना देण्यास सांगितले. तो निरोप मी दिलाही. पण वेळ निघून गेली होती. किसन वीर हे यशवंतरावांचे अगदी तरुणपणापासूनचे सहकारी. त्यांनी यशवंतरावांना फोन करून आता निर्णय बदलू शकत नसल्याचे कळवले आणि दुसऱ्या दिवशी संयुक्त मंत्रिमंडळाच्या विरुद्ध बंड होऊन ते कोसळले. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली रेड्डी काँग्रेस, जनता व शे० का० पक्ष यांच्या आघाडीचे मंत्रिमंडळ आले.

केंद्रातील जनता पक्षात मतभेदांना जाहीर स्वरूप येऊ लागल्यामुळे त्याचे भवितव्य अनिश्चित होत होते. मग मधू लिमये आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी जनसंघाच्या मंत्र्यांच्या दुहेरी निष्ठेवर टीका सुरू केली. रा० स्व० संघाचे आदेश घेऊन जनता आघाडीत कसे राहता येईल, असा त्यांचा प्रश्न होता. याची परिणती फर्नांडिस यांच्या राजीनाम्यात झाली. पाठोपाठ राजनारायण व चरणसिंग यांनी बंडाची भाषा केली तेव्हा संजय गांधी यांनी या दोघांना बंड करून जनता पक्षाचे सरकार अल्पमतात आणल्यास, काँग्रेसच्या

पाठिंब्यावर तुम्ही मंत्रिमंडळ बनवा असा सल्ला दिला. तो चरणसिंग व राजनारायण यांनी ऐकला आणि जनता पक्षाचे सरकार संपुष्टात आणले. चरणसिंग यांनी लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते म्हणून यशवंतराव यांना उपपंतप्रधानपद घेण्याची विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. पण आयत्या वेळी इंदिरा काँग्रेसने पाठिंबा देण्याचे नाकारल्यामुळे, हे मंत्रिमंडळ खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले नाही. आपण चरणसिंग यांचे आमंत्रण स्वीकारण्यात चूक केली, अशी खंत यशवंतराव नंतर खाजगीत व्यक्त करत.

या अवस्थेत लोकसभा बरखास्त करून निवडणूक घेणे क्रमप्राप्त झाले. तशी ती होऊन इंदिरा गांधी व त्यांचा पक्ष निर्विवाद बहुमत मिळवून अधिकारावर आला. इंदिरा काँग्रेस पक्षातर्फे निवडून आलेल्यांपैकी दीडशे जण संजय गांधी यांच्यावर निष्ठा ठेवणारे होते. त्यांना संसदीय जीवनाचा कसलाही अनुभव नव्हता. फक्त झोंडगिरीत ते वाकबगार होते. नव्या परिस्थितीत इंदिरा काँग्रेसमध्ये संजय गांधी आणि त्यांची युवक काँग्रेस हे एक समांतर सत्ताकेंद्र होऊन बसले. संजय गांधींनी आणीबाणी पुकारून घटना तहकूब करण्याचा कायदेशीर सल्ला देणाऱ्या सिद्धार्थ शंकर रे यांचा अपमान करून, इंदिरा गांधीच्या वर्तुळापासून दूर केले. नंतर बरुआ, रजनी पटेल, नंदिनी सत्पथी इत्यादींनाही निरोप दिला. कम्युनिस्ट पक्षाने आणीबाणीस पाठिंबा दिला असला तरी संजय गांधी यांनी कम्युनिस्ट पक्ष व काँग्रेस पक्षातील डावे यांच्याविरुद्ध मोहीम उघडली.

इंदिरा गांधी पंतप्रधान होताच त्यांनी महाराष्ट्रातील संयुक्त आघाडीचे सरकार बरखास्त केले. तीच अवस्था इतर राज्यांतील काँग्रेसेतर मंत्रिमंडळांची झाली. यशवंतरावांपुढे पेच उभा राहिला. त्या काळात यशवंतराव व वेणुताई यांना मी माझ्या घरी जेवायला बोलावले होते. तेव्हा अनेक विषय बोलून झाले. मग मी त्यांना म्हणालो की, तुम्ही यापुढे काँग्रेस वा इतर कोणत्याही पक्षात न जाता, अपक्ष म्हणून डॉ० कुंझरू यांच्याप्रमाणे राहाल तर ते प्रतिष्ठेचे होईल. यशवंतरावांना हे पसंत पडल्याचा माझा ग्रह झाला होता. त्यांच्या काही मित्रांनी व चाहत्यांनी त्यांना अपक्ष म्हणून लोकसभेत राहा असे सांगितले. इतरही काहींनी हेच सांगितल्याचे नंतर मला कळले. हा सल्ला आपल्याविषयीच्या आपुलकीमुळे दिला जात असल्याची यशवंतरावांना जाणीव होती. पण अखेरीस त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. इंदिरा गांधींनी निवडणुकीत यश मिळवून खरी काँग्रेस कोणाची हे सिद्ध केले असल्यामुळे, आपण त्या पक्षात जाणार असे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे त्यांनी अर्ज केला. तो मंजूर करण्यास विलंब लावण्यात आला. यशवंतरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये जाऊ नये असे म्हणणारांनाच नव्हे, तर पक्षीय राजकारणाशी संबंध नसलेल्या महाराष्ट्रातल्या असंख्य लोकांना हा महाराष्ट्राचा अपमान आहे असे वाटले. या प्रकारची वागणूक त्यांना मिळायला नको होती अशी सार्वत्रिक भावना होती. अखेरीस प्रवेश देण्यात आला आणि काही काळ यशवंतराव वित्तीय आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम पाहू लागले. पण त्यास काही अर्थ नव्हता. आपण काँग्रेसमध्ये तरुणपणापासून वाढलो तेव्हा अखेरचे दिवस काँग्रेसमध्येच घालवणे श्रेयस्कर अशी त्यांची भावना होती. बुद्धिनिष्ठतेने विचार केल्यास या भावनात्मकतेचे समर्थन करणे अशक्य होते. यामुळे टीका होणे अनिवार्य होते. परंतु यशवंतरावांच्या निधनाला आता पाव शतक उलटल्यानंतर विचार केल्यास त्यांचा निर्णय हा समजण्यासारखा होता, पण समर्थनीय मात्र नव्हता असे म्हटले पाहिजे. पण ज्यांनी एका पक्षात इतकी वर्षे घालवली, मोठी जबाबदारी स्वीकारली आणि अधिकारपदे भोगली, त्यांची पक्षाबद्दलची भावना वेगळी असू शकते.

या संबंधात दोन उदाहरणे देण्यासारखी आहेत. १९७१ सालच्या लोकसभा निवडणुकीत जनसंघाला

२२ जागा मिळाल्या होत्या. जनसंघ नव्हे, तर इंदिरा गांधीच पाकिस्तानशी समर्थपणे मुकाबला देऊ शकतील अशी भावना, रा० स्व० संघाच्या अनेक सदस्यांत पसरल्याचे तेव्हा उघडपणे बोलले जात होते. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर काही दिवसांनी अटल बिहारी बाजपेयी यांना दिल्लीत मी भेटलो असता, तुमचे तुमच्या पक्षाशीच बरेच मतभेद असल्याची चर्चा चालू आहे. तसे असेल तर तुम्ही या पक्षात कसे काय राहू शकता? असा प्रश्न मी विचारला असता अटलजींनी उलट सवाल केला, 'जायें तो जायें कहाँ?' ताजे उदाहरण लोकसभेचे निवृत्त सभापती सोमनाथ चतर्जी यांचे. त्यांना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने दूर केले आहे. पण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सभासद म्हणूनच जीवनाची अखेर व्हावी अशी इच्छा त्यांनी प्रगट केली आहे. आजकाल पक्षनिष्ठा अशी काही शिल्लक राहिलेली नसल्यामुळे ही उदाहरणे कालबाह्य मानली जातील.

इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर यशवंतरावांची लोकसभेत काही भाषणे झाली. त्यातील अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लष्कर पाठवल्याबद्दल, सरकारवर अविश्वास दर्शवणाऱ्या विरोधी पक्षाच्या ठरावास विरोध करणारे भाषण उल्लेखनीय होते. या लष्करी कारवाईच्या अगोदर यशवंतराव पंजाबमध्ये गेले असता, त्यांनी अकाली दलाच्या काही नेत्यांशी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यांना एकंदर प्रशासनच हतबल झाल्याचे आढळले आणि अकाली दलाचा नेता भिंद्रनवाले याचे बंदी झाल्याचे दिसले. भिंद्रनवाले याने त्याच्या साथीदारांसह सुवर्णमंदिर हे शस्त्रास्त्रांचे आगर बनवून एखादा किल्ला लढवावा तशी तयारी केली होती. पंजाबमध्ये यशवंतराव यांनी जे पाहिले त्याची माहिती त्यांनी इंदिरा गांधींना दिली होती. त्या वेळी सर्व कोंडी झाल्यामुळे लष्करी कारवाईशिवाय दुसरा मार्ग उरला नव्हता, हे यशवंतरावांनी लोकसभेतील भाषणात स्पष्ट केले. ते म्हणाले, की पंजाबमध्ये धर्मस्थानाचा असा उपयोग करण्यास मोकळीक दिली असती, तर देशभर अनेक धर्मस्थानांचा असाच उपयोग करण्याचा मार्ग मोकळा झाला असता. पंजाबचा प्रश्न इतका विकोपाला जाण्याचे मूळ कारण, आनंदपूरचा ठराव हे असल्याचे यशवंतरावांनी मत दिले. या आनंदपूरसाहेबातील अकाली दलाचा ठराव अतिरेकी अकालींच्या दडपणाखाली संमत झाला होता. त्यांत शीख हे अलग आहेत, एक राष्ट्र आहेत असे म्हटले होते. भिंद्रनवाले याने हेच मुख्य सूत्र धरून आपले हिंसक आंदोलन चालवले होते आणि अमृतसरच्या देवालयात शस्त्रास्त्रांचा साठा करून, सरकारचा पायाच नष्ट करण्याचा घाट घातला होता. यापासून त्याला परावृत्त करण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरल्यावर लष्करी कारवाई हाच एक उपाय होता. यशवंतरावांनी याचा ऊहापोह केला. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, डाव्या विचारसरणीचे, इतकेच नव्हे तर, कम्युनिस्ट पक्षाचे एकेकाळचे सक्रिय कार्यकर्ते निखिल चक्रवर्ती, यांनी ही कारवाई समर्थनीय असल्याचा अभिप्राय दिला होता. आनंदपूरसाहेब इथला अकाली दलाचा ठराव कसा विघटनात्मक होता, हे मधू लिमये यांनी काही लेख लिहून दाखवून दिले होते. सुवर्ण मंदिरातील कारवाईची दुर्दैवी परिणती होऊन इंदिरा गांधी यांचा खून, चार महिन्यात त्यांच्या शीख शरीररक्षकांनी केला.

यशवंतराव या रीतीने खासदार म्हणून आपली जबाबदारी पार पाडत असतानाच, ८३ सालात वेणुताईचे निधन झाले. यशवंतरावांच्या भावना कोणत्या असतील याची कल्पना येण्यासाठी, त्यांनी वेणुताईना लिहिलेल्या एका पत्राचा दाखला दिला पाहिजे. यशवंतराव १९७४ साली कौलालंपूर इथे असताना त्यांनी वाचायला आणलेले पुस्तक उघडले. त्यांनी सावकाशीने आवडते पुस्तक वाचावे म्हणून नेले होते. या पुस्तकाचा लेखक एक ब्रिटिश विचारवंत होता. ४०-५० वर्षे संसार केलेल्या आपल्या



सौ० वेणुताई यशवंतराव चव्हाण

पत्नीला त्याने हे पुस्तक अर्पण केले होते. त्याची अर्पणपत्रिका ही त्याने पत्नीचे नाव बदलून एका फ्रेंच लेखकाने लिहिलेली अर्पणपत्रिका होती. त्या लेखकाच्या भावना याच आपल्याही आहेत हे यशवंतरावांनी वेणुताईंना लिहिले होते. अर्पणपत्रिका अशी : 'तुझ्या संगतीची साथ ही ईश्वराने दिलेली देणगी आहे. त्याच्या या कृपेच्या जाणिवेने माझे मन आकंठ भरलेले आहे. तुझ्या उदार अंत:करणामध्ये माझ्या या जाणिवेला जागा राहू दे.' असे मनोमीलन झालेली पत्नी निधन पावल्यावर यशवंतराव पूर्णत:



कराडमध्ये चाललेली अंत्ययात्रा

खचले. त्यांच्या मनाची सारी उभारीच संपली आणि वर्ष संपते तोच, यशवंतरावांचे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी निधन झाले.

यशवंतरावांच्या निधनास पंचवीस वर्षे झाली असल्यामुळे, त्यांच्या राजकीय व व्यक्तिगत जीवनाचा आढावा काहीशा वस्तुनिष्ठतेने घेणे शक्य आहे. एक व्यक्ती म्हणून पाहिले तर त्यांचा पहिला काळ हा आर्थिक अडचणींचा होता. त्यातही ते स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले आणि मग स्वातंत्र्य आल्यानंतर एका मागोमाग एक अशा जबाबदारीच्या पदांवर काम करून, त्यांनी आपल्या अंगची कर्तबगारी दाखवून दिली. पण आयुष्याच्या अखेरच्या काही वर्षांत त्यांना अनुकूल असे फासे पडले नाहीत. विविध महत्त्वाच्या खात्यांची मंत्रिपदे भूषविलेल्या यशवंतरावांवर एक खासदार म्हणून वावरण्याची वेळ आली. त्यातच पत्नीवियोगाचे दु:ख वाट्याला आले. ही एक शोकान्तिका म्हटली पाहिजे. नाटक, कादंबरी, चित्रपट यांतील शोकान्तिका अनेकदा सुखान्तिकेपेक्षाही लोकप्रिय होतात आणि लोक पुन्हा पुन्हा त्या वाचतात वा पाहतात. पण ही शोकान्तिका मात्र वारंवार आठवावी अशी नाही.

ज्यांनी यशवंतरावांचे व्यक्तित्व व कर्तृत्व पाहिले त्यांना ते आठवत राहते आणि सध्याची देशाची व महाराष्ट्राची अवस्था पहिल्यानंतर तर ही आठवण अधिक तीव्र होते. नवे विचार व अनुभव घेण्याची



कराडमधील प्रीतिसंगमावर स्व० यशवंतरावसाहेबांची समाधी




साहित्य संमेलनात बोलताना (कराड) १९७५

यशवंतरावांची वृत्ती पहिल्यापासून अखेरपर्यंत होती. स्वातंत्र्य आंदोलनात असताना त्यांनी त्या काळातल्या नामवंतांचे विचार ऐकले आणि कारावास हे एक विद्यापीठ मानले. देश स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांमुळे अखिल भारताचा विचार करण्याची प्रवृत्ती वाढीला लागली आणि महाराष्ट्राची उन्नती ही देशाच्या उन्नतीचा भाग असल्याची भावना कायम मनात ठसली. तथापि राजकीय स्वातंत्र्यास आर्थिक व सामाजिक आशय असला पाहिजे याचे महत्त्व महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापासून ते समाजवादी पंथ व रॉय यांच्यापर्यंतच्या शिकवणुकीने मनावर बिंबले. वैचारिक बैठक, अधिकारपदाच्या काळात पुढे येणाऱ्या समस्या हाताळताना उपयोगी पडली. नंतरच्या काळातील परदेश-प्रवास हाही त्यांना अधिक व्यापक दृष्टी देण्यास कारणीभूत झाला.

यशवंतरावांच्या कारकिर्दीचा विचार करताना काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. नेहरू काय, की यशवंतराव काय, यांनी या देशात क्रांती करण्याचा वसा घेतला नव्हता. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणण्याचे जितके प्रयत्न करता येतील तितके करावे, ही त्यांची धारणा होती. आपला अनेक दृष्टीने विभागलेला समाज आणि त्यातील बहुसंख्य लोकांची विपन्नावस्था, निरक्षरांची संख्या अधिक, यामुळे काही बंधने आली व येतात. आपण कायद्याचे राज्य स्वीकारले असून न्यायालय हाही एक घटक अंमलबजावणीच्या बाबतीत लक्षात घ्यावा लागतो. या अशा बंधनांच्या व निर्बंधांच्या चौकटीत



गायिका श्रीमती आशा भोसले यांच्यासमवेत

राहून आपल्या नेत्यांनी, त्या काळात आपली जबाबदारी सांभाळली. तेव्हा त्यांनी सर्व प्रश्न कां सोडवले नाहीत, हा प्रश्न निरर्थक ठरतो. नेहरू काय, की यशवंतराव काय, यांच्याबाबतीत एक समान घटक होता. तो हा, की अगदी सामान्य लोकांना ते अधिकाधिक प्रामाणिकपणे प्रयत्न करून अधिकांचे अधिक कल्याण साधू पाहत असल्याची मनोमन खात्री होती. अर्थात नेहरूंच्या बाबतीत ती अखिल भारतीय तर यशवंतरावांच्या बाबतीत महाराष्ट्राच्या पातळीवर. म्हणून महाराष्ट्र राज्याची स्थापना व यशवंतरावांचे नेतृत्व, यामुळे काही तरी नवे घडत असल्याची भावना तयार झाली आणि विश्वासाचे, उभारीचे एक वातावरण निर्माण झाले.

मंत्री आणि त्यातही मुख्यमंत्री, पंतप्रधान अशा जबाबदारीच्या अधिकारपदावर असलेल्या व्यक्तींनी केवळ आपण आपल्या खात्यापुरते बांधील आहोत असे न मानता, निदान भारतासारख्या देशात तरी सर्वांच्या आणि त्यातही सामान्य लोकांच्या बाबतीत सहानुभूती बाळगली पाहिजे, अशी यशवंतरावांची धारणा होती. ते या भावनेने वागत असल्यामुळे अनेक लोक भेटत. काही जण तर आपली वैयक्तिक सुखदु:खे ऐकवण्यासाठी भेटत. यातच काहींचे विवाह जुळवण्याचे आणि घटस्फोट होऊन विवाह मोडण्याची वेळ आलेल्यांच्या कौटुंबिक जीवनाबाबत मध्यस्थीही करण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले होते.

लेखक, कलावंत यांच्याबद्दल यशवंतराव विशेष उदार असत. बडे गुलाम अलींच्याबद्दलचा अनुभव, यशवंतरावांचे मित्र वि० वा० नेने यांनी दिला आहे. यशवंतरावांशी नेने बोलत बसले असता माणसे सतत येत होती. राहायला जागा मागणारे ताठ्यात बोलत असल्याचे पाहून नेने यांना राग आला.



रसिकराज यशवंतराव, नाट्य कलाकारांसमवेत. इतर मान्यवर वसंतराव साठे, विठ्ठलराव गाडगीळ,
एन० एम० कांबळे, ढाकणे, दाजी भाटवडेकर

पण यशवंतराव शांतपणे ऐकून घेऊन समजावणीच्या शब्दांत उत्तर देत होते. त्याच वेळी ठुमरीचे बादशहा बडे गुलाम अली आले आणि आपल्याला राहायला जागा द्यावी अशी त्यांनी विनंती केली. यशवंतरावांनी विचारले 'मुस्लिम मोहल्ल्यात हवी ना?' बडे गुलाम अली यांनी उत्तर दिले, 'छे, त्या मोहल्ल्यात नको. गायकांत व वादकांत मुसलमान बरेच असले तरी सामान्य मुसलमानांत शास्त्रीय संगीताचे शौकिन अत्यंत कमीच. त्यामुळे मला जागा हवी हिंदू मोहल्ल्यातच. माझ्या रियाजाला आदराने येऊन ऐकणारे लोक, मला त्या समाजातच मिळतील.'

नवे विचार समजून घ्यावे, वेगवेगळे ग्रंथ वाचावे ही यशवंतरावांची प्रवृत्ती होती, तरी ते व्यावहारिक राजकारणातील डावपेचांत कमी पडत नसत. राजकारणात हे अपेक्षित आहे. पण केवळ डावपेचांत ते व्यग्र नसत आणि आपल्या धोरणास काही वैचारिक अधिष्ठान असल्याचे ते दाखवून देत. वर काही बंधनांचा व निर्बंधांचा उल्लेख केला आहे. त्यांत आणखी एक घटक प्रत्येकाच्या स्वभावाचाही असतो, हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. यशवंतरावांचे काही विचार होते, काही भूमिका होत्या. पण या संबंधी ते दुराग्रही नव्हते. अगदी नक्षलवादाची चिकित्सा करतानाही ते, हे आंदोलन कोणत्या आर्थिक व



चित्रकार शां० ना० जाधव यांच्यासमवेत चित्ररसिक यशवंतराव



मा० यशवंतराव व राजा केळकर संग्रहालयाचे श्री० राजा केळकर



'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकाच्या शतकमहोत्सवी प्रयोगाप्रसंगी डॉ० काशिनाथ घाणेकर व त्यांचे साथी यांच्यासह संरक्षणमंत्री यशवंतराव व मुख्यमंत्री श्री० कन्नमवार

सामाजिक कारणांस्तव उद्‌भवले याकडे दुर्लक्ष करू शकत नव्हते. या संबंधात यशवंतरावांनीच न० चिं० ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त केलेले भाषण उल्लेखनीय ठरेल. ते म्हणाले : 'दुसऱ्याच्या म्हणण्यातील तथ्य ते (तात्यासाहेब) मान्य करीत–ते एकांतिक विचाराचे नव्हते, व्यवहारी व मध्यममार्गी होते–केळकरांची जी मध्यममार्गावर श्रद्धा होती त्यामागे एकतर त्यांचे त्याला अनुकूल सौम्य व बुद्धिवादी व्यक्तिमत्त्व होते आणि दुसरे, अनुभवी व्यवहारवाद होता.केळकरांनी मध्यमक्रमासंबंधी जे विवेचन केले आहे त्यात म्हटले होते की, मध्यमक्रम म्हणजे निखालस वाईटाशी तडजोड असा नाही, तर जे सामान्यत: चांगले म्हणून समजले जाते, त्याचीच मर्यादा शोधून तारतम्याने जे युक्त वाटेल , त्याचे आचरण म्हणजे मध्यमक्रम होय. ''सद्‌गुणांच्या आचरणातही तारतम्याने सुचविणारे मर्यादादर्शन असे त्याचे शास्त्रीय वर्णन केळकरांनी केले आहे''–भावना जेव्हा उद्दीपित होतात तेव्हा अशा वृत्तीच्या लोकांची उपेक्षा होते, तशीच ती केळकरांची झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात, यशवंतरावांची नुसती उपेक्षाच नाही, तर त्यांच्यावर टीकास्त्राचा चोहो बाजूंनी मारा झाला.

यशवंतरावांनी कोणतेही नवे उपक्रम हाती घेण्यापूर्वी अनेकांशी विचारविनिमय करण्याची प्रथा पाडली. किंबहुना असेही दिसेल की, महाराष्ट्र काँग्रेसमध्ये काही वर्षे त्यांचा शब्द अखेरचा मानला जात



लोकसाहित्याचा मानसन्मान डॉ० सरोजिनी बाबर आणि यशवंतराव



सिनेअभिनेता राज कपूर, वसंत देसाई, आशा भोसले, मुकेश आणि इतर कलावंतांसमवेत यशवंतराव व सौ० वेणूताई



जाहीर सभेत भाषण करताना

होता; तेव्हाही त्यांनी संघटना व मंत्रिमंडळ यांतील लोकांना प्रथम आपापले विचार मांडण्यास सांगण्यावर कटाक्ष ठेवला. त्यानंतर अधिकाधिक जणांना मान्य होणारा मार्ग सांगत असताना, आपले मत देण्याकडे त्यांचा कल असे. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी तत्त्वावरील उद्योग सुरू करताना अशा चर्चा झालेल्या होत्या. या सहकारी क्षेत्रातील उद्योगांमुळे महाराष्ट्राच्या काही ग्रामीण भागाचे जीवन बदलून गेले. यातून सामान्य लोकांतही आत्मविश्वास वाढला. कालांतराने या क्षेत्राची वाढ कुंठित झाली. महाराष्ट्र बँकेचे संस्थापक सी० व्ही० जोग यांच्या अभिनंदनपर ग्रंथास, (इकॉनॉमी ऑफ महाराष्ट्र) डॉ० वि० म० दांडेकर यांनी ७३ साली लिहिलेल्या प्रस्तावनेत म्हटले



वसंत देसाई यांच्या सत्कार करताना

होते, 'महाराष्ट्रात सहकारी चळवळ प्रारंभीच्या काळात यशस्वी झाली कारण महाराष्ट्र सरकारने तिला मदत केली आणि प्रोत्साहन दिले. परंतु आता हेच या चळवळीतील सध्याच्या अडचणींना कारणीभूत ठरत असल्याचे दिसते. ही चळवळ अधिकाधिक राजकारणग्रस्त होत आहे. तसेच तीमध्ये जी व्यापाराची वृत्ती हवी ती कमी होत असून भ्रष्टाचार वाढला आहे.' यशवंतरावांवर या अनिष्ट प्रवृत्ती पाहून व्यथित होण्याची वेळ आली होती. हे असे का झाले, असे ते स्वत:ला विचारत होते. याचे एक कारण डॉ. दांडेकरांनी नमूद केले होते. दुसरे कारण असे दिसते की, पहिला काळ ओसरल्यानंतर बहुतेकांचा स्वातंत्र्य आंदोलनाचा संपर्क राहिला नव्हता आणि जी वैचारिक बैठक असायला हवी ती नव्हती. अनेकांच्या बाबतीत धड व्यापार नाही आणि धड धेयवाद वा कल्याणकारी वृत्ती नाही, अशी अवस्था झाली आणि पुढे हे वाढतच गेले.

यशवंतरावांना विविध क्षेत्रांतील माणसांची चांगली पारख होती. त्यांनी हरिदेव शर्मा आणि लेले यांना अनेक तासांच्या ज्या प्रदीर्घ मुलाखती दिल्या होत्या, त्यांतून त्यांचे हे वैशिष्ट्य उठून दिसते. या मुलाखतींत महाराष्ट्राच्या राजकीय व्यक्तींचा निर्देश आहे तसाच तो देशाच्या निरनिराळ्या राज्यांतल्याही आहे. हेच वैशिष्ट्य परदेशी व्यक्तींच्या बाबतीतही दिसते. ६५ सालातील भारत-पाकिस्तान युद्धानंतर ताष्कंद इथे शांततेची बोलणी झाली. या परिषदेला संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव हजर होते. त्यांनी लिहिले, 'प्रेसिडेंट अयूब आणि भुत्तो या दोन्ही व्यक्तींना मी प्रथमच भेटलो. प्रे० अयूबला व्यक्तिमत्त्व आहे. उंचापुरा पठाण. चेहऱ्यावर नाटकी हास्य भरपूर, बोलणेही अघळपघळ आणि गोड. माणूस प्रामाणिक नाही वाटत. त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवणे अवघड–नव्हे धोक्याचे आहे.' निक्सन यांच्यानंतर आलेले जेराल्ड फोर्ड


ज्ञानपीठ पुरस्कारानिमित्त झालेल्या ज्येष्ठ साहित्यिक वि० स० खांडेकर यांच्या सत्कारप्रसंगी (खासबाग मैदान, कोल्हापूर)

व डेमॉक्रॅटिक पक्षाचे जिमी कार्टर यांची अध्यक्षपदासाठी प्रचारमोहीम चालू असताना, यशवंतराव अमेरिकेत होते. त्यांनी लिहिले की, 'निदान मला तरी कार्टर चलाख म्हणून धोकादायक वाटतो. फोर्ड गंभीर पण प्रामाणिक व्यक्ती वाटली.' हे नंतर तंतोतंत खरे ठरले. कार्टर यांची अध्यक्षीय कारकीर्द अयशस्वी झाली. ते अध्यक्ष असताना तेव्हांचे पंतप्रधान मोरारजी देसाई व कार्टर या दोघांनाही नैतिक श्रेष्ठत्वाचा गंड होता आणि अण्वस्त्रांचा प्रसार थांबवण्यावर त्यांचा कटाक्ष होता. अर्थात कार्टर अमेरिकेची अण्वस्त्रे कमी करण्यास तयार नव्हते. भारतास या संबंधी मदत न देण्याच्या बाबतीत त्यांच्या मनात जे होते ते ध्वनिक्षेपक बंद असल्याच्या समजुतीने त्यांनी बोलून दाखवले. खरोखरच त्यांची गैरसमजूत होती, का ते मुद्दामच तसे बोलले हे सांगणे कठीण आहे. आज अमेरिकेने तालिबान व अल् काईदाच्या संकटासंबंधी मोहीम काढली आहे. पण अफगाणिस्तानात सोव्हिएत युनियनने लष्कर पाठवले तेव्हा तिथल्या मुजाहिदांना शस्त्रास्त्रांची मदत देण्याचे धोरण कार्टर यांनी अवलंबिले. अमेरिकेची शस्त्रे मूलतत्त्ववादी तालिबानच्या हातांत जातील हे माहीत असूनही कार्टर यांनी ती दिली. कारण तालिबानपेक्षा सोव्हिएत हा मोठा शत्रू आहे असे ते मानत होते.

स्वत:चे सामर्थ्य आणि स्वत:च्या मर्यादा या दोन्हींची जाण असलेल्या व अधिकारपद भोगत असलेल्या वा भोगलेल्या व्यक्ती थोड्या दिसतात. यशवंतराव अशा व्यक्तींपैकी एक होते. शक्तिस्थानामुळे ते अहंकारी बनले नाहीत आणि मर्यादांमुळे काही पदे मिळाली नाहीत, म्हणून ते कुढत

बसले नाहीत. मुख्य म्हणजे ते पूर्णत: राजकारणग्रस्त नव्हते. साहित्य, संगीत, चित्रकला, नाटके, चित्रपट यांत ते आनंद घेत असत. त्यांनी आवडीची पुस्तके जमवली आणि शास्त्रीय संगीताची चांगली जाण असल्यामुळे त्याचा उत्तम संग्रह जमवला. या अशा छंदामुळे ऐन वेळीही ते एखाद्या विषयावर चांगले भाषण करीत. तरुणपणापासूनच यशवंतरावांना चांगली व्याख्याने ऐकण्याची आवड होती. श्रीनिवास शास्त्री, भुलाभाई देसाई, डॉ० राधाकृष्णन यांच्या उत्कृष्ट इंग्रजी भाषणांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. लोकसभेत त्या वेळी हिरेन मुखर्जी हे एकेकाळचे इंग्रजीचे प्राध्यापक, कम्युनिस्ट पक्षाचे खासदार होते. त्यांचे इंग्रजी भाषण फार सुंदर होत असे. यशवंतरावांनी लोकसभेत मुखर्जी यांच्या भाषणाची जाहीरपणे प्रशंसा केली होती.

गृहमंत्री असताना यशवंतरावांच्या कारभारकौशल्याचा व वाक्पटुत्वाचा खरा प्रत्यय आला. त्यांनीच लिहिले आहे की, 'एक वेळ पार्लमेंटमध्ये कम्युनिस्ट व नक्षलवादी यांच्यासंबंधी मला बोलावयाचे होते आणि त्या बोलण्याच्या ओघात मी सभागृह इतके ताब्यात घेतले, की एक वेळ अशी आली, की माझ्या वाक्याची सुरुवात झाल्यानंतर त्यातील पुढील शब्द कोणते असतील याची कल्पना विरोधी व माझ्या पक्षातील सदस्यांना येत होती. तसेच, वाक्याचा शेवट कसा करणार, याचे शब्द ते बोलू लागले. हा अनुभव विशेष होता.'

मराठी वक्त्यांत यशवंतरावांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व काकासाहेब गाडगीळ यांच्या भाषणांचा आपल्यावर प्रभाव पडला, असे म्हटले आहे. तर्कतीर्थांचे भाषण विचारांनी परिपूर्ण असते आणि काहीतरी नवे विचार ऐकायला मिळतात, असे यशवंतरावांनी लिहिले आहे. ना० सी० फडके यांच्या मराठी शब्दांच्या उच्चारांचा आपल्यावर परिणाम झाला असल्याचे सांगून, इतके स्वच्छ मराठी बोलणारा माणूस मी क्वचितच पाहिला आहे, अशी ग्वाही ते देतात. अशा अनेक वक्त्यांची भाषणे यशवंतरावांनी मनापासून ऐकली, पण त्यांनी कोणाचीही शैली उचलली नाही. महाराष्ट्रात ज्यांची भाषणे लोक आवडीने ऐकत, त्यांत यशवंतरावांचा समावेश होता. त्यांचे भाषण हे श्रोत्यांशी संभाषण केल्यासारखे असे. ते कधीही लांबलचक भाषण करत नसत. प्रत्येक भाषणात काही नवा मुद्दा असायचा. दुसरे म्हणजे त्यांनी उपदेशकाची भूमिका कधी घेतली नाही. त्यांनी प्रचंड जाहीर सभा जिंकल्या असल्या तरी त्यांचा भाषणाचा बाज संसदीय पद्धतीशी विशेष संवादी होता. यशवंतरावांचे विविध विषयांवरील ग्रंथवाचन, अनुभवाचे व्यापक क्षेत्र आणि लोकांपुढे आपले विचार मनापासून मांडण्याची धाटणी; यामुळे ते श्रोत्यांची मने जिंकत. यास जोड मिळाली होती ती त्यांच्या स्मरणशक्तीची. कालिदासाचे *मेघदूत* त्यांना अर्धेअधिक पाठ होते. आनंदीबाई शिर्के यांच्या कथेच्या जुन्या संग्रहाची व कथेची आठवण त्यांनी अनेक वर्षांनी शिर्के यांना दिली होती. ते काव्यप्रेमी असल्यामुळे त्यांना अनेक कविता पाठ असत.

वि० स० खांडेकर यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाची सभा कोल्हापुरात यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या सभेतील त्यांचे भाषण त्यांच्या रसिकतेचे व मर्मज्ञतेचे निदर्शक आहे. यशवंतराव त्यांच्या भाषणात म्हणाले, ''भाऊसाहेबांच्या नायकाने एखाद्या तरुणीच्या उजव्या गालावरची खळी पाहिली, म्हणजे आपण लहान असताना तळ्यात खडा मारल्यानंतर पाण्यात जे भोवरे फिरत-फिरत जातात, त्यांची त्यास आठवण व्हायची. भाऊसाहेबांचे वाङ्मय वाचायला घेतले, म्हणजे बीजेची कोर आली नाही किंवा चवथीचे चांदणे आले नाही, असे कधी व्हायचे नाही. भाऊसाहेबांच्या वाङ्मयात निदान मी कधी अमावास्या पाहिली नाही. ती बीजेची कोर असेल किंवा



ज्येष्ठ साहित्यिक–कादंबरीकार श्री० वि० स० खांडेकर यांना पुष्पहार अर्पण करताना




एका निवांत क्षणी पुस्तक वाचताना

चवथीचा चांद असेल किंवा अष्टमीचा चंद्रमा असेल किंवा पुनवेचा चांद असेल. असा हा चांदण्याचा लेखक आहे. प्रकाशाचा लेखक आहे. पण नुसता सहृदय लेखक नाही. तर भाऊसाहेबांच्या लेखामध्ये स्वप्नाळू सहृदयतेबरोबर निर्धारित क्रियाशीलताही आहे.''

यशवंतरावांची वाचनाची एक पद्धती होती. पुस्तक हाती घेतल्यावर ते पुढून मागून चाळत असत. मग मन लावून वाचत. ते करताना महत्त्वाच्या वाटलेल्या भागावर खुणा केल्या जात व काही वेळा शेरा मारला जाई. एखादा भाग शैली वा विचार या दृष्टीने विशेष आवडला तर ते खऱ्या ग्रंथप्रेमीप्रमाणे स्वत:शीच मोठ्याने वाचत. *राजसंन्यास, भाऊसाहेबाची बखर* इत्यादींचे कित्येक भाग त्यांना पाठ होते. ही अशी पुस्तके असोत की, मालकम मगरीज, केनान इत्यादींची पुस्तके असोत त्यांसंबंधी बोलण्यात आमचा बराच वेळ गेला आहे. रॉय जेन्किन्स हे यशवंतरावांचे आणखी एक आवडते लेखक. ते मजूर मंत्रिमंडळात मंत्री होते. नंतर मतभेदामुळे पक्षातून बाहेर पडले. ते एक विचारगर्भ व शैलीदार लिखाण करणारे लेखक होते. त्यांच्या लिखाणाचे चाहते म्हणून यशवंतराव लंडनच्या मुक्कामात त्यांना मुद्दाम भेटायला गेले होते.

परदेश प्रवासात काम संपले की, पुस्तके खरेदी करावी, प्रेक्षणीय स्थळे पाहावी आणि नाटक, संगीतिका यांचा आस्वाद घ्यावा असा यशवंतरावांचा कार्यक्रम असे. देशातल्या वा परदेशांतल्या विविध स्थळांची त्यांनी थोडक्यात मार्मिकपणे वर्णने केलेली दिसतील. यांत थोडा इतिहास, खास वैशिष्ट्य,



धनंजय कीर यांचा सत्कार करताना. सोबत बाळासाहेब देसाई



'दिल्ली दरवाजा' या संस्थेच्यावतीने दिल्लीत प्रथमच गणेशोत्सव साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी बोलताना



कलादालनातील छायाचित्र प्रदर्शन पाहताना. सोबत वसंतराव नाईक

एकंदर वातावरण ही सर्व येऊन जात. युरोप अमेरिकेतील अनेक शहरांतील नदीकाठ कसा शोभिवंत असतो, या संबंधी लिहिताना यशवंतरावांनी म्हटले आहे की, पानशेतनंतर पुण्याचा नदीकाठ शोभिवंत करण्याची योजना आपण ठरवली होती. पण नंतर महाराष्ट्र सरकारने तिचे पानशेत केले. कृष्णाकाठावरच्या वास्तव्यामुळे त्यांना नदी सर्वांत आवडती वाटे.

ज्या गावास वा शहरास भेट देतील त्याचा इतिहास जाणून घेण्याची सवय असल्यामुळे, यशवंतराव अनेक गावांची जी माहिती देतात ती उल्लेखनीय असे. काबूलला गेले असता त्यांनी बामियन या गावी गौतम बुद्धाचे दोन प्रख्यात पुतळे पाहिले. त्यांनी लिहिले, की त्यांच्या आसपास चंगीझखानाने केलेल्या प्रचंड विध्वंसाचे पुरावे दिसले. एकीकडे तो विध्वंस आणि दुसरीकडे करुणामय बुद्धाचे पुतळे. यशवंतरावांनी ते पुतळे पाहिल्यानंतर पंचवीस-तीस वर्षांनी चंगीझखानाचे वारस शोभणाऱ्या तालिबान्यांनी



रणजित देसाई यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना. सोबत बाळासाहेब देसाई



सुप्रसिद्ध साहित्यिक पु० ल० देशपांडे यांच्याबरोबर

हे पुतळे छिन्नविछिन्न करून टाकले. अफगाण हे नाव कसे पडले? तसा काही वंश नाही. काबूलच्या म्युझियमच्या चालकाने सांगितले की, अश्ववाहन यावरून अफगाणिस्तान झाले असे मानतात. अफगाणिस्तानात घोडेस्वारी हा राष्ट्रीय खेळ मानला जातो. विविध देशांतल्या म्युझियम्समध्ये जाऊन त्यांतील चित्रकलेचे व शिल्पकलेचे उत्तमोत्तम नमुने पाहण्याचा मनसोक्त आनंद यशवंतरावांनी घेतला. व्होल्गाच्या काठावरील युद्धाचे स्मारक अगदी वेगळे आहे. तेथे जणू युद्धच चालू असल्याचा भास व्हावा अशा प्रकारचे ते आहे, असे यशवंतराव सांगतात. सिमल्यासंबंधी लिहिलेल्या पत्रात यशवंतरावांनी सिमल्यावर एखादा सुरेख लेख लिहावा असे वाटते. तशीच इच्छा इतर काही वेळा त्यांनी व्यक्त केली होती. पण लिखाण झाले नाही. ना० सी० फडके यांनी यशवंतरावांच्या लिखाणासंबंधी लिहिले होते : ''भावनेने ओथंबलेलं, प्रभावी भाषेने नटलेलं लेखन जी लेखणी करू शकते ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातांत शोभावी अशीच ती आहे. यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हां जेव्हां मी घेतो तेव्हा माझ्या मनात येतं, यशवंतरावांच्या रूपानं महाराष्ट्राला व भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा, परंतु त्यांच्यावर पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचं पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही, ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. असं जरी असलं तरी भावी काळात त्यांच्यावरच प्रचंड साहित्य निर्माण होईल, याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.'' भावनेने ओथंबलेले, प्रभावी भाषेने नटलेले या शब्दांत अप्पासाहेब फडके यांनी यशवंतरावांच्या लिखाणाचे स्वरूप वर्णन केले आहे. त्याचा एक नमुना : ''महाबळेश्वरला एकाच ठिकाणी पाच नद्या उगम पावतात. डोंगराच्या वळचणींतून वेगवेगळ्या अंगांनी वाटा काढीत सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच बहिणींचे परस्परांवरचे प्रेम मोठे अमर्याद. जन्मस्थळी त्यांचे वेगळे अस्तित्व दिसते; पण ते तेवढ्यापुरतेच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे तोच त्या हातांत हात घालून, गोफ विणून, एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. मग मात्र यांतील कृष्णा कोणती, कोयना कोणती आणि वेण्णा कोणती? दिसते , ती एक धार. गोमुखातून ही शुभ्र धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत, वेगवेगळ्या वाटांनी या बहिणी निघून जातात. पुढे कुठेतरी डोंगरावरून उड्या मारताना दिसतात. परंतु एक गोष्ट मात्र खरी, उगमापासून शंभर मैलांच्या आंतच या बहिणींचा मिलाफ होतो आणि कराडपासून त्या कृष्णामय बनूनच सागराच्या भेटीसाठी निघतात. जरा धारदार अंगाची कोयना कराडला, आपल्या बहिणीला–कृष्णाबाईला कडकडून भेटते. संगमावर मग आनंदाचा कल्लोळ होतो. या ठिकाणी पोचलेल्या या सर्वजणींचे पंचामृत मोठ्या पात्रात साठते आणि सुगंधित आणि चविष्ट बनून पांथस्थांची तहान शमविण्यासाठी आणि आसपासच्या परिसरास दिलासा आणि ओलावा देण्यासाठी पूर्वमुखी होऊन दक्षिणेकडे निघते.'' सिमला, उटीपासून युरोप व अमेरिकेतल्या काही सुंदर शहरांची त्यांनी उत्तम वर्णने केली आहेत.

मायकेल फूट हे ब्रिटिश मजूर पक्षाचे नेते होते. ढंगदार व्यक्तित्वाचे मायकेल फूट, यशस्वी संपादक व लेखक होते. मजूर पक्षीय नेते अन्युरिन बेव्हन, हॅजलिट, एच० जी० वेल्स इत्यादींची त्यांनी लिहिलेली चरित्रे गाजली. त्यांची ग्रंथसमीक्षणे वैशिष्ट्यपूर्ण असत. त्यांनी म्हटले आहे की, 'सत्तापदावर असलेल्या व्यक्तींना वाचनासाठी वेळ नसतो; पण जे वाचत नाहीत ते सत्तापदावर राहण्यास पात्र नसतात.' यशवंतरावांचे ग्रंथप्रेम, वाचन आणि पाठांतर पाहिल्यावर मायकेल फूट ज्या प्रकारच्या अधिकारपदस्थांची अपेक्षा करत होते त्या वर्गात यशवंतरावांची गणना होत होती.

वयाच्या पहिल्या काही वर्षातील गरिबी व तीमुळे होणारी ओढाताण, नंतर राजकारणातील धकाधकी यांमुळे यशवंतरावांचे मन निबर न बनता, ते कायम संवेदनशील राहिले. ज्याप्रमाणे राजकारणामुळे संवेदनशीलता कमी झाली नाही त्याचप्रमाणे संवेदनशीलतेमुळे अधिकारावर असताना आवश्यक असेल तेव्हा खंबीरपणे निर्णय घेण्यात कसूर केली गेली नाही. यशवंतरावांच्या व्यक्तिगत गुणांचा अनुभव त्या वेळच्या अनेकांना आला. त्याची ओळख नंतरच्या पिढीच्या लोकांना या संबंधात कोणी काय लिहून ठेवले असेल, त्यावरून होऊ शकते. कर्तबगार व्यक्ती त्यांच्या अंगच्या गुणांमुळे त्यांच्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावतात; पण अनेकदा असे दिसते की, त्यांच्या हयातीनंतर त्यांच्या आठवणी राहतात, पण त्यांच्या मागे त्यांच्या कार्याचा मागमूस राहत नाही.

याचे कारण अशा अनेक व्यक्तींनी संस्थात्मक असे बदल केले नसतात. मरणोत्तर कीर्तिरूपाने जगलेले अनेक मिळतात, पण दीर्घकाळ समाजाच्या जीवनावर परिणाम होतो, तो अशा व्यक्तीने संस्थात्मक परिवर्तन घडवून आणले असेल तर. एकदोन उदाहरणे द्यायची तर महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन करून, महाराष्ट्रात महिला शिक्षणाच्या प्रसाराची कायमची सोय केली. नंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार करणारी संस्था स्थापन केली आणि तिचा विस्तार होत गेला. यास प्रारंभ झाला तो छत्रपती शाहू महाराजांच्या राजवटीत. या धर्तीवर यशवंतरावांनी मराठवाडा (नंतर डॉ० बाबासाहेब आंबडेकर असे नामांतर झालेले) व कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी विद्यापीठ यांची स्थापना करण्याच्या कामी पुढाकार घेतला. त्याचबरोबर महाराष्ट्रात भांडवलसंचय होण्यास मर्यादा पडलेली असताना, सहकारी तत्त्वाचा स्वीकार करून सहकारी साखर कारखान्यांना मोठी चालना दिली. यात नंतर दोष निर्माण झाले असतील, पण निदान पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रमीण जीवनात मोठे परिवर्तन होण्यास ही चळवळ कारणीभूत झाली. महाराष्ट्राच्या जीवनावर यामुळे दीर्घकालीन परिणाम झाला.

आज महाराष्ट्र हा देशाचा एक घटक आहे असे न मानता, तो वेगळा असल्याची भूमिका घेऊन राजकारण करण्याची घातक प्रवृत्ती बळावत चालली आहे. इतकेच नव्हे, तर निवडणुकीच्या राजकारणामुळे जाती व पोटजाती यांच्या नावावर राजकारण होऊ लागले आहे. अशा वेळी महाराष्ट्र मोठा व्हावा, पण देश मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल, ही यशवंतरावांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. यशवंतरावांचे व्यक्तित्व विवेकी तर कर्तृत्व विधायक होते. म्हणून संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वीच्या काळातील कमालीचे तापलेले वातावरण ते बरेचसे शांत करू शकले आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर अनेक लोकोपयोगी उपक्रम त्यांनी राबवले. यशवंतरावांनी दोन विद्यापीठे स्थापन करून फार वर्षांची लोकांची मागणी पुरी केली. सहकारी क्षेत्र व्यापक व चैतन्यशाली बनवून विधायक कर्तृत्वाला आणि सार्वजनिक पुरुषार्थाला वाव दिला. यामुळे अनेक संस्था वाढल्या व कार्यकर्ते तयार झाले. यशवंतरावांचे हे खरे स्मारक असून ते स्मरणात राहणारे आहे.



आबासाहेब कुलकर्णी, अण्णासाहेब शिंदे यांच्यासमवेत



अण्णासाहेब शिंदे, यशवंतराव यांचे स्वागत करताना



पुणे येथील सभेत भाषण करताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत



शंकरदयाळ शर्मा यांच्यासमवेत



विचारमग्न क्षणी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत



करणसिंग यांच्यासमवेत



श्रीनगरचे सौंदर्य डोळ्यांत साठवताना



# जन्मशताब्दी वर्ष

## २०१२ - २०१३

॥ शुभारंभ सोहळ्याची छायाचित्रे ॥

जन्मशताब्दी वर्ष

२०१२ २०१३



महामहिम राष्ट्रपतींचे आगमन







राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन्,
महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील,
मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण,
केंद्रीय कृषिमंत्री ना. शरद पवार







श्री. देवीसिंह शेखावत, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना. प्रफुल्ल पटेल, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री ना. विलासराव देशमुख, राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन, महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील, मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय कृषिमंत्री ना. शरद पवार, केंद्रीय ऊर्जामंत्री ना. सुशीलकुमार शिंदे व मार्शल ऑफ द इंडियन एअरफोर्स अर्जन सिंग.

# मराठी संदर्भ ग्रंथ


काळे बाबुराव बालाजी, *यशवंतराव चव्हाण*, गो० य० राणे, पुणे
कालेलकर भा० क्र०, *यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
कुलकर्णी ल०ग०, सातारचे पत्री सरकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई
कुंटे द० का०, *वाटचाल*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
खांडेकर वि०स०, *एस०एम० जोशी गौरव ग्रंथ*, श्रेयस मुद्रण, मुंबई
गाडगीळ न० वि० ऊर्फ काकासाहेब, *पथिक* (तीन खंड) व्हीनस प्रकाशन, पुणे
गोखले पु०पां०, *जागृत सातारा*, लोकसेवा संघ प्रकाशन, कोल्हापूर
गोडबोले माधव, अपुरा डाव,
घाटे वि०द०, *दिवस असे होते*, मौज प्रकाशन, मुंबई
चपळगावकर नरेंद्र, *कर्मयोगी संन्यासी*, मौज प्रकाशन, मुंबई
चव्हाण यशवंतराव, *कृष्णाकांठ*, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे
*ऋणानुबंध*, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे
*भूमिका*, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे
*सह्याद्रीचे वारे*, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
*विरंगुळा*, संपादक, रामभाऊ जोशी, श्रीयशोदा प्रकाशन, पुणे
*विदेशदर्शन*, श्रीयशोदा प्रकाशन, पुणे
*विधिमंडळातील भाषणे*
*युगांतर*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
*शब्दांचे सामर्थ्य*, संपादक, राम प्रधान, प्र० सौ० वेणुताई चव्हाण स्मारक, मुंबई
जावडेकर शंकर दत्तात्रय, *आधुनिक भारत*, रघुनाथ गणेश जोशी, पुणे
जोशी एस० एम०, *मी एस० एम०* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
जोशी लक्ष्मणशास्त्री, संपादक, *श्री० यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ*, मुंबई.
जोशी रामभाऊ, *यशवंतराव: एक इतिहासाचे पान*, केसरी प्रकाशन, पुणे
तळवलकर गोविंद, *भारत व जग*, मौज प्रकाशन, मुंबई
देवगिरीकर त्र्यं० र०, *राजकीय आठवणी*. प्र० चित्रशाळा प्रकाशन, पुणे
देव शंकरराव, *संयुक्त महाराष्ट्र आंदोलन*, भाऊ धर्माधिकारी, दास्ताने, देवकीनंदन नारायण, पुणे
देशमुख दत्ता, *मी दत्तुचा दत्ता कसा झालो*
नाईकनवरे विश्वास, *तिरपी टोपी ताठ मान, कै० शंकरराव मोरे यांचे विचारविश्व*, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे

पवार गो० मा० *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे*, लोकवाङ्मय गृह, मुंबई
पाटील पांडुरंग चिंतामणी, *माझ्या आठवणी*, मौज प्रकाशन, मुंबई
पाटील उत्तमराव, *क्रांतिपर्व*, उषा प्रकाशन, औंध
पाटील रा०तु०, *यशवंतराव चव्हाण, एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी*, राजे-देसाई प्रकाशन, कोल्हापूर
फडके य० दि०, *केशवराव जेधे*, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
फडके य०दि०, *विसाव्या शतकातील महाराष्ट्र*, खंड ६ ते ८, मौज प्रकाशन, मुंबई
बाबर सरोजिनी, सं०, *मी पाहिलेले यशवंतराव*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
बेडेकर दि० के०, *संयुक्त महाराष्ट्र*, के० एस० गुप्ते, पुणे
माडगूळकर ग० दि०, *मंतरलेले दिवस*, साधना प्रकाशन, पुणे
लिमये नरूभाऊ, *वीस चोक ऐंशी*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

# Bibliography


Alexander P. C., *My Years with Indira Gandhi,* Vision Books, Delhi

Ambedkar B R., *Maharashtra as a Linguistic Province,* Statement submitted to the Linguistic Provinces Commission Published.

Austin Granville, *The Indian Constitution,* OUP, Delhi

Austin Granville, *Working Democratic Constitution : the Indian Experience,* OUP, Delhi

Brecher Micahel, *Nehru's Mantle the Politics of Succession in India, Praeger,* NY

Carras Mary C., *The Dynamics of India Political Factions,* CUP, Cambridge

Carter Anthony, *Elite Politics in Rural India,* CUP, London

Chaudhuri J. N., *Autobiography,* Vikas, Bombay

Chaudhuri J. N., *Arms Aims and Aspects,* Manaktala, Bombay

Deshpande, S. H. ed., *Economy of Maharashtra,* Samaj Prabodhan Sanstha, Pune

Dev Narendra, *Socialism and the National Revolution,* Anupama Publishing, Delhi

Dhar P. N., *Indira Gandhi, the Emergency and Indian Democracy,* OUP, Delhi

Dhar P. N., *Evolution of Economic Policy in India : Selected Essays,* OUP, Delhi

Gadgil D. R., *Federating India, Gokhale Institute of Politics,* Pune

Haksar P. N., *Premonition, Interpress,* Bombay

Hangen Welles, *After Nehru Who?,* Harcourt, Brace and World, NY

Hardgrave Robert L., *The Nadars of Tamilnad, the Political Culture of a Community in Change,* University of California Press, Berkeley

Harrison Selig, *India : The Most Dangerous Decades,* PUP, Princeton,

Hart Henry ed., *Indira Gandhi's India : A Political System Reappraised,* Westview Press, Bouldar

Kashyap Subhash, *The Politics of Defection,* National Publishing House, Delhi.

Kochanek Stanley, *The Congress Party of India : The Dynamics of One-Party Democracy,* PUP, Princeton,

Kunhi Krishnan T. V., *Chavan and the Troubled Decade,* Somaiya Publications, Bombay.

Lele Jayant, *Elite Pluralism and class Rule : Political Development in Maharashtra*

Malhotra, Inder, *Indira Gandhi,* Northeastern University Press. Boston

Nehru B. K., *Nice Guys Finish Second,* Viking, Delhi

Nehru Jawaharlal, *A Bunch of Old Letters,* Asia Publishing House, London

Nehru Jawaharlal, *Selected Works of Nehru Vols.,* 21-39, Delhi

Omvedt Gail, *Cultural Revolt in a colonial Society, The Non Brahman Movement in Western India : 1873- to 1930,* Scientific Socialist Education Trust, Bombay

Pandey Gyanendra, *Indian Nation in 1942, Center for Studies in Social Science Calcutta*

Patel I. G., *Glimpses of Indian Economic Policy,* OUP, Delhi

Pradhan R. D., *Debacle to Revival: Y. B. Chavan as Defence Minister 1962-1965,* Orient Longmans, Delhi

Pradhan R. D., *Ed. Y. B. Chavan : Selected Speeches in Parliament 4 Vols.,* Ameya Prakashan, Pune

Rahman, M. M., *The Congress Crisis,* Associated Publishing House, Delhi

Roach James R., *India's 1957 Elections , Far Eastern Survey, Vol. 26, No 5,* May 1957

Rosenthal Donald B., *The Expansive Elite , District Politics and State Policy-Making in India,* University of California Press, Berkeley, 1977

Sarkar Bidyut, P. N. Haksar, *Times and the Man,* Allied Publishing Ahamedabad.

Sharma Hari Dev Ed., *Selected Works of Acharya Narendra Deva, Vol. 2,* 1941-1948, Radiant Publishers, Delhi

Sirsikar V. M., *Political Behaviour in India,* Manaktalas, Bombay

Sirsikar V. M., *Rural Elite in a Developing Society,* Orient Longmans, Delhi,

Stern Robert W., *The Process of Opposition in India : Two Case Studies of How Policy Shapes Politics :* University of Chicago Press, Chicago



G02187
02/06/2012



व्यासंगी विचारवंत श्री० गोविंद तळवलकर यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या चित्रचरित्रास प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. यासाठी त्यांनी अनेक मराठी व इंग्रजी पुस्तकांचा आधार घेतला; अप्रकाशित मुलाखतीही मिळवल्या. लेखक व यशवंतराव यांचे स्नेहाचे संबंध पूर्वीपासून असल्यामुळे अनेक घटनांचा संदर्भ त्यांना माहीत होता. स्नेही असूनही प्रस्तावना लिहिताना जितकी वस्तुनिष्ठता दाखवता येईल तितकी दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

---

सव्यसाची लेखक, इतिहासकार व प्रभावी संपादक म्हणून तळवलकर सर्वश्रुत आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'चे अठ्ठावीस वर्षे ते संपादक होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण, साहित्य, संस्कृती, समाजकारण, अर्थकारण व इतिहास यांवरील त्यांचे अभ्यासपूर्ण, सुबोध व निर्भीड लेख व अग्रलेख गाजले. काही ग्रंथरूपात प्रसिद्ध झाले. परदेशप्रवासाचे पडसादही त्यांच्या लिखाणातून उमटत होते.

मराठी व इंग्रजी पुस्तकांचा परिचय करून देऊन ग्रंथप्रेम वाढवण्यावर त्यांचा कटाक्ष होता. हे लेख तसेच देशी व परदेशी वृत्तपत्रे व नियतकालिकांची ओळख करून देणारी लेखमाला यांचे ग्रंथसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

आजही त्यांचे लिखाण वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून येत असते. 'नवरोजी ते नेहरू' या ग्रंथात हे दोघे व त्यांच्या दरम्यानच्या प्रमुख भारतीय पुढाऱ्यांत कोणते समान दुवे होते याचे विवेचन तळवलकरांनी केले आहे. आधुनिक भारताच्या राजकीय इतिहासावरील 'सत्तांतर : १९४७' (तीन खंड), तसेच 'लोकमान्य टिळक', 'न्या० रानडे' व 'नेक नामदार गोखले' या त्यांच्या ग्रंथांचे स्थान अनन्यसाधारण आहे. गोखल्यांवरील पुस्तक इंग्रजीतही लिहिले आहे.

सोव्हिएत युनियनची सत्तरएक वर्षांची सत्ता संपुष्टात आल्यामुळे जगाच्या इतिहासास नवे वळण लागले. पूर्व युरोपचे स्वरूप बदलत असताना ते पाहून आल्यावर 'बदलता युरोप' व चार खंडांतील 'सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त' हे ग्रंथ तळवलकरांनी लिहिले. इराक व अफगाणिस्तानमधील युद्धांवरही पुस्तके लिहिली.

---

सोव्हिएत युनियनच्या अस्तानंतर जगाबरोबर भारताचेही राजकारण व अर्थकारण बदलणे अनिवार्य होते. याचे विवेचन 'भारत आणि जग' या त्यांच्या ग्रंथात आहे.

“ लोकशाही राज्यकारभारामध्ये, मी चांगले काम करतो, लोकांच्या उपयोगाचे काम करतो एवढी कसोटी अपुरी आहे. काम चांगले तर केलेच पाहिजे, पण काम चांगल्या प्रकारे झाले आहे याची प्रचीती आली पाहिजे, लोकांना ते जाणवले पाहिजे. म्हणूनच मी म्हणतो की राज्यकारभाराची खरी कसोटी, लोकांच्या समाधानात आहे. सरकार चांगले असून उपयोग नाही, तर सरकार चांगले आहे, राज्यकारभार चांगला चालला आहे असे लोकांना वाटले पाहिजे, जाणवले पाहिजे. तरच तो सरकारी कारभार चांगला म्हणता येईल. ”

यशवंतराव चव्हाण

ISBN 978-81-7486-995-1

9 788174 869951 >

किंमत पाचशे रुपये